# अभंग-भारत

## खंड २ रा

श्री. अन्नपूर्णाबाई द. नरोळे

रा. ठाणे यांचेकडून

सप्रेम भेट

20/7/63

आषाढी एकादशी

ॐ

चैतन्य ग्रंथ-माला, पुष्प १२ वें

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## खंड ३ रा

६ भीष्मपर्व, ७ द्रोणपर्व, ८ कर्णपर्व, ९ शल्यपर्व,
१० सौप्तिकपर्व व ११ स्त्रीपर्व.



ग्रंथकार

कीर्तनवाचस्पति वासुदेव शिवराम कोल्हटकर
संस्थापक—धर्मचैतन्य संस्था, पुणें २.

★

शके १८७३ ]  मूल्य ७॥ रुपये  [ तुकारामबीज.

प्रकाशक :
वासुदेव शिवराम कोल्हटकर
धर्मचैतन्य संस्था, सदाशिव पेठ,
पुणें २.

सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन

मुद्रक :
अण्णाजी देवराव इनामदार
श्रीशारदा मुद्रणालय
२८१ बुधवार पेठ, पुणें २.

सादर समर्पण—

# आचार्य देवोभव



नमो सत्यवतीसुता वेदव्यासा । प्रभो, विष्णुरूपा द्वैपायना ॥ १ ॥
ब्रह्मसूत्रें अष्टादश पुराणांचा । मुने, तूंचि कर्ता ज्ञानरूप ॥ २ ॥
गुरो, आचार्यांचा मुख्य तूं आचार्य । धर्माचारधैर्य देई मना ॥ ३ ॥
तुझें तूं भारत करूनि सुलभ । दाविलासी मार्ग जनांप्रति ॥ ४ ॥
निमित्तमात्र हा देह केला माझा । परी बोलविता तूंचि गुरो ॥ ५ ॥
वदली जें वाणी घडो तेंचि आतां । क्रियेवीण वाचा व्यर्थ माझी ॥६॥
त्वत्प्रसादें ग्रंथ होवो हा तारक । ग्रंथीं या सामर्थ्य सकळ असो ॥७॥
वासुदेव म्हणे आचार्या हे देवा । मस्तकीं ठेवावा कर माझ्या ॥ ८ ॥

श्री

# प्रास्ताविक निवेदन

**—ॐ नमो भगवते वासुदेवाय—**

योगेश्वर श्रीकृष्णाच्या कृपेनें आणि भगवान् व्यासमहर्षींच्या आशीर्वादानें अभंग-भारताचा हा तिसरा खंड आज वाचकांच्या हातीं देण्याचें सद्भाग्य मला लाभत आहे. पुणेंकरांस अविस्मरणीय असा आमच्या धर्मचैतन्य संस्थेंतील मूर्तिस्थापनेचा परममंगल आणि भव्य महोत्सव आणि शांति-पर्वांतील मोक्षधर्मावरील अभंग करण्यासाठीं आमचें श्रीबद्रीनारायणक्षेत्रीं गमन आणि तेथील वास्तव्य इत्यादि पूर्वसंकल्पित कार्यांमुळें अभंग-भारताच्या या तिसऱ्या खंडाचें प्रकाशन वर्षभर उशीरांच होईल असें मी कीर्तनांतून बोललों होतों. परंतु 'लौकिक अंदाजापेक्षां अलौकिक संकेतच खरे असतात' हाच या वेळीं आम्हांस आश्चर्यकारकरीतीनें अनुभव आला.

भगवान् व्यासांनीं भारत रचलें पण त्यांनाही त्याच्या प्रसारासंबंधीं चिंताच उत्पन्न झाली. 'कथमध्यापयानीह शिष्यानित्यन्वचिन्तयत्' असें आदिपर्वांत म्हटलेंच आहे. पण तेथेंच "अनेक कवींनीं हें भारत आजपर्यंत गाइलें आहे, गात आहेत आणि 'आख्यास्यन्ति तथैवान्ये इतिहासमिमं भुवि' पुढेंही इतर कवि (आपापल्या भाषेंत) या भूलोकांत हें भारत गातील." असेंही सांगितलें आहे. त्यामुळें या कार्यास आपणास एक तऱ्हेनें आशीर्वादच आहे असेंच मनानें घेतलें आणि अजूनपर्यंत तें सत्यच आहे असाच अनुभव आला आहे.

यंदां श्रीगणेशचतुर्थीला पुणें येथें धर्मचैतन्य संस्थेंत पूर्वसंकल्पाप्रमाणें पांच वर्षांत अभंग-भारताची कविता पूर्ण होऊन तें संपूर्णपणें कीर्तनांत गाइलें गेलें आणि तें भगवत्चरणीं अत्यंत लीनतेनें अर्पण करण्याचा

समारंभही अवर्णनीय असाच झाला. त्या वेळीं पुण्याच्या श्रोत्यांनीं पांच वर्षांच्या या ज्ञानयज्ञाची समाप्ति म्हणून ग्रंथाची अक्षरशः सुवर्णानें महापूजा केली, आणि कोणास जन्मांतही पहावयास सांपडणार नाहीं असा समारंभ करून आपल्या दृष्टीचे पांग फेडले. त्या सुवर्णाच्या सुमारें १,१०० रुपयांचा या खंडाच्या प्रकाशनाचे कामीं बहुमोल उपयोग झाला आहे.

पहिल्या व दुसऱ्या खंडाच्या प्रास्ताविक निवेदनांत भारतासंबंधीं व त्या त्या खंडांतील विषयांसंबंधीं थोडें थोडें लिहिलें आहेच. या खंडांत सर्वच युद्धाचा विषय आहे पण सुरवातीलाच श्रीमद्भगवद्गीता आली असून गीतेची माहिती नाहीं असा दुर्भागी निदान या भारतांत तरी कोणी असेल असें वाटत नाहीं.

## अभंग-गीता

अभंग-गीतेंत गीतेचा सिद्धांतानुसारी सरळ अर्थ शक्य तितक्या सोप्या-भाषेंत देण्याचा प्रयत्न केला आहे. या अभंग-गीतेच्या पठनचिंतनानें कोण-त्याहि नुसत्या मराठी भाषांतर वाचून होणाऱ्या आनंदापेक्षां अधिक लाभ होईल असा विश्वास आहे. प्रत्येक श्लोकाचा अर्थ सुस्पष्टपणें देऊन गुंतागुंतीच्या आणि संदेहाच्या ठिकाणीं एखाद्याच चरणांत पण निःसंदिग्धपणें अर्थ प्रति-पादन करण्याची दक्षतेनें काळजी घेतली आहे. हे सर्वच अभंग श्रीमदाद्य-शंकराचार्यांच्या भाष्याचें पूर्ण साह्य घेऊनच झालेले असल्यामुळें आईचा हात धरून चालणाऱ्या मुलाप्रमाणें संपूर्ण अभंग-गीतेंत भाष्याचा पालव कोठेंही सुटलेला नाहीं असेंच गीताभ्यासकांच्या ध्यानीं आल्यावांचून राहणार नाहीं.

असें करण्यांत मूळ गीतेचा अर्थ सुगमतेनें वाचकांच्या ध्यानीं यावा हाच उद्देश. गीतेच्या निर्णयाबद्दल इतकी चर्चा आणि काथ्याकूट झालेला आहे कीं, आतां वाचकांना त्याबद्दल उत्सुकतेपेक्षां उपेक्षाच अधिक उत्पन्न होऊं लागलेली आहे. पण गीतेबद्दल हें विशेष आहे कीं, मूळ गीता-ग्रंथाबद्दल कोणीच विरुद्ध नाहीं आणि म्हणूनच अभंग-गीतेचा सर्वांना सारखाच उपयोग झाल्यावांचून रहाणार नाहीं.

संपूर्ण महाभारत हें एक बहुमोल महावस्त्र आहे असें म्हटलें तर त्याची वीणच अशी आहे कीं, गीता, विदुरनीतीप्रमाणें प्रत्यक्ष उपदेशाचा विषय

असो, शकुंतला-दमयंतीप्रमाणें कथाप्रसंग असो अथवा भीष्म, द्रोण, कर्णपर्वादि युद्धप्रसंग असो ' नाग, मूद, कंकण ' इत्यादि सर्व सुवर्णविकारांत जसें सर्वत्र सुवर्णच असावयाचें तसेंच महाभारतांत सर्वत्र ज्ञानच असावयाचें असा निर्णय निश्चयानें देण्यास कांहींच हरकत नाहीं. या तृतीय खंडांत सर्व युद्धाचीं पर्वेंच आहेत. यांत काय वाचायचें आहे ? असें प्रथम मनांत येणें स्वाभाविक आहे पण एकेक पर्व वाचण्यासाठीं हातांत घ्यावें तों तें संपलें केव्हां तेंच समजत नाहीं इतका वाचक त्यांत रंगून जातो. कांहीं प्रसंग तर विविध दृष्टीनें इतके बहारीचे आहेत कीं, ते पुनः पुनः अनेक वेळां वाचले तरी तृप्ति होत नाहीं. असा हा अभंग-भारताचा तृतीय खंड वाचकांच्या हातीं देतांना माझ्या पुण्याच्या श्रोत्यांप्रमाणेंच मुंबापुरवासी श्रोत्यांचाही कृतज्ञतेनें उल्लेख केल्यावांचून हें निवेदन पुरें करणें शक्यच नाहीं.

## द्वितीय खंडाचा थाटाचा प्रकाशन-समारंभ

मुंबईतील अभंग-भारताच्या द्वितीय खंडाचा प्रकाशन-समारंभ म्हणजे तेथील धर्माभिमानी जनतेला एक अपूर्व अशी पुण्यपर्वणीच होती. ठाकुरद्वार येथील श्रीव्यंकटेशमंदिराच्या उत्साही कार्यकर्त्यांनीं ह्या समारंभाचें नेतृत्व आपण होऊन मोठ्या उत्साहानें स्वीकारिलें होतें. मार्गशीर्ष शु. १ शके १८७२ ( दि. १० डिसेंबर १९५० ) या दिवशीं श्रीव्यंकटेशमंदिरांत उत्कृष्ट आरास केली होती. अंगणांतील औदुंबराच्या वृक्षाखालीं एका भव्य सिंहासनावर ग्रंथस्थान उभविलें होतें. त्याला लागूनच भव्य व्यासपीठाची योजना केली होती. शेठ गंगाराम क्षत्रिय यांच्या वाडींत श्री. गणेश जनार्दन फाटक यांचे एथें आमचा मुक्काम असल्यामुळें तेथून विधियुक्त ग्रंथपूजन करून ग्रंथाची पालखींतून मोठ्या थाटानें २ तास मिरवणूक काढून भजन करीत शेंकडों स्त्री-पुरुषांच्या मेळाव्यांत आणि चौघडा आदि मंगलवाद्यांच्या निनादांत पालखी समारंभस्थळीं आली. त्यावेळीं समारंभस्थळ सहस्रावधि स्त्री-पुरुषांनीं फुलून गेलें होतें. या समारंभास पुणें, कल्याण, ठाणें, तारापूर, बृहन्मुंबई, आंजर्लें, दापोली, रत्नागिरी, पेण, पनवेल, अलिबाग इ. अनेक ठिकाणचे भारतप्रेमी लोक मुद्दाम उपस्थित राहिले होते.

ग्रंथस्थानीं अभंग-भारत प्रकाशन-समितीच्या अध्यक्षांनीं जोडप्यानें

ग्रंथाची स्थापना केल्यावर समारंभाचे अध्यक्ष श्री १०८ दीक्षित महाराज यांच्या हस्तें ग्रंथाचें प्रकाशन झालें. त्या वेळीं वेदोक्त आशीर्वाद, ईशस्तवन, स्वागतपद्य इत्यादिकांनीं सभास्थान पावन मंगलध्वनीनें दुमदुमून गेलें होतें. नंतर वैदिक, सौभाग्यवती व कुमारिका यांच्याकडून ग्रंथांची सुवर्णपुष्पांनीं पूजा झाल्यावर १८ कुमारिकांनीं नीरांजनें ओंवाळून या ग्रंथाची आरती केली. त्यावेळीं मंदिराच्या त्रिपुर स्तंभावरही दीप लावण्यांत आले होते. त्यावेळचें मंगल-गंभीर वातावरण आणि तें हृदयंगम दृश्य अलौकिक आणि अपूर्व असेंच होतें.

हा समारंभाचा कार्यक्रम सुमारें चार-पांच तास चालला असूनही सहस्रावधि स्त्री-पुरुप अत्यंत शांतपणें चित्राप्रमाणें तटस्थ होऊन तो अपूर्व आनंद लुटीत होते. या समारंभासाठीं सॉलिसिटर मोतीराम विनायक जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं ' अभंग–भारत ग्रंथ प्रकाशन समारंभ-समिति ' या नांवाची एक समिति स्थापन करण्यांत आली होती. त्या समितीतर्फें सुमारें ४०–५० स्त्री-पुरुषांनीं जमविलेले ३५०० रुपये अध्यक्षांच्या हस्तें तृतीय खंडाच्या प्रकाशनासाठीं आम्हांस देण्यांत आले

महाभारताचें अभंगांत रूपान्तर करणें आणि तें छापणें या दोन गोष्टींत ग्रंथ छापणें हें काम अत्यंत खर्चाचें असल्यामुळें वरीलप्रमाणें मदत करणारांचे आभार कोणत्या शब्दांत मानावे हेंच समजत नाहीं. ' अभंग–भारत प्रकाशन समिति ' ही संपूर्ण ग्रंथ प्रकाशित झाल्यावरच बरखास्त होईल असेंही अध्यक्षांच्या इच्छेप्रमाणें समितीनें ठरविलें आहे. या समितींत अविश्रांत श्रम घेणाऱ्या पुढील बंधु-भगिनींचा प्रामुख्यानें उल्लेख केल्यावांचून राहवतच नाहीं.

सौ. सिंधुबाई तळपदे, सौ. रुक्मिणीबाई दामले, सौ. सावित्रीबाई अभ्यंकर, सौ. गोदूताई दामले, सौ. लक्ष्मीबाई भिडे (कुर्ला), सौ. गोपिकाबाई बर्वे (तारापूर), तसेंच सॉलिसिटर श्री. मोतीराम विनायक जयकर, रा. सा. सी. बी. वेलकर, श्री. मोतीराम आत्माराम जयकर, श्री. शिवशंकर वासुदेव तळपदे, श्री. कृष्णाजी महादेव दामले, श्री. गणेश जनार्दन फाटक, श्रीमती रमाबाई गोंधळेकर, कु. शालिनी मुकुटे, श्रीमती इंदिराबाई करमरकर इ०. यांवांचून ज्यांनीं समितीच्या विनंतीस मान देऊन पावती-पुस्तकें घेऊन

वरील बंधु-भगिनींप्रमाणेंच द्रव्यसहाय्य जमविण्याचें अवघड कार्य केलें त्यांचाही मी ऋणी आहें. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें :—

श्री. श्रीकृष्ण चिंतामण उपाध्ये, श्री. मनोहर यशवंत देसाई, श्री. यशवंत विठोबा देसाई, श्री. सुरेंद्रनाथ गोपिनाथ पतंगे, वे. मू. गंगाधर महादेव केळकर गुरुजी, श्री. अनंत सखाराम पटवर्धन, श्री. शंकर गंगाधर लळित, श्री. हरि कृष्णाजी लेले, श्री. यशवंत गणेश शेंड्ये, श्री. वासुदेव रामकृष्ण कर्णिक, श्री. रामचंद्र महादेव बर्वे, वे. मू. वझे गुरुजी, श्री. जयंत रामदत्त देसाई, श्री. मनोहर रामचंद्र दारशेतकर, श्री. सीताराम गोविंद गोडे, श्री. रंगनाथ रामचंद्र मालशे, श्री. गणेश वासुदेव सहस्रबुद्धे, श्री. वामन चिंतामण वैद्य, श्री. बाळकृष्ण परशुराम बापट, श्री. गणेश वासुदेव हर्डीकर, श्री. अवधूत नरहरी आघारकर, श्री. रामचंद्र दामोदर केतकर, सौ. सुमती मराठे, सौ. सरस्वतीबाई किरकिरे, सौ. सुमतीबाई मुळ्ये, सौ. प्रतिभाबाई भिडे, सौ. कमला शेट्ये, श्रीमती माई जोगळेकर, श्रीमती इंदिराबाई ताठोरे, श्रीमती पार्वतीबाई बोडस, सौ. वसुंधरा मराठे, सौ. बकुळ देवकुळे.

**तसेंच या खंडास २५ रुपयांची उदार मदत करणारांचीं नांवें:—**

सौ. सुशिलाबाई पुरुषोत्तम नालावाला ( कै. शाहा जयंतीलाल वी. नालावाला यांचे स्मरणार्थ ), श्री. पु. म. भागवत, श्रीमती इंदिराबाई बापट, श्रीमती आवडाबाई सामंत, श्रीमती शारदाबाई वसंत रेळे ( कै. डॉ. वसंत गंगाराम रेळे यांचे स्मरणार्थ ), श्रीमती पार्वतीबाई गोडबोले, सौ. सावित्रीबाई गोविंद अभ्यंकर ( कै. विनायक बळवंत अभ्यंकर यांचे स्मरणार्थ ), श्रीमती लक्ष्मीबाई वाड, श्री. डॉ. द. के. ओक, सौ. लक्ष्मीबाई विष्णुपंत गोखले, सौ. सरस्वतीबाई रांगणेकर, सौ. रमाबाई नारायण दाते, कु. सुशिला मोरेश्वर मानकर ( कै. लक्ष्मीबाई मोरेश्वर मानकर यांचे स्मरणार्थ ), श्रीमती इंदिराबाई रानडे, सौ. रमाबाई पितळे, श्री. व्यंकटेश बाळकृष्ण निमक.

खंड २ प्रमाणेंच एवढा मोठा, उत्तम बांधणी, टिकाऊ कागद आणि तोही पूर्वीपेक्षां महाग घ्यावा लागूनही हा खंडही पूर्वग्राहकांस फक्त **सहाच** रुपयांस देतां येणें हें वरील आस्थेवाईक बंधुभगिनींच्या सहाय्यामुळेंच आम्हांस शक्य झालें आहे.

## शांतिरसाची पाणपोई

अभंग-भारताचा चतुर्थ खंड केवळ शांतिपर्वाचाच निघणार असून तो या खंडाएवढाच मोठा होईल. शांतिपर्वाचा अभ्यास आणि आचार होईल तर जागतिक शांतीचा प्रश्न सुटल्यावांचून रहाणार नाहीं एवढी शांतिपर्वाची थोरवी आहे. यांत राजधर्माच्या बालेकिल्ल्यावर आपद्धर्माच्या भक्कम तटबंदींत मोक्षधर्माचें ज्ञानमंदिर उभारलेलें असून तेथील ज्ञानगंगेचा प्रवाह मराठी वाचकांस सौलभ्यानें प्राप्त व्हावा अशी अभंगांची रचना झाली असल्यामुळें मराठी वाचकांस ती शांतरसाची पाणपोईच वाटेल यांत मला लवमात्र शंका वाटत नाहीं.

## हें पुण्यमंदिर कोण बांधील ?

हें शांतिपर्वाच्या प्रकाशनाचें कार्य करण्यास आम्हांस एकरकमी सहाय्य करून आपलें नांव अजरामर करणारा कोणी भाग्यवान् पुण्यात्मा धनिक लाभल्यास शांतिपर्वासारख्या या अभंगरूपी शांतिपर्वानें अलौकिक ज्ञानभांडाराची लूट केल्याचें पुण्य त्याच्या पदरीं पडेल ! सरस्वतीचें हें ज्ञानमंदीर उभारून आपल्या संपत्तीस धन्य करण्याची सद्बुद्धि महर्षि व्यासकृपेनें कोणास होते तें पहावें.

शेवटीं या तृतीय खंडास हरतऱ्हेनें सहाय्य करणाऱ्या सर्वांचें पुनः एकदां मनोभावानें आभार मानतों. तसेंच पुण्याचे प्रसिद्ध कलावंत ब्लॉकमेकर श्री. ग. शि. मोघे यांनीं याही भागांतील चित्रांचे ठसे आपुलकीनें करून दिल्याबद्दल त्यांचे व येथील शारदा मुद्रणालयाचेहि आभार मानून ईश्वरस्मरणपूर्वक पुढील कार्यासाठीं तूर्त विश्रांति घेतों.

धर्मचैतन्य संस्था,
सदाशिव पेठ, पुणें २.

वा. शि. कोल्हटकर

# —: विषयानुक्रमणिका :—

## ६ भीष्मपर्व

जंबूखंडविनिर्माणपर्व १  अ. १ ते १०  पृ. १ ते ७

**अध्याय १ ला** सैन्याचे आणि युद्धाचे नियम. **अध्याय २–३** व्यास धृतराष्ट्रसंवाद, संजयास दिव्यदृष्टीचा वर, दुश्चिन्हें, व्यासोपदेश, विजयाचीं चिन्हें. **अध्याय ४–१०** संजयकृत भूगोलवर्णन, आयुष्यकथन व युगवर्णन.

भूमिपर्व २  अ. ११–१२  पृ. ७

**अध्याय ११–१२** शाकद्वीप आणि उत्तरादि द्वीपांचें वर्णन.

भगवद्गीतापर्व ३  अ. १३–४२  पृ. ८–८१

**अध्याय १३–१५** भीष्मवधवृत्तनिवेदन, धृतराष्ट्राचे प्रश्न, आणि शोक, दुर्योधन–दुःशासनसंवाद. **अध्याय १६–२२** कौरवसैन्याचें वर्णन, उभय सैन्यांतील व्यूहांचें वर्णन, धर्मार्जुनसंवाद, पांडवांकडील प्रमुख वीर. **अध्याय-२३** अर्जुनकृत दुर्गास्तवन **अध्याय २४** उभयांच्या सैनिकांची मनोवृत्ति. **अध्याय २५–४२** संपूर्ण भगवद्गीता.

भीष्मवधपर्व ४  अ. ४३–१२२  पृ. ८१–१३०.

**अध्याय ४३** गीतामाहात्म्य, धर्माचें आशीर्वादग्रहण. **अध्याय ४४–४९** युद्धारंभ, संकुलयुद्ध, अभिमन्यूचा पराक्रम, श्वेताचा पराक्रम आणि त्याचा वध, धृतराष्ट्राचा प्रश्न, शंख-भीष्मांचें युद्ध, प्रथमदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ५०** युधिष्ठिराचा विषाद, त्याचें कृष्णकृत समाधान, धृष्टद्युम्नाला धर्माची कौरव-

वधार्थ आज्ञा, क्रौंचव्यूहवर्णन. **अध्याय ५१** दुर्योधनाची स्वसैन्याला आज्ञा, व्यूहरचना, उभय सैन्यांचें रणभूमीवर आगमन. **अध्याय ५२** भीष्मार्जुनयुद्ध. **अध्याय ५३** द्रोण व धृष्टद्युम्न यांचें युद्ध. **अध्याय ५४** कलिंगवध. **अध्याय ५५** पार्थाचा पराक्रम आणि द्वितीयदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ५६** कौरव-पांडवांचे व्यूह आणि युद्धारंभ. **अध्याय ५७** संकुलयुद्ध. **अध्याय ५८** कौरवसैन्यपराभव, दुर्योधन भीष्मसंवाद आणि युद्धारंभ. **अध्याय ५९** भीष्मांचें भयंकर युद्ध, कृष्णप्रतिज्ञाभंग, तृतीयदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ६०** भीष्मार्जुनयुद्ध. **अध्याय ६१** सांयमनीपुत्रवध. **अध्याय ६२–६४** भीष्मांचा पराक्रम, घटोत्कचाचा पराक्रम, चतुर्थदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ६५–६६** धृतराष्ट्राचा शोक व विश्वोपाख्यान. **अध्याय ६७–६८** भीष्मोक्त केशवाचें महात्म्य व दुर्योधनास शमाचा उपदेश. **अध्याय ६९** पंचमदिनयुद्धारंभ, उभय सैन्यांचे व्यूह, सात्यकीचें युद्ध. **अध्याय ७०** रणांगणवर्णन. **अध्याय ७१** पार्थाचें आगमन व युद्ध. **अध्याय ७२–७४** अनेक योद्ध्यांचें युद्ध, अभिमन्यूकृत लक्ष्मणाचा पराजय, सात्यकीच्या दहा पुत्रांचा वध. पंचमदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ७५** उभय सैन्याची व्यूहरचना व तुमुल युद्ध. **अध्याय ७६** धृतराष्ट्राचा उद्वेग. **अध्याय ७७–७९** द्रोणांचा पराक्रम, भीम दुर्योधन-अभिमन्युआदि वीरांचें संकुलयुद्ध, षष्ठादिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ८०–८१** भीष्म-दुर्योधन संवाद, भीष्मांचें प्रोत्साहनपर भाषण, उभय सैन्याची व्यूहरचना. **अध्याय ८२–८६** द्वंद्व, द्वैरथसंकुलादि युद्ध, सप्तमादिन युद्धसमाप्ति. **अध्याय ८७–८८** युद्धारंभ, सुनाभादि धृतराष्ट्रपुत्रांचा वध, दुर्योधनाचें भीष्मांना दोष देणें व भीष्मांची स्पष्टोक्ति. **अध्याय ८९** धृतराष्ट्राचा उद्वेग. **अध्याय ९०** इरावानाचें पूर्ववृत्त आणि त्याचा वध. **अध्याय ९१–९५** घटोत्कचाचें युद्ध व त्यास भीमादिकांचें सहाय्य, घटोत्कच व भगदत्त यांचें युद्ध. **अध्याय ९६** पार्थ-भीष्म संग्राम, संकुलयुद्ध आणि अष्टमदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ९७–९८** दुर्योधन-भीष्मसंवाद. **अध्याय ९९** उभय सैन्यांचें युद्धार्थ निर्गमन आणि उत्पातदर्शन. **अध्याय १००-१०१** अभिमन्यु व अलंबुष यांचें युद्ध, अभिमन्यूवर भीष्मांची चाल, संकुलयुद्ध. **अध्याय १०२** धृतराष्ट्रप्रश्नास संजयाचें उत्तर, द्रोण-पार्थसंग्राम. **अध्याय १०३–१०६** संकुलयुद्ध, कृष्णाची भीष्मवधार्थ सिद्धता, त्याचें पार्थकृत निवारण, पांडवपराभव, नवमदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय १०७**

भीष्मांच्या वधाचा उपाय विचारण्यासाठी भीष्मशिबिरांत धर्माचें गमन, भीष्मांचें उपायकथन. **अध्याय** १०८ व्यूहरचना, भीष्म-शिखंडीसंवाद. **अध्याय** १०९ भीष्म-दुर्योधनसंवाद. **अध्याय** ११० अर्जुन-दुःशासनयुद्ध. **अध्याय** १११--११२ संकुलयुद्ध, द्रोणकथित दुश्चिन्हकथन. **अध्याय** ११३ भीमाचा पराक्रम आणि त्रिगर्तांचो भीमार्जुनांवर चाल. **अध्याय** ११४ भीमार्जुनपराक्रम. **अध्याय** ११५-११८ भीष्मांची युधिष्ठिराला स्ववधार्थ अनुज्ञा, संकुलयुद्ध आणि भीष्मपराक्रम. **अध्याय** ११९ भीष्मार्जुनयुद्ध, देववाणी, भीष्मांचे प्रतिकाररहित युद्ध, भीष्मपतन, देवतांचें आश्चर्य, उत्तरायण लागेपर्यंत प्राणधारणाचा भीष्मांचा संकल्प, उभय सैन्यांचा विषाद. **अध्याय** १२० भीष्मपतनानंतरचा वृत्तांत, द्रोणांची मूर्छा, भीष्मांस अर्जुनदत्त उपधान, शल्यांसह देहपाताचा निश्चय, धर्म-कृष्णसंवाद. **अध्याय** १२१ भीष्मदर्शनार्थ वीरांचें आगमन, भीष्मांची तृषा, अर्जुननिर्मित जलधारा, भीष्मांचा दुर्योधनास शमाचा उपदेश. **अध्याय** १२२ कर्णाचें आगमन, त्यास भीष्मांनीं केलेला शमाचा उपदेश, कर्णाचा युद्धनिश्चय आणि त्यास भीष्मांची अनुज्ञा.

---

## ७ द्रोणपर्व

द्रोणाभिषेकपर्व १ अ. १-१६ पृ. १३१-१४०

**अध्याय** १-४ शोकमग्न धृतराष्ट्राचे प्रश्न, कर्णाचें आगमन, कर्णकृत भीष्मस्तुति, कर्णाची भीष्मांशीं भेट, त्यास भीष्मांनीं दिलेली युध्दार्थ अनुज्ञा. **अध्याय** ५-७ द्रोणांस सेनापति करण्याविषयीं कर्णाची सूचना, दुर्योधनाची द्रोणांस तशी प्रार्थना, द्रोणांची संमति, द्रोणांस अभिषेक आणि युद्धारंभ. **अध्याय** ८-११ द्रोणवधाचें संक्षिप्त वृत्तकथन, धृतराष्ट्राचा विलाप. श्रीकृष्णाचें गुणगान आणि त्याचें सामर्थ्यवर्णन. **अध्याय** १२-१६ द्रोणांची प्रतिज्ञा, अर्जुनाचें धर्माला आश्वासन, द्रोणांचें विविध योध्दयाशीं युद्ध. प्रथमदिनयुद्धसमाप्ति.

संशप्तकवधपर्व २ अ. १७–३२ पृ. १४०–१५१

अध्याय १७–२० त्रिगर्तांची अर्जुनवधाची प्रतिज्ञा, अर्जुन-संशप्तकयुद्ध, कौरवसेनाव्यूहवर्णन, युद्धारंभ. अध्याय २१–२५ पांडवसेनेचा पराभव, दुर्योधन-कर्णसंवाद, पांडववीरांच्या अश्व–ध्वजांचें वर्णन, धृतराष्ट्रविलाप, विविधवीरयुद्ध. अध्याय २६–२९ भगदत्ताचा पराक्रम, संशप्तकवध, भगदत्त आणि अर्जुन यांचें युद्ध, वैष्णवास्त्रवृत्त, भगदत्तवध. अध्याय ३०–३२ गांधारभ्रात्यांचा वध. शकुनीची माया, नीलाचा वध, भीमाचें कौरवांशीं युद्ध, कर्णार्जुनयुद्ध, द्वितीयदिनयुद्धसमाप्ति.

अभिमन्युवधपर्व ३ अ. ३३–७१ पृ. १५१–१६८

अध्याय ३३ उभय सैन्यांची मनस्थिति, अभिमन्युवधाचें संक्षिप्त वृत्त. अध्याय ३४ अभिमन्यूचें गुणवर्णन, चक्रव्यूहाचें वर्णन. अध्याय-३५ अभिमन्यूची चक्रव्यूहाची प्रतिज्ञा. अध्याय ३६–४१ अभिमन्यूचा पराक्रम, द्रोणांचे प्रशंसोद्गार, दुःशासनाची प्रतिज्ञा, कर्णाचा पराभव, कर्ण-भ्रात्याचा वध. अध्याय ४२–४९ अभिमन्यूचा अलौकिक पराक्रम आणि अनेक वीरांनीं मिळून त्याचा केलेला वध. अध्याय ५० समरभूमीचें वर्णन आणि तृतीयदिनयुद्धसमाप्ति. अध्याय ५१ युधिष्ठिरविलाप. अध्याय ५२-५४ व्यास-युधिष्ठिरसंवाद, अकंपनाचें उपाख्यान, मृत्यूचें वृत्त. अध्याय ५५–७० युधिष्ठिराची मनस्थिति, सृंजयाची कथा, मरुत्ताचें वृत्त, सुहोत्र, पौरव, शिबि, राम, भगीरथ, दिलीप, मांधाता, ययाति, अंबरीष, शशबिंदु गय, रंतिदेव, भरत, पृथु आणि परशुराम यांच्या कथा. अध्याय ७१ सृंजय-राजपुत्राचें संजीवन, व्यासांचा उपदेश.

प्रतिज्ञापर्व ४ अ. ७२–८४ पृ. १६८—१८०

अध्याय ७२ अर्जुन-कृष्णसंवाद, शिबिरांतील दृश्य, अध्याय ७३ अभिमन्यूवधकथन, पार्थप्रतिज्ञा अध्याय ७४ भयग्रस्त जयद्रथास आश्वासन. अध्याय ७५ कृष्णाचें भाषण. अध्याय ७६ पार्थाचें स्वपराक्रमकथन अध्याय ७७–७८ दुश्चिन्हें, सुभद्रासांत्वन आणि तिचा विलाप. अध्याय

७९ श्रीकृष्णपूजन, कृष्ण-दारुकसंवाद. **अध्याय ८०–८१** पार्थाचें स्वप्न, त्याला दिव्यास्त्रप्राप्ति. **अध्याय ८२–८४** युधिष्ठिराची सज्जता, धर्म, अर्जुन आणि कृष्ण यांचीं भाषणें, पार्थाचें युद्धार्थ प्रयाण.

**जयद्रथवधपर्व ५** अ. ८५–१५२ पृ. १८०–२२६

**अध्याय ८५–८६** धृतराष्ट्रसंजयसंवाद. **अध्याय ८७** कौरवसेनाव्यूह. **अध्याय ८८–८९** वीरांचें वर्णन आणि अर्जुनाचा शत्रुसैन्यांत प्रवेश. **अध्याय ९०** दुःशासनपराजय. **अध्याय ९१** अर्जुनाची द्रोणांस प्रार्थना व त्यांचें उत्तर. **अध्याय ९२** द्रोणार्जुनयुद्ध, श्रुतायुधाचें वृत्त आणि त्याचा वध. **अध्याय ९३** अंबष्ठवध. **अध्याय ९४** दुर्योधनाला कवचप्रदान. **अध्याय ९५–९८** संकुलयुद्ध, द्रोण-सात्यकि युद्ध, **अध्याय ९९–१००** श्रीकृष्णसारथ्यकौशल्य, अर्जुनाच्या अतर्क्य शक्तीनें रणांगणांत अश्वांस जलपान आणि विश्रांति, कौरवांचा विस्मय. **अध्याय १०१–१०४** द्रोण सैन्यांचें उल्लंघन, दुर्योधनाशीं युद्ध आणि त्याचा पराभव, वीरयुद्ध. **अध्याय १०५** कौरव-पांडवांच्या ध्वजांचें वर्णन. **अध्याय १०६** द्रोणकृतयुधिष्ठिर-पराभव. **अध्याय १०७** क्षेमधूर्ति आणि वीरधन्वा यांचा वध. **अध्याय १०८** सौमदत्तिवध व अलंबुषाचा पराभव. **अध्याय १०९** घटोत्कच अलंबुषयुद्ध. अलंबुषाचा वध. **अध्याय ११०–११३** द्रोण–सात्यकीयुध्द, पार्थसाह्यार्थ धर्माची सात्यकीस प्रेरणा, सात्यकीचें गमन व त्याचा कौरवसेनेंत प्रवेश. **अध्याय ११४** धृतराष्ट्र-संजयसंवाद **अध्याय ११५** जलसंधाचा वध. **अध्याय ११६** सात्यकीकृत दुर्योधन व कृतवर्मा यांचा पराजय. **अध्याय ११७–१२०** सात्यकीचा व्यूहप्रवेश, सुदर्शनवध, दुर्योधनाचें पलायन. **अध्याय १२१** युध्दवृत्तकथन. **अध्याय १२२–१२५** दुःशासनाचा उपहास, द्रोणपराक्रम सात्यकीकृत दुःशासनपराजय, संजय-धृतराष्ट्र-संवाद, बृहत्क्षत्रवध, धृष्टकेतुवध, जरासंधपुत्रवध, इ० **अध्याय १२६-१२८** धर्माचें पार्थसहाय्यार्थ भीमास पाठविणें, भीमाचा पराक्रम. **अध्याय १२९–१३४** भीमाचा पराक्रम व कर्णाचें पलायन, **अध्याय १३५–१३९** भीमपराक्रम, कर्णपलायन, कर्णाचा उद्वेग, त्याचें भीमाशीं पुनः निकराचें युद्ध, भीमाची निर्भर्त्सना, त्यास भीमाचें प्रत्युत्तर. **अध्याय**

१४० धृतराष्ट्र-संजयसंवाद. **अध्याय १४१** अर्जुनकृत सात्यकिप्रशंसा. **अध्याय १४२** सात्यकि-भूरिश्रवासंग्राम, भूरिश्रव्याचा बाहुच्छेद. **अध्याय १४३** भूरिश्रव्यानें पार्थाची केलेली निंदा, त्यास पार्थाचें उत्तर, भूरिश्रव्याचा वध. **अध्याय १४४** भूरिश्रवोत्पत्ति. **अध्याय १४५** धृतराष्ट्रसंजय-संवाद आणि तुमुल युद्ध **अध्याय १४६** कृष्ण-पार्थसंकेत, जयद्रथजन्म-वृत्त आणि त्याचा वध. **अध्याय १४७** कृपाचार्यांची मूर्च्छा, **अध्याय १४८** भीमार्जुनसंवाद, कर्णाची निर्भर्त्सना. **अध्याय १४९** युधिष्ठिराचा हर्ष, श्रीकृष्णाचें स्तवन, **अध्याय १५०-१५२** दुर्योधनाचा अनुताप, त्यास द्रोणांचें उत्तर, दुर्योधन-कर्णसंवाद आणि पुनर्युद्धारंभ.

<u>घटोत्कचवधपर्व ६</u> अ. १५३-१८३ पृ. २२७-२५३

**अध्याय १५३-१५५** धर्म-दुर्योधनयुद्ध, रात्रियुद्ध, कौरवसैन्यांत अशुभ-चिन्हें, धृतराष्ट्रसंजयसंवाद. **अध्याय १५६** सोमदत्तप्रतिज्ञा, घटोत्कचवर्णन, अश्वत्थामाकृत घटोत्कचपराभव. **अध्याय १५७** बाल्हिकवध, भीम-पराक्रम; **अध्याय १५८** कर्णदुर्योधनसंवाद. **अध्याय १५९** कर्णाचा अधिक्षेप, कर्णपराक्रम, त्याचा पराजय. **अध्याय १६०-१६१** अश्वत्थाम्याचा पराक्रम, संकुल युद्ध. **अध्याय १६२** सोमदत्तवध. **अध्याय १६३** युद्धवर्णन, रणांगणांत दिवे लावणें. **अध्याय १६४** संकुलयुद्ध. **अध्याय १६५** युधिष्ठिराचें पलायन. **अध्याय १६६** भूरिवध, घटोत्कचपराभव, दुर्योधन-पराभव. **अध्याय १६७-१७२** भिन्न भिन्न योद्धयांचें संकुलयुद्ध. **अध्याय १७३** कर्णाचा पराक्रम कृष्णार्जुनांचा संकेत, घटोत्कचाचा युद्धारंभ. **अध्याय १७४** अलंबुषाचा वध. **अध्याय १७५** कर्ण-घटोत्कचयुध्द, **अध्याय १७६** अलायुधागमन. **अध्याय १७७-१७८** अलायुधाचें युद्ध व मृत्यु. **अध्याय १७९** घटोत्कचाचा पराक्रम, अंतीं वासवी शक्तीनें त्याचा वध. **अध्याय १८०** श्रीकृष्णहर्ष व त्याचें अर्जुनप्रश्नास उत्तर. **अध्याय १८१** जरासंधादिकांच्या वधासंबंधीं अर्जुनास श्रीकृष्णाचें उत्तर. **अध्याय १८२** धृतराष्ट्र-संजयसंवाद **अध्याय १८३** धृतराष्ट्राचा शोक, धर्माचा शोक, व्यासांकडून धर्माचें सांत्वन.

**द्रोणवधपर्व ७** अ. १८४-१९२ पृ. २५४-२६३

**अध्याय १८४-१८५** सैन्यनिद्रा आणि द्रोण--दुर्योधनाचें भाषण. अध्याय १८६ द्रुपद-विराटवध. **अध्याय १८७-१८९** पंचदशादिनयुद्धारंभ व संकुलयुद्ध **अध्याय १९०** श्रीकृष्णाचें युक्तिकथन, युधिष्ठिराचें असत्य भाषण. **अध्याय १९१-१९२** द्रोण-धृष्टद्युम्नयुद्ध, द्रोणांचा शस्त्रसंन्यास आणि द्रोणवध.

**नारायणास्त्रमोक्षपर्व ८** अ. १९३-२०२ पृ. २६३-२७५

**अध्याय १९३** कौरवसैन्यपलायन, अश्वत्थाम्याचा क्रोध. **अध्याय १९४** धृतराष्ट्राचा प्रश्न. **अध्याय १९५** अश्वत्थाम्याची पांडवांदिकांच्या वधाची प्रतिज्ञा. **अध्याय १९६** धर्मार्जुनांचें भाषण. **अध्याय १९७** भीमसेनप्रतिज्ञा व द्रोणवधसमर्थन. **अध्याय १९८** सात्यकि व धृष्टद्युम्न यांच्यांत विवाद, सात्यकीचें भीमाकडून निवारण, **अध्याय १९९-२००** आश्वत्थामाकृत नारायणास्त्रप्रयोग, भीमाचा हट्ट, त्याचें कृष्णार्जुनांकडून संरक्षण, अस्त्रशांति. **अध्याय २०१** द्रोणपुत्राचा आग्नेयास्त्रप्रयोग, त्याचा अर्जुनाकडून उपसंहार, अश्वत्थाम्याचा रणत्याग, त्यास व्यासदर्शन व त्यांचा उपदेश. **अध्याय २०२** व्यासांस अर्जुनाचा प्रश्न, व्यासोक्त रुद्रस्तुति.

---

## ८ कर्णपर्व

**कर्णपर्व १** अ. १-९६ पृ. २७६-३६६

**अध्याय १** दुर्योधनादिकांचें अश्वत्थाम्याकडे गमन, जनमेजयाचा प्रश्न. **अध्याय २-४** धृतराष्ट्र-संजयसंवाद, कर्णपराक्रम, कर्णार्जुनयुद्धवर्णन, कर्णवधाचें संक्षिप्त वृत्तानिवेदन, धृतराष्ट्राचें दुःख. **अध्याय ५-९** धृतराष्ट्र उभय सैन्यांतील वीरांचें वृत्त संजयास विचारतो. तें ऐकून राजाची मूर्छा,

पुढें त्याचा कर्णासाठीं विलाप, त्याचें संजयकृत सांत्वन. **अध्याय १०-११** कर्णाभिषेक व व्यूहरचना. **अध्याय १२-१५** क्षेमधूर्ति, विंदानुविंद, चित्रसेन व चित्र यांचा वध, अश्वत्थामा व भीम यांचें युद्ध. **अध्याय १६-१७** अर्जुनाचें संशप्तक व अश्वत्थामा यांच्याशीं युद्ध आणि अश्वत्थाम्याचा पराजय. **अध्याय १८-२०** दंडधार व दंड यांचा वध कृष्णाचें अर्जुनाला प्रोत्साहन, धृतराष्ट्र-संजयसंवाद व पांड्यवध. **अध्याय २१-२३** संकुलयुद्ध, सहदेवकृत दुःशासनपराभव. **अध्याय २४-२६** कर्णकृत नकुलपराभव, युयुत्सुपराभव, इतर वीरांचें घोर युद्ध, धृष्टद्युम्न व शिखंडीपराभव. **अध्याय २७-३०** संशप्तकांचें शौर्य, धर्म-दुर्योधनयुद्ध, प्रथमदिनयुद्धसमाप्ति. **अध्याय ३१** धृतराष्ट्रसंजयसंवाद, कर्ण-दुर्योधनसंवाद. **अध्याय ३२** कर्णसारथ्यासाठीं दुर्योधनकृत शल्यप्रार्थना, त्याचा शल्यकृत धिक्कार, अंतीं कर्णसारथ्यस्वीकार. **अध्याय ३३-३६** त्रिपुराख्यान, दुर्योधनकृत शल्यस्तुति, कर्णशल्यांचें रथारोहण आणि त्यांचा संवाद. **अध्याय ३७-४०** कर्णास झालेलीं दुश्चिन्हें, त्याची आत्मप्रौढी आणि कर्ण-शल्यसंवाद. **अध्याय ४१-४५** हंसकाकीयोपाख्यान, कर्णाचें आत्मवृत्तकथन व कर्णशल्यांची परस्पर निर्भर्त्सना, **अध्याय ४६-४८** व्यूहरचना व संकुलयुद्ध. **अध्याय ४९** कर्णकृत युधिष्ठिरपराभव. **अध्याय ५०** भीमशरानें कर्णास मूर्च्छा. **अध्याय ५१-५७** सहा धार्तराष्ट्रांचा वध, संकुलयुद्ध, शिखंडीपराभव, सुकेतुवध, अश्वत्थाम्याचा पराक्रम, संकुलयुद्ध, अश्वत्थाम्याची प्रतिज्ञा. **अध्याय ५८-६५** कृष्णकृत युध्दभूमीचें वर्णन, अश्वत्थाम्याचा पराजय, कृष्णाचें भाषण संकुलयुद्ध, धर्माचा पराभव, कृष्णार्जुन व धर्म यांची भेट. **अध्याय ६६-७४** धर्मार्जुनांचें भाषण, अर्जुनाची निर्भर्त्सना, कृष्णकृत सत्यासत्यनिर्णय. बलाक-कौशिककथा, अर्जुनास बोध, अर्जुनकृत धर्मनिंदा व त्याचें सांत्वन, अर्जुनाची प्रतिज्ञा, धर्माचा आशीर्वाद, श्रीकृष्णाचें प्रोत्साहन, अर्जुनाचें वीरश्रीयुक्त स्वपराक्रमवर्णन. **अध्याय ७५-८१** धृतराष्ट्र संजयसंवाद, भीम-विशोकसंवाद, शकुनिपराभव, कर्णाचें शौर्य त्यास शल्याचें प्रोत्साहन, संकुलयुद्ध. **अध्याय ८२-८३** भीम-दुःशासनयुद्ध, दुःशासनवध आणि भीमाची प्रतिज्ञा. **अध्याय ८४-८६** दहा धार्तराष्ट्रांचा वध, वृषसेनकृत नकुलपराजय, वृषसेनाचा वध,

कृष्णार्जुनसंवाद, **अध्याय ८७** कर्णार्जुनांची भेट, त्यांच्या विजयासंबंधीं देवांत संवाद; अर्जुनप्रतिज्ञा. **अध्याय८८** अश्वत्थाम्याचा दुर्योधनास उपदेश. **अध्याय ८९–९१** कर्णार्जुनांचें घोर युध्द. अर्जुनकिरीटपतन, नागवध, कर्णरथचक्रग्रसन, कर्णकृत अर्जुनप्रार्थना त्यास श्रीकृष्णाचें उत्तर, कर्णाचा वध. **अध्याय ९२-९६** शल्याचें परत जाणें, कौरवसैन्यपलायन, रणभूमीचें वर्णन, शिबिरप्रयाण, धर्माचा हर्ष, कर्णपर्वश्रवणमहात्म्य.

---

# ९ शल्यपर्व

**शल्यसैनापत्याभिषेकपर्व १** अ. १–२८ पृ. ३६७–३९४

**अध्याय १–३** धृतराष्ट्राचा मोह, त्याचा विलाप आणि कथाप्रस्ताव, कौरवसैन्याचें पलायन. **अध्याय ४–७** कृप आणि दुर्योधन यांचीं भाषणें. शल्याभिषेकाचा विचार आणि शल्यास सैनापत्याभिषेक. **अध्याय ८–१२** व्यूहरचना, संकुलयुद्ध, शल्यभीमयुद्ध, शल्य-धर्मयुद्ध. **अध्याय १३–१७** शल्यपराक्रम, अश्वत्थाम्याकडून सुरथाचा वध, शल्य-धर्मयुद्ध, शल्यवध, **अध्याय १८–२८** संकुलयुद्ध, शाल्ववध, संकुलयुद्ध, दुर्योधनाचें पलायन, धृतराष्ट्रपुत्रवध, कृष्णार्जुनसंवाद, दुर्योधनबंधुवध, आणि शकुनिवध.

**ऱ्हदप्रवेशपर्व २** अ. २९ पृ. ३९५–३९८

**अध्याय २९** दुर्योधनाचा ऱ्हदप्रवेश.

**गदायुद्धपर्व ३** अ. ३०–६५ पृ. ३९९४४६

**अध्याय ३०** कृप-कृतवर्मा व अश्वत्थामा यांचें दुर्योधनाशीं भाषण. त्या भाषणानें कांहीं व्याधांना लागलेला दुर्योधनाचा सुगावा, व्याधांकडून धर्मराजाला ऱ्हदस्थ दुर्योधनाचें वृत्तकथन, धर्माचें कृष्णादिकांसह ऱ्हदासन्निध जाणें. **अध्याय ३१–३३** दुर्योधन-युधिष्ठिरसंवाद, श्रीकृष्णाचें धर्मास दोष देणें, भीमदुर्योधनाची गदायुद्धार्थ सिद्धता, **अध्याय ३४** बलभद्र

आगमन, त्याची गदायुद्ध पाहाण्याविषयीं उत्सुकता. **अध्याय ३५–३८** बळिरामाची तीर्थयात्रा, प्रभासोत्पत्ति, त्रिताख्यान, सरस्वतीच्या तीरावरील तीर्थांचा महिमा, सरस्वतीचे सात भाग, मंकणकमुनींचें वृत्त, **अध्याय ३९–४३** औशनस आणि कपालमोचनतीर्थ, उषंगूचा आश्रम, आर्ष्टिषेणविद्याप्राप्ति, विश्वामित्रकथा, बकमुनींची कथा, यायाततीर्थ, वसिष्ठापवाहतीर्थ, सरस्वतीला विश्वामित्राचा शाप, बळरामाचें सोमतीर्थाला गमन, **अध्याय ४४–४६** कुमारोत्पत्ति, त्यास देवसेनापत्याभिषेक, तारकासुरवध. **अध्याय ४७** वरुणाचें जलपतित्व. **अध्याय ४८** बदरपाचनतीर्थ. **अध्याय ४९** इंद्रतीर्थ. **अध्याय ५०** जैगीषव्यवृत्त. **अध्याय ५१** दधिचि सारस्वतवृत्त. **अध्याय ५२** वृद्धकन्याचरित्र. **अध्याय ५३–५४** कुरुक्षेत्रमाहात्म्य आणि गदायुद्ध पाहाण्यासाठीं बळिरामाचें कुरुक्षेत्रीं गमन. **अध्याय ५५–५९** भीम-दुर्योधनवर्णन, त्यांचें गदायुद्ध. दुर्योधनाचें ऊरुभेदन, आणि शिरस्ताडन, युधिष्ठिराचा विलाप. **अध्याय ६०** बळरामाचा क्रोध, कृष्णकृत त्याचें सांत्वन, बळरामाचें द्वारकेस प्रयाण. **अध्याय ६१** कृष्ण-दुर्योधनसंवाद. **अध्याय ६२** पार्थरथज्वलन, गांधारीच्या सांत्वनार्थ श्रीकृष्णाचें गमन. **अध्याय ६३** धृतराष्ट्र आणि गांधारी यांचें सांत्वन. **अध्याय ६४–६५** दुर्योधनविलाप आणि अश्वत्थाम्यास सेनापत्याभिषेक.

---

# १० सौप्तिकपर्व

सौप्तिकपर्व १  अ. १–९  पृ. ४४७–४६३

**अध्याय १–३** अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा यांची वटवृक्षाखालीं बैठक, तेथलि उलूककृतीनें अश्वत्थाम्याचा निश्चय, कृपाचार्यांचा अश्वत्थाम्याला उपदेश, निद्रिस्थ पांडव-पांचालवधाची अश्वत्थाम्याची प्रतिज्ञा. **अध्याय ४–६** अश्वत्थामा, कृतवर्मा व कृपाचार्य यांचा संवाद, अश्वत्थाम्याचें पांडवाशिबिरद्वारीं आगमन, त्यास तेथें महद्भूतदर्शन, अश्वत्थाम्याची शिवोपासना. **अध्याय ७** अश्वत्थाम्यास शिवदर्शन व खड्गप्राप्ति. **अध्याय ८–९** शिबिरद्वारीं कृप आणि कृतवर्मा यांस ठेवून पांचाळ द्रौपदेयांचा

केलेला नाश, दुर्योधनाचें सांत्वन, दुर्योधनाचा प्राणत्याग, अश्वत्थाम्यादिकांचें नगरगमन, संजयाच्या दिव्यदृष्टीचा नाश.

ऐषीकपर्व अ. १०–१८ पृ. ४६३–४७०

अध्याय १० धृष्टद्युम्नाच्या सारथ्याकडून धर्मराजाला शिबिरांतील वृत्त कथन, युधिष्ठिराचा शोक. अध्याय ११–१२ द्रौपदीचा क्रोध, अश्वत्थाम्याच्या मस्तकावरील मणिहरणार्थ भीमाचें गमन, अश्वत्थाम्याचा अविचार भीमरक्षणार्थ धर्मादिकांचें गमन. अध्याय १३–१५ भागीरथीतीरीं व्यासांसन्निध अश्वत्थाम्याची गांठ व त्याचा अस्त्रप्रयोग, कृष्णाज्ञेनें अर्जुनकृत अस्त्रप्रयोग, अर्जुनकृत अस्त्रोपसंहार. अध्याय १६–१८ कृष्णाचा अश्वत्थाम्याला शाप, अश्वत्थाम्याचा मणि देऊन द्रौपदीचें सांत्वन, युधिष्ठिराचे मस्तकीं मणिधारण, रुद्रमहात्म्य कथन.

---

## ११ स्त्रीपर्व

जलप्रदानिकपर्व १ अ. १–१५ पृ. ४७१–४८५

अध्याय १–१० धृतराष्ट्राचा शोक, त्याचें संजयकृत सांत्वन, धृतराष्ट्राचें विदुराकडून सांत्वन, शास्त्रार्थकथन, गर्भवासप्रकारकथन, संसाराचें रूपक, तत्त्वकथन, व्यासांचा उपदेश, पुनः विदुराचें सांत्वनपर भाषण, धृतराष्ट्रनिर्गमन व स्त्रियांचा विलाप. अध्याय ११ धृतराष्ट्राचें रणांगणाकडे निर्गमन, वाटेंत कृपादिकांची भेट. अध्याय १२–१३ धर्माचें धृतराष्ट्राकडे आगमन, लोहभीमभंग, धृतराष्ट्रकोपविमोचन. अध्याय १४–१५ युधिष्ठिराचें गांधारीकडे गमन, व्यासकृत गांधारीसांत्वन, भीम-गांधारीसंवाद; कुंती पांडवभेट, गांधारी कोपशमन.

स्त्रीविलापपर्व २ अ. १६–२५ पृ. ४८५–४९२

अध्याय १६ गांधारीला दिव्यदृष्टीची प्राप्ति, रणभूमिप्रवेश, गांधारी आपल्या शोकमग्न स्नुषा कृष्णाला दाखविते. अध्याय १७–२५ दुर्योधन

भानुमतिविषयीं गांधारीचा शोक, दुःशासन, शकुनि, विकर्ण-दुर्मुखादि, त्याचप्रमाणें कर्ण, जयद्रथ, शल्य, भगदत्तादि, तसेंच भीष्म-द्रोण, भूरिश्रवा कांबोजादि यांसाठीं गांधारीचा शोक आणि तिचा श्रीकृष्णाला शाप.

**श्राद्धपर्व ३** अ. २६-२७ पृ. ४९२-४९४

**अध्याय** २६-२७ भूमीवर पडलेल्या गांधारीचें कृष्णकृत सांत्वन, युधिष्ठिर आज्ञेनें मृतांचें दहन; गंगातीरावर त्यांनां उदकदान. युधिष्ठिराकडून कुंती-कर्णाला आपला पुत्र म्हणून जलांजली देवविते. धृतराष्ट्र-युधिष्ठिरांकडून इष्ट-बांधवांना जलदान.

---


# " अभंग-भारत "

ग्रंथकार, कीर्तनवाचस्पति श्री. वा. शि. कोल्हटकर

श्रीमन्महाभारत हीं भारतीयांच्या ज्ञानाची खाणच आहे. या खाणींतील सर्व अमोलिक रत्नें या ग्रंथांत ग्रंथकारांनीं मोठ्या कौशल्यानें ग्रथित केलीं आहेत. आदि आणि सभा या पर्वांचा खंड १ ला, वन, विराट व उद्योग या पर्वांचा खंड २ रा, भीष्मपर्वापासून स्त्रीपर्वापर्यंतचा खंड ३ रा असे ३ खंड प्रसिद्ध झाले आहेत.

यापुढील केवळ शांतिपर्वाचा ४ था खंड आणि अनुशासनपर्वापासून पुढील सर्व पर्वांचा ५ वा खंड असे २ खंड प्रसिद्ध व्हावयाचे आहेत.

सुमधुर काव्य, महाभारताचा बोध आणि ग्रंथकाराची तळमळ या त्रिवेणी संगमानें या ग्रंथाला प्रयागराजाचें प्रासादिक महत्त्व प्राप्त झालें आहे.

प्रसिद्ध झालेल्या ३ खंडांचें मूल्यः—अनुक्रमें ५, ७॥, ७॥ ट. ह वे.

पत्ता – **सी. कृ बर्वे**..................**धर्मचैतन्य संस्था, पुणें २**

अभंग-भारत खंड २ रा प्रकाशन समारंभ, मुंबई.



ग्रंथपूजन व मिरवणूक.



(चित्र १) मुंबई येथील श्रीव्यंकटेश मंदिरांत अभंगभारताच्या खंड २ च्या प्रकाशनप्रसंगीं श्रीदीक्षितजी महाराज यांचे अध्यक्षतेखालीं सॉ. मो. त्रि. जयकर स्वागतपर भाषण करीत आहेत.

(चित्र २) ग्रंथकार भाषण करीत आहेत.

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग--भारत

(महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ)

## ६ भीष्मपर्व

### जंबूखंडविनिर्माणपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला    अभंग १ ला

वैशंपायन तो जनमेजयासी । वार्ता त्या युद्धाची सकल सांगे ॥१॥
पावन पवित्र त्या कुरुक्षेत्रासी । वीर ते व्यापिती विजयेच्छेनें ॥२॥
वेदज्ञ ते वीर जाहले एकत्र । ओसचि सर्वत्र जंबुद्वीप ॥ ३ ॥
अश्व, गज, योद्धा न दिसे कोठेंचि । बाल-वृद्ध तेचि स्वग्रामांत ॥४॥
अनेक योजनें विस्तीर्ण तें क्षेत्र । परी संकुचित भासे तदा ॥ ५ ॥
वीरचिन्हें, संज्ञा, आभरणें तींही । नियोजित व्हावीं म्हणती सर्व॥
शुभ्रछत्रधारी दुर्योधन शोभे । सभोंवतीं उभे मत्त गज ॥ ७ ॥
धनंजय-देवदत्ताचा तो नाद । करी भयग्रस्त कौरवांसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शोणिताची वृष्टि । होई त्या स्थळासी आश्चर्य हें ॥

अध्याय २ रा

२

युगान्तसमयीं सागरसंगम । तैसें दिसे सैन्य उभयांचें ॥ १ ॥
युद्धोत्तर वैर न व्हावें म्हणूनि । नियम संग्रामीं योजियेले ॥ २ ॥
समान वीरांनीं संग्राम करावा । प्रतिकार व्हावा समशस्त्रें ॥ ३ ॥
वीरां वीर, अश्व अश्वां, गजां गज । करूनि सावध युद्ध व्हावें ॥
विव्हल, मूर्छित, होऊं नये त्रस्त । विमुख, शरणागत, वध्य नव्हे
शस्त्र-कवचहीना ताडूं नये कदा । अन्यासी भिडतां अन्या वर्ज्य ॥
अश्व-सारथी, तैं वीरां शस्त्रदाते । वादक वाद्यांचे अवध्य ते ॥७॥
यापरी युद्धाचे नियम करूनि । हृष्टचित्तें रणीं वीर स्थित ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे युद्धोत्सुक वीर । पाहती समोर एकमेकां ॥ ९ ॥

अध्याय ३ रा

३

त्रिकालज्ञ व्यास धृतराष्ट्राप्रति । म्हणती दिव्यदृष्टि अर्पूं काय ॥१॥
राव म्हणे ज्ञातिवध न पहावा । वृत्तांत ऐकावा हेचि इच्छा ॥ २ ॥
मुनि म्हणे गुप्त प्रगटहि कृत्य । कळो संजयास कृपाबळें ॥ ३ ॥
निर्भय संजय महा संगरांत । करूं नको शोक नियति घोर ॥ ४ ॥
धर्म तेथें जय, जाणावा निश्चय । आलें महाभय क्षत्रियांसी ॥ ५ ॥
पशु, पक्षी, ग्रह, दुश्चिन्हें कथिती । देवता कांपती स्वेदयुक्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुश्चिन्हें विविध । जाहलीं सैन्यांत तयावेळीं ॥ ७ ॥

४

धृतराष्ट्रा, ऐकें पराजयचिन्हें । धेनूसी गर्दभ वत्सें होती ॥ १ ॥
मातृगामी पुत्र, वंध्या गर्भवती । अकालीं वृक्षांसी पुष्पें, फळें ॥२॥
क्रव्याद[1] एकत्र भक्षिताती मांस । बहु चरण-नेत्र पशु-पक्षी ॥ ३ ॥
युद्धचि करिती बालकें सर्वत्र । महा वृक्षांवर कुमुदें होती ॥ ४ ॥
एकाच समयीं बहु कन्यालाभ । रुधिर धेनूंस पान्हा येतां ॥ ५ ॥
त्रयोदश दिनीं अमा-पूर्णा येती । पाहीं ग्रहस्थिति नाशप्रद ॥ ६ ॥
'पक्का' 'पक्का' शब्दें ओरडती पक्षी । वेळ विनाशाची धृतराष्ट्रा ॥

१ श्वापदें.

पुत्रांलागीं करीं धर्मबोध राया । जाईं त्यागूनियां अथवा राज्य ॥
वासुदेव म्हणे राव स्वार्थास्तव-। पावलों मी मोह, ऐसें कथी ॥९॥

५

राजप्रश्नें मुनि कथी शुभचिन्हें । निर्धूमाचि जाणें स्थंडिलाग्नि ॥१॥
समरासी जातां पृष्ठभागीं काक । शुभ पक्षी शुभ करिती शब्द ॥
उल्हसित सेना विजय संपादी । शुभध्वनि येई कर्णीं ज्यांच्या ॥३॥
शब्द, स्पर्शादिक शुभ अविकृत । निर्भय सैनिक, शुभ वायु ।४॥
सहज तें शुभ विपरीत अशुभ । भ्याडपणा त्याज्य सैनिकांचा ॥
भयाकुल सैन्य नावरे कदापि । शमें विजयप्राप्ति तेंचि श्रेष्ठ ॥ ६ ॥
अपारही सेना होई रणीं व्यर्थ । वीर पंच, सप्त, लाभकारी ॥ ७ ॥
दैववंत तेचि पावती विजय । म्हणे वासुदेव पुण्य जोडा ॥ ८ ॥

अध्याय ४ था

६

मुनि स्वस्थळासी जातां । संजयासी म्हणे राजा ॥ १ ॥
अनावर राज्यलोभ । गुण भूमीचे तूं सांग ॥ २ ॥
नम्रभावें म्हणे सूत । जगीं भूतेंही द्विविध ॥ ३ ॥
जाणें स्थावर-जंगम । दुजियाचे भेद तीन ॥ ४ ॥
मनुज, पशु, जरायुज । तेचि जाण प्राणिश्रेष्ठ ॥ ५ ॥
तेही चतुर्दशविध । श्रेष्ठ त्यांत त्रैवर्णिक ॥ ६ ॥
धेनु, अज, तेही श्रेष्ठ । सिंह, मानव, वरिष्ठ ॥ ७ ॥
उद्भिज ते पंचविध । वृक्ष, कुश, लता, देख ॥ ८ ॥
जाणे वल्ली, ते त्वक्सार । पंचभूतांचे विकार ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे संख्या । चतुर्विंशति हे सांख्यां ॥ १० ॥

७

चतुर्विंशती ते अक्षरें मंत्राचीं । जाणावी गायत्री ब्रह्मरूप ॥ १ ॥
सिंह, व्याघ्र, गज, महिष, वराह । ऋक्ष तैं वानर सप्त वन्य ॥ २ ॥
धेनु, अज, मेष, अश्व तैं खेचर । गर्दभ वानर ग्राम्य पशु ॥ ३ ॥
ऐसे चतुर्दश पशु भूमीवरी । सकलां सांभाळी भूमिमाता ॥ ४ ॥
जयाची हे भूमि तयाचेंचि जग । ऐसें श्रुतिवाक्य विख्यात तें ॥५॥

यास्तव नृपाळ अर्पिताती प्राण। भूमीस्तव जाण धृतराष्ट्रा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भूमीचा महिमा। कथी नरोत्तमा गावल्गणि ॥ ७ ॥

अध्याय ५ वा

८

राव म्हणे सूता, भूमंडळज्ञान। कथीं मजलागून समस्तही ॥ १ ॥
सूत म्हणे राजा, पंचमहाभूतें। जाण चैतन्याचे विकार ते ॥ २ ॥
एकाहूनि एका अधिक गुणसंख्या। भूमीची श्रेष्ठता पंचगुणें ॥ ३ ॥
कनकंकुंडलन्याय असे एथ[1]। चैतन्याधिष्ठित सकलाभास ॥ ४ ॥
अचिंत्य तें तर्कें कदा शोधूं नये। पर तें जाणावें प्रकृतीच्या ॥ ५ ॥
सुदर्शननामें एक जंबुद्वीप। ब्रह्मांड समस्त तेंचि असे ॥ ६ ॥
दीर्घस्वप्नाचा या बाध ब्रह्मज्ञानें। मनोमय जाणें विश्वाश्वत्थ ॥ ७ ॥
मानसशशीचा शश परमात्मा। औषधि पोषणा करी वेगें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे जीव-शिव ऐक्य। कथितो संजय ऐका आतां ॥ ९ ॥

अध्याय ६ वा

९

राव म्हणे सूता, अश्वत्थाचें ज्ञान। कथीं, शशब्रह्म, नलगे आधीं ॥
कार्यरूप मज विभूति निवेदीं। कारण तें बोधीं तदनंतर ॥ २ ॥
कल्पित भूमीचा भाग सांग मज। वर्ष, गिरिषट्क कथिले सूतें ॥
पूर्व-पश्चिम ते सागरान्त गिरी। वर्षं विराजलीं मध्यभागीं ॥ ४ ॥
उत्तरेसी हरिवंश हे नृपाळा। हिमाद्रि शोभला मध्यभागीं ॥ ५ ॥
माल्यवान, गंधमादन पुढती। मेरु मध्यभागीं शोभे त्यांच्या ॥ ६ ॥
सभोंवार त्याच्या द्वीप चतुष्टय। भद्राश्व, केतुमाल, जंबुद्वीप ॥ ७ ॥
उत्तरकुरु तें पुण्यजनस्थान। करितो वर्णन वासुदेव ॥ ८ ॥

१०

गरुडाचा पुत्र सुमुख नामक। पाही कनककाक मेरूवरी ॥ १ ॥
सान थोर नसे त्या स्थळासी भेद। म्हणूनियां त्याग करूं म्हणे ॥
सूर्य चंद्रादिक मेरुप्रदक्षिणा। करिती या स्थाना देवादिक ॥ ३ ॥

---

१ भिन्नभिन्न अलंकारांत सुवर्ण जसें एकच असतें तसें विश्वांत ब्रह्म एकच आहे हा भाव.

पर्वकाळीं येती ऋषि, मुनि येथें । वास्तव्य शुक्राचें त्याचि स्थानीं ॥
रत्नगिरी सर्व शुक्राच्या स्वाधीन । चतुर्थांश धन कुबेराचें ॥ ५ ॥
उत्तरेसी त्याच्या कर्णिकार वन । शिवभगवान वसे तेथें ॥ ६ ॥
मस्तकीं तयाच्या शोभे भागीरथी । जन दीर्घायुषि पश्चिमेसी ॥७॥
वासुदेव म्हणे मेरूच्या सन्निध । वर्णियेले लोक पुण्यवंत ॥ ८ ॥

११

भारत, हेमवत, हरि, इलावृत्त । श्वेत, हैरण्यक, ऐरावत ॥ १ ॥
उत्तरोत्तर हीं सप्तवर्षें सुखी । धर्म-काम-अर्थीं अधिकाधिक ॥ २ ॥
हेमकूट तोचि कैलास गणावा । सुवर्णवालुका बिंदुसरीं ॥ ३ ॥
याच सरोवरीं सामावली गंगा । पातली विभागां पुढती सप्त ॥४॥
'वस्वौकसारा' ती नलिनी, सरस्वती । सीता, जंबुनदी तैसी सिंधु
वासुदेव म्हणे सप्तम ते गंगा । पावली विभागां ऐशारूपें ॥ ६ ॥

१२

हिमवान हेमकूट । श्वेतगिरी तैं निषध ॥ १ ॥
नीलगिरी शृंगवान । देवादिकांचें तें स्थान ॥ २ ॥
वसती राक्षस गुह्यक । पुढती महासर्प नाग ॥ ३ ॥
देव, असुर, गंधर्व । ब्रह्मर्षींचा पुढती वास ॥ ४ ॥
श्रद्धावंत श्रेयःकामी । अन्य अश्रद्ध ते मानीं ॥ ५ ॥
नाग, काश्यप हीं द्वीपें । दिव्य शशाचीं तीं अंगें ॥ ६ ॥
कर्णस्थानीं विराजती । वासुदेव वर्णी त्यांसी ॥ ७ ॥

अध्याय ७ वा

१३

उत्तर कुरूचें ऐकावें वर्णन । संजय कथन करीतसे ॥ १ ॥
नित्य फल-पुष्पयुक्त वृक्ष तेथें । रत्न जडित ते भूमि शोभे ॥ २ ॥
देवलोकभ्रष्ट मानव त्या स्थानीं । दांपत्य जन्मूनि सौख्य भोगी ॥
क्षीरिण वृक्षाचें क्षीर प्राशिताती । जन्म-कर्म त्यांसी समानाचि ॥४॥
निरामय नित्य प्रसन्न दीर्घायु । परस्पर बहु प्रेम त्यांचें ॥ ५ ॥
एकाचि समयीं मृत्यु दंपतीसी । 'भारुंड' ते पक्षी प्रेतवाही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वृक्ष तो कालाम्र । वन भद्रसाल शोभवी त्या ॥ ७ ॥

१४

सुदर्शन नामें पुढती जंबुवृक्ष । महा पुण्यप्रद पुरवी हेतु ॥ १ ॥
त्याचि नामें जंबुद्वीप हें शोभलें । सुमधुर फळें तयालागीं ॥ २ ॥
रसाची त्या वाहे सरिता, सुवर्ण– । जंबूनद, नाम त्याचि रसें ॥ ३ ॥
माल्यवान गिरि अग्निसंवर्तक । हेमवर्ण लोक तया ठाईं ॥ ४ ॥
सत्कर्मे त्या जनां ब्रह्मलोकप्राप्ति । वासुदेव चित्तीं संतोपला ॥ ५ ॥

अध्याय ८ वा १५

श्वेतवर्ण तेंचि रमणकद्वीप । जन कुलवंत सुखी तेथें ॥ १ ॥
हिरण्मय वर्षीं गरुडाचा वास । नांदती बलाढ्य यक्ष तेथें ॥ २ ॥
पुढती गिरिशृंगें रत्नमय तीन । शांडिलीचें स्थान हेंचि असे ॥ ३ ॥
उत्तरेसी स्थान ऐरावत श्रेष्ठ । सूर्याचा प्रकाश नसे तेथें ॥ ४ ॥
नित्य ज्योत्स्ना तेथें पीडा न क्षुधेची । देवांसम कांती तत्रस्थितां ॥
क्षीरसागराच्या उत्तर दिशेसी । वैकुंठनिवासी हरि वसे ॥ ६ ॥
तोचि जीव, कर्ता-करविता ईश । म्हणे धृतराष्ट्र सकल काळ ॥ ७ ॥
कालातीत तोचि वैकुंठनायक । म्हणती अच्युत, विष्णु तया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे काल, कालातीत । एकचि अच्युत आदि अंतीं ॥ ९ ॥

अध्याय ९ वा १६

राव म्हणे सूता, भारताचा लोभ । करीतसे क्षोभ उभयांमाजी ॥
वर्णन तयाचें करीं रे संजया । लोभ न पांडवां सूत म्हणे ॥ २ ॥
जाणूनियां कर्मभूमि हें भारत । प्रिय देवादिक मानिती या ॥ ३ ॥
महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान् । विंध्य, ऋक्षवान, पारियात्र ॥ ४ ॥
कुलपर्वत हे भारतांत सप्त । इतर असंख्य, सान-थोर ॥ ५ ॥
गंगा-यमुनादि असंख्य सरिता । पांचालादि देशां आधार हा ॥ ६ ॥
कामधेनु होय सद्धर्मे पाळितां । यज्ञ अन्न देवां मानवां दे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे इहपरसुख । दर्शनेंचि प्राप्त योगबळें ॥ ८ ॥

अध्याय १० वा १७

धृतराष्ट्र म्हणे आयुष्यकथन । शुभाशुभ कर्म कथन करीं ॥ १ ॥

सूत म्हणे कृत, त्रेता तें द्वापार। कलि ऐसीं चार युगें एथें ॥ २ ॥
चार-तीन-दोनसहस्र प्रमाण। वय अप्रमाण कलीमाजी ॥ ३ ॥
कृतयुगीं जन प्रज्ञावंत श्रेष्ठ। तापसी धनाढ्य महाबळी ॥ ४ ॥
त्रेतायुगामाजी उत्साही धार्मिक। स्पर्धा द्वापरांत परस्पर ॥ ५ ॥
असूया, असत्य, ईर्षा, मान, क्रोध। कलीमाजी स्पष्ट विषयासक्ति
हैमवत वर्षी गुण बहु श्रेष्ठ। तयाहूनि श्रेष्ठ हरिवर्षी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्थलकालगुण। वागावें जाणून सकलांनीं ॥ ८ ॥

---

## भूमिपर्व २

अध्याय ११ वा १८

अठरा सहस्र सहाशें योजनें। विस्तृत तो जाणे जंबुगिरी ॥ १ ॥
द्विगुण तयाच्या लवण सागर। नाम रत्नाकर सार्थ त्यासी ॥ २ ॥
जंबुद्वीपाहूनि द्विगुण तें शाक। सभोंवतीं क्षीर सिंधु त्याच्या ॥३॥
शाकद्वीपामाजी शाक महावृक्ष। शामवर्ण लोक सकल तेथें ॥ ४ ॥
मंग, मशक, तें मानस, मंदग। देश हे प्रसिद्ध तयास्थानीं ॥ ५ ॥
ब्राह्मण, क्षत्रिय यथाक्रम तेथें। सन्मान धर्मातें देती बहु ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें शाकद्वीप। गिरि, नद्या श्रेष्ठ तयास्थानीं ॥ ७ ॥

अध्याय १२ वा १९

राया, घृत, दधि, सुरा, जल, ऐसे। चतुःसिंधु साचे उत्तरेसी ॥१॥
कुश-क्रौंचद्वीप पुष्कर प्रसिद्ध। एकाधर्मे देश एकचि तो ॥ २ ॥
सम नामें देश पुढती प्रसिद्ध। वसती दिग्गज तया ठाईं ॥ ३ ॥
चंद्र, सूर्य, राहु, वर्णियेले ग्रह। कथिला विस्तार पुराणीं तो ॥ ४ ॥
ईश्वरनिर्मित सृष्टि हे सकळ। खेद तो निष्फळ धृतराष्ट्रा ॥ ५ ॥
ऐके हें भूमीचें वर्णन तयासी। आयुर्बल कीर्ति लाभतसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विख्यात भारत-। देश, हा प्रसिद्ध कर्मभूमि ॥ ७ ॥

---

## भगवद्गीतापर्व ३

अध्याय १३ वा २०

मुनि म्हणे राया, पातला संजय । वंदूनियां पाय वृत्त कथी ॥ १ ॥
शांतनव भीष्म रणांत निमाला । शिखंडी जाहला संहारक ॥ २ ॥
शरपंजरीं तो पहुडला वीर । तुटला आधार कौरवांचा ॥ ३ ॥
हरिल्या जयानें काशिराजकन्या । वध पर्शुरामा न घडे ज्याचा ॥
तोचि शिखंडीनें पाडिला रणांत । वीर अलौकिक शांतनव ॥ ५ ॥
शर्वरी त्या दश सैन्य संरक्षिलें । कंपित जाहलें पांडवसैन्य ॥ ६ ॥
प्रतिज्ञापालन करूनि संगर । केलें घनघोर रणांगणीं ॥ ७ ॥
वातभग्नवृक्षासम भीष्म आज । करी शरशेज दुर्दैव हें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीष्मवधवृत्त । ऐकूनि नृपास खेद बहु ॥ ९ ॥

अध्याय १४ वा २१

धृतराष्ट्र म्हणे संजया, रणांत । कैसा वीरश्रेष्ठ हत झाला ॥ १ ॥
दर्शनेंचि ज्याच्या शत्रु हतप्रभ । कैसा तो रणांत पडला तात ॥२॥
वृत्तांत सकळ ऐकवीं मजसी । वधिलें तयासी कैसें तरी ॥ ३ ॥
मागेंपुढें त्याच्या वीर कोण कोण- । होते, निवेदन करीं मज ॥ ४ ॥
लोहमय वाटे हृदय हें माझें । विदीर्ण न कैसें होई तरी ॥ ५ ॥
धर्मज्ञ तो कैसा रणांत पहुडला । कितव[2] त्या काळा वदला काय ॥
असूनि जिवंत द्रोण-कृपादिक । कैसा गंगासुत नष्ट होई ॥ ७ ॥
अशान्त मी झालों सूता, दुर्योधन । वदला हें पाहून काय सांगें ॥
वासुदेव म्हणे सकळ वृत्तांत । नृपालागीं सूत कथन करी ॥ ९ ॥

अध्याय १५ वा २२

सूत म्हणे धृतराष्ट्रा । दोष नसे हा अन्याचा ॥ १ ॥
आचरी जो निंद्यकर्म । वध्य तोचि जगीं जाण ॥ २ ॥
नको शोक करूं आतां । ऐकें सकल वृत्तांता ॥ ३ ॥

---

१ वैशंपायन. २ शकुनी.

जयांमुळें दिव्य दृष्टि । गगनसंचाराची शक्ति ॥ ४ ॥
अस्त्रांपासूनि रक्षण । प्राप्त, व्यासां त्या वंदून ॥ ५ ॥
कथितों सकलहि वृत्त । ऐकें देऊनियां चित्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐका । कथितों मीही त्या वृत्तांता ॥ ७ ॥

२३

सज्ज होतां सैन्य बोलला नृपति । पितामहाप्रति संरक्षावें ॥ १ ॥
संरक्षण त्याचें आमुचा तो जय । संरक्षी विजय शिखंडीतें ॥ २ ॥
भीष्म शिखंडीसी न वधील कदा । जाणावी आपदा तेचि आम्हां ॥
दुःशासनादिकां ऐसें कथी राव । संरक्षिती सर्व भीष्मालागीं ॥ ४॥
शिखंडीजंबूक वधील सिंहासी । न होवो हें कदापि राव म्हणे ॥
वासुदेव म्हणे संजय निवेदी । भीष्मपतनाची कथा ऐका ॥ ६ ॥

अध्याय १६ वा

२४

संपतां रजनी वीर प्रातःकाळीं । प्राप्त रणस्थळीं शौर्यें होती ॥ १ ॥
अश्व, गज, रथ, सैनिक ते योद्धे । गर्जूनियां मोदें सिद्ध होती ॥२॥
जयद्रथ, शल्य, कैकेय, शकुनि । दहा अक्षौहिणी सैन्य सिद्ध ॥३॥
एक अक्षौहिणी धार्तराष्ट्रसेना । शोभे अग्रस्थाना पुढती भीष्म ॥४॥
शिरस्त्राण-अश्व-कवचहि शुभ्र । आभरणें अश्व सकल शुभ्र ॥ ५ ॥
तालध्वज भीष्म शोभे सूर्यासम । पांडवांचें सैन्य भयग्रस्त ॥ ६ ॥
पूर्वाभिमुख तें सैन्य पांडवांचें । एकाचि ठायातें प्राप्त होई ॥ ७ ॥
ऐकिला पाहिला नव्हताचि कदा । संमर्द सैन्याचा ऐसा राया ॥८॥
वासुदेव म्हणे प्रलयकालीन । सिंधूसम सैन्य भयद भासे ॥ ९ ॥

अध्याय १७ वा

२५

सप्त महाग्रह पातले समीप । मघेसी तो चंद्र प्राप्त झाला ॥ १ ॥
भानु उदयासी जाहला तो द्विधा । करिती घोर शब्दां क्रूर पक्षी ॥
पांडव विजयी होवोत हा शब्द । उच्चारूनि युद्ध करिती भीष्म ॥३ ।

वीरांप्रति भीष्म म्हणे करा रण । गृहांत मरण निंद्य वीरां ॥ ४ ॥
उघडिलें तुम्हांस्तव स्वर्गद्वार । गेले थोर वीर याचि मार्गें ॥ ५ ॥
ऐकूनियां योद्धे कर्णाविण सर्व । पातले सगर्व रणामाजी ॥ ६ ॥
सिंहपुच्छ चिन्ह द्रोणनंदनाचें । सुवर्ण वेदी ते द्रोणध्वजीं ॥ ७ ॥
गज तेंचि अंग, नृपाळ मस्तक[1] । अश्व पक्ष, व्यूह रचिला तदा ॥
वासुदेव म्हणे सर्वत्र ज्या मुखें । रक्षिती व्यूहातें द्रोणादिक ॥ ९ ॥

अध्याय १८ वा २६

शब्द महान सेनेचा । अश्व, पदाति, गजांचा ॥ १ ॥
एकमेकां भिडले वीर । समरीं शोभले रणधीर ॥ २ ॥
दुःशासनादि ते जाण । पृष्ठभागाचें रक्षण- ॥ ३ ॥
करिती, शिकस्त करोनी । भीष्म मुख्य हें गणूनि ॥ ४ ॥
रथ, चक्र, संरक्षक । गजचरणरक्षक ॥ ५ ॥
साठ सहस्र ते संख्या । वीर प्रवर्तले युद्धा ॥ ६ ॥
गंगा-यमुनासंगम । वासुदेवा भासे सैन्य ॥ ७ ॥

अध्याय १९ वा २७

धृतराष्ट्र म्हणे प्रतिव्यूह कैसा । होता पांडवांचा सांगें मज ॥ १ ॥
सूत म्हणे धर्म वदला पार्थासी । वदले बृहस्पति युद्धशास्त्रीं ॥ २ ॥
अल्प सैन्य व्हावें संगरीं एकत्र । पसरावें सर्वत्र वि[illegible] जरी ॥३॥
सूचिमुखव्यूह वास्तव रचावा । वज्रव्यूह व्हावा पार्थ म्हणे ॥४॥
उपायज्ञ भीम वसो अग्रभागीं । गाळण वैऱ्याची पाहूनि त्या ॥५॥
पृष्ठभाग रक्षो विराट नृपति । तयासवें जाती सकळ वीर ॥ ६ ॥
पार्थ म्हणे भीमा, दाखवीं सामर्थ्य । नजीकचि प्राप्त वैरी तुझे ॥ ७ ॥
गर्जना तेधवां जाहली वीरांची । शोभे महाकपि ध्वजावरी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुश्चिन्हें त्यावेळीं । पाहूनि घाबरी कौरवसेना ॥९॥

---

१ हत्ती हेंच ज्याचें अंग आहे इत्यादि हें व्यूहाचें वर्णन आहे.

अध्याय २० वा २८

राव म्हणे सूता, उल्हसित कोण । कोण दैवाधीन दिसले सांगें ॥
सूत म्हणे राजा, उल्हसित सर्व । सैन्य तें विचित्र वन शोभे ॥२॥
देव-दैत्यांसम पांडव-कौरव। वायु अनुकूल पांडवांसी ॥ ३ ॥
सुवर्णालंकृत नील गजावरी । शुभ्र छत्रधारी दुर्योधन ॥ ४ ॥
एका गजासवें होते शत रथ। रथासवें अश्व शत राया ॥ ५ ॥
अश्वासवें दश धनुर्धारी वीर। तयासवें ढालधारी शत ॥ ६ ॥
दैव, गांधर्व ते मानुष, असुर। व्यूह वारंवार भीष्म रची ॥ ७ ॥
कौरवांची सेना भयावह भासे। परी पांडवांतें कृष्ण साह्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दैवोद्योग जेथें। अलौकिक तेथें कार्यसिद्धि ॥ ९ ॥

अध्याय २१ वा २९

कौरवांचा व्यूह पाहोनियां त्रस्त। धर्माप्रति पार्थ वदला धैर्ये ॥ १॥
राया, प्रज्ञा-गुण-शौर्य-संख्यादिक। वीर पराभूत कैसे होती ॥ २ ॥
कथिलें देवांसी ब्रह्मदेवें पूर्वी। राया, ध्यानीं घेई कथितों तेंचि ॥३॥
सत्य, दया, धर्म, उद्यम अमोघ-। साधन, सामर्थ्य तुच्छ तया ॥४॥
धर्मप्रेमें अहं-ममता त्यागूनि। लढे तया क्षणीं विजयलाभ ॥ ५ ॥
कृष्ण तेथें जय बोलला नारद। तयाचा प्रसाद आम्हांलागीं ॥६॥
जयाच्या प्रसादें विजयी विबुध। साह्य तो गोविंद कृष्ण आम्हां ॥
वासुदेव म्हणे पार्थ धर्माप्रति। कृष्णाची महती ऐसी सांगे ॥ ८ ॥

अध्याय २२ वा ३०

वज्रव्यूहासी योजून। पार्थ करी संरक्षण ॥ १ ॥
मध्यभागीं तो शिखंडी। धृष्टद्युम्न अग्रभागीं ॥ २ ॥
शुभ्रछत्रधारी धर्म। दक्षिणेसी युयुधान ॥ ३ ॥
मणि-मंत्र औषधीनें। स्वस्त्ययन तें धर्माचें ॥ ४ ॥
धेनु-सुवर्णाचें दान। करूनि शोभे शक्रासम ॥ ५ ॥

रथ हस्तिनापुरींचा । आणविला सुवर्णाचा ॥ ६ ॥
चक्रांकित पार्थरथ । करी श्रीकृष्ण सारथ्य ॥ ७ ॥
पाहूनियां भीमार्जुनां । कांपे कौरवांची सेना ॥ ८ ॥
कृष्ण म्हणे तीन शत । केले भीष्में अश्वमेध ॥ ९ ॥
सैन्यासवें भीष्म वध्य । कथन करी वासुदेव ॥ १० ॥

अध्याय २३ वा ३१

कृष्णाज्ञेनें पार्थ विजयलाभातें । स्तवन दुर्गेचें करीतसे ॥ १ ॥
सिद्धसेनानी, हे आर्ये, तव नाम । देसी निजस्थान योगिवृंदां ॥२॥
मंदरवासिनी, नमितों मी तुज । ब्रह्मचर्यस्थित कुमारी तूं ॥ ३ ॥
कापालपत्नी तूं म्हणूनि कापाली । देवी, महाकाली, विघ्नांतके ॥
कृष्णभगिनी, हे प्रसन्नवदने । विविधरूपानें नटसी अंबे ॥ ५ ॥
ब्रह्मविद्या तूंचि, तूंचि माते मुक्ति । स्वाहा स्वधा तूंचि नमितों तुज
मनोभावें तुज प्रार्थितों मी माते । नित्य विजयातें देई मज ॥ ७ ॥
पुष्टि, तुष्टि, धैर्य, सूर्यकांति तूंचि । भगवती तूंचि सकलैश्वर्य ॥८॥
अंबे, तूंचि माझें करावें कल्याण । अंबा प्रगटून वर देई ॥ ९ ॥
सिद्ध मनोरथ होसील तूं नर । नारायण थोर साह्य तुज ॥ १० ॥
बोलूनियां ऐसें पावे अंतर्धान । करील पठण विजय तया ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे बोलला संजय । कृष्ण तेथें जय धृतराष्ट्रा ॥ १२ ॥

अध्याय २४ वा ३२

राव म्हणे हर्षे अग्रभागीं कोण । गेले रणस्थान लक्षूनियां ॥ १ ॥
कोण खिन्न-व्यग्र, प्रारंभीं प्रहार-। केला कोणी घोर सांगे सूता ॥२॥
सूत म्हणे राया, सर्वही हर्षित । पुष्पमाळायुक्त रणांगणीं ॥ ३ ॥
संघर्ष करिती, युद्ध तें तुमुल । उभयही वीर गर्जताती ॥ ४ ॥
रणवाद्यनादें दुमदुमे नभ । हृष्ट सैन्य-गजनाद उठे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अपूर्व संग्राम । कृष्णोक्त तें ज्ञान ऐका आतां ॥ ६ ॥

———

# श्रीमद्भगवद्गीता

## गीता अध्याय १ ला

अध्याय २५ वा ३३ (१) श्लोक १ ते ३

धर्मवृद्धिकारी सूता, कुरुक्षेत्रीं। युद्धेच्छा अंतरीं धरूनि वीर ॥१॥
दुर्योधनादिक तैसेचि पांडव। करिते झाले काय राव म्हणे ॥ २ ॥
सूत म्हणे व्यूहस्थित शत्रुसैन्य। पाहूनि नंदन वदला द्रोणां ॥ ३ ॥
आचार्य हो, पहा बुद्धिमंत शिष्यें। तुझ्या, द्रुपदसुतें रचिला व्यूह
पांडवांचें महा सैन्य अवलोकावें। वासुदेव यावें लक्ष म्हणे ॥ ५ ॥

३४ (२) ४–६

भीमार्जुनांसम शूर युद्धामाजी। राया, सैन्यामाजी वीर बहु ॥ १ ॥
सात्यकि, विराट, द्रुपद महारथ। धृष्टकेतु, काश्य, चेकितान ॥
नरपुंगव ते पुरुजित् कुंतिभोज। उत्तमौजा, शैब्य, वीर्यवंत ॥ ३ ॥
पराक्रमी युधामन्यु तें सौभद्र। द्रौपदीचे पुत्र महारथ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पांडवपक्षीय। वीर देती धैर्य समरतां रणीं ॥ ५ ॥

३५ (३) ७–९

आतां ऐका गुरुश्रेष्ठा। नायक जे माझ्या पक्षा ॥ १ ॥
कथितों कांहीं नामें त्यांचीं। केवळ स्मरणार्थ तुम्हांसी ॥२॥
गुरो, तुम्ही, भीष्म, कर्ण। कृप जिंकिती जे रण ॥ ३ ॥
अश्वत्थामा, विकर्णादि। तैसाचि तो सौमदत्ति ॥ ४ ॥
ऐसे शूर बहु अन्य। मदर्थ ज्यां तुच्छ प्राण ॥ ५ ॥
युद्ध विशारद सर्व। नाना शस्त्रधारी वीर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सैन्य। वर्णी ऐसें दुर्योधन ॥ ७ ॥

३६ (४) १०–१३

अमर्याद ऐसें भीष्मसंरक्षित। सैन्य गुरुराज आमुचें हें ॥ १ ॥
मर्यादित त्यांचें सैन्य भीमाश्रित। सर्वांनीं भीष्मांस संरक्षावें ॥२॥

सूत म्हणे राया, कुरुवृद्ध भीष्म । प्रहर्षित जाण करिती नृपा ॥३॥
उच्च सिंहनाद करूनियां शंख । फुंकिला, रणांत महावीरें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शंख भेर्यादिक-। झडती, तो नाद गगनीं कोंदे ॥ ५ ॥

३७ ( ५ ) १४–१८

शुभ्र अश्वयुक्त रथामाजी स्थित । अर्जुन-अच्युत तयावेळीं ॥ १ ॥
दिव्य शंख वेगें फुंकिती आपुले । प्रहर्षित झाले पांडववीर ॥ २ ॥
‘पांचजन्य’, ‘देवदत्त’ कृष्णार्जुन । महा शंख भीम फुंकी ‘पौंड्र’ ॥३॥
धर्मराज फुंकी ‘अनंतविजय’ । ‘ सुघोष ’ नकुळ फुंकी वेगें ॥ ४ ॥
सहदेव फुंकी ‘मणिपुष्पकातें’ । काश्य, शिखंडी ते महारथ ॥ ५ ॥
धृष्टद्युम्न तेंवी विराट, सात्यकि । द्रुपद, द्रौपदीतनय वीर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे एकामागें एक । सौभद्रादि शंख फुंकिताती ॥ ७ ॥

३८ ( ६ ) १९–२३

कौरवहृदयें विदीर्ण त्या नादें । पृथिवी निनादे, कोंदे नभ ॥ १ ॥
स्वस्वस्थानास्थित धृतराष्ट्रपुत्र । शस्त्रास्त्रप्रसंगक्षण आला ॥ २ ॥
गांडीव धनुष्य उचलूनि पार्थ । तदा अच्युतास वदला ऐका ॥ ३ ॥
दोन्हीं सैन्यांमाजी अच्युता, तूं माझ्या । नेऊनियां रथा उभा करीं ॥
निरीक्षीन देवा, वीर युद्धोत्सुक । संग्रामीं या युद्ध करणें कोणा ॥५॥
तया दुर्बुद्धीचें कराव्या हित । पातले जे एथ पाहीन त्यां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यापरी अर्जुन । बोलला वचन कृष्णाप्रति ॥ ७ ॥

३९ ( ७ ) २४–२८

सूत म्हणे पार्थवचनें श्रीकृष्ण । नेई रथोत्तम सैन्यामाजी ॥ १ ॥
भीष्म-द्रोणादिक वीरांच्या समोर । रथ यादवेंद्र उभा करी ॥ २ ॥
म्हणे पार्था, पाहीं कौरव सकळ । जाहले एकत्र रणांगणीं ॥ ३ ॥
भूरिश्रव्यादिक पितृव्य त्या स्थानीं । भीष्मादिक रणीं पितामह ॥४॥
द्रोणादि आचार्य मातुल तें भ्राते । पुत्रपौत्र सखे तया स्थानीं ॥
सुहृत्, श्वशुरादि अवलोकी पार्थ । चित्त करुणार्द्र होई त्याचें ॥६॥
विषण्ण मनें तो बोलला कृष्णासी । वासुदेव कथी तेंचि ऐका ॥७॥

४० ( ८ ) २९–३१

कृष्णा, स्वजन युद्धार्थ । अवलोकूनि समुपस्थित ॥ १ ॥
शिथिल होती सर्व गात्रें । वदनही शुष्क झालें ॥ २ ॥
कंप रोमांच शरीरीं । गांडीव हें गळतें खालीं ॥ ३ ॥
सकल अंग दाह पावे । उभें मजसी न राहवे ॥ ४ ॥
भ्रमतें जणु माझें मन । होती अशुभ शकुन ॥ ५ ॥
कृष्णा, स्वजनसंहार । न दिसे मज श्रेयस्कर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । ऐसा होई खिन्नचित्त ॥ ७ ॥

४१ ( ९ ) ३२–३५

नाहीं नाहीं मज विजयाची इच्छा । अथवा राज्यसुखां अपेक्षीं ना
काय लाभ आम्हां जिवंत राहूनि । राज्य वा भोगूनि विविध भोग
जयांस्तव राज्य, भोग तैंवी सुखें । युद्धार्थ ते उभे प्राणपणें ॥ ३ ॥
आचार्य, पितर, पितामह, पुत्र । मातुल, श्वशुर पौत्रादि ते ॥ ४ ॥
त्रैलोक्यराज्यही न रुचे तयांवीण । केवी अपेक्षीन भूमिराज्य ॥
वासुदेव म्हणे पार्थाचा निर्धार । टाळावें हें घोर युद्ध ऐसा ॥ ६ ॥

४२ ( १० ) ३६–३७

धार्तराष्ट्रांसी वधूनि । आम्हां काय लाभ जनीं ॥ १ ॥
आततायी हे वधितां । निश्चयेंसी पाप माथां ॥ १ ॥
ऐसा बांधवांचा वध । करणें आम्हांसी न योग्य ॥ ३ ॥
स्वजनवधें आम्हां केंवी । कृष्णा, सौख्यलाभ होई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । पडला ऐसा संदेहांत ॥ ५ ॥

४३ ( ११ ) ३८–४२

यद्यपि त्यां लोभपराभूतचित्तां । न दिसे सर्वथा दोष त्यांचा ॥१॥
कुलक्षयकृत दोष वा पातक । मित्रद्रोहकृत न कळे तयां ॥ २ ॥
जाणूनि ते दोष निवृत्तचि व्हावें । केंवी न जाणावें ऐसें आम्हीं ॥
कुलक्षयें कुलधर्म सनातन । नष्ट होती जाण यदुश्रेष्ठा ॥ ४ ॥
तेणें सर्व कुळा व्यापितो अधर्म । करिती दुर्वर्तन कुलस्त्रिया ॥ ५ ॥

कुलस्त्रीदोषानें वर्णांचा संकर। वार्ष्णेया तें घोर विघ्न असे ॥ ६॥
संकरें नरक कुलघ्नां कुळाही। पिंडोदक कांहीं पितरां नसे ॥ ७॥
वासुदेव म्हणे तेणें त्यां पतन। दोष हे दारुण कुळक्षयें ॥ ८॥

४४ ( १२ ) ४३–४४

वर्ण संकरकारक। कुलघ्नांचे घडतां दोष ॥ १ ॥
उच्छिन्नचि जातिधर्म। शाश्वत तें कुलधर्म ॥ २ ॥
कुलधर्म नष्ट होतां। जनार्दना, मानवांचा ॥ ३ ॥
नरकवास निश्चयानें। कथिती ज्ञाते अनुभवानें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसी। चिंता पार्थाच्या चित्तासी ॥ ५ ॥

४५ ( १३ ) ४५–४७

हाय हाय आम्हीं राज्यसुखासाठीं। स्वजनघातासी सज्ज झालों
प्रतिकारहीना अशस्त्राही मज। वधितां शस्त्रधर धार्तराष्ट्र ॥ २ ॥
क्षेमतरचि तें होईल मजसी। देवा, हे युद्धाची गोष्ट नको ॥ ३ ॥
सूत म्हणे ऐसें बोलूनि अर्जुन। शोकाकुल मन शस्त्रें टाकी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा वीर पार्थ। रथामाजी स्वस्थ बैसलासे ॥ ५ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन-
संवादे अर्जुनविषादयोगोनाम प्रथमोऽध्यायः

---

## गीता अध्याय २ रा

अध्याय २६ वा ४६ ( १ ) १–३

सूत म्हणे ऐसा कृपायुक्त पार्थ। होई त्रस्तनेत्र अश्रु गाळी ॥ १ ॥
खेदाकुला तया श्रीकृष्ण भगवान। बोलला वचन तेंचि ऐका ॥ २॥
अर्जुना, न श्रेष्ठीं आचरिलें तेंचि। अस्वर्ग्य अकीर्तिकारी पाप ॥३॥
अवेळीं या कैंवी तुज आठवलें। नव्हतेंचि चिंतिलें कोणी कदा ॥
स्वीकारीं न ऐसें क्लैब्य तूं कदापि। शोभे न तुजसी पृथापुत्रा ॥५॥
ऊठ ऐसें क्षुद्र सोडूनि दौर्बल्य। शत्रूवरी चाल करीं वीरा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णवचन। ऐकूनि अर्जुन वदता झाला ॥ ७ ॥

४७ ( २ ) ४–६

कृष्णा, कैंवी भीष्म-द्रोणां । ताडूं ऐशा प्रखर बाणां ॥ १ ॥
पूजार्ह ते मजप्रति । संग्राम न योग्य त्यांसी ॥ २ ॥
ऐसीयांच्या वधाहूनि । भिक्षान्नही श्रेष्ठ जनीं ॥ ३ ॥
गुरुरक्तानें लांछित । अर्थ, काम मजसी त्याज्य ॥ ४ ॥
समरीं युद्ध वा भिक्षान्न । श्रेष्ठ काय न कळे जाण ॥ ५ ॥
जिंकूं आम्हीं तयांप्रति । अथवा आम्हां ते जिंकिती ॥ ६ ॥
तेंही न कळेचि आम्हां । काय करावें श्रीकृष्णा ॥ ७ ॥
जीवितही ज्यांच्या वधें । न रुचे तेचि पुढती उभे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । करी ऐका प्रश्न मुख्य ॥ ९ ॥

४८ ( ३ ) ७–१०

दैन्यदोषें कृष्णा, नष्ट क्षात्रवृत्ति । झाली तत्वबुद्धि संमोहित ॥१॥
शरण हा शिष्य पुशितो तुजसी । निश्चित श्रेयाची वाट दावीं ॥
निष्कंटक सार्वभौमही समृद्ध । राज्य, इंद्रपद लाभे जरी ॥ ३ ॥
इंद्रियशोषण शोकाची निवृत्ति । तरी कैशा रीति न कळे घडे ॥
सूत म्हणे राया, पार्थ श्रीहरीतें । नको नको मातें युद्ध म्हणे ॥ ५ ॥
तदा स्तब्धा तया विषण्ण पार्थासी । सैन्यमध्यभागीं हृषिकेश-॥
जणु हांसतचि वदला वचन । करी निवेदन वासुदेव ॥ ७ ॥

४९ ( ४ ) ११–१२

नव्हती जे शोकयोग्य । त्यांचा करूनियां शोक ॥ १ ॥
गोष्टी सुज्ञांच्या बोलसी । ऐकें पंडितांची स्थिति ॥ २ ॥
मृत, जिवंतही मूर्ख । अशोच्यचि तयां देख ॥ ३ ॥
नव्हतों कदा मी, न ऐसें । पार्था कथावें चित्तातें ॥ ४ ॥
तैसाचि तूं अथवा नृप । नव्हते ऐसेंही नाहींच ॥ ५ ॥
मरणोत्तर नसूं आम्हीं । ऐसेंही न घेई ध्यानीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तत्त्व । कथितो ऐका रमाधव ॥ ७ ॥

५० ( ५ ) १३–१५

बाल्य, तारुण्य कीं वार्धक्य या देहीं। अन्य देह पाहीं त्याच परी॥
ज्ञाता तयास्तव न पावेचि मोह। जाणें हा निश्चय धनुर्धरा ॥ २ ॥
इंद्रियविषयसंयोग हे पार्था। देती सुख-दुःखां शीतोष्णजां ॥३॥
उत्पत्तिविनाशशाली ते अनित्य। जाणूनियां नित्य सहन करीं॥
धैर्यवंतासी ज्या सुख-दुःखसम। बाधती न जाण श्रेष्ठा त्या हे॥५॥
मोक्षप्राप्तीलागीं समर्थ तो पाहीं। वासुदेव होई दास त्याचा ॥६॥

५१ ( ६ ) १६–१८

असत्या अस्तित्व, अभाव सत्याचा। कदाकाळीं साचा न घडे पार्था
तयां उभयांचा निर्णय जाणिती। ज्ञाते तत्त्वदर्शी निश्चयानें ॥ २ ॥
जेणें व्यापियेलें या सर्व विश्वासी। तत्त्व तें अविनाशी ध्यानीं असो॥
तया अव्ययाचा करणें विनाश। नसेचि वा शक्य कवणातेंही ॥४॥
अविनाशी अप्रमेय नित्य देही। देह त्याचे पाहीं अंतवंत ॥ ५ ॥
जाणूनियां प्राप्त युद्ध हें आचरीं। बोध ध्यानीं धरी वासुदेव ॥ ६ ॥

५२ ( ७ ) १९–२०

मानील जो तया हन्ता। अथवा विषय हननाचा ॥ १ ॥
दोघेही ते अनभिज्ञ। आत्मा नव्हे कर्ता, कर्म ॥ २ ॥
जन्म-मृत्यु न तयासी। नित्य अज-अव्ययासी ॥ ३ ॥
होऊनि न तो नाहींसा। पुरातन असे सदा ॥ ४ ॥
देहवधानें तयाचा। वध न घडेचि साचा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वेद। जनां दावी हा सिद्धान्त ॥ ६ ॥

५३ ( ८ ) २१–२२

अविनाशी, नित्य, अज, अव्ययासी। जाणेल जो श्रेष्ठी धनुर्धरा॥
घात तो कोणाचा कैंबी वा करील। अथवा करवील कैसा तरी॥
जीर्णवस्त्रें जैंवी टाकूनि नूतन। अन्य जें धारण करी नर ॥ ३ ॥
तैसाचि हा देही जीर्ण शरीरातें। टाकूनि अन्यातें स्वीकारितो ॥
वासुदेव म्हणे वस्त्रान्तरें नर। न पालटेचि स्थिर तैंवी आत्मा ॥५॥

५४ ( ९ ) २३–२५

छेदिती न शस्त्रें जाळीन पावक । भिजवी न उदक तयालागीं ॥ १ ॥
न सुकवी वायु, अच्छेद्य अदाह्य । अक्लेद्य, अशोष्य नित्य आत्मा ॥
सर्वगत, स्थाणु, अचल, सनातन । अव्यक्तचि जाण अचिंत्य तो ॥
अविकारी तया जाणूनियां शोक । करणें उचित नसे तुज ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण यदुनाथ । शोकविनाशार्थ ज्ञान कथी ॥ ५ ॥

५५ ( १० ) २६–२७

देहासवें जरी उत्पत्ति-विनाश । मानिले आत्म्यास क्षणभरी ॥ १ ॥
तथापि हे वीरा, त्याज्यचि हा शोक । उत्पत्तिविनाशशीलास्तव ॥
जन्मला तयासी मृत्यु निश्चयानें । मृताप्रति घेणें पुनर्जन्म ॥ ३ ॥
अपरिहार्य या गोष्टीस्तव शोक । करणें उचित नसे पार्था ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे विश्व हें नश्वर । परी अनावर मोह त्याचा ॥ ५ ॥

५६ ( ११ ) २८–२९

उत्पत्तीच्या पूर्वीं अव्यक्त हीं भूतें । व्यक्तता तयांतें मध्यें येई ॥ १ ॥
अंतींही अव्यक्त स्वभाव ज्यां ऐसा । शोक काय त्यांचा करणें योग्य ॥
आश्चर्य मानूनि पाही कोणी यासी । कोणी आश्चर्येंचि वर्णी तया ॥
आश्चर्य मानूनि ऐके तया कोणी । श्रवणेंही कोणी जाणीचिना ॥४॥
वासुदेव म्हणे दुर्लभचि श्रोता । वक्ता तैंवी ज्ञाता सुदुर्लभ ॥ ५ ॥

५७ ( १२ ) ३०–३१

कोणाही देहीं हा अवध्यचि नित्य । देही कुंतीपुत्र ध्यानीं धरो ॥१॥
यालागींचि शोक करणें कोणास्तव । जाणावें अयोग्य धनुर्धरा ॥
स्वधर्मही जरी अवलोकिसी तरी । कंप हा शरीरीं न शोभेचि ॥ ३ ॥
युद्धाहूनि धर्म्य श्रेयस्कर अन्य । क्षत्रियासी जाण असेचिना ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्वस्वधर्माचार । श्रेयस्कर थोर मार्ग हाचि ॥ ५ ॥

---

१ तोडतां येत नाहीं असा. २ जाळतां न येईल असा. ३ न भिजवितां येईल असा. ४ न सुकवितां येईल असा. ५ स्थिर.

५८ ( १३ ) ३२-३४

यदृच्छाप्राप्त हें अर्जुना, समर। उघडलें द्वार स्वर्गाचेंचि ॥ १ ॥
ऐसीया युद्धाचा घडे तयां लाभ। जयां थोर भाग्य क्षत्रियांसी ॥
ऐसें असूनियां धर्म्ययुद्धत्याग। करितां धर्ममार्ग उल्लंघन ॥ ३ ॥
तैसाचि त्यायोगें सत्कीर्तीचा नाश-। होऊनियां, पाप जोडिसील
अपकीर्ति जन कथितील नित्य। पावसील खेद तेणें बहु ॥ ५ ॥
संभाविताlलागीं अपकीर्तीहूनि। मरणचि जनीं श्रेष्ठ वाटे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कीर्तिसंपादन। रक्षण त्याहून कठिण असे ॥ ७ ॥

५९ ( १४ ) ३५-३६

महारथी तुज म्हणतील हा भ्याला। सोडूनि पळाला समरांगण ॥
मानिती जे तयां होसील अमान्य। याहूनि पतन काय दुजें ॥ २ ॥
हाय निंदूनियां तव सामर्थ्यासी। वदूं नये तेंचि वदतील ते ॥ ३ ॥
सन्मान्य वीरासी दुःखकारी ऐसें। अन्य काय असे जगामाजी ॥४॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्ण सांवळा। पुढती बोलला काय ऐका ॥ ५ ॥

६० ( १५ ) ३७

युद्धामाजी मरण येतां। वीरा, पावसील स्वर्गा ॥ १ ॥
भोगिसील विजयलाभें। राज्य अवघ्या भूतलाचें ॥ २ ॥
तस्मात् युद्धाचा निश्चय। करूनि ऊठ हे कौंतेय ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण। मूर्तिमंत तें चैतन्य ॥ ४ ॥

६१ ( १६ ) ३८-३९

धनुर्धरा, सुख-दुःख, लाभ-हानी। जया-जय मानीं सारखेंचि ॥१॥
मग होईं वीरा, रणालागीं सिद्ध। तेणें पापदोष न लागेचि ॥ २ ॥
ऐसी ज्ञानबुद्धि कथिली तुजसी। आतां योगबुद्धि श्रवण करीं ॥३॥
छेदिसील तेणें पार्था, कर्मबंध। वासुदेव मागे ऐका गाई ॥ ४ ॥

६२ ( १७ ) ४०-४४

आरब्ध कर्माचा मार्गीं या न नाश। अथवा विपरीत न घडे कांहीं
स्वल्पही आचार श्रेष्ठ या मार्गींचा। संसारभयाचा नाश करी ॥

एकमेव मोक्ष, निश्चय या मार्गी ॥ बहुविध बुद्धि सकामाची ॥ ३ ॥
स्वर्गप्रदकर्मांविण न साधन । अर्थवादमग्न मन ज्यांचें ॥ ४ ॥
ऐसे कामासक्त स्वर्गाचि पुरुषार्थ । मानितासी मूढ मधुर शब्दें ॥
भोगैश्वर्यप्रद बहुकर्मयुक्त । जन्म फलप्रद वेदवाक्यें ॥ ६ ॥
ऐकूनि आकृष्ट होई ज्यांचें चित्त । भाग्य भोगासक्त अस्थिर ते ॥७॥
वासुदेव म्हणे ऐसीयांच्या चित्तीं । कदा स्थिरबुद्धि वसेचिना ॥८॥

६३ ( १८ ) ४५–४६

त्रैगुण्यविषय वेद हे जाणावे । निष्काम तूं व्हावें धनुर्धरा ॥ १ ॥
द्वंद्वरहित तूं नित्य हो सत्त्वस्थ । योगक्षेमास्तव न करीं चिंता ॥२॥
विषयाधीन तूं न होईंचि पार्था । आत्मस्वरूपाचा ध्यास घेईं ॥ ३ ॥
जलमय देशीं कूपप्रयोजन । उदकार्थ जाण नसे जैंवी ॥ ४ ॥
तत्त्वज्ञ विप्रासी सर्ववेद तैसे । तोंवरी कूपातें सोडूं नये ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अधिकारभेद । जाणूनीच मार्ग आक्रमावा ॥ ७ ॥

६४ ( १९ ) ४८–४८

केवळ ज्ञानेंचि कर्मकांडफल । कर्मींचि अधिकार परी तुझा ॥ १ ॥
कर्मफलासक्ति न धरीं सर्वथा । लंघूनि त्या मार्गा पुढती जाईं ॥२॥
कर्मफलहेतु न धरावा मनीं । तैसाचि अकर्मीं संग नको ॥ ३ ॥
योगस्थ होऊनि, आसक्ति त्यागूनि । समत्व पावूनि कर्मं करीं ॥४॥
सिद्धि-असिद्धीतें समान लेखणें । योग तोचि जाणें धनंजया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्म जें विहित । तेंचि करीं हित त्यजितां संग ॥६॥

६५ ( २० ) ४९–५१

बुद्धियोगाहूनि ऐशा । निकृष्टचि सकामता ॥ १ ॥
शरण जाईं तूं योगासी । सकाम ते अज्ञ लेखीं ॥ २ ॥
समबुद्धि योगयुक्त । करी पाप-पुण्यत्याग ॥ ३ ॥
म्हणूनि योगयुक्त होईं । कर्मकौशल्य तें पाहीं ॥ ४ ॥
योगयुक्तचि ते ज्ञाते । त्यजिती कर्मांच्या फलातें ॥ ५ ॥

---

१ त्रिगुणांच्या विषयांनीं युक्त म्हणजे संसाराचें प्रतिपादन करणारे.

तेणें जन्मबंधमुक्ति । अनामयपदप्राप्ति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे योग । ऐसा टाळी कर्मभोग ॥ ७ ॥

६६ ( २१ ) ५२-५३

मोहमलाप्रति बुद्धि तव पार्था । उल्लंघील यदा विवेकानें ॥ १ ॥
आत्मव्यतिरिक्त श्रुत-श्रोतव्येंही । विराग सर्वही त्यागिसील ॥ २॥
बहु श्रुतिवाक्यें चलित जे बुद्धि । त्यागी विक्षेपासी यदा पार्था ॥
विकल्पशून्यातें यदा आत्मस्थित । तदा योग प्राप्त होई तुज ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पूर्वोक्त प्रश्नाचें । उत्तर हें ऐसें दिधलें कृष्णें ॥ ५ ॥

६७ ( २२ ) ५४-५६

पार्थ म्हणे कृष्णा, ज्ञाता स्थितप्रज्ञ । कथावें लक्षण मज त्याचें ॥१॥
स्थितप्रज्ञ कैंचा बोले, वसे, वागे । कथावें तें मातें यदुश्रेष्ठा ॥ २ ॥
कृष्ण म्हणे पार्था, मनोगत काम । सर्वही त्यागून सर्वरूपें ॥ ३ ॥
आत्म्यामाजी आत्मस्वरूपें संतुष्ट । स्थितप्रज्ञ देख तोचि एक ॥४॥
त्रिविध तापें जो उद्विग्न न होई । निरिच्छचि पाहीं सौख्य भोगीं ॥
विगत जयाचे राग, भय, क्रोध । स्थिरबुद्धि चांग मुनि तोचि ॥६॥
वासुदेव म्हणे ज्ञात्याचें लक्षण । मानावें साधन मुमुक्षूनें ॥ ७ ॥

६८ ( २३ ) ५७-५८

देहादिकाची ज्या नसेचि आसक्ति । शुभाशुभ प्राप्ति अथवा होतां
हर्ष-व्यथाही न जयाच्या चित्तास । प्रज्ञा प्रतिष्ठित जाण त्याची ॥
विषयांपासूनि आंवरी इंद्रियां । कूर्म अवयवां जैशापरी ॥ ३ ॥
सर्वप्रकारें जो संयमीवरिष्ठ । प्रज्ञा प्रतिष्ठित जाण त्याची ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्थिरबुद्धि नर । वंद्य तो साचार जगामाजी ॥ ५ ॥

६९ ( २४ ) ५९-६१

उपोषणें होती विषय निवृत्त । आसक्ति चित्तांत वसे परी ॥ १ ॥
परमार्थतत्त्वबोधें स्थितप्रज्ञ । आसक्ति लंघून धन्य होई ॥ २ ॥

---

१ श्रवण केलेलें. २ श्रवण करण्यास योग्य.

यत्नशील बुद्धिमंताचेंहि मन । इंद्रियें हरण करिती बळें ॥ ३ ॥
बलिष्ठां त्यां सर्वां आंवरी जो शांत । मीचि सर्वश्रेष्ठ जयाप्रति ॥४॥
वासुदेव म्हणे इंद्रियें स्वाधीन । प्रतिष्ठित जाण प्रज्ञा त्याची ॥ ५ ॥

७० ( २५ ) ६२–६३

चिंतितां विषय उपजे आसक्ति । पुढती विषयांची इच्छा होई ॥१॥
तोचि काम तेणें क्रोधोत्पत्ति जाण । संमोह दारुण क्रोधें घडे ॥ २ ॥
पुढती स्मृतिभ्रंशें विस्मृति शास्त्रांची । विस्मरणें बुद्धि नष्ट होई ॥
बुद्धिनाशें होई विनाश नराचा । दास श्रीहरीचा वासुदेव ॥ ४ ॥

७१ ( २६ ) ६५–६६

राग द्वेषहीन स्वाधीनइंद्रिय । सेवितां विषय स्वाधीनात्मा ॥ १ ॥
चित्तप्रसन्नता पावे पुण्यवंत । निर्मल अत्यंत चित्त ज्याचें ॥ २ ॥
प्रसादें त्या होई त्रिविध तापनाश । प्रज्ञा प्रतिष्ठित त्वरित त्याची
चित्तस्थैर्यावीण नसे आत्मबुद्धि । ब्रह्माहं तयासी भाव कैंचा ॥ ४ ॥
निदिध्यासन त्या भावनेवांचूनि । न घडे, त्या वांचूनि शांति नसे ॥
शांतीवीण कैसें सौख्य तें लाभेल । बोध हा तारील वासुदेवा ॥६॥

७२ ( २७ ) ६७–६८

स्वैर इंद्रियांमागून । धांवे उच्छृंखल मन ॥ १ ॥
हरी प्रज्ञा तें नराची । जळीं वायु जें नावेसी ॥ २ ॥
यास्तवचि हे कौंतेया । आंवरी जो या इंद्रियां–॥ ३ ॥
विषयांपासूनि सर्वथा । त्याची प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धन्य । ज्याचीं इंद्रियें स्वाधीन ॥ ५ ॥

७३ ( २८ ) ६९–७२

सर्वभूतांची जे निशा तेथ ज्ञाता । जागृत सर्वदा प्रयत्नेंसी ॥ १ ॥
जागृत ज्यावेळीं सकलही भूतें । तोचि ज्ञानियातें निशाकाल ॥ २ ॥
सर्वदिशांनींही भरतां जल जेवीं । वृद्धि-क्षय नाहीं सिंधूप्रति ॥ ३ ॥
तेंवी विषयांतही विकारविहीन । तया शांति जाण, कामुका न ॥
त्यागी सर्व काम निरिच्छ निर्मम । निरहंकार जाण शांति तया ॥

ऐसी ब्राह्मी स्थिति लाभतां न मोह । जरी अंतकाल येतां लाभे
तल्लाभेंचि नरा घडे मोक्षप्राप्ति । लाभो तेचि स्थिति वासुदेवा ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगोनाम द्वितीयोऽध्यायः

---

## गीता अध्याय ३ रा

अध्याय २७ वा

७४ ( १ ) १–२

पार्थ म्हणे कृष्णा, श्रेष्ठ कर्माहून । वाटे जरी ज्ञान तुजलागीं ॥ १ ॥
तरी घोरकर्मी योजिसी कां मज । जनार्दना, सांग स्पष्टपणें ॥ २ ॥
जणु मिश्रवाक्यें संदेहीं पाडिसी । श्रेयस्कर तेंचि सांगे एक ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे श्रेयस्कर कर्म । अथवा तें ज्ञान प्रश्न हाचि ॥ ४ ॥

७५ ( २ ) ३–५

कृष्ण म्हणे जगीं मोक्षमार्ग एक । परी तो द्विविध ज्ञानकर्में ॥ १ ॥
द्विविध ते निष्ठा सृष्ट्यारंभीं मीचि । अधिकारभेदेंसी कथिली स्पष्ट
कर्माधिकारी ते कर्ममार्गें जाती । ज्ञानमार्गें स्थिति संन्यासियां ॥३॥
कर्मारंभाविण नैष्कर्म्य न वाणे । न्यासें ज्ञानहीनें सिद्धि नोहे ॥ ४ ॥
क्षणही न कोणी कर्माविण राहे । पराधीनता हे मायागुणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कराविती कर्म । प्रकृतीचे गुण अज्ञाकरीं ॥ ६ ॥

७६ ( ३ ) ६–९

वरि वरी कर्मेंद्रियें आंवरूनि । स्मरतो स्वमनीं विषय नित्य ॥ १ ॥
अत्यंतचि मूढ दांभिक तो नर । स्पष्टपणें थोर कथिती ऐसें ॥ २ ॥
परी संयमूनि मनें, ज्ञानेंद्रियां । कर्मेंद्रियीं कार्या आरंभी जो ॥ ३
ऐसा अनासक्त कर्ममार्गी रत । जाण तो वरिष्ठ दोहोंमाजी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे मूढ तो दांभिक । जाणावा साधक अनासक्त ॥ ३ ।

---

१ कर्म घडत असतांही मी कर्ता नव्हे असा ज्ञात्याचा दृढ बोध. म्हणजेच विद्वत् फलभूत-मानससंन्यास.

७७ (४) ८–९

अर्जुना, तूं करीं नियत कर्म जें। अकर्माहूनि तें श्रेष्ठ जाण ॥ १ ॥
शरीरयात्राही न घडे अकर्में। शास्त्रविहित कर्मे घडे जैसी ॥ २ ॥
ईश्वरार्थ कर्मांविण जें जें कर्म। जाण तें बंधन कर्त्यालागीं ॥ ३ ॥
यास्तव तदर्थ होऊनि असंग। आचरीं तूं मार्ग सत्कर्माचा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ईश्वरार्थ कर्म। न घडे बंधन कदा कोणा ॥ ५ ॥

७८ (५) १०–११

सृष्ट्यारंभीं ब्रह्मा प्रजा यज्ञासवें। निर्मूनि वाढावें यज्ञें म्हणे ॥ १ ॥
कामधेनूसम यज्ञ हा तुम्हांसी। होवो वदे हेंचि सकलांप्रति ॥ २ ॥
यज्ञें इंद्रादिकदेवांचें पूजन। करितां प्रसन्न होतील ते ॥ ३ ॥
परस्परां ऐसा तोष देऊनियां। संपादावें श्रेया उभयतांनीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे एकमेकां साह्य। होणें हा उपाय लाभदायी ॥ ५ ॥

७९ (६) १२–१३

यज्ञसंतुष्ट विबुध। अर्पितील इष्टभोग ॥ १ ॥
तेंचि तयां न अर्पितां। तस्करचि जो भोगिता ॥ २ ॥
यज्ञशेषान्न भक्षिती। तयां सकल पापमुक्ति ॥ ३ ॥
आत्मार्थेचि जे रांधिती। पापी पाप ते भक्षिती ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्पष्ट। अभिप्राय हा कृष्णोक्त ॥ ५ ॥

८० (७) १४–१६

भक्षित अन्नेंचि उद्भव भूतांचा। पर्जन्यें अन्नाचा समुद्भव ॥ १ ॥
यज्ञेंचि पर्जन्य कर्मे घडे यज्ञ। देदाज्ञेनें कर्म घडे पार्था ॥ २ ॥
ईश्वरोक्त वेद सकलप्रकाशक। स्वधर्मयज्ञांत वास त्याचा ॥ ३ ॥
ऐसें जगच्चक्र ईश्वरप्रेरित। नानुसरे, पाप प्रत्यक्ष तो ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियसुखार्थ। आयुष्य तें व्यर्थ वेंची मूढ ॥ ५ ॥

८१ (८) १७–१८

परी प्रीति जया आत्मज्ञानीं मात्र। ज्ञानेंचि संतृप्त सर्वकाल ॥ १ ॥

आत्मबोध हाचि संतोष जयाचा। कार्यभाग त्याचा पूर्ण झाला ॥२॥
इहलोकीं त्याचें कृत वा अकृत। अर्थ वा अनर्थ घडवीचिना ॥ ३ ॥
आब्रह्मस्तम्ब त्या कांहीं प्रयोजन। नसे ऐसें जाण निश्चयेंसी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रयोजनावीण। कासयासी शीण घेई कोणी ॥ ५ ॥

८२ ( ९ ) १९–२०

यास्तव तूं अनासक्त। कर्म आचरीं विहित ॥ १ ॥
अनासक्तचि तें कर्म। अंतीं दावी परंधाम ॥ २ ॥
जनकादिकही कर्मेंचि। संपादिते झाले सिद्धि ॥ ३ ॥
पार्था, लोकसंग्रहार्थ। स्वीकारीं तूं हाचि पंथ ॥ ४ ॥
लोकां दावावा सन्मार्ग। कर्मी मार्ग हा यास्तव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्म। अधिकारें श्रेष्ठ धर्म ॥ ६ ॥

८३ ( १० ) २१–२२

आचरितो श्रेष्ठ जें जें। करिती इतर जन तें तें ॥ १ ॥
तयालागीं जें प्रमाण। इतर अनुसरती तें जाण ॥ २ ॥
पार्था, कांहींही मजसी। नसे कर्तव्य त्रिलोकीं ॥ ३ ॥
नसे अप्राप्तही कांहीं। प्राप्तव्य वा कांहीं नाहीं ॥ ४ ॥
परी कर्मेंचि वर्ततों। वासुदेव पुढती गातो ॥ ५ ॥

८४ ( ११ ) २३–२४

पार्था, जरी मीचि नाचरितां कर्म। आलस्य त्यागून मनोभावें ॥१॥
इतरही तरी वागतील तैसे। अनुकरण माझें करूनि सुखें ॥ २ ॥
विनष्ट वा, तरी होतील हे लोक। स्वकर्मविन्मुख मीचि होतां ॥३
वर्णसंकरासी होऊनि कारण। होईल उत्सन्न अवघी प्रजा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शास्त्राज्ञा पाळूनि। मर्यादारक्षणीं रमती श्रेष्ठ ॥ ५ ॥

८५ ( १२ ) २५–२६

आसक्त, विमूढ, उत्साहें ज्या कर्म। आचरिती जाण जयापरी ॥१॥
लोकसंग्रहार्थ तैसींच ज्ञात्यानें। अनासक्त कर्में आचरावीं ॥ २ ॥
फलाशायुक्तांचा कदा बुद्धिभेद। करूं नये नित्य ध्यानीं असो ॥३॥

शांतचित्तें तेंचि स्वयेंहि करूनि । ऱ्यावें आचरूनि इतरां करवीं ॥
वासुदेव म्हणे अज्ञाचिया चाली । चालूनि सांवरी तोचि श्रेष्ठ ॥५॥

८६ ( १३ ) २७–२९

अहंकारमूढ, प्रकृति गुणांचीं । कर्मे आपुलींचि मानी सर्व ॥ १ ॥
आत्मभिन्न गुणकर्मतत्त्ववेत्ता । इंद्रिय विषयांचा खेळ जाणें ॥ २ ॥
गुणांमाजी गुणप्रवृत्ति जाणूनि । असक्ति न मनीं धरिती ज्ञाते ॥३॥
कर्मफलासक्त मूढ, मतिमंद । ज्ञात्यानें अश्रद्ध न करावे त्यां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे बुद्धिभेदें अज्ञ । भ्रष्टमार्ग जाण पतन पावे ॥ ५ ॥

८७ ( १४ ) ३०–३२

कर्ता-करविता मज मानूनियां । भार घालूनियां मजवरी ॥ १ ॥
शोक, आशा तेंवी ममत्व त्यागूनि । स्वधर्म जाणूनि युद्ध करीं ॥२॥
अन्यही जे कोणी ऐसें हें मन्मत । आचरिती नित्य श्रद्धावान् ॥ ३ ॥
न करितां माझी निंदा, कर्मपाश । वंधनकारक न घडे तयां ॥ ४ ॥
निंदूनि हें मत जे न अनुष्ठिती । मूढ अविवेकी तेचि भ्रष्ट ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्व ज्ञानामाजी । विपरीत बुद्धि तयां जाणा ॥ ६ ॥

८८ ( १५ ) ३३–३४

ज्ञाताही प्राचीन कर्मानुरूपचि । वर्ते निग्रहासी वाव नसे ॥ १ ॥
भूतजात जाणा पूर्वकर्माधीन । निग्रहील कोण तयांलागीं ॥ २ ॥
प्रतिइंद्रियांच्या विषयीं सहज । होती राग-द्वेष उदित मनीं ॥ ३ ॥
परी तयांधीन होऊं नये कदा । मार्गामाजी सदा विघ्नेंचि ते ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे मार्गस्थ तस्कर । तैसेचि हे चोर राग-द्वेष ॥ ५ ॥

८९ ( १६ ) ३५

सदोषहि स्वधर्मचि श्रेष्ठतर । सुअनुष्ठित परधर्माहूनि ॥ १ ॥
मरणही श्रेयस्कर तें स्वधर्मी । भयावह मानीं परधर्म ॥ २ ॥
अन्य वर्णाश्रमधर्म निर्दोषहि । त्याज्यचि ते पाहीं स्वधर्मज्ञ ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे क्षत्रियासी युद्ध । विप्रासी वैराग्य श्रेष्ठ धर्म ॥ ४ ॥

९० ( १७ ) ३६–३८

पार्थ म्हणे इच्छेवांणही मनुष्य । कवणें प्रेरित करी पाप ॥ १ ॥

तयाप्रति जणु ओढूनि वळेंचि । वार्ष्णेया, नियोजी कोण सांगें ॥
कृष्ण म्हणे काम तोचि क्रोध बापा । उद्भव तयाचा रजोगुणें ॥ ३ ॥
अधाशी तो मोठा महापापी जाण । वळेंचि दुष्कर्म घडवी वैरी ॥४॥
धूमें अग्नि, मळें आदर्श, उल्वानें । गर्भ, तैंवी जाणें आच्छन्न हें ॥
वासुदेव म्हणे आच्छन्न तें काय । कथितो यदुराय ऐका आतां ॥

११ ( १८ ) ३९–४०

ज्ञानीयांच्या नित्य वैऱ्यानें हें ज्ञान । टाकिलें झांकूनि कुंतिपुत्रा ॥
अग्नीसी न अलंभावें त्या कदापि । वैर कामरूपी दुष्पूर तें ॥ २ ॥
मन-बुद्धींद्रियें अधिष्ठान त्याचें । झांकूनि ज्ञात्यातें बुद्ध्यादिकीं ॥३॥
विमोहित करी ऐसा जीवाप्रति । सावधान चित्तीं वासुदेव ॥ ४ ॥

१२ ( १९ ) ४१–४३

यास्तव जिंकूनि इंद्रियें प्रथम । त्यागीं दुष्ट काम पापरूप ॥ १ ॥
गुरूपदिष्ट तें ज्ञान, अनुभवें- । विज्ञान तें, पावे नाश कामें ॥ २ ॥
इंद्रियें हीं श्रेष्ठ तयांहूनि मन । बुद्धि तयाहून श्रेष्ठ असे ॥ ३ ॥
बुद्धिद्रष्टा बुद्धीहूनि श्रेष्ठ आत्मा । सूक्ष्मत्वें, या क्रमा कथिती ज्ञाते
ऐशा बुद्धीहूनि पर आत्मज्ञानें । सुसंस्कृत मनें स्थैर्य लाभे ॥ ५ ॥
दुर्जय तो कामशत्रु जिंकीं वीरा । वंदी विश्वाधारा वासुदेव ॥ ६ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगोनाम तृतीयोऽध्यायः

---

## गीता अध्याय ४ था

अध्याय २८ वा १३ ( १ ) १–३

कृष्ण म्हणे सूर्या अव्यय हा योग । कथितां मी मनूस कथिला तेणें
इक्ष्वाकूतें कथी मनु हा पुढती । राजर्षि जाणिती ऐशा क्रमें ॥ २ ॥

---

१ वारेनें ( गर्भाच्छादन ) २ तृप्ति ३ पूर्ति कधींच करितां येत नाहीं असा ४ आश्रय

दीर्घकालें नष्ट जाहला जो तोचि। पुरातन आजि कथिला तुज ॥
मद्भक्त तें सखा पार्था तूं म्हणोनि, । कथिलें जें जनीं परमगुह्य ॥
वासुदेव म्हणे कृष्णाचें वचन। ऐकूनि अर्जुन वदला ऐका ॥ ५ ॥

१४ ( २ ) ४–६

कृष्णा, सूर्य तो पूर्वींचा । सांप्रतचा जन्म तुझा ॥ १ ॥
योग कथिलासी हा तया । कैसें मानूं यदुराया ॥ २ ॥
कृष्ण म्हणे धनुर्धरा । बहुत जन्म आपणाला ॥ ३ ॥
पूर्वी होऊनियां गेले । जाणितों मी तुज न कळे ॥ ४ ॥
अजन्माही निर्विकार । सकल भूतांचा ईश्वर ॥ ५ ॥
स्वीकारूनि स्वप्रकृति । जन्मतों मी सामर्थ्येंसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जन्म । मायामयचि ते जाण ॥ ७ ॥

१५ ( ३ ) ७–८

यदा यदा धर्मग्लानि । व्याप्त अधर्में अवनी ॥ १ ॥
तदा कूटस्थ मी आत्मा । स्वयें जन्मतों अर्जुना ॥ २ ॥
परित्राणार्थ साधूंच्या । विनाशार्थेंही दुष्टांच्या ॥ ३ ॥
धर्मसंस्थापनेसाठीं । जन्म घेतों युगायुगीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । वचन भक्तांसी देवाचें ॥ ५ ॥

१६ ( ४ ) ९–१०

ऐशापरी माझ्या जन्मकर्माचें जो । रहस्य जाणितो अलौकिक ॥१॥
त्यागितां देह त्या नसे पुनर्जन्म । अर्जुना, तो लीन मत्स्वरूपीं ॥ २॥
वीतराग-भय-क्रोधही न जयां । मद्रूप, आश्रया येती माझ्या ॥ ३॥
ज्ञानरूपी तपें पावन जाहले। तरूनियां गेले ऐसे बहु ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे केवळ ज्ञातेचि। पावती मोक्षासी महाज्ञानी ॥ ५ ॥

१७ ( ५ ) ११–१२

जैसे मजप्रति जे नर भजती। भजतों तयांसी तैसाचि मी ॥ १ ॥
सर्वप्रकारें हे मानव माझाचि । मार्ग आचरिती विविधरूपें ॥ २ ॥
इहकर्मफलसिद्धि जे इच्छिती। इंद्रादि देवांसी पूजिती ते ॥ ३ ॥
कारण या लोकीं त्वरित कर्मसिद्धि। वासुदेव इच्छी परी ज्ञान ॥

९८ ( ६ ) १३–१५

विभागूनि गुण, कर्म । निर्मिलें म्यां चातुर्वर्ण्य ॥ १ ॥
कर्ता मायिकत्वें जरी। अकर्ता मी अव्यय तरी ॥ २ ॥
कर्मफलें न मी लिप्त । अथवा कर्मफलासक्त ॥ ३ ॥
ऐसें यथार्थत्वें मज-। जाणें, न त्या कर्मबंध ॥ ४ ॥
केलें कर्म हें जाणूनि । जनकादिक मुमुक्षूंनीं ।. ५ ॥
तस्मात् कर्मचि तूं करीं । पूर्वपरंपरा वरीं ॥ ॥
वासुदेव म्हणे कर्म-। मार्ग, असे पुरातन ॥ ७ ॥

९९ ( ७ ) १६–१८

कर्म-अकर्म हें ज्ञातेही नेणती । मोहिताचि मति एथ त्यांची ॥ १ ॥
यास्तव कथितों, तुज तेंचि कर्म । संसारबंधन तुटे जेणें ॥ २ ॥
बोद्धव्यें तें कर्माकर्म-विकर्मही । गहनाचि पाहीं कर्मतत्त्व ॥ ३ ॥
इंद्रियव्यापारीं अकर्ताचि आत्मा । अकर्मींही कर्मा अवलोकी जो ॥
तोचि नरांमाजी जाण बुद्धिमंत । योगी तो समस्त कर्मकर्ता ॥५॥
वासुदेव म्हणे विहित नाचरितां। पाप अकर्में त्या भोगीतसे ॥ ६॥

१०० ( ८ ) १९–२०

संकल्पमूलककामविवर्जित । । जयाचे आरंभ सकल जनीं ॥ १ ॥
ज्ञानदग्ध सर्व कर्मबीजें ज्याचीं । पंडित तयासी म्हणती बुध ॥२॥
त्यागूनियां कर्मसंग तें अभिमान । नित्य तृप्त जाण निराश्रय ॥ ३ ॥
मग्नचि तो कर्मीं दिसतांही पाहीं । न करीचि कांहीं कर्म पार्था ॥
वासुदेव म्हणे जनदृष्ट्या जरी। ज्ञाता कर्म करी परि तो मुक्त ॥५॥

१०१ ( ९ ) २१–२२

इंद्रियांसमेत चित्त संयमित । सर्व ज्याचे त्यक्त परिग्रह ॥ १ ॥

---

१ जाणण्यास योग्य. २ मुकाट्यानें बसण्यांतही. ३ मी कर्ता आहें या अहंपणाचे कर्तृत्वास ४ दृष्टादृष्ट फल देणाऱ्या साधनांचा अवलंब न करणारा ५ त्या त्या इंद्रियाचा तत्तद्विषयस्वीकार.

केवळ शारीरं[1] कर्म आचरितां । लवही न माथां दोष त्याच्या ॥२॥
अयाचित लाभें संतोष जयासी । मत्सर न चित्तीं द्वंद्वातीत ॥ ३ ॥
सिद्धि-असिद्धीही जयालागीं सम । न घडे बंधन कर्मे तया ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे निष्क्रियात्मबोध । जया त्यासी बंध काय कर्मे ॥५॥

१०२ ( १० ) २३–२४

गतसंग तैंवी धर्माधर्मयुक्त । ज्ञानामाजी चित्त स्थिर ज्याचें ॥ १॥
यज्ञार्थ तयाचें कर्म फलासंगें । विनाशचि पावे धनंजया ॥ २॥
मंत्र-हवनद्रव्य-हवन-अग्नि-ब्रह्म । ब्रह्मचि यजमान प्राप्तव्यही ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मकर्मी[2] लय । ब्रह्मावीण काय अन्य तया ॥ ४ ॥

१०३ ( ११ ) २५–२७

अन्य कोणी योगी इंद्रादि यजिती । अन्य ब्रह्मांतचि यजिति ब्रह्म ॥
कोणी श्रोत्रादिक संयमाग्नीमाजी । शब्दादि होमिती इंद्रियांत ॥२॥
प्राणेंद्रियकर्म आकुंचनादिक । तैंवी श्रवणादिक सकल कोणी ॥३॥
ज्ञानप्रदीप्त त्या संयमाग्नीमाजीं । हवन करिती ज्ञानमार्गें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ध्यान-धारणादि । आत्मसंयमाग्नि योग तोचि ॥ ५ ॥

१०४ ( १२ ) २८–३०

महाव्रती कोणी द्रव्य-तप-योग-। ज्ञान तें स्वाध्याय करिती यज्ञ ॥
अपानीं कीं प्राण, प्राणांत अपान । रुद्ध प्राणापान करिती कोणी ॥
प्राणायामपर ऐसे कोणी योगी । करिती पूरकादि प्राणायाम ॥ ३ ॥
आहाराचि कोणी करूनि परिमित । प्राणाचि प्राणांत होमिताती ॥
वासुदेव म्हणे सर्व हे यज्ञज्ञ होती पापहीन स्वस्वयज्ञें ॥ ५ ॥

१०५ ( १३ ) ३१–३३

यज्ञावशिष्ट तो प्रसाद सेवितां । सनातन पदा प्राप्त होती ॥ १ ॥
यज्ञावीण इहलोकही न लाभे । परलोक सांगें कैसा मग ॥ २ ॥
ऐसे बहुविध यज्ञ हे वेदोक्त । जाणूनि कर्मज मुक्त होईं ॥ ३ ॥
परंतपा, द्रव्यमय यज्ञाहूनि । श्रेयस्कर जनीं ज्ञानयज्ञ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ज्ञानसागरांत । होती अंतर्भूत सकल कर्मे ॥ ५ ॥

---

१ शरीररक्षणाला कारण होणारें. २ ब्रह्म हेंच कर्म.

१०६ ( १४ ) ३४-३६

ज्ञान तें संपादीं साष्टांग वंदनें । तेंवी परिप्रश्नें सेवेनेंही ॥ १ ॥
तत्त्ववेत्ते ज्ञानी कथितील ज्ञान । स्वानुभवी पूर्ण सज्जन जे ॥ २ ॥
जया ज्ञानें ऐसा मोह पुनरपि । होणार नाहींचि पार्था, तुज ॥ ३ ॥
पाहसील भूतजात हें समस्त । आम्हां उभयांत तया ज्ञानें ॥ ४ ॥
पाप्यांमाजी पापी असशील तूं जरी । तारील हे तरी ज्ञाननौका ॥
वासुदेव म्हणे धर्माधर्म दोन्हीं । बंधचि हे मानीं मोक्षद्रष्ट्या ॥६॥

१०७ ( १५ ) ३७-३९

जैसा प्रदीप्त अनल । भस्म करी काष्ठभार ॥ १ ॥
सर्वकर्में तें ज्ञानाग्नि । टाकी क्षणार्धें जाळूनि ॥ २ ॥
इहलोकीं ज्ञानाहून । नसे कांहींचि पावन ॥ ३ ॥
दीर्घकाळें तें स्वयेंचि । योगसंसिद्ध संपादी ॥ ४ ॥
श्रद्धावंत मिळवी ज्ञान । तत्पर जो संयमपूर्ण ॥ ५ ॥
ज्ञानें पावे त्वरित शांति । वासुदेवा ते विश्रांति ॥ ६ ॥

१०८ ( १६ ) ४०-४२

अनात्मज्ञ, श्रद्धाहीन तो संशयी । विनष्टचि होई संशयानें ॥ १ ॥
इह-परलोकसंशयात्म्यालागीं । नसेचि सुखाची प्राप्ति तेंवी ॥ २ ॥
नष्टसंदेह जो एकत्व ज्ञानानें । परमार्थदर्शनें कर्म त्यागी ॥ ३ ॥
अप्रमत्ता तया धर्माधर्मरूप । सकळ कर्मबंध बाधेचिना ॥ ४ ॥
अज्ञानसंभूत बुद्धिस्थ संशय । छेदूनि यास्तव ज्ञानखड्गें ॥ ५ ॥
स्वधर्मानुष्ठान योग हा आचरीं । ऊठ वा, सत्वरी करीं युद्ध ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे संशय त्यागूनि । अधिकार जाणूनि पंथ चाल्दृ ॥७॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ब्रह्मयज्ञप्रशंसानाम चतुर्थोध्याय:

---

१ कर्मयोगानें व ज्ञानयोगानें सुसंस्कृत झालेला.

## गीता अध्याय ५ वा

अध्याय २९ वा १०९ ( १ ) १-२

पार्थ म्हणे पुनः योगाची प्रशंसा । करिसी संन्यासा प्रशंसूनि ॥ १ ॥
श्रेयस्कर मार्ग कथीं जो निश्चित । तयांमाजी एक कृष्णनाथा ॥२॥
कृष्ण म्हणे पार्था, संन्यास तैं कर्म । उभयही जाण श्रेयस्कर ॥३॥
परी तयांमाजी कर्मयोग श्रेष्ठ । केवळ संन्यास अवर जाणें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अधिकारभेदें । येई साधनातें श्रेष्ठपण ॥ ५ ॥

११०( २ ) ३-५

द्वेष-कांक्षाहीन. नित्य तो संन्यासी । निर्द्वंद्व बंधेंसी सुखें मुक्त ॥
भिन्न सांख्य, भिन्न योग ऐसें अज्ञ-। बोलती, न सुज्ञ वदती कदा ॥
सम्यगनुष्ठान एकाहि मार्गाचें । आचरील त्यातें उभयलाभ ॥३॥
ज्ञात्यांसी जें लाभे तेंचि योगियांसी । योगें पतनाची भीति नसे ॥
ऐसें ऐक्य त्यांचें पाही तोचि द्रष्टा । वासुदेव वाचा शास्त्राधारें ॥

१११ ( ३ ) ६-७

योगावीण सांख्यलाभ हा कठीण । योगयुक्ता ब्रह्म त्वरित लाभे ॥
ईश्वरार्थकर्में घडे चित्तशुद्धि । शुचित्व देहासी, इंद्रियजय ॥ २ ॥
सकल तयासी भूतें आत्मरूप । करूनिही लिप्त कर्मी न तो ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे विहित कर्माचार । करी निरहंकार मानवासी ॥४॥

११२ ( ४ ) ८-९

शब्द-स्पर्श-रूप-रसादिग्रहण । निद्रा तैं गमन श्वासोच्छ्वास ॥ १ ॥
शब्दोच्चारही तें मलविसर्जन । विषयग्रहण निमिषोन्मेष ॥ २ ॥
सर्व हे व्यापार विषयेंद्रियांचे । कर्ता मी न ऐसें ध्यानीं असो ॥३॥
निर्धार दृढ हा करावा ज्ञात्यानें । वासुदेव म्हणे चित्तस्थैर्यें ॥ ४ ॥

११३ (५ ) १०-११

अर्पूनि ईश्वरा त्यागूनियां संग । जो कोणी विहित कर्में करी ॥ १ ॥

जळीं पद्मपत्रासम तो अलिप्त । बाधेनाचि पाप तयालागीं ॥ २ ॥
केवळ शरीर-मन- बुद्ध्यादिकीं । कर्में आचरिती जनीं योगी ॥ ३ ॥
त्यागूनियां संग चित्तशुद्धीस्तव । सांगे वासुदेव कृष्णवच ॥४॥

११४ ( ६ ) १२–१३

कर्मफलासक्ति त्यागूनियां योगी । यथाक्रम जोडी शांतिलाभ ॥१॥
अशान्त, कामेच्छु तेंवी फलासक्त । कर्मामाजी दृढबद्ध होई ॥ २ ॥
जितेंद्रिय देही नित्य-नैमित्तिक । मनानें समस्त त्यजूनि कर्में ॥ ३ ॥
करी न करवी देहामाजी कांहीं । सुखेनैव राही, पुरीं तया ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे निर्लेपचि आत्मा । उपाधींचे जाणा खेळ सर्व ॥ ५ ॥

११५ ( ७ ) १४–१६

क्रिया, कर्म, आत्मा न निर्मी कोणाचें । कोणा फलभोगातें भोगवीना
सर्व हे अविद्यालक्षण प्रकृति । सकलप्रवृत्तिमूळ तेंचि ॥ २ ॥
व्यापक आत्मा न स्वीकारी कोणाचें । पाप-पुण्यही तें कदाकाळीं
विवेक-विज्ञान झांकिलें अज्ञानें । पावताती तेणें मोह प्राणी ॥ ४ ॥
परी ज्ञानें ज्यांचें विनष्ट अज्ञान । उदित त्यांचें ज्ञान सूर्यासम ॥ ५ ॥
तेणें परमात्मा प्रकाशित होई । लीन तया ठाईं वासुदेव ॥ ६ ॥

११६ ( ८ ) १७

परमार्थतत्त्वीं बुद्धि स्थिर ज्यांची । ब्रह्मचि जयांसी आत्मा वाटे ॥१॥
मीचि ब्रह्म ऐसा दृढभाव ज्यांसी । श्रेष्ठ गति ज्यांची परब्रह्म ॥ २ ॥
ज्ञानें सकलही पाप नष्ट ज्यांचें । नसेचि तयांतें पुनर्जन्म ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे आत्मा ज्ञानरूप । बोध हा कृतार्थ करी जीवा ॥ ४ ॥

११७ ( ९ ) १८

विद्या-विनयसंपन्न । ऐसा पुण्यात्मा ब्राह्मण ॥ १ ॥
श्वान, धेनु तेंवी गज । चांडाळही क्रियाभ्रष्ट ॥ २ ॥
ऐशा सकलही स्थानीं । जयां ब्रह्मभाव जनीं ॥ ३ ॥
समदर्शी ते पंडित । विश्व जयां ब्रह्मरूप ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । अभ्यासें या पावे पदा ॥ ५ ॥

११८ ( १० ) १९–२१

सर्वभूतवासी परब्रह्मीं चित्त । जन्म-मरणमुक्त एथेंचि ते ॥ १ ॥
सर्वदोषशून्य तेंवी सम ब्रह्म । ब्रह्मांतचि स्थान तस्मात् त्यांचें ॥
इष्टलाभें हृष्ट, अप्रियें उद्विग्न। होऊं नये जाण कदाकाळीं ॥ ३ ॥
निर्दोष सम त्या ब्रह्मीं स्थिरबुद्धि । निःसंदेह स्थिति ब्रह्मीं त्यांची ॥
ब्रह्मविषयीं जो अनासक्तचित्त । जाणें आत्मसौख्य स्वानुभवें ॥ ५ ॥
ब्रह्मयोगयुक्ता सुख त्या अक्षय । वासुदेव पाय वंदी त्याचे ॥ ६ ॥

११९ ( ११ ) २२–२३

भोग इंद्रियार्थसंयोगें जे होती । दुःखमूळ तेचि हे कौंतेया ॥ १ ॥
उत्पत्ति-विनाशशील ते म्हणोनि। ज्ञाता तयास्थानीं न रमे कदा॥२॥
काम-क्रोधोद्भवां वेगां सहन करी । इहैवचि पूर्वी मरणाच्या जो ॥३॥
तोचि योगी नर, सुखी तो जाणावा । स्फूर्ति वासुदेवा सिद्धान्तें या ॥

१२० ( १२ ) २४–२५

अंतरात्म्यामाजी जया सर्व सौख्य । आराम जयास अंतरात्मा ॥१॥
प्रकाशही ज्याचा नित्य अंतरात्मा । पावे परब्रह्मा तोचि योगी ॥२॥
क्षीणपाप छिन्न संशय यतात्मे । निरत पुण्यात्मे भूतहितीं ॥ ३ ॥
तयां मोक्षलाभ घडे निश्चयेंसी । वासुदेव त्यांसी जोडी कर ॥ ४ ॥

१२१ ( १३ ) २६–२९

यती यतचित्त कामक्रोधमुक्त । आत्मज्ञ विमुक्त सर्वकाल ॥ १ ॥
विदेहमुक्त ते जीवन्मुक्त तेंवी । सदा सर्वत्रही ब्रह्मरूप ॥ २ ॥
बाह्य विषय ते बाह्यचि राखूनि । भ्रूमध्यीं ठेऊनि निज दृष्टि ॥ ३ ॥
कुंभकेंचि स्थैर्य प्राणापानांप्रति। इंद्रिय, मन, बुद्धि नियत ज्याची
विगत जयाचे इच्छा, भय, क्रोध । मुक्तचि तो नित्य धनंजया ॥५॥
यज्ञ-तपभोक्ता सर्वलोकस्वामी । सुहृत्सर्वांचा मी, ऐसा ज्ञानें- ॥
घडे शांतिलाभ तया यतीश्वरा। तयाचा आसरा वासुदेवा ॥ ७ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसंन्यासयोगोनाम पंचमोऽध्यायः

## गीता अध्याय ६ वा

अध्याय ३० वा १२२ ( १ ) १–३

कृष्ण म्हणे कर्म फलाश्रयावीण। कर्तव्य जाणून आचरी जो ॥ १ ॥
पार्था, जाणें तोचि योगी संन्यासीही। निरग्नि कीं नाहीं निष्क्रियही ॥
म्हणती ज्या संन्यास जाणावा तो योग। त्यजितां न संकल्प न कुणी योगी ॥ ३ ॥
योगारूढेच्छूसी कर्मचि कारण। योगारूढा शम साधन तें ॥ ४ ॥
सकल कर्मांची निवृत्ति तो शम। वासुदेव धन्य होवो तेणें ॥ ५ ॥

१२३ ( २ ) ४–५

कर्मीं विषयींही आसक्त न यदा। सर्व संकल्पांचा त्याग करी ॥ १ ॥
साधक तो योगी तया योगारूढ। ऐसें ज्ञानी स्पष्ट निरूपिती ॥ २ ॥
स्वयेंचि आपुला उद्धार करावा। होऊं नच द्यावा अधःपात ॥ ३ ॥
बंधु, शत्रुही तो आपुला आपण। सावध ऐकून वासुदेव ॥ ४ ॥

१२४ ( ३ ) ६–७

जेणें जिंकियेला देह। तेंवी इंद्रियसमूह ॥ १ ॥
तोचि तयाचा बांधव। आत्मशत्रूचि इतर ॥ २ ॥
तया जितात्म्या[1] शांताचा। आत्मा परमात्माचि साचा ॥ ३ ॥
सुख-दुःख शीतोष्णादि। पूजा तिरस्कार तोही-॥ ४ ॥
समानचि होई तया। वोधें स्वास्थ्य वासुदेवा ॥ ५ ॥

१२५ ( ४ ) ८–९

शास्त्रज्ञानें तेंवी अनुभवें तृप्त। अचल जितेंद्रिय ऐसा जो कीं ॥ १ ॥
मृत्तिका, सुवर्ण, काष्ट, ज्या समान। योगारूढ जाण तोचि योगी ॥
शत्रु, मित्र, उदासीन वा मध्यस्थ। बंधु वा अप्रिय असो कोणी ॥३॥
साधु असाधूही लेखितो जो सम। विशेष तो जाण वासुदेवा ॥४॥

१२६ ( ५ ) १०–१२

ध्यानयोगीयानें सतत एकांतीं। यतात्मा[1] निराशी[2] अपरिग्रह[3] ॥ १ ॥

---

१ देह व चित्त संयमिलें आहे असा. २ तृष्णाहीन. ३ परिग्रहरहित.

होऊनि एकाकी चित्त आंवरावें। प्रयत्नें करावें स्थिर-शांत ॥ २ ॥
देश पाहूनियां सदा शुचिर्भूत। स्थिरासन निज प्रस्थापावें ॥ ३ ॥
नसो अति उच्च तेंवी अति नीच। चैलाजिन कुश उलट क्रमें ॥४॥
एकाग्र त्या स्थानीं करूनियां मन। चित्तेंद्रिय-कर्म संयमावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चित्तविशुध्यर्थ। आवडे ज्ञात्यास स्थान ऐसें ॥ ६ ॥

१२७ ( ६ ) १३–१४

सम काय-शिर-ग्रीवा। अचल स्थिर बैसूनियां ॥ १ ॥
अन्य दिशा न पाहतां। अवलोकावें निज नासाग्रा ॥ २ ॥
चित्त प्रशान्त ठेऊनि। भयरहित होऊनि ॥ ३ ॥
ब्रह्मचर्यव्रतस्थित। ठेवीं मत्स्वरूपीं चित्त ॥ ४ ॥
संयमूनि निज मन। व्हावें मत्परचि जाण ॥ ५ ॥
वासुदेव एकचित्त। ईश्वरचि तया श्रेष्ठ ॥ ६ ॥

१२८ ( ७ ) १५

ऐसें मन सर्वकाल। राखील जो सुनिश्चल ॥ १ ॥
तोचि योगी नियतचित्त। योगाभ्यासीं जो निरत ॥ २ ॥
मोक्षकारक ते शांति। लाभे तया मदधीन जी ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ऐसी। शांति तेचि मम विश्रांति ॥ ४ ॥

१२९ ( ८ ) १६–१७

अधिकान्नें योग न घडे सर्वथा। तेंवी न भक्षितां लवही अन्न ॥ १ ॥
अति निद्रेनें कीं निद्राचि न घेतां। योगीयांचा पंथा साधेचिना ॥
परिमित अन्न परिमित आहार। तेंवी हालचाल इंद्रियांची ॥ ३ ॥
निद्रा, जागृतीही जया परिमित। तया हितप्रद योगमार्ग ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सांसारिक दुःखें। कदा योगियातें बाधतीना ॥ ५ ॥

१३० ( ९ ) १८–१९

विशेष निग्रहें आत्म्यांतचि चित्त। होई अवस्थित जयावेळीं ॥ १ ॥
दृष्टादृष्ट सर्व सुटती कामना। लाभे ‘ युक्त ’ संज्ञा तयावेळीं ॥ २ ॥

१ दर्भ, अजिन आणि धूतवस्त्र अशा क्रमानें.

निवातस्थळींचा अचल जैं दीप । उपमा संयत योगिया ते ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ध्यान-समाधीचा । अभ्यास जयाचा धन्य तोचि ॥

१३१ (१०) २०-२१

यदा योगाभ्यासें चित्त तें निरुद्ध । होऊनियां शांत स्थिर होई ॥१॥
समाधिविशुद्धचित्तें स्वानुभव । घेऊनि संतुष्ट होई तेथें ॥ २ ॥
इंद्रियातीत जें शुद्धबुद्धिग्राह्य । अनंत अमेय सौख्य जाणे ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे योगी आत्मस्थित । तेथूनि चलित न होईचि ॥ ४ ॥

१३२ ( ११ ) २२-२३

जया लाभाहूनि श्रेष्ठ । अन्य लाभ न जयास ॥ १ ॥
तया आत्मसौख्यमग्ना । ढळवी ऐसी न यातना ॥ २ ॥
दुःखविच्छेदक योग । जाणावा हा सुप्रसिद्ध ॥ ३ ॥
वासुदेव निश्चयानें । हर्षें आचरूं हा म्हणे ॥ ४ ॥

१३३ ( १२ ) २४-२५

संकल्पोद्भव ते सकळही काम । समूळ त्यागून शुद्ध मनें ॥ १ ॥
सकल विषयांपासूनि सबल । इंद्रियें सकळ आंवरूनि ॥ २ ॥
पुढती हळु हळु सधैर्यबुद्धीनें । निर्विकारमनें शांत व्हावें ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे मन आत्मस्थित । करूनि कांहींच चिंतूं नये ॥ ४ ॥

१३४ ( १३ ) २६-२७

चंचल अस्थिर मन ज्या ज्या मिषें । सरेल परतें विषयलोभें ॥ १ ॥
आत्मवश त्या त्या विषयांपासूनि । यत्नें आंवरूनि करावें त्या ॥२॥
ऐसी मनःशांति लाभली जयातें । क्षीण मल ज्याचे मोहादिक ॥३॥
पापहीन जीवन्मुक्त त्या योग्यासी । वासुदेव कथी श्रेष्ठ सौख्य ॥४॥

१३५ ( १४ ) २८-२९

ऐसा चित्तस्वास्थ्यअभ्यास सर्वदा । करील तयाचा पापनाश ॥
ब्रह्मसान्निध्यें त्या आत्यंतिक सौख्य । लाभतें सहज योगिश्रेष्ठा ॥
ऐशा योगयुक्तचित्तें समदर्शी । आत्मा सर्वभूतीं अवलोकी तो ॥
तेंवी सर्वभूतें आत्म्यामाजी पाही । वासुदेव पायीं नम्र त्याच्या ॥

१३६ ( १५ ) ३०-३२

सर्वभूतांमाजी अवलोकी मज । भूतें मदाश्रित अवलोकी जो ॥ १ ॥
तयासी मी तैंवी तोही मजप्रति । नाहींसा कदापि होत नसे ॥ २ ॥
पूर्ण ऐक्यभावें सर्वभूतस्थिता । भजेल व्यापका मजलागीं जो ॥
कैसीही तयाची दिसो बाह्यकृति । योगी तो मत्पदीं सर्वकाल ॥४॥
सकलांचें सुख-दुःख आत्मोपम । जयासी तो धन्य परम योगी ॥
वासुदेव म्हणे काया-वाचा-मनें । हिंसा त्या करणें घडेचिना ॥ ६ ॥

१३७ ( १६ ) ३३-३४

पार्थ म्हणे कृष्णा, योग हा साम्यत्वें । मज चंचलत्वें स्थिर न होई
चंचल हें मन सिद्धीप्रति विघ्न । अति बलवान अभेद्यचि ॥ २ ॥
वायूसम त्याचा निग्रह दुष्कर । अथवा त्याचें बल वायूहूनि ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे चांचल्यें प्रक्षोभ । करी हें प्रसिद्ध नित्य मन ॥ ४ ॥

१३८ ( १७ ) ३५-३६

कृष्ण म्हणे पार्था, दुर्निग्रह चल । मन निःसंशय जाणें बापा ॥ १ ॥
परी अभ्यास तैं वैराग्यरज्जूनें । बंधन तयातें शक्य होई ॥ २ ॥
अभ्यासवैराग्यावीण अनिरुद्ध-। चित्त, तयां योग दुष्प्राप्यचि ॥
वासुदेव म्हणे स्वाधीनचित्तासी । प्रयत्नें योगाची प्राप्ति होई ॥

१३९ ( १८ ) ३७-३९

पार्थ म्हणे कृष्णा, सश्रद्ध अयति । योगचलितमति अंतीं ज्याची ॥
योगसिद्धि तेणें प्राप्त नच होतां । कवण गति योग्या तया लाभे ॥
ब्रह्ममार्गहीना योग-कर्मभ्रष्टा । निराधारा मूढा तयाप्रति ॥ ३ ॥
विच्छिन्नाभ्रासम विनाश कीं कृष्णा । शंकानिरसना समर्थ तूं ॥४॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णावांचून । शंका अन्य कोण वारील ही ॥५॥

१४० ( १९ ) ४०-४१

कृष्ण म्हणे पार्था, विनाश तयाचा । इह-पर साचा घडेचि ना ॥१॥
कल्याणपथानें न लाभे दुर्गति । पार्था कवणाप्रति ध्यानीं असो ॥२
दीर्घकाल पुण्यवंतांचा तो लोक । लाभे योगभ्रष्ट यतीलागीं ॥३॥
वासुदेव म्हणे पुढती पवित्र-। श्रीमंत कुळांत जन्म घेई ॥ ४ ॥

१४१ (२०) ४२–४४

अथवा तो योगभ्रष्ट । ज्ञात्या योग्यांच्या कुळांत ॥ १ ॥
दारिद्र्यांत जन्म घेई । दुर्लभ हा जन्म पाहीं ॥ २ ॥
पूर्वजन्मार्जित मार्ग । तया लाभे या जन्मांत ॥ ३ ॥
योगसिद्धीस्तव यत्न । करी तेथ तो फिरून ॥ ४ ॥
पराधीनही तो योगी । होई आकृष्ट त्या मार्गी ॥ ५ ॥
योगजिज्ञासूही पाहीं । शब्दब्रह्मा लंघूनि जाई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे काय । वर्णू योग्याचें महत्व ॥ ७ ॥

१४२ (२१) ४५–४७

यत्नशील ऐसा संशुद्धकिल्बिष[1] । होई योगसिद्ध बहुत जन्मीं ॥१॥
तेणें तयाप्रति लाभे श्रेष्ठ गति । योग्याहूनि तपी श्रेष्ठ नसे ॥ २ ॥
शब्दज्ञान्याहूनि श्रेष्ठचि तो मानीं । कर्मठ त्याहूनि अवर बापा ॥३॥
यास्तव अर्जुना, योगीचि तूं होई । साधन न कांहीं अन्य श्रेष्ठ ।४॥
रुद्रादि देवताध्यानमग्न जे जे । तयांहूनि भजे मजलागीं जो ॥ ५ ॥
श्रद्धावंत, तैवी मीचि ज्याच्या चित्तीं । युक्ततम तोचि मान्य मज
वासुदेव म्हणे कर्माची मर्यादा । दावूनियां पार्था, स्तविला योग ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ध्यानयोगोनाम षष्ठोऽध्यायः

---

## गीता अध्याय ७ वा

अध्याय ३१ वा १४३ (१) १–२

कृष्ण म्हणे पार्था, माझाचि तूं भक्त । तैवी मदाश्रित योगयुक्त ॥१॥
सकल ऐश्वर्ययुक्ता मजप्रति । निश्चयें जाणसी कैवी ऐकें ॥ २ ॥
संपूर्णही तुज कथितों हें ज्ञान । पार्था, सविज्ञान अत्यानंदें ॥ ३ ॥
जाणतां जें अन्य न उरे ज्ञातव्य । म्हणे वासुदेव पुढती कांहीं ॥४॥

---

१ पापविनिर्मुक्त.

१४४ ( २ ) ३-५

सहस्रावधि या मानवांत कोणी । ज्ञानार्थ झटूनि यत्न करी ॥ १ ॥
ऐशा यत्नशीलांमजी एकाद्याचि । जाणितो मजसी यथार्थत्वें ॥२॥
भूमि, जल, अग्नि, वायु, तें आकाश । मन, बुद्धि, देख अहंकार ॥
ऐसी मत्प्रकृति अष्टधा विभिन्ना । बुद्धि एथ जाणा महत्तत्त्व ॥ ४॥
अविद्यासंयुक्त अव्यक्तचि एथ । अहंकार स्पष्ट कथिती ज्ञाते ॥५॥
अपरा हे, पराप्रकृति तो जीव । विश्वासी आधार तोचि एक ॥ ६॥
वासुदेव म्हणे जीवावीण जग । निराधार जड स्पष्टचि हें ॥ ७ ॥

१४५ ( ३ ) ६-७

परा, अपरा या प्रकृतींपासूनि । पार्था, घेई ध्यानीं सकल भूतें ॥ १॥
उत्पत्ति-विनाश मीचि ऐशापरी । पार्था, ध्यानीं धरीं विश्वाप्रति ॥
मजहूनि श्रेष्ठ अन्य नसे कांहीं । सूत्रामाजी पाहीं मणि जैसे ॥ ३ ॥
तैसें मजमाजी सकल हें विश्व । कथी वासुदेव भगवद्बोध ॥ ४ ॥

१४६ ( ४ ) ८-११

उदकांत रस, चंद्र-सूर्यप्रभा । वेदांमाजी पार्था, प्रणव मीचि ॥ १ ॥
आकाशीं मी शब्द, पुरुषीं पुरुषत्व । पृथ्वींत सुगंध मीचि असें ॥२॥
अग्नीमाजी तेज भूतांचें जीवन । तपही मी जाण तपस्व्यांचें ॥ ३ ॥
सनातन बीज सकल भूतांचें । बुद्धिमंतांमध्यें मीचि बुद्धि ॥ ४ ॥
तेजस्व्यांचें तेज बलही मी जाण । काम-रागहीन विशुद्ध जें ॥ ५ ॥
शास्त्रअविरोधी काम तोही मीचि । वासुदेव व्यासि कथितो ऐसीं

१४७ ( ५ ) १२-१५

सात्त्विक, राजस, तामसही तेंवी । मजमुळें पाहीं सकळ भाव ॥ १॥
तथापि मी नसें आधीन तयांच्या । स्वाधीन ते माझ्या धनुर्धरा ॥
गुणमय भावें मोहित जें जग । गुणातीता मज जाणींचिना ॥ ३ ॥
गुणमयी दैवी दुर्लंघ्या मन्माया । लंघिती जे पायां शरण माझ्या ॥

१ सर्वांला कारण ज्या या दोन प्रकृति त्या माझ्याच असल्यामुळें.

मायेनें जयांचा हरियेला बोध। दुराचारी, मूढ, नराधम ॥ ५ ॥
असुर ते मज न येती शरण। मागे कृष्णप्रेम वासुदेव ॥ ६ ॥

१४८ ( ६ ) १६-१९

चतुर्विध मज पुण्यात्मे भजती। जिज्ञासू, अर्थार्थी, आर्त, ज्ञाते ॥१॥
तयांत वरिष्ठ ज्ञानी नित्ययुक्त। एकमेव भक्त भगवंताचा ॥ २ ॥
कारण ज्ञात्यासी अतिप्रिय मीचि। तोही मजप्रति प्रिय बहु ॥ ३ ॥
श्रेष्ठचि ते सर्व परी ज्ञानी मम। आत्माचि, मी जाण मानियेला ॥४॥
कारण शांतात्मा होई तो उद्युक्त। व्हावया मद्रूप ज्ञानयोगें ॥ ५ ॥
बहुजन्माअंतीं परिपक्वज्ञानें चराचर जाणे वासुदेव ॥ ६ ॥
ऐसा मजप्रति ज्ञानी प्राप्त होई। महात्मा तो पाहीं दुर्लभ जनीं ॥७॥
वासुदेव म्हणे धन्य ते पुण्यात्मे। हरिमय ध्यानें देह ज्यांचा ॥ ८ ॥

१४९ ( ७ ) २०-२३

तत्त्वकामनेनें अपहृत[1] ज्ञान। भजताती अन्य देवतांसी ॥ १ ॥
स्वभावें[2] निबद्ध होऊनियां ते ते। नियम तयांचे पाळिताती ॥ २ ॥
जो जया देवाची श्रद्धायुक्त भक्ति। इच्छी तया तेचि करितों दृढ ॥
पुढती आराधी तया देवाप्रति। पूर्ण तद्वाराचि करितों इच्छा ॥ ४ ॥
मतिमंदाचें त्या नश्वर तें फळ। असो सर्वकाल परी ध्यानीं ॥ ५ ॥
देवतापूजक देवलोकीं जाती। मद्भक्त पावती मद्रूपातें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सारखेचि श्रम। मग कां भगवान चिंतूं नये ॥ ७ ॥

१५० ( ८ ) २४-२६

अविवेकी माझ्या शाश्वत उत्तम। रूपा न जाणून परमश्रेष्ठा ॥ १ ॥
अव्यक्त प्रगट ऐसें मानिताती। नित्य प्रसिद्धासी अज्ञभावें ॥ २ ॥
अनादि अज्ञानआवृत मी पार्था। प्रगट समस्तांलागीं नसें ॥ ३ ॥
अज मी अव्यय जाणिती न मूढ। भक्तांलागीं मात्र ज्ञान माझें ॥४॥
भूत वर्तमान भविष्यकालीन। सकल भूतज्ञान मजसी असे ॥ ५ ॥
परी मजप्रति जाणती न कोणी। रमतो साधनीं वासुदेव ॥ ६ ॥

१ ज्ञान हिरावले गेलेले. २ पूर्वसंस्कारानें.

१५१ ( ९ ) २७-३०

उत्पत्तिसमयीं रागद्वेषोद्भव । द्वंद्वेंचि संमोह भूतमात्रां ॥ १ ॥
नष्टपाप पुण्यजन दृढव्रत । मुक्तमोह, मज भजती तेचि ॥ २ ॥
जरा-मृत्युमोक्षास्तव ममाश्रय- । करूनि, उपाय करिती यत्नें ॥३॥
भक्त, तेचि परब्रह्म प्रत्यगात्मा । तेंवी सर्व कर्मा जाणिताती ॥ ४ ॥
साधिभूत साधिदैव साधियज्ञ । जयां मम ज्ञान युक्तचित्तां ॥ ५ ॥
अंतकालींही ते आठविती मज । वंदी वासुदेव प्रेमें तयां ॥ ६ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगोनाम सप्तमोऽध्यायः

---

गीता अध्याय ८ वा

अध्याय ३२ वा १५२ ( १ ) १-२

पार्थ म्हणे देवा, ब्रह्म तें अध्यात्म । तेंवी कथीं कर्म पुरुषोत्तमा ॥१॥
अधिभूत तेंवी अधिदैव कथीं । चिंतूं अधिदैवासी केंवी कोठें ॥२॥
कोण अधियज्ञ वसे कीं तो देहीं । प्रयाणसमयीं केंवी ज्ञान-॥ ३ ॥
घडे, शांतचित्तां नरांप्रति तव । कथी वासुदेव पार्थप्रश्न ॥ ४ ॥

१५३ ( २ ) ३-४

कृष्ण म्हणे तत्त्व शाश्वत तें ब्रह्म । जीवचि अध्यात्म जाण बापा ॥
वस्तुभावकारी[१] चरु पुरोडाश । अर्पिणें[२] तें साच समजें कर्म ॥ २ ॥
विनाशिभावें तें जाण अधिभूत । देहस्थ पुरुष[१] अधिदैव तें ॥ ३ ॥
देहामाजी मीचि जाण अधियज्ञ । देई अवधान वासुदेव ॥ ४ ॥

१५४ ( ३ ) ५-७

माझेंचि स्मरण करूनियां अंतीं । त्यागूनि देहासी सुखें जाई ॥ १ ॥
निःसंशय होई मद्रूप तो जाण । अंतीं जें स्मरण तेंचि प्राप्त ॥ २ ॥

---

१ वस्तूंची उत्पत्ति करणारा. २ सर्व कार्य. १ समष्टीचा अभिमानी--हिरण्यगर्भ.

अभ्यास जो जया तेंचि तया प्राप्त । यास्तव अखंड चिंतीं मज ॥
स्वधर्मरूप तें युद्धही आचरीं । ममार्पित करीं मन-बुद्धि ॥ ४ ॥
मजप्रति तेणें निश्चयें पावसी । तोष अंतरासी वासुदेवा ॥ ५ ॥

१५५ ( ४ ) ८–१०

चित्तैकाग्र्याभ्यासयुक्त एकचित्तें । चिंती जो तयातें परमपद ॥१॥
सर्वज्ञ शाश्वत ब्रह्मांडाचा शास्ता । कर्मफलदाता सूक्ष्मात्सूक्ष्म ॥
अचिंत्यस्वरूप सूर्यासम कांति । जो पैलतटाकीं अज्ञानाच्या ॥ ३ ॥
भक्तियुक्तयोगबळें अंतकाळीं । भ्रुवोर्मध्यस्थळीं दक्षतेनें-॥ ४ ॥
स्थापूनियां प्राण, अविचल मनें । चिंती तोचि जाणें परम धन्य ॥५॥
श्रेष्ठ दिव्यपदा पावे तो निश्चित । तदाचि कृतार्थ वासुदेव ॥ ६ ॥

१५६ ( ५ ) ११–१३

वेदवेत्ते जया अक्षर म्हणती । वीतराग यति पावती ज्या ॥ १ ॥
ब्रह्मचर्य आचरिती ज्या इच्छेनें । स्थान संक्षेपानें कथितों तेंचि ॥२॥
सर्व इंद्रियांचा निरोध करूनि । मन निरोधूनि हृदयामाजीं ॥ ३ ॥
मस्तकीं स्थापूनि प्राणवायूप्रति । उद्युक्त योगासी होऊनियां ॥ ४ ॥
ॐकारस्वरूप एकाक्षर ब्रह्म । प्रेमें उच्चारून स्मरूनि मज ॥ ५ ॥
त्यागूनियां देह सोडी जो इहलोक । वासुदेव मोक्ष म्हणे तया ॥६॥

१५७ ( ६ ) १४–१६

अनन्यचित्त जो प्रतिदिनीं नित्य । मज अनंतास स्मरे प्रेमें ॥ १ ॥
सुलभ मी तया सदा शांत चित्ता । जाण वीरश्रेष्ठा कुंतिपुत्रा ॥२॥
मीचि होऊनियां परम श्रेष्ठगति । मोक्षरूप ज्यांसी प्राप्त होई-॥ ३ ॥
दुःखालय अशाश्वत पुनर्जन्म । न लाभे त्यां जाण महाभागा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पुनरावर्तन । विश्वाचें, न जन्म ईशलाभें ॥ ५ ॥

१५८ ( ७ ) १७–२१

अहोरात्रवेत्ते म्हणती ब्रह्म्याचा । सहस्र युगांचा एक दिन ॥ १ ॥
तैसीच ते रात्र, कारण सुषुप्ति[१] । सर्व व्यक्ताप्रति ब्रह्मयाची ॥ २ ॥

---

१ सर्व व्यक्ताप्रति ब्रह्मयाची सुषुप्ति कारण, असा अन्वय.

उगवतां त्याचा दिन सर्व भूतें। विलीनचि तेथें रात्र होतां ॥ ३ ॥
वारंवार ऐसा तोचि भूतगण। पावे लयोद्गमें कर्मतंत्र ॥ ४ ॥
अव्यक्ताहूनि त्या अक्षर अव्यक्त-। भिन्न, सर्वश्रेष्ठ सनातन ॥ ५ ॥
विनाश तयाचा घडेनाचि कदा। सर्वही भूतांचा नाश होतां ॥ ६ ॥
जया अव्यक्तासी अक्षर बोलती। तेचि परमगति म्हणती श्रुति ॥७॥
लाभतां ते नसे पुनरावर्तन। सर्वश्रेष्ठस्थान तेंचि माझें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्विविध अव्यक्त। माया-ब्रह्म, श्रेष्ठ ब्रह्मचि तें ॥ ९ ॥

१५९ (८) २२-२४

पुरुष तो श्रेष्ठ अनन्य भक्तीनें। लाभे सर्व जेणें व्यापिलें त्या ॥ १॥
सांठवलीं सर्व भूतें जयामाजी। पार्था, ऐसी स्थिति ध्यानीं असो ॥
यदा मृत्यु येतां ध्यानयोग्यां मोक्ष। कर्मयोग्यां प्राप्त पुनर्जन्म ॥ ३ ॥
कथीन तो काळ पार्था, घे ऐकूनि। देवता जें अग्नि तेंवी ज्योति ॥ ·
शुक्लपक्ष तेंवी उत्तरायणाची। देवता जें, मुक्ति मरणें तदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी क्रममुक्ति। ध्यानयोग्यांप्रति प्राप्त होई ॥ ६ ॥

१६० (९) २५-२६

धूमदेवता जें देवता निशेची। ते कृष्णपक्षाची देवता जें ॥ १ ॥
षण्मास दक्षिणायन देवता ते। चांद्रमसें-भोगें पुनरावृत्ति ॥ २ ॥
शुक्ल-कृष्ण ऐशा जाणें दोन गति। ध्यानें-कर्मे जगीं नित्य ऐशा ॥
क्रममुक्तिलाभ तेंवी पुनर्जन्म। फलें हीं तीं दोन गतींचीं त्या ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अवशिष्ट कर्म। देई पुनर्जन्म जीवमात्रा ॥ ५ ॥

१६१ (१०) २७-२८

पार्था, पंथ ऐसे जाणील जो दोन। योग्यासी त्या जाण न शिवे मोह
तस्मात्सर्वकाळ होई योगयुक्त। शांत ठेवीं चित्त योगबळें ॥ २ ॥
जाणूनि हीं सप्त प्रश्नांचीं उत्तरें। योगी जो विचरे शांतचित्तें ॥३॥

---

१ नाश व उत्पत्ति. २ चंद्रांतील ज्योतीला-चंद्रलोकाला जाऊन तेथील पुण्यभोग भोगून संपला म्हणजे.

वेद्-यज्ञ-जप-दानपुण्य जें जें। लंघूनियां तें तें सकळ पुण्य ॥४॥
सर्वश्रेष्ठ मूळ स्थानींचि तो लीन। वासुदेव धन्य गीतागानें ॥५॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगोनाम अष्टमोऽध्यायः

---

## गीता अध्याय ९ वा

अध्याय ३३ वा १६२ ( १ ) १–३

कृष्ण म्हणे पार्था, असूयारहिता। कथितों तुज आतां गुह्यतम ॥१॥
जाणतां जें स्वानुभव आत्मज्ञान। संसारबंधन तुटूनि मोक्ष ॥ २ ॥
राजविद्या राजगुह्य हें पवित्र। प्रत्यक्ष जें पात्र अनुभवासी ॥ ३ ॥
सर्वोत्तम संपादनार्थ सुलभ। जया न विनाश कदाकाळीं ॥ ४ ॥
ज्ञानरूपधर्मी जयांसी न श्रद्धा। तयांसी न कदा मम प्रीति ॥ ५ ॥
जन्म–मरणाच्या तयां येरझारा। कृष्णपदीं थारा वासुदेवा ॥ ६ ॥

१६३ ( २ ) ४–५

अव्यक्त स्वरूपें व्यापिलें मी विश्व। मजमाजी सर्व वसती भूतें ॥ १
तेंवी मीचि आत्मा तयांचा म्हणोनि। तयांत मी जनीं म्हणती मूढ॥
परी असंगत्वें नसें मी तयांत। तेंही न माझ्यांत सत्यदृष्ट्या ॥ ३ ॥
पहा पहा माझें तात्विक स्वरूप। भूताधार नित्य परि न भूतीं ॥४॥
स्वरूप माझेंचि करी भूतोत्पत्ति। वासुदेव वृद्धि म्हणे तेंवी ॥ ५ ॥

१६४ ( ३ ) ६--१०

यथा सर्वगामी वायु नित्य नभीं। तैसीं मजमाजी सकल भूतें ॥ १ ॥
कल्पक्षयीं सर्व प्रकृतींत लीन। कल्पारंभीं पुनः निर्मितों त्यां ॥२॥
आत्मप्रकृतीसी करूनियां वश। प्रकृति परवश भूतांप्रति-॥ ३ ॥
निर्मितों मी, पार्था, जाणें वारंवार। अनादि हा खेळ जाण माझा ॥
अनासक्ता, उदासीना, मज तेणें। कदाही न जाणें कर्मबंध ॥ ५ ॥
ममाध्यक्षत्वेंचि माया चराचर-। प्रसवे हें विश्व ऐसें चाले ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मायामय विश्व। कर्ता कर्म सर्व मायामय ॥ ७ ॥

१६५ (४) ११–१३

नित्य शुद्ध-बुद्ध-मुक्ताप्रति मज । अवमानिती मूढ मनुजभावें ॥ १ ॥
व्यर्थ-आशा-कर्म-ज्ञान-अविवेकें । मोहमयचि ते असुर दैत्य ॥ २ ॥
दैवीप्रकृतीचे परी जे महात्मे । अनन्यचित्तानें भजती मज ॥ ३ ॥
जाणूनियां मीचि भूतादि अव्यय । कथी वासुदेव कृष्णबोध ॥ ४ ॥

१६६ (५) १४–१७

सततचि माझें करिती कीर्तन । तेंवी शम-दम दृढव्रत ॥ १ ॥
तैसेचि जे भावें नमिताती मज । ऐसे नित्ययुक्त करिती भक्ति ॥२॥
ज्ञानयज्ञें कोणी भजताती मज । एक, पृथक्, विश्वरूप भावें ॥ ३ ॥
यज्ञ, वैश्वदेव, स्वधा, औषध मी । मंत्र, आज्य, अग्नि, हवन मीचि
जगाचा मी पिता, पितामह, माता । कर्मफलदाता तेंवी मीचि ॥५॥
वासुदेव म्हणे वेद्य ऋगादिक । ओंकार पवित्र श्रीकृष्णचि ॥ ६ ॥

१६७ (६) १८–१९

कर्मफल तेंवी प्रभु मी पोषक । साक्षी मीचि देख सकलाश्रय ॥ १ ॥
आर्तिहर, सखा, प्रभव, प्रलय । बीज मी अव्यय विश्वाचें या ॥२॥
स्थितीही जयाची होई मजमाजी । कर्मफलनिधि मीचि पार्था ॥३॥
तापद मी सूर्यरूपें वृष्टिकारी । अनावृष्टि करीं अथवा मीचि ॥ ४ ॥
अमृत मी देवां मृत्यु सकलां मी । कार्यकारण मी व्यक्ताव्यक्त ॥५॥
वासुदेव म्हणे कार्य तेंचि व्यक्त । कारण अव्यक्त असद्रूप ॥ ६ ॥

१६८ (७) २०–२२

वेदत्रयाभ्यासी सोमें पूतपाप । पूजूनि जे मज यज्ञद्वारा-॥ १ ॥
इच्छिताती स्वर्ग, लाभे तयां तेंचि । दिव्य भोग स्वर्गी भोगिती ते
पुण्यक्षयें तयां पुनर्मृत्युलोक । कर्मी कामासक्त भ्रमती ऐसे ॥ ३ ॥
अनन्यचित्तें जे भजताती मज । होऊनियां नित्य ध्यानमग्न ॥ ४ ॥
योगक्षेमभार त्यांचा मजवरी । वासुदेव धरी हेंचि ध्यानीं ॥ ५ ॥

१६९ (८) २३–२५

अन्य देवांतेंही पूजितां अज्ञानें । मत्पूजाचि जाणें अज्ञतां श्रद्धा ॥१॥
सर्वयज्ञभोक्ता प्रभु मीचि अर्से । परी ऐसा मातें तत्त्वरूपें-॥ २ ॥

जाणती न तयां अल्पलाभास्तव । न घडे मम लाभ पतनें ऐशा ॥३॥
देवभक्तांप्रति देवलोकप्राप्ति । जाती पितृलोकीं पितृभक्त ॥ ४ ॥
तत्तद्भूतगणां पावती तद्भक्त । पावती मद्भक्त मजप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इच्छा क्रिया जैसी । तेंचि मानवासी लाभतसे ॥ ६ ॥

१७० ( ९ ) २६–२८

पत्र, पुष्प, फल, तोयही भक्तीनें । अर्पितां प्रेमानें स्वीकारितों ॥ १॥
आचरिसी कीं जें हविसी, भक्षिसी । देसी जें करिसी तप किंवा ॥
कुंतिपुत्रा, तें तें अर्पी मजप्रति । लवही आसक्ति न ठेवितां ॥ ३ ॥
तेणें शुभाशुभकर्मबंधमुक्त । होसील संन्यासयोगयुक्ता ॥ ४ ॥
जीवन्मुक्त तेणें होसील या लोकीं । देहान्तीं मजसी पावसील ॥५॥
वासुदेव म्हणे कर्मफलबंध । तुटतां सुलभ मुक्तिपंथ ॥ ६ ॥

१७१ ( १० ) २९–३१

सम मी अर्जुना, सर्वभूतांमाजी । कोणी न मजसी द्वेष्य प्रिय ॥ १ ॥
परी जे भजती मज भक्तियुक्त । त्यांमाजी मी नित्य मजमाजी ते ॥२॥
अतिनिंद्यकर्मा, होऊनि अनन्य । भजतां मज जाण साधूचि तो ॥
कारण धर्मात्मा होई तो सत्वरि । नित्य शांति वरी तया नरा ॥
कदाही न माझ्या भक्ताचा विनाश । पार्था, हें समज निश्चयानें ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णवचनीं । श्रद्धा जया मनीं तरेल तो ॥ ६ ॥

१७२ ( ११ ) ३२–३४

पापयोनीही ते शरण मजसी । स्त्री-वैश्य-शूद्रादि येती जरी ॥ १ ॥
तयांतेंही सर्वश्रेष्ठ गति लाभे । क्षीण पाप त्यांचें भजतां मज ॥ २ ॥
पुण्ययोनि मग विप्र वा राजर्षि । कां नच पावती श्रेष्ठपदा ॥ ३ ॥
यास्तव अनित्य दुःखद यालोकीं । जन्मूनियां माझी भक्ति करीं ॥
होईं तूं मन्मना तैसा हो मद्भक्त । मत्पूजनीं रत वंदीं मज ॥ ५ ॥
ऐसा समाहिताचित्त तूं मत्पर । पावसी सत्वर मजलागींचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अध्याय नवम । देईल संपूर्ण शांति जीवा ॥ ७ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्ययोगोनाम नवमोऽध्यायः

## गीता अध्याय १० वा

अध्याय ३४ वा १७३ ( १ ) १–३

महाबाहो म्हणे कृष्ण । ऐकें श्रेष्ठ मद्वचन ॥ १ ॥
ऐकतां जें तुजसी मोद । कथितों पुनरपि हितार्थ ॥ २ ॥
देव महर्षीही माझी । उत्पत्ति न जाणिताती ॥ ३ ॥
कारण, या मीचि असें । मूळ कारण तयांचें ॥ ४ ॥
मज अनादि अजासी । जाणें लोकेश्वराप्रति ॥ ५ ॥
असंमूढ तो मर्त्यांन[1] । होई पापविनिर्मुक्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञानें । तुटती सर्वेही बंधनें ॥ ७ ॥

१७४ ( २ ) ४–६

असंमोह, बुद्धि, ज्ञान, क्षमा, सत्य । शम-दम, सुख-दुःख तेंवी ॥ १ ॥
भय अभयही, उत्पत्ति-विनाश । समता तुष्टि तप अहिंसा ते ॥ २ ॥
यश-अपयश दानादि विविध- । भावांप्रति, मीच समजें हेतु ॥ ३ ॥
पूर्वीचे ते सप्तऋषि, मनु चार । सर्वप्रजामूळ, निर्मिले म्यां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे देवावरी भाव । ठेविताती सर्व भक्त त्याचे ॥ ५ ॥

१७५ ( ३ ) ७–९

ऐसा हा विस्तार रचनाही मम । जाणील संपूर्ण स्वरूपेंसी ॥ १ ॥
स्थिरयोगयुक्त होतसे तो सत्य । संशय मनांत लवही नसो ॥ २ ॥
मीचि सर्वोत्पत्ति प्रवृत्ति एथूनि । भजती जाणूनि हेंचि मज ॥ ३ ॥
परमार्थतत्त्वीं आदर तैं प्रीति । तत्त्वार्थ जाणती भजती तेचि ॥ ४ ॥
सकल इंद्रियांसह ज्यांचें चित्त । मजमाजी स्थित सर्वकाल ॥ ५ ॥
परस्परांप्रति बोधिती जे सदा । कथूनि, मत्स्वरूपा तुष्ट हृष्ट ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसे रममाण । स्वरूप जाणून होती भक्त ॥ ७ ॥

---

१ मानवांत

१७६ (४) १०–११

ऐसे नित्ययुक्त प्रेमें भजती मज । तयां बुद्धियोग अर्पितों मी ॥ १ ॥
जेणें मम प्राप्ति होई तयांप्रति । निवेदी पार्थासी यादवेंद्र ॥ २ ॥
तयांचीच दया अंतरीं येऊन । अज्ञानज तम तयांचें मी-॥ ३ ॥
नाशितों, राहूनि अंतरीं तयांच्या । दिव्य ज्ञानदीपा उजळूनियां ॥
वासुदेव म्हणे दयामय हरि । संकटें निवारी भाविकांचीं ॥ ५ ॥

१७७ (५) १२–१५

पार्थ म्हणे परंब्रह्म परंधाम । परमपावन तूंचि देवा ॥ १ ॥
पुरुप शाश्वत विभु आदिदेव । म्हणती तूंचि दिव्य अजन्मा तूं ॥
नारद, असित, देवल व्यासही । कथिताती तूंही वदसी तेंचि ॥३॥
सर्वही तें सत्य मानितों केशवा । अगम्यचि देवादिकांसी तूं ॥ ४ ॥
पुरुषोत्तमा, भूतभावना, भूतेशा । हे देवदेवेशा जगत्पते ॥ ५ ॥
स्वयें तूंचि आत्मस्वरूपा आपणा-। जाणसी, न अन्या बोध तुझा ॥
वासुदेव म्हणे ईश्वरावांचून । यथार्थत्वें कोण जाणें ईशा ॥ ७ ॥

१७८ (६) १६–१८

विभूतिरूपें ज्या व्यापिसी जगातें । तूंचि तें पूर्णत्वें कथिण्या योग्य
चिंतूनियां नित्य जाणूं तुज कैंवी । योगींद्रा कथावी तेंचि भक्ति ॥
कोण्या कोण्या रूपें चिंतावें तुजसी । विस्तारें तें कथीं जनार्दना ॥
आत्मयोग तेंवी कथाव्या विभूति । ऐकूनि न तृप्ति पुनः पुनः ॥४॥
वासुदेव म्हणे ठाईं ठाईं ईश । विभूतिस्वरूप ऐका आतां ॥ ५ ॥

१७९ (७) १९–२२

दिव्य मी कथितों त्या आत्मविभूति । अंत न तयांसी कथितों मुख्य
भूतांतर्यामी मी सकल भूतांस । आदि मध्य अंत गुडाकेशा ॥ २ ॥
आदित्यांत विष्णु, रवि ज्योतींमाजी–। सकिरण, मरीचि मरुतांत मी
नक्षत्रांत शशि वेदांमाजी साम । देवांमाजी जाण इंद्र मातें ॥ ४ ॥
इंद्रियांत मन, चेतना मी भूतीं । वासुदेव चित्तीं सावधान ॥ ५ ॥

१८० (८) २३–२७

रुद्रांत शंकर, यक्षांत कुबेर । वसूंमाजी थोर पावक मी ॥ १ ॥

मेरु मी प्रसिद्ध शिखरवंतांत । पुरोहित मुख्य बृहस्पति ॥ २ ॥
सेनापतींमाजी स्कंद मी, सागर-। सरसांत थोर, वीरश्रेष्ठा ॥ ३ ॥
महर्षींत भृगु, वाणींत ॐकार । यज्ञांत मी थोर जपयज्ञ ॥ ४ ॥
स्थावरांत हिमाचल तो मी पार्था । वृक्षांत अश्वत्था समजें मीचि ॥
देवर्षि नारद, तेंवी चित्ररथ-। गंधर्व, सिद्धांत कपिल मीचि ॥ ६ ॥
अमृतोद्भव तो अश्वीं उच्चैश्रवा । गजांत वरवा ऐरावत ॥ ७ ॥
नराधिप नरांमाजी माझिभूति । वासुदेव कथी गीतामृत ॥ ८ ॥

१८१ ( ९ ) २८-३१

आयुधांत वज्र धेनु कामदुघा । उत्पादनकर्ता कंदर्प मी ॥ १ ॥
वासुकी सर्पांत, अनंत नागांत । जलदेवतांत वरुण जाणें ॥ २ ॥
पितृगणांमाजी जाण मी अर्यमा । जाणें मज यमा संशम्यांत ॥ ३ ॥
दैत्यांत प्रल्हाद, गणकांत काल । मृगांत मृगेंद्र, पार्था, मीचि ॥ ४ ॥
पक्षांत गरुड तोचि मी अर्जुना । पवन पावनामाजी मीचि ॥ ५ ॥
शस्त्रधरांमाजी राम, मी मकर- । थोर जळचर, जाणें मीचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सरितांत गंगा । निर्मला शुभांगा मीचि श्रेष्ठ ॥ ७ ॥

१८२ ( १० ) ३२-३५

आदि, अंत, मध्य जाण मी सृष्टीचा । विद्यांमाजी विद्या अध्यात्म मी
अर्थनिर्णायकवाद मी वादांत । अक्षरांत श्रेष्ठ अकार मी ॥ २ ॥
सकल समासांमाजी द्वंद्व तो मी । कालाचा या जनीं काल मीचि ॥
सर्वकर्मफलदाता मीचि असें । व्यापक विश्वातें समजें मज ॥ ४ ॥
सर्वहर मृत्यु, अभ्युदय हेतु । न धरावा किंतु मीचि पार्था ॥ ५ ॥
नारींमाजी मेधा, क्षमा, धृति, स्मृति। श्री वाक् तेंवी कीर्ति मीचि जाण
वासुदेव म्हणे सामीं बृहत्साम । गायत्री मी जाण छंदांमाजी ॥ ७॥

१८३ ( ११ ) ३६-३८

मार्गशीर्ष मी मासांत । सकल ऋतूंत वसंत ॥ १ ॥
छलकांत द्यूत मीचि । मीचि तेजस्व्यांची कांति ॥ २ ॥
मीचि उद्यम, विजय । तेंवी सात्विकांचें सत्त्व ॥ ३ ॥

---

१ जलाशयांत.

वासुदेव मी वृष्णींत । तेंवी पार्थ पांडवांत ॥ ४ ॥
मीचि व्यास मुनींमाजी । कवींमाजी उशना कवी ॥ ५ ॥
दमनकारकांत दंड । मीचि नीति विजयेच्छूंत ॥ ६ ॥
गुह्यांमाजी मौन, ज्ञान- । ज्ञानवंतांचें मी जाण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कथीं । देव संक्षेपें विभूति ॥ ८ ॥

१८४ ( १२ ) ३९-४२

सर्वभूतबीज तेंचि मी गणावें । मजवीण जाणावें शून्य सर्व ॥ १ ॥
मम दिव्य विभूतींसी नसे अंत । संक्षेपेंचि तुज कथिलें असे ॥ २ ॥
विभूति-श्रीयुक्त जें जें वा ऊर्जित । जाणें तें संभूत ममांशेंचि ॥ ३॥
अथवा काय लाभ ऐशा बहु ज्ञानें । विश्व एकांशानें व्यापियेलें ॥ ४॥
वासुदेव म्हणे एकांशांत विश्व । कैंवीं विभूतींस जाणावें त्या ॥ ५॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूति-योगोनाम दशमोऽध्यायः

---

गीता अध्याय ११ वा

अध्याय ३५ वा १८५ ( १ ) १-३

पार्थ म्हणे कृष्णा, ममानुग्रहार्थ । अध्यात्म नामक परम गुह्य ॥ १ ॥
वदलासी तेणें मोह हा विनष्ट । जाहला समस्त मनिंचा माझ्या ॥
कमललोचना, विनाश-उत्पत्ति । अव्यय महती कथिलीसी त्वां ॥
ईश्वरा, आपणा कथिसी तूं जेंवी । तैसाचि तूं, होई निश्चय हा ॥४॥
नरोत्तमा, तुझें वैष्णव तें रूप । पहावें मनांत हेचि इच्छा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वचनीं विश्वास । परी हेतु, रूप अवलोकावें ॥ ६ ॥

१८६ ( २ ) ४-९

शक्य मी पाहणें मानिसी तें देवा । तरी योगेश्वरा स्वरूप दावीं ॥
कृष्ण म्हणे पार्था, अवलोकीं रूप । दिव्य नानाविधवर्णाकृति ॥२॥
शत सहस्र हे प्रकार जयाचे । पहा पंहा कैसें रूप माझें ॥ ३ ॥
पहा हे आदित्य, मरुत्, वसु, रुद्र । आश्चर्ये अपूर्व अवलोकीं हीं ॥

गुडाकेशा, माझ्या देहीं या एकत्र। विश्व चराचर अवलोकीं हें ॥
अन्यही इच्छिसी तें तें अवलोकीं। असमर्थ दृष्टि जाण तुझी ॥ ६ ॥
दिव्यदृष्टि तुज देतों मी यास्तव। पाहीं योगैश्वर्य सकल माझें ॥
वासुदेव म्हणे कथितो संजय। दावी रूप दिव्य कृष्ण पार्था ॥ ८ ॥

१८७ ( ३ ) १०-१४

अनेक वदनें नयन अनेक। विस्मयकारक रूपें बहु ॥ १ ॥
आभरणें दिव्य, आयुधें उद्यत। माला दिव्यगंध अनुलेपन ॥ २ ॥
सर्वाश्चर्यरूप देव तो अनंत। सर्वतोमुख जो दिसला पार्था ॥ ३ ॥
एकाचि समयीं गगनांत सूर्य-। तळपतां सहस्र तेंवी प्रभा ॥ ४ ॥
तदा त्या शरीरीं अवयवीं एका। विश्व अनेकधा विभागलें ॥ ५ ॥
पाहूनि तें पार्थ जाहला विस्मित। ठाकले रोमांच अंगावरी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे करूनि प्रणाम। वदला अर्जुन कृताञ्जलि ॥ ७ ॥

१८८ ( ४ ) १५-१७

देवा, तव देहीं सकल विबुध। सर्वभूतसंघ दिसती मज ॥ १ ॥
कमलासनस्थ ब्रह्माही सर्वेश। ऋषि तेंवी सर्प दिसती दिव्य ॥
विश्वेश्वरा, विश्वरूपा दिससी मज। बहु-बाहूदर-वक्त्र-नेत्र ॥ ३ ॥
सर्वत्र अनंतरूपें तुजलागीं। अंत, मध्य, आदि न कळे तव ॥ ४ ॥
चक्रगदापाणी मस्तकीं किरीट। महा तेजःपुंज दीप्तिमंत ॥ ५ ॥
कोठूनिही दृष्टि दिपते पाहतां। प्रदीप्तानलार्कासम तेज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे देव अप्रमेय। वदला कौंतेय अवलोकूनि ॥ ७ ॥

१८९ ( ५ ) १८-२०

जाणण्यासी योग्य तूंचि परब्रह्म। विश्वाचें निधान तूंचि श्रेष्ठ ॥ १ ॥
अव्यय तूं सत्यधर्माचें रक्षण। पुरुष सनातन मान्य मज ॥ २ ॥
आदिमध्यान्त न अनंतवीर्यासी। अनंत जयासी दृढ बाहु ॥ ३ ॥
चंद्र-सूर्य नेत्र, दीप्ताग्नीचि वक्त्र। स्वतेजें हें त्रस्त विश्व ज्याच्या ॥

१ सर्वव्यापी.

देवा, त्वांचि एथें सकल दिशांसवें । आकाश व्यापिलें निजरूपें ॥
महाभागा, रूप उग्र तें अद्भुत । पाहूनि त्रैलोक्य भयाकुल ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि प्रत्यक्ष । वर्णी वीर पार्थ पुढती ऐका ॥ ७ ॥

११० ( ६ ) २१-२२

देवा, सुरासुरसंघ हे तुझ्यांत । होताती प्रविष्ट स्पष्ट दिसे ॥ १ ॥
भयभीत कोणी हात जोडूनियां । तुज स्तवूनियां प्रार्थिताती ॥२॥
महर्षि-सिद्धांचे संघ स्वस्तिशब्दें । तुज स्तुतिस्तोत्रें स्तविती बहु ॥
एकादश रुद्र, द्वादश आदित्य । अष्टवसु साध्य विश्वेदेव ॥ ४ ॥
मरुद्गण, यक्ष, गंधर्व, पितर । अश्वी[1] तें असुर सिद्धसंघ ॥ ५ ॥
सर्वही ते तुज विस्मयें पाहती । वासुदेव चित्तीं चकित होई ॥ ६ ॥

१११ ( ७ ) २३-२५

महाबाहो, तुझें रूप तें विशाल । बहुवक्त्रनेत्र बहुपाद ॥ १ ॥
बहूदर, बहुकराल त्या दंष्ट्रा । लोकांसवें चित्ता व्यथा मज ॥ २ ॥
नभाहूनि उंच व्यापका, प्रदीप्त । विस्फारित मुख नानावर्ण ॥ ३ ॥
विशाल प्रदीप्त नयन पाहूनि । भ्यालों धैर्य मनीं शांतिही न ॥ ४ ॥
विकराल दाढा कालानलासम । त्वन्मुखें पाहून भ्रांत झालों ॥ ५ ॥
नुमगती दिशा देवा, सौख्य नसे । प्रसन्न हो मातें जगदाधारा ॥६॥
वासुदेव म्हणे विश्वरूप ऐसें । दाविलें पार्थातें करुणाकरें ॥ ७ ॥

११२ ( ८ ) २६-२७

नृपसंघासह सर्व धार्तराष्ट्र । तैंवी सूतपुत्र भीष्म-द्रोण ॥ १ ॥
प्रमुख पांडववीरांसवें वेगें । वदनीं तुझ्या स्वांगें प्रवेशती ॥ २ ॥
विकराल दाढायुक्त भयंकर । वदनीं भग्नशिर दिसती कोणी ॥ ३ ॥
अडकले कोणी दंतसंधीमाजी । भयाकुल चित्तीं वासुदेव ॥ ४ ॥

११३ ( ९ ) २८-३१

सागरींचि बहु सरिताप्रवाह । दिव्य मुखीं वीर शिरती तैंवी ॥१॥

---

१ अश्वनीकुमार.

दीप्तानलीं जेंवी झेंप पतंगांची । तैसेचि त्वन्मुखीं शिरती सर्व ॥२॥
व्यापका, सर्वत्र ज्वलंतमुखांनीं । सर्वांसी ग्रासूनि आस्वादिसी ॥
उग्र तुझी प्रभा व्यापूनि जगासी । ताप अत्यंतचि देई देवा ॥ ४ ॥
उग्ररूपी तुम्हीं सांगा देव कोण । देवा, व्हा प्रसन्न नमितों भावें ॥
जगत्कारणा, मी इच्छीं तव ज्ञान । समजे न कारण कर्माचें या ॥६॥
वासुदेव म्हणे पार्थाचें वचन । ऐकूनि श्रीकृष्ण वदला ऐका ॥ ७ ॥

१९४ ( १० ) ३२-३३

लोकक्षयकारी काल मी प्रवृद्ध । जाहलों प्रवृत्त लोकक्षया ॥ १ ॥
युद्धामाजी जे जे वीर उपस्थित । होतील ते नष्ट तुझ्यावीण ॥ २ ॥
यास्तव उठोनि संपादीं तूं यश । विजयें समृद्ध राज्य भोगीं ॥ ३ ॥
पार्था, मीचि सर्वां वधिलें पूर्वींच । होईं तूं निमित्तमात्र आतां ॥४॥
वासुदेव म्हणे कालरूपें ईश । घडवी समस्त मनुजहस्तें ॥ ५ ॥

१९५ ( ११ ) ३४-३५

भीष्म, द्रोण, जयद्रथ । अन्य वीर कर्णादिक ॥ १ ॥
पूर्वीं वधिलेंचि मी ज्यांसी । रणीं लीलेनें त्यां वधीं ॥ २ ॥
समरांगणीं करीं युद्ध । जिंकिसील निज शत्रूंस ॥ ३ ॥
कथी संजय, ऐकूनि- । वचन, पार्थ जोडी पाणी ॥ ४ ॥
कांपे अंग कंठ दाटे । नमूनि वदे भीतचित्तें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । ऐका वदला जें कृष्णास ॥ ६ ॥

१९६ ( १२ ) ३६-३९

हृषीकेशा, तुझें ऐकूनि माहात्म्य । हृष्ट अवघे जन, तैंवी भक्त ॥ १ ॥
राक्षस भीतीनें करिती पलायन । सर्व सिद्धगण वंदिताती ॥ २ ॥
श्रेष्ठ गुरु आदिकर्ता तूं ब्रह्म्याचा । महाभागा, कैसा वंद्य न तूं ॥३॥
देवदेव, जगन्निवास अनंत । सदसद्वरिष्ठ, अक्षर तूं ॥ ४ ॥
आदिदेव तूंचि पुराणपुरुष । आधार विश्वास तूंचि मुख्य ॥ ५ ॥
वेत्ता, वेद्य, परंपद तूं व्यापिलें । देवा, विश्व सारें अमर्यादा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अनंतस्वरूपा । वंदन व्यापका विश्ववंद्या ॥ ७ ॥

१९७ ( १३ ) ४०–४२

पूर्व-पश्चिमेसी वंदन तुजसी। सर्वा, सर्वत्रचि नमन तुज ॥ १ ॥
अमितविक्रमा अतर्क्य सामर्थ्या। व्यापिसी या जगा म्हणूनि 'सर्व'
अजाणतां तव माहात्म्य हें ऐसें। प्रेमें वा प्रमादें गणूनि मित्र ॥ ३ ॥
अनादरें तुज संबोधिलें देवा। हे कृष्णा, यादवा, सख्या, ऐसें ॥४॥
आसनीं शयनीं विहारभोजनीं। थट्टेस्तव जनीं एकांतीं वा ॥ ५ ॥
अवमानिलें तें क्षमीं अप्रमेया। देवा, वासुदेवा, क्षमा करीं ॥ ६ ॥

१९८ ( १४ ) ४३–४६

चराचरपिता श्रेष्ठगुरु पूज्य। अतुल प्रभाव तूंचि एक ॥ १ ॥
लोकत्रयीं नसे अन्य त्वत्समान। अधिक कोठून असे कोण ॥ २ ॥
दंडवत् म्हणूनि करितों प्रणाम। ईशासी प्रसन्न करितों वंद्या ॥ ३॥
पित्यालागीं पुत्र मित्रासी जैं मित्र। पति भार्येस्तव तैंवी क्षमीं ॥४॥
अदृष्टपूर्व हें पाहूनियां रूप। भयानें व्यथित मन झालें ॥ ५ ॥
देवदेवा, जगन्निवासा, दाखवीं। रूप तेंचि करीं कृपा आतां ॥ ६ ॥
किरीटभूषित गदाचक्रपाणी। पाहूं इच्छितों मी त्याचि रूपा ॥ ७ ॥
सहस्रबाहो, हो विश्वमूर्ते तैंवी। चतुर्भुज, गाई वासुदेव ॥ ८ ॥

१९९ ( १५ ) ४७–४९

कृष्ण म्हणे रूप प्रसन्न चित्तानें। हें आत्मयोगानें दावियेलें ॥ १ ॥
तेजोमय विश्व अमर्याद आद्य। पार्था, जें अन्यास दिसलें नसे ॥२॥
एवंविध पार्था, भूलोकीं अन्या न। वेदाध्ययन यज्ञ दानादिकें ॥३॥
उग्र तपें किंवा विविध कर्मांनीं। पावलों पूर्वीं मी कदा कोणा ॥४॥
ऐसें माझें घोर रूप हें पाहोनि। मूढ व्यथित मनीं न होईं तूं ॥ ५ ॥
निर्भय संतुष्ट होईं पुनरपि। अवलोकीं त्याचि पूर्वरूपा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भक्तकल्पद्रुम। करीतसे पूर्ण भक्तइच्छा ॥ ७ ॥

२०० ( १६ ) ५०–५१

सूत म्हणे कृष्ण बोलूनियां ऐसें। दाखवी पार्थातें पूर्वरूप ॥ १ ॥
प्रसन्नरूप तो महात्मा होऊनि। भीतपार्था मनीं धैर्य देई ॥ २ ॥

पार्थ म्हणे तदा मानुष हें रूप। पाहूनि मोहक जनार्दना ॥ ३ ॥
स्वस्थचित्त झालों आलों भानावरी। हरिचरण धरी वासुदेव ॥४॥

२०१ ( १७ ) ५२–५३

कृष्ण म्हणे पार्था, सुदुर्दर्श रूप। माझें हें अलभ्य दिसलें तुज ॥१॥
देवही इच्छिती नित्य हें दर्शन। न घडेचि जाण परी तयां ॥ २ ॥
वेद, यज्ञ, दान, तपेंही न ऐसा। पावें, तुज जैसा पावलों मी ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे वेद, यज्ञ, दान, । व्यर्थ भक्तीवीण हाचि भाव ॥ ४ ॥

२०२ ( १८ ) ५४–५५

केवळ अनन्य भक्तीनेंचि पार्था। लाभ मम ऐसा होई जनीं ॥ १ ॥
तत्वतः ज्ञान तें यथार्थ दर्शन। भक्तीनेंचि जाण मोक्षलाभ ॥ २ ॥
अर्जुना, मदर्थ आचरी जो कर्म। जया मी परम मद्भक्तासी ॥ ३ ॥
संगवर्जित जो निर्वैर सर्वांसी। येई मजप्रति पांडवा, तो ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे एकादशाध्याय। तत्पद आशय दृढ करी ॥ ५ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नाम एकादशोऽध्यायः

---

## गीता अध्याय १२ वा

अध्याय ३६ वा २०३ ( १ ) १–२

पार्थ म्हणे ऐसे अहोरात्र तुज। अथवा अव्यक्तास ध्याती सदा ॥
तया दोघांमाजी कोण रे वरिष्ठ। कथावें तें मज भक्तप्रिया ॥ २ ॥
कृष्ण म्हणे नित्य माझे ठाईं चित्त। श्रेष्ठ श्रद्धायुक्त भजती मज ॥
भक्तोत्तम तेचि ऐसी मम मति। वासुदेव वंदी भक्तश्रेष्ठां ॥ ४ ॥

२०४ ( २ ) ३–५

परी जे सर्वत्र समबुद्धि होती। सर्वभूतहितीं रत सदा ॥ १ ॥

इंद्रियसंयमें अचिंत्यानिर्देश्य । अव्यक्त, कूटस्थ सर्वव्यापी ॥ २ ॥
ध्रुव अक्षरा त्या ध्याती अहोरात्र । मज निर्गुणास पावती ते ॥३॥
अव्यक्तोपासकां क्लेश बहु होती । देहाभिमान्यां ती कठिण भक्ति ॥
वासुदेव म्हणे अव्यक्तचिंतन । व्यक्ताहूनि जाण क्लेशदायी ॥ ५ ॥

२०५ ( ३ ) ६-१०

परी जे अर्पूनि सर्व कर्मे मज । अनन्य मत्पर मज ध्याती ॥ १ ॥
मद्रूपचित्त जे तयां मी सत्वरी । संसारसागरीं समुद्धर्ता ॥ २ ॥
मन, बुद्धि, स्थिर करीं मद्रूपींचि । तेणें मजमाजी पुढती वास ॥३॥
चित्तस्थैर्य ऐसें शक्य नसे जरी । अभ्यासेंचि तरी इच्छीं मज ॥
अभ्यासही शक्य नसे तरी कर्म । मदर्थचि जाण अवघे करीं ॥ ५॥
तेणेंचि तूं चित्तशुद्धिद्वारा मोक्ष । पावसी, निश्चय वासुदेवा ॥६॥

२०६ ( ४ ) ११-१२

हेंही तुज जरी अशक्याचि बापा । निश्चयें मद्योगा स्वीकारूनि ॥१॥
सर्वकर्मफलत्याग यतचित्तें । करीं तूं धारिष्ट्यें वीरश्रेष्ठा ॥ २ ॥
अभ्यासाहूनि तें ज्ञान श्रेयस्कर । ज्ञानाहूनि थोर मित्रा ध्यान ॥ ३ ॥
ध्यानाहूनि श्रेष्ठ कर्मफलत्याग । त्यागें शांतिलाभ त्वरित होई ॥४॥
वासुदेव म्हणे सर्वपणात्याग । जयां त्यांचा मार्ग परिसा आतां ॥

२०७ ( ५ ) १३-१४

सर्वभूतीं जया अद्वेष, मित्रत्व । तैसा दयाभाव दुःखितांसी ॥ १ ॥
अहंकार ममत्वही न जयासी । क्षमी, सुख-दुःखीं समभाव ॥ २ ॥
सर्वदा संतुष्ट तेंवी शांतचित्त । स्वभावनिरोध यत्नें करी ॥ ३ ॥
निश्चय जयाचा आत्मतत्वीं दृढ । अर्पियेलीं मज मन-बुद्धि ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा माझा भक्त । बोलला अच्युत, प्रिय मातें ॥५॥

२०८ ( ६ ) १५-१७

जया पासूनियां उद्वेग न कोणा । उद्विग्न न कोणा पासूनि जो ॥१॥

---

१ ज्याचें चिंतनही करतां येत नाहीं असा. २ ज्याचा नामनिर्देश करितां येत नाहीं असा. ३ निर्विकार.

हर्ष, क्रोध, भय, खेदेंसी नियुक्त । प्रिय तोचि भक्त मजसी पार्था ॥
निरिच्छ जो अंतर्बाह्य शुद्ध, दक्ष । नसे पक्षपात तेंवी भय ॥ ३ ॥
कामनिक सर्व कर्मांसी जो त्यागी । प्रिय तो मजसी भक्त बहु ॥४॥
हर्ष, शोक, द्वेष, इच्छा न जयासी । शुभाशुभत्यागी प्रिय मज ॥५॥
वासुदेव म्हणे सिद्धाचीं लक्षणें । जाणावीं साधनें साधका तीं ॥६॥

२०९ ( ७ ) १८–२०

शत्रु-मित्र जया सम । तेंवी मान अपमान ॥ १ ॥
शीत उष्ण सुख-दुःखीं । सम, नसे ज्या आसक्ति ॥ २ ॥
तुल्य निंदा-स्तुति मौनी । यथालाभें तुष्ट मनीं ॥ ३ ॥
राही जेथें तेंचि घर । तत्त्वबुद्धि ज्याची स्थिर ॥ ४ ॥
मत्पर जे श्रद्धायुक्त । सेवूनि हें धर्म्यामृत ॥ ५ ॥
कथिलें तेंवी आचरिती । नित्य जयां माझी प्रीति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । भक्त देवाचे लाडके ॥ ७ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगोनाम द्वादशोऽध्यायः

---

## गीता अध्याय १३ वा

अध्याय ३७ वा २१० ( १ ) १–३

कृष्ण म्हणे पार्था, शरीर हें क्षेत्र । क्षेत्रज्ञ ज्ञात्यास म्हणती त्याच्या
सर्व क्षेत्रांमाजी मीचि तो क्षेत्रज्ञ । जाणणें हें ज्ञान मानितों मी ॥ २ ॥
कैसें कोणतें तें क्षेत्र, तद्विकार । कोण तया मूळ, क्षेत्रज्ञही ॥ ३ ॥
प्रभाव तयाचा पार्था, घे ऐकूनि । संक्षेपें तुज मी निवेदितों ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्षेत्रक्षेत्रज्ञांचा । बोध आतां ऐका सविस्तर ॥ ५ ॥

२११ ( २ ) ४–६

विविध ऋषींनीं गाइलें बहुविध । छंदांनीं विवेक केला ज्याचा ॥
युक्तियुक्त ब्रह्मसूत्रपदाधारें । निश्चयें कथिलें नानापरी ॥ २ ॥

पंचमहाभूतें बुद्धि अहंकार । इंद्रियें दशैक, अव्यक्तही ॥ ३ ॥
पंच विषय ते इच्छा सुख-दुःख । चेतना संघात तैंवी धैर्य ॥ ४ ॥
संक्षेपें हें क्षेत्र सविकार कथिलें । वासुदेव बोले भगवद्वाणी ॥ ५ ॥

२१२ ( ३ ) ७-८

अमानित्व, अदंभित्व तें अहिंसा । क्षांति तें ऋजुता, गुरुसेवा ॥१॥
अंतर्बाह्य शुद्धि, मोक्षमार्गीं स्थैर्य । स्वाधीनइंद्रियदेहआत्मा ॥ २ ॥
विषयवैराग्य, निरहंकारता । जन्म-मृत्युजराव्याधिदुःख ॥ ३ ॥
दोषांचें या नित्य जयासी चिंतन । वासुदेव धन्य मानी तया ॥ ॥४॥

२१३ ( ४ ) ९-११

विषयीं न प्रीति पुत्र दारादिकीं । जया न आसक्ति ममत्वेंसी ॥१॥
इष्टानिष्टलाभें नित्य समचित्त । माझा दृढभक्त एकांतिक ॥ २ ॥
एकांतीं निर्भय पवित्र निवास । जनसमूहांत नावडे ज्या ॥ ३ ॥
अध्यात्मज्ञानीं जो सर्वदा निमग्न । तत्त्वार्थालोचन नित्य ज्यासी ॥४॥
विद्वद्वरोक्त हें ज्ञानाचें साधन । याहूनि जें अन्य अज्ञान तें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे साधनासी साध्य । ज्ञातें अभ्यासार्थ मानिताती ॥

२१४ ( ५ ) १२-१४

ज्ञेयं तें तुजसी कथितों मी पार्था । ऐकूनि घे आतां दक्षतेनें ॥ १ ॥
अनादि सदसद्विलक्षण श्रेष्ठ । होतां ब्रह्मबोध अमृतलाभ ॥ २ ॥
हस्त-पाद, नेत्र, शिरें, मुखें तैसीं । श्रवणेंद्रियें ज्यासी सर्वदेहीं ॥३॥
प्राणिसमूहीं या व्यापूनि सर्वांसी । तिष्ठे तत्त्व तेंचि एकमेव ॥ ४ ॥
सर्वेंद्रियगुणें भासे परी तैसें । सेंद्रिय तें नसे अलिप्तचि ॥ ५ ॥
तेंचि सर्वाधार निर्गुण, गुणभोगी । वासुदेव जगीं नवल म्हणे ॥

२१५ ( ६ ) १५-१६

भूतीं अंतर्बाह्य, अचर वा चर । समीप वा दूर ज्ञानाज्ञानें ॥ १ ॥
सूक्ष्मत्वें अज्ञासी कदाही कळेना । ब्रह्मचि विद्वाना सकल दिसे ॥

---

१ मोक्षाचा विचार. २ ब्रह्म

भिन्न भिन्न भूतीं असे अविभक्त । परी तें विभक्त ऐसें भासे ॥ ३ ॥
ज्ञेयाचि उत्पत्ति, पालन, संहार । ज्ञेयाचि आधार वासुदेवा ॥ ४ ॥

२१६ ( ७ ) १७–१९

ज्योतींचीही ज्योति, स्पर्श न तमाचा । ज्ञेयालागीं कदा म्हणती ज्ञाते
ज्ञान, ज्ञेय, ज्ञानगम्य हें त्रिविध । सर्वांतरीं स्थित वैशिष्ठ्येंसी ॥
ऐसें क्षेत्र तेंवी साधन ज्ञानाचें । ज्ञेयही संक्षेपें निवेदिलें ॥ ३ ॥
जाणूनि हें माझा भक्त मद्भावासी । पात्र निश्चयेंसी समजें पार्था ॥
प्रकृति पुरुष अनादि हीं दोन्हीं । विकार ते मानीं बुद्धयादिक ॥५॥
सुख-दुःखादीही प्रकृतीचे गुण । वासुदेव कृष्णवचन कथीं ॥ ६ ॥

२१७ ( ८ ) २०–२२

देहेंद्रियकर्मा कारणप्रकृति । सुख-दुःखभोगीं पुरुषहेतु ॥ १ ॥
प्रकृतिअभिमानें प्रकृतीचे गुण । भोगीतसे जाण पुरुष पार्था ॥ २ ॥
आसक्ति गुणांची सदसज्जन्मांसी । कारण भोक्त्यासी होत असे ॥
समीपस्थ, द्रष्टा, तेंवी अनुमोदक । भोक्ता तैं पालक महेश्वर ॥ ४ ॥
परमात्माही जया म्हणती तो या देहीं । परपुरुष पाहीं वास करी
वासुदेव म्हणे क्षराक्षराहूनि । अन्यचि घ्या ध्यानीं पुरुष पर ॥ ६ ॥

२१८ ( ९ ) २३–२५

ऐसा जाणे जो पुरुष । गुणांसवें प्रकृतीस ॥ १ ॥
कैसेंही तो आचरतां । चुकती जन्म-मरणखेपा ॥ २ ॥
ध्यानें आत्मा स्वबुद्धींत । बघती कोणी शुद्धचित्त ॥ ३ ॥
सांख्ययोगें बघती कोणी । कोणी कर्म आचरूनि ॥ ४ ॥
ऐशा त्रिविधमार्गी अज्ञ । गुरुवचनें करिती यत्न ॥ ५ ॥
ऐसे श्रवणनिष्ठ तेही । भव उल्लंघिती पाहीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रोता–। क्रियावंत, होई ज्ञाता ॥ ७ ॥

२१९ ( १० ) २६–२८

क्षेत्रक्षेत्रज्ञांच्या संयोगेंचि सर्व । उपजे हें विश्व जाण पार्था ॥ १ ॥
सर्वही नश्वर भूतांमाजीं सम । शाश्वत परम ईशाप्रति ॥ २ ॥

पाहे, तोचि पाही यथार्थ स्वरूपें । इतर नश्वरातें अवलोकिती ॥३॥
कारण सर्वत्र तुल्यरूपें स्थित । पाही ईश्वरास समत्वें जो ॥ ४ ॥
स्वयेंचि आपुला न करी तो घात । पावे परमपद ऐशा रीतीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अज्ञानें देहासी । आत्मा लेखी त्यासी यत्न योग्य ॥

२२० ( ११ ) २९–३०

शरीरेंद्रियें हे प्रकृतीच कर्मे । आचरी हे जाणें सर्वविध ॥ १ ॥
अकर्ताचि आत्मा ऐसें जया ज्ञान । ज्ञाता तोचि जाण इतर मूढ ॥
भूतांचें पृथक्त्व एकाचि आत्म्यांत । अवलोकी शास्त्रगुरुबोधें ॥३॥
तयापासूनीचि विस्तार भूतांचा । जाणील जो यदा तदा मुक्त ॥४॥
वासुदेव म्हणे आत्माचि हें सर्व । ज्या क्षणीं हा भाव मुक्तीचि तें ॥

२२१ ( १२ ) ३१–३२

अनादित्व तेंवी तथा निर्गुणत्व । म्हणूनि अव्यय परमात्मा ॥ १ ॥
असूनि शरीरीं न करी, न लिप्त । अकर्ता आलिप्त सर्वकर्मी ॥२॥
सूक्ष्मत्वें व्यापक आकाश हें जैसें । धूम्र, धुलि, अभ्रें अलिप्तचि ॥
त्यापरी सर्वत्र आत्मा देहामाजी । असूनि तयासी लेप नसे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सूक्ष्माहूनि सूक्ष्म । आत्मा निरंजन निर्विकल्प ॥ ५ ॥

२२२ ( १३ ) ३३–३४

प्रकाशित करी एकचि हा रवि । सकल लोक जेंवी स्वप्रकाशें ॥
सकल क्षेत्रासी तेंवी हा क्षेत्रज्ञ । प्रकाशवी पूर्ण लीलामात्रें ॥ २ ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञांचें अंतर जे ऐसें । स्वयें ज्ञाननेत्रें जाणितातीं ॥ ३ ॥
भूतप्रकृतीचा ज्ञानें जे अभाव-। जाणती, तयांस मोक्षलाभ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे त्रयोदशाध्याय । देईल अनुभव अभ्यासितां ॥ ५ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगोनाम त्रयोदशोऽध्यायः

## गीता अध्याय १४ वा

अध्याय ३८ वा २२३ (१) १–२

सर्व ज्ञानांमाजी श्रेष्ठ जें उत्तम । पुनरपि ज्ञान कथितों तुज ॥ १ ॥
जाणतां जें देहपातोत्तर मुनि । सर्व श्रेष्ठ स्थानीं रमूनि गेले ॥ २ ॥
ज्ञानाचा या जयां आश्रय ज्ञात्यांसी । मत्स्वरूपप्राप्ति तयांलागीं ॥
पुनःसृष्ट्युत्पत्तीकाळींही न जन्म । प्रलयींही जाण मरण न त्यां ॥
वासुदेव म्हणे ज्ञानरूप आत्मा । जन्ममरणभ्रमा केंवी पावे ।। ५ ॥

२२४ (२) ३–४

सर्वांहूनि मोठी प्रकृतीचि माझी । भरण विश्वासी म्हणूनि ब्रह्म ॥
तियेच्याचि ठाईं स्थापितों मी गर्भ । सकल भूतांस जन्म तेणें ॥२॥
देवादिक सर्व योनींमाजी जे जे । आकार तयांतें हेचि भूमि ॥ ३ ॥
बीजदाता पिता सकळां त्यां मीचि । वासुदेव वंदी तयालागीं ॥४॥

२२५ (३) ५–६

प्रकृतिसंभूत सत्व, रज, तम । बंधक हे गुण धनुर्धरा ॥ १ ॥
अव्यय जो देही तयासी या देहीं । जणु बद्ध पाहीं करिती भासे ॥
तयांमाजी सत्व निर्मलत्वें देख । होई प्रकाशक न करी पीडा ॥३॥
परी मी सुखी वा ज्ञानी या अभिमानें । पडती बंधनें आत्म्यालागीं
वासुदेव म्हणे सत्वगुणें ज्ञान । तो न आत्मधर्म आत्माही न ॥ ५ ॥

२२६ (४) ७–८

अप्राप्ता ची इच्छा प्राप्तामाजी प्रीति । तोचि कामरूपी रजोगुण ॥१॥
कर्मसंगें घडे बंधन त्या योगें । मोही तो सर्वांतें तमोगुण ॥ २ ॥
अज्ञानोद्भव तो प्रमाद आलस्य । निद्रायोगें बंध प्राणिमात्रां ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ऐसे हे त्रिगुण । प्रकृतीचे गुण, नसती आत्मा ॥ ४ ॥

२२७ (५) ८–१०

पार्था, सुखासक्त करीतसे सत्व । कर्मांत आसक्त करी रज ॥ १ ॥
विवेकावरणें कर्तव्यविन्मुख । करीतसे देख तमोगुण ॥ २ ॥

---

१ सर्वकार्यजाताहून

रजतमांलागीं जिंकूनियां सत्व । पावतो महत्व हे कौंतेया ॥ ३ ॥
सत्वतमां रज, रजसत्वां तम । जिंकिती तें जाण वृद्धि तयां ॥४॥
वासुदेव म्हणे पराक्रमावीण । जगामाजीं कोण उदय पावे ॥ ५ ॥

२२८ ( ६ ) ११-१२

देहामाजी यदा सर्वही इंद्रियें । नांदती विवेकें ज्ञानयुक्त ॥ १ ॥
तदा सत्ववृद्धि जाहली अंतरीं । निर्धार हा करीं भाग्यवंता ॥ २ ॥
लोभ, व्यर्थ चेष्टा, काम्यकर्मारंभ । तृष्णा, वृत्तिक्षोभ रजोत्कर्षे ॥
वासुदेव म्हणे ऐसा रजोगुण । दारुण बंधन जीवालागीं ॥ ४ ॥

२२९ ( ७ ) १३-१५

अविवेक अप्रवृत्ति अनवधान । मोहवृद्धि जाण तमोत्कर्षे ॥ १ ॥
सत्ववृद्धीमाजी पंचत्व पावतां । अमल पुण्य लोका पावे प्राणी ॥२॥
रजोवृद्धीमाजी प्राण जरी जाई । कर्मासक्त होई मनुज तरी ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे तमोगुणामाजी । त्यागितां देहासी तिर्यग्जन्म ॥ ४ ॥

२३० ( ८ ) १६-१७

सात्विक कर्माचें सात्विकाचि फल । लाभतें निर्मल महाभागा ॥१॥
दुःख हेंचि फल राजसकर्माचें । अज्ञान तमाचें फल जाणा ॥ २ ॥
सत्ववृद्धि होतां ज्ञानाचा उदय । रजोगुणें होय लोभवृद्धि ॥ ३ ॥
प्रमाद, मोह तें अज्ञान, तमानें । वासुदेव म्हणे वृद्धिंगत ॥ ४ ॥

२३१ ( ९ ) १८-१९

सत्वस्थ ते उर्ध्वलोकांमाजी जाती । राजस ते येती मनुजलोकीं ॥
जघन्य जो तम तयांत जे स्थित । ऐशा तामसांस अधोलोक ॥२॥
गुणाहूनि कर्ता, न पाही जें ज्ञाता । जाणे गुणातीता आत्म्याप्रति ॥
तदाचि तयासी लाभतो मद्भाव । नित्य वासुदेवयत्न तैसा ॥ ४ ॥

२३२ ( १० ) २०

देहनिमित्त जे गुण । सत्व, रज आणि तम ॥ १ ॥
लंघूनियां जन्म जरा-। मृत्यु दुःखें जो सुटला ॥ २ ॥
देहीं असूनि तो मुक्त । भोगीतसे अमृतत्त्व ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । जीवन्मुक्त तारी जगा ॥ ४ ॥

२३३ ( ११ ) २१–२२

पार्थ म्हणे देवा, गुणातीत कैसा । वर्ततो तें सांगा चिन्हें त्याचीं ॥
तेंवी त्रिगुणासी लंघूनियां कैंवी । कथावें तो जाई मजलागीं ॥ २ ॥
प्रकाश, प्रवृत्ति तेंवी मोहादिक । होतां कार्य प्राप्त त्रिगुणांचें ॥ ३ ॥
करीना जो द्वेष, होतां ते निवृत्त । इच्छाही जयास नसे त्यांची ॥
वासुदेव म्हणे साक्षिरूपें ऐसा । स्थिर, गुणबाधा नसे तया ॥ ५ ॥

२३४ ( १२ ) २३–२४

उदासीनासम नित्य ज्याचा वास । गुणांनीं विचलित न होई जो ॥
गुणामाजी गुण वर्तती या बोधें । अविचल चित्तें स्वरूपीं राहे ॥
सर्वदा जो स्वस्थ सुख-दुःखींसम । लोष्टाश्मकांचन सम ज्यातें ॥३॥
प्रियाप्रिय, निंदास्तुतीही ज्या तुल्य । म्हणे वासुदेव धैर्यवंत ॥४॥

२३५ ( १३ ) २५–२६

मान अपमान तुल्यचि जयास । मित्र अरिपक्ष तुल्य ज्यातें ॥ १ ॥
सर्व कर्मारंभ त्याग ज्या पुरुषासी । गुणातीत त्यासी म्हणती ज्ञाते॥
अव्यभिचारी त्या भक्तियोगें मज । भजतो जो नित्य सर्वभावें ॥३॥
तो या त्रिगुणांसी लंघूनियां जाई । समर्थचि होई ब्रह्मभावा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ईश्वरानुग्रह । तारी एकमेव साधकासी ॥ ५ ॥

२३६ ( १४ ) २७

अविनाशी निर्विकार । नित्य धर्म जो साचार ॥ १ ॥
एकान्तिक तेंवी सुख । सदा आनंदस्वरूप ॥ २ ॥
ऐसा मीचि प्रत्यगात्मा । होतों अनुभवें परमात्मा ॥ ३ ॥
अथवा निर्विकल्प ब्रह्म । सविकल्पा अधिष्ठान ॥ ४ ॥
तेचि प्रतिष्ठा ब्रह्माची । बोध ठसो ऐसा चित्तीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । ज्ञान कथिलें अर्जुनातें ॥ ६ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगोनाम चतुर्दशोऽध्यायः

---

## गीता अध्याय १५ वा

अध्याय ३९ वा २३७ ( १ ) १–२

उत्कृष्ट तें ब्रह्ममूळ ज्या वृक्षासी । निकृष्ट जयासी असती शाखा ॥
क्षणभंगुर तो अनादि अनंत । वृक्ष ज्या अश्वत्थ नांव असे ॥ २ ॥
संरक्षक पर्णें जया ऋग्वेदादि । जाणतो हें तोचि वेदवेत्ता ॥ ३ ॥
अधोर्ध्व तयाच्या शाखा विस्तारल्या । गुणांनीं वाढल्या, विषयांकुर
कर्मकारण तीं वासनास्वरूप । मानवलोकांत मुळें त्याचीं ॥ ५ ॥
अविच्छिन्न ऐसा विस्तार तयाचा । वासुदेव त्याचा महिमा वर्णी॥

२३८ ( २ ) ३–४

वर्णिलें त्यापरी वृक्षाचें त्या रूप । न दिसेचि देख सांसारिकां ॥१॥
आदि अंतस्थिति न कळे तयाची । ऐशा अश्वत्थासी बद्धमूळा-॥
छेदूनियां, दृढ असंगशस्त्रानें । विस्तारिली जेणें संसृति हे-॥३॥
अनादि, त्या आद्यपुरुषासी अनन्य। शरण जाऊन शोधावें त्या ॥
गेले जे त्या स्थानीं न येती फिरोनि । चिंती तेंचि मनीं वासुदेव ॥

२३९ ( ३ ) ५–६

मान, अहंकार, मोह न जयांसी । जिंकिली आसक्ति दोषयुक्त ॥१॥
निवृत्त जयांचे निःशेषही काम । चिंतिती अध्यात्म निरंतर ॥२॥
विन्मुख जे सुख-दुःखादि द्वंद्वांनीं । अव्यक्त त्या स्थानीं जाती ज्ञाते
स्थान तें न चंद्रसूर्य दाविताती । अग्नीही तयासी दावीचिना ॥४॥
जेथ जातां नसे निवृत्ति तें मम । तेजोमय स्थान श्रेष्ठ बापा ॥५॥
वासुदेव म्हणे वैष्णव तें पद । लाभेना सहज भक्तीवीण ॥ ६॥

२४० ( ४ ) ७–८

कर्ता, भोक्ता, जीव या जीवलोकांत । माझाचि तो अंश पुरातन ॥
स्वस्थानापासूनि आकर्षूनि स्वयें । मन तें इंद्रियें घेई जीव ॥ २ ॥
देहस्वामी तोचि शरीर हें त्यागी । अन्य देहामाजी प्रवेशे जें ॥ ३ ॥
तदा वायु जेंवी सुगंध पुष्पांचा- । नेई, नेई तैसा इंद्रियमनां ॥४॥
वासुदेव म्हणे मनासवें ऐसीं । जीवासवें जाती पंचेंद्रियें ॥ ५ ॥

२४१ ( ५ ) ९–१०

श्रोत्र, चक्षु, स्पर्श रसना तें घ्राण। सहावें तें मन, साधनां या-॥१॥
अधिष्ठाता स्वयें होऊनियां जीव। भोगितो विषय विविध परी॥
देहत्यागितां वा वसतांही देहीं। उपभोक्त्यातेंही गुणान्विता॥३॥
न पाहती मूढ पाहताती ज्ञाते। वासुदेव हर्षे ऐशा बोधें॥४॥

२४२ ( ६ ) ११–१२

यत्नशील योगी ऐशा बुद्धिस्थिता। अवलोकिती पार्था, हा मी ऐसें
प्रयत्नेंही शुद्ध जयांचें न चित्त। अविवेकी ते मज न पाहती॥२॥
प्रकाशित करी अखिल जगातें। तेज जें सूर्याचें प्रखर बहु॥३॥
चंद्राचें त्यापरी अग्नीचेंही तेज। माझेंचि समग्र समजें पार्था॥४॥
वासुदेव म्हणे ज्योति चैतन्याची। जेथ जेथ तेंचि रूप त्याचें॥५॥

२४३ ( ७ ) १३–१४

प्रवेशूनि पृथ्वीमाजी मी स्वतेजें। धारण भूतांचें करितों स्वयें॥१॥
सोमरूप चंद्र होऊनियां सर्व। वनस्पतिवर्ग करितों पुष्ट॥२॥
वैश्वानररूपें प्राणिशरीरांत। प्राणापानयुक्त होऊनियां॥३॥
पचवितों स्वयें चतुर्विध अन्न। म्हणे धन्य धन्य वासुदेव॥४॥

२४४ ( ८ ) १५–१६

हृदयीं मी सर्वांचिया संनिविष्ट। स्मृति, ज्ञान, हृत करितों, देतों॥
जाणण्यासी योग्य वेदांनीं तें मीचि। संप्रदाय मीचि वेदान्ताचा-॥
चालवितों, वेदवेत्ता मीचि जाण। क्षराक्षर दोन पुरुष लोकीं॥३॥
भूतें तोचि क्षर मायाचि अक्षर। वासुदेव स्थिरपुरुषा ध्यातो॥४॥

२४५ ( ९ ) १७–१८

अन्यचि उत्तम पुरुष अर्जुना। म्हणती परमात्मा शास्त्रज्ञ त्या॥१॥
प्रवेशूनि लोकत्रयीं तो आधार-। होतसे, ईश्वर अव्ययही॥२॥
क्षराक्षराहूनि अतीत उत्तम। म्हणूनि पुरुषोत्तम म्हणती मज॥३॥
वेदशास्त्रांमाजी तैसाचि जनांत। पार्था, मी प्रसिद्ध याचि नामें॥
वासुदेव म्हणे उपाधीरहित। पुरुष तो श्रेष्ठ परात्पर॥५॥

२४६ ( १० ) १९–२०

असंमूढ नर मज पुरुषोत्तमा । जाणे जो अर्जुना, ऐशापरी ॥ १ ॥
सर्वज्ञ तो मज भजे सर्वभावें । पार्था, काय गावें यश त्याचें ॥२॥
गुह्याहूनि गुह्य शास्त्र हे अनघा । कथियेलें पार्था, तुजलागीं मी ॥
जाणूनि हें शास्त्र जनीं बुद्धिमंत । होई कृतकृत्य भरतश्रेष्ठा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पंचदशोऽध्याय । चिंतनें अनुभव भक्तां देई ॥ ५ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे पुराणपुरुषोत्तमयोगोनाम पञ्चदशोऽध्यायः

---

गीता अध्याय १६ वा

अध्याय ४० वा २४७ ( १ ) १–३

कृष्ण म्हणे पार्था, अभय, चित्तशुद्धि । ज्ञानयोगामाजीं अचल निष्ठा
दान, दम, यज्ञ तेंवी अध्ययन । सर्वदाचि जाण ऋजुभाव ॥२॥
अहिंसा, अक्रोध, सत्य, त्याग, शांति । दया सर्व भूतीं, अलोलुप्त्व
मृदुत्व, अकार्यीं लज्जा, अचांचल्य । उत्साहद, धैर्य, तेज, क्षमा ॥
बाह्यान्तर शुद्धि, अद्रोह, लीनता । गुण हे संपदा दैवी जया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जन्मजात ऐसे । दैवी संपत्तीचे लोक जनीं ॥ ६ ॥

२४८ ( २ ) ४–६

दंभ, दर्प, अभिमान । क्रोध कठोर, भाषण ॥ १ ॥
अज्ञान त्यां अभिजात । आसुरी ते वृत्ति ज्यांस ॥ २ ॥
दैवी संपत्ति ते मोक्षा । आसुरी ते कारण बंधा ॥ ३ ॥
दैवीमाजी तुझा जन्म । पार्था, न होईं तूं खिन्न ॥ ४ ॥
द्विप्रकारक ते सृष्टि । दैव, आसुर या लोकीं ॥ ५ ॥
विस्तारें ते कथिली दैवी । पार्था, आसुरी ऐकावी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । भक्तकाजकल्पद्रुम ॥ ७ ॥

२४९ ( ३ ) ७–८

कोठें करावी प्रवृत्ति । कवणापासूनि निवृत्ति ॥ १ ॥

कदा, आसुरां त्या जनां । तारतम्य हें कळेनां ॥ २ ॥
शुचिर्भूतपणा तैंवी । सत्याचार न त्यां कांहीं ॥ ३ ॥
स्वयें आपण ते जैसे । असत्य तें जग त्यांतें ॥ ४ ॥
धर्माधर्मअपेक्षक । जगच्छास्ता न त्यां ईश ॥ ५ ॥
सकामस्त्री-पुरुषोद्भव । कामहेतुक त्यां विश्व ॥ ६ ॥
धर्माधर्म अदृष्टादि । कारणें न ते मानिती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दृश्य । तेंचि मूढांसी त्यां सत्य ॥ ८ ॥

२५० ( ४ ) ९–१०

स्वीकारूनि ऐसी दृष्टि ते नष्टात्मे । विषयांतचि रमे चित्त ज्यांचें ॥
उग्रकर्मे ऐसे जगत्शत्रु जाण । नाशासी कारण जगता होती ॥ २ ॥
आश्रय करूनि दुष्पूर कामाचा । दंभ, मान, मदा, अवलंबूनि ॥ ३ ॥
मोहानें अशुभ निश्चय करिती । व्रतेंही अशुचि कृतीही ते ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नास्तिक ते मूढ । तयांहूनि जड दगड भले ॥ ५ ॥

२५१ ( ५ ) ११–१३

तयां असुरांसी अमर्याद चिंता । नित्य आमरणान्ता ध्यानीं असे ॥
विविध विषयभोग हाचि त्यां पुरुषार्थ । तत्पर विषयांत निश्चयें या ॥
शतावधि आशापाशें होती बद्ध । नित्य काम-क्रोधपरायण ॥ ३ ॥
संपादिलें अद्य हें मी, हें मिळवीन । तुष्टिकर धन असेचि हें ॥ ४ ॥
तैसेंचि हें माझें होईल पुढती । नसो हे आसक्ति वासुदेवा ॥ ५ ॥

२५२ ( ६ ) १४–१६

वधिला हा शत्रु, अन्यही वधीन । ईश्वर मजवीण अन्य नसे ॥ १ ॥
सर्वैश्वर्यभोक्ता मीचि सर्व सिद्ध । सुखी मी बलाढ्य इतर क्षुद्र ॥
धनसंपन्न मी कुलीनही मीचि । सदृश मजसी कोण अन्य ॥ ३ ॥
करीन मी यज्ञ देईन दानातें । नाचेन आनंदें, भ्रमती ऐसे ॥ ४ ॥
ऐसे भ्रांतचित्त मोहजाळमग्न । विषयनिमग्न नरक तयां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसे नराधम । घोर नरकावीण कोठें जाती ॥ ६ ॥

२५३ ( ७ ) १७–१८

स्वयेंचि आपणा मानिती ते थोर । न वांके शरीर कवणापुढें ॥ १ ॥

धनाढ्य मी ऐशा मानमदें युक्त । दंभें नाममात्र करिती यज्ञ ॥ २ ॥
विधि-विधान त्यां न लागेचि कांहीं । लौकिकार्थ होई अवघा यत्न ॥
अहंकार, बळ, दर्प, काम, क्रोध । संयुक्त ते, मूढ आसुरभावें ॥ ४ ॥
साक्षिभूता मज स्वपरदेहस्था । लेखिती न कदा अतिद्वेषें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गुणही ते दोष । पाहताती नित्य असूयक ॥ ६ ॥

२५४ ( ८ ) १९–२०

द्वेष्ट्यां तयां क्रूर अशुभ अधमां । व्याघ्रादींचिया जन्मां टाकितों मी
निरंतर पार्था, मूढ जन्मोजन्मीं । आसुरीचि योनि पावताती ॥ २ ॥
लाभ न त्यां माझा होतां अधमाधम-। निंद्य गति जाण लाभतसे ॥
वासुदेव म्हणे आसुरी संपत्ति । देई अधोगति ऐशापरी ॥ ४ ॥

२५५ ( ९ ) २१–२२

काम-क्रोध-लोभ ऐसें हें त्रिविध । आत्मविनाशकद्वार असे ॥ १ ॥
यास्तव हें त्रय त्यागावें सर्वथा । ध्यानीं असो पार्था, सर्वकाळ ॥
कौंतेया, या तिन्हीं घोरतमोयुक्त । द्वारांनीं जो मुक्त श्रेयोगामी ॥
त्याचि साधनें त्या लाभे श्रेष्ठ गति । वासुदेव त्यासी हात जोडी ॥

२५६ ( १० ) २३–२४

त्यागूनियां शास्त्र स्वैर जो वर्ततो । पुरुषार्थयोग्य तो होईचिना ॥
सुखही तयासी न लाभेचि कदा । अथवा परमपदा न पावे तो ॥
म्हणूनियां शास्त्र प्रमाण तुजसी । कार्याकार्यामाजी पडतां मोह ॥
शास्त्रविधानोक्त जाणूनि यास्तव । योग्य तूं कर्तव्य आचरिण्या ॥
वासुदेव म्हणे अध्याय षोडश । शास्त्रमर्यादेस कथन करी ॥ ५ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगोनाम षोडशोऽध्याय:

## गीता अध्याय १७ वा

अध्याय ४१ वा

२५७ ( १ ) १–२

पार्थ म्हणे कृष्णा, अशास्त्रीयमार्गे । पूजिती देवांतें श्रद्धायुक्त ॥ १ ॥
अवस्था तयांची सात्विक, राजस । अथवा तामस कथावी ते ॥
कृष्ण म्हणे जीवां श्रद्धा हे त्रिविध । पूर्वकर्मोचित लाभतसे ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे सात्विकादि श्रद्धा । ऐक म्हणे पार्था कृष्णनाथ ॥

२५८ ( २ ) ३–४

अंतःकरण जें संस्कारविशिष्ट । श्रद्धा ही तैसीच सकलांप्रति ॥१॥
श्रद्धामयचि हा पुरुष हे पार्था । जैसी ज्याची श्रद्धा तैसाचि तो ॥
सात्विक देवांसी, राजस तैसेचि । यक्ष-राक्षसांसी भजती नित्य ॥
भूतप्रेतांलागीं भजती तामस । वासुदेव ध्यास हरिचा घेई ॥ ४ ॥

२५९ ( ३ ) ५–६

दंभअहंकारसंयुक्त जे बापा । बल कामरागान्वित जयां ॥१ ॥
अविवेकी शरीरस्थ इंद्रियांसी । मज देहस्थाही करिती कृश ॥ २ ॥
अशास्त्रीय घोर आचरिती तप । तयांचा तो देख आसुरभाव ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे त्यागार्थ दुर्गुण । कथी नारायण नराप्रति ॥ ४ ॥

२६० ( ४ ) ७–८

त्रिविध या लोकीं आहारही पार्था । यज्ञ, दान तथा तपही तैसें ॥
सात्विक, राजस, तामसां जे प्रिय । ऐकावे प्रकार धनुर्धरा ॥ २ ॥
आयुर्बल, वीर्य, आरोग्य तैं सुख-। प्रीतिविवर्धक, रस्य[1], स्निग्ध ॥
देहामाजी चिरवास्तव्य जयांचें । हृद्य आहार ते सात्विकांसी ॥४॥
वासुदेव म्हणे चित्तस्थैर्यकारी । प्रीति त्या आहारीं सात्विकांची ॥

२६१ ( ५ ) ९–१०

अति तीक्ष्ण, कटु, क्षार, उष्ण रूक्ष । जे दाहकारक आहार ते ॥१॥
दुःख, शोक, रोगकारक राजसां-। रुचताती, पार्था, सर्वकाल ॥ २ ॥
यातयाम[2], गतरस[3], पर्युषितें[4] । दुर्गंधसंयुक्त उच्छिष्टही ॥ ३ ॥

---

१ रसयुक्त. २ अर्धवट शिजलेलें. ३ रस नाहीसा झालेलें. ४ शिळें.

अपवित्रपणें अयोग्य यज्ञासी । अन्न तामसांसी तेंचि प्रिय ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अन्नासम मति । मतीसम कृति विसरूं नये ॥ ५ ॥

२६२ ( ६ ) ११–१३

फळाकांक्षा चित्तीं नसेचि जयासी । यज्ञ जो सविधि आचरितो ॥
कर्तव्यभावें जो चित्तसमाधानें । होई तोचि जाण सात्विक यज्ञ ॥
चित्तीं फलासक्ति किंवा दंभार्थही । राजस तो पाहीं यज्ञ पार्था ॥
मंत्रविधि तेंवी दक्षिणाविहीन । नसे अन्नदान जयामाजी ॥ ४ ॥
श्रद्धाहीन यज्ञ तामस गणावा । प्रिय वासुदेवा सात्विक तो ॥ ५ ॥

२६३ ( ७ ) १४–१५

देव, द्विज, गुरु, ज्ञात्यांचें पूजन । शौच तें वर्तन सरळभावें ॥ १ ॥
प्राणिहिंसात्याग तेंवी ब्रह्मचर्य । तप तें शारीर म्हणती ज्ञाते ॥२॥
अनुद्वेगकारी, सत्य, प्रिय, हित । ऐसें जें सुवाक्य महाबाहो ॥ ३ ॥
स्वाध्यायाभ्यसन तप तें वाङ्मय । गीता वासुदेव नित्य गाई ॥४॥

२६४ ( ८ ) १६–१७

सौम्यता तें मनःशांति तेंवी मौन । मनःसंयमन कपटाभाव ॥१॥
ऐशा तपामाजी प्राधान्य मनासी । म्हणती तेणें त्यासी मानस तप ॥
फलाकांक्षाहीन, कर्ता शान्तचित्त । श्रेष्ठ श्रद्धायुक्त त्रिविध ऐसें ॥
सात्विकांचें तप, शारीरादि जाण । तयाचें चिंतन वासुदेवा ॥ ४ ॥

२६५ ( ९ ) १८–१९

सत्कार तें मान पूजार्थ जें तप । करिती दांभिक दंभानेंचि ॥ १ ॥
चंचल अनित्य तप तें राजस । मानिताती त्याज्य ज्ञानीजन ॥ २ ॥
मूढनिश्चयें जें आत्मपीडायुक्त । परविनाशार्थ तामस तें ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे निश्चय आपुला । पाहिजे लाविला कसावरी ॥ ४ ॥

२६६ (१०) २०–२२

कर्तव्यबुद्धीनें प्रत्युपकाराची । भावना न चित्तीं ठेऊनियां ॥ १ ॥
देश, काल, पात्र, पाहूनि जें दान । सात्विक तें जाण धनंजया ॥२॥
प्रत्युपकारार्थ अथवा फलोद्देशें । दान बहु क्लेशें राजस तें ॥ ३ ॥
अदेशीं, अकाळीं, अपात्रीं जें दान । सत्कारविहीन तुच्छबुद्ध्या ॥
दानासी त्या ज्ञाते म्हणताती तामस । वासुदेव नाश म्हणे तेणें ॥

२६७ ( ११ ) २३–२४

ॐ तत्सत् ऐसा ब्रह्माचा त्रिविध । निर्देश प्रसिद्ध ज्ञात्यांमाजी ॥१॥
नामनिर्देशें त्या विप्र वेद यज्ञां । निर्मूनियां ब्रह्मा रमला पूर्वी ॥ २ ॥
म्हणूनि ॐकार उच्चारूनि यज्ञ । क्रिया, तप, दान, विधानोक्त ॥
घडताती क्रिया वेदज्ञ विप्रांच्या । वासुदेव त्यांचा चरणरज ॥ ४ ॥

२६८ ( १२ ) २५–२६

मोक्षेच्छु तत्शब्दें आसक्तीरहित । करिती विविध यज्ञ, दानें ॥१॥
तेंवी निष्ठायुक्त करिती तपश्चर्या । तत्शब्द हे वीरा, ऐसा श्रेष्ठ ॥
अस्तित्व या अर्थी अथवा साधुत्वीं । सत्शब्द योजिती कुंतीपुत्रा ॥
प्रशस्तकर्मांत तैसाचि सत्शब्द । म्हणे वासुदेव उपयोजिती ॥ ४ ॥

२६९ ( १३ ) २७–२८

यज्ञ, दान, तपामाजी ही जे निष्ठा । योजिती सत्शब्दा तया ठाईं ॥
यज्ञ, दान, तपास्तव जें जें कर्म । म्हणताती सत्कर्म तयालागीं ॥
अश्रद्धेनें हुत, दत्त, तप्ततप- । अथवा जें जें कृत अश्रद्धेनें ॥ ३ ॥
असत् शब्द तया पार्था योजिताती । इह-परत्रही निरर्थका ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे श्रद्धा हेचि शक्ति । मूर्तिमती मुक्ति जाणा श्रद्धा ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगोनाम सप्तदशोऽध्यायः

---

## गीता अध्याय १८ वा

अध्याय ४२ वा २७० ( १ ) १–२

पार्थ म्हणे कृष्णा, तत्त्व संन्यासाचें । सांगें यथार्थत्वें मजलागीं ॥
त्यागाचेंही तेंवी पृथग्भावें तत्त्व । हृषीकेशा, मज निरूपावें ॥ २ ॥
कृष्ण म्हणे काम्यकर्मांचा जो न्यास । म्हणती तो संन्यास कोणी ज्ञाते
सर्वकर्मफलत्याग तोचि त्याग । बोलती पंडित ऐसें कोणी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे दोन्हीही हे पक्ष । दिसती एकरूप त्यागभावें ॥ ५ ॥

२७१ ( २ ) ३-४

बंधकत्वें दोष सर्वेही कर्मातें। यास्तव कोणी तें म्हणती त्याज्य ॥
यज्ञ, दान, तप, त्याज्य तें नव्हेचि। कोणी कथिताती ज्ञाते ऐसें ॥
त्याग संन्यास तो मानूनियां एक। कथिती भगवंत निर्णयातें ॥३॥
नरव्याघ्रा, त्याग जाणावा त्रिविध। वासुदेव स्पष्ट कथितो ऐका ॥

२७२ ( ३ ) ५-६

यज्ञ, दान, तप, अवश्य करावें। त्याज्य न मानावें तया कर्मा ॥१॥
अनासक्तचित्तें घडतां तीं पावन। करिताती जाण निश्चयानें ॥ २ ॥
कर्तृत्वाभिमान तैंवी फलासक्ति। सोडूनीच तींही आचरावीं ॥ ३ ॥
निश्चित हा माझा उत्तम निर्णय। सांगे वासुदेव कृष्णोक्ति ते ॥ ४ ॥

२७३ ( ४ ) ७-९

नित्यकर्मांचा न त्याग उपपन्न। त्याग मोहपूर्ण तामस तो ॥ १ ॥
जाणूनियां दुःख, कायक्लेशभीति। धरूनियां चित्तीं त्यजितां कर्म ॥
राजस त्या त्यागें त्यागफललाभ। न घडेचि देख कदाकाळीं ॥३॥
नित्यकर्म निजकर्तव्य मानूनि। आसक्ति सोडूनि फलाशा तैं ॥४॥
करितां सात्विकत्याग तो जाणावा। बोध वासुदेवा रुचे बहु ॥ ५ ॥

२७४ ( ५ ) १०

काम्यादि कर्मांचा न करीचि द्वेष। नसेचि आसक्त नित्यकर्मीं ॥१॥
नित्यकर्म संग-फलाशा त्यजूनि। रमे जो सत्कर्मी सर्वकाल ॥ २ ॥
आत्मानात्मबोधा कारण जें सत्व। होऊनि तद्युक्त शंकाहीन ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ऐसा सुसंस्कृत-। चित्त, नैष्कर्म्यास प्राप्त होई ॥ ४ ॥

२७५ ( ६ ) ११-१२

देहाचि मी ऐसें मानी जो तयासी। अशेषकर्में तीं सुटतीचिना ॥
परी कर्मफलत्यागेंचि अर्जुना। 'त्यागी' ऐसी संज्ञा तया प्राप्त ॥
अनिष्ट इष्ट कीं मिश्र हें त्रिविध। फल मरणोत्तर गौण त्यागें ॥ ३ ॥
परी ज्ञाता मुख्य त्यागी जो तयातें। कदा तें न बाधे मुक्ताप्रति ॥
अज्ञाचा जो फलत्यागरूपन्यास। गौण तो संन्यास मुख्य नव्हे ॥

ऐसा त्याग-संन्यास तो एकरूप । पंडितोक्त भेद आभास ते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गौण, मुख्य ऐसे । भेद संन्यासाचे त्यागचि ते ॥७॥

२७६ ( ७ ) १३–१४

सर्वकर्मसिद्धीस्तव, जयामाजीं- । कर्मांची समाप्ति, वेदांतीं, त्या ॥
कथिलीं जीं पंचकारणें तीं ऐक । वीरश्रेष्ठा, बोध घेई त्यांचा ॥ २ ॥
शरीर तें कर्ता, श्रोत्रादि इंद्रियें । चेष्टा पृथग्भावें प्राणादींच्या ॥ ३ ॥
चार हीं कारणें कथी वासुदेव । पंचम तें दैव आदित्यादि ॥ ४ ॥

२७७ ( ८ ) १५–१६

शरीर, वाणी वा मनानें जें कर्म । धर्म्य वा अधर्म्य मनुज करी ॥१॥
अधिष्ठानादि ते हेतु तया पंच । जाणावे सर्वत्र सर्वकर्मां ॥ २ ॥
ऐसेंही असूनि केवळ मी कर्ता । ऐसें जो सर्वथा मानीतसे ॥ ३ ॥
अकृतबुद्धि तो जाणावा दुर्मति । वासुदेवा त्याची कींव येई ॥ ४ ॥

२७८ ( ९ ) १७–१८

कर्तृत्वाहंकार, पापभयलेप । नसेचि जयास कदाकाळीं ॥ १ ॥
सर्वप्राणिवध करूनिही बंध । नसेचि तयास अकर्ता तो ॥ २ ॥
ज्ञान, ज्ञेय, ज्ञाता, सामग्री हे त्रिधा । कर्मालागीं पार्था, प्रेरक ते ॥
करण, कर्म, कर्ता, संग्रह त्रिविधा । वासुदेव ऐसा बोध कथी ॥ ४ ॥

२७९ ( १० ) १९–२२

कापीलशास्त्रींचा ज्ञान, कर्म, कर्ता । गुणभेद ऐसा ऐका आतां ॥१॥
विभक्त या सर्वभूतांमाजी एक । अव्यक्त अविभक्त आत्मवस्तु- ॥ २ ॥
पाहतो, ज्या ज्ञानें जाणें तें सात्विक । अर्जुना, राजस पुढती ऐकें ॥
सर्वभूतांमाजी पृथग्भावें नाना । वस्तु जया ज्ञाना राजस तें ॥ ४ ॥
व्यक्ति-मूर्तींत कीं पूर्णभावें युक्त । तत्वार्थरहित युक्तिशून्य ॥ ५ ॥
तेणेंचि अत्यल्प ज्ञान तें तामस । सांगे वासुदेव कृष्णवाणी ॥ ६ ॥

२८० ( ११ ) २३–२५

फलेच्छारहित, रागद्वेषहीन । अनासक्तकर्म नियतचि जें ॥ १ ॥
सात्विक तें, साहंकार कामेच्छूचें- । कर्म, सायासाचें राजसचि ॥

परिणाम, शक्तिक्षय, प्राणिहिंसा । तेंवी न चिंतितां स्वसामर्थ्य ॥
अविवेकानेंचि आरंभ जयाचा । वासुदेववाचा तामस तें ॥ ४ ॥

२८१ ( १२ ) २६–२७

त्यागिली आसक्ति न म्हणेचि मी मी । धृत्युत्साह मनीं नित्य ज्याच्या
सिद्धि असिद्धीनें निर्विकारचित्त । कर्ता तो सात्विक म्हणती ज्ञाते
आसक्त जो कर्मफलेच्छु तें लुब्ध । अशुचि हिंसात्मक कर्मे करी ॥
हर्ष-शोकयुक्त राजस तो कर्ता । दिसे नाश त्याचा, वासुदेवा ॥४॥

२८२ ( १३ ) २८–२९

अयुक्त जो मूढ, उद्धत, मायावी । परवृत्तिछेदी, आळशी तें ॥ १ ॥
दीर्घसूत्री तेंवी खेद ज्या सर्वदा । तामस तो कर्ता महाबाहो ॥ २॥
बुद्धि धृतीचेही गुणकृत भेद । त्रिविध प्रसिद्ध कथितों तुज ॥ ३ ॥
सर्वही निःशेष ऐक ते विवेकें । वासुदेव हर्षे गाई तेंचि ॥ ४ ॥

२८३ ( १४ ) ३०–३२

प्रवृत्ति-निवृत्ति तेंवी कार्याकार्य । जाणे भयाभय बंधमोक्ष ॥ १ ॥
अंतःकरण जें पार्था, तेंचि बुद्धि । जाणावी सात्विकी निश्चयानें ॥२॥
धर्माधर्म, कार्याकार्याचा निश्चय । न घडे ते होय राजसबुद्धि ॥३॥
अज्ञानाच्छन्ना जे अधर्मासी धर्म । मानी सर्वज्ञान विपरीतचि ॥ ४ ॥
तामसी ते बुद्धि जाणावी अर्जुना । वंदी त्या चिद्धना वासुदेव ॥ ५ ॥

२८४ ( १५ ) ३३–३५

धारणा जे योगबळें ब्रह्मैक्यानें । प्राणेंद्रियकर्मे मनाचीं हीं ॥ १ ॥
करी जे धारण सात्विक ते धृति । पार्थासी निवेदी यदुश्रेष्ठ ॥ २ ॥
धृतीनें ज्या धर्म, काम, तेंवी अर्थ- । धारणा, हे पार्थ, होत असे ॥
त्या त्या वेळीं चित्तीं धरी फलाकांक्षा । राजसी ते पार्था, धृति जाण
निद्रा, भय, शोक, विषाद तें मद । न त्यागी पुरुष दुर्बुद्धीचा ॥५॥
धृतीनें ज्या, तेंचि जाणावी तामसी । भय तें न चित्तीं वासुदेवा ॥

२८५ ( १६ ) ३६–३७

आतां त्रिविध तें पार्था, ऐकें सुख । अभ्यासें जयांत रमतो प्राणी ॥
निश्चयेंचि जेणें होतसे दुःखान्त । पार्था, हें ध्यानांत नित्य असो ॥

सुख जें प्रारंभीं भासे विषासम । अमृतासमान परी अंतीं ॥ ३ ॥
तैसें जें स्वबुद्धिप्रसादेंचि लाभे । वासुदेव सांगे सात्विक तें ॥ ४ ॥

२८६ ( १७ ) ३८-३९

विषयइंद्रियसंयोगें ज्या जन्म । अमृतासमान प्रारंभीं जें ॥ १ ॥
विषासमचि जें परिणामीं होई । राजस तें पाहीं सुख पार्था ॥ २ ॥
आदि-अंतीं मोहकारक आत्म्यासी । निद्रा, आलस्य तें प्रमादोत्थ ॥
तामस तें सुख अर्जुना, प्रसिद्ध । वासुदेवा शुद्ध दुःखचि तें ॥ ४ ॥

२८७ ( १८ ) ४०-४२

ऐशा या प्रकृतिगुणावीण लोकीं । अथवा न स्वर्गी प्राणी कोणी ॥
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य तैं शूद्रांचीं । कर्में प्रविभक्त तीं प्राक्कर्मानें ॥
शम, दम, तप, आर्जव तें शौच । विज्ञान, आस्तिक्य, ज्ञान, क्षमा ॥
स्वभावजन्य हें ब्राह्मणांचें कर्म । वासुदेव धर्म पुढती सांगे ॥ ४ ॥

२८८ ( १९ ) ४३-४५

शौर्य, तेज, धृति, दाक्ष्य, अपलायन । प्रभुत्व तें दान क्षात्रकर्में ॥१॥
कृषि, गोरक्षण तसेंचि वाणिज्य । कर्म स्वभावज वैश्यांचें हें ॥ २ ॥
सेवारूपी कर्म जाणावें शूद्राचें । स्वकर्ममग्नातें सिद्धिलाभ ॥ ३ ॥
स्वकर्मानिमग्ना सिद्धि लाभे कैसी । वासुदेव कथी तेंचि ऐका ॥४॥

२८९ ( २० ) ४६-४७

जयापासूनि हे भूतोत्पत्ति पार्था । व्यापी सर्व जगा तयाप्रति ॥ १ ॥
पूजूनि स्वकर्में नर पावे सिद्धि । पात्रता ज्ञानाची सिद्धि तेचि ॥ २ ॥
सदोषहि स्वधर्मचि श्रेयस्कर । सुअनुष्ठित परधर्माहूनि ॥ ३ ॥
वर्णाश्रमधर्मनियत जें कर्म । आचरिती जन निर्दोष ते ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्वस्वकर्में नर । आपुला उद्धार करूनि घेई ॥ ५ ॥

२९० ( २१ ) ४८-४९

जन्मसिद्ध कर्म असतांही सदोष । त्यागूं नये दोष मानूनियां ॥ १ ॥
धूमानें जैं अग्नि तैंवी सर्वकर्में । दोषाच्छन्न जाणें जगामाजी ॥ २ ॥
पुत्रदारादिकीं अनासक्तचित्त । जितात्मा निरिच्छ सकलभोगीं ॥

यथार्थदर्शनस्वरूप संन्यासें । श्रेष्ठ नैष्कर्म्यातें प्राप्त होई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सम्यग्दर्शनें कीं । तद्युक्तंन्यासेंचि सद्योमुक्ति ॥ ५ ॥

२११ ( २२ ) ५०-५१

पार्था, ज्ञाननिष्ठायोग्यता जयासी । तया ब्रह्मप्राप्ति परिसें कैंवी ।
संक्षेपें कथितों निश्चयें ती जाण । पराकाष्ठा पूर्ण ज्ञानाची ते ॥ २ ॥
विशुद्धबुद्धीनें होऊनियां युक्त । इंद्रियसंघात देहासवें-॥ ३ ॥
संयमूनि, राग-द्वेष तैं विषय- । त्यागूनियां सर्व शब्दादि ते ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अन्यही साधनें । ज्ञात्याचीं प्रेमानें कथितों ऐका ॥

२१२ ( २३ ) ५२-५३

आवडे एकान्त तैंवी लघ्वाहार । संयत शरीर, वाणी मन ॥ १ ॥
तत्पर जो नित्य ध्यानयोगामाजी । इहपर भोगीं विरक्त जो ॥ २ ॥
अहंकार, वल, मद, काम, क्रोध । इष्ट परिग्रह तोही त्यागी ॥ ३ ॥
ममत्व सोडूनि सर्वदा जो शांत । होई तो समर्थ ब्रह्मभावा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा निर्विकार । ज्ञानी जो साचार ब्रह्मरूप ॥ ५ ॥

२१३ ( २४ ) ५४-५५

ब्रह्मभूत ऐसा निजानंदीं मग्न । इच्छा शोक जाण नसती तया ॥१॥
सर्वांभूतीं समा तया श्रेष्ठ भक्ति । लाभते हें चित्तीं असो पार्था ॥२॥
भक्तीनें यथार्थ जो वा जेवढा मी । प्रवेशे जाणूनि मजमाजी तो ॥३॥
वासुदेव म्हणे प्रवेशचि ज्ञान । नव्हेचि तें भिन्न धनंजया ॥ ४ ॥

२१४ ( २५ ) ५६-५७

केवळ माझाचि आश्रय जयातें । करितांही कर्मातें नित्य सर्व ॥ १ ॥
मम प्रसादें त्या अव्यय शाश्वत । पद होई प्राप्त निश्चयेंसी ॥ २ ॥
सर्वकर्मे पार्था, विवेकें मजसी । अर्पूनियां मीचि श्रेष्ठ मानीं ॥ ३ ॥
बुद्धियोगाश्रय करूनि सतत । मजमाजी चित्त ठेवीं बापा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सर्वदा मच्चित्त-। होई, हाचि श्रेष्ठ बोध असे ॥ ५ ॥

---

१ सम्यग्दर्शनयुक्त.

२९५ ( २६ ) ५८–६०

होतांचि मच्चित्त पार्था, मत्प्रसादें। लंघिसी निमित्तें संसाराचीं ॥
अहंकारें माझें ऐकसी न जरी। विनाशचि तरी पावसील ॥ २ ॥
अहंभावें युद्ध न करीं मी ऐसें। वदसी घडेल तें सर्व मिथ्या ॥३॥
क्षत्रियस्वभाव हेचि त्वत्प्रकृति। भागचि तुजसी पाडील तें ॥ ४ ॥
स्व-स्वभावसिद्ध कर्में तूं निबद्ध। मोहें स्वकर्मास इच्छिसी ना ॥
परी करिसील पराधीनत्वेंचि। वासुदेव हेचि म्हणे माया ॥ ६ ॥

२९६ ( २७ ) ६१–६२

अर्जुना, ईश्वर वसे सर्वां भूतीं। यंत्रारूढां जैंवी फिरवी यंत्र ॥ १ ॥
तैसें तत्तत्कर्मीं भ्रमवी हा भूतां। कर्ता-करविता तोचि एक ॥ २ ॥
तयासीच सर्वभावें जा शरण। मस्तक ठेऊन चरणांवरी ॥ ३ ॥
प्रसादें तयाच्या श्रेष्ठ शांतिस्थान। शाश्वत तें जाण पावसील ॥
वासुदेव म्हणे भवबंधच्छेद। करील गोविंद कृपालेशें ॥ ५ ॥

२९७ ( २८ ) ६३

ऐसें गुह्यांमाजी गुह्य। कथिलें ज्ञान पार्था, तुज ॥ १ ॥
पूर्ण विचार तूं याचा। निजांतरीं करीं बापा ॥ २ ॥
मग इच्छिसील जैसें। अर्जुना, तूं करीं तैसें ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे पूर्ण-। विश्वासें, हें वदला कृष्ण ॥ ४ ॥

२९८ ( २९ ) ६४–६६

सर्व गुह्यांहूनि गुह्य परम वच। कथितों हितप्रद परमप्रिया ॥ १ ॥
होऊनि मन्मना तैंवी मद्भक्तचि। पूजा करीं माझी वंदीं मज ॥ २ ॥
तेणें मत्प्रिया तूं मजचि पावसी। प्रतिज्ञा हे माझी सत्य सत्य ॥३॥
सर्वधर्माधर्म त्यजूनियां मज। शरण एकासीच येईं सख्या ॥ ४ ॥
सर्वपापविनिर्मुक्त मी तुजसी। करीन क्षणींचि न करीं शोक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वयें नारायण। अभयवचन भक्तां देई ॥ ६ ॥

२९९ ( ३० ) ६७–६८

तपश्चर्याहीना न कथीं हें कदा। तैसेंचि अभक्ता कदाकाळीं ॥ १ ॥
देव, गुरूंची जो न करी शुश्रूषा। असूयक माझा, न कथीं त्यासी ॥

परम हें गुह्य मद्भक्तां जो कथी । करूनियां माझी दृढ भक्ति ॥ ३ ॥
मज ईश्वरा तो पावतो निश्चयें । वासुदेव भावें गीता गाई ॥ ४ ॥

३०० ( ३१ )　६९–७०

संप्रदायकर्त्या तयाहूनि कोणी । प्रिय न या जनीं अन्य मज ॥ १ ॥
प्रियतर तयाहूनि अन्य कोणी । होणारही नाहीं पृथ्वीवरी ॥ २ ॥
आमुचा जो कोणी संवाद हा धर्म्य । अभ्यासील जाण पठणें नित्य
पूजितो तो मज ज्ञानयज्ञें पार्था । सुलभ हा पंथा वासुदेवा ॥ ४ ॥

३०१ ( ३२ )　७१–७२

श्रद्धावंत तैंवी असूयारहित । ऐके तोही मुक्त वीरश्रेष्ठा ॥ १ ॥
पुण्यवंतांचे त्या बहु शुभलोक । लाभताती देख याचि पुण्यें ॥ २ ॥
एकाग्रचित्तें हें ऐकिलेंसी काय । झाला नष्ट काय मोह सांगें ॥३॥
वासुदेव म्हणे अज्ञानसंभूत । मोह ज्ञानेंचि तो नष्ट होई ॥ ४ ॥

३०२ ( ३३ )　७३–७४

पार्थ म्हणे मोह जाहला विनष्ट । आतां जाण मज निःसंदेह ॥ १ ॥
प्रसादेंचि तुझ्या लाभली हे स्थिति । पाळीन वचनासी तुझ्या प्रभो
संजय रायासी बोलला यापरी । संवाद श्रीहरि-अर्जुनांचा ॥ ३ ॥
रोमहर्षण हा अद्भुत ऐकिला । पुनित जाहला वासुदेव ॥ ४ ॥

३०३ ( ३४ )　७५–७७

व्यासप्रसादें हें श्रेष्ठ । गुह्य ऐकिलें मी स्पष्ट ॥ १ ॥
योगयोगेश्वर कृष्ण । स्वयें करितां निवेदन ॥ २ ॥
अद्भुत हें पुण्यप्रद । स्मरणें वारंवार मोद ॥ ३ ॥
पुनःपुन्हां आठवूनि । अद्भुत तें रूप मनीं ॥ ४ ॥
वाटे विस्मय परम । हर्षें कोंदलें गगन ॥ ५ ॥
ऐसा हर्ष संजयासी । वासुदेव वंदी त्यासी ६ ॥

३०४ ( ३५ )　७८

जेथ योगेश्वर हरि । तैंवी पार्थ धनुर्धारी ॥ १ ॥
विजयश्री, वैभव तेथें । अचलनीति, न्याय, नांदे ॥ २ ॥

संजयाचा हा सिद्धान्त । असो सर्वदा ध्यानांत ॥ ३ ॥
होवो संतुष्ट श्रीरंग । झाले गीतेचे अभंग ॥ ४ ॥
चरणकमलीं त्याच्या नित्य । भृंग गुंजन करोत ॥ ५ ॥
विनवी वासुदेव देवा । नित्य चरणीं ठाव द्यावा ॥ ६ ॥

इतिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगोनाम अष्टादशोऽध्यायः

श्रीमद्भगवद्गीता समाप्त

---

## भीष्मवधपर्व ४

अध्याय ४३ वा ३०५

साक्षात्पद्मनाभमुखपद्मांतूनि । आविर्भूत वाणी जाहली जे ॥ १ ॥
पठण तियेचें व्हावें सर्वकाल । शास्त्रांचा विस्तार व्यर्थ सर्व ॥ २ ॥
सर्वशास्त्रमयी गीता हे जाणावी । सर्वदेवमयी हरिमूर्ति ॥ ३ ॥
जाणावी ते गंगा सर्वतीर्थमयी । तैंवी वेदमयी मनुस्मृति ॥ ४ ॥
गीता, गंगा तैंवी गायत्री, गोविंद । गकार हे चार मोक्षदाते ॥ ५ ॥
भारतामृताचें नवनीत गीता । अमृतचि पार्था पाजियेलें ॥ ६ ॥
वैशंपायन तें जनमेजया कथी । वासुदेव तेंचि प्रेमें गाई ॥ ७ ॥

३०६

गीतार्थ ऐकूनि बोले धनंजय । करीन मी सर्व कथिसील तें ॥ १ ॥
केशवासी ऐसें बोलतांचि पार्थ । होई वाद्यनाद सेनेमाजी ॥ २ ॥
दिशा, उपदिशा निनादूनि जाती । इंद्रादिक येती अंतरिक्षीं ॥ ३ ॥
इतुक्यांत धर्म काढूनि कवच । त्यागूनियां रथ पुढती जाई ॥ ४ ॥
शत्रुसैन्यामाजी प्रवेशला मौनें । पाहोनि पार्थानें त्वरा केली ॥ ५ ॥
बांधवांसमेत जाई मागोमाग । वीरही प्रमुख कृष्णासवें ॥ ६ ॥
पार्थ म्हणे राया, काय हें करिसी । सर्वही धर्मासी वदती तेंचि ॥

कृष्ण म्हणे धर्म, गुरूंसी वंदून । करील संग्राम, विजय तेणें ॥ ८ ॥
कौरवसैनिक वस्त्रें फडकाविती । धर्मासी निंदिती म्हणती भ्याड
वासुदेव म्हणे भीष्मांसी वंदूनि । आशीर्वादवाणी मागे धर्म ॥१०॥

३०७

भीष्म म्हणे धर्मा, अनुज्ञा मागसी । माला विजयाची तेणें तुज ॥१॥
न येतासी तरी शाप प्राप्त होता । प्रसन्न मी वत्सा, वर मागें ॥२॥
पुरुप अर्थाचा दास धर्मराजा । अर्थ न कोणाचा दास जनीं ॥ ३ ॥
मज वृद्धालागीं सांभाळिलें यांनीं । पक्ष हा सोडूनि कैसा जाऊं ॥
तथापि जे इच्छा युद्धावीण अन्य । धर्मा, ती मागून घेई आतां ॥
धर्म म्हणे सदा इच्छा कल्याणाची । धरावी मानसीं हेंचि देई ॥६॥
कैसा तव वध होईल तें सांगें । जोडूनि करांतें प्रार्थना ही ॥ ७ ॥
भीष्म म्हणे काल पातला न माझा । रणीं कोण ऐसा वधिल मातें
वासुदेव म्हणे भीष्म कथी धर्मा । भेटें याचि कर्मा पुनरपि ॥ ९ ॥

३०८

मानूनि वचन वंदिलें भीष्मांसी । धर्म द्रोणांप्रति कर जोडी ॥ १ ॥
आशीर्वाद त्यांचा घेऊनियां पुशी । कैंवी अजिंक्यांसी जिंकू तुम्हां
द्रोण म्हणे शस्त्र जोंवरी करांत । तोंवी संज्ञायुक्त अवध्य मी ॥ ३ ॥
श्रद्धेयवचनें अप्रिय वृत्तांत । कळतां कार्यसिद्ध होई तुझें ॥ ४ ॥
वंदूनि तयांसी भेटे कृपाचार्यां । पाहूनि आचार्यां, कंठ दाटे ॥ ५ ॥
कृप म्हणे इच्छा जाणियेली धर्मा । अवध्य मी, तुम्हां विजय लाभो
प्रातःकाळीं नित्य आशीर्वाद हाचि । देईन तुम्हांसी मनोभावें ॥७॥
पुढती शल्यासी कार्याचें स्मरण-। देई, जेणें कर्णतेजोभंग ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णसांवळा । भेटूनि कर्णाला वदला ऐका ॥९॥

३०९

कृष्ण म्हणे कर्णा, भीष्मवधावधि । येऊनि आम्हांसी साह्य होई ॥
समदृष्टि तेणें होईल वा सिद्ध । कर्ण म्हणे शुद्ध अधर्म हा ॥ २ ॥
दुर्योधनास्तव त्यागीन मी प्राण । अप्रिय वर्तन न घडे कदा ॥ ३ ॥
उच्चस्वरें धर्म बोले सकलांसी । इच्छितां साह्यासी येवो कोणी ॥

ऐकूनि युयुत्सु पुढती पातला । धर्म म्हणे कुळा आधार तूं ॥ ५ ॥
पितृतर्पणासी वांचशील एक । इतरांचा नाश स्पष्ट असे ॥ ६ ॥
दुंदुभीचा नाद करूनि युयुत्सु । धर्मविजयेच्छु मिळे धर्मा ॥ ७ ॥
कवच, धनुष्यें, शोभे युधिष्ठिर । जाहला सत्कार पांडवांचा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुग्धधवल शंख- । नाद, गगनांत घुमला तदा ॥९॥

अध्याय ४४ वा ३१०

उभयहि सैन्यें सन्निध पातलीं । आरोळी ठोकिली भीमसेनें ॥ १ ॥
मत्त, वलिवर्द, भासला सेनेतें । भय कौरवांतें मृगांसम ॥ २ ॥
सूर्याआड मेघ तैसें शरजाल । येई भीमावर कौरवांचें ॥ ३ ॥
पांडववीरांनी विछिन्न तें केलें । समर जुंपलें उभयांमाजी ॥ ४ ॥
पांडव स्मरती कौरवांचीं पापें । कौरवां भीमाचें बालपण ॥ ५ ॥
आपपरभाव न स्मरे कोणासी । भीष्म अग्रभागीं शोभतसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वैर पांडवांचें । मूळ त्या भीमाचें बाळपण ॥ ७ ॥

अध्याय ४५ वा ३११

पूर्वाण्हसमयीं महाघोर युद्ध । रणवाद्यनाद गगनभेदी ॥ १ ॥
शूरांच्या गर्जना, सैनिकांचा शब्द । ठाकती रोमांच अंगावरी ॥ २ ॥
प्राणावरी झाले उदार कौरव । जाहलीं निष्ठुर मनें त्यांचीं ॥ ३ ॥
भीष्म पार्थाप्रति पार्थही तयांसी । ताडितां न होती व्यथित कोणी
सात्यकि-कृतवर्मा शोभके पलाश । अभिमन्यु-बृहद्वल लढती शौर्यें
भीमसेन धांवे दुर्योधनावरी । येई नकुळावरी दुःशासन ॥ ६ ॥
दुर्मुख-सहदेव, धर्म-मद्रपति । धृष्टद्युम्न लक्षी द्रोणांलागीं ॥ ७ ॥
सौमदत्ति-शंख संग्राम करिती । धृष्टकेतु वेधी बाल्हिकासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दैत्य अलंवुष । वीर घटोत्कच झोडी तया ॥ ९ ॥

३१२

अश्वत्थाम्यावरी शिखंडी धांवला । विराटें वेधिला भगदत्त ॥ १ ॥
कृप-बृहत्क्षत्र, द्रुपद-जयद्रथ । विकर्ण-सुतसोम्यांत रण माजे ॥ २ ॥
सुशर्म्यावरी तो चेकितान जाई । प्रतिविंध्या पाही शकुनि क्रोधें ॥

सुदक्षिणावरी धांवे श्रुतकर्मा । ताडी इरावाना श्रुतायु तो ॥ ४ ॥
विंदानुविंद ते ससुत कुंतिभोजां । गांधार-कैकयां समर होई ॥ ५ ॥
वीरबाहु झुंजे विराटपुत्रासी । उलूक-चेदिपति करिती युद्ध ॥ ६ ॥
प्रेक्षणीय रण घोररूप घेई । वीरावरी जाई वीर क्रोधें ॥ ७ ॥
अश्व, गज, रथ, पदाति तें वीर । युद्ध परस्पर करिती शौर्ये ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे देव-दानवांचें- । युद्धचि, तें भासे देवादिकां ॥ ९ ॥

अध्याय ४६ वा

३१३

सूत म्हणे नृपा, युद्ध घनघोर । जाहला सचार वीरांमाजीं ॥ १ ॥
पुत्र, पिता, बंधु, भ्राता, भागिनेय । सखा, तें मातुल न म्हणे कोणी
वीरांवरी वीर रथांवरी रथ । गजाघातें गज करिती शब्द ॥ ३ ॥
गजरक्षक ते सशस्त्र धांवती । रक्तलांछित तीं दिसती खड्गें ॥४॥
छिन्नभिन्न अश्व, गज ते पदाति । भग्न शस्त्रें किती विखुरलीं ॥५॥
नवमेघवर्ण सुवर्णभूषित । तुडविती मत्तगज अश्वां ॥ ६ ॥
तैसेचि कित्येक अश्वसादी वीर । ओढिती फरफर श्रेष्ठ गज ॥७॥
पाणी पाणी ऐसें ओरडती कोणी । पांडवसेनानी भिडती भीष्मा ॥
वासुदेव म्हणे तारकासंयुक्त । रौप्यस्तंभीं ध्वज गांगेयाचा ॥ ९ ॥

अध्याय ४७ वा

३१४

राया, अपराण्हकाळीं । महाघोर वेळ आली ॥ १ ॥
अभिमन्यु पुढती झाला । पितामहासी भिडला ॥ २ ॥
संरक्षक कृतवर्मा-। शल्य, वेधिला त्या क्षणा ॥ २ ॥
नव बाणें प्रपितामहा । वेधी, तोच परवीरहा ॥ ४ ॥
बाळावरी येती शर । छेदूनि तो रणीं स्थिर ॥ ५ ॥
गर्जूनियां भीष्मध्वज । तोडी, भीम करी नाद ॥ ६ ॥
आले विराट, सात्यकि । महा वीर तें साह्यासी ॥ ७ ॥
भीष्में ध्वज तें भीमाचा । तोडितांचि नाद मोठा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । सोडी घोर तीन बाण ॥ ९ ॥

३१५

विराटाचा पुत्र होता गजारूढ । शल्यावरी धांव शौर्यें घेई ॥ १ ॥

निवारण त्याचें नाहींच जाहलें। अश्व नष्ट केले मत्त गजें ॥ २ ॥
अश्वहीनरथीं बैसूनि शल्यानें। ताडिलें शक्तीनें उत्तरासी ॥ ३ ॥
शक्त्याघातें वीर पावला पंचत्व। करी शुंडाभेद शाल्व तेव्हां ॥
पाहूनि तें श्वेत उत्तराचा भ्राता। धांवे शल्याघाता परमक्रोधें ॥
जयद्रथादिक तया सप्त योद्धे। अडवूनि वेगें करिती युद्ध ॥ ६ ॥
चापभंग त्यांचा करी विद्युद्वेगें। अश्व, रथ, त्यांचे छेदियेले ॥ ७ ॥
रुक्मरथालागीं पाडूनि मूर्छित। शल्यावरी श्वेत धांविन्नला ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शल्याचा सांभाळ। धांवूनियां वीर करिती बहु ॥

अध्याय ४८ वा

२१६

सूत म्हणे राया, तयावेळीं भीष्म। करिती संग्राम घनघोर ॥ १ ॥
सूर्य विक्रमी तो आच्छादी सूर्यासी। अनेक वीरांसी स्वर्ग दावी ॥
रथांवरी रथ आपटती किती। प्रेतें लोंबताती अश्वांवरी ॥ ३ ॥
सहस्रावधि ते सशस्त्र प्रवीर। विछिन्न शरीर रणांगणीं ॥ ४ ॥
विव्हळती कोणी प्राण त्यागिताती। सूतांसवें रथी पडले रणीं ॥ ५ ॥
टणत्कारें वीर वीरालागीं ज्ञात। दिशा धूलिव्याप्त, न दिसे कांहीं ॥
रणवाद्यनादें शब्द न ये कानीं। अक्षत न कोणी वीर दिसे ॥ ७ ॥
संहार वीरांचा करी तदा 'श्वेत'। मारिले असंख्य वीर तेणें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीरश्रेष्ठ भीष्म। स्थिर मेरूसम एकमेव ॥ ९ ॥

२१७

श्वेतावरी भीष्म प्रहार करितां। एकाकीचि होता वीर स्थित ॥ १ ॥
पाहूनि तें धैर्य संतुष्ट गांगेय। कौरवांचें प्रिय शौर्यें करी ॥ २ ॥
एकमेकां वीर झांकिती शरानें। पृथासुतमनें खिन्न होतीं ॥ ३ ॥
गजासम मत्तवृषभगर्जना। क्षोभ त्या वीरांना व्याघ्रासम ॥ ४ ॥
भीष्म-श्वेत ऐसे लढती त्वेषानें। रक्षिलें श्वेतानें पांडवांसी ॥ ५ ॥
भीष्मपराभवें दुर्योधन क्रुद्ध। पातले साह्यास वीर त्याच्या ॥ ६ ॥
पांडवसेनेसी वधिती हें पाहून। जाई उसळून तयांवरी ॥ ७ ॥
पिटाळूनि तयां पुनरपि श्वेत। धांवोनि संतप्त अडवी भीष्मा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तोडूनि धनुष्य। पाडियेला ध्वज गांगेयाचा ॥ ९ ॥

३१८

मला, मेला, भीष्म शब्द येई ऐसा। राव म्हणे कैसा समय घोर ॥
वीरांनो, व्हा सज्ज वांचवा भीष्मांसी। वीर वाल्हिकादि धांव घेती
परी त्या नवांचें केलें निवारण। भग्नचाप भीष्म होई पुनः ॥ ३ ॥
अलौकिक ऐसें पाहूनियां कर्म। क्रोधें रणीं भीष्म नवल करी ॥४॥
ध्वज, अश्व, रथ, सारथी पाडिला। विरथ जाहला श्वेत आतां ॥
परी त्या वीरानें शक्त्याघात केला। हाहाःकार झाला रणांगणीं ॥
अष्टशरें भीष्म करिती नव भाग। बेभान तें श्वेत होई क्रोधें ॥ ७ ॥
तत्काळ तयानें गदाघात केला। भूमीवरी आला पितामह ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वांचला गांगेय। परी चूर्ण होय स्यंदनाचें ॥ ९ ॥

३१९

झाली तदा देववाणी। 'समय विजयाचा हा मानीं' ॥ १ ॥
वीर श्वेताच्या साह्यार्थ। धांव घेती भीमादिक ॥ २ ॥
निवारण करूनि त्यांचें। भीष्म जपती ब्रह्मास्त्रातें ॥ ३ ॥
सुटतां ऐसा दिव्य बाण। घेई श्वेताचे तो प्राण ॥ ४ ॥
दुःशासन टाळ्या पिटी। भय पांडवसैन्यासी ॥ ५ ॥
जयें कौरव हर्षित। खिन्न होती केशव, पार्थ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सैन्य। गांठी आपुलालें स्थान ॥ ७ ॥

अध्याय ४९ वा

३२०

धृतराष्ट्र म्हणे संजया, श्वेताचा। वध न सौख्याचा होई मज ॥१॥
धृष्टद्युम्न, पार्थ क्रुद्ध होती तेणें। कौरवांचीं सैन्यें ग्रासितील ॥ २ ॥
दुर्योधन मूळ अनर्थासी वाटे। संजय रायातें दोष देई ॥ ३ ॥
पूर्वाण्ह संपतां पुनरपि युद्ध। शल्यावरी शंख चाल करी ॥ ४ ॥
जयद्रथादिक धांवले पुढती। रक्षिलें शल्यासी संकटीं त्या ॥ ५ ॥
गर्जूनियां भीष्म पुढती पातले। तदा संरक्षिलें पार्थें शंखा ॥ ६ ॥
पार्थरथावरी पाहूनि शंखासी। भीष्म तयाप्रति त्यजूनि जाती ॥७॥
द्रुपदसेनेची उडविती दैना। पांडवांची सेना भयग्रस्त ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रथम दिवस। लढूनि शिबिरास वीर जाती ॥ ९ ॥

अध्याय ५० वा

३२१

घेती विश्रांति सकळ । धर्मराजा दुःखाकुल ॥ १ ॥
म्हणे भीष्म महावीर । कोण टिके त्यां समोर ॥ २ ॥
नौकाहीन सागरांत । वाटे आमुचा प्रवेश ॥ ३ ॥
सैन्य पतंगासमान । सकल संहारील भीष्म ॥ ४ ॥
कृष्णा, न रुचे वीरनाश । घोर आचरीन तप ॥ ५ ॥
मार्ग कथावा हिताचा । कृष्णा धीर तूं आमुचा ॥ ६ ॥
सव्यसाची हा त्रयस्थ । न करी भीमासम युद्ध ॥ ७ ॥
करी उपेक्षा आमुची । कोण रक्षील आम्हांसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । पुशितो मार्ग खिन्नमन ॥ ९ ॥

३२२

कृष्ण म्हणे धर्मा, असावें निर्भय । नित्य तुझें प्रिय करूं आम्हीं ॥
धृष्टद्युम्न वीर सेनापति तुझा । जाणें तो भीष्मांचा साक्षात् यम ॥
धर्म म्हणे वीरा, ऐकें धृष्टद्युम्ना । चित्तीं षडानना युद्धामाजी ॥३॥
कृष्णासवें आम्हीं अनुसरूं तुज । येरु द्रोणवध करिन म्हणे ॥ ४ ॥
ऐकूनि सकलां आनंद जाहला । धर्मानें कथिला क्रौंचव्यूह ॥ ५ ॥
अन्यदिनीं प्रातःकाळीं क्रौंचारुण । रची धृष्टद्युम्न कथिल्यापरी ॥
अग्रभागीं पार्थ, शोभे त्याचा ध्वज । करी जणु नृत्य नभामाजी ॥
वासुदेव म्हणे परस्पर शोभा । येई पार्थ-ध्वजां एकमेकां ॥ ८ ॥

३२३

दाशार्णकादि ते शोभती ग्रीवेसी । धर्म पृष्ठभागीं वीरांसह ॥ १ ॥
धृष्टद्युम्न-भीम, पंख ते क्रौंचाचे । सात्यक्यादि उभे दक्षिणेसी ॥२॥
माद्रेयादि वीर होते वामभागीं । संख्या कोट्यवधि वीरांची त्या ॥
भानुउदयाची, प्रतीक्षा करिती । प्रहर्षित चित्तीं वीरश्रेष्ठ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्रौंचारुणव्यूह । रचूनि पांडव सिद्ध ऐसे ॥ ५ ॥

अध्याय ५१ वा

३२४

पाहूनियां दृढ व्यूह पांडवांचा । दुर्योधन वाचा वदला वीरां ॥ १ ॥
युद्धविशारद तुम्हीं महायोद्धे । विजय लीलामात्रें संपादाल ॥ २ ॥

भीष्मरक्षितही सेना अमर्याद । रक्षा सेनानाथ पितामह ॥ ३ ॥
व्यूह यथायोग्य रचिला भीष्मानें । मागोमाग द्रोणें गमन केलें ॥४॥
कुंतलादि वीर रक्षिती सैन्यासी । गांधारवीरादि पृष्ठभागीं ॥ ५ ॥
दुर्योधनादिक शकुनीचे व्रात । भूरिश्रव्यादि ते उभय भागां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सेना सिद्ध होतां । करिती शंखनादा उभय योद्धे ॥

अध्याय ५२ वा

३२५

दुर्योधनशब्दें सेना कौरवांची । पांडववीरांसी भिडली रणीं ॥ १ ॥
शरवर्षावानें सेना विद्ध होतां । वदला गोविंदा सव्यसाची ॥ २ ॥
देवा, भीष्मावरी चाल करूं आतां । नाश सैनिकांचा न पाहवे ॥३॥
ऐकतांचि शौरि क्षणार्धांत रथ । नेतसे समीप गांगेयाच्या ॥ ४ ॥
भीष्मावरी पार्थ येतां सैंधवादि । भीष्मासी रक्षिती दक्षतेनें ॥ ५ ॥
भीष्म-द्रोण-कृपप्रमुख वीरांनीं । ताडिलें शरांनीं पार्थालागीं ॥ ६ ॥
परी अकंपित पार्थ प्रतिकार । करोनियां शर प्रखर सोडी ॥ ७ ॥
भीमासी भीष्मानें विद्ध केलें रणीं । अशीति सोडूनि तीव्र शर ॥
वासुदेव म्हणे भीम शरविद्ध । पाहूनि आनंद कौरवांसी ॥ ९ ॥

३२६

आनंद तो कौरवांचा । पाहूनियां क्रोध पार्था ॥ १ ॥
चापक्रीडा आरंभिली । शत्रुसेना घाबरली ॥ २ ॥
दुर्योधन विनवी भीष्मा । पार्थ संहारितो सैन्या ॥ ३ ॥
तुम्हांसमक्ष हा नाश । घडतां कां ऐसें दुर्लक्ष ॥ ४ ॥
कांहीं उपाय योजावा । नाश अर्जुनाचा व्हावा ॥ ५ ॥
कर्ण माझा हितकर्ता । येईना तो रणीं युद्धा ॥ ६ ॥
येती भीष्मांचे उद्गार । क्षात्रधर्मासी धिक्कार ॥ ७ ॥
पुढती भीष्म-पार्थयुद्ध । पार्थ होई शरविद्ध ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । लढले शौर्यें परस्पर ॥ ९ ॥

३२७

ध्वजचिन्ह मात्र व्यांवर्तक[1] दिसे । जाहले इतुके एकरूप ॥ १ ॥

---

१ परस्पर भेददर्शक.

धर्मासकालागीं पापा नच थारा । तैसें परस्परां छिद्र नसे ॥ २ ॥
आच्छादित क्षणीं, क्षणांत प्रगट । होती वीरश्रेष्ठ नैपुण्यानें ॥ ३ ॥
अंतरिक्षामाजी चारण, गंधर्व । म्हणती हें अपूर्व युद्ध जगीं ॥ ४ ॥
अजिंक्य हे वीर एकमेकांप्रति । युद्ध हें कल्पांतीं पूर्ण नोहे ॥ ५ ॥
खड्ग परशुआदि प्रखर शस्त्रांनीं । वधिलीं शूरांनीं उभय सैन्यें ॥
कौरव-पांडव, धृष्टद्युम्न-द्रोण । करिती संग्राम त्याचि वेळीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्राप्रति । संजय तें कथी अवघें वृत्त ॥ ८ ॥

अध्याय ५३ वा ३२८

धृतराष्ट्र म्हणे संजया, आश्चर्य । पार्थाचें सामर्थ्य ऐकूनियां ॥ १ ॥
अजिंक्य भीष्मांसी कैसा हा अवध्य । द्रोणयुद्धवृत्त कथन करीं ॥
सूत म्हणे राजा, दारुण संग्राम । करी धृष्टद्युम्न द्रोणांसवें ॥ ३ ॥
कालदंडासम तोडूनियां शर । शक्ति महावीर ताडी द्रोणां ॥ ४ ॥
छेदितां ते शक्ति फेंकी वीर गदा । हस्तकौशल्याचा राजा द्रोण ॥
चापल्येंचि गदा फिरवी माघारी । घुसले शरीरीं द्रोणशर ॥ ६ ॥
द्रुपदसुताचें तोडिलें धनुष्य । क्षणांत विरथ केलें तया ॥ ७ ॥
तदा धृष्टद्युम्न धांवे अंगावरी । शरवृष्टि करी द्रोणगुरु ॥ ८ ॥
इतुक्यांत भीम येऊनि वीरांसी । घेई निजरथीं दक्षतेनें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीम-कलिंगाचें । घोर युद्ध साचें ऐका आतां ॥ १० ॥

अध्याय ५४ वा ३२९

पुत्र कलिंगाचा भानुमान योद्धा । भीमासवें युद्धा प्रवर्तला ॥ १ ॥
संग्राम तयानें वर्णनीय केला । भीमानें वधिला पुत्र त्याचा ॥ २ ॥
शक्रदेववधें भानुमंत क्रुद्ध । करी घोरयुद्ध भीमासवें ॥ ३ ॥
चतुर्दश फेंकी तोमरें क्रोधानें । छेदिलीं खड्गानें भीमसेनें ॥ ४ ॥
गर्जना भीमाची ऐकूनियां सैन्य । मानी असामान्य योद्धा भीम ॥५॥
गजावरी केलें भीमानें उड्डाण । वीर गतप्राण गजासवें ॥ ६ ॥

भ्रांत[1], आविद्ध[2] तैं उद्भ्रांत[3]गतीनें । प्लुत[4], उत्प्लवनें[5] लढला भीम ॥७॥
प्रसृत[6], संपात[7], समुर्दीर्ण[8] मार्गें । वैरियांचीं अंगें छेदी भीम ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे छिन्न अश्व, गज । भग्नचि पर्वत, रणभूमि ते ॥ ९ ॥

३३०

अश्वसार्दीवरी करूनि उड्डाण । घेई भीम प्राण असंख्यांचे ॥ १ ॥
कोणा लत्ताघातें, शस्त्राघातें कोणा । केवळ गर्जना कोणालागीं ॥२॥
ऊरुवेगें कोणी पाडिले रणांत । दर्शनेंचि गतप्राण कोणी ॥ ३ ॥
श्रुतायुष अंतीं कलिंग नृपाळ । सोडी नव शर भीमावरी ॥ ४ ॥
खवळला तेणें अधिकचि पार्थ । 'विशोक' तो सूत रथ आणी ॥
थांब, थांब, शब्दें रथावरी बैसे । आकर्ण चापातें ओढीतसे ॥ ६ ॥
अंतीं श्रुतायूतें पाडिलें रणांत । धाडिले रक्षक यमलोकीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अंतीं सप्तशत- । वीरां, यमलोक दावी भीम ॥ ८ ॥

३३१

महा सरोवरीं मकरासमान । शोभे भीमसेन रणामाजी ॥ १ ॥
धृष्टद्युम्न म्हणे वीर हो, व्हा सिद्ध । योग्यवेळीं युद्ध करा शौर्यें ॥
सात्यकीही येई भीमाच्या साह्यासी । केला कर्दमचि कलिंगांचा ॥
अंतक तैं भासे भीम सैनिकांसी । भीष्म अडविती अंतीं भीमा ॥
शराघातें केले अश्व गतप्राण । शक्ति सोडी भीम भीष्मांवरी ॥ ५ ॥
निष्फळ ते होतां भीष्मांचा सारथी । संहारी सात्यकि क्षणामाजी ॥
भयाकुल अश्व भीष्मां नेती दूर । कलिंगसंहार करी भीम ॥ ७ ॥
धृष्टद्युम्न निजरथीं घेई भीमा । देई आलिंगना प्रेमभरें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सात्यकि भीमासी । भेटतां तयाची द्विगुण स्फूर्ति ॥

अध्याय ५५ वा   ३३२

अश्वत्थामा, शल्य, कृपाचार्यांप्रति । लढे रणामाजी धृष्टद्युम्न ॥ १ ॥

---

१ मंडलाकृति २ फार श्रमानें मंडलाकृति फिरविणें ३ वरचेवर फिरणें ४ उड्या मारणें ५ उड्डाण करणें ६ हात पसरलेला ७ वेगयुक्त ८ तुटून पडणें.

अश्वघातें अश्वत्थामा शल्यरथीं । चढूनि वेगेंसी शर सोडी ॥ २ ॥
अभिमन्यु तदा धांवोनियां येई । युद्ध तदा होई महाघोर ॥ ३ ॥
इतुक्यांत राया, पौत्र लक्ष्मण । पातला गर्जून तयास्थानीं ॥ ४ ॥
लक्ष्मण-सुभद्रानंदनसंग्राम । पाही दुर्योधन धांव घेई ॥ ५ ॥
तयासमवेत नृपाळ असंख्य । कोंडितांही बाळ न हटे तयां ॥ ६ ॥
पाहोनि तें पार्थ वेगें धांव घेई । आकांतचि होई तदा रणीं ॥ ७ ॥
विनाश सैन्याचा पाहूनियां भीष्म । म्हणती यासी कोण अडवी रणीं
वासुदेव म्हणे अस्ताचळाप्रति । पातला गभस्ति द्वितिय दिनीं ॥

अध्याय ५६ वा ३३३

गरुडव्यूह तो भीष्में रचिला प्रभातीं ॥
स्वयें देवव्रत राही चंचुप्रदेशासी ॥ १ ॥
द्रोण-कृतवर्मा नेत्र जाहले पक्ष्याचे ॥
अश्वत्थामाकृपद्वय मस्तकीं विराजे ॥ २ ॥
ग्रीवा कैकेयादि होती, दुर्योधन पृष्ठ ॥
मागध-विंकुज पक्ष, पुच्छ शक-विंद ॥ ३ ॥
अर्धचंद्रव्यूह केला सज्ज पांडवांनीं ॥
भीम-अर्जुन ते होती अग्रभागीं दोन्हीं ॥ ४ ॥
धृष्टद्युम्नासवें धर्म मध्यभागीं शोभे ॥
वासुदेव म्हणे युद्धारंभ शंखनादें ॥ ५ ॥

अध्याय ५७ वा ३३४

केला संहार पार्थानें । भयाकुल कौरवसैन्यें ॥ १ ॥
वीर करिताती निर्धार । प्राणांतींही न माघार ॥ २ ॥
गगन आच्छन्न धुळीनें । युद्ध केवळ ध्वजचिन्हें ॥ ३ ॥
होतां शोणितसिंचन । होई निर्मल तें स्थान ॥ ४ ॥
दिसती सर्वत्र कबंधें । चिन्ह घोर विनाशाचें ॥ ५ ॥
घटोत्कचावरी राव । सेनेसवें घेई धांव ॥ ६ ॥
भीष्म-द्रोण खवळले । धनंजयही उसळे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे युद्ध । तृतिय दिनीं तें प्रसिद्ध ॥ ८ ॥

अध्याय ५८ वा ३३५

पाहूनि पार्थाचा दिव्य पराक्रम। म्हणती धन्य धन्य देव तया ॥१॥
सौभद्र, सात्यकि, विक्रम दाविती। द्रोणसेनेप्रति अडवी धर्म ॥२॥
एकाचि शरानें दुर्योधनाप्रति। संज्ञाशून्य रथीं पाडी भीम ॥ ३ ॥
सर्वत्र कौरवसेना पराभूत। जाहला सावध राव तदा ॥ ४ ॥
जाऊनियां वदे भीष्म-द्रोणादिकां। ऐसी ही उपेक्षा करितां कांहो ॥.
प्रथमचि मज कळतें हें जरी। अन्य मार्ग तरी योजितों मी ॥ ६ ॥
कर्णाच्या विचारें वागतों मी जरी। मार्ग कांहीतरीं निघता अन्य ॥
त्याग जरी माझा न करावा हे इच्छा। संग्राम शोभेसा होवो तरी ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध तदा भीष्म। म्हणे निवारीन सकलां आजी ॥

अध्याय ५९ वा ३३६

क्रुद्ध दुःखी भीष्म प्रतिज्ञा ऐकूनि। कौरवांसी मनीं हर्ष वाटे ॥ १ ॥
पश्चिमेचा मार्ग आक्रमी दिनेश। आकर्ण धनुष्य ओढी भीष्म ॥ २ ॥
महा भयंकर होई तदा रण। वीर छिन्नभिन्न असंख्यात ॥ ३ ॥
पाहिलें न पूर्वीं ऐकिलें न कोणी। समर त्या स्थानीं ऐसें होई ॥४॥
पाहतां पाहतां रुधिराचा पूर। मांसाचा चिखल होई रणीं ॥ ५ ॥
नीलपर्वत ते दिसती मृत गज। अडविले मार्ग क्षत्रियांचे ॥ ६ ॥
ये, ये, कोठें जासी संग्रामीं मी स्थित। ऐसे वीर शब्द ऐकूं येती ॥
सर्वत्रचि भासे गांगेयाचा रथ। ऐसा महावेग तया वीरा ॥ ८ ॥
अग्नीमाजी जैसा शलभांचा नाश। तैसे असंख्यात मरती वीर ॥
वासुदेव म्हणे शर वेगवान। अचुक संधान करितीं रणीं ॥ १० ॥

३३७

विक्रम तो गांगेयाचा। अवलोकी पार्थसखा ॥ १ ॥
पार्थ करी मृदु युद्ध। तेणें पांडवांचा नाश ॥ २ ॥
भीष्म देवदेव योद्धा। पाड काय पांडवांचा ॥ ३ ॥
संहारूनियां भीष्मासी। सांभाळीन पांडवांसी ॥ ४ ॥
मनीं पार्थाच्या आदर। सोडीनाचि तीक्ष्ण शर ॥ ५ ॥
चिंती यदुनाथ ऐसें। शर येती तों भीष्मांचे ॥ ६ ॥

द्रोण, विकर्णादि वीर । धांव घेती पार्थावर ॥ ७ ॥
पाहूनियां तें सात्यकि । साह्य होतसे पार्थासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । करी संग्राम दारुण ॥ ९ ॥

३३८

भयाकुल होई पांडवांची सेना । सोडूनियां रणा धांव घेई ॥ १ ॥
क्षात्रधर्म सांगे सात्यकि तयांसी । म्हणे कां रणासी त्यजूनि जातां
सेना त्यागी रण, क्रुद्ध न फाल्गुन । खवळला भीष्म कृष्णा दिसे ॥
सात्यकीसी म्हणे यदुकुलनाथ । सकल जावोत वीर सुखें ॥ ४ ॥
भीष्म-द्रोणांलागीं संहारीन आजी । पाहीं शक्ति माझी शिनिश्रेष्ठा ॥
वधूनि दुष्टांसी सुखवीन धर्मा । सर्वदा सज्जनां सुख होवो ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें बोलूनियां । रश्मी त्यागूनियां उठला कृष्ण ॥

३३९

चक्र सुदर्शन शोभे सूर्यासम करीं ॥
भक्तकाजासाठीं उडी घेई गिरिधारी ॥ १ ॥
कंपित करूनि भूमि चालला वेगानें ॥
भासे गजेंद्रासी सिंह झडपी शौर्यानें ॥ २ ॥
मेघःश्याम देहावरी पीतांबर शोभे ॥
नील मेघांवरी जैंवी विद्युल्लता लवे ॥ ३ ॥
देह सुदर्शन, बाहु कमलनाल ते ॥
चक्र अंबुज तें क्रोधसूर्यानें विराजे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे करी गर्जना मुकुंद ॥
कल्पान्तासमान तदा दिशा होति धुंद ॥ ५ ॥

३४०

अचल भीष्म म्हणे देवा । येई येई हे केशवा ॥ १ ॥
देवदेवा, जगन्नाथा । तुज नमस्कार माझा ॥ २ ॥
ओढीं मज रथाखालीं । घाव मस्तकीं या घालीं ॥ ३ ॥
कृपाहस्तें होवो वध । तेणें मुक्त मी सहज ॥ ४ ॥
शस्त्र घेऊनि आलासी । हाचि सन्मान त्रिलोकीं ॥ ५ ॥

इतुक्यांत येई पार्थ । वेगें कवटाळी कृष्णास ॥ ६ ॥
परी क्रोध अनावर । ओढी कृष्ण त्या फरफर ॥ ७ ॥
दशमपादीं पार्थवीरें । अधोक्षजासी अडवीलें ॥ ८ ॥
वंदूनियां म्हणे देवा । क्रोध आतां आंवरावा ॥ ९ ॥
तुझ्या आज्ञेनें प्रतिज्ञा । करीन मी सत्य प्राज्ञा ॥ १० ॥
वासुदेव म्हणे पार्थ । विनवी घेऊनि शपथ ॥ ११ ॥

३४१

कौरवांचा वध करीन निश्चयें । ऐसें धनंजयें वचन दिलें ॥ १ ॥
प्रार्थप्रतिज्ञा ती ऐकूनि प्रसन्न । होई जनार्दन भक्तप्रिय ॥ २ ॥
चक्रपाणी बैसे पार्थरथावरी । धरी रश्मी करीं आनंदानें ॥ ३ ॥
दिव्य पांचजन्य फुंकिला हरीनें । कौरवांचीं सैन्यें भयाकुल ॥ ४ ॥
निजशरें झांकी पार्थ दशदिशा । अंगावरी येतां वीर बहु ॥ ५ ॥
भल्ल, शक्ति, गदा, येतां निवारण । करूनि अर्जुन अस्त्र योजी ॥६॥
महेंद्रास्त्रें अग्निबाण ते असंख्य । करिती आक्रांत सेनेमाजी ॥ ७ ॥
वैतरणीत्रमूमेद-मांस नदी । पाहूनि गर्जती पांडववीर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे झळकतां अस्त्र । जाहला सूर्यास्त तृतिय दिनीं ॥

अध्याय ६० वा ३४२

चतुर्थदिनीं तें सैन्य कौरवांचें । सज्जलें युद्धातें कुरुक्षेत्रीं ॥ १ ॥
रचियेला व्यूह अद्भुत धर्मानें । विक्रम अर्जुनें केला बहु ॥ २ ॥
भीष्मादिक तदा पार्थावरी येती । पाहूनि तयासी अभिमन्यु ॥ ३ ॥
धांव घेई तदा पित्याच्या साह्यासी । प्रदीप्त अग्नीची शोभा तया ॥
भीष्म तयावेळीं करिती शरवृष्टि । शोणिताची नदी वाहूं लागे ॥
पार्थ भीष्माप्रति आच्छादी शरांनीं । जाल तें छेदूनि भीष्म गर्जे ॥
वासुदेव म्हणे पितामह-पार्थ । द्वैरथ तें युद्ध महाघोर ॥ ७ ॥

अध्याय ६१ वा ३४३

त्याचवेळीं वीर अभिमन्यूप्रति । रणांत कोंडिती पंचवीर ॥ १ ॥
अश्वत्थामा, भूरिश्रवा, चित्रसेन । सांयमनीनंदन तैवी शल्य ॥२॥

वीरांमी त्या बालसिंहासम वीर। एकाकी सौभद्र झुंज घेई ॥ ३ ॥
अश्वहीन करी स्यंदन शल्याचा। भयाकुल तदा होती वीर ॥ ४ ॥
धांवला पांचाळ इतुक्यांत साह्यासी। कौरव तयासी आड होती ॥
सांयमनीसुत करी घोर युद्ध। केला शिरच्छेद धृष्टद्युम्नें ॥ ६ ॥
हाहाःकार तदा होतां सांयमनी। संक्रुद्ध होऊनि धांव घेई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ताडी पार्षतासी। क्रोधें मद्रपति तयावेळीं ॥ ८ ॥

अध्याय ६२ वा ३४४

धृतराष्ट्र म्हणे सूता, यत्नाहूनि। वाटे दैव जनीं श्रेष्ठ मज ॥ १ ॥
बहुत प्रकारें दुर्योधनें दुःख। आजवरी मज दिधलें असे ॥ २ ॥
चिंतितों मी बहु परी विजयाचा। मार्गनच चित्ता गवसे माझ्या ॥३॥
गावलगणि म्हणे राया, तूं अपराधी। आतां उपायाची गोष्ट नको ॥
संहाराचें वृत्त ऐकें लक्ष देईं। शल्यासवें होई महायुद्ध ॥ ५ ॥
धृष्टद्युम्ना शल्य ताडितो, हें पाहीं। अभिमन्यु येई पुढती त्याच्या ॥
दश कौरवांचे पांडवांचे दश। वीर अलौकिक करिती युद्ध ॥ ७ ॥
धृष्टद्युम्नावरी धांवे दुर्योधन। माद्रीसुत जाण पुढती झाले ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भागिनेयावरी। शल्य वृष्टि करी प्रखर शरें ॥ ९ ॥

३४५

पाहोनियां दुर्योधना। क्रोध येई भीमसेना ॥ १ ॥
गदा कलहान्तकारी। वीर घेई निज करीं ॥ २ ॥
पाहोनियां पलायन। करी कौरवांचें सैन्य ॥ ३ ॥
राव आज्ञापि मागधां। सोडिती ते पुढती गजां ॥ ४ ॥
पाहोनियां भीमसेन। करी गजांसी ताडन ॥ ५ ॥
अभिमन्यु ते माद्रेय। शराघातें करिती साह्य ॥ ६ ॥
तुटती बाहू सालंकृत। शिरें शिरस्त्राणयुक्त ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीम। करी गज छिन्न भिन्न ॥ ८ ॥

३४६

भीम गजरक्तमेदें तो माखला। काळचि भासला कौरवांसी ॥ १ ॥
गदापाणी दुजा शंकरचि दिसे। भयानक वाटे रणांगणीं ॥ २ ॥

पशुपाल पशु हांकी जैं यष्टीनें । भीम तैं गदेनें रगडी गज ॥ ३ ॥
उधळूनि गज तुडविती सैन्य । शिवचि तैं भीम स्मशानस्थ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भीम गदाधारी । अपार संहारी कौरवसैन्य ॥ ५ ॥

अध्याय ६३ वा

३४७

संहार हा ऐसा पाहूनि सैन्याचा । प्रतिकार साचा होई भीमा ॥१॥
परी भीमसेन वेणुवनीं गज । तैसा कुंजरांस चुरडी वेगें ॥ २ ॥
अश्वसादी, गजारोही, रथस्थित । तत्रस्थचि प्रेतरूप करी ॥ ३ ॥
सेनेलागीं साक्षात् मृत्युचि तो भासे । पितामह त्यातें अडवी क्रोधें
पाहूनि भीष्मांसी सात्यकि धांवला । प्रतिकार केला महाघोर ॥५॥
निवारण त्याचें करीनाचि कोणी । अलंवुष रणीं त्रस्त होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वीर भूरिश्रवा । पुढती सरसावला धनुष्पाणी ॥ ७॥

अध्याय ६४ वा

३४८

सात्यकीचें निवारण । होई प्रखर येती बाण ॥ १ ॥
दुर्योधनादिक वीर । भूरिश्रव्यासी आधार ॥ २ ॥
पाहूनियां कौरवभ्राते । भीम वदे सारथ्यातें ॥ ३ ॥
होऊनियां रथारूढ । घेतों आतां रणीं सूड ॥ ४ ॥
‘ होई दक्ष ’ म्हणूनि भीम । ताडी नंदकालागून ॥ ५ ॥
दुर्योधन पुढती होई । युद्ध तदा घोर पाहीं ॥ ६ ॥
करूनियां शराघात । केलें भीमासी मूर्छित ॥ ७ ॥
वीर धांवले साह्यासी । शुद्धि येई भीमाप्रति ॥ ८ ॥
केलें शल्यासी ताडन । तेणें केलें पलायन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीम । आतां खवळला पूर्ण ॥ १० ॥

३४९

चतुर्दश भ्राते सुषेणादि वीर । मांडिती समर भीमासवें ॥ १ ॥
पाहूनि तयांसी वृकासम भीम । राही एक क्षण स्वस्थ उभा ॥ २ ॥
चाटूनियां जीभ सोडी दिव्य बाण । वधिला सुषेण क्षणामाजी ॥३
उग्र, वीरबाहु, भीम, भीमरथ । दावी यमलोक सुलोचना ॥ ४ ॥
अवशिष्ट भ्राते करिती पलायन । अडवा म्हणे भीष्म भीमालागीं

क्रोधावेशें धांव घेई भगदत्त । भीम तें मूर्छित ध्वजस्तंभीं ॥ ६ ॥
घटोत्कच तदा निर्मी महागज । करी महायुद्ध मायामय ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे त्या पिता-पुत्रांसी । पाहूनि वीरांसी वदला भीष्म ॥

३५०

घटोत्कच-भगदत्त । युद्ध वाटे हें संकट ॥ १ ॥
बलाढ्य तो भीमसुत । सांभाळावा भगदत्त ॥ २ ॥
द्रोणादिक धांव घेती । दैत्य गर्जे पाहतांचि ॥ ३ ॥
भीष्म म्हणे दैत्य क्रुद्ध । यासी न करावें युद्ध ॥ ४ ॥
श्रांत झालें सकळ सैन्य । न रुचे युद्ध हें दारुण ॥ ५ ॥
अस्ताचळासी आदित्य । जाई थांबवूं हें युद्ध ॥ ६ ॥
दिन चतुर्थ तो ऐसा । वीर जाती निज निवासा ॥ ७ ॥
पुत्रासवें भीमसेन । शिबिरीं पावला सन्मान ॥ ८ ॥
दुर्योधन भ्रातृवधें । शिबिरीं चिंतामग्न बैसे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मोद । पांडवांच्या शिबिरांत ॥ १० ॥

अध्याय ६५-६६ वा ३५१

राव म्हणे सूता, चिंताकुलचित्त । विदुराचें वाक्य सत्य होई ॥१॥
कोणत्या साधनें ते अवध्य पांडव । कथावा उपाय मजलागीं ॥ २ ॥
निश्चयेंसी सुतां संहारील भीम । आंवरील कोण तया ऐसा ॥ ३ ॥
भीष्मादिक काय योजिती उपाय । मजसी संजय कथन करो ॥४॥
सूत म्हणे राया, पांडव बलिष्ठ । नसे मंत्र-तंत्र तयां कांहीं ॥ ५ ॥
'धर्म तेथें जय' निश्चय हा जाणें । कौरव दुरात्मे पापरत ॥ ६ ॥
अपराध घोर केले कौरवांनी । पांडवांची वाणी न बोले तें ॥ ७ ॥
महत्त्व तयाचें जाणिती न दुष्ट । होती पराभूत तेणेंचि ते ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संजय रायासी । म्हणे हीं कर्मांचीं फळें भोगीं ॥९॥

३५२

भीष्म, द्रोण, क्षत्ता, कथूनियां श्रांत । मरणोन्मुखा पथ्य न रुचे कदा ॥
तैसी हितवाणी कटु ते वाटली । वेळही पातली नृपा आतां ॥ २ ॥

दुर्योधन हाचि प्रश्न भीष्माप्रति । करितां तयासी वदती भीष्म ॥३॥
शम हाचि राया, श्रेयस्कर मार्ग । पांडवां गोविंद साह्य असे ॥४॥
त्रैलोक्यांत तयां जिंकी ऐसा वीर । नसेचि निर्धार मनीं धरीं ॥५॥
भीष्म-दुर्योधना, विस्मयकारक । ऐकविती वृत्त कथितों तेंचि ॥६॥
वासुदेव म्हणे होतां अविवेक । न रुचे सुबोध ज्ञात्याचाही ॥ ७ ॥

३५३

गंधमादना त्या गिरीवरी देव । जाहले एकत्र एकयावेळीं ॥ १ ॥
अंतरिक्षामाजी दिव्य विमानस्थ । पाहूनियां तेज विनवी ब्रह्मा ॥२॥
स्वयंभू परमात्मा तूंचि विश्वाधार । अनंत अपार शक्तिरूप ॥ ३ ॥
ब्रह्मदेवाप्रति बोले तैं सर्वात्मा । सकळ कामना पुरती तुझ्या ॥ ४॥
अंतर्धान पावे बोलूनियां देव । पुशितां ब्रह्मदेव सकलां कथी ॥ ५॥
परात्पर ब्रह्म प्रगट जाहलें । तयासी विनविलें उद्धारार्थ ॥ ६ ॥
नारायण नरासवें तो जन्मेल । दैत्य संहारील नररूपी ॥ ७ ॥
दुर्योधनाप्रति कथिलें ऋषींनीं । पार्थ कृष्ण रणीं लढती तेचि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुर्योधना भीष्म । वदती जेथ धर्म विजय तेथें ॥ ९ ॥

अध्याय ६७ वा

३५४

दुर्योधन म्हणे कृष्णाची उत्पत्ति । अलौकिक स्थिति कथन करीं ॥
पितामह म्हणे देवांचें दैवत । जाण अंबुजाक्ष गोविंद तो ॥ २ ॥
मार्कंडेय वर्णी तया वासुदेवा । जलशायी देवा अच्युतासी ॥ ३ ॥
आदि, अंत, स्थिति हाचि या विश्वाची । कामना जनांची पुरवी हाचि
कर्णमलें याच्या होई मधुदैत्य । संहारी तयास देवांस्तव ॥ ५ ॥
मधुसूदन तो यास्तव प्रसिद्ध । हाचि पद्मनाभ त्रिविक्रम ॥ ६ ॥
पर्वकाळीं याचें करी जो पूजन । सकलहि पूर्ण वांछा त्याची ॥ ७॥
आचार्य, पितर, गुरु तोचि मानीं । विजय तो जनीं सर्वकाळ ॥८॥
संकटीं तयासी शरण जो नित्य । तयालागीं सौख्य लाभे सदा ॥
भवसिंधूमाजी बुडत्या नरासी । जनार्दन रक्षी शरण जातां ॥१०॥
वासुदेव म्हणे दुर्योधना भीष्म । निवेदिती गुण श्रीहरीचे ॥ ११ ॥

अध्याय ६८ वा ३५५

विविधप्रकारें दुर्योधना, मुनि । श्रीकृष्णस्तवनीं दंग होती ॥ १ ॥
राया, पितामहवचन ऐकूनि । दुर्योधनमनीं उपजे भाव ॥ २ ॥
जाणूनि तें भीष्म म्हणती करीं शम । नर-नारायण कृष्ण-पार्थ ॥
अवज्ञा तयांची करितां विनाश । वंदितां तयांस सुखी होसी ॥ ४ ॥
बोलूनि अनुज्ञा देई रायाप्रति । शयनीं विश्रांति पितामहा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राव दुर्योधन । शिबिरीं शयन करी सौख्यें ॥ ६ ॥

अध्याय ६९ वा ३५६

दिन पंचम उदेला । वीर सिद्ध ते रणाला ॥ १ ॥
राया, तुझी दुष्टबुद्धि । कारण या प्रसंगासी ॥ २ ॥
मकरव्यूह कौरवांचा । श्येनव्यूह तो पार्थांचा ॥ ३ ॥
मकराच्या मुखामाजी । प्रवेशला भीम गाजी ॥ ४ ॥
भीम-भीष्म करिती युद्ध । दुर्योधन होई क्रुद्ध ॥ ५ ॥
विनवी द्रोणाचार्यांप्रति । नष्ट करा पांडवांसी ॥ ६ ॥
रावशब्द तो ऐकूनि । क्रोधें भिडले द्रोण रणीं ॥ ७ ॥
अडवी सात्यकि गुरूंसी । पुढती पातला शिखंडी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे घोर । तदा जाहलें संगर ॥ ९ ॥

अध्याय ७० वा ३५७

उभय सैन्याचा जाहला विनाश । कौरवांचे मुख्य पडती वीर ॥१॥
चीत्कारती गज, अश्व खिंकाळती । वाद्यघोष होतो गगनभेदी॥ २॥
मत्त वृषभ ते गर्जताती वीर । हांका परस्पर मारिताती ॥ ३ ॥
भग्न मस्तकें तीं जणु अश्मवृष्टि । भूषणासवेंचि तुटती बाहु ॥ ४ ॥
छिन्नभिन्न हस्तपाद, रम्य मुखें । विखुरलीं तेथें अस्ताव्यस्त ॥ ५ ॥
अश्व, गजांचे ते अवयव भग्न । अडविती स्थान जागोजागीं ॥ ६ ॥
विद्युत्घोषासम आयुधांचा नाद । शोणिताचा नद वाहूं लागे ॥७॥
निरंकुश गज, स्वारहीन अश्व । करिती संचार चोहींकडे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीमा कौरवेंद्र । गांठितां संगर तुमुल होई ॥ ९ ॥

अध्याय ७१-७२ वा ३५८

भीष्मासवें रात्र भीमावरी येतां । अडवी गंगासुता पार्थ रणीं ॥१॥
अर्जुनाचा ध्वज शोभला गगनीं । भैरवास्त्र रणीं सोडी पार्थ ॥२॥
मत्त गज रणीं ओढिती वीरांतें । कमळजाल जैसें ओढिताती ॥३॥
द्रोण-कृपांवरी धांवे भीमसेन । उलूक तो जाण सहदेवासी ॥ ४ ॥
शाल्व तो सात्यकि लढती परस्पर । ऐसे महावीर अन्यही ते ॥५॥
भीम भीष्मांवरी शक्त्याघात करी । निष्फळ ती करी पितामह ॥
सात्यकि त्या काळीं भीमा साह्य करी । गांगेय संहारी सूत त्याचा
धांवा, धांवा, अश्व सांभाळा हा शब्द । उमटला तेथ सैनिकांचा ॥
वासुदेव म्हणे पांडवांचें सैन्य । संहारिती भीष्म तयावेळीं ॥ ९ ॥

अध्याय ७३ वा ३५९

विराट-भीष्मांचें युद्ध तदा होई । धांवे पार्थावरी अश्वत्थामा ॥ १ ॥
हृदयीं पार्थाच्या मारिले षड्बाण । धनुष्य तोडून टाकी पार्थ ॥२॥
नव्वद शरांनीं ताडी अश्वत्थामा । कवचभेद जाणा केला पार्थें ॥
अंतीं दया करी पार्थ तयावरी । युद्ध अन्यस्थळीं करीतसे ॥ ४ ॥
संग्राम करिती भीम-दुर्योधन । कंठगत रत्न उडवी भीम ॥ ५ ॥
चित्रसेनावरी सौभद्र धांवला । लक्ष्मण पातला पुढती त्याच्या ॥
विरथ तयासी करी बाळवीर । शक्ति क्रुद्धवीर फेंकी तदा ॥ ७ ॥
छेदितां ते शक्ति राजपुत्रा कृप । घेऊनि रथांत दूर नेई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर रणधुंद । करिती आच्छादित समरभूमि ॥ ९ ॥

अध्याय ७४ वा ३६०

युद्धदुर्मद सात्यकि । करी घोर संग्रामासी ॥ १ ॥
शर जोडी केव्हां सोडी । न कळे केव्हां शिरें तोडी ॥ २ ॥
दशसहस्र वीरांसी । संहारिलें ऐशारीति ॥ ३ ॥
भूरिश्रवा करी रण । पळवी पांडवांचें सैन्य ॥ ४ ॥
सात्यकीचे पुत्र दश । येती धांवोनि साह्यास ॥ ५ ॥
अडवी भूरिश्रवा तयां । युद्ध जुंपलें त्या ठाया ॥ ६ ॥

वधिलें दहाही सुतांसी । क्रोधें धांवला सात्यकि ॥ ७ ॥
लढतां लढतां ते विरथ । होती उभय वीरश्रेष्ठ ॥ ८ ॥
भीम, दुर्योधन तया । घेती स्यंदनीं आपुल्या ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । लढतां होई अस्तमान ॥ १० ॥

अध्याय ७५ वा ३६१

षष्ठदिनीं व्यूह रचिला मकर । क्रौंचव्यूह थोर रचिती भीष्म ॥ १ ॥
द्रोणावरी भीम धैर्यें शर सोडी । सारथ्यासी वधी शराघातें ॥२॥
क्रुद्ध भीष्म-द्रोण पांडवांचें सैन्य । लाविती पळवून विक्रमानें ॥ ३॥
मुख्य मुख्य वीरवधें व्यूहभेद । करिती एकमेक परमक्रोधें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अद्भुत तें सैन्य । शस्त्रास्त्रें दारुण युद्ध करी ॥ ५ ॥

अध्याय ७६ वा ३६२

धृतराष्ट्र म्हणे शूर माझी सेना । व्यूहबद्ध रणा सज्ज नित्य ॥ १ ॥
बाल,वृद्ध कोणी नसती सैनिक । अथवा स्थूल, कृश नसती कोणी
उत्साही, सुदृढ, निरोगी सकळ । शस्त्रास्त्रकुशल शस्त्रधारी ॥३ ॥
खड्ग-द्वंद्व-गदायुद्धांत प्रवीण । मुष्टियुद्धज्ञान तयांलागीं ॥ ४ ॥
व्यायामें सुदृढ शरीर तयांचें । वेतन तयांतें यथायोग्य ॥ ५ ॥
कुलीन, संपन्न संतुष्ट ते सर्व । सन्मान्य ते थोर नसती क्षुद्र ॥ ६ ॥
स्वयेंचि ते माझ्या पातले साह्यास । सामग्रीसमृद्ध सकल योद्धे
भीष्म, द्रोण, कृप, बाल्हिक, सौबल । असतां प्रबल घोर दैव ॥
पांडव ते देव भासे म्हणे राव । वासुदेव सर्व नियति म्हणे ॥ ९ ॥

अध्याय ७७ वा ३६३

सूत म्हणे राया, कर्म आत्मकृत । भोगणें तें प्राप्त सकलांप्रति ॥ १ ॥
द्यूत, युद्धारंभ सर्व तें त्वत्कर्म । भोगीं घे ऐकून वृत्त आतां ॥ २ ॥
पाहूनियां रिक्तरथ धृष्टद्युम्न । म्हणे कोठें भीम सूतालागीं ॥ ३ ॥
येरु म्हणे गेला घेऊनियां गदा । धृष्टद्युम्न तदा शिरला रणीं ॥४॥
सहाय्यकांलागीं त्यजूनि तो जाई । निंद्यचि तो होई देवां, नरां ॥५॥
चिंतूनियां ऐसें भीष्माच्या साह्यार्थ । धांवला पार्षत सैन्यासवें ॥

भीमासी कौरव यत्नें अडविती । पाहिला पुढती तोंचि वीर ॥ ७ ॥
शरविद्ध भीमा एकाकी पाहूनि । घेतला स्यंदनीं तयालागीं ॥ ८ ॥
काढूनियां शल्यें देई आलिंगन । गर्जे दुर्योधन बघतां काय ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पुनरपि घोर । जाहलें समर तया ठाई ॥ १० ॥

अध्याय ७८ वा

३६४

धृष्टद्युम्नावरी शरवृष्टि होई । कंपित ते पाहीं अवनी तदा ॥ १ ॥
वधार्थ वैऱ्यांचा पाहूनियां यत्न । पाडिलें छेदून अस्त्रबळें ॥ २ ॥
धार्तराष्ट्र ऐसे मोहित पाहून । द्रुपदा पळवून द्रोण धांवे ॥ ३ ॥
प्रज्ञास्त्र जपूनि उठवी वीरांसी । धर्म तैं योद्धयांसी वदला ऐका ॥ ४ ॥
भीम-पार्षतांसी साह्य व्हा जावोनि । द्वादश तैं रणीं वीर येती ॥ ५ ॥
सूचिव्यूहें भेद करिती सैन्याचा । सौभद्र तयांचा प्रमुखवीर ॥ ६ ॥
पाहोनि तयासी कांपले कौरव । द्रोण देई धीर तयांलागीं ॥ ७ ॥
कैकेयाच्या रथीं बैसे भीमसेन । धांवे धृष्टद्युम्न द्रोणावरी ॥ ८ ॥
द्रोण शराघातें विरथ पार्षत । सौभद्र तयास स्वरथीं घेई ॥ ९ ॥
धन्य धन्य शब्दें गर्जले कौरव । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥ १० ॥

३६५

मोहनास्त्रनाशें कौरवेंद्रवीर । भीमसेना शर ताडी क्रोधें ॥ १ ॥
रथारूढ भीम ताडी दुर्योधना । तेंवी चित्रसेना विद्ध करी ॥ २ ॥
अभिमन्युआदि वीरांसी पाहूनि । कौरव संग्रामीं दूर जाती ॥ ३ ॥
परी भीमसेनें अडवूनि तयांसी । अपराण्हकाळासी युद्ध केलें ॥ ४ ॥
सौभद्र, विकर्ण, दुःशासनादिक । परस्पर युद्ध करिती घोर ॥ ५ ॥
त्याचिवेळीं भीष्म-अर्जुन अन्यत्र । युद्ध घनघोर करिती रणीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निरुत्साही वीर । न दिसे समर शोधितांही ॥ ७ ॥

अध्याय ७९ वा

३६६

सायंकाळीं दुर्योधन । करी भीमासवें रण ॥ १ ॥
भीम बोलला तयासी । अद्य इच्छा पूर्ण माझी ॥ २ ॥
त्यागिसी न जरी रण । तरी हरीन तव प्राण ॥ ३ ॥
दुःख कुंती, द्रौपदीचें । होवो परिमार्जन त्याचें ॥ ४ ॥

करूनि आमुची उपेक्षा । झाला अवमान कृष्णाचा ॥ ५ ॥
उलूकमुखें जें वदलासी । त्याचें प्रायश्चित्त आजी ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां भीम । सोडी वेगें तीक्ष्ण बाण ॥ ७ ॥
चाप, ध्वज, अश्व, रथ । तोडी रायाचे क्षणांत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृप । घेती रायासी रथांत ॥ ९ ॥

३६७

व्याकुळ नृपाळ विश्रांति पावला । निस्तब्ध बैसला रथामाजी ॥
जयद्रथादिक वेढिती भीमासी । सौभद्र तयासी साह्य होई ॥ २ ॥
विकर्ण त्या रणीं शरविद्ध झाला । वेढिती बाळाला कौरव ते ॥३॥
दुष्कर्णासी वीर शतानिक पाडी । कौरव धांवती तयावरी ॥ ४ ॥
सायंकाळीं युद्ध घनघोर झालें । असंख्य निमाले वीर रणीं ॥ ५ ॥
गांगेय सोडिती नतपत्र शर । वीरांचा संहार करिती ऐसा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे षष्ठदिनयुद्ध । ऐशारीति शांत अस्तमानीं ॥ ७ ॥

अध्याय ८० वा ३६८

धृतराष्ट्राप्रति सांगे गावल्गणि । वीर सप्तमदिनीं सिद्ध होती ॥ १ ॥
रक्तलांछित तैं राव भीष्मांप्रति । म्हणे भय चित्तीं बहुत वाटे ॥२॥
पाहूनि भीमासी भयग्रस्त झालों । अशांति पावलों पितामहा ॥३॥
प्रसादेंचि तुझ्या वध पांडवांचा । व्हावा सत्यसंधा, इच्छितों मी ॥
हांसोनियां भीष्म म्हणे राजपुत्रा । कोण कुंतिपुत्रां जिंकी रणीं ॥
तथापि मी प्राण लेखूनियां तुच्छ । करीन बा युद्ध तुझ्यासाठीं ॥
जाळीन मी देवांसही तुझ्यास्तव । सैन्याचा या काय पाड असे ॥
ऐकोनि ते शब्द कौरव हर्षित । चालले रणास हर्षभरें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मेघ युगान्तींचा । तैसी सैन्यशोभा सकळां भासे ॥

अध्याय ८१ वा ३६९

भीष्म म्हणे राया, द्रोण शल्यादिक । करितील युद्ध मनोभावें ॥१॥
तथापि पांडव महेंद्रासमान । विक्रमी श्रीकृष्ण साह्य तयां ॥ २ ॥
यास्तव देवांही अजिंक्य ते वीर । संदेह लवमात्र नसे मज ॥ ३ ॥
तथापि मी तयां अथवा ते मजसी । जिंकिती रणासी निश्चय हा ॥

बोलूनियां ऐसें विशल्यकरणी । दिधली आणूनि दुर्योधना ॥ ५ ॥
शल्यरहित तो जाहला तत्काळ । रचिलें मंडळ स्वसैन्याचें ॥ ६ ॥
वज्रव्यूह केला सिद्ध पांडवांनीं । सज्जले संग्रामीं उभय योद्धे ॥७॥
वासुदेव म्हणे प्रारंभींच पार्थ । पिटाळी सैन्यास स्व-सामर्थ्यें ॥८॥

अध्याय ८२ वा ३७०

कौरवांची सेना जर्जर जाहली । राव तयावेळीं वदला सैन्या ॥१॥
विजयार्थ भीष्म प्राणपणें आजी । सज्जले रणासी रक्षा तयां ॥ २ ॥
इतुक्यांत पार्थस्यंदनाचा नाद । ऐकूनियां सिद्ध सकळ वीर ॥ ३ ॥
रश्मिधारी कृष्ण पाहूनियां भीष्म । करिती संधान पार्थावरी ॥ ४ ॥
द्रोण-मत्स्यपति लढती शौर्यानें । पुत्र शंख नामें वधिला द्रोणें ॥५॥
अश्वत्थामा लढे वीर शिखंडीसी । माधवाच्या रथीं अंतीं चढे ॥६॥
ऐंद्रास्त्रें सात्यकि अलंबुषा जिंकी । पार्षत रायासी जिंकीतसे ॥ ७ ॥
भीमशरें कृतवर्मा तो विरथ । व्रणकाचा रथ गांठी वेगें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कालदंडासम । शर सोडी भीम सैन्यावरी ॥ ९ ॥

अध्याय ८३ वा ३७१

राव म्हणे सूता, पांडवविजय । कथिसी कौरवदैन्य सदा ॥ १ ॥
ऐसेंचि दुर्दैव वाटे निःसंशय । बोलला संजय दोष तुझा ॥ २ ॥
अवन्तीपुरीचे दोघे राजपुत्र । इरावंतावर धांव घेती ॥ ३ ॥
परी इरांसवें कौरवसेनेसी । वाट दक्षिणेची दावियेली ॥ ४ ॥
भगदत्त-घटोत्कचाचें समर । महा भयंकर होई रणीं ॥ ६ ॥
समर सांडोनि गेला घटोत्कच । शल्य-माद्रीसुत करिती रण ॥६
सहदेवशरें शल्य जें मूर्छित । सारथी तें रथ दूर नेई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हर्ष पांडवांसी । कौरवसेनेसी खेद वाटे ॥ ८ ॥

अध्याय ८४ वा ३७२

सूर्य पातला माध्यान्हीं । धर्म-श्रुतायु तो रणीं ॥ १ ॥
धर्मकवच होतां विद्ध । क्रुद्ध झाला धर्मराज ॥ २ ॥

१ एक कौरवयोद्धा.

क्रोध धर्माचा असह्य । स्वस्त्ययन करिती देव ॥ ३ ॥
प्राणिमात्र भयग्रस्त । कौरवांसी भासे अंत ॥ ४ ॥
महा विवेकी धर्मानें । क्रोध आंवरिला यत्नें ॥ ५ ॥
श्रुतायूनें पलायन । केलें संग्राम सोडून ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे थोर । केला धर्मानें संहार ॥ ७ ॥

३७३

कृप-चेकितान लढती एकमेक । शर गदाघात करिती क्रोधें ॥ १ ॥
खड्गयुद्ध त्यांचें होई अलौकिक । दोघेही मूर्छित पडले अंतीं ॥२॥
शिशुपालसुत उचली चेकिताना । शकुनि गुरुद्रोणां रथीं घेई ॥३॥
वीर असंख्यात लढती परस्पर । अभिमन्यु वीर चमके शौर्यें ॥४॥
भीमाची प्रतिज्ञा आणूनि मनांत । सोडी कौरवांस संधि येतां ॥५॥
पार्थ-सुशर्म्याचें संगर अपूर्व । म्हणे वासुदेव पुढती झालें ॥ ६ ॥

अध्याय ८५ वा ३७४

सूत म्हणे राया, ताडितां भुजंग । होई जैवी क्रुद्ध तैसा पार्थ ॥१॥
असंख्य भूपाळ पाडिले रणांत । पाहोनि त्रिगर्त पुढती येई ॥ २ ॥
क्षणांत तयासी पराभूत केलें । भीष्मांसी मांडिलें पुढती रण ॥ ३॥
शल्य, जयद्रथ, त्रिगर्त नृपाळ । रक्षिती सकळ गांगेयासी ॥ ४ ॥
शिखंडी भीष्मासी ताडीतसे बाण । केलें चाप भग्न क्षणीं त्याचें ॥
धर्म शिखंडीसी देई तदा स्फूर्ति । प्रतिज्ञेची स्मृति करूनि देई ॥६॥
वारुणास्त्र तदा सोडी द्रुपदसुत । युधिष्ठिरचाप तोडी भीष्म ॥ ७ ॥
गदाघातें भीम ताडी चित्रसेना । त्यागूनि स्यंदना वांचला तो ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्रसुत । वांचतांचि सौख्य कौरवांसी ॥ ९ ॥

अध्याय ८६ वा ३७५

चित्रसेनासी विकर्ण । घेई रथावरी जाण ॥ १ ॥
शांतनव-युधिष्ठिर । युद्ध जाहलें अपूर्व ॥ २ ॥
विरथ धर्म, नकुळरथीं । बैसूनियां वीरांप्रति ॥ ३ ॥
म्हणे करा भीष्मवध । पुढती जुंपे घोर युद्ध ॥ ४ ॥

देई आव्हान शिखंडी । भीष्म तया उपेक्षिती ॥ ५ ॥
पश्चिमेसी अंशुमाळी । जातां घोर वेळ आली ॥ ६ ॥
धर्म, सात्यकि, अर्जुन । लढती अद्वितीय रण ॥ ७ ॥
वाहे शोणितसरिता । दिनमणि जाई अस्ता ॥ ८ ॥
शिबिरीं शल्यहीन होती । सुस्नात ते रमती गीतीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वीर । घेती विश्रांति सकळ ॥ १० ॥

अध्याय ८७-८८ ३७६

अष्टम दिनीं ते सिद्ध झाले वीर । रचियेला व्यूह कौरवांनीं ॥ १ ॥
'शृंगारक' व्यूह तो धृष्टद्युम्नाचा । शृंगाग्रीं वीरांचा घोर शब्द ॥
भीमसेन तेवीं सात्यकि, अर्जुन । वीर ते मागून सकल त्यांच्या ॥
परस्परां वीर प्रथम अवलोकिती । वीरावरी जाती वीर वेगें ॥ ४ ॥
भीष्म-भीम रणीं करिती घोर युद्ध । सारथ्याचा वध भीमें केला ॥
भीष्मरथ जातां दूर सुभानासी । यमसदनासी धाडी भीम ॥ ६ ॥
पराजितादिक अन्य बंधुषष्ठ । जाहले पांथस्थ यमलोकींचे ॥ ७ ॥
दुर्योधन तदा भीष्मासी विनवी । म्हणती ते न व्हावी विजयइच्छा
स्वर्गेच्छेनें बापा करीं घोर युद्ध । पांडव अजिंक्य देवांसही ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीष्म वारंवार । वर्णिताती शौर्य पांडवांचें ॥ १० ॥

अध्याय ८९ वा ३७७

ऐकूनियां वृत्त राव दुःख करी । संजय निवारी तयालागीं ॥ १ ॥
पुढती वृत्तांत माध्यान्हकाळींचा । कथिला युद्धाचा नृपालागीं ॥
झालें घोर युद्ध वीर रणांगणीं । गतप्राण कोणी अर्धमृत ॥ ३ ॥
कण्हती, कुंथती आक्रोश मांडिती । आर्त हांका येती कर्णपथीं ॥४॥
अश्व, गज तेही सुवर्णालंकृत । धापा टाकितात रणीं बहु ॥ ५ ॥
छत्र, हार, रज्जु, केयूर-कुंडलें । व्यजनें चामरें छिन्नभिन्न ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसे वीरश्रेष्ठ । जाहले स्वर्गस्थ असंख्यात ॥ ७ ॥

अध्याय ९० वा ३७८

सौबल-शकुनि भिडे पांडवांसी । इरावंत त्यासी अडवी क्रोधें ॥१॥

कांबोज, आरट्ट सिंधुदेशोद्भव । तयासवें अश्व बहुत होते ॥ २ ॥
मही-वन-गिरिसंचारी ते अश्व । लढे इरावंत तयांसवें ॥ ३ ॥
ऐरावतसुत वैनतेय हत । उलूपी दुःखार्त कांता त्याची ॥ ४ ॥
पुढती ते भार्या जाहली पार्थाची । तनय तियेसी इरावंत ॥ ५ ॥
पितृव्य तयाचा सांभाळ न करी । तयाच्या अंतरीं पार्थद्वेष ॥ ६ ॥
स्वर्गामाजी तदा असतां अर्जुन । भेटला जाऊन पुत्र तया ॥ ७ ॥
तदा भावीयुद्धसाह्याचा संकल्प । धरूनि साह्यार्थ पातलासे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तोचि इरावान । संग्राम दारुण करीतसे ॥ ९ ॥

३७९

भिडले वीर परस्पर । वाहूं लागलें रुधिर ॥ १ ॥
सुबलपुत्र पुढती येती । इरावंतासी ताडिती ॥ २ ॥
तयां मोहित करूनि । स्तब्ध करी समरांगणीं ॥ ३ ॥
रुद्ध प्रास निजांगींचा । ओढूनियां करी घाता ॥ ४ ॥
होतां सावध सौबल । जाती इरावंतावर ॥ ५ ॥
नवल केलें इरावंतें । प्राण हरिले तयांचे ॥ ६ ॥
वृषभ राहिला जिवंत । नष्ट होई बंधु षट्क ॥ ७ ॥
भयाकुल दुर्योधन । विनवी दैत्यासी जाऊन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे रणीं । आर्ष्यशृंगी धनुष्पाणी ॥ ९ ॥

३८०

इरावंतावरी धांवला तो दैत्य । निर्मूनियां अश्व मायामय ॥ १ ॥
द्विसहस्र अश्वसादी निर्मियेले । धांवोनि कोंडिलें इरावंता ॥ २ ॥
परस्परांलागीं करिती मोहित । होई छिन्नगात्र दैत्य तदा ॥ ३ ॥
परी दैत्य दिसे यौवनसंपन्न । विद्ध इरावान करी तया ॥ ४ ॥
घोररूप दैत्य घेतां इरावंत । अनंताचें रूप स्वयें घेई ॥ ५ ॥
नाग तया साह्य होतां गरुडरूपें । दैत्य त्या नागांतें भक्षीतसे ॥ ६ ॥
अंतीं इरावंता वधिलें खड्गानें । अन्यत्रचि रणें प्रवीरांची ॥ ७ ॥
पार्थादि सकळ लढती अन्यत्र । जाहला संचार वीरांमाजी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे युद्धपराङ्मुख । न होतांचि युद्ध करिती वीर ॥ ९ ॥

अध्याय ९१ ते ९३ ३८१

इरावंतवधें क्षुब्ध घटोत्कच। कांपवी सैन्यास गर्जूनियां ॥ १ ॥
यमासम करी संहार सैन्याचा। येवोनि राक्षसां युद्ध करी ॥ २ ॥
दुर्योधन क्रोधें राक्षसां संहारी। धांवे तयावरी घटोत्कच ॥ ३ ॥
म्हणे ऋणमुक्त होईन मी आज। पित्यासी संतोष होई तेणें ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां बाणवृष्टि करी। सेना तैं बावरी कौरवांची ॥ ५ ॥
दुर्योधन धरी धीर तयावेळीं। साह्यार्थ पातली द्रोणसेना ॥ ६ ॥
पितामहशब्दें द्रोणही पातले। युद्ध घोर झालें तयावेळीं ॥ ७ ॥
धर्माज्ञेनें भीम साह्यार्थ पातला। संग्राम त्या काला घोर होई ॥ ८॥
वासुदेव म्हणे कौरवांची सेना। विन्मुखचि रणा स्तब्ध राही ॥९॥

अध्याय ९४ वा ३८२

दुर्योधन धांवे तदा भीमावरी। क्षणमात्र करी भ्रांत तया ॥ १ ॥
पाहोनि ते वीर घटोत्कच धांवे। रायासी रक्षावें म्हणे द्रोण ॥ २ ॥
कृप, अश्वत्थामा, भूरिश्रवा, शल्य। धांवले तत्काळ बहुत वीर ॥
षड्विंशति बाण भीमाप्रति द्रोण। ताडूनि आच्छन्न करिती वेगें ॥
परी सव्यभागीं ताडूनि मूर्छना। येतां गुरुद्रोणां गर्जे भीम ॥ ५ ॥
अश्वत्थाम्यासवें धांवे दुर्योधन। गदापाणी भीम उसळे तेव्हां ॥६॥
विद्ध भीमाप्रति पाहूनि सौभद्र। भीमसखा नील तेंवी धांवे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे परी द्रोणपुत्र। नीलासी मूर्छित पाडी रणीं ॥ ८ ॥

३८३

पाहूनियां घटोत्कच। धांवे राक्षसां समवेत ॥ १ ॥
राक्षसांसी अश्वत्थामा। करी पराभूत रणा ॥ २ ॥
घटोत्कच पाहूनियां। पसरी रणीं निजमाया ॥ ३ ॥
युद्धविन्मुख ते वीर। लढती रणीं परस्पर ॥ ४ ॥
अंतीं करिती पलायन। अश्वत्थामा, शल्य, द्रोण ॥ ५ ॥
दुर्योधनही पळाला। भीष्म अडविती तयांला ॥ ६ ॥
परी नायकेचि कोणी। घटोत्कच गर्जे रणीं ॥ ७ ॥
वर्णी प्रेमें वासुदेव। विजयी जाहले पांडव ॥ ८ ॥

अध्याय ९५ वा

३८४

दुर्योधन म्हणे पितामहाप्रति । सांगा कांहीं युक्ति मजलागीं ॥ १ ॥
घटोत्कचालागीं वधावें स्वहस्तें । सामर्थ्य द्या ऐसें मज कांहीं ॥
पितामह म्हणे भगदत्ता प्रेषीं । संहारील त्यासी, तोचि रणीं ॥ ३॥
ऐकूनि ते वाणी धांवे भगदत्त । 'सुप्रतीक' गज सिद्ध करी ॥ ४ ॥
भीम, अभिमन्यु, द्रौपदेय पांच । धांवले साह्यार्थ तयावेळीं ॥ ५ ॥
सुप्रतीक तदा धांवे भीमावरी । भीम गजावरी शर सोडी ॥ ६ ॥
दाशार्ण धांवतां अडवी तया गज । व्यर्थ प्राग्जोतिप यत्न तेंवी ॥७॥
भीमादिक वीर भगदत्तावरी । धांवले सत्वरी पाहूनियां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे गज सुप्रतीक । पांडव सैन्यास तुडवी रणीं ॥ ९ ॥

३८५

घटोत्कच धांव घेई । उग्ररूपें सिद्ध होई ॥ १ ॥
छेदूनियां त्याचा शूल । शक्ति फेंकी भगदत्त ॥ २ ॥
नवल झालें तयावेळीं । शक्ति वरचेवरी छेदी ॥ ३ ॥
जानुआघातें तो दैत्य । होई विस्मय लोकांत ॥ ४ ॥
क्रुद्ध होई भगदत्त । ताडी शर सकलांस ॥ ५ ॥
झाला मूर्छित सारथी । भीम घेई गदा हातीं ॥ ६ ॥
इतुक्यांत येई पार्थ । अडवी तया कौरवेंद्र ॥ ७ ॥
इरावंतमृत्युवृत्त । भीम निवेदी पार्थास ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आतां । समय घोर संग्रामाचा ॥ ९ ॥

अध्याय ९६ वा

३८६

व्याकुळ अर्जुन बोलला कृष्णासी । शम सकलांसी हितप्रद ॥ १ ॥
ज्ञातिवधें आम्हां लाभ काय कृष्णा । परी दुर्योधना मान्य नसे ॥२॥
ने ने माझा रथ सेनासिंधूमाजी । उल्लंघूनि त्यासी जाईन मी ॥ ३ ॥
वायुवेगें कृष्ण हांकी स्यंदनासी । अपराण्हकाळासी घोरयुद्ध ॥४॥
भीष्म-पार्थ तदा भिडले रणांत । भीम कौरवांस यम झाला ॥ ५ ॥
'व्यूढोरस्क' तेंवी 'कुंडली' निमाला ।:'अनाधृष्टि' गेला ' वैराटहि' ॥
'कुंडभेदी', 'दीर्घलोचन','सुबाहु',।पडला 'दीर्घबाहु', 'कनकध्वज ॥

अवशिष्ट भ्राते करिती पलायन । धांव घेती द्रोण अग्रभागीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्रोणांच्या समक्ष । करी घोर युद्ध वृकोदर ॥ ९ ॥

३८७

कृप, भगदत्त, गांगेय, पार्थासी । घोर संगरासी सज्ज होती ॥ १ ॥
निवारूनि अस्त्रें अस्त्रधनुर्धारी । सैन्यासी संहारी कौरवांच्या ॥२॥
विरथ अंबष्ट हार्दिक्याच्या रथीं । चढतां अर्जुनासी खड्गें ताडी ॥
क्षणार्धें सौभद्र करी छिन्न भिन्न । वीर धन्य धन्य म्हणती तदा ॥
असंख्यात वीर लढताती रणीं । पिता-पुत्र कोणी अवलोकीना ॥५॥
हस्तपादयुक्त सजीव तें स्थान । अथवा शयनस्थान सकलांचें ॥६॥
अलंकारयुक्ता प्रमदाचि भासे । सनक्षत्र साजे गगनापरी ॥ ७ ॥
घोर रण होतां अंधार पसरे । युद्ध आंवरिलें तया दिनीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अष्टम हा दिन । जाहला संपूर्ण ऐशारीति ॥ ९ ॥

अध्याय ९७ वा

३८८

सूत म्हणे राया, शकुनि, दुर्योधन । दुःशासन, कर्ण, एकत्र ते ॥
दुर्योधन म्हणे भीष्म, द्रोण, कृप । सौमदत्ति, शल्य लढती सौम्य ॥
पांडवांचा वध न कळे कां टाळिती । आमुच्या क्षयाची वेळ तेणें ॥
कैसें पराभूत करावें त्यां, कर्णा । कर्ण, दुर्योधना मार्ग सांगे ॥ ४ ॥
कर्ण, म्हणे भीष्म त्यागितां रणासी । वधीन सैन्यासी निश्चयें मी ॥
पांडवांची दया भीष्म करी नित्य । तैसेंचि वार्धक्य आड येई ॥६॥
शस्त्रत्याग जरी रुचेल गांगेया । वधीन पांडवां सत्य जाण ॥ ७ ॥
ऐकूनियां राव भीष्मशिबिरास । सिद्ध जावयास सपरिवार ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वंदिती नृपासी । वीर मार्गामाजी नम्रभावें ॥ ९ ॥

३८९

येतां सन्निध शिबिर । उतरे नृपाळ सत्वर ॥ १ ॥
खिन्नचित्तें वंदूनियां । उच्चासनीं बैसे राया ॥ २ ॥
बोले जोडूनियां कर । पितामहा, तूं रणधीर ॥ ३ ॥
तुझ्या मनीं द्वेष माझा । तेंवी लोभ पांडवांचा ॥ ४ ॥
तेणें दुर्भाग्यें वा तयां । वधिसी न तूं गांगेया ॥ ५ ॥

ऐसें असेल वा जरी । अनुज्ञा दे कर्णा तरी ॥ ६ ॥
पांडवांसी तो जिंकील । वदला भीष्मांसी नृपाळ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वस्थ । बोलूनियां वैसे नृप ॥ ८ ॥

अध्याय १८ वा ३९०

उदारचरित सत्यव्रत भीष्म । व्यथित वाग्बाण सुटतां घोर ॥ १ ॥
खिन्न, क्रुद्ध, परी अप्रिय न वदे । सर्पासम त्याचे सुटती श्वास ॥
दीर्घकाल स्वस्थ चिंतनचि करी । पुढती पाही वरी क्रुद्धनेत्रें ॥ ३ ॥
करीलचि वाटे दग्ध सर्व जगा । आंवरूनि क्रोधा शांत होई ॥ ४ ॥
म्हणे दुर्योधना, कां ऐसा टोंचिसी । व्यर्थ दोष देसी कां रे ऐसा ॥
प्राणपणें राया, लढतों मी रणीं । दोष कां जाणूनि ऐसा देसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शौर्य पांडवांचें । भीष्म नृपाळातें कथिती स्वयें ॥७॥

३९१

इंद्रपराभव करूनियां पार्थ । तोषवी अग्नीस प्रसिद्ध हें ॥ १ ॥
कर्णासम भ्राते असतां सन्निध । वनीं तुज मुक्त पार्थें केलें ॥ २ ॥
विराटनगरीं आम्हां सकलांसी । मोहूनि वस्त्रांसी हरिलें तेणें ॥३॥
कोठें गेला होता तयावेळीं कर्ण । रणांत अर्जुन ठाकला जैं ॥ ४ ॥
जिंकिले दुर्जय निवातकवच । ऐसा वीर पार्थ अद्वितीय ॥ ५ ॥
जगद्रोक्षा कृष्ण असतां साह्यासी । कोण रणामाजी जिंकी तया ॥
बोधिलें तुजसी अनेक ज्ञात्यांनीं । अवाच्य बोलूनि ताडिसी कां ॥
मरणोन्मुखाची विपरीत दृष्टि । वैर पांडवांसी केलें तुम्हीं ॥ ८ ॥
दाखवीं पुरुषार्थ लढूनियां आतां । कथी भीष्मवाचा वासुदेव ॥९॥

३९२

पांचालांसवें त्या सोमकांचा वध । अथवा रणांत भीष्मवध ॥ १ ॥
ऐसा पुरुषार्थ करीन मी रणीं । वृत्त असो ध्यानीं शिखंडीचें ॥ २ ॥
यावच्चंद्रकीर्ति ऐसें रणीं युद्ध । करीन उद्यीक ध्यानीं धरीं ॥३॥
ऐकूनि हे वाणी हर्षे दुर्योधन । शिबिरीं जाऊन निद्रा घेई ॥ ४ ॥
प्रातःकाळीं वृत्त कथूनि सर्वांसी । सज्ज व्हा रणासी म्हणे राव ॥
पार्थासवें गांठ जाणूनियां भीष्म । विचारांत मग्न होई रणीं ॥ ६ ॥

जाणूनि तें राव सैन्य द्राविंशति । उत्साहें रणासी सिद्ध करी ॥७॥
वृकही संहारी अरक्षित सिंहां । म्हणे संरक्ष वा भीष्म आतां ॥८॥
पार्षतासी पार्थ म्हणे शिखंडीसी । स्यापीं अग्रभागीं रक्षीन मी ॥
वासुदेव आतां संग्राम थोरांचा । गाऊनि तयांचा भाट होई ॥१०॥

अध्याय ९९ वा ३९३

शांतनवें व्यूह सर्वतोभद्र हा । स्थापियेला महा रणामाजी ॥ १ ॥
अग्रभागीं कृप, कृतवर्मा शैब्य । शकुनि, जयद्रथ, सुदक्षिण ॥ २ ॥
धृतराष्ट्रसुत तैसेचि कांबोज । भीष्म वीरराज स्वयें उभा ॥ ३ ॥
दक्षिणविभागीं भूरिश्रवा, द्रोण । वामभागीं जाण अश्वत्थामा ॥४॥
त्रिगर्तरक्षित राव मध्यभागीं । पृष्ठीं राक्षसादि सिद्ध होती ॥ ५ ॥
महाव्यूह केला सिद्ध पांडवांनीं । प्रवर्तले रणीं घोरयुद्धा ॥ ६ ॥
वाद्यनादें झाली कंपित धरणी । भ्रमण गगनीं करिती पक्षी ॥ ७ ॥
भयप्रद चिन्हें होती तयावेळीं । कंपित जाहलीं सैन्यवनें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे घोर वेळ ऐसी । प्रारंभ युद्धासी शंखनादें ॥ ९ ॥

अध्याय १०० वा ३९४

अभिमन्युमेघ वर्षे शरवृष्टि । कौरवेंद्र कष्टि होई बहु ॥ १ ॥
भासला तयासी द्वितीय अर्जुन । अलंबुषा रण मांडीं म्हणे ॥ २ ॥
राजाज्ञेनें धांवे दैत्य बाळावरी । मूर्छित त्या करी द्रौपदेय ॥ ३ ॥
द्रौपदेयां साह्य अभिमन्यु होई । संग्राम त्या ठाई घनघोर ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शंबर-शक्राचें । युद्धचि तें भासे दुःखदाई ॥ ५ ॥

अध्याय १०१ वा ३९५

आर्षश्रृंगी, अलंबुष । सौभद्रासी म्हणे थांव ॥ १ ॥
उभा रहा रे म्हणतां । करिती परस्पराघाता ॥ २ ॥
होता मायावी राक्षस । अस्त्रवेत्ता पार्थसुत ॥ ३ ॥
वक्षस्थळीं घुसतां शर । दैत्य पाडी अंधःकार ॥ ४ ॥
भास्करास्त्रें हरूनि तम । ताडी अभिमन्यु बाण ॥ ५ ॥
पलायन करी दैत्य । सोसवे न त्या आघात ॥ ६ ॥

सैन्य पळतां धांवे भीष्म । करीतसे निवारण ॥ ७ ॥
पिता-मातुलासी तुल्य । सौभद्रेय दावी बळ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । धांवे पुत्राचया साह्यार्थ ॥ ९ ॥

३९६

पाहूनि पार्थासी, गांगेयासी वीर । धांवूनि आधार होती रणीं ॥१॥
कृपाचार्य करी अर्जुनासी विद्ध । सात्यकि संक्रुद्ध सोडी बाण ॥ २ ॥
वरचेवरी तो द्रोणपुत्र छेदी । धनुष्यहि तोडी सात्यकीचें ॥ ३ ॥
सात्यकि क्रोधानें सोडी दिव्यबाण । द्रौणि संज्ञाशून्य बसला रथीं
पुनरपि युद्ध होई त्या दोघांचें । साह्य स्वपुत्रातें होती द्रोण ॥ ५ ॥
विंशति शरांनीं ताडी त्यां सात्यकि । गर्जना पार्थाची इनुक्यामाजी
शोभती ते दोघे बुध-शुक्रांसम । गुरु-शिष्यरण घोर आतां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संग्रामकुशल । वीर धनुर्धर द्रोण-पार्थ ॥ ८ ॥

अध्याय १०२ रा ३९७

गुरु-शिष्यभाव जाई विसरूनि । द्रोण-पार्थ रणीं करिती लीला ॥
एकमेकां वीर करिती शराच्छन्न । सुशर्माही बाण सोडीतसे ॥ २ ॥
सिंहनादें पार्थ विद्ध करी तया । वातास्त्र त्रिगर्ता झुगारिलें ॥ ३ ॥
अश्वत्थामा, कृप, दुर्योधनादिक । विंद ते अनुविंद पुढती येती ॥
सुदक्षिण, शल्य, काम्बोज, बाल्हिक । पार्था, भगदत्त अडवी भीमा ॥
घेवोनियां गदा पुढती धांवे भीम । दन्तउत्पाटन करिंचें करी ॥ ६ ॥
भग्नदन्त कोणी चीत्कारती गज । युद्धपराङ्मुख अंतीं सेना ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वळावीण लोकीं । नसे विजयप्राप्ति कदाकाळीं ॥८॥

अध्याय १०३-१०४ था ३९८

झालें महाघोर रण । भयाकुल होई सैन्य ॥ १ ॥
झेंप वीरावरी वीर । घेती रुधिराचा पूर ॥ २ ॥
होई दुर्योधननिंदा । म्हणती वैरी तोचि जगा ॥ ३ ॥
शौर्यें लढताती कौरव । प्रतिकूल परी दैव ॥ ४ ॥

दुर्योधन भीष्म-द्रोण । क्रोधें करिताती संग्राम ॥ ५ ॥
विद्ध जाहला द्रुपद । तिकडे वाल्हिक विरथ ॥ ६ ॥
भीष्म, सात्यकि, शक्तीनें । करिती उभयांसी ताडनें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । घोरयुद्ध त्या स्थळातें ॥ ८ ॥

अध्याय १०५ वा ३९९

दुर्योधन निजसैन्य पराभूत । पाहूनि शल्यास विनवी रणीं ॥ १ ॥
म्हणे धर्म आम्हांसमक्ष सैन्यासी । पळवी तयासी आंवरीं तूं ॥२॥
ऐकूनियां शल्य धांवे धर्मावरी । वेळ घोर आली तयावेळीं ॥ ३ ॥
माद्रीसुत होते धर्माच्या साह्यासी । भीम अवलोकी नवल एक ॥
मद्रपति धरी धर्मराजाप्रति । सन्निधचि घडी ऐसी दिसे ॥ ५ ॥
पाहूनियां ऐसें समर दारुण । करी भीमसेन सायंकाळीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रीहरींचा दास । कार्यामाजी दक्ष असतां यश ॥७॥

अध्याय १०६ वा ४००

महा क्रोधाकुल भीष्म रणामाजी । ताडी सकलांसी प्रखर शर ॥
धर्मादि सकळ पांडव वेधिले । नवलचि केलें भीष्में तदा ॥ २ ॥
प्रतिकार थोर केला पांडवांनीं । काळासम रणीं तळपे भीष्म ॥३॥
घायाळचि करी पांडवसैन्यासी । धीर न कोणासी धरवे तदा ॥
पाहूनियां ऐसी सैन्याची अवस्था । यदुनाथ पार्था वदला ऐका ॥
अपेक्षितकाल सन्निध पातला । स्मरूनियां बोला, युद्ध करीं ॥ ६ ॥
अधोमुख पार्थ पाही तिर्यग्नेत्रें । म्हणे श्रेय माझें काय येणें ॥ ७ ॥
तथापि मी तुझें पाळूनि वचन । करीन संग्राम घोर आजि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ-गंगासुत । शोभती रणांत सूर्यासम ॥ ९ ॥

४०१

झांकी पार्थाचा स्यंदन । शरवृष्टि करूनि भीष्म ॥ १ ॥
धनंजय महायोद्धा । चापहीन करी वृद्धा ॥ २ ॥
अन्य चाप घेतां तेंही । छेदी पार्थ लवलाहीं ॥ ३ ॥
भीष्म म्हणे धन्य धन्य । जगीं कुंतीचा नंदन ॥ ४ ॥

ऐसें बोलूनियां भीष्म । करी वर्षाव दारुण ॥ ५ ॥
करी सारथ्य श्रीहरी । वर्णवेन ती चातुरी ॥ ६ ॥
अश्वगतीनेंचि बाण । चुकवी भीष्मांचे श्रीकृष्ण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीम । लढे तदा काळासम ॥ ८ ॥

४०२

मृदुयुद्ध तदा पाहोनि पार्थाचें । भयप्रद तैसें भीष्मकर्म ॥ १ ॥
त्यागूनियां रश्मी उतरला कृष्ण । भीष्मासी धांवून वधूं म्हणे ॥२॥
तयावेळीं होती वीर भयग्रस्त । शांतनूचा सुत कर जोडी ॥ ३ ॥
पुंडरीकाक्षा, ये वध करीं माझा । उद्धार जन्माचा होई तेणें ॥ ४ ॥
इतुक्यांत पार्थ अडवी कृष्णासी । बैस म्हणे रथीं देवदेवा ॥ ५ ॥
भीष्माचें पतन निश्चयें करीन । ऐकूनियां कृष्ण रथीं बैसे ॥ ६ ॥
पुढती कंदन जाहलें रणांत । सेना असंख्यात क्षय पावे ॥ ७ ॥
पिपीलिकांसम पांडवांचें सैन्य । केलें छिन्नभिन्न गांगेयानें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भानु अस्तंगत । नवमदिन युद्ध पूर्ण होई ॥ ९ ॥

अध्याय १०७ वा

४०३

पराजय तयादिनीं पांडवांचा । हर्ष कौरवांचा गगनव्यापी ॥ १ ॥
आनंदें विश्रांति लाभे कौरवांसी । व्यग्रचित्त होती धर्मादिक ॥२॥
धर्म म्हणे कृष्णा, व्यर्थचि संग्राम । आरंभिला जाण भीष्मासवें ॥
वनवास मज युद्धाहूनि रुचे । वचन हिताचें कथीं आम्हां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धर्माचें वचन । ऐकूनियां कृष्ण बोले तया ॥ ५ ॥

४०४

धर्मराजा, ऐसा सोडूं नको धीर । बंधु महावीर सकल तुझे ॥ १ ॥
आज्ञापिसी तरी वधीन मी भीष्मा । कथिसी त्या कर्मा आचरीन ॥
भीष्मवध जरी न करी हा पार्थ । एकटा रणांत वधीन त्या ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे भक्तांचे जे वैरी । तेचि गिरिधारी शत्रु मानी ॥ ४ ॥

४०५

धर्मा, सखा माझा पार्थ । प्रिय आप्त तैंवी शिष्य ॥ १ ॥
हित व्हावया तयाचें । मांस अर्पीन अंगींचें ॥ २ ॥

लेखीन हा प्राण तुच्छ । सखे आम्हीं एकमेक ॥ ३ ॥
पार्थ आपुली प्रतिज्ञा । पूर्ण करील हे प्राज्ञा ॥ ४ ॥
पितामह वीरश्रेष्ठ । बलहीन आतां वृद्ध ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्म । तुष्ट बोलला वचन ॥ ६ ॥

४०६

धर्म म्हणे कृष्णा, आधार तूं आम्हां । न मोडीं प्रतिज्ञा साह्य होईं ॥
पितामह इच्छी आमुचें कल्याण । शिबिरीं जाऊन भेटूं तया ॥ २ ॥
पुशितां उपाय कथील तो आम्हां । असो क्षात्रधर्मा धिक्कार या ॥३॥
योजूनियां ऐसें शस्त्रहीन वीर । गांठिती शिबिर निशाकाळीं ॥ ४ ॥
भीष्म करी प्रेमें कृष्णाचें स्वागत । पांडवांचें हितवचन बोले ॥ ५ ॥
म्हणे कार्य सांगा असेल जें मनीं । प्राणही त्यागूनि साधीन तें ॥
वासुदेव म्हणे धर्म सद्गदित । बोलला वृद्धास तयावेळीं ॥ ७ ॥

४०७

ताता, सर्वज्ञा मी वंदितों पदासी । युक्ति विजयाची कथन करा ॥
राज्यलाभ आम्हां होई कैसा रीति । हानी ही जनांची कैंवी टळे ॥
तैसाचि आपुल्या वधाचा उपाय । मज पितामह कथन करो ॥ ३ ॥
तुज जिंकी ऐसा वीर न या जगीं । तूंचि आम्हांलागीं साह्यकर्ता ॥
भीष्म म्हणे धर्मा, अजेय मी रणीं । विजयी न कोणी पुढती माझ्या
यास्तव सत्वरी वधावें मजसी । इच्छा विजयाची जरी तुम्हां ॥६॥
मजवरी करा प्रहार सुखानें । अनुज्ञा ही जाणें तुम्हां माझी ॥ ७ ॥
अजेयत्व माझें जाणितां हें भाग्य । होवो आतां वध सुखें माझा ॥
वासुदेव म्हणे शूराचें तें शौर्य । जाणिताती शूर इतरां काय ॥९॥

४०८

पितामहालागीं बोले युधिष्ठिर । इंद्राहूनि थोर यश तुझें ॥ १ ॥
भीष्म म्हणे बाळा, वदसी हें सत्य । जाणें मी अजिंक्य देवदेवां ॥
तथापि 'मी तुझा' ऐसें जो वदेल । शरण येईल अथवा मज ॥३॥
शस्त्रत्यागी किंवा कवच-ध्वजहीन । विकलांग, रणभूमिस्थित ॥ ४ ॥

एकुलता एक पुत्र जो पित्यासी । स्त्री, स्त्रीसमचि, अथवा कोणी ॥
ऐसे प्रतियोद्धे अवध्य मजसी । अप्रशस्त लोकीं न वधीं तयां ॥६॥
अमंगल ध्वज पाहूनियां कदा । न करींचि युद्धा नियम ऐसा ॥ ७ ॥
यास्तव सोडावे विशिख ते बाण । शिखंडीमागून मजवरी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ-कृष्णावीण । प्रतियोद्धा कोण भीष्माप्रति ॥ ९ ॥

४०९

वधोपाय तो ऐकूनि । गेले शिबिरातें निघूनि ॥ १ ॥
भीष्म मरणासी सिद्ध । ऐकूनियां खिन्न पार्थ ॥ २ ॥
झाला लज्जित अंतरीं । म्हणे ऐक हे श्रीहरी ॥ ३ ॥
अंकावरी बालपणीं । ज्याच्या क्रीडा केली आम्हीं ॥ ४ ॥
मलिन, रुक्ष केलें अंग । परी कदा न जो क्रुद्ध ॥ ५ ॥
तात ऐसें संबोधितां । कथी आम्हांसी जो कथा ॥ ६ ॥
तयावरी शराघात । कैंवी करूं हे गोविंद ॥ ७ ॥
नष्ट होवो अवघी सेना । जावो प्राण नारायणा ॥ ८ ॥
पराजय होवो सुखें । परी कर्म न घडो ऐसें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । पुशी श्रीकृष्णाचें मत ॥ १० ॥

४१०

कृष्ण म्हणे पार्था, आठवीं प्रतिज्ञा । प्रातचि संग्रामा सिद्ध होणें ॥
जेणें नियोजित ऐसा भीष्मवध । नियति ते व्यर्थ कैसी घडे ॥ २ ॥
भीष्मवधावीण विजय न तुम्हां । सज्ज हो संग्रामा पार्था, शौर्यें ।
बृहस्पति इंद्रा हाचि करी बोध । असूयारहित युद्ध व्हावें ॥ ४ ॥
ज्येष्ठ, गुणवंत प्रतिस्पर्धी होतां । वधचि तयाचा करणें योग्य ॥५॥
धर्म क्षत्रियांचा असे हा शाश्वत । मान्य करी पार्थ कृष्णोक्त तें ॥
वासुदेव म्हणे चिंतूनियां ऐसें । शयनागारातें शिबिरीं जाती ॥७॥

अध्याय १०८ वा

४११

सूत म्हणे राया, प्रातःकाळीं सैन्य । शंख शुभ्रवर्ण फुंकिताती ॥१॥
उभयहि सैन्यें होती व्यूहास्थित । प्रारंभ युद्धास उत्साहानें ॥ २ ॥

भीष्मावरी शर सोडिती अपार । जाहला संहार रणीं बहु ॥ ३ ॥
उग्ररूपें भीष्मप्रतिकार होतां । कौरवांच्या चित्ता हर्ष वाटे ॥ ४ ॥
वत्सदंत तेंवी शर ते नाराच । तैसे आंजलिक आदि बहु ॥ ५ ॥
मंडलाकृतीनें पाहूनियां चाप । पांडव विस्मित म्हणती धन्य ॥६॥
कर्तव्यविमूढ विस्मयें पाहती । समर्थ न होती प्रतिकारा ॥ ७ ॥
ताडितां शिखंडी बोले तया भीष्म। वागे इच्छेसम ' शिखंडिनी '॥
वासुदेव म्हणे भीष्माचें वचन । शिखंडी ऐकून क्रुद्ध होई ॥ ९ ॥

४१२

ताडीं न ताडीं वा भीष्मा मजप्रति । बोलला शिखंडी भीष्मालागीं ॥
वधीन निश्चयें संग्रामीं या तुज । पाहूनियां पार्थ स्फूर्ति देई ॥ २ ॥
म्हणे वीरा, आजी न सोडावें रण । भीष्म वधावीण निश्चयेंसी ॥
संरक्षीन तुज निर्भय असावें । निश्चयें साधावें स्वकार्यासी ॥ ४ ॥
निवारीन सर्वां एकाकी मी आज । करीं पराभूत पितामहा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ शिखंडीसी । देऊनियां स्फूर्ति युद्ध करी ॥ ६ ॥

अध्याय १०९ वा

४१३

राव म्हणे सूता, ताताचा स्यंदन । जाहला कीं भग्न तुटलें चाप ॥
सूत म्हणे राया, समितिंजय भीष्म । पाशयुक्त यम भासे रणीं ॥२॥
सिंहासम पार्थ गर्जे तया वेळीं । भयाभीत झाली सकल सेना ॥३॥
दुर्दशा सैन्याची पाही दुर्योधन । पुढती होवून बोले भीष्मा ॥ ४ ॥
कृष्णसारथी हा दग्ध करी सैन्य । गांगेया, तुजवीण कोण त्राता ॥
आधार संकटीं होई तूंचि आम्हां । बोलती वचना भीष्म तदा ॥६॥
वासुदेव म्हणे चिंतूनियां भीष्म । प्रतिज्ञावचन वदती ऐका ॥ ७ ॥

४१४

दुर्योधना, पूर्ववचनें संहार । केला हा निर्धार मनीं आणीं ॥ १ ॥
प्रतिदिनीं दशसहस्रां मारिलें । अद्यही चाललें तेंचि कर्म ॥ २ ॥
राया, अद्य माझी ऐक ही प्रतिज्ञा । दारुण संग्रामा सिद्ध झालों ॥
पांडवांचा वध करीन मी आजि । अथवा रणासी पतन माझें ॥४॥
बोलूनियां भीष्मसिंह खवळला । अपूर्व त्या स्थळा समर होई ॥५॥

दशसहस्र तें वीर गतप्राण। तितुकेचि जाण गजसादी ॥ ६ ॥
द्विगुण पदाति संहारूनि भीष्म। अनल निर्धूम भासे रणीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पांडव व्याकुळ। सज्ज ते सकळ भीष्मवधा ॥ ८ ॥

अध्याय ११० वा ४१५

सूत म्हणे राया, पार्थ शिखंडीसी। सांगे भीष्मभीति नसे तुज॥१॥
ऐकूनि शिखंडी धृष्टद्युम्नादिक। द्रुपद, कुंतिभोज साह्य होती ॥ २ ॥
अभिमन्यु तेंवी विराट नृपाळ। धांवले सकळ वीर रणीं ॥ ३ ॥
निवारण त्यांचें केलें कौरवांनीं। धृष्टद्युम्न रणीं धैर्य देई ॥ ४ ॥
प्रोत्साहनें वीर लढती उत्साहें। दुःशासन धांवे पार्थावरी ॥ ५ ॥
शिलामुख शर सोडिले प्रखर। युद्ध घनघोर उभयांमाजी ॥ ६ ॥
अंतीं दुःशासन मूर्छित जाहला। संरक्षी तयाला पितामह ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शुद्धीवरी येतां। दुःशासन पार्था अडवी रणीं ॥ ८ ॥

अध्याय १११ वा ४१६

आर्षश्रृंगी सात्यकीसी-। लढे, भगदत्त साह्यासी ॥ १ ॥
दुर्योधन म्हणे वीरां। सात्यकीसी ठार करा ॥ २ ॥
ऐकूनियां तें वचन। घोर जाहलें कंदन ॥ ३ ॥
द्रुपद, शिखंडी, विराट। करिती भीष्मासी लगट ॥ ४ ॥
कृप, माद्रेय भिडती। घटोत्कच ये पुढती ॥ ५ ॥
ऐसे लढतां बहुत वीर। भीम धांवे भीष्मांवर ॥ ६ ॥
अडवी भूरिश्रवा त्यासी। द्रोण निवारी धर्मासी ॥ ७ ॥
चित्रसेन चेकिताना। अडवी नष्ट बहु सेना ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। करीतसे घोर युद्ध ॥ ९ ॥

अध्याय ११२ वा ४१७

अश्वत्थाम्यालागीं बोले गुरुद्रोण। दुश्चिन्हें दारुण घडती अद्य ॥
स्वयेंचि हे शर उसळती माझे। एकरूप अस्त्रें सकल होती ॥ २ ॥
सेनेमाजी गृध्र बैसती लपूनि। कंपित हे भूमि, भालुशब्द ॥ ३ ॥
मंदिरीं देवता कंप पावताती। चंद्र अधःश्रृंगी उदय पावे ॥

भीष्मार्जुनयुद्ध स्मरणें रोमांच-। ठाकती, व्यथित चित्त माझें ॥ ५॥
अग्रभागीं पार्थ शिखंडी त्यामागें। चाप महाक्रोधें ओढी पार्थ ॥६॥
धर्मही जाहला संक्रुद्ध रणांत। विस्मरण होत मजलागीं ॥ ७॥
कृतविद्य पार्थ भैरवास्त्रसिद्ध। करीं जा निरोध वेगें त्याचा ॥८॥
वासुदेव म्हणे अनर्थाचें ज्ञान। सुचविती, द्रोण पुत्रालागीं ॥ ९॥

४१८

वत्सा, शराघातें कवचें विदीर्ण। शस्त्रें छिन्नभिन्न पडती रणीं ॥१॥
संकटीं उद्धार व्हावें प्राणावरी। निर्धार हा करीं आजि मनीं ॥२॥
धर्मशील वीर पांडव हे क्षुब्ध। व्यूह हा अभेद्य सिद्ध त्यांचा ॥३॥
अभिमन्यु पहा शोभे शामवर्ण। द्वितीय अर्जुन भासतसे ॥ ४॥
वत्सा, जा शिखंडी भीष्मासी दटावीं। माया दूर व्हावी ऐशावेळीं
वासुदेव म्हणे यम कीं वरुण। गंगेचा नंदन म्हणती गुरु ॥ ६॥

अध्याय ११३ वा ४१९

शल्य, भगदत्त, कृप, कृतवर्मा। वीर दक्ष भीमा भिडती रणीं ॥१॥
परी तो हैराण करी तयांप्रति। करी सैंधवासी विरथ वेगें ॥ २॥
पाहूनियां शल्य धांवला पुढती। विशोक सारथी विद्ध केला ॥३॥
खवळूनि भीम सोडी दिव्य शर। पराभूत वीर केले बहु ॥ ४॥
इतुक्यांत पार्थ साह्यासी पातला। एकाकी देखिला भीम रणीं ॥
उभयही वीर ठाकले रणांत। धांवले त्रिगर्त राजाज्ञेनें ॥ ६॥
वासुदेव म्हणे पार्थ त्रिगर्तांसी। रणांत झोडपी तीव्र बाणें ॥ ७॥

अध्याय ११४ वा ४२०

खिल्लारीं धेनूंच्या दोघे सिंहासम। करिती संग्राम पार्थ, भीम ॥
छेदिलें, पाडिलें, झोडिलें वीरांसी। गेले यमलोकीं असंख्यात ॥२॥
इतुक्यांत शल्य वक्षस्थळीं ताडी। पार्थ खोड मोडी रणीं त्याची ॥
द्रोण, मागधही ताडिती भीमासी। प्रत्युत्तर त्यांसी देई भीम ॥४॥
शिखंडी क्रोधानें धांवे भीष्मावरी। साह्य तया करी वीरवृंद ॥ ५॥
लावूनि भीष्मांचा पण रणद्यूत। आरंभिलें स्पष्ट भासे ऐसें ॥ ६॥

निज सैन्या स्फूर्ति देई धृष्टद्युम्न। प्राणपणें सैन्य सिद्ध होई ॥ ७ ॥
भग्नतीर, सिंधु घेई अंगावरी। तैसेंचि स्वीकारी भीष्म तयां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीष्म महाबळी। वीरांसी निवारी लीलामात्रें ॥ ९ ॥

अध्याय ११५ वा ४२१

सूत म्हणे राया, दशमादिन युद्ध। होईल प्रसिद्ध जगामाजीं ॥ १ ॥
शांतनव, वीर वधी असंख्यात। जीविताचा वीट येई अंतीं ॥ २ ॥
म्हणे युधिष्ठिरा, प्रिय करीं माझें। पांचाल पार्थातें पुढती आणी ॥
प्रयत्न करूनि वधावें मजसी। कथिलें सेनेसी तेंचि धर्म ॥ ४ ॥
द्रोणादिक भीष्मा रक्षिती प्रयत्नें। संग्राम अर्जुनें घोर केला ॥ ५ ॥
द्रोणपुत्रासवें सात्यकि भिडला। अभिमन्यु गेला रायावरी ॥ ६ ॥
युधिष्ठिर, शल्य, विराट, सैंधव। ऐसे महाबळ करिती युद्ध ॥ ७ ॥
सर्वत्र एकचि दिसे रणघाई। कोंदूनियां जाई नाद नभीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीराप्रति वीर। भिडले परस्पर अश्व, गज ॥ ९ ॥

अध्याय ११६ वा ४२२

अभिमन्यु वीर दुर्योधनाप्रति। लढे शरशक्ति योजूनियां ॥ १ ॥
दुर्योधन, अश्वत्थामा, चित्रसेन। उदार होऊन करिती युद्ध ॥ २ ॥
भीष्मवधइच्छा जाणूनि पार्थाची। भिडला अन्यासी अभिमन्यु ॥
भीमसेन करी गजांचें मर्दन। शल्य आणि धर्म लढती क्रोधें ॥ ४ ॥
विराट-सैंधव भिडले रणांत। पार्षत द्रोणांस अडवी वेगें ॥ ५ ॥
भीष्मावरी पार्थ जातां भगदत्त। अडवितां पार्थ निवारी त्या ॥ ६ ॥
शिखंडीसी पार्थ म्हणे त्वरा करीं। पांचाळा, सत्वरी कार्य साधीं ॥
करूनि आक्रोश कौरव धांवले। सैन्य संहारिलें पार्थें त्यांचें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तृणावरी अग्नि। तैसा भीष्म रणीं खवळे क्रोधें ॥९॥

४२३

रथ अग्न्यागार, अर्चि दिव्य चाप। इंधन तें खड्ग शक्ति, गदा ॥१॥
शरसंघज्वाला पसरल्या रणीं। करिती जाळूनि भस्म सेना ॥ २ ॥

व्यर्थ नच जाई तदा भीष्मबाण । करिती पलायन रिक्तरथ ॥ ३ ॥
वीर चतुर्दशसहस्र सोमक । गेले इहलोक सोडूनियां ॥ ४ ॥
अर्जुन, शिखंडीवांचूनि त्या रणीं । धजेनाचि कोणी संगरासी ॥५॥
वासुदेव म्हणे खवळतां सिंह । कोण घाली घाव तयावरी ॥ ६ ॥

अध्याय ११७ वा ४२४

शिखंडी भीष्मासी ताडी दश बाण । न करी निवारण भीष्म त्याचें ॥
पार्थ म्हणे वीरा, त्वरा करीं आतां । अन्य योग्य योद्धा नसे कोणी ॥
ऐकूनि पार्थाचें वचन शिखंडी । प्रखर शरें झोंकी गांगेयातें ॥ ३ ॥
उपेक्षा तयाची करूनियां भीष्म । करी निवारण अर्जुनाचें ॥ ४ ॥
दुःशासन करी अद्भुत विक्रम । अंतीं त्या फाल्गुन सहज जिंकी ॥
सर्प विषतुल्य शिखंडीच्या शरां । मानी जलधारा पितामह ॥ ६ ॥
दुर्योधनवचें सकलहि वीर । धांवले सत्वर पार्थावरी ॥ ७ ॥
वीर परी मर्त्य पांडव हे जाणा । राव म्हणे रणा सिद्ध झालों ॥८॥
वासुदेव म्हणे अग्नि पतंगांसी । पार्थ तेंवी छेदी सकलां क्षणीं ॥९॥

४२५

दीप्तिमंत चाप तळपे गगनीं । शरवृष्टि रणीं करी घोर ॥ १ ॥
दुःशासनालागीं करूनियां विद्ध । घुसती जेंवी सर्प विळामाजी ॥
दुःशासन, कृप, शल्य, विविंशति । पळूनियां जाती विकर्णादि ॥३॥
पूर्वाण्हीं तळपे भास्कराचि दुजा । पूर शोणिताचा वाहूं लागे ॥४॥
छिन्नभिन्न वीर, विच्छिन्न शस्त्रास्त्रें । विखुरलीं तेथें असंख्यात ॥५॥
काक, श्वान, गृध्र, गोमायु संतुष्ट । पाहूनियां तृप्त रक्त, मांस ॥ ६ ॥
राक्षस, पिशाच्चें करिती घोर शब्द । वायुवेगें ध्वज फडकती ॥७॥
अस्त्राभिमंत्रणें भीष्म घाव घेई । शिखंडीतें पाही तदा स्वस्थ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सैन्याचा संहार । ऐसा होई थोर रणामाजी ॥ ९ ॥

अध्याय ११८ वा ४२६

सूत म्हणे राया, ब्रह्मलोकइच्छा । धरूनि वीरांचा यत्न होई ॥ १ ॥
नर-गजभेद गेला विसरूनि । कोणासही कोणी वधिती क्रोधें ॥२॥

शिशिर कुंतन करी धेनुमर्म । तैसें करी भीष्म पांडवांसी ॥ ३ ॥
धनंजय करी अतुल विक्रम । कौरव झटून लढती तदा ॥ ४ ॥
भीष्मावरी जाती सोमक धांवोनि । शतानीक रणीं वधिला भीष्में ॥
विराटभ्रात्याचा पाहूनियां वध । हांका अर्जुनास मारिताती ॥ ६ ॥
भार्गवकृपेनें भीष्म महाबळी । वीर त्रस्त करी पांडवांचे ॥ ७ ॥
कृष्ण म्हणे पार्था, अडवीं भीष्मासी । सामर्थ्य तुजसी एकमेव ॥
ऐकूनियां पार्थ करी घोर युद्ध । शिखंडी भीष्मास शर ताडी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे हांसे सत्यव्रत । सोडी शर पार्थ तीव्र बहु ॥ १० ॥

अध्याय ११९ वा ४२७

वेढिलें भीष्मासी सकळ वीरांनीं । परिघ, शतघ्नी वर्षताती ॥ १ ॥
कवच जाहलें विदीर्ण भीष्माचें । त्रस्त मर्मछेदें होई बहु ॥ २ ॥
खवळूनि करी संचार सर्वत्र । पांडवसैन्यांत येई अंतीं ॥ ३ ॥
प्रखर शरांनीं ताडितां वीरांसी । प्रतिकार त्यासी करिती वीर ॥
शिखंडीशरांनीं व्यथा नच भीष्मा । क्रोध तैं अर्जुना येई बहु ॥ ५ ॥
प्रखर शरांनीं तोडियेलें चाप । द्रोण, भगदत्त पुढती झाले ॥ ६ ॥
निवारण त्यांचें पार्थ करी यत्नें । विद्ध शिखंडीनें केलें सूता ॥ ७ ॥
ध्वजही तोडिला क्षणांत भीष्मांचा । पार्थ तोडी चापा क्रोधावेशें ॥
अन्य चाप घेतां तेंही छेदियेलें । वासुदेव बोले पुढती ऐका ॥ ९ ॥

४२८

पार्थावरी घोर शक्ति । येतां पार्थ क्षणीं छेदी ॥ १ ॥
भीष्म चिंती स्वमनांत । जगीं वीर मी अजिंक्य ॥ २ ॥
अजिंक्य हे पांडवही । अच्युत त्यां साह्य होई ॥ ३ ॥
पुढती पातला शिखंडी । ऐसी झाली स्थिति माझी ॥ ४ ॥
इच्छामृत्यु, अवध्यत्व । वर पित्याचे हे मज ॥ ५ ॥
परी मृत्युकाल आला । ऐसें वाटतें मजला ॥ ६ ॥
चिंतितां हे देववाणी । येई गांगेयाच्या कानीं ॥ ७ ॥
'चिंतिसी तें सत्य जाण । करूं नको घोर रण' ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । तुष्ट शब्द तो ऐकून ॥ ९ ॥

४२९

शुभ अनुकूल दुंदुभीचा नाद । सुटला सुगंधशीतवायु ॥ १
पुष्पवृष्टि देव करिती भीष्मावरी । संभ्रांत अंतरीं पुण्यवंत ॥ २ ॥
सूत म्हणे व्यासप्रसादें ती वाणी । ऐकिली न कोणी भीष्मावीण ॥
पुढती भीष्मानें केलें घोर रण । सोशिले दारुण पार्थशर ॥ ४ ॥
पंचविंशति ते येती पार्थशर । जर्जर शरीर होई तदा ॥ ५ ॥
निवारण करी पार्थाच्या शरांचें । सोशी शिखंडीचे बाण सौख्यें ॥
पार्थ अंतीं क्रोधें तोडी भीष्मचाप । एकामागें एक असंख्यचि ॥७॥
सत्यव्रत बोले दुःशासना, कोण । जिंकील अर्जुन लढतां रणीं ॥८॥
मजही जिंकील ऐसा वीर नसे । शर हे पार्थाचे वज्रासम ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे झांकितांही सूर्य । न झांकेचि कार्य सुजनांचें तें ॥

४३०

दुःशासना, तीव्र शर हे असंख्य । नसती खचित शिखंडीचे ॥ १॥
सर्पासम बाण मर्मी हे झोंबती । खचित नसती शिखंडीचे ॥ २ ॥
प्राणहारक या मजसी वेदना । शिखंडीच्या बाणा बळ नसे ॥ ३ ॥
निश्चयें हे शर श्वेतवाहनाचे । ऐसा वीर मातें दिसला नाहीं ॥ ४॥
ऐसें बोलूनियां शक्ति पार्थावरी । फेंकित छेदिली धनुर्धरें ॥ ५ ॥
धर्माज्ञेनें वीर असंख्य धांवले । घनघोर झालें युद्ध तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कौरवांचें सैन्य । भीष्माचें रक्षण यत्नें करी ॥ ७ ॥

४३१

केलें आच्छादित सैन्य । करिती पांडव संग्राम ॥ १ ॥
वेढा देती गांगेयासी । म्हणती झोडपा सैन्यासी ॥ २ ॥
विद्ध भीष्मांचें शरीर । रिक्त नव्हतेंचि अंगुळ ॥ ३ ॥
वृद्ध व्याकुळ जाहला । सूर्य अस्तासी चालला ॥ ४ ॥
झालें मस्तक पूर्वेसी । पतन पावला गभस्ती ॥ ५ ॥
हाहाःकार थोर झाला । धराधरही कांपला ॥ ६ ॥
रोमरोमीं त्याच्या शर । अधर राहिलें शरीर ॥ ७ ॥
शयन शरतल्पावरी । दिव्य तेज तें शरीरीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वृष्टि । तदा होई पर्जन्याची ॥ ९ ॥

४३२

पडतां पडतां पाहूनि सूर्यासी । दक्षिणायनाची स्मृति होई ॥ १ ॥
' इच्छामरणी हा दक्षिणायनांत । कैसा संगरांत देह ठेवी ' ॥ २ ॥
ऐसी दिव्य वाणी जाहली गगनीं । भीष्म ती ऐकूनि वदती ऐका ॥
पाहूनि सुवेळ त्यजीन मी प्राण । तोंवरी धारण करिन त्यांचें ॥४॥
हंसरूपें गंगा पाठवी ऋषींसी । घालिती वीरासी प्रदक्षिणा ॥ ५ ॥
भीष्म म्हणे मज काळाचें स्मरण । स्वाधीन मरण असे माझें ॥६॥
शरतल्पावरी वीर पहुडला । सिंहनाद केला पांडवांनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कौरव दिङ्मूढ । जाहले मोहित कृप, द्रोण ॥ ८ ॥

४३३

झाले मोहित सकळ । दुर्योधनादि व्याकुळ ॥ १ ॥
करिती रोदन दुःखित । अंग जाहलें गलित ॥ २ ॥
हर्ष पांडव सैन्यासी । वाद्यनाद गगनभेदी ॥ ३ ॥
शस्त्रें ठेविताती दैन्यें । रणामाजी उभय सैन्यें ॥ ४ ॥
कोणी करिती आक्रोश । कोणी जाहले मूर्छित ॥ ५ ॥
क्षत्रधर्मासी निंदिती । कोणी भीष्मातें स्तविती ॥ ६ ॥
करिती प्रशंसा पूर्वज । पितर, ऋषि, सुजनवृंद ॥ ७ ॥
ध्यानमग्न होई भीष्म । योगमार्गी चित्त लीन ॥ ८ ॥
काल प्रतीक्षी गांगेय । वंदी तया वासुदेव ॥ ९ ॥

अध्याय १२० वा

४३४

सत्यव्रत माझ्या पित्याचें पतन । हाय हाय दैन्य राव म्हणे ॥ १ ॥
बालब्रह्मचारी पित्यास्तव, तात । सेनानी बलाढ्य पडला कैसा ॥
हाय हाय वृत्त असह्य हें मज । शिखंडी पित्यास यम व्हावा ! ॥
सूता, सविस्तर निवेदीं रे वृत्त । सूत म्हणे दुःख सकलां होई॥४॥
शमाचा संभव संपला म्हणोनि । पांडवही मनीं खिन्न झाले ॥ ५ ॥
दुर्योधनादींचा तुटला आधार । दुःखाचा सागर उचंबळे ॥ ६ ॥
कौरव-पांडव स्थित सभोंवार । निस्तेज भास्कर अस्तमानीं ॥७॥

'हाय हाय गेला ब्रह्मज्ञ' हा शब्द । चारण, गंधर्व उच्चारिती ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पांडव हर्षित । शोकमग्न होत दुर्योधन ॥ ९ ॥

४३५

दुःशासनमुखें ऐकूनि ते वार्ता । द्रोणां येई मूर्छा परम दुःखें ॥ १॥
तत्काळ सावध होऊनियां सैन्य- । निवारूनि, रण स्तब्ध करी॥२॥
इतस्ततः दूत धाडूनि पांडव । पाचारिती सर्व सैन्यालागीं ॥ ३ ॥
कवचहीन ते उभयहि योद्धे । सभोंवार उभे पाही भीष्म ॥ ४ ॥
वंदूनि तयांसी म्हणे गंगासुत । असावें स्वागत सकलांचें ॥ ५ ॥
दर्शनें सर्वांच्या संतुष्ट अंतर । लोंबतसे शिर पहा माझें ॥ ६ ॥
मजलागीं कोणी द्या रे उपधान । नृपाळ घेऊन येती उशी ॥ ७ ॥
भीष्म म्हणे वीरशय्या हें जाणून । अर्पी उपधान पार्था, मज ॥८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ समयज्ञ । सोडी दिव्यबाण उशाखालीं ॥ ९ ॥

४३६

शिर उचलोनि धरिती ते बाण । योग्य उपधान भीष्म म्हणे ॥ १ ॥
मृदु उपधानें शापितों तुजसी । योग्य न वीरासी उपधान तें ॥२ ॥
वीरहो, पहा हें कर्म अर्जुनाचें । आतां या स्थळातें वास माझा॥३॥
उत्तरायणाची प्रतीक्षा करीन । योग्यवेळीं प्राण जातील हे ॥ ४ ॥
सूर्योपासना मी तोंवरी करीन । पृथक् करा स्थान खंदकें हें ॥५ ॥
त्यागूनियां रण करा आतां शम । येणेंचि कल्याण सकलांचें ॥ ६ ॥
शस्त्रवैद्य आणी दुर्योधन तदा । भीष्म म्हणे आतां वैद्य नको ॥७॥
शल्यांसवें दाह होवो या देहाचा । अंतीं प्राण जातां धर्म हाचि ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि वचन । अर्पितांचि धन वैद्य जाती ॥ ९ ॥

४३७

क्षात्रधर्मनिष्ठ पाहूनि नृपाळ । विस्मित सकळ तयावेळीं ॥ १ ॥
प्रदक्षिणा तीन तीन ते घालूनि । गेले निजस्थानीं दुःखाकुल ॥ २॥
शिबिरांत कृष्ण येऊनि बोलला । विजय लाभला धर्मा आजी ॥३॥
अजिंक्य गांगेय तुझ्या दृष्टिक्षेपें । पावला रणातें पतन शौर्यें ॥४॥
धर्म म्हणे देवा, भक्तांचा आश्रय । प्रसादें विजय भक्तां देसी ॥५॥

निरंतर आम्हां रक्षिसी रणांत । सहजचि प्राप्त विजय तेणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे हांसूनियां कृष्ण । म्हणे हें वचन योग्य धर्मा ॥ ७ ॥

अध्याय १२१ वा ४३८

अन्यदिनीं वीर भीष्मांच्या सान्निध । वंदूनि पदांस तिष्ठताती ॥१॥
लाह्या, पुष्पें, कन्या चंदनाचें चूर्ण । उधळिती जाण भीष्मावरी ॥
असंख्यात जन पातले त्या स्थानीं । वैर विसरूनि वसती वीर ॥
नवग्रहयुक्त आदित्य मंडळ । तैसेंचि तें स्थळ शोभतसे ॥ ४ ॥
शुश्रूषा भीष्मांची घडो हेचि इच्छा । यातना वीराच्या असह्यचि ॥
त्रस्त, दीर्घश्वास सोडी महावीर । मूर्छा वरचेवर येई तया ॥ ६ ॥
नृपांसी पाहूनि शब्द एक 'पाणी'। येई वदनांतूनि गांगेयाच्या ॥
ऐकूनि ते शब्द धांवले नृपाळ । भक्ष्य, शीतजळ आणिताती ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें भीष्म । बोलती वचन ऐका तेंचि ॥ ९ ॥

४३९

भोग काय हे कामाचे । आतां मानव मी नसें ॥ १ ॥
अपेक्षा न लवभरी । ऐशा सुखाची अंतरीं ॥ २ ॥
करितों समयप्रतीक्षा । नका करूं मूढकृत्या ॥ ३ ॥
मज भेटवा तो पार्थ । वंदी तदा पृथापुत्र ॥ ४ ॥
भीष्म म्हणे तयाप्रति । तुझे बाण हे झोंबती ॥ ५ ॥
यथाविधि जळदाता । पात्र तूंचि एक पार्था ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आज्ञा । शिरोधार्य ती फाल्गुना ॥ ७ ॥

४४०

तथेति म्हणोनि पार्थ रथीं वैसे । ओढी प्रत्यंचेतें क्षणामाजी ॥ १ ॥
टणत्कारनादें अवघे भयाभीत । प्रदक्षिणा पार्थ घाली भीष्मा ॥२॥
पर्जन्यास्त्रें बाण सर्वांच्या समक्ष । सोडी दक्षिणेस भूमीवरी ॥ ३ ॥
शीतळ, मधुर, धार उदकाची । अमृततुल्यचि उसळे वरी ॥ ४ ॥
पवित्र त्या जळें पितामह शांत । जाहले कंपित नृप तदा ॥ ५ ॥
शंख, दुंदुभींचा तुमलचि घोष । घुमला नभांत तयावेळीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आनंदित भीष्म । बोलती वचन ऐका पार्था ॥ ७ ॥

४४१

महाबाहो, धनंजया । अजिंक्य तूं देवदेवां ॥ १ ॥
नारायणाच्या प्रसादें । नरा, जिंकिसी सर्वांतें ॥ २ ॥
प्राण्यांमाजीं श्रेष्ठ नर । जलाशयीं तो सागर ॥ ३ ॥
पक्ष्मांमाजी वैनतेय । चतुष्पादांमाजी गाय ॥ ४ ॥
ज्योतिवंतांत आदित्य । हिमालय गिरिश्रेष्ठ ॥ ५ ॥
जातीमाजी श्रेष्ठ विप्र । धनुर्धरांमाजी पार्थ ॥ ६ ॥
कथिलें यास्तव सर्वांनीं । धार्तराष्ट्रासी विनवोनि ॥ ७ ॥
परी बुद्धिभ्रष्ट भ्रांत । शब्दीं न ठेवी विश्वास ॥ ८ ॥
अंतीं भीमगदाघातें । समरीं शयन नृपातें ॥ ९ ॥
ऐकूनि तें दुर्योधन । वासुदेव म्हणे खिन्न ॥ १० ॥

४४२

भीष्म म्हणे राया, ऐक माझी वाणी । अद्वितीय रणीं पार्थ एक ॥
आग्नेय, वारुण, सौम्य तें वायव्य । पाशुपत, ऐंद्र, वैष्णवही ॥ २ ॥
ब्राह्म, पारमेष्ठ्य, प्राजापत्य, धाता । त्वष्टा तैं सविता विवस्वान ॥
ऐसीं सकलास्त्रें जाणितो अर्जुन । तैसाचि श्रीकृष्ण जगामाजीं ॥४॥
अजिंक्य, हा जाण, आचरी शमातें । अंत्य शब्द माझे ऐकें राया ॥
भीष्मवधें अंत होवो या वैराचा । अर्पी अर्धराज्या पांडवांसी ॥६॥
सकलांचा घात नको करूं आतां । ऐकूनि स्वहिता साधीं वेगें ॥७॥
ऐकसिल तरी होईल कल्याण । विनाशचि जाण अथवा अंतीं ॥८॥
बोलतसे ऐसें योगयुक्त भीष्म । परी दुर्योधन हतभागी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मुमूर्षूसी पथ्य । न रुचे रायास तैंवी बोध ॥ १० ॥

अध्याय १२२ वा

४४३

पाहूनियां भीष्ममौन सर्व राजे । गेले स्वस्थळातें निघूनियां ॥ १ ॥
ऐकूनियां वृत्त कर्ण रणांगणीं । भेटला येऊनि भीष्मांप्रति ॥ २ ॥
शरतल्पास्थित निमीलित नेत्र । पाहूनि भीष्मांस गहिंवरे ॥ ३ ॥
भीष्मा,भीष्मा,नित्य द्वेष ज्या कर्णाचा । केलासी तो उभा पुढती तुझ्या
दर्शनासी आलों, ऐकूनि हें भीष्म । उघडी नयन सावकाश ॥ ५ ॥

रक्षकांसी दूर धाडूनियां भीष्म । पृष्ठीं फिरवून हस्त म्हणे ॥ ६ ॥
ये ये कर्णा, माझ्या प्रतिस्पर्धी वीरा । संतोष अंतरा आगमनें ॥ ७ ॥
न येतासी तरी न होतें कल्याण । कथी संभाषण वासुदेव ॥ ८ ॥

४४४

कर्णा, पांडवांचा द्वेष । करूं लागलासी नित्य ॥ १ ॥
गौरवीतां तुजप्रति । पीडिसील पांडवांसी ॥ २ ॥
यास्तवचि अर्धरथ । ऐसें गणिलें मी तुज ॥ ३ ॥
धर्मलोपें तुझा जन्म । संगतीसी दुर्योधन ॥ ४ ॥
कलुषित तेणें बुद्धि । म्हणूनि दुष्ट हे प्रवृत्ति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । करिती स्वहेतुकथन ॥ ६ ॥

४४५

वत्सा, तूं कौंतेय भास्कराचा सुत । नारद वृत्तांत कथूनि गेला ॥
लवमात्र द्वेष न करीं मी तुझा । नीचाश्रयें तुझा अधःपात ॥ २ ॥
कृष्णार्जुनांसम मानितों मी तुज । लेखिलें मी तुच्छ सहेतुक ॥ ३ ॥
पांडववैरानें न होवो संग्राम । इच्छा हे धरून वदलों तैसें ॥ ४ ॥
ब्राह्मणाभिमानी सत्वयोधि, दाता । तुझ्यासम वत्सा, नसे कोणी ॥
लवही न क्रोध आतां तुजवरी । दैवचि हें करी सकळ कांहीं ॥६॥
इच्छिसी जरी तूं प्रिय या भीष्माचें । सख्य पांडवांचें घडो तरी ॥
मजसवें होवो अंत या वैराचा । सुखी क्षत्रियांचा वृंद होवो ॥ ८ ॥
सत्यही व्यवहारीं म्हणे वासुदेव । झांकी कल्याणार्थ ज्ञाता ऐसें ॥

४४६

कर्ण म्हणे सत्य, परी दुर्योधना । आधार न भीष्मा, मजवांचोनि ॥
पांडवांसी कृष्ण तैसा मी तयासी । युद्धांत वीरासी मरण येवो ॥
हेचि इच्छा नित्य धरोनि अंतरीं । ओढिलें समरीं क्षत्रियांसी ॥३॥
वागलों जाणूनि अनिवार्य दैव । आतां अनिवार्य युद्ध जाणा ॥ ४ ॥
अजिंक्य पार्थासी लढेन संतोषें । अनुज्ञा हे मातें असो ताता ॥५॥
अविवेकें, क्रोधें वदलों मी तुज । क्षमा करीं मज दयावंता ॥ ६ ॥

भीष्म म्हणे कर्णा, निरहंभावानें । रणीं श्रेयस्कामें युद्ध करीं ॥ ७ ॥
धनंजयशरें लाभेल सद्गति । अनुज्ञा तुजसी असे मम ॥ ८ ॥
धर्मयुद्ध हेंचि श्रेय क्षत्रियांचें । यत्न मी शमाचे बहुत केले ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीष्मांसी वंदन । पर्व हें संपूर्ण कृष्णार्पण ॥ १० ॥

## भीष्मपर्व समाप्त

---

या भीष्मपर्वाची एकंदर अभंगसंख्या ४४६

पुढील द्रोणपर्वाचा आद्य श्लोक—

जनमेजय उवाच—

तमप्रतिमसत्त्वौजोबलवीर्यसमन्वितम् ॥
हतं देवव्रतं श्रुत्वा पांचाल्येन शिखण्डिना ॥ १ ॥

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग--भारत

(महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ)

## ७ द्रोणपर्व

### द्रोणाभिषेकपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला

१

अप्रतीम सत्व-ओज-बलयुक्त । वधिलें भीष्मांस पांचाळानें ॥ १ ॥
वैशंपायनासी जनमेजय बोले । ऐकूनि हें केलें काय अंधें ॥ २ ॥
येरु म्हणे राव होई शोकाकुल । दुःखें संजयास प्रश्न करी ॥ ३ ॥
संजया, पुत्रांनीं केलें काय सांगें । आधार तयांतें कोण आतां ॥४॥
गावलगणि म्हणे वंदूनि भीष्मांसी । वीर संगरासी सज्ज झाले ॥५॥
पोरकी कौरवसेना तदा भासे । नक्षत्रहीन तें नभ जैसें ॥ ६ ॥
सस्यहीन भूमि, सरिता निर्जल । जैसी अमंगल विधवाचि ते ॥७॥
शरभहतसिंहहीन जैंवी गुहा । ताडिती कौरवां पांडव बहु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्णाचें स्मरण । करीतसे सैन्य तयावेळीं ॥ ९ ॥

२

कर्णा, कर्णा, ऐसा करिती आक्रोश । म्हणती कौरवांस रक्षील तो ॥
अर्धरथी ऐसें वर्णितां त्या भीष्म । मानी अपमान महायोद्धा ॥ २ ॥

युद्ध त्यागूनि तो बैसला क्रोधानें । बोले अभिमानें वनीं जाऊं ॥३॥
पराभूत रणीं होई जरी भीष्म । तरीच संग्राम वद्सी करूं ॥ ४ ॥
ऐशा कर्णवीरा, येई रे सत्वरी । हांका वरचेवरी मारिताती ॥ ५ ॥
अनिवार्य योद्धा जामदग्न्यशिष्य । संकटीं सैन्यास स्मरण त्याचें ॥
देवां विष्णूसम कौरवांसी कर्ण । करील रक्षण ऐसें वाटे ॥ ७ ॥
धृतराष्ट्र म्हणे संजया, राधेय । सांगे करी काय तयावेळीं ॥ ८ ॥
संकटीं जयाचें साह्य तो मानव । म्हणे वासुदेव देव जनीं ॥ ९ ॥

अध्याय २ रा

३

सरसावला कर्ण अंतरीं दुःखित । आठवी भीष्मांस अत्यादरें ॥ १ ॥
म्हणे भीष्मांसम पडतां वीर रणीं । उगवेल दिनमणि कैंवी मानूं ॥
अशक्य तें शक्य, विश्व अशाश्वत । जाहलों मी भ्रांत कैंवी लढूं ॥
परी पांडवांसी वधीन रणांत । अथवा स्वर्गास जाईन मी ॥ ४ ॥
भीमार्जुनादिक सात्यकि, श्रीकृष्ण । शोभवितां रण कोण वांचे ॥५॥
तथापि मी नसें भ्याडही दुर्बल । श्रेष्ठ तपोबल तपा जिंकी ॥ ६ ॥
अचल मी असें आत्मसंरक्षणीं । कर्ण न या जनीं मित्रद्रोही ॥७॥
पराभव होई ऐसेंही पाहून । येईल धांवून तोचि मित्र ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे जाणूनि विश्वास । होई कर्तव्यास सिद्ध कर्ण ॥ ९ ॥

४

पराभव आजी करीन शत्रूचा । राज्य धार्तराष्ट्रा समर्पीन ॥ १ ॥
कनकखचित सूता, तें कवच । चढवीं अंगास शिरस्त्राण ॥ २ ॥
चाप-बाण माझे सर्पतुल्य आणीं । तूणीर भरूनि घेई सर्व ॥ ३ ॥
रथावरी ठेवीं सकल शस्त्रास्त्रें । कमलचिन्हध्वजें सजवीं रथ ॥ ४ ॥
मंत्रोदकें स्नान घालीं दिव्य अश्वां । रथ सिद्ध व्हावा ऐसा सूता ॥
दधिपूर्ण पात्रें कांस्य सुवर्णाचीं । मंगलपुष्पेंसी सिद्ध करा ॥ ६ ॥
वीर हो, या जगीं पांडव अजिंक्य । परी मी रणांत जिंकीन त्यां ॥
अथवा सुखानें जाईन स्वर्गासी । न येवो साह्यासी वीर कोणी ॥८॥
वासुदेव म्हणे सूर्यासम कर्ण । शोभवी स्यंदन वीरश्रेष्ठ ॥ ९ ॥

अध्याय ३ रा ५

पाहूनि रणांत मैनाक तो भीष्म । जाहला उद्विग्न कर्ण मनीं ॥ १ ॥
सद्गदित कंठें वंदी पितामहा । आशीर्वाद द्यावा म्हणे मज ॥ २ ॥
क्षेमकारी म्हणे बोला शब्द दोन । व्यर्थ पुण्यकर्म भासे जनीं ॥३॥
धार्तराष्ट्रां दग्ध करील किरीटी । पार्थ-जगजेठी अग्नि-वायु ॥ ४ ॥
चापटणत्कार, कपीची गर्जना । कांपवील सैन्या क्षणामाजी ॥ ५ ॥
साक्षात् परशुरामा जिंकिलें जयानें । जिंकिलें त्या जेणें ऐसा पार्थ ॥
अनुज्ञा लाभतां ऐशाही वीरासी । वधीन मी ऐसी स्फूर्ति मज ॥
वासुदेव म्हणे नम्रभावें कर्ण । भीष्मांसी वंदून आज्ञा मागे ॥ ८ ॥

अध्याय ४ था ६

भीष्म म्हणे कर्णा, सिंधु सरितांसी । सूर्य नक्षत्रांसी, सुजनां सत्य
भूतांसी पर्जन्य, इंद्र जैं देवांसी । धीर कौरवांसी तैंवी तुझा ॥ २ ॥
कांबोज, अंबष्ठ, विदेह, गांधार । किरातही थोर जिंकिलेसी ॥ ३ ॥
आशीर्वाद असो तुजलागीं कर्णा । आधार तूं सैन्या होईं रणीं ॥४॥
स्नेहचि तो श्रेष्ठ आताहूनि जनीं । साह्य हो संग्रामीं दुर्योधना॥५॥
ऐकूनि ते वाणी वंदूनि भीष्मांसी । पातला रणासी कर्ण वेगें ॥ ६॥
पाहोनि तयासी नृपाळ गर्जले । दंड थोपटिले हर्षें कोणी ॥ ७ ॥
हर्षभरें कोणी करिती टणत्कार । स्वागत सत्कार ऐसा होई ॥ ८॥
वासुदेव म्हणे संकटीं आधार । लाभतांचि धीर वाटे बहु ॥ ९ ॥

अध्याय ५ वा ७

दुर्योधन म्हणे कर्णा । केलें सनाथ तूं आम्हां ॥ १ ॥
करीं विचार हिताचा । मार्ग दाखवीं यशाचा ॥ २ ॥
कर्ण म्हणे राया, तूंचि । मार्ग दाखवीं आम्हांसी ॥ ३ ॥
कथिसील जें उचित । ऐसा आमुचा विश्वास ॥ ४ ॥
दुर्योधन म्हणे भीष्म । गेले शत्रु संहारून ॥ ५ ॥
आतां कोण सेनापति । कर्णा, सांग तुझी मती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । कथी सर्व हे कुलीन ॥ ७ ॥

८

दुर्योधना, शूर सकल हे वीर । रणधुरंधर बुद्धिमंत ॥ १ ॥
तुल्यबल परी करितील स्पर्धा । मुकती स्वहिता ऐशा रीति ॥ २ ॥
यास्तव नृपाळा, आचार्य द्रोणांसी । योजीं सेनापति ऐसें वाटे ॥
शुक्र-बृहस्पतीतुल्य वीर द्रोण । अडवील कोण रणीं तया ॥ ४ ॥
वीर बुद्धिमंत सेनापतिश्रेष्ठ । योजीं तो वरिष्ठ सेनापति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रसंगावांचूनि । पात्रता न ध्यानीं येई लोकीं ॥ ६ ॥

अध्याय ६ वा

९

सूत म्हणे राया, दुर्योधन द्रोणां । जाऊनियां रणा वंदी प्रेमें ॥ १ ॥
म्हणे गुरुराया, विद्या, बल, बुद्धि । विक्रम तैं नीति श्रेष्ठ तव ॥२॥
रुद्रांत कापाली, अग्नि वसूंमाजी । श्रेष्ठ यक्षांमाजी धनद जैसा ॥
मरुद्गणीं इंद्र, द्विजांत वसिष्ठ । तेजांमाजी श्रेष्ठ भास्कर जैं ॥ ४॥
दैत्यांमाजी शुक्र तैसा तूं आमुतें । सांभाळीं सैन्यातें वीरश्रेष्ठा ॥५॥
सेनापति जरी होसी गुरुश्रेष्ठा । जिंकूं तरी पार्था सुखें आम्हीं ॥
जयनाद तदा जाहला द्रोणांचा । करिती सिंहनादा वीर रणीं ॥७॥
वासुदेव म्हणे सत्कार पाहून । दुर्योधना द्रोण वदले ऐका ॥ ८ ॥

अध्याय ७ वा

१०

द्रोण म्हणे वेद षडंगांसहित । अर्थविद्या श्रेष्ठ जाणितों मी ॥ १ ॥
पाशुपतादिक जाणितों मी अस्त्रें । द्रुपदसुतातें न वधीं कदा ॥ २ ॥
घातास्तव माझ्या निर्मिलें तयासी । दावीन वीरांसी बळ माझें ॥
यथाशास्त्र तदा होई अभिषेक । सर्वत्र तैं घोष रणवाद्यांचा ॥ ४ ॥
वेदमंत्रध्वनि संगीताचा नाद । विप्र आशीर्वाद देती सौख्यें ॥ ५ ॥
पराभव वाटे होई पांडवांचा । हर्ष कौरवांचा ऐशारीति ॥ ६ ॥
द्रोणगुरु सिद्ध करिताती व्यूह । कर्णादिक साह्य सकळ योद्धे ॥७॥
भीष्मवधदुःख विसरले योद्धे । पाहूनि कर्णातें अग्रभागीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्णाची प्रशंसा । म्हणती पांडवांचा काळ कर्ण ॥

११

शकटव्यूहासी रचिलें द्रोणानें । क्रौंचव्यूह धर्में सिद्ध केला ॥ १ ॥

अग्रभागीं कृष्णार्जुन विराजती । फडके आकाशीं दिव्यध्वज ॥२॥
कुरुसैन्यामाजी अग्रभागीं कर्ण । इच्छिती दारुण युद्ध दोघे ॥ ३ ॥
भारद्वाज सिद्ध युद्धासी जाहला । आर्त शब्द झाला सैन्यामाजी ॥
कांपली धरणी वायु भयानक । रुधिर-अस्थि-मांसवृष्टि होई ॥ ५ ॥
गृध्र, श्येन, बक, कंक, वायसादि । सेनेच्या भोंवतीं फिरती मोदें ॥
ऐसीं भयंकर जाहलीं दुःश्चिन्हें । परस्पर सैन्यें भिडलीं रणीं ॥७॥
भयाकुल करी द्रोण सैनिकांसी । धृष्टद्युम्न त्यांसी धैर्य देई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संहारितो सैन्य । वीर गुरुद्रोण रथारूढ ॥ ९ ॥

अध्याय ८ ते १० १२

द्रोणाचार्य घोर करिताती संग्राम । युद्ध धृष्टद्युम्न करी बहु ॥ १ ॥
संहारिलें द्रोणें सैन्य अक्षौहिणी । पाडिलें त्यां रणीं धृष्टद्युम्नें ॥२॥
ऐकूनि विलाप करी धृतराष्ट्र । द्रोणांचें महत्व गाई मुखें ॥ ३ ॥
बोलतां बोलतां क्षीण होती त्यासी । म्हणे या वृत्तासी राहूं द्यावें ॥
ऐसें कथी परी असह्य तें दुःख । होऊनि, मूर्छित होई राव ॥ ५ ॥
महाप्रयत्नें तो सावध जाहला । पांडवांच्या बला वर्णीतसे ॥ ६ ॥
धर्म, भीमादि ते पांचही पांडव । वर्णी धृतराष्ट्र इतर योद्धे ॥ ७ ॥
भोजकन्या केली स्वबळें महिषी । वीर तो साह्यासी पार्थशिष्य ॥
वासुदेव म्हणे कृष्णादिकां राजा । म्हणे कैंवी माझा सुत जिंकी ॥९॥

अध्याय ११ वा १३

राव म्हणे सूता, वासुदेव दिव्य । वर्णूं मी प्रभाव कैंवी त्याचा ॥१॥
बालपणीं गोपकुळांत वाढला । दावी बाहुबळा सकळिकांसी ॥ २॥
यमुनातीरासी वधी केशीदैत्य । मृत्यु मूर्तिमंत धेनूंचा जो ॥ ३ ॥
वृषभरूपी त्या वधी बाहुबळें । असंख्य वधिले दैत्य कृष्णें ॥ ४ ॥
जरासंध जया संरक्षी कंसासी । अस्त्राविण त्यासी संहारिलें ॥ ५ ॥
क्रोधी दुर्वासासी करूनि संतुष्ट । मेळवी बहुत वर कृष्ण ॥ ६ ॥
गांधारकन्येच्या स्वयंवरामाजी । जिंकी नृपाळांसी प्रतोदेंचि ॥ ७ ॥
जरासंध, शिशुपालही वधिला । काय वर्णूं लीला श्रीकृष्णाच्या ॥

गगनसंचारी ' सौभ ' शाल्वपुरी । पाडिली सागरीं श्रीकृष्णानें ॥
वासुदेव म्हणे सागरतळासी । लपतां वरुणासी जिंकियेलें ॥ १० ॥

१४

पंचजन दैत्य पातालनिवासी । पांचजन्य त्यासी वधितां लाभे ॥
पारिजात पुष्पें स्वर्गांतूनि आणी । वस्त्रें पुरवोनि नवल केलें ॥ २ ।
भक्तिबळें दिव्यरूप तें पाहिलें । पुढती राहिलें नित्य माझ्या ॥ ३ ॥
अंतपार नसे कृष्णसामर्थ्याचा । महावीर साचा हलधर ॥ ४ ॥
संग्रामीं श्रीकृष्ण लढेल हा जरी । अवनी ही तरी कौंतेयांची ॥ ५ ॥
सारथी जयाचा कृष्ण, रथी पार्थ । कोण त्या रथास प्रतिरथ ॥ ६ ॥
अशक्य यास्तव जय कौरवांचा । सकल वृत्तांता कथन करीं ॥७॥
वासुदेव म्हणे कालाची प्रेरणा । न टळेचि कोणा सिद्धांत हा ॥८॥

१५

सूता, प्राणाहूनि प्रिय । कृष्णालागीं धनंजय ॥ १ ॥
कृष्ण आत्मा अर्जुनाचा । विजय शाश्वत तयाचा ॥ २ ॥
यश मूर्तिमंत कृष्ण । कांहीं वर्णिले सद्गुण ॥ ३ ॥
दुर्योधन मोहवश । ओळखी न श्रीकृष्णास ॥ ४ ॥
मोहित तो दैवयोगें । कृष्ण नारायण स्वांगें ॥ ५ ॥
एकरूप कृष्णार्जुन । यद्यपि तें रूप भिन्न ॥ ६ ॥
जाणें युग विपर्यास । भीष्म-द्रोणांचा हा वध ॥ ७ ॥
मृत्यु न टळे कोणासी । योगी, मुनि, तापसांसी ॥ ८ ॥
वृत्त घोर हें ऐकून । कैसे वांचती हे प्राण ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे राव । करी बहु हाय हाय ॥ १० ॥

१६

व्यर्थ आम्हीं केली असूया धर्माची । ऐश्वर्य तयासी माळ घाली ॥
उपभोग आतां घेई तूंचि धर्मा । ऐसी त्या अनुज्ञा देतों आम्हीं ॥२॥
हाय हाय नाश जाहला दारुण । वज्र होई तृण पक्वपर्णा ॥ ३ ॥
पांडवां ऐश्वर्य लाभेल अनंत । धर्माचा हा कोप नडला आम्हां ॥
अधार्मिक पुत्र माझे सकलहि । सन्निधचि आली घोर वेळ ॥ ५ ॥

अशक्यचि आतां विघ्ननिवारण । दैव ज्ञात्याहून घडवी अन्य ॥६॥
संजया, मजसी व्यर्थ वाटे शोक । कथावा वृत्तांत सकल आतां ॥
वासुदेव म्हणे प्रवाहपतित । कैसा होई स्थित निराधार ॥ ८ ॥

अध्याय १२ वा १७

सूत म्हणे राजा, पाहिलें प्रत्यक्ष । तेंचि आतां वृत्त श्रवण करीं ॥
रणामाजी द्रोण बोलले रायासी । इच्छित वरासी मागें नृपा ॥२॥
दुर्योधन तदा कर्णादि वीरांसी । विचारूनि कथी द्रोणाचार्यां ॥३॥
धर्मासी जिवंत धरूनि आणावें । हेंचि मज द्यावें गुरुश्रेष्ठा ॥ ४ ॥
द्रोण म्हणे कां रे, इच्छिसी न वध । धन्य कुंतीसुत वाटे तेणें ॥५॥
इच्छिसी तयाचें सख्य कीं नृपाळा । शत्रु न तयाला सत्य कीं हें ॥
ऐकूनि नृपाळ बोलला सहज । भाव हृदयस्थ लपेचिना ॥ ७ ॥
राव म्हणे आम्हां एकही पांडव । जिंकील निश्चय ऐसा मम ॥ ८ ॥
यास्तव वधूनि लाभ न धर्मासी । जिंकीन पुनरपि द्यूतीं तया ॥९॥
वासुदेव म्हणे ऐकूनि हें द्रोण । बोलले चिंतून दीर्घदर्शी ॥ १० ॥

१८

द्रोण म्हणे राजा, पार्थाच्या परोक्ष । धरीन धर्मास रणामाजी ॥१॥
पार्थाच्या समक्ष न घडे हें कृत्य । अतर्क्य सामर्थ्य अर्जुनाचें ॥ २ ॥
यास्तव पार्थासी गुंतवूनि दूर । साधीं निजकार्य दुर्योधना ॥ ३ ॥
वधूनि धर्मासी लाभ न हें सत्य । पार्थाचें सान्निध्य नसो तया ॥
क्षण जरी ऐसा लाभेल मजसी । धरीन धर्मासी निश्चयें मी ॥ ५ ॥
ऐकूनि प्रतिज्ञा बालिश हर्षले । लाभला मानिलें धर्म करीं ॥ ६ ॥
प्रतिज्ञा न भंगो म्हणोनि सर्वत्र । कथिला वृत्तांत सेनेमाजी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अतर्क्य ते सत्ता । रक्षी निजभक्तां नानापरी ॥ ८ ॥

अध्याय १३ वा १९

सामर्थ्याद तीं प्रतिज्ञा । हर्ष देई सकल सैन्या ॥ १ ॥
ऐकूनियां धर्मराज । म्हणे पार्था, हो सावध ॥ २ ॥

धनंजय म्हणे धर्मा । कदापि मी न वधीं द्रोणां ॥ ३ ॥
तैसा त्यागही न तुझा । घडेल हा पण माझा ॥ ४ ॥
त्यागीनही रणीं प्राण । परी द्रोणां न वधीन ॥ ५ ॥
धरूनियां राया, तुज । वैरिया न लाभे राज्य ॥ ६ ॥
कोसळेल हें गगन । धरातल होई भग्न ॥ ७ ॥
परी बंधन धर्माचें । अशक्य मी असतां साचें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । देई अभय धर्मास ॥ ९ ॥

२०

पार्थ म्हणे धर्मा, सत्यव्रत तुझें । न भंगेचि माझें वचन तेंवी ॥ १ ॥
पराजय कदा जाहला न माझा । संरक्षीन भ्राता प्राणपणें ॥ २ ॥
पुढती पांडव फुंकिताती शंख । करिती वाद्यघोष कौरवही ॥ ३ ॥
व्यूहसिद्ध सैन्यें करिती घोरयुद्ध । वीर ते अजिंक्य पार्थ-द्रोण ॥४॥
रथारूढ द्रोण अग्रभागीं येती । पार्षत सैन्यासी संहारिती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पराक्रमी द्रोण । रणीं सूर्यासम तळपताती ॥ ६ ॥

अध्याय १४ वा

२१

सृंजयाचें सैन्य होई भयाकुल । द्रोण सोडी शर घोर रणीं ॥ १ ॥
शोणिताची नदी वाहे भयप्रद । वीरां पितृलोक प्राप्त होई ॥ २ ॥
शकुनि, सहदेव, विरथ जाहले । समर जुंपलें द्रुपद-द्रोणां ॥ ३ ॥
विविंशति-भीम, शल्यासी नकुळ । लढले कृपाचार्य-धृष्टकेतु ॥ ४ ॥
कृतवर्म्यालागीं दटावी सात्यकि । विराटें कर्णासी निरोधिलें ॥ ५॥
परी पराभूत राधेय त्या करी । परस्परांवरी चाल ऐसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सेनापति द्रोण । होतां ऐसें कर्म घोर होई ॥ ७ ॥

२२

सौभद्रासी दुर्योधन । अडवी रणांत गर्जून ॥ १ ॥
ताडिताती परस्परां । बाळ भिडे कौरवेंद्रा ॥ २ ॥
रथावरी मारी उडी । केश धरूनि त्या ओढी ॥ ३ ॥
पाडी सारथी लत्तेनें । ध्वज तोडिला खड्गानें ॥ ४ ॥
रणीं फेंकिलें पौरवा । येई मूर्छना तयाला ॥ ५ ॥

निराश्रितासम बाळ । ओढी रायासी फरफर ॥ ६ ॥
पाहूनिय जयद्रथ । वेगें धांव घेई तेथ ॥ ७ ॥
वीर अन्यही तयासी । तयावेळीं साह्य होती ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बाळ । दावी विक्रम सबळ ॥ ९ ॥

२३

निवारूनि वीरां जयद्रथावरी । धांवला सत्वरी पार्थसुत ॥ १ ॥
पक्षयुक्त गिरि भासले ते वीर । कोंडिला सौभद्र कौरवांनीं ॥ २ ॥
सोडूनि सैंधवा सौभद्र त्या वेळीं । अन्य वीरांवरी धांव घेई ॥३ ॥
शल्यें शक्तिछेद केला स्वखड्गानें । भयाकुल सैन्यें कौरवांचीं ॥४॥
पाहूनि विक्रम धन्य धन्य शब्द । वीरांच्या मुखांत सहज येई ॥५॥
गर्जती पांडव वीर आनंदानें । खवळूनि सैन्यें पुढती येती ॥ ६ ॥
पर्वतशिखरीं जेंवी जलधारा । वर्षती तैं शरां बाळावरी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शल्यही धांवला । सौभद्रानें केला पराक्रम ॥ ८ ॥

अध्याय १५ वा

२४

राव म्हणे सूता अलौकिक युद्ध । पहावें प्रत्यक्ष ऐसें वाटे ॥ १ ॥
अभिमन्यु-शल्य दोघे अतिवीर । लढले तें समग्र वृत्त सांगें ॥ २ ॥
सूत म्हणे राया, वीर मद्रपति । गदा घेई हातीं पाही भीम ॥ ३ ॥
होऊनियां पुढें निवारी बाळासी । आव्हान शल्यासी स्वयें देई ॥४॥
मद्रपति तदा धांवे भीमावरी । गदा गदेवरी आदळली ॥ ५ ॥
विस्फुलिंग जेंवी मशकान्वित वृक्षीं । वर्षाकाळीं रात्रीं शोभती ते ॥६॥
गजावरी गज, व्याघ्रावरी व्याघ्र । करिताती विद्ध एकमेकां ॥ ७ ॥
अंतीं एकमेक जाहले मूर्छित । उठला त्वरित भीमसेन ॥ ८ ॥
कृतवर्मा घेई शल्यासी स्वरथीं । हर्ष पांडवांसी विजयाचा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दशदिशा व्याप्त । घुमे हर्षनाद पांडवांचा ॥ १० ॥

अध्याय १६ वा

२५

वृषसेन तदा धांव घेई क्रुद्ध । अडवी शतानीक नकुलपुत्र ॥ १ ॥
तोडूनि तयाचा ध्वज फोडी चाप । द्रौपदीचे सुत पुढती येतां ।

वात्सल्यें पांडव-कौरव पातले । समर जुंपलें घोर तदा ॥ ३ ॥
कौरवसेनेची होई दाणादाण । पाहूनियां द्रोण खवळे सिंह ॥ ४ ॥
युधिष्ठिरावरी धांव घेई वेगें । तोडूनि तयाचें चाप गर्जे ॥ ५ ॥
संरक्षी नृपासी पांचालकुमार । येती धन्योद्गार रणामाजी ॥ ६ ॥
द्रोणाचार्य त्याचा करी शिरच्छेद । धांवे व्याघ्रदत्त द्रोणावरी ॥७॥
सिंहसेनासवें व्याघ्रदंताप्रति । दाविली स्वर्गाची वाट द्रोणें ॥८॥
गांठी द्रोण धर्मा अंतकासमान । वर्णी ता संग्राम वासुदेव ॥ ९ ॥

२६

वांचवा धर्मासी, वांचवा धर्मासी । शब्द हा एकचि ऐकू यइ ॥१॥
म्हणती दुर्योधन कृतार्थ संग्रामीं । धर्मासी या क्षणीं धरिती द्रोण ॥
इतुक्यांत रथघोष ऐकूं येई । पार्थ तया ठाई प्राप्त झाला ॥ ३ ॥
कापून सैन्यासी काढूनियां मार्ग । गांठिलें गुरूंस वायुवेगें ॥ ४ ॥
रुधिराचा पूर वाढे तदा रणीं । व्यापिलें शरांनीं पार्थें रण ॥ ५ ॥
आच्छादितां नभ तमचि दाटला । अस्तंगत झाला भास्करहि ॥६॥
द्रोण तयावेळीं आंवरी सैन्यासी । पार्थही तैसेंचि निजसैन्या ॥ ७ ॥

---

## संशप्तकवधपर्व २

अध्याय १७ वा २७

सूत म्हणे राया, शिबिरामाजी द्रोण । नृपासी वचन वदती दुःखें ॥
रणामाजी पार्थ असतां धर्मासी । धरणें अशक्यचि कथिलें पूर्वी ॥
अन्यस्थानीं जरी नेसील पार्थासी । धरीन धर्मासी सहज तरी ॥३॥
पलायन तेंही आम्हां विजयप्रद । ऐकूनि त्रिगर्त वदला क्रोधें ॥ ४ ॥
बंधुत्रयाची हे ऐकावी प्रतिज्ञा । दारुण संग्रामा करूं आतां ॥ ५ ॥
संहार पार्थाचा करूं रणामाजी । त्रिगर्तशून्यचि अथवा भूमि ॥६ ॥
सत्यरथ, सत्यधर्मा, सत्यव्रत । जाहले त्रिगर्त सिद्ध रणा ॥ ७ ॥
मालवासवें तो सिद्ध तुंडकेर । चाळीस सहस्र सजले रथ ॥ ८ ॥
विंशति सहस्र आणीक हे वीर । वासुदेव घोर वर्णी रण ॥ ९ ॥

२८

दिल्या आहुती अग्नीसी । घृत मर्दिलें अंगासी ॥ १ ॥
विप्रां धेनु धन, वस्त्रें । अर्पूनियां तोषविलें ॥ २ ॥
घेऊनियां समरदीक्षा । सिद्ध होती घोर युद्धा ॥ ३ ॥
म्हणती वधूं अर्जुनास । पलायनें, महापाप ॥ ४ ॥
तेंवी शरणागतत्याग । गृहा लाविती जे आग ॥ ५ ॥
करिती गोवध जे कोणी । विप्रद्वेष ज्यांच्या मनीं ॥ ६ ॥
ऐसीं पातकें आम्हांसी । नच होतां वचनपूर्ती ॥ ७ ॥
समरांगणीं जातां प्राण । लाभे आम्हां पुण्यस्थान ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे घोर । प्रतिज्ञा ते करिती वीर ॥ ९ ॥

२९

पार्थालागीं रणीं त्रिगर्त आव्हान । देतां तो वचन बोले धर्मा ॥ १ ॥
राया, व्रत माझें करीन मी पूर्ण । त्रिगर्तां वधीन आज्ञा देई ॥ २ ॥
धर्म म्हणे पार्था, प्रतिज्ञा गुरूची । आठवूनि चित्तीं युद्ध करीं ॥३॥
पार्थ म्हणे तुज रक्षी सत्यजित । स्मरूनि द्रोणांस निःसंशय ॥ ४ ॥
वधचि तयांचा होतां क्षणभरी । न राहीं संगरीं ध्यानीं असो ॥५॥
बोलूनियां ऐसें अनुज्ञा घेऊनि । सन्नद्ध होऊनि पार्थ जाई ॥ ६ ॥
क्षुधित शार्दूलासम घेई झेंप । त्रिगर्तांचा वध करूं म्हणे ॥ ७ ॥
हर्षे दुर्योधन धराया धर्मासी । प्रवर्ते युद्धासी उत्साहानें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सेनेमाजी सेना-। मिळाली, त्या क्षणा युद्ध घोर ॥९॥

अध्याय १८ वा

३०

संशप्तक हृष्ट रणांगणीं स्थित । पार्थ श्रीकृष्णास वदे तदा ॥ १ ॥
सद्गति लाभेल हाचि यांसी हर्ष । बोलूनि हें शंखनाद केला ॥ २ ॥
ऐकूनि तो शब्द अश्व देहधर्म-। करिताती, सैन्य मूर्छा पावे ॥ ३ ॥
सावध ते होतां संगराची घाई । शरवृष्टि होई पार्थावरी ॥ ४ ॥
सुशर्मा, सुरथ, सुबाहु, सुधर्मा । करिती संग्रामा सुधनु तेही ॥५॥
सुधन्व्याचें शिर तोडिलें पार्थानें । भयाकुल सैन्यें पळती मागें ॥
सुशर्मा तयांसी धैर्यें करी स्थिर । वासुदेव घोर समर कथी ॥ ७ ॥

अध्याय १९ वा ३१

संशप्तकगण अंगावरी येतां । द्विगुणित पार्था वळ चढे ॥ १ ॥
नारायणगण येती पार्थावरी । सोडी तयांवरी त्वाष्ट्र अस्त्र ॥ २ ॥
सर्वत्र त्या योगें पार्थचि भासतां । क्रोधें वधिताती एकमेकां ॥ ३ ॥
नारायणगण ऐसे रणीं भ्रांत । जळीं-स्थळीं पार्थ-गोविंद त्यां ॥ ४ ॥
ऐसा त्यांचा क्षय होतां अन्यवीर । रणीं शरजाल वर्षताती ॥ ५ ॥
कृष्ण म्हणे पार्था, न दिससी कोठें । पार्थ वातास्त्रातें जपीतसे ॥६॥
तेणें शरजाल जाई तें उडूनि । छिन्नभिन्न रणीं करी वीरां ॥ ७ ॥
मृतसंशप्तकव्याप्त रणस्थान । अन्यत्र दारुण द्रोणयुद्ध ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्माचें बंधन । इच्छी दुर्योधन मनामाजी ॥ ९ ॥

अध्याय २० वा ३२

अन्यदिनीं द्रोण सुपर्णव्यूहेंसी । धर्मबंधनाची इच्छा धरी ॥ १ ॥
प्राग्जोतिषाचा सालंकार गज । झळके रणांत सूर्यासम ॥ २ ॥
पार्षतासी धर्म म्हणे विप्रहस्तीं । गवसें न ऐसी सेना योजीं ॥ ३ ॥
धृष्टद्युम्न म्हणे राया, मम प्राण । तोंवरी बंधनभय नसे ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें पार्षत धांवला । दुर्मुख जाहला आड तया ॥ ५ ॥
रोमहर्षण तें जाहलें संगर । अचानक विप्र धर्मा ताडी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मृतही जिवंत । मानूनियां युद्ध करिती वीर ॥ ७ ॥

अध्याय २१ वा ३३

महासिंह जैवी धांवे गजावरी । तैसा धर्मावरी द्रोण धांवे ॥ १ ॥
पांडवसैन्यांत हाहाःकार होई । धर्म हातघाई करी शौर्यें ॥ २ ॥
द्रोणावरी तदा धांवे सत्यजित । द्रोणाच्या सुतास विद्ध करी ॥३॥
ध्वजही गुरूंचा छेदिला तयानें । पांचाल-वृकानें विद्ध केलें ॥ ४ ॥
वृक सत्यजित अडविती द्रोणा । दारुण संग्रामा करिती क्रोधें ॥५॥
खवळला तदा द्रोण महासिंह । केला शिरच्छेद उभयांचा ॥ ६ ॥
भयाकुल धर्म जाई तदा दूर । कोसलादि वीर साह्य होती ॥ ७ ॥
विराटानुज तैं धांवे शतानीक । द्रोण शिरच्छेद करिती त्याचा ॥८॥
वासुदेव म्हणे मत्स्यवीर तदा । त्यागूनियां युद्धा पळूनि जाती ॥९॥

३४

चेदि केकयादिकांसी। द्रोण वारंवार जिंकी ॥ १ ॥
अंतीं होऊनि एकत्र। चाल करिती द्रोणांवर ॥ २ ॥
परी गुरु महाबळी। दैना सकलांची केली ॥ ३ ॥
वसुदानासी मारिलें। क्षत्रवर्म्यासी पाडिलें ॥ ४ ॥
युधामन्यु सात्यकीसी। विद्ध केलें त्या क्षणासी ॥ ५ ॥
अंतीं धर्मावरी धांव। वेगें घेई गुरुराव ॥ ६ ॥
आठवूनि पार्थवाणी। धर्म जातसे पळूनि ॥ ७ ॥
पुढती घोरयुद्ध झालें। द्रोणें वीर संहारिले ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कंप। वीरांसही सुटला तेथ ॥ ९ ॥

अध्याय २२ वा ३५

राव म्हणे सूता, तया संग्रामांत। वांचले कितीक वीर सांगें ॥ १ ॥
सूत म्हणे राया, प्रवाहपतित नावेसम देख पळती वीर ॥ २ ॥
पाहूनि हर्षानें बोले दुर्योधन। रणवाद्यस्वन करूनि कर्णा ॥ ३ ॥
पहा पहा वीरा, सैन्याची ही दैना। कोण आतां रणा फिरूनि येई ॥
निराश होतील पांडव खचित। कर्ण म्हणे व्यर्थ बोल तुझे ॥ ५ ॥
खवळतां भीम करील संग्राम। साह्यार्थ धांवून जाऊं द्रोणां ॥ ६ ॥
तदा सबांधव राव धांव घेई। एकाकीचि पाही गुरूलागीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सकळ हे वीर। करिताती घोर युद्ध क्रोधें ॥ ८ ॥

अध्याय २३ वा ३६

राव म्हणे सूता, पांडव वीरांचीं। चिन्हें स्यंदनाचीं कथन करीं ॥
सूत म्हणे राया, अश्व कृष्णवर्ण-। भीमाचे संग्राम करिती घोर ॥२॥
सात्यकीचे शुभ्र, युधामन्युअश्व। सारंगाचे पक्ष तेवी वर्णें ॥ ३ ॥
कपोतवर्ण ते धृष्टद्युम्नअश्व। क्षत्रवर्मा रक्तअश्व योजी ॥ ४ ॥
हरितवर्ण ते अश्व शिखंडीचे। कांबोज देशींचे नकुळअश्व ॥ ५ ॥
उत्तमौजाचे ते अश्व मेघवर्ण। तित्तिरचि जाण सहदेवाचे ॥ ६ ॥
हस्तिदंतासम अश्व ते धर्माचे। पुच्छभागीं होते कृष्णवर्ण ॥ ७ ॥

द्रुपदअश्वांसी विराजे तिलक । जैसे इंद्रगोप केकयांचे ॥ ८ ॥
विराटाचे अश्व पाटली वर्णाचे । वर्णितो आनंदें वासुदेव ॥ ९ ॥

३७

शुभ्रवर्ण अश्व ग्रीवा कृष्णवर्ण । तुरग ते जाण प्रतिविंध्याचे ॥ १ ॥
पिंगटवर्णाचे वारु सुतसोमा । पार्थाच्या नंदना हर्ष देती ॥ २ ॥
सोमयागकाळीं जन्मला म्हणूनि । सुतसोम जनीं नाम त्यातें ॥ ३ ॥
शतानीकहय बालरवीसम । द्रौपदेयां जाण मयुरकंठी ॥ ४ ॥
कपिलवर्ण तो सौभद्रवाजींसी । युयुत्सुरथासी पिंगट ते ॥ ५ ॥
विक्रमी सागरध्वज पांड्यराज । रत्नमालायुक्त अश्वरथीं ॥ ६ ॥
घटोत्कचाचे ते भिन्नवर्ण अश्व । अरट्ट देशस्थ बृहंतासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर देवांसम । शोभविती स्थान उत्साहानें ॥ ८ ॥

३८

हेम कमंडलु कृष्णाजिनयुक्त । भारद्वाजोद्भव ऐसा शोभे ॥ १ ॥
विराजला सिंह भीमध्वजावरी । धर्म ध्वजावरी मृदंग ते ॥ २ ॥
नंद-उपनंद वाजती यंत्रानें । उल्हास त्या स्वनें सैनिकांसी ॥ ३ ॥
शरभ, हंस ते नकुल-सहदेवां । चिन्हें द्रौपदेयां यमादिक ॥ ४ ॥
सौभद्राच्या ध्वजीं शार्ङ्गपक्षी शोभे । हिडिंबासी साजे गृध्रकेतु ॥
महेंद्र धर्मासी, भीमासी वायव्य । चाप तें गांडीव अर्जुनाचें ॥ ६ ॥
नकुल-सहदेवां वैष्णव-आश्विन । पौलस्त्य दारुण घटोत्कचा ॥ ७ ॥
रौद्र, आग्नेय तें कौबेरही याम्य । गिरीश हीं जाण द्रौपदेयां ॥ ८ ॥
अभिमन्युलागीं बलरामदत्त धनुष्य तें रौद्र शोभा देई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसे महावीर । हर्षें द्रोणां शर ताडिताती ॥ १० ॥

अध्याय २४ वा ३९

राव म्हणे सूता, दैवदुर्विलास । वनचारी पार्थ लढती रणीं ॥ १ ॥
दैवयोगें राज्य लाभलें पुत्रासी । वाटे दैवगति विचित्र हे ॥ २ ॥
दुर्योधनावरी विश्वासलों व्यर्थ । कथिलें साह्य मज सकल राजे ॥
दुर्लक्षित केली वाणी विदुराची । ज्ञातिक्षय आजी प्राप्त झाला ॥ ४ ॥
धर्म सोडूनि जो अर्थपरायण । अधःपात जाण निश्चयें त्या ॥ ५ ॥

न्याय तोचि आजी ठाकला पुढती । वृत्तांत मजसी सकल कथीं ॥
वासुदेव म्हणे अंतीं पश्चात्ताप । न टळे कोणास घडतां पाप ॥ ७ ॥

अध्याय २५ वा ४०

प्रोत्साहित करी वीरां दुर्योधन । प्रवर्तलें रण घोर तदा ॥ १ ॥
भीमावरी धांवे दुर्योधन क्रोधें । ताडी शराघातें भीम त्यासी ॥ २ ॥
सात्यकि द्रोणांसी लढतां कृतवर्मा । अडवी, क्षत्रवर्मा ताडी तया ॥
प्रतिकार त्याचा करी जयद्रथ । दटावी धर्मास शल्य रणीं ॥ ४ ॥
युधिष्ठिर त्याचें चाप-ध्वज छेदी । भय सैनिकांसी तयावेळीं ॥ ५ ॥
वाल्हिक, द्रुपद लढती परस्पर । द्रोणां ताडी शर शतानीक ॥ ६ ॥
आड येतां भूतकर्म्याचा विनाश । करी शतानीक परम क्रोधें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शाल्वराजाप्रति । भीमरथ वधी प्रखर शरें ॥ ८ ॥

४१

श्रुतकर्मा विविंशति । परस्परांसी ताडिती ॥ १ ॥
इतुक्यांत प्रतिविंध्य । येई द्रोणांच्या समीप ॥ २ ॥
अडवी तया अश्वत्थामा । द्रौपदेय करिती रणा ॥ ३ ॥
लक्ष्मणासी सागरपति । उत्तमौजा अंगदासी ॥ ४ ॥
द्रोणांवरी पुरुजित । अडवी तया वत्सदंत ॥ ५ ॥
कर्ण निवारी केकयां । काश्यादिक जय-विजयां ॥ ६ ॥
अडवूनि वृषसेना । घटोत्कच पाही द्रोणां ॥ ७ ॥
पुढती धांवे अलंबुष । लढती शौर्यें दोघे दैत्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्वंद्व । लढती कौरव-पांडव ॥ ९ ॥

अध्याय २६ वा ४२

महारण तदा केलें कौरवांनीं । धार्तराष्ट्र रणीं गर्जतसे ॥ १ ॥
दुर्योधन क्रोधें आव्हानी भीमासी । भीम गजेंद्रासी उधळी वेगें ॥
पाहूनि नरेंद्र क्रोधें धांव घेई । भीमासवें होई युद्ध त्याचें ॥ ३ ॥
मारूनियां गज चापही तोडिलें । भीमानें धरिलें दुर्योधना ॥ ४ ॥

अंगराज तदा धांवूनियां येतां । शराघातें गजा संहारिलें ॥ ५ ॥
म्लेच्छपति वेगें पडतां भूमीसी । भीम वेगें छेदी शिर त्याचें ॥ ६ ॥
रथ, अश्व, गज, करिती पलायन । तुडविती सैन्य कौरवांचें ॥ ७॥
वासुदेव म्हणे क्रोधें भगदत्त । धांव गजारूढ घेई रणीं ॥ ८ ॥

४३

ऐरावत कुलोद्भव । गज त्याचा घेई धांव ॥ १ ॥
शुंडा संकुचित करी । धांव घेई भीमावरी ॥ २ ॥
त्याचें पाहूनि उड्डाण । भासे घेई भीमप्राण ॥ ३ ॥
चूर्ण होतां स्यंदनाचें । भीम वांचे दैवयोगें ॥ ४ ॥
त्याच्या उदराखालीं स्थित-। होऊनि, त्या ताडी क्रुद्ध ॥ ५ ॥
गरगरां फिरे गज । इच्छूनियां चरणाघात ॥ ६ ॥
भीम सन्मुख ठाकला । करी आघात गजाला ॥ ७ ॥
झाला अनर्थ त्या वेळीं । गज भीमासी आंवळी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । गेला चापल्यें निसटून ॥ ९ ॥

४४

पुनरपि भीम अधोभागीं लपे । गजश्रेष्ठ त्यातें तुडवूं इच्छी ॥ १ ॥
साह्याची अपेक्षा करी तदा भीम । न येई धांवून परी कोणी ॥ २ ॥
मारिलें भीमासी हाचि शब्द येई । दुःखाकुल होई धर्मराजा ॥ ३ ॥
धांवूनि पुढती अडवी भगदत्ता । वीर तो अनेकां विद्ध करी ॥ ४ ॥
निज अंतकाळ पाहूनियां भीम । गेला होता प्राण वांचवोनि ॥ ५ ॥
भगदत्त घेई दाशार्णाचे प्राण । कोंडी तया धर्म महायत्नें ॥ ६ ॥
सुप्रतीक फेंकी सात्यकीचा रथ । सारथी सावध करी अश्वां ॥७ ॥
इतुक्यांत गजश्रेष्ठ फेंकी रथां । पांडवांसी त्राता न दिसे कोणी ॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें भीम । गर्जना करून धांव घेई ॥ ९ ॥

४५

पाहोनि भीमासी सुप्रतीक गज । अश्वांवरी जल फेंकी बहु ॥ १ ॥
त्रस्त अश्व नेती भीमसेना दूर । रुचिपर्वा वीर पुढती धांवे ॥ २ ॥
सुपर्वा तयाचा शिरच्छेद करी । धांवले सत्वरी वीर तदा ॥ ३ ॥
युयुत्सूचा सुत मारिला गजानें । युयुत्सूसी यत्नें मार्ग लाभे ॥ ४ ॥

रणधाईमाजी दुर्योधन भ्रांत । सौभद्र रणांत उडी घेई ॥ ५ ॥
जाणूनि तत्काळ उतरला खालीं । गेला अन्यस्थळीं कौरवेंद्र ॥ ६ ॥
भगदत्तें ऐसा आकांत मांडिला । हाहाःकार झाला सैन्यामाजी ॥
वासुदेव म्हणे सुप्रतीक एक । भासला अनेक पांडवांसी ॥ ८ ॥

अध्याय २७ वा ४६

पार्थ म्हणे कृष्णा, सुप्रतीक गज । आणिला रणांत भगदत्तें ॥ १ ॥
महाबलशाली गज तो एकाकी । वधील सैन्यासी लीलामात्रें ॥२॥
कदा न तो श्रांत, अग्नीही न बाधे । प्रहार तयांचे व्यर्थ तया ॥३॥
कृष्णा, त्या गजाचा शब्द येई कानीं । रथ ने त्या स्थानीं संहारूं त्या ॥
ऐकूनि कृष्णानें हांकितांचि र धांव संशप्तक घेती तदा ॥ ५ ॥
आव्हान पार्थासी गर्जूनियां देती । द्विधाभाव चित्तीं अर्जुनाच्या ॥
चिंतूनियां अंतीं आव्हान स्वीकारी । संशप्तकांवरी धांव घेई ॥ ७ ॥
धर्मप्रेमें पार्थ होईल अस्वस्थ । पुढती विनाश करूं त्यांचा ॥ ८ ॥
ऐसी योजनाही केली दुर्योधनें । वासुदेव म्हणे पुढती ऐका ॥ ९ ॥

४७

तयावेळीं चमत्कार । करी पार्थ धनुर्धर ॥ १ ॥
संशप्तक आच्छादिती । शरवर्षाव करिती ॥ २ ॥
जनार्दनही मोहित । पाहूनियां क्रुद्ध पार्थ ॥ ३ ॥
जपे ब्रह्मास्त्र क्रोधानें । केला संहार अस्त्रानें ॥ ४ ॥
क्षणामाजी तया स्थळीं । छिन्न शिरें विखुरलीं ॥ ५ ॥
छिन्नभिन्न सकलवीर । आदळती ते सर्वत्र ॥ ६ ॥
धन्य धन्य ऐसा शब्द । कृष्ण अंतरीं विस्मित ॥ ७ ॥
कर जोडूनि धर्मासी । म्हणे धन्य तूं या लोकीं ॥ ८ ॥
पार्थ म्हणे भगदत्ता- । गाठूं, वेगें हांकी रथा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे देव । साह्य होतां विघ्न काय ॥ १० ॥

अध्याय २८ वा ४८

द्रोणसैन्यावरी धांवतां अर्जुन । सुशर्मा आव्हान देई तया ॥ १ ॥
पार्थ म्हणे कृष्णा, श्रेयस्कर तेंचि । आचरीं संकटीं तूंचि आतां ॥

तयावेळीं कृष्ण नेऊनि स्यंदन । संशप्तकां बाण ताडीं म्हणे ॥ ३ ॥
मोहित करूनि सुशर्म्यासी पार्थ । बांधवांचा वध करीतसे ॥ ४ ॥
अडवी तयासी कोण रणामाजी । ठाकला पुढती भगदत्ताच्या ॥५॥
भग्न नौकेसम कौरवांचें सैन्य । होई छिन्नभिन्न तयावेळीं ॥ ६ ॥
शत शत वीर फिरूनि धांवले । मर्दन मांडिलें परी पार्थे ॥ ७ ॥
भगदत्त शौर्यें अंगावरी घेई । गजही त्या ठाई नृत्य मांडी ॥ ८ ॥
पाठमोरा त्यासी न वधी अर्जुन । शास्त्रशुद्ध रणयोद्धा पार्थ ॥ ९ ॥
वासुदव म्हणे क्षुब्ध धनंजय । पाहूनि संहार सैनिकांचा ॥ १० ॥

अध्याय २९ वा ४९

राव म्हणे सूता, काय करी पार्थ । जातां भगदत्त अंगावरी ॥ १ ॥
सूत म्हणे तदा मृत्यूच्या मुखांत । कृष्णासवें पार्थ म्हणती जन ॥
परी पार्थ भेदी कवच गजाचें । करी शराघातें विद्ध तया ॥ ३ ॥
भगदत्त शक्ति ताडी श्रीकृष्णासी । शराघातें छेदी पार्थ मार्गी ॥ ४ ॥
अन्य शरें ध्वज छतही पाडिलें । तोमर फेंकिलें भगदत्तें ॥ ५ ॥
आघातें किरीट उलट जाहला । किरीटी गर्जला तयावेळीं ॥ ६ ॥
भगदत्ता घेई पाहूनि हें जग । पुढती दुर्लभ दर्शन हें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध भगदत्त । ऐकूनियां पार्थवचन धांवे ॥ ८ ॥

५०

छिन्न चाप तेंवी तूणीरही भग्न । करी तो अर्जुन परम क्रोधें ॥ १ ॥
अभिमंत्री तदा अंकुश भगदत्त । योजी वैष्णवास्त्र तयावरी ॥ २ ॥
पार्थवक्षस्थळीं फेकीतसे वेगें । कृष्ण करी मागें अर्जुनासी ॥ ३ ॥
निजवक्षस्थळीं घेतला कृष्णानें । अवलोकिती सैन्यें भक्तप्रेम ॥ ४ ॥
अद्भुत त्या वेळीं होई चमत्कार । वैजयंती हार त्रिशूळाचा ॥ ५ ॥
मालेमाजी तया कमलांचे गुच्छ । चंद्र-सूर्य तेज एकत्र तें ॥६॥
रणांत वायूनें कंपित ती माला । अधिक शोभला घनःशाम ॥ ७ ॥
पार्थ म्हणे देवा प्रतिज्ञेचा भंग । करिसी कां सांग अकारण ॥ ८ ॥
करीं माझ्या चाप असतां रणांत । यमही प्रत्यक्ष दुर्बळचि ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वैष्णवास्त्रवृत्त । कृष्ण अर्जुनास कथन करी ॥ १० ॥

५१

रूप चतुष्टय धरूनियां पार्था । रक्षितों मी जगा सर्वकाल ॥ १ ॥
बद्रिकाश्रमीं नारायणरूपें । आचरीं तपातें धनुर्धरा ॥ २ ॥
परमात्मरूपें अवलोकीं जगा । क्षेत्रज्ञ स्वमार्गा क्रमीतसें ॥ ३ ॥
सहस्राब्द निद्रा घेई जलशायी । उठतां वर देई योग्य जनां ॥ ४ ॥
ऐशावेळीं भूमि भौमासुरास्तव । मागूनियां वर घेई एक ॥ ५ ॥
वैष्णवास्त्र तदा दिधलें तयासी । अजिंक्य तो लोकीं होई तेणें ॥
तेंचि भगदत्ता लाभे वैष्णवास्त्र । अवध्य तयास नसे कोणी ॥ ७ ॥
विफल तें केलें प्राग्ज्योतिषासी । वधूनि देवांसी सुखी करीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णवचनें । झांकिलें शरानें पार्थें सैन्य ॥ ९ ॥

५२

प्रखर नाराच शर गजावरी । सोडिला त्या वेळीं अर्जुनानें ॥ १ ॥
गजगंडस्थळ फोडूनि तो शर । शिरला सत्वर धरणीमाजीं ॥ २ ॥
प्रेरणा गजासी करी भगदत्त । न मानीचि गज परी कांहीं ॥ ३ ॥
निर्धनाची कांता न मानी पतीसी । तैसी भगदत्ताची आज्ञा भंगे ॥
गज तरी काय करील विचारा । जाहला घाबरा प्राण त्याचा ॥५॥
क्लेशें आर्तशब्द करूनियां अंतीं । गेला यमलोकीं तत्काळचि ॥ ६ ॥
कृष्ण म्हणे वृद्ध गलित-पलित । देहेंसी रणांत लढतो पहा ॥ ७ ॥
पापण्या तयाच्या नसती स्वाधीन । बंधनेंचि जाण उघडी नेत्र ॥८॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तो शब्द । तोडी नेत्रबंध भगदत्ताचा ॥ ९ ॥

५३

बंधन छेदितां झांकले नयन । पसरला तम सर्वत्राचि ॥ १ ॥
मागोमाग सोडी अर्धचंद्र शर । विदीर्ण शरीर करी ऐसा ॥ २ ॥
तत्काळचि देह पडला रणांत । हेममालायुक्त भगदत्ताचा ॥ ३ ॥
गिरिशिखरस्थ कर्णिकार वृक्ष । भासे सकळांस पडतां रणीं ॥ ४ ॥
इंद्रासवें सख्य होतें ज्या वीराचें । ऐसीया वीरातें वधिलें रणीं ॥५॥
झंजावात वनीं तैसाचि अर्जुन । संहार दारुण करीतसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नाहीं सान-थोर । तुटतां आधार सत्कर्मांचा ॥ ७ ॥

अध्याय ३० वा ५४

सव्य घालूनि त्या वृद्धासी अर्जुन । जातां वीर दोन आड येती ॥१॥
अचल, वृषक, पुत्र गांधाराचे । मागें पुढें दोघे ताडिती त्या ॥ २ ॥
तिलप्राय रथ करी वृषकाचा । वीरां अर्धशतां संहारिलें ॥ ३ ॥
भ्रात्याच्या स्यंदनीं चढला वृषक । एकशरें पार्थ उभयां वधी ॥४॥
दुर्योधन रडे मातुलवधानें । शकुनि क्रोधानें माया निर्मी ॥ ५ ॥
विविध आयुधें व्याघ्र, सिंह, सर्प । धांवले रणांत पार्थावरी ॥ ६ ॥
संहारी तयांसी पार्थ क्षणार्धांत । अंधःकार तेथ पुढती दाटे ॥ ७ ॥
भयानक शब्द उमटे त्या माजी । ज्योतिषास्त्र चिंती पार्थ वेगें ॥८॥
पुढती प्रवाह निर्मितां जळाचे । आदित्यास्त्रें पार्थें आटवीले ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सौबल पळाला । काळासम केला नाश पार्थें ॥१०॥

अध्याय ३१ वा ५५

सूत म्हणे राया, अन्यस्थळीं वीर । करिती संगर महाघोर ॥ १ ॥
ऐकिलें पाहिलें नव्हतेंचि पुरा । म्हणती कोणी मारा, रक्षा द्रोणां ॥
पांचालवीरांसी संहारिती द्रोण । पुढती धांवून येई नील ॥ ३ ॥
आव्हान तयासी देई गुरुपुत्र । प्रवर्तलें घोर युद्ध तदा ॥ ४ ॥
अश्वत्थामा अंतीं सोडी दिव्य शर । तोडी नीलशिर कांतिमान ॥
पांडवांचें सैन्य तदा भयग्रस्त । सोडवील पार्थ म्हणती कदा ॥६॥
वासुदेव म्हणे तयावेळीं पार्थ । संहारी अन्यत्र संशप्तकां ॥ ७

अध्याय ३२ वा ५६

पाहूनियां भीम धांवला गर्जूनि । दुर्योधन, द्रौणि पुढती येती ॥१॥
कर्णहि तयांच्या साह्यार्थ धांवला । धर्म म्हणे घाला भीमावरी ॥
ऐकूनियां वीर साह्य होती भीमा । वधूं म्हणे द्रोणां धृष्टद्युम्न ॥३॥
प्राप्त संशप्तकां संहारूनि पार्थ । येई इतुक्यांत तयास्थानीं ॥ ४ ॥
संकुल संग्राम होई तयावेळीं । कृष्णार्जुन वळी लढती क्रोधें ॥ ५ ॥
कर्णभ्राते तीन वधिले पार्थानें । पंचदश भीमें वधिले वीर ॥ ६ ॥
चंद्रवर्मा, बृहत्क्षत्र, नैषधांसी । धाडी यमलोकीं धृष्टद्युम्न ॥ ७ ॥

सात्यकि धांवतां वांचविती द्रोण । संकटांत कर्ण पडला होता ॥
सात्यकीसी वीर अवघे दमविती । जाहला गभस्ति अस्तंगत ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसे दिनद्वय । संपतां अपूर्व पुढती युद्ध ॥ १० ॥

## अभिमन्युवधपर्व ३

अध्याय ३३ वा ५७

संजय बोलला धृतराष्ट्राप्रति । प्रतिज्ञा गुरूची विफल होई ॥ १ ॥
असंख्य वीरांचा संहार जाहला । कौरवां वाटला खेद बहु ॥ २ ॥
पांडव पार्थाचा करिती गौरव । जाहला-उदय तृतीयदिनीं ॥ ३ ॥
दुर्योधन म्हणे कां हो गुरुराया । । इच्छीतसां व्हावा पराजय ॥४॥
युधिष्ठिर हातीं येतांही सोडिला । म्हणाला मी केला सर्व यत्न ॥
परी इच्छामात्रें जिंकाल त्रैलोक्य । ऐसा आशाभंग न करीं आर्य ॥
द्रोण खिन्नचित्तें वदती रायासी । न शोभे ही उक्ति तुजलागीं ॥
संरक्षितां पार्थ धर्माचें बंधन । अशक्यचि जाण त्रैलोक्यांत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे क्रोधाकुळ द्रोण । प्रतिज्ञावचन वदती ऐका ॥ ९ ॥

५८

विश्वकंद कृष्ण, धनुर्धर पार्थ । अडवील त्र्यंबक एकाचि त्यां ॥ १ ॥
परी दुर्योधना अतिवीर एक । वधीन मी अद्य निश्चयेंसी ॥ २ ॥
रचीन मी व्यूह देवांही अभेद्य । परी अर्जुनास दूर नेई ॥ ३ ॥
न जाणें अर्जुन ऐसें कांहीं नसे । थोर थोर त्याचे बहुत गुरु ॥ ४ ॥
ऐकूनि आह्वान देती संशप्तक । दारुण युद्धार्थ पार्थालागीं ॥ ५ ॥
अन्यत्र अर्जुन जातांचि युद्धासी । चक्रव्यूह रची द्रोणगुरु ॥ ६ ॥
वन्य पशु जेंवी सांपडे वणव्यांत । तैसाचि सौभद्र व्यूहामाजी ॥७॥
राया, तया व्यूहीं अभिमन्युवीर । संग्राम अपूर्व करूनि गेला ।८॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्र दुःखें । कथीं म्हणे मातें सकल वृत्त ॥ ९ ॥

अध्याय ३४ वा ५९

सूत म्हणे राया, सद्गुण बाळाचे । वर्णूं तरी कैसे नकळे मज ॥ १ ॥
धर्म, भीमादींचे सद्गुण एकत्र । घेती अवतार बाळरूपें ॥ २ ॥

होऊनियां शांत आप्तसंहाराचें । वृत्त सर्व ऐकें धृतराष्ट्रा ॥ ३ ॥
चक्रव्यूह द्रोणें रचिला अद्भुत । तयामाजी स्थित महायोद्धे ॥ ४ ॥
रक्तवस्त्रें रक्त अलंकारधारी । सज्जले संगरीं प्राणपणें ॥ ५ ॥
अगरु-चंदनउटि सर्वांगासी । सूक्ष्मवस्त्रें त्यांसी शोभविती ॥ ६ ॥
दशसहस्र ते वीर धनुर्धर । ताडिताती शर सौभद्रेया ॥ ७ ॥
दुर्योधनपुत्र अग्रभागीं स्थित । मध्यभागीं कृप-कर्ण दिसे ॥ ८ ॥
द्वारावरी द्रोण जयद्रथादिक । वासुदेव वृत्त सकल कथी ॥ ९ ॥

अध्याय ३५ वा

६०

द्रोणांवरी वीर धांवले समस्त । परी व्यूहभेद न कळे कोणा ॥ १ ॥
जाणूनि हें धर्म बोले अभिमन्यूसी । संकटीं आम्हांसी साह्य होईं ॥
वत्सा, पार्थ, कृष्ण, प्रद्युम्नावांचूनि । व्यूहभेद कोणी न जाणे हा ॥
तूंचि एकमात्र भेदिसील व्यूह । याचितों सकल तुजलागीं ॥ ४ ॥
दोष अर्जुनाचा न येवो आम्हांसी । ऐसी करीं कृति महावीरा ॥५॥
बाळ म्हणे मज व्यूहभेदज्ञान । परी येतां विघ्न युक्ति कैसी ॥ ६ ॥
धर्म म्हणे आम्हीं मागोमाग येऊं । सर्वस्वी सांभाळूं तुजलागीं ॥७॥
भीम म्हणे द्वार मोकळें लाभतां । संहार वीरांचा करूं आम्हीं ॥८॥
वासुदेव म्हणे अभिमन्युवीर । बोलला विनम्र होऊनियां ॥ ९ ॥

६१

अभिमन्यु म्हणे पतंगासमान । करीन उड्डाण व्यूहामाजी ॥ १ ॥
वृद्धिंगत तेणें प्रेम श्रीकृष्णाचें । यशही पित्याचें वृद्धि पावे ॥ २ ॥
उभयकुळासी उद्धारक होईं । ऐसी नवलाई करीन रणीं ॥ ३ ॥
एकाकी मी नाश करीन शत्रूचा । तरीच पार्थाचा पुत्र म्हणा ॥ ४॥
एकाचि स्यंदनें पळवीन वीर । सज्ज बालवीर महारणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अभिमन्यु सूता । म्हणे सज्ज माझा करीं रथ ॥ ६ ॥

अध्याय ३६ वा

६२

बाळ म्हणे सूता करूनियां त्वरा । रथ ने संगरा अविलंबेंसी ॥१ ॥
सूत म्हणे करीं विचार अंतरीं । भार हा तुजवरी बहु थोर ॥ २ ॥
अस्त्रवेत्ता द्रोण अनुभवी थोर । कौरवळें तूं पोर आयुष्मंता ॥ ३ ॥

बाळ म्हणे इंद्र-रुद्र जरी येती । तरी रणामाजी लढेन त्यां ॥ ४ ॥
प्रतिष्ठा न मज ऐसीया वीरांची । आचार्यांची भीति नसे मज ॥ ५ ॥
काय कथूं पिता मातुलही जरी । येतील संगरीं लढेन त्यां ॥ ६ ॥
बोलूनियां ऐसें हांकीं म्हणे रथ । खिन्नमनें सूत हांकी अश्वां ॥ ७ ॥
वर्षत्रय वय होतें त्या अश्वांचें । सैन्य पांडवांचें मागोमाग ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ध्वज त्याचा उंच । बाळासी कवच सुवर्णाचें ॥ ९ ॥

६३

पार्थाहूनि श्रेष्ठ वीर तो बलिष्ठ । शोभला प्रत्यक्ष बाळसिंह ॥ १ ॥
द्रोणादिकांवरी धांवूनियां गेला । क्षणांत भेदिला व्यूह तेणें ॥ २ ॥
'थांब थांब' 'यासी वधा' ऐसा शब्द । येई कानावर कौरवांचा ॥
अश्व-गजशब्दें कंप पावे भूमि । कोलाहलध्वनि सैनिकांचा ॥ ४ ॥
मृतदेहराशी शलभासमान । सुभद्रानंदन पाडी रणीं ॥ ५ ॥
हस्त-पाद, शिरें भग्न अश्व-गज । अश्वसादी ध्वज सर्वत्रचि ॥ ६ ॥
महाविष्णुपरी करी घोरकर्म । पार्थाचा नंदन रणामाजी ॥ ७ ॥
प्राणभयें वीर करिती पलायन । वर्णी घोर रण वासुदेव ॥ ८ ॥

अध्याय ३७ वा

६४

क्रोधें दुर्योधन बाळावरी धांवे । राजासी रक्षावें म्हणती द्रोण ॥
द्रोण, अश्वत्थामा, कृप, कर्णादिक । नृपाळासी मुक्त करिती यत्नें ॥
वांचला नृपाळ पाहोनियां क्रुद्ध । बाळ सिंहनाद करीतसे ॥ ३ ॥
अश्मकाचा पुत्र अंगावरी येतां । शिरच्छेद त्याचा बाळ करी ॥ ४ ॥
कर्णादिक वीर ताडितां शरासी । राधेयाचें छेदी कवच बाळ ॥ ५ ॥
कांपवूनि कर्णा, दीर्घलोचनासी । वधी कुंडभेदी सुषेणातें ॥ ६ ॥
मूर्छित पाडिलें शल्यासी रणांत । प्रशंसिती यक्ष, देव बाळा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अभिमन्युबाळ । भासे दुजा काळ कौरवांसी ॥ ८ ॥

अध्याय ३८ वा

६५

धांव घेतां शल्यानुज । छेदी त्याचे हस्तपाद ॥ १ ॥

अंतीं शिरच्छेद करी । अनुचर पळती दूरी ॥ २ ॥
वीर उच्चारूनि गोत्र । धांव घेती बाळावर ॥ ३ ॥
म्हणती सुटका न तुझी । बाळ विद्ध करी त्यांसी ॥ ४ ॥
वासुदेव-पार्थदत्त । अस्त्रें योजितो सौभद्र ॥ ५ ॥
योजी केव्हां सोडी शर । न कळे चमके चाप घोर ॥ ६ ॥
अंशुमाळीसम भासे । पळवी सकळ सैन्यातें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर । रणीं शोभला झुंजार ॥ ८ ॥

अध्याय ३९ वा

६६

सूत म्हणे राया, सुभद्रानंदन । संग्राम दारुण करी ऐसा ॥ १ ॥
अलातचक्र तो भासे रथस्थित । जाहला सर्वत्र वास त्याचा ॥ २ ॥
असामान्य शौर्यें कंपित तें सैन्य । पाहूनियां द्रोण तुष्ट होती ॥ ३ ॥
संबोधूनि कृपाशब्द कौतुकानें । सहज मुखानें येती 'धन्य' ॥ ४ ॥
एकाकी हा बाळ वधील सर्वांसी । न कळे कां चित्तीं न आणी तें ॥
ऐकोनि ते शब्द क्रुद्ध दुर्योधन । म्हणे संरक्षण करिती द्रोण ॥ ६ ॥
शिष्य, शिष्यपुत्र प्रिय धार्मिकांसी । म्हणोनि उपेक्षी पोरासी हा ॥
आत्मप्रौढी तेणें मानी तो सौभद्र । करा म्हणे वध त्वरित याचा ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि वचन । धांवे दुःशासन पुढती क्रोधें ॥ ९ ॥

६७

दुःशासन म्हणे दुर्योधनालागीं । वधीन मी आजी पोरासी या ॥
ऐकूनि ते वार्ता दुःखें कृष्णार्जुन । सोडितील प्राण निश्चयेंसी ॥ २ ॥
मानी वीरां दुःख असह्य होईल । सहज साधेल कार्य तेणें ॥ ३ ॥
दीन वदनें ते अवशिष्ट भ्राते । स्वयेंचि प्राणांतें त्यागितील ॥ ४ ॥
वधितां पोरासी ऐसी कार्यसिद्धि । जाणें निश्चयेंसी कौरवेंद्रा ॥५॥
बोलूनियां ऐसें धांवे बाळावरी । प्रतिकार करी बाळ क्रोधें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा तो किशोर । होई अनिवार सकळांसी ॥ ७ ॥

अध्याय ४० वा

६८

दुःशासनालागीं वीर । म्हणे येई रे समोर ॥ १ ॥
निंदिलेंसी माझ्या ताता । घेई शासन उन्मत्ता ॥ २ ॥

केलेंसी जें घोर पाप । घेई त्याचें प्रायश्चित्त ॥ ३ ॥
तुज रणांत शासून । फेडीन मी पितृऋण ॥ ४ ॥
करिसी पलायन जरी । तरिच वांचसी संगरीं ॥ ५ ॥
ऐसें बोलूनि प्रखर । ताडी एक दिव्य शर ॥ ६ ॥
तेणें होई निश्चेतन । सूत पळवी स्यंदन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर । करी ऐसा चमत्कार ॥ ८ ॥

६९

दुर्योधन म्हणे कर्णा, दुःशासन । होई संज्ञाशून्य एका बाणें ॥ १ ॥
प्रत्यक्ष हा शूर मजलागीं भासे । सैनिक साह्यातें येती पहा ॥ २ ॥
ऐकूनियां कर्ण शरवृष्टि करी । विद्ध तदा करी बाळ तया ॥ ३ ॥
क्रोधें अस्त्रयुद्ध करी सूर्यसुत । परी तो विरथ होई क्षणीं ॥ ४ ॥
रथ, अश्व, सूत, छेदितां बाळानें । बंधु त्याचा प्रेमें धांव घेई ॥ ५॥
वासुदेव म्हणे गर्जले पांडव । होई वाद्यघोष रणामाजीं ॥ ६ ॥

अध्याय ४१ वा

७०

कर्णबंधु परम शूर । बाळावरी सोडी शर ॥ १ ॥
अश्व, सूत, छत्र, ध्वज । छेदी बाळाचे सहज ॥ २ ॥
सोडोनियां एक बाण । बाळ घेई त्याचा प्राण ॥ ३ ॥
कर्ण धांवला दुःखानें । त्यासी ताडिलें शरानें ॥ ४ ॥
असह्य तो होतां बाण । गेला राधेय पळून ॥ ५ ॥
मागोमाग धांवे सेना । बाळ करी घोर रणा ॥ ६ ॥
ढीग पडला प्रेतांचा । भासे सूर्य माध्यान्हींचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्थित । पुढती एक जयद्रथ ॥ ८ ॥

अध्याय ४२ वा

७१

राव म्हणे सूता सौभद्रामागून । गेले कोण कोण व्यूहामाजी ॥ १ ॥
सूत म्हणे धर्म, भीम तैं माद्रेय । शिखंडी, विराट धृष्टद्युम्न ॥ २ ॥
द्रुपद, केकय, धृतकेतु, मत्स्य । घुसले व्यूहांत बाळासवें ॥ ३ ॥
परी जयद्रथ अडवी त्यालागीं । सेनेसह मार्गीं पराक्रमें ॥ ४ ॥

राव म्हणे ऐसा असामान्य योद्धा । होता कीं जामाता सांगे मज ॥
सूत म्हणे शिवप्रसादें चौघांसी । निवारी एकाकी जयद्रथ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जयद्रथाधारें । सकळ धांवले बाळावरी ॥ ७ ॥

अध्याय ४३ वा ७२

सिंधुराज करी युद्ध । रथ त्याचा शास्त्रसिद्ध ॥ १ ॥
ऐसा जयद्रथ वीर । सोडी वीरावरी शर ॥ २ ॥
चढला सात्यकीस्यंदनीं । नवलचि होई रणीं ॥ ३ ॥
अडवी एकाकी सकलां । व्यूहमार्ग निरोधिला ॥ ४ ॥
बाळ जाहला एकाकी । शक्ति न चले कोणाची ॥ ५ ॥
निवारण सकलांचें । केलें एका जयद्रथें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वर । होई शिवाचा सफल ॥ ७ ॥

अध्याय ४४ वा ७३

सिंधुराज रणीं अडवी वीरांसी । इच्छा विजयाची धरूनियां ॥ १ ॥
तयावेळीं बाळ क्षुब्ध करी सैन्य । सारथीविहीन वृषकेतु ॥ २ ॥
भयाभीत अश्व ओढिती स्यंदन । मार्ग तो लक्षून जाई बाळ ॥ ३ ॥
वसातीय तदा अडवी क्रोधानें । पार्थतनयानें वधिलें त्यासी ॥ ४ ॥
क्रोधें तदा वीर वेढिती बाळासी । आच्छादी तयांसी वीर शरें ॥ ५ ॥
दुष्प्रेक्ष्य सौभद्र तप्तसूर्यासम । वासुदेव रण वर्णी त्याचें ॥ ६ ॥

अध्याय ४५ वा ७४

अंतकासमान विक्रमें सौभद्र । संहारीत वीर घुसला व्यूहीं ॥ १ ॥
तदा शल्यपुत्र रुक्मरथ धांवे । परी क्षणीं पावे पंचत्वासी ॥ २ ॥
क्रोधें तदा वीर बाळासी ताडिती । विद्ध तो सर्वांगीं अश्वांसवें ॥
गंधर्वास्त्र तेंवी रथमाया बाळ । जपूनियां घोर युद्ध करी ॥ ४ ॥
अस्त्रबळें रणीं भासले सौभद्र । वीरांसी सर्वत्र संमोहनें ॥ ५ ॥
असंख्यात राजपुत्रां संहारिलें । जेंवी आम्रफळें वनामाजी ॥ ६ ॥
पाहूनि तें भय पावे दुर्योधन । सोडी तीव्र बाण बाळावरी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे टिकला न परी । फिरला माघारी विद्ध राव ॥ ८ ॥

अध्याय ४६ वा ७५

राव म्हणे बाळ एकाकी सकळां । विकल त्या स्थळा करी तेंवी ॥१॥
परी नित्य धर्म जयासी आश्रय । तया अश्रद्धेय काय जगीं ॥ २ ॥
सूत म्हणे राया, राव पराभूत । होतां सैनिकांस भय वाटे ॥ ३ ॥
पुत्र, मित्र, भ्राते होतां गतप्राण । केलें पलायन सकलांनीं ॥ ४ ॥
पाहोनियां तुझा पौत्र लक्ष्मण । शस्त्रास्त्रप्रवीण पुढती धांवे ॥ ५ ॥
तसल्यें नृपाळ येई त्या मागोनि । सोडिले सर्वांनीं शर बहु ॥६॥
परी मेघालागीं ज्यापरी समीर । तैसा बालवीर उधळी सर्वां ॥७॥
वासुदेव म्हणे शूर, रूस्वरूप । दुर्योधनपुत्र लढला शौर्यें ॥ ८ ॥

७६

पाहूनि तयासी गर्जला सौभद्र । म्हणे यमलोक पाहीं आतां ॥ १ ॥
बोलूनियां ऐसें बाळ दिव्य बाण । सोडूनियां प्राण घेई त्याचा ॥ २॥
दुर्योधन तदा होऊनि संक्रुद्ध । करा म्हणे वध सौभद्राचा ॥ ३ ॥
ऐकूनियां द्रोण, द्रौणि, कृप, कर्ण । एकत्र होऊन धांव घेती ॥ ४ ॥
तयांच्या समक्ष क्राथपुत्राप्रति । धाडी यमलोकीं अभिमन्यु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें कर्म । सोडूनियां रण पळती वीर ॥ ६ ॥

अध्याय ४७ वा ७७

कृप, कर्ण, बृहद्बल । धांव घेती बाळावर ॥ १ ॥
बृहद्बल चवताळून । हृदयीं ताडी तीव्र बाण ॥ २ ॥
परी निर्भय सौभद्र । फोडी रथ तोडी चाप ॥ ३ ॥
वधूनियां सारथ्यासी । दिव्य बाण घेई हातीं ॥ ४ ॥
हृदय करूनि विदीर्ण । घेई बृहद्बलप्राण ॥ ५ ॥
गतप्राण कोसलासी । करूनि फोडी गर्जनेसी ॥ ६ ॥
दशसहस्र ते वीर । पुढती केले रणीं ठार ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे रणीं । बाळ शोभे चक्रपाणी ॥ ८ ॥

अध्याय ४८ वा ७८

वैकर्तनासवें पुढती होई युद्ध । शोभले पलाश प्रफुल्लित ॥ १ ॥
कर्ण रुचिवांसी करूनि विरथ । मागध भोजांस वधिलें क्षणीं ॥२॥

दुःशासनपुत्र पुढती पातला । वांचवी तयाला द्रोणपुत्र ॥ ३ ॥
अश्वत्थाम्यालागीं दावूनियां हात । ताडिलें शल्यास सौभद्रानें ॥४॥
पंचयोध्यांप्रति वधूनियां क्रोधें । तत्काळ शकुनीतें विद्ध केलें ॥ ५ ॥
दुर्योधनालागीं बोलला शकुनि । उपाय योजूनि वधूं यासी ॥ ६ ॥
द्रोणांलागीं कर्ण तैसेंचि बोलला । बोलती कर्णाला द्रोणगुरु ॥ ७ ॥
कर्णा, या बाळाचा अतुल विक्रम । पाहूनियां मन हर्ष पावे ॥ ८ ॥
नाहीं नाहीं ऐसा विक्रम देखिला । भूषवी पार्थाला अभिमन्यु ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे विकलांग कर्ण । म्हणे मज बाण पीडिती हे ॥ १० ॥

७९

हांसूनियां द्रोण बोलले कर्णासी । अभेद्य बाळासी कवच भासे ॥
पार्थासी ते विद्या पढविली होती । तेणें बाळाप्रति कथिली वाट ॥
यास्तव विरथ करूनियां यासी । छेदीं धनुष्यासी तरिच कार्य ॥३॥
पृष्ठभागीं शरवर्षाव करूनि । पाडीं रणांगणीं बालकासी ॥ ४ ॥
चापपाणी बाळ अजिंक्य हा भासे । कर्णा, शक्य तें तें करीं यत्नें॥
ऐकूनियां कर्ण द्रोणांचें वचन । धनुष्यछेदन करी वेगें ॥ ॥ ६ ॥
अश्ववध केला सत्वरी भोजानें । सूत गौतमानें संहारिला ॥ ७ ॥
ऐसे महावीर कोंडिती बाळासी । करिती शरवृष्टि सकळवीर ॥८॥
वासुदेव म्हणे जाणूनियां भाव । गर्जे रणीं सिंहशावक तो ॥ ९ ॥

८०

छिन्न चाप भग्नरथ । परी होईना हताश ॥ १ ॥
ढाल, तलवार घेऊन । केलें गगनीं उड्डाण ॥ २ ॥
करितां भ्रमण आकाशीं । धाक वाटला वीरांसी ॥ ३ ॥
झेंप घेईल हा कोठें । समजे न तें कोणातें ॥ ४ ॥
अंतीं करावया घात । योजितानी क्रूर कृत्य ॥ ५ ॥
खड्ग तोडिलें द्रोणानें । ढाल छेदिली कर्णानें ॥ ६ ॥
रोमरोमीं ज्याच्या बाण । ढाल, तलवार छिन्न ॥ ७ ॥
होतां उतरे रणांत । करीं घेई रथचक्र ॥ ८ ॥
चक्रधारी कृष्णासम । बाळ शोभे दीप्तिमान ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे रणीं । करी संग्राम आर्जुनी ॥ १० ॥

अध्याय ४९ वा ८१

सुभद्रेचा प्राण लाडका कृष्णाचा । भासला कृष्णसा रणामाजी ॥
भुरु भुरु केश उडती वायूनें । उगारी क्रोधानें रथचक्र ॥ २ ॥
उग्ररूप त्याचें पाहूनियां कंप- । पावती, रणांत थोर थोर ॥ ३ ॥
परी रथचक्रशकलें सर्वांनीं । एकत्र होऊनि रणीं केलीं ॥ ४ ॥
अंतीं उगारूनि गदा तो धांवला । कंपित जाहला अश्वत्थामा ॥५॥
तीन पाउलें तो भयाकुल मागें । होतांचि अश्वांतें वधिलें बाळें ॥
कालिकेयपुत्र तैसेचि गांधार । करोनि प्रहार संहारिले ॥ ७ ॥
वसातीय दश केकयांचे रथ । तैसे मत्त गज वधिले दहा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बाळाचा विक्रम । वर्णूनियां कोण सिद्ध करी ॥ ९ ॥

८२

दुःशासनपुत्ररथ चूर्ण केला । सारथी मारिला गदाघातें ॥ १ ॥
दौःशासनी गदा घेऊनि धांवला । क्रोधानें गर्जला थांब थांब ॥२॥
बाळासवें युद्ध केलें त्या वीरानें । ताडिलें गदेनें परस्परां ॥ ३ ॥
मूर्छित जाहले उभयही वीर । कौरवांचें थोर दैव तदा ॥ ४ ॥
दौःशासनि वीर सावध जाहला । मूर्छित देखिला अभिमन्यु ॥ ५ ॥
पूर्ण शुद्धीवरी नसतां आघात । होतां तो निश्चेष्ट पडला रणीं ॥ ७ ॥
वीर तो एकाकी पडे हाय हाय । म्हणे वासुदेव हरिइच्छा ॥ ८ ॥

८३

स्वैर कमलिनीसंहारकारक- । गजालागीं व्याध हंत पाडी ॥ १ ॥
दावानल शांत होतां वनामाजी । सौभद्र तैसाची रणीं शोभे ॥ २ ॥
भंगला पर्वत आटला सागर । अस्तंगत सूर्य हाय हाय ॥ ३ ॥
हर्षित कौरव उभे सभोंवार । अश्रुपूर्ण नेत्र इतरांचे ॥ ४ ॥
धूळीमाजी मृत सौभद्रशरीर । गळूनियां चंद्र पडला भासे ॥ ५ ॥
अंतरिक्षामाजी येई स्पष्ट शब्द । अन्याय्य हें युद्ध धर्महीन ॥ ६ ॥
वधिलें अनेकीं एकाकी बाळासी । युद्ध हें श्रेष्ठांसी असंमत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पांडवांचें सैन्य । करी पलायन तयावेळीं ॥ ८ ॥

८४

धर्म म्हणे बाळ गेला स्वर्गामाजी । जिंकूनि सकळांसी भिऊं नका
प्रोत्साहन धर्म देऊनि वीरांसी । प्रवृत्त रणासी करी तदा ॥ २ ॥
कृष्णतुल्य वीर महाविषसर्प । ऐसा वीरराज पडला रणीं ॥ ३ ॥
असंख्यात वीर पाडिले रणांत । संहारिले अश्व, गज बहु ॥ ४ ॥
धन्य, धन्य, जगीं कुमार तो धन्य । शोक निष्कारण करूं नये ॥५॥
इंद्रलोकीं वीर गेला पुण्यकर्में । वासुदेव म्हणे धन्य जन्म ॥ ६ ॥

अध्याय ५० वा ८५

सूत म्हणे राया, जाहला सूर्यास्त । सर्वत्र प्रकाश रक्तवर्ण ॥ १ ॥
आयुधांचें तेज हरिलें सूर्यानें । आरक्तवसनें नटली भूमी ॥ २ ॥
यमपुरीसम भासे रणभूमि । महावीर रणीं पहुडले ॥ ३ ॥
मृतदेहराशी रक्तमांस पंक । महा भयानक रणामाजी ॥ ४ ॥
सजीव-निर्जीवां वैतरणीसम । नेतसे वाहून शोणितचि ॥ ५ ॥
पिशाचें येऊनि प्राशिताती रक्त । पशु-पक्षी हिंस्र जमती बहु ॥ ६॥
सावकाश सैन्यें तया रणांतूनि । चाललीं स्वस्थानीं गांभीर्यानें ॥७॥
अस्ताव्यस्त बाळ भूषणरहित । धूळीमाजी प्रेतरूप दिसे ॥ ८ ॥
हवनीय द्रव्य करूनियां दग्ध । जैंवी अग्नि शांत तैंवी बाळ ॥ ९ ॥
त्रिकाळ अटळ, ढळतां तो ध्रुव । म्हणे वासुदेव दुःख तैंवी ॥ १० ॥

अध्याय ५१ वा ८६

गतप्राण होतां अभिमन्युवीर । पांडव शस्त्रास्त्र त्यागिताती ॥ १ ॥
धर्माच्या भोंवतीं बैसती दुःखानें । मांडिला धर्मानें शोक बहु ॥२॥
हाय मजसाठीं दुर्भेद्य व्यूहांत । घुसला तो हत कैसा होई ॥ ३ ॥
थोर थोर जयापुढें हतप्रभ । वीर तो रणांत पडला कैसा ॥ ४ ॥
द्रोणसैन्यसिंधु गेला जो तरूनि । काय दौःशासनी वधी त्यासी ॥
पार्थासी वदन दावूं केंवी आतां । हाय सुभद्रेचा बाळ गेला ॥ ६ ॥
केशवार्जुनांचा हरपला प्राण । तोषवूं सांगून काय तयां ॥ ७ ॥
विजयार्थ झालों मोहमग्न कैसा । पावलों प्रपाता मधुलोभें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुःखाकुलधर्म । आठवी सद्गुण बालकाचे ॥ ९ ॥

८७

पाचारावें जया केवळ सुखार्थ । धाडिलें तयास रणांगणीं ॥ १ ॥
संतप्त अर्जुननेत्रें दग्ध होऊं । बाळासवें जाऊं पुण्यलोकीं ॥ २ ॥
त्रैलोक्यविजेता तात जयाप्रति । रक्षिलें न त्यासी हाय कोणी ॥३॥
कौरवांचा आतां विनाश क्षणांत । करील संक्रुद्ध पार्थ रणीं ॥ ४ ॥
दुष्टसहवासें वागे दुर्योधन । सोडील तो प्राण अंतीं दुःखें ॥ ५ ॥
जय-पराजय आतां मज सम । सुभद्रानंदन हाय गेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वर्ग तें साम्राज्य । सकलही तुच्छ वाटे धर्मा ॥७॥

अध्याय ५२ वा

८८

तयावेळीं व्यास येती तयास्थानीं । धर्म त्यां सन्मानी दुःखाकुल ॥
म्हणे मुनिश्रेष्ठा, गेला माझा बाळ । नाहींच सांभाळ झाला त्याचा ॥
अधर्मे एकासी अनेकीं वधिलें । बाळासी कोंडिलें जयद्रथें ॥ ३ ॥
वारंवार येई विचार हा मनीं । गेलों मी बुडोनि शोकार्णवीं ॥ ४ ॥
मुनि म्हणे धर्मा, निश्चयें तो बाळ । गेला पुण्यस्थळ लक्षूनियां ॥
संकटांत ज्ञाते मोह न पावती । कोण त्या मृत्यूसी अडवील ॥ ६ ॥
धर्म म्हणे वीर मृत असंख्यात । पडले रणांत न दिसे मृत्यु ॥ ७ ॥
कथावें मृत्यूचें स्वरूप यास्तव । म्हणे वासुदेव चित्त द्यावें ॥ ८ ॥

८९

व्यास बोलती रायातें । अकंपन कथा ऐकें ॥ १ ॥
पुरातन इतिहास । ऐक कथिती जो नारद ॥ २ ॥
वृत्त ऐक तें पवित्र । मंगलाचेंही मंगल ॥ ३ ॥
श्रवण करितां प्रातःकाळीं । शोक दुर्भाग्यादि जाळी ॥ ४ ॥
अकंपन नामें राजा । हरि नामें पुत्र त्याचा ॥ ५ ॥
विष्णुतुल्य तो विक्रमी । रूपवंत गुणखाणी ॥ ६ ॥
रणामाजी तो निमाला । राव शोकमग्न झाला ॥ ७ ॥
जाणूनि तें ब्रह्मसुत । तदा तयास्थानीं प्राप्त ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐका । नारद जे कथिती कथा ॥ ९ ॥

९०

मुनि म्हणे धर्मा, प्रश्न नारदासी । अकंपनें हाचि दुःखें केला ॥ १ ॥
नारद म्हणती तयासी नृपाळा । चिंतामग्न झाला पुरा ब्रह्मा ॥ २ ॥
वाढतां वाढतां बहु वाढे प्रजा । संहार तियेचा चिंती मनीं ॥ ३ ॥
अंगांतूनि येई अग्नि त्या संतापें । दग्ध करी क्रोधें त्रैलोक्यासी ॥ ४॥
पाहूनि तें रुद्र निशाचरपति । ब्रह्मदेवाप्रति शरण जाई ॥ ५ ॥
तयालागीं ब्रह्मा म्हणे तव प्रिय । पुत्रा, करूं काय कथन करीं॥६॥
वासुदेव म्हणे ब्रह्मवचनेंसी । विनवी तयासी रुद्र ऐका ॥ ७ ॥

अध्याय ५३ वा

९१

जोडूनियां कर रुद्र म्हणे आतां । आंवरीं या क्रोधा दयावंता ॥ १ ॥
ब्रह्मा म्हणे भार जाहला पृथ्वीसी । विनवी ते मजसी काय करूं ॥
आत्यंतिक नाशावीण नाश व्हावा । रुद्र म्हणे द्यावा वर हाचि ॥३॥
ऐकूनि ब्रह्म्यानें आंवरिला क्रोध । निर्मियेली एक दिव्याकृति ॥४॥
पिंगट तियेचा वर्ण रक्तनेत्र । दक्षिणदिशेस उभी राहे ॥ ५ ॥
स्त्रियेसी त्या 'मृत्यो' ऐसें म्हणे ब्रह्मा । संहाराची आज्ञा तिजसी करी
ऐकूनियां दुःखव्याप्त ते जाहली । ओंजळींत धरी अश्रु ब्रह्मा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विचित्र हे लीला । जाणूनि हरीला शरण जावें ॥८॥

अध्याय ५४ वा

९२

मृत्यु म्हणे देवा कार्य अधर्माचें । वाटतसे मातें काय करूं ॥ १ ॥
शाप सकलांचा बाधेल मजसी । ऐसी निंद्यकृति न कधीं मज ॥
याचि कार्यास्तव निर्मिलें तुजसी । ब्रह्मा म्हणे निंदी कोण तुज॥३॥
बोलूनियां ऐसें ब्रह्मा होतां शांत । पळूनि तपास जाई मृत्यु ॥ ४ ॥
दीर्घकाल घोर आचरितां तप । प्रसन्न तियेस होई ब्रह्मा ॥ ५ ॥
विनवी तयातें ऐसें घोरकर्म । मजलागीं मान्य नसे देवा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मदेवालागीं । मृत्यु कर जोडी नम्रभावें ॥ ७ ॥

९३

कर्तव्यचि माझें म्हणसील जरी । स्वस्वकर्मे तरी होवो नाश ॥ १ ॥
ब्रह्मा म्हणे मृत्यो, होईल तैसेंचि । दोष न तुजसी लवमात्र ॥ २ ॥

अश्रुबिंदु तुझे होऊनियां रोग । करितील तुज साह्य जाणें ॥ ३ ॥
रागद्वेषहीन होऊनियां कर्म । आचरितां पुण्य तुजलागीं ॥ ४ ॥
कर्मफळें नित्य भोगितील प्राणी । आज्ञा हे मानूनि कार्य करीं ॥५॥
वासुदेव म्हणे सकलांचे प्राण । हरील अधर्म स्वभावेंचि ॥ ६ ॥

९४

ब्रह्मसुत म्हणे अकंपना, ऐसी । कथा हे मृत्यूची ध्यानीं आणीं
ब्रह्मवचनें ती प्रवर्तली कर्मा । न टळेचि कोणा मृत्यु जगीं ॥ २ ॥
प्रत्यक्ष ब्रह्माही कल्पांतीं नासेल । व्यर्थेचि ठरेल शोक राया ॥ ३ ॥
बाळ तुझा भोगी सौख्य स्वर्गामाजी । आंवरीं शोकासी अकंपना ॥
ईश्वरनिर्मित नियम हा जनीं । सुज्ञा, आणीं ध्यानीं सर्वकाल ॥ ५ ॥
नारदवचनें अकंपन शांत । होई शोकमुक्त युधिष्ठिरा ॥ ६ ॥
कथूनियां ऐसें कृष्णद्वैपायन । तपासी निघून जाई वनीं ॥ ७ ॥
विरजा नामें हा व्यास सोमपुत्र । गेला स्वस्थानास कथिती मुनि॥
वासुदेव म्हणे कर्तव्यजागृति । करूनियां देती मुनिव्यास ॥ ९ ॥

अध्याय ५५ वा ९५

सूत म्हणे राया, मृत्यूचें स्वरूप । ऐकूनियां शांत होई धर्म ॥ १ ॥
तथापि सिद्धांत जाणूनीहि चित्त । थोरांचा वियोग घडतां द्विधा ॥
याचि न्यायें धर्म होई मनीं खिन्न । व्यासांलागीं प्रश्न करीतसे ॥
मुनिश्रेष्ठा, सांगा सत्कर्मे नृपांचीं । पूर्व महात्म्यांचीं महाभागा ॥४॥
धर्मालागीं मुनि सृंजयाची कथा । निवेदिती ऐका सद्भावेंसी ॥५॥
वासुदेव म्हणे सृंजय-शैब्यासी । पुत्र पुण्यराशी एक होता ॥ ६ ॥

९६

सृंजयाचे मित्र नारद-पर्वत । येती सदनांत एकेदिनीं ॥ १ ॥
सन्मानूनि त्यांसी वार्ता-विनोदातें । करिती त्या स्थळातें कन्या येई॥
पाहोनि तियेसी बोलला पर्वत । नृपा, कोण येथ देवता हे ॥ ३ ॥
राव म्हणे कन्या आशीर्वाद माझा । लाभावा हे इच्छा धरूनि आली ॥

---

१ अभिमन्यु.

ऐकोनि नारद म्हणे भाग्यवंता । अर्पूनि स्वहिता साध्वी कन्या ॥५॥
सृंजय तथेति बोलला आनंदें । पर्वत तैं क्रोधें तप्त होई ॥ ६ ॥
म्हणे स्वमनानें वरिलें जियेसी । नारदा, तियेसी वरिसी कैंवी ॥७॥
स्वच्छागमनाचा मार्ग होवो रुद्ध । बोलला पर्वत शापवाणी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि नारद । बोले पर्वतास ऐका तेंचि ॥ ९ ॥

९७

मन, वाचा, विधि, सर्वही ते व्यर्थ । सप्तपदी मुख्य विधि जाणें ॥
सप्तपदीवीण भार्यात्व न सिद्ध । कां रे मज व्यर्थ शापिलेंसी ॥ २ ॥
स्वर्गमार्ग रुद्ध मजवीण तुझा । हाचि शाप माझा तुजलागीं ॥ ३ ॥
नारद-पर्वत ऐसे या भूलोकीं । राहिले पुढती वृत्त ऐका ॥ ४ ॥
पुत्रकामें नृप सेवा ब्राह्मणांची । करितां तयांसी तोष वाटे ॥ ५ ॥
नारदासी विप्र म्हणती सृंजया । पुत्रलाभ व्हावा ऐसें करीं ॥ ६ ॥
सृंजयासी पुत्र लाभो इच्छेसम ।तुष्ट हें बोलून ब्रह्मसुत ॥ ७ ॥
स्वेद-मूत्रादि त्या मल सुवर्णाचे । सुवर्णष्ठिवी हें नाम तया ॥८॥
वासुदेव म्हणे विपुल सुवर्ण । निर्मिलें भुवन सुवर्णाचें ॥ ९ ॥

९८

प्रासाद, प्राकार, दुर्ग सुवर्णाचे । भाग्य सृंजयाचें म्हणती जन ॥१॥
तस्करांसी सर्व वृत्तांत कळतां । घेऊनि त्या सुता जाती वनीं ॥ २ ॥
कैसा सुवर्णाचा लाभ हा न कळे । म्हणूनि वधिलें बालकासी ॥३॥
उदरींही नसे सुवर्ण म्हणोनि । कलह करोनि मरती सर्व ॥ ४ ॥
अविचारें ऐसे नरकासी जाती । वृत्त सृंजयासी कळतां दुःख ॥५॥
विलाप तयाचा ऐकूनि नारद । सृंजयासी बोध करी बहु ॥ ६ ॥
सृंजया, हा शोक हरील आयुष्य । तेणें तूं अतृप्त त्यजिसी देह ॥७॥
वासुदेव म्हणे वृत्त मरुत्ताचें । कथिलें नारदें सृंजयासी ॥ ८ ॥

९९

जयाच्या सदनीं ब्रह्मवेत्ते मुनि । वसती तो त्यजूनि गेला सर्व ॥
मरुत्ताचें यश वर्णवे न मज । संवर्त यज्ञास साह्य झाला ॥ २ ॥
बहुविध यज्ञ केले मरुत्तानें । प्रत्यक्षरूपानें देव तेथें ॥ ३ ॥

इच्छाभोजन तें सर्वत्रांसी लाभे। डोले परमानंदें ब्रह्मवृंद ॥ ४ ॥
साक्षात् मरुद्गण सेवेलागीं सिद्ध। तेथ सभासद विश्वेदेव ॥ ५ ॥
राज्यामाजी त्याच्या वृष्टि नियमित। देव पितरांस तृप्त करी ॥ ६ ॥
नित्य ब्रह्मचर्यरत करी दान। अपाराचि धन दिधलें विप्रां ॥ ७ ॥
अंतीं तो स्वर्गासी जाई सपरिवार। चित्त ज्याचें थोर दानयुक्त ॥
गर्वहीन ज्ञान, शौर्य क्षमायुक्त। भोग अनासक्त जयालागीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसा गुणश्रेष्ठ। सृंजया, मरुत्त तोही गेला ॥ १० ॥

अध्याय ५६ वा १००

दुष्प्रेक्ष्य देवांसी सुहोत्र नृपाळ। दक्ष सर्वकाळ सत्कर्मी जो ॥ १ ॥
सुवर्णाची वृष्टि राज्यामाजी ज्याच्या। कनकसरिता, मकर, मत्स्य
असंख्य तें धन यज्ञांत वेंचिलें। आश्चर्य जाहलें सकळांलागीं ॥ ३ ॥
अंतीं इहलोक सोडूनियां गेला। सद्गति लाभला नृपश्रेष्ठ ॥ ४ ॥
सृंजया, यापरी गेले थोर थोर। काय तुझा पुत्र तयांपुढें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सृंजया नारद। करिताती बोध ऐसा बहु ॥ ६ ॥

अध्याय ५७-५८ वा १०१

सृंजया, नृपाळ अंगदेशाधिप। केले असंख्यात यज्ञ जेणें ॥ १ ॥
दुग्धपात्रें, गोप, सुवर्णभूषणें। ऐसीं धेनुदानें केलीं बहु ॥ २ ॥
पौरव तो गेला सोडूनि भूलोक। पुत्रास्तव शोक न करीं ऐसा ॥
औशीनर शिवि भूमंडळीं ख्यात। ऐसा न जगतांत राव झाला ॥
दधि-दुग्धडोह यज्ञांत तयाच्या। पेयांच्या सरिता अन्नराशी ॥ ५ ॥
स्नान, पान, अन्न सेवावें यथेष्ट। विनविती स्पष्ट सकलां ऐसें ॥ ६ ॥
ऐसाही नृपाळ झाला गतप्राण। औदार्यविहीन पुत्र तुझा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सृंजयासी मुनि। म्हणती सद्गुणी तेही गेले ॥ ८ ॥

अध्याय ५९ वा १०२

दाशरथी राम सद्गुणनिधान। आनंदाचें स्थान सकलांसी जो ॥ १ ॥
पितृआज्ञेस्तव गेला जो वनांत। दशकंठवध केला जेणें ॥ २ ॥
राज्यामाजी देव मानवसहवास। ऋषीही जनांस भेट देती ॥ ३ ॥

शुद्ध श्वासोच्छ्वासें दीर्घायुषी जन । आचरिती पुण्य सर्वकाळ ॥
अपमृत्यु कोणा कदा काळीं नसे । प्रेम स्वधर्माचें सकळ जनां ॥ ५ ॥
राक्षसभयानें नष्ट धर्मकृत्यें । केलीं रघुनाथें निर्विघ्न तीं ॥ ६ ॥
ऐसा मूर्तिमंत सद्गुणी श्रीराम । सृंजया, सोडून गेला आम्हां ॥ ७ ॥
न करीं रे शोक गुणहीनास्तव । म्हणे वासुदेव म्हणती मुनि ॥ ८ ॥

अध्याय ६० वा १०३

उगमापासूनि सागरापर्यंत । गंगेवरी घाट सुवर्णाचे ॥ १ ॥
याचकभारानें वांके गंगातीर । भगीरथ थोर ऐसा राव ॥ २ ॥
अंकावरी ज्याच्या गंगा नदी बैसे । ऊर्वशी नामातें प्राप्त होई ॥३॥
असूनि ते कन्या पुत्रकार्य करी । पूर्वजां उद्धारी नृपाळाच्या ॥ ४
भागीरथी नामें जाहली प्रख्यात । ऐसा भगीरथ श्रेष्ठ राजा ॥ ५ ।
सृंजया, ऐसाही गेला भगीरथ । करूं नको शोक पुत्रास्तव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गेले थोर थोर । नाहीं चिरंजीव कोणी एथें ॥ ७ ॥

अध्याय ६१ वा १०४

दिलीपाच्या यज्ञामाजी । उजळे यज्ञविधि ॥ १ ॥
वसुधेचें करी दान । त्रैलोक्यांत ज्यासी मान ॥ २ ॥
स्त्रिया विविधपेयमत्त । परी शुद्ध पातिव्रत्य ॥ ३ ॥
युद्ध करितां सागरीं । वाहनें न बुडती जळीं ॥ ४ ॥
तेणें विस्मित सकळ । म्हणती अपूर्व नृपाळ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । गेले थोर थोर राजे ॥ ६ ॥

अध्याय ६२ ते ६९ १०५

मांधात्याचें वृत्त निवेदिलें सर्व । गाथा ते अपूर्व ययातीची ॥ १
अंबऋषी तोही गेला राजराज । शशबिंदु श्रेष्ठ तोही गेला ॥ २
गय अग्नीलागीं मागे वरदान । धर्मावरी प्रेम नित्य असो ॥ ३ ॥
वल्कल जयाचें होतें लक्षद्वय । दाता रंतिदेव तोही गेला ॥ ४ ॥
कनकवृषभसहस्र, धेनुशत । अष्टोत्तर शत भार सोनें ॥ ५ ॥

---

१ तोळा.

प्रमाण सुवर्णनिष्काचें हें ऐसें । असंख्य निष्कांचें दान करी ॥ ६ ॥
सर्वदमन तो दुष्यंताचा पुत्र । गेला इहलोक सोडूनियां ॥ ७ ॥
वेनपुत्र पृथु वसुंधरेप्रति । दोहूनि जनांची पुरवी इच्छा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तोही इहलोक । सोडूनि स्वर्गस्थ जाहलासे ॥ ९ ॥

अध्याय ७० वा १०६

मुनि म्हणे सृंजयासी । ऐसे थोर हे नृपति ॥ १ ॥
गेले अन्यही जाणार । परशुरामही न स्थिर ॥ २ ॥
दान पृथ्वीचें घेऊन । कश्यप म्हणतां जा येथून ॥ ३ ॥
हटवी तत्काळ सागर । सोडूनियां एक शर ॥ ४ ॥
राही महेंद्रागिरीसीं । तोही जाईल पुढती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मुनि । कथिती सृंजयालागूनि ॥ ६ ॥

अध्याय ७१ वा १०७

धर्मालागीं व्यास षोडशनृपांचें । सांत्वनार्थ ऐसें कथिती वृत्त ॥१॥
ऐकूनि सृंजय बोले नारदासी । पावलों मी शांति काय करूं ॥ २ ॥
मुनि म्हणे मृतपुत्र हा जिवंत । आयुष्य कृतार्थ करीं त्याचें ॥ ३ ॥
अकृतार्थ भीरु यशहीन जनीं । पुत्र जो फिरूनि दिधला त्यासी ॥
धर्मा, अभिमन्यु कृतार्थ जाहला । सार्थकीं लागला देह त्याचा ॥
रात्रंदिन ज्ञाते इच्छिती जें स्थान । पावला तें जाण बाळ सख्यें ॥
ध्यानमग्न योगी याजक तपस्वी । पावती जे गति तेचि बाळा ॥ ७ ॥
अशक्य तयाचें पुनरपि येणें । वासुदेव म्हणे पुण्य थोर ॥ ८ ॥

१०८

मृत अभिमन्यु नृपासम शोभे । कांतिमान लाभे चंद्रतनु ॥ १ ॥
धर्मा, नको करूं शोक तयास्तव । स्थान ज्या अपूर्व प्राप्त झालें ॥२॥
दीर्घजीवी आम्हीं शोच्य धर्मराजा । भाग्यवंत तुझा बाळ लोकीं ॥
जाणूनि श्रेयाचा मार्ग आचरावा । शोक न करावा पापरूप ॥ ४ ॥
मनोवृत्तिरूप शोक शांतचित्ता । न बाधे सर्वथा युधिष्ठिरा ॥ ५ ॥
काळवश जग आणूनि ध्यानात । होई शांतचित्त शोकहीन ॥ ६ ॥

बोलूनियां ऐसें जाती व्यासमुनि । बोधें शांत मनीं धर्मराज ॥ ७ ॥
परी अर्जुनासी काय कथूं ऐसी । चिंता तयाप्रति वाटे बहु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कठिण कठिण । व्यवहार जाण ज्ञात्यासही ॥ ९ ॥

## प्रतिज्ञापर्व ४

अध्याय ७२ वा १०९

सूत म्हणे राया, संध्याकाळ होतां । दिन तो संपतां भयानक ॥१॥
लक्षूनि शिबिर येती महावीर । आली महाघोर वेळ आतां ॥ २ ॥
धनुर्धर पार्थ फिरतां माघारीं । अश्रु येती नेत्रीं कंठ दाटे ॥ ३ ॥
केशवासी म्हणे होऊनि सद्गद । भयोद्विग्न चित्त देवा, माझें ॥ ४ ॥
अडखळे वाणी गात्रें होती शांत । उत्साह कां नष्ट ऐसा माझा ॥५॥
पितृतुल्य धर्म असेल कीं सुखी । कृष्ण म्हणे कांहीं भासे अन्य ॥
रणांतचि संध्या करोनियां दोघे । चालले स्वमार्गें रथारूढ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शिबिरांत येतां । दिसे त्या शांतता भयप्रद ॥ ८ ॥

११०

पार्थ म्हणे कृष्णा, कां रे वाद्यध्वनि । येईनाचि कानीं शिबिरामाजी
अधोमुखें सैन्य धरी कां रे मौन । कोणी अभिनंदन न करी माझें ॥
पाहूनि हें सर्व मन भयाकुल । शिबिरीं कुशल असेल कीं ॥ ३ ॥
माधवा, विकल्प मनामाजी येती । असेल कीं सुखी द्रुपद माझा ॥
हास्यमुख माझा बाळ नित्यासम । पुढती धांवून न येई कां ? ॥ ५
चिंतामग्न ऐसे उभयही कृष्ण । येतां तयां खिन्न दिसती भ्राते ॥६॥
वासुदेव म्हणे अर्जुनाच्या चित्ता । दैवयोगें शंका सहज येई ॥ ७ ॥

१११

पार्थ म्हणे ऐसीं वदनें कां म्लान । बाळ माझा प्राण न दिसे कैसा॥
चक्रव्यूह आजी रचिला हे वार्ता । धाडिला कीं माझा बाळ रणीं ॥
व्यूहभेदज्ञान शिकविलें परी । अशक्य बाहेरी येणें तया ॥ ३ ॥
महावीर रणीं करील संहार । रणामाजी वीर पडला काय ॥ ४ ॥
सुकुमार माझा बाळ तो उपेंद्र । निमाला शार्दुल कैसा सांगा ॥५॥

केशवासमान सुभद्रानंदन । सुभद्रेचा प्राण वधिला कोणी ॥ ६ ॥
दाखवा रे, कोणी अभिमन्यु बाळ । प्राण हे व्याकुळ होती माझे ॥
वासुदेव म्हणे त्यागील कीं प्राण । दुःखार्त अर्जुन तळमळे ॥ ८ ॥

११२

सुकुमार माझा बाळ । मृदु, कुरळे कुंतल ॥ १ ॥
हरिणशावकासमान । तरल, विशाल नयन ॥ २ ॥
मत्तगजेंद्राचे परी । शौर्य जयाचें संगरीं ॥ ३ ॥
सिंहशावकाची गति । आज्ञाधारक मधुर भाषी ॥ ४ ॥
होतां तयाचें स्मरण । दिसती स्पष्ट हे सद्गुण ॥ ५ ॥
निग्रह त्या बालकाचा । अतुल पराक्रम साचा ॥ ६ ॥
शांत, दान्त, दयाशाली । बाळ माझा महाबळी ॥ ७ ॥
निजपक्षाचा अभिमानी । कैसा सांपडला रणीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बाळ । पार्थाहूनि तो सबळ ॥ ९ ॥

११३

हाय, हाय गेला प्रद्युम्नाचा सखा । प्राण केशवाचा, बाळ माझा ॥
लाडका तो वत्स न दिसतां मज । होईल प्राणान्त खचित माझा ॥
कोठें तें सौंदर्य पाहूं अप्रतीम । अनाथासमान पडला रणीं ॥ ३ ॥
नित्य मृदुशय्या, जयासी, तो रणीं । पहुडला मानी बाळ माझा ॥
रमवीती जया लावण्यलतिका । सभोंवतीं त्याच्या भालु आजी ॥
सूत, मागधांचें ऐके जो गायन । ध्वनि त्या भीषण जागविती ॥
छत्रछायायोग्य मुखपद्म ज्याचें । धूलिव्याप्त कैसें तेंचि रणीं ॥ ७ ॥
भग्नौकायुक्त वणिजासमान । मांडिला दारुण शोक पार्थें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धनुर्धर पार्थ । बोलला दुःखार्त धर्मालागीं ॥ ९ ॥

११४

एकाकी जो अनेकांसी । भिडला, गेला तो स्वर्गासी ॥ १ ॥
मज नसे लवही शंका । कर्णी येती त्याच्या हांका ॥ २ ॥
संकटीं त्या असहायासी । सहज अपेक्षा साह्याची ॥ ३ ॥

निःसंशय स्मरण माझें । झालें असेल बाळातें ॥ ४ ॥
असता जरी माझा पिता । संकटीं तो संरक्षिता ॥ ५ ॥
वारंवार ऐसी वाणी । आली असेल त्या स्थानीं ॥ ६ ॥
अथवा बाळ माझा ऐसें । बदला नसेलचि वाटे ॥ ७ ॥
पिता जयाचा अर्जुन । सुभद्रेचा जो नंदन ॥ ८ ॥
भागिनेय जो कृष्णाचा । दीन होईल तो कैसा ॥ ९ ।
वासुदेव म्हणे पार्थ । करी ऐसा बहु शोक ॥ १० ॥

११५

दुष्ट धनुर्धर धजले तरी कैसे । सुकुमार बाळातें वधावया ॥ १ ॥
पुत्र तो पार्थाचा, कृष्णभागिनेय । विसरले काय हतभागी ॥ २ ॥
नित्य जो सामोरा येई मजप्रति । कैसा धूलिमाजी पडला सूर्य ॥३॥
सुभद्रा, द्रौपदी करितील आक्रांत । केवीं करूं शांत तयांलागीं ॥
हृदय न केवीं होई माझें भग्न । ऐकूनि रूदन सुभद्रेचें ॥ ५ ॥
ऐकियेला रणीं कौरवांचा घोष । धिक्कारी तयांस वैश्यासुत ॥ ६ ॥
ऐकिलेंसी तदा परी कां यादवा । कथिलें न तेधवां मजलागीं ॥७॥
संहार खळांचा होता त्याचि क्षणीं । पार्थाच्या लोचनीं अश्रुपूर ॥
वासुदेव म्हणे सद्गद पार्थासी । बोलला श्रीपती महावीर ॥ ९ ॥

११६

कृष्ण म्हणे पार्था, आंवरीं हें दुःख । जाणें हेंचि भाग्य क्षत्रियाचें ॥
रणांत माघार न घेती जे कदा । तयांची संपदा हेचि असे ॥ २ ॥
संहारूनि रणीं असंख्य वीरांसी । आनंदें स्वर्गासी गेला बाळ ॥३॥
संग्रामीं मरण हाचि क्षात्रधर्म । नको शोकमग्न होऊं ऐसा ॥ ४ ॥
पहा हे सकळ सुहृज्जन दीन । करील सांत्वन कोण त्यांचें ॥ ५ ॥
प्रारंभीं तुजसी कथिला जो बोध । स्मरूनियां शोक न करीं ऐसा ॥
पार्थ म्हणे सांगा राजीवलोचन । करितां संग्राम वधिला कोणी ॥
करीन तयाचा क्षणांत संहार । म्हणे वासुदेव हंत हंत ॥ ८ ॥

---

१ धृतराष्ट्राच्या वैश्य जातीच्या स्त्रीचा पुत्र युयुत्सु.

११७

सकळही तुम्हीं असतां सन्निध । पडला रणांत बाळ कैसा ॥ १ ॥
कळतें जरी पूर्वी तुम्हीं असमर्थ । होतों संरक्षक मीचि तरी ॥ २ ॥
व्यर्थ तीं शस्त्रास्त्रें व्यर्थ पराक्रम । बाळाचें रक्षण न घडे जयां ॥ ३ ॥
वल्गनाचि काय करीतसे वाचा । पौरुषहीनांचा व्यर्थ जन्म ॥ ४ ॥
दुर्बल भीरूंचा धरिला विश्वास । माझाचि हा दोष स्पष्टपणें ॥ ५ ॥
बोलूनियां ऐसें पार्थ झाला स्तब्ध । मूर्तिमंत क्रोध भासला तो ॥
धर्म-कृष्णाविण कोणी अवलोकन । न करी नयन उंचावोनि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे युधिष्ठिर अंतीं । सकळही कथी समरवृत्त ॥ ८ ॥

अध्याय ७३ वा

११८

युधिष्ठिर म्हणे पार्था, संकटांत । बाळालागीं हांक मारियेली ॥१॥
व्यूहभेदार्थ तो सज्जला तत्काळ । असह्य तो भार शिरीं घेई ॥२॥
वैनतेयासम घुसला व्यूहांत । गेलों मागोमाग सकल आम्हीं ॥३॥
परी क्षुद्रभावें आम्हां जयद्रथें । शिवाच्या प्रसादें रुद्ध केलें ॥ ४ ॥
तेणें एकाकी तो बाळ व्यूहामाजी । कोंडिलें तयासी सकळांनीं ॥५॥
द्रोण, कृप, कर्ण, बृहद्बल, द्रौणि । एकाकी संग्रामीं लढती त्यासी
परी त्या वीरानें केलें घोरयुद्ध । वीर असंख्यात मर्दियेले ॥ ७ ॥
अंतीं शोकार्णवीं लोटूनि आम्हांसी । गेला स्वर्गलोकीं अभिमन्यु ॥
वासुदेव म्हणे धर्माचे ते शब्द । ऐकूनि निस्तब्ध धनंजय ॥ ९ ॥

११९

क्षणभरी शांत भासला अर्जुन । बोलला वचन 'हाय बाळा' ॥ १ ॥
बोलूनियां ऐसें निश्चेष्ट जाहला । खेद बहु केला सकलांनीं ॥ २ ॥
त्वरितचि उठे सावध होऊनि । बेभान तो वाणी वदला ऐका ॥ ३ ॥
जयद्रथ जरी न करी पलायन । अथवा शरण न ये कृष्णा ॥ ४ ॥
विसरला सर्व स्नेहभाव दुष्ट । उद्यांकि वध करीन त्याचा ॥ ५ ॥
न घडे हें तरी सकल पातकें । पीडितील मातें निश्चयेंसी ॥ ६ ॥
दुष्टवधाविण सूर्य अस्तंगत । होतां उद्यांकि वचन ऐका ॥ ७ ॥
प्रदीप्तवन्हींत प्रवेश करीन । कोण संरक्षण करी त्याचें ॥ ८ ॥

ऐकूनि प्रतिज्ञा पांचजन्य वाजे । गगन निनादे वाद्यघोषें । ९ ॥
वासुदेव म्हणे होई सिंहनाद । रात्रौ शिबिरांत तयावेळीं । १० ॥

अध्याय ७४ वा

१२०

ऐकूनियां वाद्यनाद । जयद्रथा कथिती दूत ॥ १ ॥
पार्थप्रतिज्ञा ऐकूनि । राजसभेसी जाऊनि ॥ २ ॥
वदला भयाकुल शब्द । जातों आपुल्या स्थळास ॥ ३ ॥
जीविताची मज आशा । संरक्षक कोण माझा ॥ ४ ॥
महावीर द्रोणादिक । असतां पार्थाचा न धाक ॥ ५ ॥
परी पार्थाची प्रतिज्ञा । ऐकूनियां भय मना ॥ ६ ॥
पांडवांची वेळ घोर । परी गर्जताती वीर ॥ ७ ॥
गुप्तस्थळीं मी जाईन । त्वरित द्यावें अनुमोदन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीत । जयद्रथ पात्रे कंप ॥ ९ ॥

१२१

कार्यदक्ष धार्तराष्ट्र जयद्रथा । म्हणे नरव्याघ्रा, अभय असो ॥ १ ॥
कर्णासवें आम्हीं रक्षूं तुजलागीं । मानूं नको भीति अर्जुनाची ॥२॥
परी सिंधुपति अस्वस्थ होऊनि । भेटला जाऊनि आचार्यांसी ॥ ३ ॥
म्हणे गुरुश्रेष्ठा, पार्थ जयद्रथ । तुळूनियां श्रेष्ठ कोण सांगे ॥ ४ ॥
द्रोण म्हणे पार्थ श्रेष्ठ निःसंशय । परी तूं निर्भय जयद्रथा ॥ ५ ॥
अर्जुना अभेद्य योजीन मी व्यूह । सर्वदा क्षत्रिय भयहीन ॥ ६ ॥
आत्मगोपन तें भ्याडाचें लक्षण । रणांत मरण भाग्य वीरा ॥ ७ ॥
तपस्व्यांचे लोक क्षत्रियां लाभती । सज्ज हो रणासी भिऊं नको ॥
आम्हां सकलांसी मानी अशाश्वत । युद्धपराङ्मुख होऊं नको ॥
वासुदेव म्हणे होती सिंहनाद । ऐकूनियां शब्द आचार्यांचे ॥ १० ॥

अध्याय ७५ वा

१२२

सूत म्हणे राया, अर्जुनासी कृष्ण । बोलला वचन तयावेळीं ॥ ॥
मज भ्रात्यांसी वा पुशिल्यावांचून । प्रतिज्ञावचन वदलासी हें ॥ २ ॥
उपहास परी न होवो पार्थाचा । उद्युक्त साहसा जाहलासी ॥ ३ ॥
कळल संकट, दूतमुखें वृत्त । झाला भयाभीत सिंधुपति ॥ ४ ॥

अभय तयासी देती गुरुद्रोण । योजना संपूर्ण सिद्ध असे ॥ ५ ॥
शकटव्यूहांत अर्धपद्मव्यूह । सूचिमुखीं राव जयद्रथ ॥ ६ ॥
भूरिश्रवा, कर्ण, कृप, वृषसेन । करिती रक्षण द्रौणिआदि ॥ ७ ॥
जिंकिल्यावांचूनि तयां सकलांसी । नव्हे कार्यसिद्धि निश्चयेंसी ॥
वासुदेव म्हणे कृष्णमंत्रावीण । म्हणे हें कठीण कार्य पार्था ॥ ९ ॥

अध्याय ७६ वा १२३

पार्थ म्हणे देवा, कर्णादिक षट्क । जिंकीन सहज रणामाजी ॥ १ ॥
ममार्धाही न्यून वीर ते सकल । ऐसें श्रेष्ठ बल दावीन मी ॥ २ ॥
त्रिभुवन जरी येईल साह्यासी । तरी सिंधुपति न वांचेल ॥ ३ ॥
दुर्योधनालागीं द्रोणांचा विश्वास । परी सैन्यभेद प्रथम त्यांचा ॥
सकलही माझीं अस्त्रें उदयीक । होतील प्रगट यादवेंद्रा ॥ ५ ॥
आप्त परी नीच, घोर अपराधी । पापी सिंधुपति शासनार्ह ॥ ६ ॥
संहारूनि रणीं दावीन विक्रम । करीन वचन पूर्ण माझें ॥ ७ ॥
निंदूं नको देवा, मम सामर्थ्यासी । सत्य विप्रांअंगीं सर्वकाळ ॥८॥
यज्ञांत वैभव, साधूंतें विनय । कृष्ण तेथें जय निश्चयेंसी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पार्थ श्रीकृष्णासी । सज्ज स्यंदनासी ठेवीं म्हणे ॥

अध्याय ७७ वा १२४

ऐसे क्रोधाकुल नर-नारायण । होतां बहु खिन्न देवादिक ॥ १ ॥
निर्जल तैं मेघ करिती गर्जना । गजादि रुदना करिती भयें ॥ २ ॥
रोमांचकारक जाहले उत्पात । सैन्य चिंतायुक्त कौरवांचें ॥ ३ ॥
कृष्णालागीं पार्थ म्हणे सुभद्रेसी । तेंवी उत्तरेसी शांत करीं ॥ ४ ॥
अंतःपुरीं तदा जाऊनियां कृष्ण । बोलला वचन सुभद्रेसी ॥ ५ ॥
सुभद्रे, काळाची अटळ हे गति । शूर कुलीनांची हेचि वाट ॥ ६ ॥
जिंकिले, पीडिले, वधिले, असंख्य । गेला पुण्यलोक लक्षूनियां ॥
तया तपस्व्याची प्राप्त होई गति । होऊं नको ऐसी शोकमग्न ॥ ८ ॥
वीरमाता, वीरपत्नी, वीरकन्या । वीरभगिनी धन्या सुभद्रे, तूं ॥९॥
वासुदेव म्हणे भगिनीसी कृष्ण । बोलला वचन शांत होई ॥ १० ॥

१२५

सुभद्रे, भोगील उद्यींक फल । जयद्रथ खल निश्चयेंसी ॥ १ ॥
इंद्रपुरीं जरी लपेल जाऊनि । तरी पार्थ रणीं ओढील त्या ॥ २ ॥
उद्यींक त्याचें पडेल मस्तक । निश्चयें रणांत पार्थशरें ॥ ३ ॥
यास्तव आंवरीं शोक वो भगिनी । बाळ पुण्यस्थानीं सौख्य भोगी ॥
ऊठ, उत्तरेसी करीं आतां शांत । जयद्रथवध सत्य मानीं ॥ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रशंसा पार्थाची । करी यदुपति तयावेळीं ॥ ६ ॥

अध्याय ७८ वा

१२६

उपदेशें दुःख अधिकचि होई । प्रत्ययासी येई नियम हाचि ॥ १ ॥
आर्तस्वरें कृष्णभगिनी बाळासी । म्हणे कां आम्हांसी त्यागियेलें ॥
कमललोचना, हाय हाय बाळा । धुळींत माखला देह तुझा ॥ ३ ॥
वधिलें तुजसी अनाथासमान । दाखवीं वदन एकवेळ ॥ ४ ॥
बाळा, सांग आतां कोठें तुज पाहूं । यमालयीं येऊं ऐसें वाटे ॥५॥
रक्षण बाळाचें जाहलें न जयां । धिक्कारचि तयां असो नित्य ॥ ६ ॥
वृष्णि पांचाल तैं भीम पार्थबल । जाहलें निष्फल धिक्कार त्यां ॥७॥
वासुदेव म्हणे सुभद्रेचे बोल । सामर्थ्य निष्फल कार्यहीन ॥ ८ ॥

१२७

अभिमन्यूवीण शून्य भासे जग । शोकग्रस्त मंद दृष्टि माझी ॥ १ ॥
अतिरथा, तुझा मातुल श्रीकृष्ण । पिता तो अर्जुन जगद्वीर ॥ २ ॥
ऐसें असूनियां कोंडिलें तुजसी । वेळ मज ऐसी प्राप्त झाली ॥ ३ ॥
स्वप्नासम तुझें जाहल जीवित । निश्चयें बुद्बुद आयुष्य हें ॥ ४ ॥
वत्सहीन धेनूसम हंबरते । कैंवी उत्तरेतें शांत करूं ॥ ५ ॥
अकाळीं कां बाळा, गेलासी निघूनि । दुर्ज्ञेय चि जनीं कालगति ॥६॥
लाभो तुजलागीं बाळा, पुण्यलोक । ज्या स्थळीं वरिष्ठ वसती ज्ञाते
इतुक्यांत येती द्रौपदी, उत्तरा । आकांत जाहला तयास्थानीं ॥ ८ ॥
मोकळा करूनि गळा आक्रंदती । मूर्छना तयांसी अंतीं येई ॥ ९ ॥
पाहूनियां खिन्न जाहला गोविंद । सिंचूनि उदक उठवी तयां ॥१०॥
वासुदेव म्हणे पुत्रशोका ऐसा । आघात न दुजा मानवासी ॥११ ॥

१२८

भगिनी वो किती करिसील शोक । अंतरीं विवेक करीं आतां ॥ १ ॥
उत्तरेसी धीर देई हे पांचाळी । सद्गति लाभली बाळालागीं ॥ २ ॥
आम्हां समस्तांसी लाभो हेचि गति । विक्रम तैसाचि घडो आम्हां
बोलूनियां ऐसें पार्थशिबिरांत । गेला जगन्नाथ तत्काळचि ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे निरोप वीरांसी । देई हृषीकेशी ऐशापरी ॥ ५ ॥

अध्याय ७९ वा

१२९

स्पर्शूनियां जल वैडूर्यसदृश । अंथरिले कुश स्थंडिलीं त ॥ १ ॥
मंगल अक्षता पुष्पमालायुक्त । शय्या सालंकृत शोभविती ॥ २ ॥
उत्तम आयुधें स्थापिलीं भोंवतीं । सुस्नात किरीटी पुढती होई ॥
माधवासी प्रेमें पूजूनियां पार्थ । त्र्यंबकबळी तो अर्पी तया ॥ ४ ॥
उपहारासह ऐसा महाबळी । सेवूनि वनमाळी तोष पावे ॥ ५ ॥
पार्थालागीं हरि म्हणे सुखनिद्रा । घेई आतां भद्रा, स्वस्ति असो ॥
निज शिबिरांत पुढती येऊन । उपायचिंतन करी मनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे योजूनियां युक्ति । समाधान चित्तीं पावे कृष्ण ॥८॥

१३०

घोर पार्थाची प्रतिज्ञा । चिंतिती न निद्रा कोणा ॥ १ ॥
पार्थवचन पूर्ण होवो । विघ्न विलयासी जावो ॥ २ ॥
युद्ध होईल उदयीक । निश्चयेंसी निर्णायक ॥ ३ ॥
अभिमन्यूच्या प्रभावें । विजय लाभो सहजभावें ॥ ४ ॥
ऐसें चिंतिती मनांत । सकल पांडव सैनिक ॥ ५ ॥
संवादही करिती हाचि । ऐसी रजनी कंठिती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । बोले दारुकालागून ॥ ७ ॥

१३१

दारुका, क्रोधानें संतप्त अर्जुन । प्रतिज्ञावचन वदला परी ॥ १ ॥
दुर्योधन यत्न करील बहुत । तैसेचि संकेत मंत्र्यांसवें ॥ २ ॥
जयद्रथवध न होवो म्हणोनि । सकलही रणीं येतील ते ॥ ३ ॥
शस्त्रनिपुण ते करितील रक्षण । अजिंक्यचि द्रोण इंद्रातेंही ॥ ४ ॥

यास्तव पार्थाचा पण सिद्ध होई। योजीन मी कांहीं युक्ति ऐसी ॥
दारुका, या जनीं प्रिय मज पार्थ। तयावीण व्यर्थ सकल विश्व ॥६॥
दुर्योधन-कर्णा, स्वयें मी जिंकीन। प्रसंगीं वधीन सकल वीरां ॥७॥
पळवीन रणीं सकळ नरेंद्र। धरीन मी चक्र करामाजी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थास्तव कृष्ण। तुच्छ लेखी प्राण ऐसी प्रीति ॥९॥

१३२

कृष्ण म्हणे सूता, दारुका पार्थाचा। सन्मित्र मी साचा सर्वकाळ॥
प्रत्यय हा येवो देव गंधर्वांसी। ऐसी मम कृति उदयीक॥ २ ॥
पार्थाचा जो द्वेष्टा तोचि माझा वैरी। मित्र, मैत्री करी पार्थासी जो
अर्धशरीर तो धनुर्धर माझें। दारुका, रथातें सिद्ध करीं ॥ ४ ॥
गरुडध्वज, तें छत्र, सकलास्त्रें। अश्व अलंकारें भूषवीं ते ॥ ५ ॥
दारुका, करीं तूं कवचधारण। समयीं फुंकीन पांचजन्य ॥ ६ ॥
ऐकतां तो नाद मजकडे येईं। वधीन विजयी जयद्रथा ॥ ७ ॥
वधावें जयासी ऐसें पार्थ इच्छी। योजीन मी तैसी युक्ति सदा ॥८॥
सूत म्हणे देवा, सारथी तूं ज्याचा। पराजय त्याचा कैसा होई ॥९॥
वासुदेव म्हणे बोलला दारुक। सामग्री ते सिद्ध सकल देवा॥१०॥

अध्याय ८० वा

१३३

गावल्गणि म्हणे धृतराष्ट्राप्रति। शिबिरीं पार्थासी निद्रा येई ॥ १ ॥
शोकसंतप्त तो होता चिंताभग्न। पाही एक स्वप्न भाग्यवंत ॥ २ ॥
स्वप्नामाजी येई कृष्णभगवान। देई उत्थापन प्रेमें पार्थ ॥ ३ ॥
कृष्ण म्हणे पार्था, विषाद न पावें। अटळ जाणावें भवितव्य ॥ ४ ॥
निश्चयेंसी शोक कार्यविनाशक। जाणसी सिद्धांत ज्ञानवंता ॥ ५ ॥
विषाद कासया करिसी तूं ऐसा। प्रतिकार होतां कार्यसिद्धि ॥६॥
प्रत्यक्ष जाणावा शत्रूचि हा शोक। करी उत्तेजित शत्रूलागीं ॥ ७ ॥
हतबल करी बांधवांसी शोक। नको क्षीणसत्व होऊं ऐसा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ज्ञानवंत पार्थ। बोलला कृष्णास ऐका तदा ॥ ९ ॥

१३४

पार्थ म्हणे नारायणा। सकल जाणसी सर्वज्ञा ॥ १ ॥
उदयीक सिंधुपति-। वधप्रतिज्ञा, हे माझी ॥ २ ॥

परी सकळ कौरव । अणितील विघ्न थोर ॥ ३ ॥
देवा, संकट येईल । होतां प्रतिज्ञा निष्फल ॥ ४ ॥
ऐशा संशयें मी खिन्न । साह्य होवो भगवान ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । बोले उदक स्पर्शून ॥ ६ ॥

१३५

कृष्ण म्हणे पार्था, अस्त्र पाशुपत । रक्षील निश्चित संकटीं या ॥१॥
विजयार्थ करीं प्रार्थना शिवाची । प्रसादें त्या प्राप्ति दिव्यास्त्राची ॥
ऐकूनि वचन उदक स्पर्शून । करी पार्थ ध्यान शंकराचें ॥ ३ ॥
ब्राह्ममुहूर्तासी ध्यानमग्न पार्थ । लक्षी नभपथ कृष्णासवें ॥ ४ ॥
वायुमार्गें त्यांचा नभांत संचार । श्रीकृष्णाचा कर धरिला पार्थें ॥
वन, आश्रम तैं पुण्यभागीरथी । लक्षूनियां जाती शिवस्थानीं ॥ ६ ॥
चंद्रप्रभायुक्त सरितासंयुक्त । धरातल स्पष्ट दिसलें तयां ॥ ७ ॥
दृढती देखिलें विष्णुपद त्यांनीं । येती पुण्यस्थानीं शंकराच्या ॥८॥
वासुदेव म्हणे सूर्यचंद्रासम । होतें कांतिमान पुण्यक्षेत्र ॥ ९ ॥

१३६

महेश्वर तयास्थानीं जटाधर । कर्पूरधवल विराजला ॥ १ ॥
समीप तयाच्या शोभली पार्वती । पिशाच्चें क्रीडती सभोंवार ॥२॥
कृष्णार्जुन तया शिवासी वंदिती । जगत्कारणासी अत्यादरें ॥ ३ ॥
पाहूनियां शिव नर-नारायणां । होई वरदाना सिद्ध प्रेमें ॥ ४ ॥
कृष्णार्जुन तदा करिती स्तवन । आदरें जोडून निजकरां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शिवसांब भोला । प्रसन्न जाहला कृष्णार्जुनां ॥ ६ ॥

अध्याय ८१ वा १३७

---

चित्तप्रसन्न अर्जुन । त्याचे प्रफुल्ल नयन ॥ १ ॥
कर जोडिले शिवासी । नवल देखे स्वप्नामाजी ॥ २ ॥
अर्पिला जो त्र्यंबकबलि । गोविंदासी तयावेळीं ॥ ३ ॥
दिसला पार्थासी त्या स्थानीं । पार्थ तदा जोडी पाणी ॥ ४ ॥
करी मानसपूजेतें । प्रार्थी कृष्ण शंकरातें ॥ ५ ॥

मागे दिव्यास्त्र शिवासी । हर्षें बोले शिव त्यासी ॥ ६ ॥
चाप-शरें ज्या दैत्यांसी । जिंकिलें तें अमृतकूपीं ॥ ७ ॥
टाकिलें तें घ्या काढून । यशदायी चाप-बाण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे चित्तीं । हर्षे कृष्णार्जुनांप्रति ॥ ९ ॥

१३८

वंदूनि शिवासी नर-नारायण । ऐश्वर्यसंपन्न बघती शर ॥ १ ॥
निर्मल उदकीं दिसती दोन सर्प । तयांमाजी एक सहस्रमुखी ॥२॥
मुखांतूनि त्याच्या येती अग्निज्वाळा । वंदिती नागाला कृष्णार्जुन ॥
रुद्राध्याय प्रेमें आरंभितां पार्थ । नवलचि एक पाही तेथें ॥ ४ ॥
तेचि नाग होती दिव्यचाप-शर । शिवासी ते वीर अर्पिताती ॥ ५ ॥
शिवापासूनि तैं प्रगटे तापसी । पिंगट जयासी वर्ण शोभे ॥ ६ ॥
नीललोहित तो, घेऊनि धनुष्य । ब्रह्मचारी स्थित जोडी बाणा ॥
मौर्वी, मुष्टि, लक्ष्य, अवलोकी पार्थ । मंत्र यथाशास्त्र ग्रहण करी ॥
विधियुक्त ऐसें अर्पूनियां ज्ञान । फेंकी चाप-बाण उदकामाजी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे जाहली पार्थासी । पूर्ववरस्मृति तयावेळीं ॥ १० ॥

१३९

अस्त्रप्राप्तिवर लाभला वनांत । शिवाप्रति पार्थ प्रार्थीतसे ॥ १ ॥
जाणूनि वचन पुरवी पशुपति । पाशुपत अर्पी अर्जुनातें ॥ २ ॥
कृतकार्य पार्थ होई प्रफुल्लित । वंदूनि शिवास शिबिरीं येई ॥ ३ ॥
अनुज्ञा शिवाची लाभतां संतुष्ट । होती कृष्ण-पार्थ मनामाजी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे जयद्रथवध । इच्छिती मनांत उभय योद्धे ॥ ५ ॥

अध्याय ८२ वा १४०

इकडे दारुकासी कृष्ण । वदतां उगवला दिन ॥ १ ॥
शिबिरांत विविध वाद्य-। नादें उठे धर्मराज ॥ २ ॥
ऱ्हस्ववस्त्रपरिधान । करूनियां करी स्नान ॥ ३ ॥
वस्त्र गुंडाळूनि केशीं । उटी लाविली अंगासी ॥ ४ ॥
शुभ्र धूतवस्त्रधारी । भावें अग्निकार्य करी ॥ ५ ॥
विप्र सहस्र पूजिले । विविध दानें तुष्ट केले ॥ ६ ॥

रत्नजडित आसनीं। पुढती बैसला जाऊनि ॥ ७ ॥
इतुक्यांत द्वारपाळ। म्हणे आला जगत्पाळ ॥ ८ ॥
धर्म म्हणे नसो कदा। प्रतिबंध त्या मुकुंदा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धर्म। करी कृष्णाचें पूजन ॥ १० ॥

अध्याय ८३ वा १४१

परस्परांलागीं कुशल पुशिती। सभास्थानीं येती सकल राजे ॥१॥
धर्म म्हणे कृष्णा, आश्रय तूं आम्हां। पार्थाची प्रतिज्ञा पूर्ण करीं ॥
दुःखार्णवीं देवा, नौका तूंचि होई। पैलतीरीं नेई दयावंता ॥ ३ ॥
सनातना, तुज माझा नमस्कार। शंख-चक्रधर पुरुषोत्तमा ॥ ४ ॥
केशवा, अससी नारायणऋषि। नारदें आम्हांसी कथिलें ऐसें ॥५॥
प्रणाम तुजसी असो देवदेवा। वचन माधवा पूर्ण करीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्मासी श्रीकृष्ण। बोलला वचन घनगंभीर ॥ ७ ॥

१४२

पार्थासम नसे योद्धा। त्रैलोक्यांत महाभागा ॥ १ ॥
महाबलाढ्य, तेजस्वी। अस्त्रकुशल तो धन्वी ॥ २ ॥
अग्नि जाळी जैं इंधना। संहारील कौरवसेना ॥ ३ ॥
गृध्र, गोमायूंचें भक्ष्य। खचित आतां जयद्रथ ॥ ४ ॥
इंद्रासवें देव जरी। रक्षितील त्या संगरीं ॥ ५ ॥
तरी यमालयीं पार्थ। पाठवील त्या निश्चित ॥ ६ ॥
सायंकाळीं पार्थ अद्य। हर्षें वंदील धर्मास ॥ ७ ॥
राया, नको करूं शोक। होईं आतां शांतचित्त ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण। वचन अमृतासमान ॥ ९ ॥

अध्याय ८४ वा १४३

रायालागीं सूत म्हणे धर्माप्रति। येऊनि किरीटी वंदी प्रेमें ॥ १ ॥
आलिंगूनि त्यासी बोले युधिष्ठिर। विजयी तूं वीर खचित आजी ॥
कृष्णासवें तव प्रफुल्ल वदन। विजयाचें चिन्ह स्पष्ट दावी ॥ ३ ॥
पार्थ म्हणे असो कल्याण रायाचें। श्रीकृष्णप्रसादें नवल आजी ॥

ऐसें बोलूनियां कथिला वृत्तांत । घडला स्वप्नांत तोचि सर्व ॥ ५ ॥
ऐकूनियां वीर वंदिती शिवासी । धन्य धन्य ऐसी सहज वाणी ॥
धर्माची अनुज्ञा घेऊनियां वीर । सज्जले झुंजार घोर युद्धा ॥ ७ ॥
सात्यकि, श्रीकृष्ण एकाचि रथांत । गेले शिबिरांत अर्जुनाच्या ॥८॥
वासुदेव म्हणे पार्थाचा स्यंदन । सज्ज करी कृष्ण झळके तेजें ॥ ९ ॥

१४४

संध्यावंदनादि आटोपूनि पार्थ । कवच, किरीट चढवी हर्षे ॥ १ ॥
प्रदक्षिणा घाली रथासी आनंदें । वंदूनि विप्रांतें चढला रथीं ॥ २ ॥
सांग्रामिक मंत्रें अभिमंत्रियेला । रथीं त्या शोभला पार्थभानु ॥ ३ ॥
कृष्ण, सात्यकि ते बैसले रथांत । गोविंद करांत रश्मि घेई ॥ ४ ॥
मंगलवाद्यांचा निनादला नाद । सकलही शुभचिन्हें होतीं ॥ ५ ॥
पाहूनियां पार्थ म्हणे सात्यकीसी । निश्चयें आम्हांसी विजयलाभ ॥
धर्माचें रक्षण सैंधवाचा वध । कर्तव्य द्विविध असे माझें ॥ ७ ॥
यास्तव करीं तूं धर्माचें रक्षण । साह्य मज कृष्ण चिंता सोडीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्मरक्षणार्थ । जाई शिनिश्रेष्ठ पार्थाज्ञेनें ॥ ९ ॥

---

## जयद्रथवधपर्व ५

अध्याय ८५ वा १४५

संजयालागूनि सकल वृत्तांत । पुशी धृतराष्ट्र उत्कंठेनें ॥ १ ॥
मानवाची बुद्धि भवितव्यासम । पुरुषप्रयत्न व्यर्थ होती ॥ २ ॥
कथिलें सकल दुर्योधनाप्रति । परी न तयासी रुचलें कांहीं ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां सकलही वृत्त । कथी धृतराष्ट्र संजयासी ॥ ४ ॥
विदुरादिकांचा कथिला उपदेश । स्वपुत्रासी दोष देई दुःखें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गावल्गणिप्रति । वृत्तांत निवेदीं म्हणे राव ॥ ६ ॥

अध्याय ८६ वा १४६

सूत म्हणे राया, शोक तुझा व्यर्थ । निष्फल विलाप करिसी आतां ॥
वाहूनियां जातां उदक बंधारा । घालूनि नृपाळा लाभ, कोणा ॥२॥

योग्यवेळीं जरी आज्ञा करितासी। आशा कल्याणाची होती राया
भीष्माहूनि पुरा सन्मानी जो तुज। तोचि कृष्ण आज तिरस्कारी॥
राजधर्म यदा मांडिलासी राया। झाला तें यादवा अनादर ॥ ५॥
अंतरांत तुझ्या होता राज्यलोभ। प्रायश्चित्त आज लाभे त्याचें ॥६॥
क्षात्रधर्मे वीर होऊनि उदार। करिती समर पांडवांसी ॥ ७॥
एक नृपाळा तें सकलही वृत्त। वासुदेव चित्त शांत करी ॥ ८॥

अध्याय ८७ वा १४७

प्रातःकाळीं द्रोणाचार्य। उत्साहानें रची व्यूह ॥ १॥
टणत्कार खणखणाट। कोठें म्हणती कृष्ण-पार्थ ॥ २॥
वाद्यघोषामाजी द्रोण। शंखनादें रचिती सैन्य ॥ ३॥
सौमदत्ति, अश्वत्थामा। कर्ण, शल्य, वृषसेना ॥४॥
कृपासवें पाचारूनि। म्हणती सिद्ध व्हावें रणीं ॥ ५॥
जयद्रथा, यांच्यासवें। षष्ठकोश जाई मागें ॥ ६॥
एकलक्ष अश्वसादी। साठ सहस्र घ्या रथी ॥ ७॥
चौदा सहस्र ते गज। सैन्य एकवीस सहस्र ॥ ८॥
जयद्रथालागीं द्रोण। देती अभयवचन ॥ ९॥
वासुदेव म्हणे कोश। लांब व्यूह तो चोवीस ॥ १०॥

१४८

पृष्ठभागीं दहा कोश तो विस्तीर्ण। मध्यचक्र जाण शकटव्यूह ॥
अन्य 'सूचिपद्म' व्यूह त्याच्या मागें। असंख्यात राजे संरक्षिती॥
गर्भांत तयाच्या गूढ व्यूह अन्य। रचूनियां द्रोण सज्ज होती ॥३॥
संरक्षूनि ऐसा वीर जयद्रथ। द्रोण शुभ्रवस्त्र गर्जताती ॥ ४॥
सागरासमान व्यूह तो विस्तीर्ण। पाहूनि चारण विस्मित तें॥ ५॥
धरातलव्यापी व्यूह तो अद्भुत। पाहूनि संतुष्ट दुर्योधन ॥ ६॥
वासुदेव म्हणे प्राणान्तसमयीं। सहजचि होई महायत्न ॥ ७॥

अध्याय ८८ वा १४९

हर्षित कौरव गर्जताती रणीं। येती रणांगणीं कृष्णार्जुन ॥ १॥
मुहूर्त त्या काळीं रौद्रनामें होता। व्यूह पांडवांचा सिद्ध होई ॥२॥

क्रुद्ध धनंजय अंतकचि भासे । रणांत तळपे सूर्यासम ॥ ३ ॥
पार्थासवें आजी करीन मी रण । गर्जे दुर्मर्षण अग्रभागीं ॥ ४ ॥
दुश्चिन्हें जाहलीं कौरवसैन्यांत । कृष्णार्जुन शंख फुंकिताती ॥ ५ ॥
देहधर्म गजवाजी तें करिती । कानावरी येती रणवाद्यें ॥ ६ ॥
संचरे पुढती शौर्य तयांमाजी । पार्थ गोविंदासी वदला तदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णस्मरण । करितां महाविघ्न दूर जाई ॥ ८ ॥

अध्याय ८९ वा १५०

पार्थ म्हणे देवा, गजसैन्यभेद । करूनियां रथ पुढतीं नेई ॥ १ ॥
दुर्मर्षण वीर होता जयास्थळीं । रथ तयास्थळीं नेई देवा ॥ २ ॥
तत्काळचि घोर युद्धासी प्रारंभ । झांकियेलें नभ अर्जुनानें ॥ ३ ॥
शिरकमळांचा वर्षाव क्षणांत । जाहला रणांत पार्थशरें ॥ ४ ॥
विछिन्न शरीरें विखुरलीं तेथें । सर्वत्र सैन्यातें पार्थ भासे ॥ ५ ॥
मानूनियां पार्थ परस्पराघात । करिती सैनिक विभ्रमानें ॥ ६ ॥
स्वयेंचि मानूनि पार्थ प्राण देती । संभ्रमें धांवती उलट मार्गें ॥७॥
वासुदेव म्हणे पार्थाच्या पुढती- । येई, त्यासी गति शराघातें ॥८॥

अध्याय ९० वा १५१

गजसैन्यासवें धांवे दुःशासन । पार्थासी वेढून गर्जतसे ॥ १ ॥
परी भग्नपंखगिरीसम गज । पाडूनि रणांत पार्थ हर्षे ॥ २ ॥
अंतीं दुःशासन करी पलायन । व्हावें संरक्षण म्हणे माझें ॥ ३ ॥
पुढती अर्जुन द्रोणांच्या समीप । मागे आशीर्वाद वंदूनियां ॥ ४ ॥
कल्याणाची इच्छा करा गुरुदेवा । पुत्र हा मानावा धनंजय ॥ ५ ॥
धर्म-कृष्णासम वंद्य तुम्हीं मज । प्रतिज्ञा हे सिद्ध होवो माझी ॥ ६ ॥
ऐकूनि ते वाणी हांसले आचार्य । म्हणती द्रोणांस प्रथम जिंकीं ॥
बोलूनियां ऐसें झांकिलें शरानें । वंदूनि पार्थानें धरिलें धनु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्राप्तकर्म जनीं । विनम्र होऊनि करिती ज्ञाते ॥ ९ ॥

अध्याय ९१ वा १५२

कृष्ण म्हणे पार्था, व्यर्थ कालक्षेप । करूं नको मार्ग आक्रमावा ॥१॥

पार्थ म्हणे देवा, इष्ट तें करावें। योग्यस्थळीं न्यावें त्वरित मज ॥
प्रदक्षिणा तदा घालूनि द्रोणांसी। चालला पुढती धनुर्धारी ॥ ३ ॥
द्रोण म्हणे कां रे सोडूनि शत्रूसी। अन्यस्थळीं जासी धनंजया ॥४॥
पार्थ म्हणे गुरो, जिंकील तुजसी। ऐसा कोण जगीं वीर असे ॥५॥
बोलूनियां ऐसें पार्थ व्यूहामाजी। घुसतां तयासी भिडती वीर ॥६॥
वासुदेव म्हणे अनेक मिळूनि। पार्थासी संग्रामीं निवारिती ॥ ७ ॥

अध्याय ९२ वा १५३

सूत म्हणे राया, पुनरपि पार्थ। द्रोणांसवें युद्ध करीतसे ॥ १ ॥
गुरु-शिष्य तदा परस्पराघात। करिती गुरु क्रुद्ध होई अंतीं ॥ २ ॥
पाहूनियां पार्थ धांवे अन्यावरी। कृतवर्म्यावरी सोडी शर ॥ ३ ॥
श्रुतायुध राव पुढती पातला। पितृवरें झाला अजिंक्य तो ॥ ४ ॥
वरुणाचा सुत माता ते पर्णाशा। अवध्य या सुता करा म्हणे ॥ ५ ॥
श्रुतायूसी गदा अर्पिली वरुणें। म्हणे या गदेनें अजिंक्य हा ॥ ६ ॥
परी लढेना जो तयासी मारितां। करील हे घाता श्रुतायूच्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वरुणवचन। गेला विसरून श्रुतायु तो ॥ ८ ॥

१५४

वीरघातिनी ती गदा। रणीं ताडिली मुकुंदा ॥ १ ॥
घेई झेलूनि तो स्कंधीं। चुकतां अभिचारविधि- ॥ २ ॥
जैंवी देवता उलटे। तैसें झालें श्रुतायूतें ॥ ३ ॥
वेगें उलटली गदा। करी श्रुतायूच्या घाता ॥ ४ ॥
तदा रणीं हाहाःकार। पलायन करिती वीर ॥ ५ ॥
क्रोधें कांबोजाचा पुत्र। शक्ति फेंकी पार्थावर ॥ ६ ॥
'सर्वपारसवी' शक्ति। आणी मूर्छना पार्थासी ॥ ७ ॥
परी क्षणीं सावधान। होऊनियां सोडी बाण ॥ ८ ॥
अश्व, सारथी वधिले। सुदक्षिणा ठार केलें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे रूप। होतें कांबोजाचें ख्यात ॥ १० ॥

अध्याय ९३ वा. १५५

'अभीषाह' 'शिबि' 'वसती' तें शूर। सोडिताती शर सैनिक ते ॥

धनंजयें त्यांचा करितां संहार। येती दोन वीर पुढती क्रोधें ॥ २ ॥
श्रुतायु त्यापरी अच्युतायु वीर। ताडिलें तोमर श्रुतायूनें ॥ ३ ॥
मूर्छना त्या घातें धनुर्धराप्रति। पाहूनि यदुपति मोह पावे ॥ ४ ॥
अच्युतायु तोही फेंकीतसे शूल। ढळला तैं तोल अर्जुनाचा ॥ ५ ॥
आश्रय त्यावेळीं घेतसे ध्वजाचा। हर्ष कौरवांचा अनावर ॥ ६ ॥
मृदुशब्दें कृष्ण पार्थासी संबोधी। इतुक्यांत शुद्धि येई पार्था ॥ ७ ॥
शरजालें व्याप्त पाही निज रथ। मेला मेला पार्थ, शब्द ऐसे ॥ ८ ॥
अग्नीसम वीर पुढती देखिले। इंद्रास्त्र सोडिलें अर्जुनानें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे उभय ते वीर। होती भग्नशिर पार्थशरें ॥ १० ॥

१५६

पुत्र त्या दोघांचे अंगावरी येती। पार्थ दावी त्यांसी यमलोक ॥ १ ॥
प्राच्य, दाक्षिणात्य, कलिंग तैं येती। तत्काळ तयांसी पार्थ वधी ॥
पुढती मायावी म्लेच्छ धांव घेती। पार्थासी व्यापिती अंधःकारें ॥
अस्त्रबळें पार्थ संहारी तयांसी। शोणिताची नदी वाहूं लागे ॥ ४ ॥
गदाधारी तदा अंबष्ठ धांवला। शिरच्छेद केला पार्थें त्याचा ॥ ५ ॥
पुढती असंख्य वीर सभोंवार। शोभला भास्कर पार्थ रणीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे होतां पापवृद्धि। गति संहाराची ऐसी वाढे ॥ ७ ॥

अध्याय ९४ वा

१५७

पाहूनियां रणीं पार्थाचा विक्रम। प्रार्थी दुर्योधन द्रोणांप्रति ॥ १ ॥
म्हणे गुरुराया, योजूनि उपाय। लाभेल विजय ऐसें करा ॥ २ ॥
शुष्केंधनें अग्नि तैसा पार्थ रणीं। सैन्यासी जाळूनि भस्म करी ॥ ३ ॥
उल्लंघूनि तुम्हां घुसला रणांत। इच्छितसां हित पांडवांचें ॥ ४ ॥
संतुष्ट तुम्हांसी ठेवितों मी सदा। विस्मरण चित्ता कैसें होई ॥ ५ ॥
अभय देऊनि जयद्रथाप्रति। मांडियेला अंतीं घात ऐसा ॥ ६ ॥
असाल दुधारी खड्ग मधुयुक्त। ऐसें मन्मनांत येतें जरी ॥ ७ ॥
सिंधुपतीलागीं आधार न होतों। सुखें जाऊं देतों सदनीं त्याच्या
आचार्यांसी दुःखें बोले दुर्योधन। यमाचाही यम, पार्थ भासे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे विनवी दुर्योधन। रोष न मानून साह्य करा ॥ १० ॥

१५८

द्रोण म्हणे राया, लवही न रोष । अश्वत्थामा मज भाससी तूं ॥
श्रीकृष्णसारथ्यें विजय पार्थासी । अश्वही रथासी जातिवंत ॥ २ ॥
तेणें अल्पस्थळ-कालही लाभतां । लंघूनि तो मार्गा जाई बहु ॥३ ॥
स्वमुक्त शराच्या पुढती एक कोश । धांवूनियां पार्थ जाई वेगें ॥
मज वृद्धाप्रति नसहे तो वेग । तेंवी धर्मराज द्वारावरी ॥ ५ ॥
सोडूनि तयासी पार्थाच्या मागूनि । कैसा जाऊं रणीं, दुर्योधना ॥
तुजलागीं साह्य असंख्यात वीर । तूंचि करीं घोर युद्ध आजी ॥७॥
राव म्हणे कैसा लढूं मी तयासी । अजिंक्य देवांसी धनंजय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रार्थी दुर्योधन । कीर्तिसंरक्षण करा आजी ॥ ९ ॥

१५९

द्रोण म्हणे सत्य अजिंक्य अर्जुन । तथापि रक्षीन तुजसी अद्य ॥१॥
कृष्णाच्या समक्ष पार्थाचा निरोध । केलासी हें जग अवलोकील ॥
अर्पितों तुजसी सुवर्णकवच । निर्भय जगांत तेणें होसी ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें उदक स्पर्शूनि । देती अभिमंत्रूनि कवच दिव्य ।४॥
शिवाच्या प्रसादें वृत्रयुद्धामाजी । लाभलें इंद्रासी कवच हेंचि ॥५॥
मानसमंत्रेंसी मज तें लाभलें । अद्य अर्पियेलें तुजसी राया ॥ ६ ॥
बोलूनियां ऐसें स्वयें गुरुद्रोण । कवचबंधन करिती रणीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कवचसंयुक्त । पातला रणांत दुर्योधन । ८ ॥

अध्याय ९५ ते ९६

१६०

पुढती झालें घोर युद्ध । महावीर करिती द्वंद्व ॥ १ ॥
लढती धृष्टद्युम्न-द्रोण । सात्यकीसी दुःशासन ॥ २ ॥
शकुनि तो माद्रेयांसी । धर्म झुंजला शल्यासी ॥ ३ ॥
विराटादि ते सकळ । युद्ध करिताती अतुल ॥ ४ ॥
कर्णादिक ते रक्षिती । यत्नें जयद्रथाप्रति ॥ ५ ॥
ऐसें वीर परस्पर । करिताती युद्ध घोर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रणीं । लढती उदार होऊनि ॥ ७ ॥

अध्याय ९७ वा १६१

युद्ध घनघोर होई तयास्थानीं । असंख्यात रणीं पडती वीर ॥ १ ॥
धृष्टद्युम्न-द्रोण संग्राम दारुण । करिती योजून तीव्र शरां ॥ २ ॥
खवळूनि द्रोण ध्वज-छत्र तोडी । विघातक सोडी एक शर ॥ ३ ॥
चतुर्दश शरें छेदी तो सात्यकी । पांचाळासी रक्षी ऐशा रीति ॥४॥
पाहूनियां द्रोण होती बहु क्रुद्ध । शिनिश्रेष्ठ विद्ध करी तयां ॥ ५ ॥
ऐशा समयासी धृष्टद्युम्नाप्रति । वेगें दूर नेती वीरश्रेष्ठ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें घोरयुद्ध । वीर होती सिद्ध प्राणार्पणा ॥ ७ ॥

अध्याय ९८ वा १६२

तीव्रशरें ताडी सात्यकीसी द्रोण । खवळला जाण सिंह जैसा ॥१॥
पाहूनि सात्यकि बोलला सूतासी । रथ ने पुढती भिऊं नको ॥ २ ॥
स्वकर्म त्यागूनि शस्त्रधारी विप्र । जाहला आधार कौरवांसी ॥३॥
बोलूनियां ऐसें भिडला सात्यकि । प्रखर सोडिती शर द्रोण ॥ ४ ॥
दारुण तें युद्ध पाहती समस्त । उजळली अस्त्रविद्या तदा ॥ ५ ॥
आचार्य त्या वेळीं जाहले संतुष्ट । म्हणती सात्वत वीर धन्य ॥६॥
भार्गव कीं भीष्म अथवा अर्जुन । भासे हा अस्त्रज्ञ म्हणती मुनि ॥
अंतीं वधेच्छेनें सोडिती दिव्यास्त्र । चिंती वारुणास्त्र सात्यकि तें ॥
हाहाःकार तदा रणांत जाहला । वीर होती गोळा पांडवांचे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे आचार्य-सात्यकि । संग्राम मांडिती ऐसा घोर ॥१०॥

अध्याय ९९ वा १६३

अस्ताचळमार्ग लक्षितां आदित्य । महावेगें पार्थ मार्ग क्रमी ॥ १ ॥
आजवरी ऐसा वेग न कोणाचा । देव-दानवांचा ऐकियेला ॥ २ ॥
ऐशा वेगें अश्व हांकी घननीळ । जाहले व्याकुळ अश्व तदा ॥ ३ ॥
देहभान परी सोडूनि धांवती । विंदानुविंदांसी स्फूर्ति चढे ॥ ४ ॥
परी पार्थशरें विंद गतप्राण ।·अनुविंद दारुण गदा घेई ॥ ५ ॥
श्रीकृष्णमस्तकीं फेंकिली क्रोधानें । अचल लीलेनें परी कृष्ण ॥६॥

इतुक्यांत पार्थ अनुविंदाप्रति । धाडी यमलोकीं बाणषट्कें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्षुधा-तृषायुक्त । अवलोकी पार्थ निज अश्वां ॥ ८ ॥

१६४

बहुत दूर सिंधूपती । अश्व विश्रांति इच्छिती ॥ १ ॥
पाहूनियां गर्जे पार्थ । म्हणे देवा, अश्व श्रांत ॥ २ ॥
करीं विशल्य तयांसी । रथ सोडीं या स्थळासी ॥ ३ ॥
करीन मी संरक्षण । कृष्ण देई अनुमोदन ॥ ४ ॥
तदा उतरला पार्थ । समरांगणीं होई स्थित ॥ ५ ॥
संधि कौरव मानिती । शरवर्षाव करिती ॥ ६ ॥
परी पार्थ होई तीर । अडवी सैन्याचा सागर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । बोले अर्जुनालागून ॥ ८ ॥

१६५

अर्जुना, हे अश्व जाहले तृषार्त । न दिसे उदक रणांगणीं ॥ १ ॥
प्रक्षालन यांचें जरी न जाहलें । उदक पाजिलें पाहिजेचि ॥ २ ॥
पहा हें उदक बोलूनियां ऐसें । सरोवर तेथें निर्मी पार्थ ॥ ३ ॥
हंस, चक्रवाक, मत्स्य, कूर्मादिक । क्रीडती अनेक तयामाजी ॥ ४ ॥
प्रफुल्लित किती कमळें शोभती । नारदही येती विस्मयानें ॥ ५ ॥
अस्त्रसामर्थ्य तें पार्थाचें अद्भुत । पाहूनि अच्युत संतोषला ॥ ६ ॥
शरमंदीरही निर्मिलें भोंवतीं । हांसला श्रीपती अत्यानंदें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शब्द धन्य धन्य । बोलला श्रीकृष्ण सहज तदा ॥

अध्याय १०० वा

१६६

सूत म्हणे राया, पादचारी पार्थ । करीतसे युद्ध समरांगणीं ॥ १ ॥
पराभूत तया करीनाचि कोणी । अश्वांलागीं पाणी पाजी कृष्ण ॥२॥
राया, ऐसें पूर्वी न झालें न घडे । निर्भय ते दोघे फिरती रणीं ॥३॥
जणूं विलासिनी स्त्रियांत गोविंद । अश्वांसी स्वच्छंद सौख्य देई ॥
पुसूनियां घाम काढियेलीं शल्यें । यथाशास्त्र केलें तृप्त तयां ॥ ५ ॥
चारा-पाणी तयां घालूनि सुखानें । प्रयाण त्वरेनें पुढती केलें ॥ ६ ॥
रथारुढ पार्थ पाहूनि कौरव । मानिती विस्मय लज्जायुक्त ॥ ७ ॥

धिक्कार आपुला करूनियां त्वरा । म्हणती आतां करा सैनिक हो ॥
वासुदेव म्हणे मानिती विनाश । कृष्ण-किरीटीस अडवी कोण ॥२॥

१६७

अपराधी दुर्योधन । क्लेश भोगील दारुण ॥ १ ॥
जयद्रथ यमलोकीं । गेला जाण निश्चयेंसी ॥ २ ॥
निज शरांपुढती पार्थ । वेगें चालला सरथ ॥ ३ ॥
वीर वेढितां तयासी । भयाभीत कौरव रथी ॥ ४ ॥
मागोमाग दुर्योधन । परी भयाकुल सैन्य ॥ ५ ॥
क्रुद्ध कृष्णार्जुनांप्रति । कोण रणांत अवलोकी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भक्त । अंगिकारी समर्थी क्रोध ॥ ७ ॥

अध्याय १०१ वा १६८

उल्लंघिती सैन्य कृष्णार्जुन वेगें । जाती निजमार्गें महाशौर्यें ॥ १ ॥
पाहोनि कौरव भयार्णवीं मग्न । करिती पलायन किती एक ॥ २ ॥
किती एक शौर्यें लढले पार्थासी । विदारी सैन्यासी धनुर्धर ॥ ३ ॥
दुर्भेद्य द्रोणांचा व्यूह तो लंघूनि । काळासम रणीं ताप देती ॥४॥
द्रोणातिक्रमण मानूनि अशक्य । निर्भय मनांत कौरव जे ॥ ५ ॥
तेचि भयाकुल जाहले निराश । करिती संकेत कृष्णार्जुन ॥ ६ ॥
प्रोत्साहन देती परस्परांप्रति । सफल मानिती निज हेतु ॥ ७ ॥
श्येनासम घेतां लक्ष्यावरी झेंप । राव कवचयुक्त पुढती धांवे ॥८॥
वासुदेव म्हणे लंघितां पार्थासी । कृष्ण अर्जुनासी वदला ऐका ॥

अध्याय १०२ रा १६९

अचानक हेतु दैवें सिद्ध होतां । पातला पुढती दुर्योधन ॥ १ ॥
कलहाचें मूळ जाण हा अर्जुना । यमाच्या सदना पाठवीं या ॥२॥
ऐकूनियां पार्थ रायावरी शर । सोडितांचि घोर समय लदा ॥ ३ ॥
मेला, मेला राव हाचि शब्द येई । राव धीर देई सैनिकांसी ॥ ४ ॥
क्रोधें दुर्योधन बोलला पार्थासी । बल तुझें आजी पाहीन मी ॥५॥
पांडूचाचि जरी पुत्र तूं अर्जुना । सिद्ध हो संग्रामा पुढती माझ्या ॥
वासुदेव म्हणे दुर्योधन ऐसें । बोलला पार्थातें क्रोधावेशें ॥ ७ ॥

अध्याय १०३ रा १७०

बोलूनियां सोडी शर। तीव्र अश्वांवरी चार
कृष्णावरी दहा बाण। करी प्रतोदछेदन ॥ २ ॥
पाहूनियां क्रुद्ध पार्थ। फेंकी बाण चतुर्दश ॥ ३ ॥
स्पर्शूनियां पडती खालीं। कृष्ण नवलचि करी ॥ ४ ॥
म्हणे पार्था, काय आजी। वेळ उलटली कैसी ॥ ५ ॥
पार्थ म्हणे हे गोविंदा। त्रिकालज्ञ तूं मुकुंदा ॥ ६ ॥
विप्रश्रेष्ठाचें हें बळ। तेणें राव हा अचल ॥ ७ ॥
परी पाहें माझी शक्ति। कृष्णा, ऐशाही समयासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। होई उद्युक्त विजयार्थ ॥ ९ ॥

१७१

चापावरी योजी वीर मानवास्त्र। छेदी गुरुपुत्र वरचेवरी ॥ १ ॥
अकालीं अस्त्राचा ऐसा होतां छेद। पार्थ म्हणे अस्त्र व्यर्थ आतां ॥
योजितां फिरोनि नाश सकलांचा। हर्ष कौरवांचा वर्णवेना ॥ ३ ॥
सर्वांगीं रक्षित होता दुर्योधन। जाणूनि अर्जुन युक्ति योजी ॥ ४ ॥
अश्व, सारथी तैं रथही छेदिला। विरथचि केला दुर्योधन ॥ ५ ॥
नखाग्रींचें मांस भेदितां यातना-। पावोनियां, रणा त्यागी राव ॥
पाहोनि असंख्य वीर धांव घेती। पांचजन्य फुंकी देव तदा ॥ ७ ॥
टणत्कार घोर पार्थधनुष्याचा। नादें त्या वीरांचा धीर गळे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे कृष्णार्जुन। वीरांसी जिंकून पुढती गेले ॥ ९ ॥

अध्याय १०४ था १७२

सूत म्हणे राया, भूरिश्रवा, शल। जयद्रथ, शल्य, वृषसेन ॥ १ ॥
कर्ण, कृप तैंवी अश्वत्थामा ऐसें। अष्टक वीरांचें धांव घेई ॥ २ ॥
तैसाचि नृपाळ पुढती धांवला। वाद्यनाद झाला तयावेळीं ॥ ३ ॥
निनादूनि गेल्या सकलहि दिशा। वीरद्वय शंखा फुंकी वेगें ॥ ४ ॥
हर्षित पार्थानें विक्रम मांडिला। पूर्वी न ऐकिला ऐसा कोणी ॥ ५॥

१ बोटाच्या नखांतून शल्य घुसावें तसे क्लेश पावून

भूरिश्रवा छेदी कृष्णाचा प्रतोद। करी शराघात पार्थावरी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मेघांसी जें वात। निवारी क्षणांत तेंवी पार्थ ॥ ७ ॥

अध्याय १०५-१०६ वा १७३

धृतराष्ट्रप्रश्नें वर्णन ध्वजांचें। करूनियां, सूतें कथिलें वृत्त ॥ १ ॥
सकलही वीर पार्थावरी जातां। क्षणांत झांकिती कृष्णार्जुनां ॥२॥
हाहाःकार तदा पांडवसैन्यांत। समर अन्यत्र महाघोर ॥ ३ ॥
द्रोणावरी जातां पांचाल धांवूनि। गर्जे निवारूनि द्रोण तयां ॥४॥
द्रोणमर्मभेद करी तदा धर्म। आच्छादिती द्रोण धर्माप्रति ॥ ५ ॥
मेला मेला धर्म ऐसा ध्वनि येई। परी धर्म घेई महाशक्ति ॥ ६ ॥
द्रोणांवरी वेगें फेंकितां ब्रह्मास्त्र। जपूनियां विप्र शर सोडी ॥ ७ ॥
छेदूनियां शक्ति पुढती जाई अस्त्र। जाहला आक्रांत तयावेळीं ॥८॥
वासुदेव म्हणे शांत धर्मराज। परी अधोक्षज साह्य त्यासी ॥ ९ ॥

१७४

ब्रह्मास्त्रासी तें ब्रह्मास्त्र। योजीतसे धर्मराज ॥ १ ॥
ऐसें अस्त्र होतां शांत। धर्म, द्रोणां करी विद्ध ॥ २ ॥
भग्नचाप गुरुद्रोण। गदा फेंकिती लक्षून ॥ ३ ॥
गदेवरी सुटतां गदा। क्रोध नावरे द्रोणांचा ॥ ४ ॥
केलें निःशस्त्र विरथ। विप्रें धर्मासी रणांत ॥ ५ ॥
बाहु उभारूनि धर्म। पुढती येतां धांवे द्रोण ॥ ६ ॥
इतुक्यांत सहदेव। रणामाजी घेई धांव ॥ ७ ॥
धर्म तयाच्या स्यंदनीं। गेला दूर तें बैसूनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सैन्य। तदा धर्माचें प्रसन्न ॥ ९ ॥

अध्याय १०७ वा १७५

परस्पर सैन्यें संग्राम दारुण। करिती रणस्थान शोभतसे ॥ १ ॥
क्षेमधूर्ति गेला इहलोक सोडूनि। वीरधन्वा रणीं गतप्राण ॥ २ ॥
धृष्टकेतु ऐसा करूनि विक्रम। उधळितो सैन्य कौरवांचें ॥ ३ ॥
विरथ, दुर्मुख निरमित्ररथीं। चढतां निरमित्राची घटका पूर्ण ॥४॥

सहदेवें त्यासी पाडिलें रणांत । गेला राजपुत्र त्रिगर्तांचा ॥ ५ ॥
नकुल, सात्यकी पीडिती सैन्यासी । द्रोण तें पुढती घेती धांव ॥६॥
वासुदेव म्हणे वेळ संकटाची । येतां न झुंजती भ्याड नर ॥ ७ ॥

अध्याय १०८ वा १७६

द्रौपदीपुत्रांसी ताडी सौमदत्ति । क्षणभरी होती भ्रांत सर्व ॥ १ ॥
परी अंतीं एक होऊनि बाळांनीं निर्दाळिलें रणीं महावीरा ॥ २ ॥
भयाभीत तदा कौरवांची सेना । ताडी भीमसेना अलंबुष ॥ ३ ॥
वृकोदर होई मूर्छित त्यावेळीं । उठला आरोळी फोडूनियां ॥ ४ ॥
पुढती जाहलें घनघोर युद्ध । अलंबुष क्रुद्ध तयावेळीं ॥ ५ ॥
बंधु बकासुर वधिला्सी म्हणे । आसुरीविद्येनें युद्ध करी ॥ ६ ॥
त्वाष्ट्रअस्त्रें भीम निवारी तयासी । अलंबुष अंतीं पळूनि जाई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रशंसा भीमाची । पांडव करिती अत्यादरें ॥ ८ ॥

अध्याय १०९ वा १७७

पुनरपि येई धांवोनियां दैत्य । आक्रांत रणांत मांडी बहु ॥ १ ॥
घटोत्कच तदा अडवी तयासी । मायावी युद्धासी रंग चढे ॥ २ ॥
भ्रांत, श्रांत अंतीं जाणूनि दैत्यासी । भीमसुत इच्छी वध त्याचा ॥
गरुडासमान घेऊनियां झेंप । उचली दैत्यास घटोत्कच ॥ ४ ॥
भ्रमणें फेंकितां घट जलपूर्ण । होई जेंवी चूर्ण तैसी स्थिति ॥ ५ ॥
अस्ताव्यस्त देह पडला रणांत । करिती सिंहनाद वीर तदा ॥ ६ ॥
अलाबुसमान अलंबुषवध । करितां घटोत्कचयश गाती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुर्जन ते अंतीं । विनाश पावती बलाढ्य ही ॥ ८ ॥

अध्याय ११० वा १७८

ऐका ऐका तयावेळीं । वेळ भयानक आली ॥ १ ॥
द्रोण-सात्यकींचें युद्ध । महाघोर तो प्रसंग ॥ २ ॥
भ्रांत जाहला सात्यकि । न सुचे कांहींचि तयासी ॥ ३ ॥
पाहूनियां त्याचें दैन्य । हर्षें गर्जे कौरवसैन्य ॥ ४ ॥
सात्यकींचें तें ग्रहण । अवलोकी राजा धर्म ॥ ५ ॥

म्हणे धांवा, धांवा रणीं । वांचवा तो वीराग्रणी ॥ ६ ॥
रज्जुबद्धचि पतंग । अश्वालककरांत ॥ ७ ॥
तैसी सात्यकीची दशा । अंत त्याचा पाहूं नका ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । धांवे साह्यार्थ ससैन्य ॥ ९ ॥

१७९

सृंजयादि वीर पांडवांसमेत । धांवले साह्यार्थ सात्यकीच्या ॥ १ ॥
खवळला द्रोण पंचाननासम । प्रगटला यम ऐसें भासे ॥ २ ॥
पांचाल केकय शतावधि रथी । यमसदनासी पाठविले ॥ ३ ॥
मत्स्य सृंजयांचा पराभव केला । त्राता न राहिला सैन्याप्रति ॥४॥
अग्रभागीं जो जो येईल तयासी । दाखवी यमाची वाट द्रोण ॥५॥
वासुदेव म्हणे साशंक तैं धर्म । देऊनियां कान शब्द ऐके ॥ ६ ॥

१८०

धर्म म्हणे पांचजन्य । नाद घुमवी गगन ॥ १ ॥
ऐका, ऐका ही गर्जना । शब्द करी कौरवसेना ॥ २ ॥
गांडीवाचा टणत्कार । वां न येई कानांवर ॥ ३ ॥
पांचजन्य मात्र वाजे । शंका अंतरीं धर्मातें ॥ ४ ॥
मानी संकटांत पार्थ । राव झाला सद्गदित ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्म । विनवी सात्यकीलागून ॥ ६ ॥

१८१

विपत्कालीं मित्रकार्य हे शैनेया । धरूनियां धैर्या करिती आर्य ॥१॥
शाश्वत तो धर्म रक्षावा समर्थी । तोचि ध्यानीं घेईं समय आजी ॥
शिनिश्रेष्ठा, मज अन्य न सुहृद । तत्पर हितार्थ आमुच्या तूं ॥ ३ ॥
पराक्रम तुझा श्रीकृष्णासमान । साह्य हो जाऊन पार्थालागीं ॥ ४ ॥
जोडूनियां कर प्रार्थितों मी तुज । कार्य हें अन्यास शक्य नसे॥५॥
तुजवरी बहु विश्वास पार्थाचा । वनांतही वाचा वदला ऐसी ॥६॥
पार्थाचा तूं शिष्य, शिष्य तो कृष्णाचा । गुरु भी गुरूचा शैना तव ॥
यालागीं वचन ध्यानीं घेईं माझें । साह्य हो पार्थातें वीरश्रेष्ठा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अनन्य भक्तीसी । निष्काम सेवेची हांव असे ॥ ९ ॥

अध्याय १११ वा १८२

शिनिश्रेष्ठ धर्माप्रति । वदला विनम्रचित्तेंसी ॥ १ ॥
महाराजा, पुण्यवंता । हेतु जाणोनि द्रोणांचा ॥ २ ॥
पार्थ वदला मजसी । संरक्षीं तूं नृपाळासी ॥ ३ ॥
तेणें निःशंकितचित्तें । वर्धीन मी त्या दुष्टातें ॥ ४ ॥
मजवरी ऐसें कार्य । गेला सोंपवूनि आर्य ॥ ५ ॥
चिंतूनि हें सर्वप्राज्ञा । मजलागीं करीं आज्ञा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । वदला सात्यकीलागून ॥ ७ ॥

१८३

शिनिश्रेष्ठा, सत्य सत्य जें बोलसी । परी चिंता माझी न धरीं मनीं ॥
भीमादिक वीर रक्षितील मज । धृष्टद्युम्नकाज करील हें ॥ २ ॥
दक्षपणें मीही लढेन रणांत । घटोत्कचादिक साह्य मज ॥ ३ ॥
द्रोणवधास्तव पांचालाचा जन्म । ध्यानीं हें आणून चिंता सोडीं ॥
यास्तव अनुज्ञा घेऊनियां माझी । पार्थाच्या साह्यासी त्वरित जाईं ॥
वासुदेव म्हणे परस्पर चिंता । वाटे एकमेकां सुहृद ते ॥ ६ ॥

अध्याय ११२ वा १८४

सात्यकीचें चित्त होऊनियां द्विधा । म्हणे काय पार्था वाटे येणें ॥
महारणामाजी न जातां मी, भ्याड । ऐसा अपशब्द वदती जनीं ॥
चिंतूनियां अंतीं निश्चय ठरवी । प्रमाण मानावी धर्मआज्ञा ॥ ३ ॥
म्हणे गुरूंचाही गुरू तूं नृपाळा । जाईन ज्या स्थळा पार्थ भिडे ॥
मत्त गज तेवीं रथी महारथी । मर्दूनि पुढती जाईन मी ॥ ५ ॥
किरातसैन्याचा कौरवां आधार । तयांचा संहार करूनि जातों ॥
पुढती गजारूढ हिमालयवासी । सैन्यें तीं म्लेच्छांचीं लंघीन मी ॥
वासुदेव म्हणे यापरी सात्यकि । महा समरासी सिद्ध होई ॥ ८ ॥

१८५

शिनिश्रेष्ठ म्हणे शिल्पशास्त्रवेत्ता । सिद्ध करो माझा रथ वेगें ॥ १ ॥
रुधिर, मादक पाजूनियां पेयें । अश्व सिद्ध केले सेवकांनीं ॥ २ ॥

दारुकाचा भ्राता सूत सात्यकीचा । उत्साह अश्वांचा अवलोकी ॥
सुस्नात सात्यकि करी बहु दानें । 'कैलातक' पानें मदान्वित ॥
सालंकृत वीर चाप-बाणें सज्ज । विप्रआशीर्वाद घेई सुखें ॥ ५ ॥
वंदूनि धर्मासी होई रथारूढ । भीम मागोमाग जाई त्याच्या ॥ ६ ॥
सात्यकि तयासी बोले वंदूनियां । रक्षीं तूं या ठाया धर्मालागीं ॥
पाहूनि तयाची निष्ठा वृकोदर । अनुज्ञा साचार देई तया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शिनिश्रेष्ठ वीर । प्रवेशला धीर रणामाजी ॥ ९ ॥

अध्याय ११३ वा १८६

यापरी सात्यकि पुढती जाई वेगें । अडवी तयातें गुरुद्रोण ॥ १ ॥
म्हणे प्रदक्षिणा घालूनियां पार्थ । गेला तैसें कृत्य न करीं वीरा ॥२॥
सात्यकि द्रोणांसी वंदूनियां बोले । गुरूनें जें केलें तेंचि योग्य ॥३॥
बोलूनियां ऐसें पुढती चालला । मार्ग दाविये‍ला सूताप्रति ॥ ४ ॥
अवंतीपतीच्या सैन्यासन्निध ते । दाक्षिणात्य उभे महावीर ॥ ५ ॥
बाल्हिक पुढती, पुढती कर्णसेना । हांकीं रे स्यंदना मध्यवेगें ॥ ६ ॥
योजनापूर्वक द्रोण धांव घेती । अडवूं पाहती सात्यकीतें ॥ ७ ॥
कृतवर्मा वेगें पुढती धांवला । अडवी भीमाला महावेगें ॥ ८ ॥
सात्यकीसवें तें लढला त्वेषानें । परी तो विक्रमें पुढती गेला ॥९॥
वासुदेव म्हणे पांडवसैन्यासी । वीर अडविती महाशौर्यें ॥ १० ॥

अध्याय ११४ वा १८७

राव म्हणे सूता, सेना गुणयुक्त । महा व्यूहस्थित असतां माझी ॥
परीक्षित सर्व तैसेचि कुलीन । तैंवी सवेतन सकलहि ॥ २ ॥
आचारसंपन्न, वरिष्ठ, उदार । रणांत माघार कैंवी घेती ॥ ३ ॥
लंघूनि तयांसी गेले कृष्णार्जुन । तैंवी युयुधान तोही गेला ॥ ४ ॥
वाटे हें दुर्दैव पुढती काय गति । योजना पुत्रांची काय सांग ॥५॥
शैनेय, भोजातें लंघूनियां जातां । पुत्रांची निराशा होईल कीं ॥६॥
होईल तयांसी वाटे पश्चात्ताप । आक्रमिला मार्ग पुढती काय ॥७॥

---

त्यकि. २ कृतवर्म्यास.

सूत म्हणे राया, दोष हा तुझाचि । शोक कासयासी करिसी व्यर्थ
वासुदेव म्हणे आप्तांचें वचन । उल्लंघी दारुण शोक तया ॥ ९ ॥

१८८

करितां शमाची याचना । अव्हेरिलेंसी तूं कृष्णा ॥ १ ॥
द्वेष, पक्षपातभाव । तैंवी अधर्मनिश्चय ॥ २॥
कळला श्रीकृष्णासी यदा । आरंभिलें तेणें युद्धा ॥ ३ ॥
राया, एकही सुकृत । आठवे न तुझें मज ॥ ४ ॥
तूंचि मूळ या नाशाचें । वृत्त आतां सकळ ऐकें ॥ ५ ॥
कृतवर्मा महावीर । करी भीमासी जर्जर ॥ ६ ॥
शिखंडीस येई मूर्छा । विक्रमी तो भोजराजा ॥ ७ ॥
मत्स्य, पांचाळ जिंकिले । युद्ध घोर आरंभिलें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अंतीं । सेना व्याकुळ धर्माची ॥ ९ ॥

अध्याय ११५ वा १८९

राया, ऐशावेळीं सात्यकि खवळे । विरथचि केलें हार्दिक्यासी[1] ॥१॥
कृतवर्मा ऐसा पराभूत होतां । लंघूनिया पंथा जाई वीर ॥ २ ॥
त्रिगर्तकुमार पुढती सिद्ध होते । तैंवी गजयोद्धे धांव घेती ॥ ३ ॥
निवारितां त्यांसी धांवे जलसंध । छेदिलें धनुष्य सात्यकीचें ॥४॥
सात्यकीनें त्याचें छेदितां धनुष्य । तोमर करात घेई वीर ॥ ५ ॥
खंडित तें होतां खड्गें चाप तोडी । अन्य चापें सोडी प्रखर बाण ॥
जलसंधाचे ते छेदियेले कर । अंतीं तोडी शिर शिनिश्रेष्ठ ॥ ७ ॥
अंबारी गजाच्या येई उदराखालीं । सेना बहुत मेली पळतां गज ॥
वासुदेव म्हणे तयावेळीं द्रोण । करिती दारुण युद्ध क्रोधें ॥९॥

अध्याय ११६ वा १९०

वीर दुर्मर्षण, दुःसह, विकर्ण । तैंवी चित्रसेन धांव घेती ॥ १ ॥
एकटा सात्यकि दमवी तयांसी । कौरवेंद्र त्यासी अडवी शौर्यें ॥२॥
परा धार्तराष्ट्र अंतीं पलायन । करितांचि सैन्य भय पावे ॥ ३ ॥

१ कृतवर्म्यास

कृतवर्मा तदा पुढती ठाकला । ताडिलें तयाला सात्यकीनें ॥ ४ ॥
कवच फोडूनि मूर्छित त्या केलें । सूतें हांकियेले पुढती अश्व ॥ ५ ॥
इकडे सावध होई कृतवर्मा । होई निजकर्मा सिद्ध रणीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मर्दूनि सैन्याली । चालला पुढती शैनेय तो ॥ ७ ॥

अध्याय ११७ वा १९१

इंद्र-बलीसम जाहला संग्राम । सात्यकीतें द्रोण ताडिताती ॥ १ ॥
तोडियेलें चाप मोडियेली गदा । शिनिश्रेष्ठ तदा गर्जे क्रोधें ॥ २ ॥
द्रोण शरविद्ध होतां सारथ्यासी । क्रोधें ताडिताती गुरु द्रोण ॥३॥
मूर्छित तो होतां खवळे सात्यकि । हांकूनि स्वर्देचि रथ लढे ॥ ४ ॥
द्रोणसारथ्याचा करोनियां वध । गर्जे जैसा व्याघ्र शिनिश्रेष्ठ ॥ ५ ॥
उधळतां अश्व म्हणती वीर धरा । गुरूलागीं करा साह्य कोणी ॥
धांवाधांव तदा करिताती वीर । व्यूहद्वारीं अश्व स्थिर होती ॥
द्वारावरी वीर पाहूनि धर्माचे । अडवी तयांतें गुरुद्रोण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे गुरुद्रोण । स्वस्थानींची जाण स्थिर होती ॥९॥

अध्याय ११८-११९ १९२

सूत म्हणे राया, सुदर्शन वीर । सात्यकीसी शर ताडीतसे ॥ १ ॥
परी सात्यकीनें वधिलें तयासी । बोले सारथ्यासी हांकीं रथ ॥२॥
सूता, पहा शौर्य पार्थाचें सर्वत्र । छिन्नगात्रव्याप्त रणांगण ॥ ३ ॥
लघूनि सागर आलों पैलतीरीं । आतां धैर्य धरीं सूतश्रेष्ठा ॥ ४ ॥
सूत म्हणे हांकूं रथ कोणत्यामार्गें । निर्भय मी सांगे वधेसी कोणा ॥
वीर म्हणे आतां करीन विक्रम । भासतील दोन पार्थ रणीं ॥ ६ ॥
पार्थाच्या समक्ष अस्त्रविद्या माझी । दावीन द्रोणांसी अत्यानंदें ॥७॥
ऐसें बोलूनियां लंबदाढीयुक्त । शबर आणि शक वधिले बहु ॥ ८ ॥
अजिंक्य कांबोज, यवन वधिले । नवल जाहलें वासुदेवा ॥ ९ ॥

अध्याय १२० वा १९३

मत्त मातंग सात्यकि । वीर तया अडवीती ॥ १ ॥
शकुनि, दुःशासन, कर्ण । जिंकी तयां वीरश्रेष्ठ ॥ २ ॥

दुर्योधन पुढती येतां । प्राण घेई सारथ्याचा ॥ ३ ॥
अश्व उधळले तदा । दूर नेती कौरवश्रेष्ठा ॥ ४ ॥
भयाकुल सकल सैन्य । करीतसे पलायन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । पराक्रम सात्यकीचा ॥ ६ ॥

अध्याय १२१ वा १९४

राव म्हणे सूता, एक अनेकांसी । जिंकितां सात्यकि घडलें काय
निर्लज्ज पुत्रांनीं पुढती काय केलें । द्रोणादि जिंकिले वीर कैसी ॥२॥
पार्थाहूनि नाश केला सात्यकीनें । रायालागीं म्हणे सूत ऐकें ॥ ३ ॥
दुर्योधन करी आज्ञा किरातांसी । पाषाण फेंकिती थोर थोर ॥ ४ ॥
गजमस्तकें ते भासले पाषाण । उडविलें चूर्ण सात्यकीनें ॥ ५ ॥
प्रदीप्त तें चूर्ण उसळे गगनीं । पसरतां रणीं सैन्य दग्ध ॥ ६ ॥
लक्षावधि हस्त पाषाणसंयुक्त । पडले रणांत नवल झालें ॥ ७ ॥
अवशिष्ट वीर पर्वतासमान । वर्षतां पाषाण तेचि गति ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अश्व, गज, सेना । अश्मचूर्णें दैना पावे रणीं ॥ ९ ॥

१९५

आर्त सैन्यशब्द ऐकूनियां द्रोण । सूतासी स्यंदन म्हणती हांकीं ॥
सात्यकीविक्रमें सैन्य भयाकुल । होईन आधार तयालागीं ॥ २ ॥
सूत म्हणे येती पांचाल, पांडव । धरूनियां गर्व अंगावरी ॥ ३ ॥
अति दूर गेला सात्यकि रणांत । करूनि विवेक आज्ञा व्हावी ॥४ ॥
इतुक्यांत वीर सात्यकि पाहिला । सिंहासम गेला वधूनि मृगां ॥
द्रोणआश्रयासी धांवले कौरव । दुःशासन धांव घेई वेगें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सात्यकीचें भय । वाटे सात थोर वीरांलागीं ॥ ७ ॥

अध्याय १२२ वा १९६

दुःशासनालागीं पाहूनियां द्रोण । बोलले वचन पळसी कां रे ? ॥१॥
कुशल असे कीं दुर्योधन राव । तैसाचि सैंधव, युवराजा ॥ २ ॥
पलायन कैसी योग्य वाटे तुज । दुष्कृत्यांचें आज स्मरण करीं ॥३॥
द्रौपदीतें दासी ऐसें वदलासी । षंढ मानिलेंसी पांडवांतें ॥ ४ ॥
सकलांसी तुच्छ मानूनियां ऐसा । भ्याडासम आतां पळसी काय ॥

एकाकी सात्वता पाहूनियां कां रे । कांपती हीं गात्रें बुद्धिमंदा ॥६॥
कपटद्यूतींचे हेचि अक्ष शर । होतील विचार सुचला नाहीं ॥ ७ ॥
पार्थाचे प्रखर शर तैं सात्वत । सोडूनि रणास पळसी कैंवी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मातेच्या उदरीं । म्हणती द्रोण, करीं वास आतां ॥९॥

१९७

तुज पलायन रुचे । तरी वंदी जा धर्मातें ॥ १ ॥
पार्थाचे ते घोर शर । भेदिती न जों शरीर ॥ २ ॥
जोंवरी न सकल भ्राते । नाहीं गेले मृत्युपंथें ॥ ३ ॥
अथवा धर्मासवें कृष्ण । नाहीं गेला खवळून ॥ ४ ॥
गदापाणी वृकोदर । नाहीं ठाकला समोर ॥ ५ ॥
करीं तोंवरीच शम । स्मरूनि भीष्मांचें वचन ॥ ६ ॥
मंदमाति दुःशासना । आतां त्यागूं नको रणा ॥ ७ ॥
जाई सात्वतासमोर । युद्ध करीं घनघोर ॥ ८ ॥
मूकपणें दुःशासन । गेला रणासी निघून ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे लाज । नसे स्वार्थी पापिष्ठास ॥ १० ॥

१९८

दुःशासनालागीं शब्दांचें ताडन । करूनियां द्रोण समरीं गेले ॥१॥
पांचाळतनय वीरकेतु तदा । अडवी भारद्वाजा महाधैर्यें ॥ २ ॥
ढुंकूनीहि तया न पाहती द्रोण । येती तैं धांवून बहुतवीर ॥ ३ ॥
लीलेनेंचि तयां वधूनियां द्रोण । लंघूनियां सैन्य पुढती जाती॥ ४ ॥
बंधुवधें खिन्न होई धृष्टद्युम्न । नेत्र अश्रुपूर्ण होती त्याचे ॥ ५ ॥
खवळूनि तदा धांवला पार्षत । आच्छादी द्रोणांस प्रखर बाणें ॥६॥
परी स्मितहास्य करूनियां द्रोण । छेदिती ते बाण सकलही ॥ ७ ॥
इतुक्यांत बाण येती मर्मांतक । जाहले मूर्छित द्रोणगुरु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे उपसूनि खड्ग । धांवला सवेग पार्षत तैं ॥ ९ ॥

१९९

आरक्तनयन क्रुद्ध धृष्टद्युम्न । चढला जाऊन रथावरी ॥ १ ॥
द्रोणशिरच्छेद करावा ही इच्छा । त्यागूनि तैं मूर्छा उठले द्रोण ॥

वैतस्तिक शर सोडिती तैं द्रोण। गेला धृष्टद्युम्न रथावरी ॥ ३ ॥
तदा महाघोर युद्ध त्या दोघांचें। इंद्र-प्रल्हादांचें स्मरण देयां ॥ ४ ॥
इतुक्यांत द्रोण वधिती सूता। अश्व पार्षतातें नेती दूर ॥ ५ ॥
पळवूनि तदा सकळ सैन्यासी। द्रोण स्वस्थळासी जाती सौख्यें ॥
वासुदेव म्हणे पांडवांचें सैन्य। उत्साहविहीन तयावेळीं ॥ ७ ॥

अध्याय १२३ वा २००

द्रोणवचनें ताडित। दुःशासन रणस्थित ॥ १ ॥
करी सात्वतासी रण। वीर मैनाकासमान ॥ २ ॥
अचल, करी सिंहनाद। दुःशासन करी युद्ध ॥ ३ ॥
लीलामात्रें शिनिश्रेष्ठ। पळवी कौरववीरांत ॥ ४ ॥
दुःशासन हांक फोडी। सूतासवें वीरा वेधी ॥ ५ ॥
बाणजाल तैं सात्यकि। कीटा जैंवी ऊर्णनाभि- ॥ ६ ॥
बद्ध करी, तैसें कर्म। घडता बद्ध दुःशासन ॥ ७ ॥
पाहूनियां कौरवेंद्र। योजीतसे बहुत वीर ॥ ८ ॥
तीन सहस्र त्रिगर्त। सात्यकीसी करिती युद्ध ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भक्त। सदा निर्भय जगांत ॥ १० ॥

२०१

पाहोनि त्रिगर्तां जैंवी झंझावात। लोळवी वृक्षांस तैसें करी ॥ १ ॥
पंचशत वीर संहारिले क्षणीं। अन्य घाबरूनि पळूनि जाती ॥ २ ॥
ऐसा तो निर्भय आक्रमितां पंथ। दुःशासन क्रुद्ध शक्ति फेंकी ॥३॥
एकाचि शरानें शक्ति ते छेदितां। प्रवर्तला युद्धा दुःशासन ॥ ४ ॥
क्षणभरी त्यासी खेळवी सात्वत। पुढती विरथ करीतसे ॥ ५ ॥
अश्व, सूत, रथ, चापही भंगिलें। भीमहेतु आले पुढती ध्यानीं ॥
दुःशासन तदा त्रिगर्तस्यंदनीं। बैसूनियां रणीं दूर जाई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सात्वत विक्रमी। रणांत आक्रमी निजमार्ग ॥ ८ ॥

अध्याय १२४ वा २०२

राव म्हणे सूता, एकाकी सात्वत। वांचला रणांत कैसी सांगे ॥१
सूत म्हणे राया, आजवरी ऐसें। एकत्र नव्हतें सैन्य कदा ॥ २ ॥

परी सात्यकीचें शौर्य अलौकिक । मर्दुनि वीरांस पुढती गेला ॥३॥
दुर्योधन तदा पुढती धांव घेई । धर्मराज दावी शौर्य तया ॥ ४ ॥
इतुक्यांत येई कोलाहल कानीं । होई रणांगणीं घोरयुद्ध ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रसंग कठीण । लढती गुरुद्रोण पुढती ऐका ॥ ६ ॥

अध्याय १२५ वा

२०३

द्रोण सोमकांचें युद्ध । झाली गर्जना प्रचंड ॥ १ ॥
बृहत्क्षत्र महायोद्धा । केकयांचा ज्येष्ठ भ्राता ॥ २ ॥
तदा होई गतप्राण । धृष्टकेतु सोडी बाण ॥ ३ ॥
परी अजिंक्य तो विप्र । वधिला शिशुपालपुत्र ॥ ४ ॥
पुत्र तयाचा धांवतां । तोही गेला यमलोका ॥ ५ ॥
पाहूनि तें जरासंध- । पुत्र, धांव घेई शूर ॥ ६ ॥
परी तत्काळचि द्रोण । घेती तयाचाही प्राण ॥ ७ ॥
पाहूनियां पांडवसेना । भयें हांका मारी भीमा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सैन्य । गाई द्रोणांचे सद्गुण ॥ ९ ॥

२०४

पार्षताचा सुत धांवे क्षत्रवर्मा । चापहीन द्रोणां करीतसे ॥ १ ॥
तत्कालचि द्रोण घेती अन्य चाप । द्रुपदपुत्रास वधिती क्षणीं ॥२ ॥
चेकितान तदा पुढती ठाकला । परी तोहि झाला गतप्राण ॥ ३ ॥
कर्णावरी ज्याच्या रुळती शुभ्र केश । वीर ऐसा वृद्ध युवकां वधी॥
पांचाळपति तैं बोले व्याघ्र, मृगां । सहज वधी तैसा युवकां द्रोण॥
जयामुळें ऐसे वळी असंख्यात । भोगील तो क्लेश दुर्योधन ॥ ६ ॥
बोलूनियां ऐसें हांऊनियां क्रुद्ध । धांवला द्रुपद द्रोणावरी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे थोरांचा संग्राम । व्यर्थ घेई प्राण सामान्यांचे ॥ ८ ॥

अध्याय १२६ वा

२०५

पाहूनि द्रोणांचा विक्रम धर्माची । अचलही शांति चलित होई ॥
निराधारपणें पाही दशदिशा । चिंती कृष्ण-पार्थां परी व्यर्थ ॥ २ ॥
टणत्कार कर्णी न येई चापाचा । ध्वज सात्वताचा न दिसे तोही ॥
तया वेळीं धर्म चिंताकुल होई । सात्वतार्थ जाई कोण म्हणे ॥ ४ ॥

धाडूनि त्या वीरा द्विगुणित चिंता । होई, म्हणे आतां काय करूं ॥
ऐसा चिंतामग्न भीमाच्या सन्निध । पातला त्वरित धर्मराज ॥ ६ ॥
भीम म्हणे राया, आमुचा तूं धीर । कां ऐसा अधीर होसी अद्य ॥
धर्म म्हणे अगा, वृकोदरा वेगें । सात्यकीच्या मागें जाई रणीं ॥८॥
कृष्णार्जुनांसवें सात्यकीचें क्षेम । सुचवीं गर्जून सिंहनादें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे स्नेहार्द्र नृपाळ । पाहूनि व्याकुल सिद्ध भीम ॥ १० ॥

अध्याय १२७ वा २०६

भीम म्हणे राया, अजिंक्य ते वीर । अंतरांत धीर राहो सदा ॥१॥
परी संतोषार्थ जाईन रणांत । करूं नको शोक महाराजा ॥ २ ॥
पार्षतासी म्हणे सावधानचित्तें । रक्षण धर्माचें करीं वीरा ॥ ३ ॥
केवळ राजाज्ञा जातों मानूनियां । मुमुर्षु ज्या ठायां जयद्रथ ॥ ४ ॥
धृष्टद्युम्न म्हणे भीमा, जा निःशंक । द्रोणांचा न धाक आम्हांलागीं ॥
ऐकूनि तें भीम वंदी धर्माप्रति । सज्जला एकाकी पुढती जाण्या ॥
अग्नि, दूर्वा, धेनु, दुग्ध, गोरोचन । अक्षता, सुवर्ण, दधि स्पर्शी ॥
कैलातक मद्य प्राशूनि, विप्रांसी । वंदूनियां याची आशीर्वाद ॥
पीत, रक्त, कृष्ण, शुभ्रवस्त्रें अंग । झांकूनियां सिद्ध संग्रामासी ॥९॥
वासुदेव म्हणे कवच, कंठत्राण । करूनि धारण रथीं बैसे ॥ १० ॥

२०७

ऐसा भीमसेन सिद्ध । इतुक्यांत रणीं नाद- ॥ १ ॥
पांचजन्याचा घुमला । भय वाटलें धर्माला ॥
म्हणे ऐक ऐक भीमा । कृष्ण फुंकी पांचजन्या ॥ ३ ॥
संकटांत सव्यसाची । ऐसें घेई माझी मति ॥ ४ ॥
कुंती-द्रौपदीसी काळ । वाटे दुःखांत लोटील ॥ ५ ॥
आतां मज भान नसे । भीमा, त्वरित जाई तेथें ॥ ६ ॥
ऐकूनियां धर्मशब्द । भीम करी सिंहनाद ॥ ७ ॥
निवारिती त्यासी वीर । खवळला तैं शार्दूल ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्रोण । म्हणती पुढती जा जिंकून ॥ ९ ॥

२०८

घेऊनि अनुज्ञा गेला धनुर्धर। तजसी न शौर्य तयापरी ॥ १
भीम म्हणे केला सन्मान पार्थानें। अडवील शौर्यानें कोण पार्था ॥
ब्रह्मबंधो, मज समजें न पार्थ। वैरी तुझा स्पष्ट भीमसेन ॥ ३ ॥
पुत्र तुझे आम्हीं परी ऐसे शब्द। दाखविती स्पष्ट भाव तुझा ॥ ४ ॥
दयावंत पार्थ, न हा भीमसेन। करील हा कर्म योग्य तेंचि ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां फेंकी निजगदा। अश्व, सूत, रथा चूर्ण करी ॥ ६ ॥
क्रुद्ध दुःशासनें ताडियेली शक्ति। छिन्न क्षणामाजी करी भीम ७॥
कुंडभेदी तेंवी सुषेण वधिला। दीर्घनेत्र झाला गतप्राण ॥ ८ ॥
रौद्रकर्मा, दुर्विमोचन उभय। म्हणे वासुदेव ठार केले ॥ ९॥

२०९

धृतराष्ट्रसुत वधितां हे तीन। संग्राम दारुण करिती वीर ॥ १ ॥
विंदानुविंद तैं सुवर्मा कोरव। वधिला सगर्व, सुदर्शन ॥ २ ॥
तदा दाणादाण जाहली सैन्याची। वीर किंकाळती पशूसम ॥ ३ ॥
भयाकुल ऐसे वीर कौरवांचे। पिटाळिती वेगें अश्वांलागीं ॥ ४ ॥
थोपटूनि दंड करी तलशब्द। तेंवी सिंहनाद भीमसेन ॥ ५ ॥
भिववूनि ऐसी कौरवांची सेना। पाहूनियां द्रोणा पुढती धांवे ॥
वासुदेव म्हणे ऐसा भीमसेन। करीत कंदन पुढती जाई ॥ ७ ॥

अध्याय १२८ वा

२१०

स्मितपूर्ण द्रोण करिती ताडन। परी ग्रासी भीम बांधवांसी ॥ १ ॥
महा तेजस्वी तो फेंकी वीर गदा। करी चेंदामेंदा ऐशारीति ॥ २ ॥
पाहोनि तें कर्म घाबरले वीर। मृग जेंवी व्याघ्रदर्प येतां ॥ ३ ॥
गरुडासमान भरारी मारितां। पांडवसेनेचा हर्ष वाढे ॥ ४ ॥
इतुक्यांत येती क्रुद्ध गुरुद्रोण। पांडवांचें सैन्य वधिती बहु ॥ ५ ॥
उड्डाण करोनि तयावेळीं भीम। करी घोर कर्म रणामाजीं ॥ ६ ॥
झांकूनियां नेत्र ग्रीवा स्कंधावरी। हस्त वक्षस्थळीं आंवळूनि ॥७॥

---

क्षुद्र ब्राह्मणा.

वृष्टीमाजी वृषासम झेली शर । धांवला सत्वर मनोवेगें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विस्मय जनांसी । पाहूनि वीराची नवलकृति ॥ ९ ॥

२११

ऐसा भीमसेन द्रोणांच्या सन्निध । येऊनियां रथ ओढी वेगें ॥ १ ॥
उचलूनि क्रोधें भिरकावी गगनीं । आश्चर्यचि रणीं तयावेळीं ॥ २ ॥
अन्यरथास्थित द्रोण पुढती येती । परी तीच गती होई त्यांची ॥ ३ ॥
ऐसे आठ रथ फेंकूनि क्षणांत । जाऊन रथांत विराजला ॥ ४ ॥
वासूनियां तोंडें पाहती त्या वीर । करीत जर्जर पुढती जाई ॥ ५ ॥
जातां जातां तया दिसला सात्वत । करीतसे युद्ध घोर क्रोधें ॥ ६ ॥
तैसाचि पुढती जातां दिसे पार्थ । आनंद हृदयांत न सामावे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तयावेळीं भीम । गर्जे मेघासम वारंवार ॥ ८ ॥

२१२

भीमाचा तो शब्द ऐके जैं मुकुंद । करिती दिव्यनाद कृष्णार्जुन ॥
वृषभासम ते फोडिती गर्जना । भीमावलोकना उत्कंठित ॥ २ ॥
सकळांचे शब्द येतां कानावरी । आनंद अंतरीं धर्मालागीं ॥ ३ ॥
म्हणे भीमा, माझा पूर्ण झाला शब्द । मानितों सद्भाग्य आजी मोठें
महाविक्रमी तो बंधु माझा पार्थ । राहिला जिवंत घोर रणीं ॥ ५ ॥
प्रतिज्ञा तयाची होईल कीं पूर्ण । होईल कीं शम तयायोगें ॥ ६ ॥
वांचवील काय उर्वरित वीर । दयाळु विचार करी धर्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चिंतितां हें धर्म । होई महारण रणांगणीं ॥ ८ ॥

## अध्याय १२९ वा

२१३

राव म्हणे सूता, भीमापुढें कोण । मांडूनियां ठाण युद्ध करी ॥ १ ॥
रथावरी रथ गजावरी गज । आपटी तयास जिंकी कोण ॥ २ ॥
ऐसा तो कृतान्त उगाळी चंदन । कोण आंवरून धरी तया ॥ ३ ॥
कौरवतृणासी दावाग्नि तो जाळी । कोण ऐशावेळीं अडवी तया ॥
मजलागीं भय अन्याचें न वाटे । सौम्य तयापुढें पार्थादिक ॥ ५ ॥
सूत म्हणे राया, ऐशा भीमावरी । वर्षावचि करी अंगराज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्ण-भीमयुद्ध । पाहूनियां स्तब्ध सकल योद्धे ॥ ७ ॥

२१४

महा भयकारी घोर। युद्ध पाहती जे वीर ॥ १ ॥
झाले भयाकुल तदा। गळती चापें त्यजिती खड्गां ॥ २ ॥
वाहनेंही भयाकुल। विसर्जिती मूत्रमल ॥ ३ ॥
कर्ण आच्छादी भीमासी। भीम शरजाल छेदी ॥ ४ ॥
नतपर्व सोडी बाण। व्याकुळ तें होई कर्ण ॥ ५ ॥
क्षुरें तोडिली प्रत्यंचा। भल्लें नाश सारथ्याचा ॥ ६ ॥
पुढती अश्वही मारिले। कर्णें उड्डाण तें केलें ॥ ७ ॥
वृषसेनाच्या स्यंदनीं। अंतीं चढला जाऊनि ॥ ८ ॥
झाला रणीं सिंहनाद। कृष्णार्जुनही हर्षित ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्ण। करी आतां युद्ध सौम्य ॥ १० ॥

अध्याय १३० वा

२१५

दुर्योधन वेगें भेटला द्रोणासी। म्हणे व्यूहामाजी घुसला भीम ॥
आश्चर्य सकलां वाटे गुरुराया। कैसा पराभवा पावलासी ॥ २ ॥
सत्यनाश आतां खचित होणार। मांडिला विचार काय सांगा ॥३॥
पुढती करावें काय तें कथावें। संग्रामासी जावें म्हणती द्रोण ॥४॥
मागें पुढें भय जाहलें आपणा। परी कृष्णार्जुनां अडवी वेगें ॥ ५ ॥
द्यूत झाला खेळ परी ह्या प्राणान्त। पातला प्रत्यक्ष दुर्योधना ॥ ६ ॥
जा जा जयद्रथा, संरक्षीं तूं आतां। सांभाळ द्वाराचा करीन मी॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां राव। रणीं घेई धांव क्रोधावेगें ॥ ८ ॥

२१६

युधामन्यु, उत्तमौजा। वधिती कौरवांच्या फौजा ॥१॥
करिती प्रवेश व्यूहांत। सेना भेदूनि अन्यत्र ॥ २ ॥
पाहूनियां दुर्योधन। अडवी तयांसी जाऊन ॥ ३ ॥
उत्तमौजा तो विरथ। युधामन्यूच्या रथांत ॥ ४ ॥
बैसतांचि उभय भ्राते। करिती विरथ रायातें ॥ ५ ॥
गदापाणी दुर्योधन। येई पुढती धांवून ॥ ६ ॥
चूर्ण करूनियां रथ। बैसे शल्याच्या रथांत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भ्राते। पुढती जाती अन्यरथें ॥ ८ ॥

अध्याय १३१ वा २१७

सूत म्हणे राया, भीमावरी कर्ण । धांवला गर्जून पुनरपि ॥ १ ॥
राव म्हणे भीम पार्थाच्या सन्निध । अडवी कर्णास कैशापरी ॥ २ ॥
उभयांसी बंधुभाव ज्ञात होता । रुचला तयां कैसा घोरमार्ग ॥ ३ ॥
दुर्योधनाप्रति कर्णाचा ज्या धीर । कैसा वृकोदर लढला त्यासी ॥
महाबळी कर्ण, सूडभाव भीमा । तयांच्या संग्रामा कथन करी ॥५॥
सूत म्हणे राया, सोडूनि कर्णासी । निघाला पुढती भीमसेन ॥ ६ ॥
परी कर्ण तया देऊनि आव्हान । म्हणे पलायन करिसी कां रे ॥ ७॥
कुंतीच्या सुतासी शोभेना हें कर्म । ऐकूनियां भीम फिरला मागें ॥
वासुदेव म्हणे पुढती महारण । होई अंतीं कर्ण पळूनि जाई ॥ ९ ॥

अध्याय १३२ वा २१८

राव म्हणे कर्ण भार्गवाचा शिष्य । जिंकिला रणांत कैसा भीमें ॥
पाहूनि तें काय करी दुर्योधन । संजया कथन करीं मज ॥ २ ॥
तेंवेंचि कर्णानें पुढती काय केलें । सूत म्हणे झालें घोरयुद्ध ॥ ३ ॥
अन्य रथावरी बैसूनियां कर्ण । आला खवळून रणांगणीं ॥ ४ ॥
सर्प, व्याघ्र किंवा श्येनपक्षी दोन । शरभ दारुण लढती वाटे ॥ ५ ॥
द्यूत तें कठोर, भाषण कर्णाचें । आठवे भीमातें वनवास ॥ ६ ॥
सकलही दुःखें स्मरूनियां भीम । प्राणपणें रण मांडी तदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे महाघोर युद्ध । जाहलें अद्भुत तयावेळीं ॥ ८ ॥

अध्याय १३३ वा २१९

राव म्हणे सूता, महारथी कर्ण । वारंवार रण केंवी त्यागी ॥ १ ॥
अनीतीचें फल वाटे हें मजसी । कर्ण पांडवांसी कैसा जिंकी ॥ २॥
आजवरी कर्ण पांडवांपुढती । विजयी कदापि नाही झाला ॥ ३ ॥
वीरांचा विनय मानूनि दौर्बल्य । केला व्यर्थ खेळ कौरवांनीं ॥४॥
सूत म्हणे वीर एकमेकांवरी । आघात संगरीं करिती घोर ॥ ५ ॥
चाप, अश्व, रथ, तोडितां कर्णाचें । भान न तयातें पुढती राही ॥
पाहूनि दुर्जय धांवे नृपाज्ञेनें । वधिलें भीमानें परी तया ॥ ७ ॥

दुःखें कर्ण तया घाली प्रदक्षिणा। महावीर रणा न सोडीचि ॥८॥
वासुदेव म्हणे रणांगणीं वीर। सर्वकाल धीर धरिती ऐसा ॥ ९ ॥

अध्याय १३४ वा २२०

पुढती अन्यरथीं वैसूनियां कर्ण। प्रवर्ते दारुण युद्धालागीं ॥ १ ॥
वीर एकमेकां ताडिती क्रोधानें। खड्ग, शक्ति, बाणें परस्पर ॥२॥
पुनरपि कर्ण जाहला विरथ। दुर्मुख साह्यार्थ धांव घेई ॥ ३ ॥
शिलीमुखबाणें तयालागीं भीम। दाखवी सदन यमधर्माचें ॥ ४ ॥
वैसूनियां कर्ण दुर्मुखाच्या रथीं। वाम कर भेदी कौंतेयाचा ॥ ५ ॥
रक्तलांछित तैं खवळला भीम। सोडी दिव्य बाण कर्णावरी ॥ ६ ॥
असह्य ते शर होऊनियां कर्ण। संग्राम सोडून पळूनि गेला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अग्नीसम भीम। दग्ध करी सैन्य कौरवांचें ॥ ८ ॥

अध्याय १३५ वा २२१

राव म्हणे सूता, पुत्राचे प्रलाप। सकलही व्यर्थ जाहले ते ॥ १ ॥
महावीर कर्ण जिंकील पांडवां। रायाचा हा व्हावा दूर भ्रम ॥ २ ॥
अश्वत्थामा, शल्य, कृपांसवें कर्ण। असमर्थ जाण भीम रणा ॥ ३ ॥
एकाकी जयानें जिंकिलें द्रोणांसी। तेथ त्या कर्णाची स्थिति काय ॥
आतां तरी भ्रम जाईल पोराचा। पश्चात्ताप साचा होईल त्या ॥५॥
खवळूनि जातां सात्यकि, अर्जुन। घेतील रे प्राण सकळांचे ॥ ६ ॥
सूत म्हणे राया, तूंचि कालकूट। भक्षिलेंसी, स्पष्ट फल त्याचें-॥७॥
भोगीं आतां व्यर्थ दुःख कां करिसी। दुर्योधनमति दिसली श्रेष्ठ ॥
वासुदेव म्हणे संजय पुढती। भीम विक्रमासी कथितो ऐका ॥ ९ ॥

२२२

दुर्मद तो दुर्मर्षण। जय, दुःसह, दुर्धर जाण ॥ १ ॥
भीमावरी पंच भ्राते। धांव घेती पुत्र तुझे ॥ २ ॥
पाहूनियां धांवे कर्ण। करी संग्राम दारुण ॥ ३ ॥
परी भीम त्यां पांचांसी। दावी यमसदनासी ॥ ४ ॥
कर्णावरी सोडी शर। झांकी तयांचें शरीर ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध। वीर वटारिती नेत्र ॥ ६ ॥

अध्याय १३६ वा २२३

धार्तराष्ट्रवध पाहूनियां कर्ण। संतप्त होऊन शर सोडी ॥ १ ॥
परी भीमसेनें तोडियेलें चाप। ससूत अश्वास ठार केलें ॥ २ ॥
अन्य चापें कर्ण करितां संग्राम। चाप तें छेदून हांसे भीम ॥ ३ ॥
उतरूनि कर्ण फेंकीतसे गदा। छेदितां ती योद्धा क्रोधा पावे ॥ ४ ॥
कवच फोडोनि सायकांची वृष्टि। करी वीरश्रेष्ठी भीमावरी ॥ ५ ॥
पंचविंशति तें शर शरीरांत। घुसतां कर्णास असह्य ते ॥ ६ ॥
इतुक्यांत फोडी कवचही भीम। सव्य बाहु जाण विद्ध केला ॥ ७ ॥
पलायन तदा करीतसे कर्ण। पाही दुर्योधन दुःखाकुल ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे साह्य व्हा कर्णास। ऐसें राव स्पष्ट वदला वीरां ॥

२२४

उपचित्र तो चित्राक्ष। शरासन, चारुचित्र ॥ १ ॥
चित्रायुध, चित्रवर्मा। बंधु धांव घेती रणा ॥ २ ॥
पाहूनि त्यां कौरवांसी। हर्ष जाहला भीमासी ॥ ३ ॥
सोडूनियां बाणषट्क। दावी तयां यमलोक ॥ ४ ॥
पाहूनि तें रडला कर्ण। आला रणांत धांवून ॥ ५ ॥
घोर संग्राम पुढती। यमासम ते भासती ॥ ६ ॥
प्रफुल्लित ते पलाश। वीर शोभले रणांत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे रण। अलौकिक तें दारुण ॥ ८ ॥

अध्याय १३७ वा २२५

प्राणांवरी वीर होऊनि उदार। करिताती घोर युद्ध शौर्यें ॥ १ ॥
भूरिश्रवा कृप तेंवी कृष्णार्जुन। म्हणती धन्य धन्य वृकोदर ॥ २ ॥
रोमांचकारी तें पाहूनियां रण। साह्य व्हा गर्जून वदला राव ॥ ३ ॥
शत्रुसह, शत्रुंजय, चित्रायुद्ध। चित्रसेन, दृढ, चित्र तेंवी ॥ ४ ॥
विकर्णासवें ते सप्तवीर भ्राते। धांव घेतां हर्षे भीमसेन ॥ ५ ॥
सुवर्णभूपित ‘ सायक ’ तें सप्त। प्राशूनियां रक्त गगनीं गेले ॥ ६ ॥
ऐसे वीर सप्त पाडिले रणांत। विकर्णार्थ शोक करी भीम ॥ ७ ॥

म्हणे वीरा, गेले पितामह तेही । निष्ठुरचि पाहीं क्षात्रधर्म ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्तव्य कठोर । ध्येयनिष्ठ वीर पार पाडी ॥ ९ ॥

२२६

पुढती करी सिंहनाद । भीम थोपटूनि दंड ॥ १ ॥
ऐकूनि तो हर्षें धर्म । करी रणवाद्यस्वन ॥ २ ॥
द्रोणावरी करी चाल । कौरवेंद्र तैं व्याकुळ ॥ ३ ॥
एकाधिक बंधु तीस । समरीं झाले होते मृत ॥ ४ ॥
तदा आठवे रायासी । स्पष्ट वाणी विदुराची ॥ ५ ॥
आठवलीं तीं दुष्कर्में । मर्मांतिक तीं वचनें ॥ ६ ॥
सूत म्हणे राया, ऐसा । प्रताप हा सकल तुझा ॥ ७ ॥
तुझ्यास्तव ऐसा नाश । पाहियेला मी प्रत्यक्ष ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठ । मित्र दावी दोष स्पष्ट ॥ ९ ॥

अध्याय १३८ वा २२७

राव म्हणे सूता, माझाचि अपराध । प्राप्तचि हा शोक करणें आतां ॥
आतां पश्चात्ताप करूनियां काय । योग्य तें कर्तव्य करणें प्राप्त ॥२॥
असो वृत्त सूता, पुढती कथावें । सूत म्हणे घ्यावें ऐकूनियां ॥ ३ ॥
झंझावातें जैवी वनाचा विध्वंस । तैसेंचि रणांत पडलें सैन्य ॥ ४ ॥
सिंधु, सौवीर ते कौरव पळाले । स्ववीरचि मेले कर्णशरें ॥ ५ ॥
गज, अश्व वीर रुधिराची नदी । असंख्य वाहती प्रेतराशी ॥ ६ ॥
भग्नरथ, चापें, परशु, गदा, खड्गें । मुकुट कवचें अलंकार ॥ ७ ॥
वस्त्रें, छत्रें शोभे रण नभासम । ग्रहयुक्त जाण नक्षत्रेंसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सैन्याचा विनाश । लढतां ते श्रेष्ठ वीर रणीं ॥ ९ ॥

अध्याय १३९ वा २२८

बाणत्रयें विद्ध करी कर्ण भीमा । भीम त्याच्या कर्णा छेदीतसे ॥१॥
मस्तकाचा वेध करूनियां भीम । कर्णासी बेभान करी तदा ॥ २ ॥
सावध होऊनि लढतां महावीर । तोडी वृकोदर चापें त्याचीं ॥३॥
एक दोन, तीन, क्रमें अष्टादश । छेदिलीं अनेक ऐसीं चापें ॥ ४ ॥

खवळला आतां राधेचा नंदन । बाण शलभांसम सोडी बहु ॥ ५ ॥
तैसेचि भीमाचे शर ते गगनीं । गेले आच्छादूनि गगनांगण ॥ ६ ॥
रुद्ध झाला वायु सर्वत्र अंधार । पुष्पें विद्याधर वर्षताती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सामग्री भीमाची । मर्यादित होती रथावरी ॥ ८ ॥

२२९

यमदंडासम भीम सोडी बाण । परी छेदी कर्ण तत्काळ तो ॥ १ ॥
पुढती प्रत्यंचा तूणीर भेदिला । अश्वहीन केला रथ त्याचा ॥ २ ॥
युधामन्युरथीं चढला तैं भीम । ध्वज-चाप छिन्न कर्ण करी ॥ ३ ॥
रथशक्ति तदा फेंकिली भीमानें । छेदिली कर्णानें तत्काळचि ॥४ ॥
ढाल हातीं घेतां छेदिली कर्णानें । फेंकिलें भीमानें क्रोधें खड्ग ॥
चाप भग्न तदा जाहलें कर्णाचें । ताडी अन्य चापें परी कर्ण ॥६॥
अंतीं कर्णावरी धांवे वृकोदर । रथोपस्थीं वीर लपला तदा ॥ ७ ॥
पुढती आयुधरहित तो भीम । शिरला जाऊन गजांमाजी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मृतगजांमाजी । जाऊनियां फेंकी गज रणीं ॥ ९ ॥

२३०

शस्त्रहीन आतां भीम । फेंकी गवसे तें घेऊन ॥ १ ॥
अंतीं वज्रमुष्ट्याघातें । चिंती वधावें कर्णातें ॥ २ ॥
अशक्य तें नव्हतें त्यासी । स्मरला पार्थप्रतिज्ञेसी ॥ ३ ॥
पुढती कर्णशराघातें । मूर्छा दाटली भीमातें ॥ ४ ॥
स्मरूनि कुंतीचें वचन । वधीनाचि तया कर्ण ॥ ५ ॥
परी प्रहार चापाचा । भीमावरी करी साचा ॥ ६ ॥
तदा चाप तें मोडून । शिरीं ताडीतसे भीम ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । बोले भीमासी वचन ॥ ८ ॥

२३१

मूढा, षंढा भीमा, खादाड तूं भ्याड । युद्धासी तूं योग्य नससी पोरा
कंद-मुळें फळें खाई जा वनांत । पेय, भक्ष्य, भोज्य नित्य सेवीं॥२॥
हांसोनि, चापानें डिवचूनि बोले । अन्यासी लढावें वृकोदरा ॥३ ॥

अस्मादिकांसवें लढतां हे अवस्था । शरण जा पार्था रक्षील तो॥४॥
भीम म्हणे कर्णा, निर्लज्ज तूं खरा । शस्त्रहीन वीरा वदसी ऐसें ॥
दुष्टा, वहुवार गेलासी पळूनि । मल्लयुद्धा रणीं सज्ज होईं ॥ ६ ॥
ये ये तुजलागीं करीन मी ठार । इतुक्यांत शर प्रखर येती ॥ ७ ॥
कृष्णाज्ञेनें पार्थ धांवूनियां आला । कर्ण दूर गेला तयावेळीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सात्यकीस्यंदनीं । बैसला जाऊनि भीम तदा ॥ ९ ॥

२३२

पार्थ कर्णाच्या मागून । धांवे उधळूनि सैन्य ॥ १ ॥
सोडी एक दिव्य शर । धनुर्धारी महाघोर ॥ २ ॥
वरचेवरी अश्वत्थामा । छेदी वांचवूनि कर्णा ॥ ॥ ३ ॥
पार्थ म्हणे गुरुपुत्रा । त्यागूं नको रे संगरा ॥ ४ ॥
पुढती येई सोशीं वाणां । पळूनि जाई अश्वत्थामा ॥ ५ ॥
पाठलाग करी पार्थ । वाण सोडी कंकपत्र ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वीर । करी सैन्याचा संहार ॥ ७ ॥

अध्याय १४० वा

२३३

राव म्हणे संजयासी । वाटे फिरली माझी घटी ॥ १ ॥
देवांसही जें अशक्य । तेथें घुसला वीर पार्थ ॥ २ ॥
आतां नाहीं नाहीं आशा । खचित नाश सैंधवाचा ॥ ३ ॥
केलें काय सात्यकीनें । ऐकें राया, सूत म्हणे ॥ ४ ॥
दैत्यश्रेष्ठ अलंवुष । अडवी क्रोधें सात्यकीस ॥ ५ ॥
महाघोर होई रण । अंतीं जाई दैत्यप्राण ॥ ६ ॥
पाहोनियां विक्रमासी । हर्ष होई अर्जुनासी ॥ ७ ॥
दुःशासनप्रमुख वीर । वर्षताती तीव्र शर ॥ ८ ॥
वाधिले दुःशासनअश्व । हर्षे पावे वासुदेव ॥ ९ ॥

अध्याय १४१ वा

२३४

उचितज्ञ-वीरसात्यकीसी रणीं । त्रिगर्त धांवोनि आड येती ॥ १ ॥
एकाकी तयांसी करी पराभूत । पुढती कलिंगांस शौर्य दावी ॥ २ ॥

सागरपतित श्रांत वीरांप्रति । भूमिलाभें शांति जयापरी ॥ ३ ॥
तेंवी अंतीं वीर पार्थाच्या सन्निध । येतां मानी सौख्य निर्भयत्वें ॥
पाहोनि तयासी कृष्ण म्हणे पार्था । शिष्य मित्र तुझा पहा येई ॥
धर्माच्या हितार्थ मर्दूनि वीरांसी । पातला सात्यकि महाशौर्यें ॥६॥
पार्थ म्हणे कृष्णा, सौख्य नसे मज । संकट त्रिविध प्राप्त येणें ॥७॥
संकटांत राव, सात्यकीसी भय । जयद्रथक्षय करणें असे ॥ ८ ॥
पहा भूरिश्रवा पाही सात्यकीसी । संकट धर्मासी नसेल कीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसें चिंती पार्थ । संकटें वीरांस येती बहु ॥ १० ॥

अध्याय १४२ वा २३५

सूत म्हणे राया, सात्वतदर्शनें । बोले आनंदानें भुरिश्रवा ॥ १ ॥
वीरा, अद्य हेतु सफल जाहला । आली पुण्यवेळा सुदैवानें ॥ २ ॥
लोळवीन तुज अद्य मी रणांत । होईल लज्जित धर्मराज ॥ ३ ॥
वधूनियां तुज दावीन विक्रम । पाहील अर्जुन शौर्य माझें ॥ ४ ॥
सुमित्रानंदनें इंद्रजितालागीं । वधिलें तेंवी आजी वधिन तुज ॥ ५ ॥
धर्म, कृष्णार्जुन होतील व्याकुळ । त्यागूनि जातील समर दुःखें ॥
वधिलेंसी त्यांच्या स्त्रियांसी आनंद । होई, ऐसें वृत्त ऐकतील ॥७॥
वासुदेव म्हणे ऐकूनि सात्यकि । भूरिश्रव्याप्रति बोले ऐका ॥ ८ ॥

२३६

कौरवेया, हें वाग्जाल । तृषार्तासी मृगजल ॥ १ ॥
क्रिया प्रत्यक्ष करावी । व्यर्थ बडबड त्यजावी ॥ २ ॥
जिंकील जो मजप्रति । जाण अजिंक्य तो लोकीं ॥ ३ ॥
उतावीळ माझें मन । घेईन रे तुझा प्राण ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां वीर । भिडले क्रोधें परस्पर ॥ ५ ॥
सुटती बाणामागें बाण । घेऊं इच्छिताती प्राण ॥ ६ ॥
यूथपति जेंवी गज । झुंजती तें वीरराज ॥ ७ ॥
अंतीं होवोनि विरथ । करिती क्रोधें खड्गयुद्ध ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कांति । चकाकली कवचांची ॥ ९ ॥

२३७

पुतळयांच्या माळा कुंडलें, कंकणें । विविध भूषणें शोभताती ॥१॥
भ्रांत, उद्भ्रांत तैं आविद्ध, आप्लुत । सृत तैं संपात, समुदीर्ण ॥२॥
विविध त्या गति दावितो कौशल्यें । तुटतां खड्ग झालें मल्लयुद्ध ॥
दीर्घबाहु दोघे ठोकिताती दंड । घुमती प्रचंड समरीं नाद ॥ ४ ॥
कंठपाश तेंवी मस्तकें ताडन । चरणाकर्षण करिती क्रोधें ॥ ५ ॥
एकमेकां वीर रेंटिती पाडिती । गर्जूनियां घेती उंच उड्या ॥ ६ ॥
बत्तीस प्रकारें करिती द्वंद्वयुद्ध । पार्थासी गोविंद वदला ऐका ॥
एकाकी सात्वत पातला या स्थानीं । श्रांत हा लढूनि होई बहु ॥
अयोग्य नव्हे वीरांचें या द्वंद्व । ऐका वासुदेव वृत्त कथी ॥ ९ ॥

२३८

कड भूरिश्रवा उचलूनि आपटी । वेळ सात्वताची कठिण आली॥
कृष्ण म्हणे पार्था, श्रांत हा सात्यकि । वीरासी संरक्षीं योग्यवेळीं॥
पार्थ म्हणे सिंह खेळवी गजासी । भूरिश्रवा तैसी क्रीडा मांडी ॥३॥
सौमदत्ति तदा फरफरां ओढी । वक्षःस्थळीं ताडी लत्ता बहु ॥४॥
अंतीं धरूनियां केश घेई खड्ग । सात्यकीमस्तक फिरवी वेगें ॥५ ॥
कुलालाचें चक्र तैसेंचि मस्तक । फिरवी सात्वत नवल करी ॥ ६ ॥
धनुर्धर पार्थ गुंतला रणांत । तथापि क्षुरप्र सोडी तदा ॥ ७ ॥
जया करीं खड्ग बाहु तो छेदिला । आनंदित झाला वासुदेव ॥ ८॥

अध्याय १४३ वा २३९

छेदिला पार्थानें कर हें जाणूनि । भूरिश्रवा वाणी वदला पार्था ॥१॥
पार्था, कां रे ऐसा अधम तूं होसी । धर्मातें कथिसी काय सांग ॥२॥
युद्धशास्त्रज्ञ तूं करिसी अधर्म । वाटतें श्रीकृष्ण वदला तुज ॥ ३ ॥
पार्थ म्हणे वृद्ध होती बुद्धिभ्रष्ट । जाणूनियां व्यर्थ निंदिसी कां ॥४॥
युद्धशास्त्रज्ञ मी जाणसी हें जरी । अधर्म आचरीं म्हणसी कैंवी ॥५॥
अर्पूनीही प्राण स्वकीयरक्षण । करिती ते धन्य वीर जगीं ॥ ६ ॥
एकाकी निःशस्त्र असहाय वीर । वधूनियां शौर्य दाविसी तूं ॥ ७ ॥
परस्परभेद न कळे ज्या रणीं । द्वैरथ त्या स्थानीं संभवेना ॥ ८ ॥

आत्मसंरक्षण ऐशा समयासी । होईना जयाची दोष तया ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे प्रायोपवेशन । वैसला करून भूरिश्रवा ॥ १० ॥

२४०

वामकरें दर्भ पसरूनि रणीं । ध्यानस्थ होऊनि बसला वीर ॥ १ ॥
कृष्णार्जुनांप्रति कौरव निंदिती । भूरिश्रव्याप्रति वदला पार्थ ॥ २ ॥
समीप जे माझे रक्षीन तयांतें । ज्ञात सकलांतें पार्थव्रत ॥ ३ ॥
जाणूनियां कैंवीं निंदितां मजसी । शस्त्रें निःशस्त्रांसी ताडूनियां ॥
शस्त्रहीन बाळ वधिलाती जेव्हां । धर्मबोध तेव्हां होता कोठें ॥५॥
ऐकूनि हे शब्द भूरिश्रवा लाजे । मस्तक भूमीतें टेंकीतसे ॥ ६ ॥
वामकरें छिन्न कर पार्थावरी । फेंकूनियां धरी मौन वीर ॥ ७ ॥
पार्थ म्हणे राया, धर्म-भीमांसम । तुजवरी प्रेम असे माझें ॥ ८ ॥
पुण्यलोकीं करीं वास तूं सदैव । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥ ९ ॥

२४१

भूरिश्रव्याप्रति बोलला अच्युत । नित्य अग्निहोत्रव्रत तुझें ॥ १ ॥
पुण्यलोकीं जाईं अंतीं गरुडावर । वैसूनि संचार करीं सौख्यें ॥ २ ॥
इतुक्यांत खड्ग घेऊनि सात्यकि । पातला पुढती परम क्रोधें ॥३॥
शुंडाहीन गजासम सौमदत्ति । धांवला सात्यकि तयावरी ॥ ४ ॥
कृष्णार्जुन, कृप, कर्णादिक वीर । वारिती कठोर कर्मासी त्या ॥५ ॥
परी शिरच्छेद केला सात्वतानें । गर्जूनि क्रोधानें वदला वीर ॥
अधार्मिक आम्हां धर्म हा कथिती । वधितां बाळासी स्मरलें नाहीं॥
ताडील जो लत्ता वधीन तयासी । प्रतिज्ञा हे माझी घोर असे ॥८॥
सर्वभावें यत्न करूनि वैऱ्यासी । पीडावें वाल्मीकी वदती ऐसें ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठ यज्ञकर्ता । गेला पुण्यलोका ऐशापरी ॥ १० ॥

अध्याय १४४ वा २४२

राव म्हणे कैंवी पाडी सात्वतासी । रणीं सौमदत्ति सांगें मज ॥१॥
सूत म्हणे भूरिश्रवावृत्त ऐकें । निःशंक मनातें करूनि घेईं ॥ २ ॥
अत्रिपुत्र सोम, पुत्र त्याचा बुध । पुरूरवासुत आयु त्याचा ॥३॥

१ शूरपुत्र शौरी

आयूचा नहुष, पुढती ययाति । देवयानीप्रति यदु झाला ॥ ४ ॥
यदुवंशीं देवमीढ जन्म पावे । वसुदेवनांवें पौत्र त्याचा ॥ ५ ॥
त्याचि कुळीं शिनीनामें वीर एक । जिंकी देवकीस वसुदेवार्थ ॥६॥
देवकीसवें तो बैसतां स्वरथीं । सोमदत्त चित्तीं क्रोध पावे ॥ ७ ॥
पुढती घोरयुद्ध होतांचि शिनीनें । जिंकूनि ओढिलें रणीं तया ॥८॥
ओढूनियां केश मारियेली लत्ता । उपजली चित्ता पुढती क्षमा ॥९॥
वासुदेव म्हणे सोमदत्ताप्रति । प्राणदान अंतीं देई शिनि ॥ १० ॥

२४३

क्रोधें सोमदत्त प्रार्थूनियां शिवा । पुत्र म्हणे द्यावा ऐसा मज ॥ १ ।
शिनिसुतालागीं ताडी जो लत्तेनें । दयाळु शिवानें ऐकिलें तें ॥२॥
पुढती लाभला भूरिश्रवा सुत । घडलें हें कृत्य शिववरें ॥ ३ ॥
राया, शिनीपुत्र अजिंक्य सात्यकि । वृष्णिवीर लोकीं पुण्यवंत ॥
ब्राह्मणाभिमानी, दीनसंरक्षक । अभिमानलेश तया नसे ॥ ५ ॥
सत्यवादी देवभक्त तो मानद । अजिंक्य रणांत सर्वकाळ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वर्णन वृष्णीचें । कथिलें नृपातें संजयानें ॥ ७ ॥

अध्याय १४५ वा

२४४

सूत म्हणे राया, अर्जुन कृष्णासी । विनवी आतां हांकीं अश्व वेगें
अस्ताचळीं सूर्य चालला प्रतिज्ञा । सफल सन्मान्या होवो माझी ॥
अश्वहृदयज्ञ महाबाहु कृष्ण । लंघूनि तें रण पुढती जाई ॥ ३ ॥
अग्रभागीं स्थित सैंधव जोंवरी । वधीन तोंवरी पार्थ म्हणे ॥ ४ ॥
परी पार्थावरी दुर्योधन, कर्ण । शल्य, वृषसेन धांव घेती ॥ ५ ॥
अश्वत्थामा, कृप, स्वयें जयद्रथ । झुंजती रणांत तेही शौर्यें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुर्योधन हांका । मारूनियां ऐका वदला कर्णा ॥ ७॥

२४५

वैकर्तना, हीच वेळ । आतां दावीं तुझें बळ ॥ १ ॥
होतां प्रतिज्ञेचा भंग । पुढती आपुलेंचि राज्य ॥ २ ॥
निष्कंटक ही अवनी । उपभोगूं घेई ध्यानीं ॥ ३ ॥
आत्मघातकी हा पार्थ । वदला प्रतिज्ञा हे व्यर्थ ॥ ४ ॥

लढतां राधेय संग्रामीं । व्यर्थ प्रतिज्ञा मी मानीं ॥ ५ ॥
कृप, शल्य हे झुंजतां । यश कैसें येई पार्था ॥ ६ ॥
अश्वत्थामा, दुःशासन । करिती सैंधवरक्षण ॥ ७ ॥
दिन चालला अस्तासी । कर्णा, दाखवीं शौर्यासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राव । ऐसें बोलला सगर्व ॥ ९ ॥

२४६

कर्ण म्हणे दुर्योधना । घायाळ मी आलों रणा ॥ १ ॥
प्रखर भीमाचे सायक । ठणके माझें सकल अंग ॥ २ ॥
विकलगात्र मी जाहलों । तुझ्यास्तव रणीं आलों ॥ ३ ॥
करीन मी सर्व यत्न । परी विजय दैवाधीन ॥ ४ ॥
कृतज्ञ मी मित्र तुझा । शौर्य दावीन रे पार्था ॥ ५ ॥
दैवाधीन परी यश । युद्ध पाहीं अलौकिक ॥ ६ ॥
ऐसें बोलती जें वीर । तोंचि येई धनुर्धर ॥ ७ ॥
दैना उडवी सैन्याची । पडती अश्व-गजराशी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । गांठी वेगें सैंधवास ॥ ९ ॥

२४७

भीम, सात्वत ते रक्षिती जयासी । वीर तो वीरासी भिडला क्रोधें ॥
सभोंवार वीर सप्तक जयाच्या । वंदूनि त्या पार्था वृत्त गाऊं ॥ २ ॥
थय थय नाचे वीर तो रणांत । भासला प्रत्यक्ष काळासम ॥ ३ ॥
संग्रामकोविद टणत्कार करी । येतां अंगावरी बहुत योद्धे ॥ ४ ॥
सहस्रावधि तैं बाण येतां तोडी । विद्युद्वेगें सोडी प्रखर शरां ॥ ५ ॥
पंच, सप्त, कोणी दश, असंख्यात । ताडिती पार्थास शर वेगें ॥ ६ ॥
परी तो बलाढ्य तितुकेही तोडी । वीर रणीं कोंडी करिती यत्नें ॥
वासुदेव म्हणे ऐशावेळीं कर्ण । अद्भुत संग्राम दावीतसे ॥ ८ ॥

२४८

अर्जुन, सात्वत, भीम, कर्णाप्रति । रणांत झुंजती वीर तीन ॥ १ ॥
परी तो माघार न घेई सर्वथा । क्रोध येई पार्था तयावेळीं ॥ २ ॥
मर्मभेदें तदा भिजवी रक्तानें । तोडी एका बाणें चाप क्षणीं ॥ ३ ॥

वक्षःस्थलभेद होतांही तो वीर । अष्ट ते सहस्र बाण सोडी ॥ ४ ॥
तोडूनियां पार्थ फेंकी दिव्य बाण । द्रोणांचा नंदन छेदी शरां ॥ ५ ॥
तयावेळीं वीरवृषभ धांवले । गर्जतां कोंदलें गगन नादें ॥ ६ ॥
दुर्योधन गर्जे सांभाळा कर्णासी । वधील पार्थासी अद्य कर्ण ॥ ७ ॥
प्रतिज्ञा तो ऐसी बोलला मजसी । इतुक्यांत अश्वासी वधी पार्थ ॥
वासुदेव म्हणे महारथी कर्ण । विरथ होऊन भांबावला ॥ ९ ॥

२४९

अश्वत्थामा तदा स्यंदनीं कर्णासी । घेऊनि युद्धासी सिद्ध झाला ॥
वीस, तीस, कोणी सप्त तीव्र बाण । घ्यावयासी प्राण सोडिताती ॥
परी पार्थ तया देई प्रत्युत्तर । वृष्टि करी थोर वीरांवरी ॥ ३ ॥
दशादिशा पार्थे व्यापिल्या शरांनीं । लोळविले रणीं बहुत वीर ॥
हिंस्र पशु-पक्षी जाहले संतुष्ट । प्रेतांचे ते ढीग अवलोकुनि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दारुण प्रसंगीं । शौर्य चढे अंगीं तोचि धन्य ॥ ६ ॥

अध्याय १४६ वा

२५०

सूत म्हणे राजा, पार्थाची प्रत्यंचा । विदीर्ण वज्राचा नाद करी ॥१॥
हांक ती यमाची वाटे कौरवांसी । सेना ते भारती भय पावे ॥ २ ॥
चपल पार्थानें सोडिलें इंद्रास्त्र । वीर अंधःकार करिती रणीं ॥ ३ ॥
ऐसे असंख्यात अंगावरी शर । येतां धनुर्धर छेदी वेगें ॥ ४ ॥
आजवरी ऐसा जाहला न नाश । मांडिला विनाश ऐसा पार्थे ॥५॥
हस्त, पाद, शिरें असंख्यात प्रेतें । अस्ताव्यस्त तेथें उधळलीं ॥६॥
मज्जा, मेद, पंक, रक्ताचा प्रवाह । केशांचें शेवाळ भयानक ॥ ७ ॥
परशु-बाण, सर्प-कंक-बक-नक्र । जंबुकें, मकर-गृध्र तेथें ॥ ८ ॥
विक्राळ गर्जूनि नाचती पिशाच्चें । वैतरणी तेथें ऐसी वाहे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पार्थ रणामाजी । घोर ऐसी नदी निर्मीतसे ॥ १० ॥

२५१

कृतांतासमान महावीर पार्थ । पाहूनियां धाक कौरवांसी ॥ १ ॥
आजवरी ऐसें पाहिलें न युद्ध । तेणें बहु धाक सैनिकांतें ॥ २ ॥
निजअस्त्रें वीर अस्त्रें आंवरूनि । दावीतसे रणीं उग्ररूप ॥ ३ ॥

ऐसा उल्लंघूनि वीरांसी तो गेला । असह्य जाहला ताप वीरां ॥ ४ ॥
हंसपंक्तीसम सोडूनियां शर । रणांत संचार करीतसे ॥ ५ ॥
अस्त्रेंचि अस्त्रांचें करी निवारण । वीरांसी लंघून पुढती जाई ॥६॥
सहस्रावधि तो सोडीतसे शर । जोडी सोडी शर न कळे केव्हां ॥
वासुदेव म्हणे सकलांसी तुच्छ । लेखूनियां पार्थ पुढती गेला ॥८॥

२५२

खवळले सकळ वीर । परी सुटला त्यांचा धीर ॥ १ ॥
अग्निज्वालेसम बाण । फेंकी सर्वत्र अर्जुन ॥ २ ॥
कबंधेंचि दिसती रणीं । गेला पुढती धांवूनि ॥ ३ ॥
पंचाशत द्रोणावरी । षोडष ते शल्यावरी ॥ ४ ॥
वृषसेनावरी तीन । कृपावरी नव बाण ॥ ५ ॥
कर्णासी ते द्वात्रिंशत । चतुःषष्ठी सैंधवास ॥ ६ ॥
ताडूनियां घोर बाण । रणीं गर्जला अर्जुन ॥ ७ ॥
विषबाणें जयद्रथ । ताडी पार्थासी संक्रुद्ध ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आतां । तेज चढे जयद्रथा ॥ ९ ॥

२५३

सैंधव कृष्णासी ताडी तीन बाण । पार्थावरी बाण-षट्क सोडी ॥
अश्वांवरी अष्ट ध्वजावरी एक । सोडी परी पार्थ सकल छेदी ॥२॥
पुढती एकाबाणें सारथी मारिला । ध्वजही तोडिला तत्काळचि ॥
कृष्ण म्हणे पार्था, वीरषट्क धांवे । कसें आतां व्हावें त्वरित कार्य ।
योजूनियां युक्ति झांकीन सूर्यासी । सैंधव पुढती येतां वेधीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अनुमोदन पार्थ । देई श्रीकृष्णास अत्यानंदें ॥ ६ ॥

२५४

योगिश्रेष्ठ योगी, योगबळें कृष्ण । सूर्यासी आच्छन्न करीतसे ॥ १ ॥
दाटला सर्वत्र अंधःकार रणीं । हर्षाकुल मनीं सकल योद्धे ॥ २ ॥
उंच उंच तोंडें करूनि गगनीं । पाहतां तरणी न दिसे तयां ॥ ३ ॥
सिंधुराज उंच करूनियां मान । करी अवलोकन गगनामाजी ॥४ ॥

कृष्ण म्हणे पार्था, पहा हा सैंधव। होऊनि निर्भय पुढती आला ॥
याचिवेळीं याचें तोडूनि मस्तक। पार्था, हो कृतार्थ क्षणामाजी॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द। मांडिला आक्रांत वीरश्रेष्ठें ॥ ७ ॥

२५५

कर्ण, शल्य, दुर्योधना। विद्ध करी वृषसेना ॥ १ ॥
भिडला जयद्रथाप्रति। भय वाटे रक्षकांसी ॥ २ ॥
केला आक्रांत वीरांनीं। प्रलय मांडिला त्या स्थानीं ॥ ३ ॥
पार्थ भासला कृतान्त। कंकण तें भासे चाप ॥ ४ ॥
केला संहार सैन्याचा। पूर्वी जाहला न ऐसा ॥ ५ ॥
पलायन करी सैन्य। कोण वर्णील तें दैन्य ॥ ६ ॥
वीरद्वयही एकत्र। राहिले न त्या रणांत ॥ ७ ॥
कोणी पडती घाबरूनि। प्रेतांमाजी दडती कोणी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। वधी सैंधवरक्षक ॥ ९ ॥

२५६

कर्ण-वृषसेनचापें होतीं भग्न। होई सूतहीन मद्रपति ॥ १ ॥
मामा-भाचे अश्वत्थामा कृपाचार्य। कुंथती घायाळ होऊनियां ॥२
पुढती संपूजित बाण वज्रासम। वज्रास्त्रें अर्जुन अभिमंत्री ॥ ३ ॥
ऐसा महाबाण जोडिला चापासी। घाबरले पक्षी पश्वादिक ॥ ४
पुनरपि कृष्ण बोलला सत्वर। साधीं निजकार्य धनुर्धरा ॥ ५ ॥
परी पार्था, ऐक वृत्त घेई ध्यानीं। झाली नभोवाणी जन्मतांचि ॥
वृहत्क्षत्रा, तुझा रणयोद्धा पुत्र। परी अलक्षित वध पावे ॥ ७ ॥
राव तदा दुःखें बोलला वचन। वाणी ती ऐकून पुत्रस्नेहें ॥ ८ ॥
भूमीवरी शिर पाडी जो दुर्जन। शतधा विदीर्ण शिर त्याचें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण अर्जुनासी। बोलला जी युक्ति पुढती ऐका ॥

२५७

पार्था, वृहत्क्षत्र करी उग्र तपा। समंतपंचकापार वसे ॥ १ ॥
अंकावरी त्याच्या मस्तक हें टाकीं। योजूनियां युक्ति अस्त्रबळें ॥
वायुसुत तुझा बांधव अर्जुना। अशक्य फाल्गुना नसे कांहीं ॥ ३ ॥

ऐसें न घडतां पावसी विनाश। छेदितां शिरास तूंचि पार्था ॥ ४ ॥
ऐकूनि तें पार्थ चावी दंत-ओष्ठ। सोडी तो वरिष्ठ शर वेगें ॥ ५ ॥
तोडूनि मस्तकासवें तो उडाला। कंदुकाचि नेला वरचेवरी ॥ ६ ॥
समंतपंचकाबाहेरी जाऊनि। टाकिला नेऊनि अंकावरी ॥ ७ ॥
वृहत्क्षत्र संध्या करितां ध्यानस्थ। उठतां मस्तक पडलें खालीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे जाहलें नवल। पडला नृपाळ भग्नशिर ॥ ९ ॥

२५८

रणामाजी नवल दुजें। किरण फांकले सूर्याचे ॥ १ ॥
ओळखिती सकळ वीर। अवघें कृष्णाचें चातुर्य ॥ २ ॥
आठ अक्षौहिणी सैन्य। रणीं झालें गतप्राण ॥ ३ ॥
मेला जामात अंधाचा। अश्रु ढाळी कौरवराजा ॥ ४ ॥
पसरे निराशा रणांत। कृष्ण घुमवी शंखनाद ॥ ५ ॥
देवदत्तही पार्थाचा। घुमला नभांत हर्षाचा ॥ ६ ॥
भीमसेन तैं सात्यकि। युधामन्यु शंख फुंकी ॥ ७ ॥
ऐकूनि तो महानाद। होई धर्मासी आनंद ॥ ८ ॥
पुढती जागजागीं युद्ध। करिती पांडव समस्त ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सैन्य। विजयी पार्थापुढें दीन ॥ १० ॥

अध्याय १४७ वा

२५९

राव म्हणे सूता, पुढती काय झालें। सूत म्हणे झालें युद्ध घोर ॥
पार्थावरी धांवे क्रोधें शारद्वत। तैंवी वीरश्रेष्ठ अश्वत्थामा ॥ २ ॥
मंदवेगें पार्थ ताडी तयांप्रति। मूर्छना कृपासी येई घोर ॥ ३ ॥
सारथी मानूनि शारद्वता मृत। महावेगें रथ दूर नेई ॥ ४ ॥
त्यागूनि तैं रण गेला अश्वत्थामा। विदुरवचना स्मरे पार्थ ॥ ५ ॥
धृतराष्ट्रा, पुत्र कुलांगार तुझा। धाडी यमलोका वदला क्षत्ता ॥६॥
सत्य सत्य आजी विदुराची वाणी। भीष्म शरासनीं पडले हाय।
धिक्कार असो या क्षात्रधर्माप्रति। विप्रगुरु आजी मूर्छायुक्त ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुःख करी पार्थ। पाहूनि कृपांस रथामाजी ॥ ९ ॥

२६०

सव्यसाची पार्थ करितां विलाप । कर्ण घेई झेंप पार्थावरी ॥ १ ॥
युद्धामन्यु तेंवी उत्तमौजासवें । शिनिश्रेष्ठ धांवे कर्णावरी ॥ २ ॥
पाहूनि तें कर्ण क्रोधें सोडी शर । बोले धनुर्धर श्रीकृष्णासी ॥ ३ ॥
कृष्णा, सात्वतासी वधील रे कर्ण । वेगें ने स्यंदन कर्णावरी ॥ ४ ॥
कृष्ण म्हणे पार्था, वासवी ते शक्ति । पूजूनि तियेसी रक्षी कर्ण ॥
कर्णासी झुंजाया समर्थ सात्वत । वीर ते साह्यार्थ असती त्याच्या
योग्यवेळ येतां कथीन मी तुज । लोळवीं कर्णास तयावेळीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कथूनियां ऐसें । संरक्षी पार्थातें यदुनाथ ॥ ८ ॥

२६१

धृतराष्ट्र म्हणे सूता । कथन करीं रे वृत्तांता ॥ १ ॥
नसतां सात्वतासी रथ । कैसें मांडियेलें युद्ध ॥ २ ॥
सूत म्हणे त्रिकालज्ञ । महा योगेश्वर कृष्ण ॥ ३ ॥
निशाकाळीं दारुकासी । वदला जोडूनि रथासी ॥ ४ ॥
सिद्ध राहीं येतां हांक । येई धांवोनि रणांत ॥ ५ ॥
संकेतें त्या शंख फुंकी । आणी दारुक रथासी ॥ ६ ॥
कृष्णाज्ञेनें शिनिश्रेष्ठ । बैसे कृष्णाच्या रथांत ॥ ७ ॥
पुढती अद्भुत संग्राम । लढला सूडभावें कर्ण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे व्यर्थ । संधी जातां करूनि कष्ट ॥ ९ ॥

२६२

महाविक्रमी तो सात्वत सूतासी । वधूनि अश्वांसी ठार करी ॥ १ ॥
तोडूनियां ध्वज रायाच्या समक्ष । कर्णासी विरथ करी शौर्यें ॥ २ ॥
तदा वृषसेन, शल्य, अश्वत्थामा । करूनि गर्जना धांव घेती ॥ ३ ॥
हाहाःकार होई तयावेळीं रणीं । रायाच्या स्यंदनीं चढला कर्ण ॥
दुःशासनादिक घायाळ जाहले । भीमास्तव केलें संरक्षण ॥ ५ ॥
एकाकी सात्वत सकलांसी जिंकी । सात्वतवधाची इच्छा व्यर्थ ॥
एक कृष्ण, दुजा वीर धनंजय । सात्यकि तृतीय योद्धा जनीं ॥ ७ ॥
चतुर्थ न कोणी तयांसम योद्धा । स्पष्ट संजयाचा अभिप्राय ॥ ८ ॥

सात्यकि-कर्णांचे येतांचि स्यंदन । म्हरथीं वैसून लढती वीर ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्राप्रति । संजय निवेदी घोर नाश ॥ १० ॥

अध्याय १४८ वा

२६३

राव म्हणे सूता, घोरकर्मा भीम । काय करी कर्म ऐशावेळीं ॥ १ ॥
सूत म्हणे षंढा, मूढा, हे खादाडा । निवेदीं या शब्दां अर्जुनासी ॥
म्हणे मज ऐसें बोले जो दारुण । वध्य ऐसा पण पार्था, माझा ॥ ३॥
स्मरूनि हें आतां योग्य तेंचि करीं । धांवे कर्णावरी पार्थ तदा ॥ ४॥
वासुदेव म्हणे महावीर पार्थ । होऊनि प्रक्षुब्ध वदला कर्णा ॥ ५ ॥

२६४

म्हणे पापदृष्टे कर्णा, सूतपुत्रा । व्यर्थ आत्मश्लाघा करिसी मूढा
जयापजय हे वीरासी अनित्य । देव इंद्रादिक लढती जरी ॥ २ ॥
मृत्यूचिया द्वारीं शौर्यानें ओढूनि । दिधलें सोडूनि सात्यकीनें ॥३॥
योगायोगें भीम जाहला विरथ । महाघोर शब्द वदलासी त्या ॥४॥
क्षुद्रबुद्धे, जाण अनार्य हें कर्म । पराक्रमी भीम लढला शौर्यें ॥ ५ ॥
अनेकवार तें झालासी विरथ । परी भीम क्षुद्र वदला नाहीं ॥ ६ ॥
नीचपणें शब्द वदलासी भीमा । भोग त्या दुष्कर्मा रणीं आतां ॥
एकाकी बाळाचें तोडिलेंसी चाप । पुत्रहीन तुज करिन आतां ॥ ८॥
वासुदेव म्हणे पार्थ वदे ऐसें । गेला तें अस्तातें दिनराज ॥ ९ ॥

२६५

सत्यप्रतिज्ञ तूं पार्था, जाहलासी आज ॥
आलिंगूनियां प्रेमानें बोलला मुकुंद ॥ १ ॥
पिता-पुत्र सुदैवानें पडले या रणीं ॥
कौरव सैन्यासी झुंज ऐसा नाहीं कोणी ॥ २ ॥
वीर मोठमोठे रणीं जाहले एकत्र ॥
महा बळिवंत यम, इंद्र, जैसा रुद्र ॥ ३ ॥
एकाकी तयांसी वीरा, झुजलासी रणीं ॥
धनुर्धरा, ऐसा वीर त्रिलोकीं न कोणी ॥ ४ ॥
वधिसील कर्णालागीं वीरांसवें जेव्हां ॥
धन्यवाद तुजसी ऐसे देईन मी तेव्हां ॥ ५ ॥

पार्थ म्हणे हे केशवा, प्रसाद हा तुझा ॥
महत्व आम्हांसी नित्य देसी हे मुकुंदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृपासिंधु भगवान ॥
बोळला जयासी तया जगीं काय वाण ॥ ७ ॥

२६६

पुढती मंद वेगें अश्वांसी हांकूनि । दावी रणभूमि कृष्ण पार्था ॥१॥
म्हणे धनुर्धरा, पहा हे नृपाळ । तळपती सूर्य भूमीवरी ॥ २ ॥
वस्त्रें, आभरणें, अश्व, रथ, गज । रणांत सर्वत्र दिसती प्रेतें ॥ ३ ॥
रक्त-मेद-मांसचिखल जाहला । नाचती त्या स्थळा पिशाच्चादि ॥
इंद्राविण अन्या अशक्य हें कर्म । अर्जुना, तूं धन्य वीर जगीं ॥५॥
इतुक्यांत रणीं पातले स्वजन । फुंकी पांचजन्य कृष्ण तदा ॥ ६ ॥
मिरवित ऐसे सकलहि येती । वृत्त निवेदिती धर्मालागीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भक्तीचें हें फळ । लाभे सर्वकाळ पुण्यवंता ॥ ८ ॥

अध्याय १४९ वा २६७

वंदूनि धर्मासी बोले योगेश्वर । सानबंधु पार पडला राया ॥ १ ॥
ऐकूनि तें धर्म उडी रथाखालीं । घेऊनि, कवटाळी कृष्णार्जुनां ॥२॥
म्हणे अंबुजाक्षा, ऐकूनि हे शब्द । आनंद नभांत न सामावे ॥ ३ ॥
कृष्णा, हें पार्थाचें शौर्य अलौकिक । पाहिलें तुम्हांस महद्भाग्यें ॥
थोर पुण्यें झाला सैंधवाचा वध । आम्हांसी गोविंद संरक्षिता ॥
मधूसूदनाच्या प्रसादें आम्हांसी । अशक्य या जगीं नसे कांहीं ॥
जनार्दना, असंभाव्य हा विजय । लाभला प्रसाद तुझाचि हा ॥ ७॥
जगत्कारणा, हे कृष्णा, पुरुषोत्तमा । लाभलासी आम्हां मित्र भाग्यें
वासुदेव म्हणे धर्माचें सत्कर्म । बोलला श्रीकृष्ण कवच आम्हां ॥

२६८

अत्यानंदें धर्मराज । हृदयीं धरूनि पार्थास ॥ १ ॥
कुरवाळूनि मुखचंद्र । म्हणे प्रत्यक्ष तूं इंद्र ॥ २ ॥
त्रैलोक्यांत जें अशक्य । केलेंसी तूं ऐसें कृत्य ॥ ३ ॥
ऐसें वदे सद्गदित । धर्म, फिरवी पृष्ठीं हस्त ॥ ४ ॥

कृष्णार्जुन म्हणती राया । तूंचि कारण विजया ॥ ५ ॥
क्रोधें तुझ्या पूर्वी दग्ध । झाले रणांगणीं मृत ॥ ६
क्रोध तुझा जयावरी । नाश तयाचा सत्वरी ॥ ७ ॥
मानदा, तूं क्रुद्ध होतां । नाश जाहला भीष्मांचा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । कृष्ण, बोलती यथार्थ ॥ ९ ॥

२६९

वंदिती सात्वत भीम तें धर्मासी । गौरवी तयांसी धर्मराज ॥ १ ॥
म्हणे पराभूत करूनि द्रोणां नो । संपादिला आजी विजय तुम्हीं ॥
वीर हो, सुदैवें लाभलाती मज । कर्ण, शल्यादिक लढती रणीं ॥३॥
शब्दास्तव माझ्या उडी सागरांत । घेऊनि तटाक गांठिलाती ॥४ ॥
बोलूनियां ऐसें आलिंगी तयांसी । प्रेमाश्रु दाटती लोचनांत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सैन्य तें हर्षित । सज्ज तें युद्धार्थ पुनरपि ॥ ६ ॥

अध्याय १५० वा

२७०

सूत म्हणे राया, जयद्रथवध । होतां बहु त्रस्त दुर्योधन ॥ १ ॥
म्लान, दीन त्याचें मुख अश्रुपूर्ण । उत्साहविहीन राव होई ॥ २ ॥
दंतहीन सर्पासम सोडी श्वास । जगाचा अपराध घडला जया ॥
सैन्यविनाशें त्या होइ बहु कृश । कंठ सद्गदित होई त्याचा ॥ ४ ॥
अश्रुपूर्ण नेत्रें स्वमनांत चिंती । पार्थासम लोकीं वीर नसे ॥ ५ ॥
कर्ण, द्रोण, अश्वत्थामा, कृपाचार्य । पार्थापुढें शौर्य न चले त्यांचें ॥
जिंकूनि सर्वांसी वधिलें सैंधवा । पराभूत व्हावा काय कर्ण ॥ ७ ॥
आधार आशेचा मानिला तो दीन । होतां, मार्ग अन्य न दिसे कांहीं ॥
दीनभावें कथी द्रोणालागीं राव । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥ ९ ॥

२७१

पहा पहा गुरो, मूर्धाभिषिक्तांचा । विनाश हा कैसा घडला रणीं ॥
भीष्मालागीं झाला वंचक शिखंडी । जयद्रथा दंडी धनंजय ॥ २ ॥
अक्षौहिणी सप्त सैन्याचा संहार । तैंवी थोर थोर वीर गेले ॥ ३ ॥
उतराई कैसा होऊं मी तयांचा । प्रायश्चित्त आतां नसे मज ॥ ४ ॥
लोभी, पापी मज धर्महीनाप्रति । लाभली न गति मित्रांसवें ॥ ५ ॥

भीष्मांचें रक्षण घडलें न ज्यातें । जगूनि तयानें काय लाभ ॥ ६ ॥
जलसंध, अलंबुष ते कांबोज । मरतां, काय काज जगूनि मज ॥७॥
वासुदेव म्हणे मरणासी सिद्ध । होऊनि रणांत सज्ज राव ॥ ८ ॥

२७२

म्हणे गुरुद्रोणा, आतां । नाश होवो पांडवांचा ॥ १ ॥
अथवा घडो माझा नाश । रणीं दावीन शौर्यास ॥ २ ॥
वधूनि पांचाळ-पांडव । होईन मी कृतकार्य ॥ ३ ॥
वीरांप्रति यमुनाजळीं । देईन मी तिलांजली ॥ ४ ॥
साह्यकर्ते असत्कृत । झटतीनाचि पूर्ववत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्मां । दोषी मानी कुरुराणा ॥ ६ ॥

२७३

स्वयें मृत्यु ओढवूनि । भीष्म गेलेचि त्यजूनि ॥ १ ॥
शिष्यवात्सल्यें उपेक्षा । गुरो, तुम्हीं करीतसां ॥ २ ॥
आतां उरला एक कर्ण । माझा कोणीही न अन्य ॥ ३ ॥
मित्रकार्यीं अमित्रासी । योजितां हे दशा ऐसी ॥ ४ ॥
मित्र, मित्र, करितां नाश । पावलों हें जिणें व्यर्थ ॥ ५ ॥
पांडुपुत्रांच्या आचार्या । स्वर्गीं जातों आतां आर्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राव । घाली द्रोणावरी घाव ॥ ७ ॥

अध्याय १५१ वा

२७४

सूत म्हणे राया, जयद्रथवधें । निंदिती रायातें सकळ रणीं ॥ १ ॥
ऐकूनि रायाचे शब्द गुरुद्रोण । म्हणती कां ताडन करिसी ऐसें ॥
सव्यसाची वीर अजिंक्य त्रैलोक्यीं । कथिलें तुजसी वारंवार ॥३॥
देवादिकांतेंही भीष्म जे अवध्य । पडतांही बोध सुचला नाहीं ॥४॥
शकुनीचे अक्ष होती घोर शर । बोलला विदुर तेंचि सत्य ॥ ५ ॥
साध्वीचा हा छळ फळला प्रत्यक्ष । मानीं प्रायश्चित्त दुर्योधना ॥
अन्याय्य कृतीनें क्रुद्ध महावीर । करिती समर घोर रणीं ॥ ७ ॥
कर्णादिक तुम्हीं असतां सन्निध । कैसा जयद्रथ वधिला पार्थें ॥८॥
वासुदेव म्हणे भारद्वाज दुःखें । बोलती रायातें सत्य तेंचि ॥ ९ ॥

२७५

दुर्योधन, द्रोण मानिले आधार। परी गेला वीर यमलोकीं ॥ १ ॥
शिखंडीसवें तो धृष्टद्युम्न मज। भासतो प्रत्यक्ष कृतांतचि ॥ २ ॥
तयाचें मजसी नित्य वाटे भय। भेदिसी तूं हाय मर्म माझीं ॥ ३ ॥
काळजासी माझ्या घरें कां पाडिसी। भीष्मावीण कैसी धरिसी आशा
महारथांमाजी सैंधव संपला। भूरिश्रवा गेला उरले कोण ॥ ५ ॥
पांडव-पांचाळसैन्याचा विनाश। करूनि कवच उतरीन ॥ ६ ॥
तोंवरी कवच राहो अंगावरी। कथीं जा सत्वरी पुत्रालागीं ॥ ७ ॥
सोडूनि जीवाची आशा सोमकांसी। लढें जा तयासी निवेदीं हें ॥
वासुदेव म्हणे स्वपुत्रासी द्रोण। करी निवेदन तेंचि ऐका ॥ ९ ॥

२७६

दया, क्षमा, शांति, सत्य, सरलता। धर्मार्थमर्यादा सांभाळाव्या ॥
प्राधान्य धर्मासी नित्य असो ध्यानीं। विप्रांसी सन्मानीं सर्वकाल॥
अप्रिय तयांचें न घडेचि कदा। मानीं तयां सदा अग्नीसम ॥ ३ ॥
पुत्रासी कथावें ऐसें दुर्योधना। जातों आतां रणा तुझ्यास्तव ॥४॥
असेल सामर्थ्य तरी रक्षीं सैन्य। क्रुद्ध वीर जाण असती अद्य ॥५॥
निशासमयींही लढतील क्रोधें। बोलूनियां ऐसें निघती द्रोण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मर्मांतकशब्दें। कदाही न भंगे धन्य तोचि ॥ ७ ॥

अध्याय १५२ वा

२७७

दुर्योधन क्रोधवश। करी युद्धाचा संकल्प ॥ १ ॥
म्हणे कर्णा, तो एकाकी। गेला भेदूनि व्यूहासी ॥ २ ॥
अशक्य जें देवांप्रति। कैसें घडलें अर्जुनासी ॥ ३ ॥
सिंहासम त्या वीरानें। वधिलीं सकलही सैन्यें ॥ ४ ॥
कर्णा, लढतां द्रोणाचार्य। पार्था व्हावें काय धैर्य ॥ ५ ॥
शिष्यभावें वाटे कर्णा। द्रोणें सोडिलें अर्जुना ॥ ६ ॥

अभय देऊनियां ऐसें। कर्म जाहलें द्रोणांचें ॥ ७ ॥
लाभतें न अभय जरी। सकळ वांचते हे नरीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राव। दुःखी पाहूनि बंधुद्वय ॥ ९ ॥

२७८

कर्ण म्हणे राया, देऊं नको दोष। लवही गुरूंस अविचारें ॥ १ ॥
प्राणपणें केला संग्राम तयांनीं। दोष न लंघूनि जातां पार्थ ॥ २ ॥
दुर्दम्य उत्साही धनुर्धर पार्थ। अस्त्रज्ञ तो दक्ष, शूर, युवा ॥ ३ ॥
अभेद्य कवच, गांडीव धनुष्य। सारथी अच्युत जयाप्रति ॥ ४ ॥
कपिध्वज गेला संग्रामीं झुंजत। आचार्य तो वृद्ध दुर्योधना ॥ ५ ॥
पराभव जाणें दैवाची घटना। दोष गुरुद्रोणा लवही नसे ॥ ६ ॥
सूक्ष्मासूक्ष्ममार्गें करितां पराकाष्ठा। खेळ हा दैवाचा घडला राया॥
वासुदेव म्हणे दैवहीन यत्न। विफलचि जाण सर्वकाळ ॥ ८ ॥

२७९

यत्न करावा सर्वथा। त्यागूनियां ते फलाशा ॥ १ ॥
लाभ, हानी दैवाधीन। कदा सोडूं नये यत्न ॥ २ ॥
केले बहुत अन्याय। परी वांचले पांडव ॥ ३ ॥
विष, लाक्षागृह, द्यूत। अंतीं अरण्य तयांस ॥ ४ ॥
परी यत्न झाले व्यर्थ। आतां धैर्यें करीं युद्ध ॥ ५ ॥
लाभ तयां, हानी तुज। ऐसें न दिसेचि निमित्त ॥ ६ ॥
लाभहानीचा निर्णय। करीतसे सदा दैव ॥ ७ ॥
होतां निद्रिस्थ मानव। जागें राही त्याचें दैव ॥ ८ ॥
आम्हीं विपुल, ते अल्प। परी झालों आजी नष्ट ॥ ९ ॥
ऐसें बोलतसे कर्ण। तोंचि पुढती पांडवसैन्य ॥ १० ॥
वासुदेव म्हणे युद्ध। पुढती जाहलें प्रचंड ॥ ११ ॥

## घटोत्कचवधपर्व ६

अध्याय १५३ वा २८०

जनाधिपालागीं सांगतसे सूत । परस्पर युद्ध करिती घोर ॥ १ ॥
नाम गोत्रोच्चार करूनि भांडतां । तेणें ध्यानीं येती लढती कोण ॥२॥
ऐसे परस्पर एकरूप होती । घुसला नृपति ऐशा रणीं ॥ ३ ॥
जयद्रथवधें क्रुद्ध दुर्योधन । तुच्छ लेखी प्राण, लढला ऐसा ॥ ४ ॥
अलौकिक भासे तयाचा विक्रम । पाहिला न जाण आजवरी ॥५॥
पुढती करूनि भीमासी तें वीर । करिती प्रतिकार तीव्र तया ॥ ६ ॥
परी एकेकासी ताडी घोर शरें । सैनिक घाबरे तदा होती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें धर्म । आकर्ण ओढून चाप धांवे ॥ ८ ॥

२८१

परी दुर्योधन छेदी त्याचा ध्वज । सूताचें मस्तक विद्ध करी ॥ १ ॥
इंद्रसेन, प्रिय सारथी धर्माचा । वेधूनियां चापा तोडी राव ॥ २ ॥
मारिला, मारिला गर्जूनि तैं धर्म । कौरवासी बाण ताडी एक ॥ ३ ॥
मूर्छित त्या शरें होई दुर्योधन । गेला गेला जन म्हणती सर्व ॥ ४ ॥
थांव थांव ऐसें गुरु तैं गर्जले । पांचाळ धांवले पुढती तदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मेघांसी पतन । तैसें सकल सैन्य वधिती गुरु ॥६॥

अध्याय १५४ वा २८२

सूतासी नृपाळ म्हणे द्रोणांप्रति । सांगें संरक्षिती कोण कोठें ॥ १ ॥
शस्त्रधरांमाजी गुरु अग्रगण्य । लढले दारुण कैंवी सांगें ॥ २ ॥
सूत म्हणे पार्थ भेटूनि धर्मासी । पातला युद्धासीससात्वत ॥ ३ ॥
नकुळ, सहदेव, धृष्टद्युम्न, भीम । द्रुपद, शाल्व जाण विराटही ॥
द्रौपदीपुत्र तैं घटोत्कच वीर । येती द्रोणांवर चालूनियां ॥ ५ ॥
घोर काळरात्र, श्वापदांचे शब्द । घूत्कारेंचि घूक कांपविती ॥ ६ ॥
रणवाद्यांमाजी गज-अश्वनादें । गगन निनादे तयावेळीं ॥ ७ ॥
घोर अंधःकार दाटला सर्वत्र । रथांवरी रथ आदळती ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आप पर कोणा । न कळेचि जाणा तयावेळीं ॥ ९ ॥

२८३

दिव्य भूषणांचा प्रकाश त्या स्थानीं । सणत्कार ध्वनि शक्त्याघातें
खिकाळती अश्व, फडकती ध्वज । चीत्कारती गज सेनेमाजी ॥२॥
ऐकूनि तो नाद उभा राहे कांटा । वायु तो पूर्वेचा दुर्योधन ॥ ३ ॥
रथ, गज, हेचि धांव घेती मेघ । वाद्यघोष नाद वाटे त्यांचा ॥ ४॥
लवती जीं चापें त्याचि सौदामिनी । कोसळती रणीं शक्तिरूपें ॥
जलधारा शर, अस्त्रें तोचि वायु । ऐसें युद्ध बहु घनघोर ॥ ६ ॥
भ्याडांलागीं भय, वीरांसी पर्वणी । ऐसे वीर रणीं लढती रात्रौ ॥
वासुदेव म्हणे पूर्वरात्रीं द्रोण । संहार दारुण करीतसे ॥ ८ ॥

अध्याय १५५ वा

२८४

द्रोणावरी जाती पांडव धांवूनि । सोमक गर्जूनि साह्य होती ॥ १ ॥
धृष्टद्युम्नपुत्रां वधिलें द्रोणांनीं । शिबि तैं धांवूनि पुढती आला ॥
द्रोणशरें त्याचा होई शिरच्छेद । भीमासी कलिंग अडवी क्रोधें ॥
सूत विशोकासी लागतांचि शर । भीमसेन वीर धांव घेई ॥ ४ ॥
मुष्ट्याघातें एका जाहलीं मोकळीं । हाडें तयावेळीं कलिंगाचीं ॥५॥
पाहूनि तें कर्ण ताडी दिव्यबाण । ध्रुवावरी भीम धांव घेई ॥ ६ ॥
मुष्ट्याघातें त्याचा घेऊनियां प्राण । गांठिला स्यंदन जयराताचा ॥
कर्णाच्या समक्ष ताडूनि चपराक । दावी यमलोक तयाप्रति ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शक्ति फेंकी कर्ण । झेलूनि ती भीम उलटी फेंकी ॥

२८५

उलटूनि येतां शक्ति । शकुनि एका शरें छेदी ॥ १ ॥
ऐसें आचरूनि कर्म । गेला निजरथीं भीम ॥ २ ॥
तदा वीर तयाप्रति । शरजालें आच्छादिती ॥ ३ ॥
दुर्मदासी सूतहीन । करीतसे भीमसेन ॥ ४ ॥
दुष्कर्णाच्या तें स्यंदनीं । चढला दुर्मद जाऊनि ॥ ५ ॥
एका रथीं वसूनि भ्राते । शर ताडिती भीमातें ॥ ६ ॥
तदा सर्वांच्या समक्ष । भीम करी नवल एक ॥ ७ ॥
केलें स्यंदनाचें चूर्ण । लत्ताप्रहारेंचि जाण ॥ ८ ॥

मुष्ट्याघातें उभयभ्राते । गेले यमसदनातें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सेना । वदे, आला रुद्रराणा ॥ १० ॥

२८६

पाहूनि हें दिव्यकर्म । झालें भीमाचें स्तवन ॥ १ ॥
हर्षें भीम धर्माप्रति । येऊनियां सादर वंदी ॥ २ ॥
वृकोदराची तें राजा । करी हर्षानें प्रशंसा ॥ ३ ॥
भीमालागीं द्रोणादिक । क्रोधें ताडिती सायक ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे युद्ध । रणीं जाहलें अद्भुत ॥ ५ ॥

अध्याय १५६ वा

२८७

भूरिश्रव्याचा तैं तात सोमदत्त । बोले सात्वतास क्रोधाकुल ॥ १ ॥
दुष्टा, पार्थ जरी संरक्षी न तुज । संहारीन आज समरांगणीं ॥ २ ॥
प्रतिज्ञा हे माझी पावे जरी भग । नर्कवास मज लाभो तरी ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां करी सिंहनाद । सात्यकि तयास वदला ऐका ॥४॥
सोमदत्ता, जरी इच्छिसी संग्राम । सोडीं दिव्यबाण त्यजूनि दया ॥
वधिलें मी तुझ्या शूर पुत्राप्रति । वधीन तुजसी सहज आतां ॥६॥
मृदंगकेतूंच्या[1] तेजानें तूं दग्ध । ऐकावी शपथ वधिन तुज ॥ ७ ॥
पलायन जरी न करिसी राजा । दावीन यमाचा मार्ग तरी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सोमदत्ताप्रति । वीर संरक्षिती रणीं बहु ॥ ९ ॥

२८८

एक सहस्र ते रथी । दशसहस्र गजांसी ॥ १ ॥
घेऊनियां दुर्योधन । करी वृद्धाचें रक्षण ॥ २ ॥
तेंवी शकुनि सपरिवार । महाक्रोधें सोडी शर ॥ ३ ॥
सात्वतासी आच्छादिती । तदा खवळे सात्यकि ॥ ४ ॥
नव बाणें सोमदत्त । ताडी तितुकेंचि सात्वत ॥ ५ ॥
सोडूनियां दिव्य बाण । करी दारुण संग्राम ॥ ६ ॥
सोमदत्त पडला खालीं । घोर मूर्छा तया आली ॥ ७ ॥

---

१ धर्मराजाच्या.

सूत करी पलायन । पाहूनियां तो संग्राम ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध । द्रोण होती पुढती सिद्ध ॥ ९ ॥

२८९

यदुश्रेष्ठावरी भारद्वाज घोर । मोडिताती शर चवताळूनि ॥ १ ॥
युधिष्ठिर, धृष्टद्युम्न, मत्स्यपति । शरें विद्ध होती तयावेळीं ॥ २ ॥
उत्तमौजा, युधामन्यु विद्ध पाही । भयाकुळ होई सैन्य तदा ॥ ३ ॥
पाहूनि तें पार्थ हांकीतसे रथ । वीर सैनिकांस येई बहु ॥ ४ ॥
परी आजि द्रोण बहुत कोपले । अग्नीसम केलें सैन्य दग्ध ॥ ५ ॥
छेदिती तयातें येई जो पुढती । प्रेतांचे पाडिती ढीग रणीं ॥ ६ ॥
पार्थाच्या समक्ष पळविलें सैन्य । बोले तें अर्जुन कृष्णालागीं ॥७॥
कृष्णा, पाहूं नको ने आतां स्यंदन । नाश गुरुद्रोण करिती बहु ॥८॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । जाहला हर्षित घननीळ ॥ ९ ॥

२९०

कुंद पुष्पासम शुभ्र । आल्हादक जेंवी चंद्र ॥ १ ॥
अश्व हांकी दुग्धवर्ण । हर्षभरें पुरुषोत्तम ॥ २ ॥
भीम सारथी विशोक । हांकी मागोमाग रथ ॥ ३ ॥
पाहूनियां भीमार्जुना । बहुत वीर जाती रणा ॥ ४ ॥
युद्ध तुंबळ जाहलें । सात्वतादि वीर आले ॥ ५ ॥
क्षुब्ध सागरासमान । रणीं होई घोर स्वन ॥ ६ ॥
धांवे सात्यकीवधार्थ । अश्वत्थामा परम क्रुद्ध ॥ ७ ॥
घटोत्कच तें पाहूनि । धांव घेतसे गर्जूनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐका । घटोत्कचाच्या वृत्तांता ॥ ९ ॥

२९१

तीस नल्वे होता विस्तीर्ण तो रथ । ऋक्षचर्मव्यास यंत्रपूर्ण ॥ १ ॥
महामेघासम नाद त्या रथाचा । वाहनें पिशाच्यासम घोर ॥ २ ॥
गृध्रविराजित उंच त्याचा ध्वज । लोंबताती अंत्रमाळा बहु ॥ ३ ॥
अष्टचक्रें तया शोभती रथासी । अक्षौहिणी त्याची सेना असे ॥४॥

१ ४०० हात म्ह० नल्व.

विकराल दाढा उग्र तें वदन। शंकूसम कर्ण महा हनु ॥ ५॥
विद्रूप नयन केश त्याचे ऊर्ध्व। ज्वालामय मुख कृशोदर ॥ ६ ॥
जाभाड तयाचें गुहाचि तें भासे। मस्तकीं विराजे किरिट त्याच्या
ऐसा यमासम पुढती धांवतां। कौरवांच्या चित्ता महाभय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विक्राळ वदन। धांवे पसरून घटोत्कच ॥ ९ ॥

२९२

चाप प्रचंड उचलूनि। धांव घेई भैमसेनी ॥ १ ॥
जैसे आवर्त गंगेत। तेंवी सेना होई क्षुब्ध ॥ २ ॥
सिंहनादें महागज। करिताती मूत्रोत्सर्ग ॥ ३ ॥
शूल, शतघ्नि, पाषाण। येतां घाबरलें सैन्य ॥ ४ ॥
अस्त्रवेत्ता अश्वत्थामा। धैर्यें ठाण मांडी रणा ॥ ५ ॥
असुरमाया निवारिली। ऐसी शूरकृति केली ॥ ६ ॥
एकमेकां मर्मभेदी-। बाणें, वीर ते ताडिती ॥ ७ ॥
लक्ष आरायुक्त चक्र। फेंकी क्रोधें घटोत्कच ॥ ८ ॥
परी तोडी शौर्यें विप्र। क्रुद्ध तदा भीमपुत्र ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसें। युद्ध होई त्या स्थळातें ॥ १० ॥

२९३

घटोत्कच अश्वत्थाम्यांचें तें युद्ध। अंजनपर्व्यास क्रोध आणी ॥ १॥
भीमाचा तो पौत्र घटोत्कचसुत। कज्जलपर्वतखंड भासे ॥ २ ॥
अश्वत्थाम्यावरी शरवृष्टि करी। द्रोणपुत्र करी शौर्य तदा ॥ ३ ॥
छेदूनियां ध्वज संहारिले अश्व। तैसेंचि धनुष्य भग्न केलें ॥ ४ ॥
अंजनपर्वा तें खड्ग घेई करीं। अश्वत्थामा करी नवल तदा ॥ ५ ॥
छेदितां तत्काळ वीर फेंकी गदा। अश्वत्थामा भेदा करीतसे ॥ ६ ॥
अंजनपर्वा तें उडाला गगनीं। द्रोणपुत्र रणीं लढला शौर्यें ॥ ७ ॥
भीमपौत्रा अंतीं पाडिलें रणांत। वासुदेव वृत्त कथन करी ॥ ८॥

२९४

पाहूनियां पुत्रवध। खवळला घटोत्कच ॥ १ ॥
अश्वत्थाम्यासी बोलला। वधिन आतां थांब तुला ॥ २ ॥
अश्वत्थामा म्हणे बाळा। कथन करीं हें अन्याला ॥ ३ ॥

गुरुबंधु माझा भीम । तुजलागीं पित्यासम ॥ ४ ॥
क्रुद्ध नसें मी तुजवरी । कोपलासी तूं अंतरीं ॥ ५ ॥
क्रुद्ध स्वयेंचि विनाश । पावे. जाण हा सिद्धांत ॥ ६ ॥
ऐकूनि तें घटोत्कच । पुत्रशोकें करी युद्ध ॥ ७ ॥
बाण जैंवी रथदंड । सोडीतसे तो प्रचंड ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विप्र । छेदूनि ते दावी शौर्य ॥ ९ ॥

२९५

घटोत्कच तदा उडाला गगनीं । अदृश्य होऊनि युद्ध करी ॥ १ ॥
मायामयगिरी होऊनि अंबरीं । वर्षी शत्रूवरी मुसळें गदा ॥ २ ॥
अश्वत्थामा तदा सोडूनि वज्रास्त्र । पर्वताचा भेद करीतसे ॥ ३ ॥
नीलमेघ रूप होऊनि तें दैत्य । करितो वर्षाव पाषाणांचा ॥ ४ ॥
द्रोणतनय तैं सोडी वायव्यास्त्र । उडवी मेघांस क्षणामाजी ॥ ५ ॥
घटोत्कच तदा विक्राळ वदन । राक्षस घेऊन चाल करी ॥ ६ ॥
सिंहव्याघ्रांसम वदनें तयांचीं । पाहूनि नृपासी धाक वाटे ॥ ७ ॥
अश्वत्थामा देई अभय रायासी । गौरवी विप्रासी राव तदा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हर्षे दुर्योधन । बोलला वचन शकुनीलागीं ॥ ९ ॥

२९६

पार्थासवें ते सहस्र । रथी झुंजती रणांत ॥ १ ॥
साठसहस्र वीरेंसी । अडवी रणांत तयांसी ॥ २ ॥
कर्ण, वृषसेन, कृप । दुःशासन, कमलाक्ष ॥ ३ ॥
शल्य, अरुणी, सुदर्शन । साह्य तुजलागीं जाण ॥ ४ ॥
अश्वत्थाम्यासम घोर । मामा, करीं तूं संगर ॥ ५ ॥
आज्ञा होतां कौरवाची । शकुनि सज्जला रणासी ॥ ६ ॥
इकडे अश्वत्थाम्याप्रति । वक्षःस्थळीं दैत्य वेधी ॥ ७ ॥
वृक्षासम कांपे विप्र । तुटलें इतुक्यांत धनुष्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विप्र । क्रोधें घेई अन्य चाप ॥ ९ ॥

२९७

खवळला आतां वीर अश्वत्थामा । घटोत्कचसैन्या नष्ट करी ॥ १ ॥
भीमपुत्र तदा क्रोधें रथ हांकी । घोर शक्ति फेंकी वीरावरी ॥ २ ॥

अश्वत्थामा चाप टाकूनि ते झेली। उलट फेंकिली दैत्यावरी ॥३॥
रथाखालीं तदा दैत्य घेई उडी। अशनी ते फोडी रथ त्याचा ॥४॥
धृष्टद्युम्नरथीं बैसे भीमपुत्र। पुढती युद्ध घोर होई रणीं ॥५॥
भीम, कृष्णार्जुनांसमक्ष तो विप्र। सैन्याचा संहार करीतसे ॥६॥
दैत्य अक्षौहिणी पावले विनाश। द्रुपदपुत्रांस वधिलें रणीं ॥७॥
महावीर दश कुंतिभोजपुत्र। वधूनियां विप्र गर्जतसे ॥८॥
घटोत्कच अंतीं जाहला मूर्छित। धृष्टद्युम्न रथ दूर नेई ॥९॥
वासुदेव म्हणे रुधिराची नदी। निर्मितां विप्रासी स्तविती देव॥

अध्याय १५७ वा

२१८

झाला दारुण संग्राम। अश्वत्थाम्याचा विक्रम ॥१॥
पाहूनियां पांडववीर। भीमसेनादि झुंजार ॥२॥
निकरानें करिती युद्ध। पुढती धांवे सोमदत्त ॥३॥
तया वृद्धासी सात्यकि। ताडीतसे दिव्यशक्ति ॥४॥
भीम फेंकूनि परिघ। मस्तकाचा करी वेध ॥५॥
सोमदत्त त्या आघातें। होई मूर्छित क्षणार्धें ॥६॥
तदा धांवला बाल्हिक। करी भीमासी आघात ॥७॥
परी सांवरूनि मूर्छा। भीम फेंकीतसे गदा ॥८॥
पडलें बाल्हिकाचें शव। कथन करी वासुदेव ॥९॥

२१९

नागदत्त, महाबाहु, दृढरथ। अयोभुज, दृढ, विरजा, उग्र ॥१॥
सुहस्त, प्रमाथि, अनुयायी, दश। धृतराष्ट्रपुत्र धांव घेती ॥२॥
पाहूनियां भीम करूनि ताडन। सहजचि प्राण घेई त्यांचे ॥३॥
कर्णबंधु वृकरथ, वृषसेना। वांचवितां भीमा क्रोध येई ॥४॥
शकुनीचे वीर करूनियां ठार। पाडी शतचंद्र मतप्राण ॥५॥
तदा भानुदत्त, गवाक्ष, शरभ। विभु तैं सुभग धांव घेती ॥६॥
शकुनीचे ऐसे येतां पंचभ्राते। प्राणहीन त्यांतें करी भीम ॥७॥
वासुदेव म्हणे धर्मही विक्रमी। संहारितो रणीं बहुत वीरां ॥८॥

३००

अंबष्ट, मालव, शिबि तें त्रिगर्त । संहारी रणांत धर्मराज ॥ १ ॥
अभीषाह तैंवीं बाल्हिकादि वीर । पडले भूमीवर गतप्राण ॥ २ ॥
हलकल्लोळ तैं माजला रणांत । धांवूनियां तेथ येती द्रोण ॥ ३ ॥
अस्त्रयुद्ध तदा जाहलें दारुण । आग्नेय, वारुण, याम्य, त्वाष्ट्र ॥ ४ ॥
ऐंद्र, प्राजापत्य अस्त्रें तीं गुरूंचीं । करी विफलचि धर्मराज ॥ ५ ॥
क्रुद्ध गुरुद्रोण धर्माच्या नाशार्थ । योजिती ब्रह्मास्त्र तेंही अंतीं ॥६॥
तया अस्त्रें घोर अंधकार दाटे । न सुचे कोणातें मार्ग कांहीं ॥ ७ ॥
ब्रह्मास्त्रेंचि परी निवारी त्या धर्म । अन्यत्रचि द्रोण निघूनि जाती ॥
वासुदेव म्हणे भीमार्जुन रणीं । द्रोणांसी अडवूनि वधिती सैन्य ॥

अध्याय १५८ वा ३०१

दुर्योधन म्हणे कर्णा । पहा सैनिकांची दैना ॥ १ ॥
मित्रवत्सला, ही वेळ । ओळखूनि दावीं बळ ॥ २ ॥
करीं आतां युद्ध घोर । दावीं वीरां पैलतीर ॥ ३ ॥
कर्ण म्हणे दुर्योधना । वधितों क्षणांत अर्जुना ॥ ४ ॥
तुझें करावया प्रिय । जाण कर्णाचें सर्वस्व ॥ ५ ॥
वासवी हे इंद्रदत्त । सोडीन मी या रणांत ॥ ६ ॥
संहारील ती पार्थासी । सहज तेणें विजयप्राप्ति ॥ ७ ॥
पुढती पांडव अंकित । अथवा जातील वनांत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हास्य । वचनें कर्णाच्या कृपास ॥ ९ ॥

३०२

कृपाचार्य तदा बोलले कर्णासी । धन्य धन्य तुझी स्फूर्ति कर्णा ॥१॥
तुजसम त्राता लाभतां रायासी । चिंता कासयाची उरली आतां ॥
परी हे राधेया, वचन हें सत्य । दिसेल आम्हांस कदाकाळीं ? ॥३॥
रायासन्निध तूं प्रौढी मारितोसी । परी रणामाजी न दिसे कांहीं ॥
आजवरी कदा दाविलेंसी शौर्य । बोलावया धैर्य कैसें होई ॥ ५ ॥
अनावर तुज एकाकीही पार्थ । प्रलाप हे व्यर्थ कासयासी ॥ ६ ॥
मूकपणें पार्थ दावितो विक्रम । व्यर्थ मेघासम गर्जसी तूं ॥ ७ ॥

क्षत्रियांचे बाहु, ब्राह्मणांची वाणी । वीर धनुष्पाणी ख्यात लोकीं ॥
मनोराज्यामाजी कर्णाचें प्राविण्य । बोलती वचन कृपाचार्य ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां कर्ण । बोलला वचन ऐका काय ॥ १० ॥

३०३

वर्षाकाळीं मेघ गर्जताती नित्य । तैसेंचि हें सत्य वचन माझें ॥ १॥
बीजगर्भभूमी सफल ज्यापरी । तसी ही वैखरी सफल माझी ॥ २ ॥
प्रयत्नाची कास धरूनि रणांत । गर्जतों विश्वास मानूनियां ॥ ३ ॥
जिंकिलें पार्थासी हेचि माझी मति । विप्रा, हानि तुझी काय येणें ॥
शारदीय मेघ समजें न मज । जाणूनि सामर्थ्य गर्जतों मी ॥ ५ ॥
निष्कंटक राज्य अर्पीन रायासी । वधूनि पार्थासी सपरिवार ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां कृप । बोलती सकोप कर्णालागीं ॥ ७ ॥

३०४

सूतपुत्रा, हे प्रलाप । वाटताती मज व्यर्थ ॥ १ ॥
कृष्णार्जुन ज्या पक्षासी । नित्य विजय तेथेंचि ॥ २ ॥
धर्मनिष्ठ युधिष्ठिर । तेंवी शस्त्रास्त्रकुशल ॥ ३ ॥
महावीर त्याचे भ्राते । तेंवी शूर साह्यकर्ते ॥ ४ ॥
कृष्ण ज्यांचा पाठीराखा । कर्णा, वध तूं तयांचा- ॥ ५ ॥
इच्छिसी, हें बालिशकर्म । कृप बोलती वचन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । बाचाबाच त्या वीरांची ॥ ७ ॥

३०५

हांसूनि विकट बोलतसे कर्ण । जाणतों मी गुण पांडवांचे ॥ १ ॥
परी वासवीच्या प्रभावें पार्थास । वधीन रणांत निश्चयेंसी ॥ २ ॥
पार्थाच्या विनाशें पांडवांची दैना । जाणूनि गर्जना करीतसें ॥ ३ ॥
नीतिबळें हेतु सर्व होती साध्य । व्यर्थ पांडवांस स्तविसी विप्रा ॥
पुनरपि ऐसें वदसील जरी । छेदिन सत्वरी जिव्हा खड्गें ॥ ५ ॥
निरुत्साह नित्य करिसी सैन्याचा । बलिष्ठ आमुचा सैन्यसिंधु ॥६॥
उभय सैन्याचा होतसे संहार । पांडवचि शूर म्हणसी कैसी ॥ ७ ॥
नराधमा, जनीं दैवाधीन जय । दावीन मी शौर्य रायास्तव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे उन्मत्त हा ऐसा । अवमान थोरांचा सहज करी ॥९॥

अध्याय १५९ वा

३०६

मातुलासी कर्ण करी दुर्भाषण। कोपला ऐकून अश्वत्थामा ॥ १ ॥
अंगावरी धांव घेऊनियां बोले। शौर्य काय केलें सांग कर्णा ॥ २ ॥
जयद्रथवधप्रसंगीं तें शौर्य। गेलें होतें काय फलाहारा ॥ ३ ॥
सत्य तेंचि केलें कथन मातुलें। मत्सरें पेटलें हृदय तुझें ॥ ४ ॥
मनोरथमात्रें शेफारूनि जासी। अवज्ञा थोरांची करिसी मूढा ॥५॥
त्रैलोक्यीं अजिंक्य वध त्या पार्थाचा। करिसी हें मूढा कोण मानी ॥
उन्मत्ता, ये तुझें छेदितों मस्तक। दुर्योधन हस्त धरी त्याचा ॥ ७ ॥
म्हणे अश्वत्थामन्, शांत होईं वीरा। आधार या काला तुमचा मज
प्रसंग जाणूनि विप्र शांत होती। शासील पार्थेचि म्हणती कर्णा ॥
वासुदेव म्हणे कठिण कठिण। येतां मूढजन एक्या ठाईं ॥ १० ॥

३०७

पुढती संग्राम जाहला दारुण। कर्ण सोडी बाण क्रोधावेशें ॥ १ ॥
पांडव, सृंजय लेखूनियां तुच्छ। म्हणती दुरात्म्यास वधा आतां ॥
अनर्थाचें मूळ मूर्तिमंत पाप। पार्थाचा हा मुख्य वैरी कर्ण ॥ ३ ॥
ऐसें गर्जूनियां झुंजती शौर्यानें। परी राधेयानें शौर्य केलें ॥ ४ ॥
कुरुक्षेत्र तदा होई रौद्रभूमि। असंख्यात रणीं पडले वीर ॥ ५ ॥
दुर्योधन म्हणे अश्वत्थाम्याप्रति। साह्य हो कर्णासी ऐशावेळीं ॥
क्रुद्ध पार्थ आतां येईल धांवोनि। वांचवीं जावोनि कर्णाप्रति ॥ ७ ॥
ऐकूनियां कृप तेंवी अश्वत्थामा। धांव कृतवर्मा घेती रणीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धनुर्धारी पार्थ। आच्छादी कर्णास तीव्र शरें ॥ ९ ॥

३०८

पार्थावरी वृष्टि करूनियां कर्ण। ताडी तीन बाण चपळतेनें ॥ १ ॥
हांसूनि पार्थानें मणिबंधभेद। करितां धनुष्य पडलें खालीं ॥ २ ॥
परी निमिषार्धें उचलूनि चाप। राधेय सवेग सोडी शर ॥ ३ ॥
पाहूनि पार्थानें तोडिलें धनुष्य। संहारिले अश्व क्षणामाजीं ॥ ४ ॥
तोडितां तत्काळ सारथ्याचें शिर। गर्जले ते वीर रणामाजीं ॥ ५॥
धांवूनियां कर्ण कृपाच्या स्यंदनीं। बैसला जाऊनि तयावेळीं ॥६॥

शरीरीं तयाच्या रोमरोमीं बाण । जीवितरक्षण करीतसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पराभव ऐसा । होतांचि कर्णाचा, पळती वीर ॥ ८ ॥

३०९

तयावेळीं दुर्योधन । क्रोधें बोलला गर्जून ॥ १ ॥
सैनिक हो, पळूं नका । पहा पराक्रम माझा ॥ २ ॥
जिंकीन मी अर्जुनासी । काळासम झेंप माझी ॥ ३ ॥
द्रोणपुत्रालागीं कृप । म्हणती घेई आतां झेंप ॥ ४ ॥
राव चालला रणासी । धरूनि पतंगवृत्तीसी ॥ ५ ॥
ऐकतांचि अश्वत्थामा । म्हणे थांब दुर्योधना ॥ ६ ॥
द्रोणपुत्र हा जिवंत । असतां काय करिल पार्थ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐका । वदला काय राव तदा ॥ ८ ॥

३१०

पांडवांसी नित्य रक्षिताती द्रोण । उपेक्षाचि जाण करिसी तूंही ॥
मंदभाग्य माझें अथवा तूंचि काचा । अभिमान धर्माचा अथवा तुज
पांचाळीचें प्रिय अथवा इच्छिसी । न कळे मजसी मूळ कांहीं ॥
धिक्कार मजसी असो ऐशावेळीं । दुःखांत लोटिलीं सकल सैन्यें ॥
सामर्थ्य असूनि तुजवीण कोण । न येई धांवून ऐशावेळीं ॥ ५ ॥
गुरुपुत्रा, आतां होऊनि प्रसन्न । पांडवविहीन अवनी करीं ॥ ६ ॥
पांचाळवधार्थ जन्मलासी ऐसें । वचन सिद्धांचें सत्य करीं ॥ ७ ॥
मानदा, बलिष्ठा, जा जा रणामाजी । निवारीं पार्थासी महाशौर्यें ॥
वासुदेव म्हणे रायाचें कौशल्य । स्फूर्ति सर्वकाळ अर्पी वीरां ॥९॥

अध्याय १६० वा

३११

दुर्योधनाप्रति बोले अश्वत्थामा । पांडवांचें आम्हां प्रेम असे ॥ १ ॥
आम्हींही तयांसी प्रिय जाण राजा । बोलसी जे वाचा सत्यचि ते
परी रणामाजी नसे तो संबंध । प्राणपणें युद्ध करितों यत्नें ॥ ३ ॥
कर्ण, शल्य, कृप, कृतवर्म्यादिक । संहारूं क्षणांत पांडवसैन्यें ॥ ४॥
आम्हांवीण तेही कौरवांची सेना । यमाच्या सदना नेती क्षणीं ॥५॥
परी परस्पर ठाकतां पुढती । शक्ति उभयांची शांत होई ॥ ६ ॥
वास्तविक राया, ऐशी वस्तुस्थिति । कापट्य मानसीं नित्य तुझ्या

कुत्सित तूं पापी, क्षुद्र, अहंमन्य । मानितोसी जन सकल तैसे ॥
सवकाळ शंका यास्तव तुजसी । परी तुझ्यासाठीं लढतों पहा ॥
वासुदेव म्हणे गुरुपुत्र ऐसें । बोलूनि शौर्यातें दावीं रणीं ॥ १० ॥

३१२

वर्षाव शरांचा अश्वत्थाम्यावरी । होतां तो निवारी महाशौर्यें ॥१॥
वीरामार्गे वीर पाडिले रणांत । धृष्टद्युम्न क्षुब्ध तयावेळीं ॥ २ ॥
म्हणे द्रोणपुत्रा, शौर्य दावीं मज । *वधितों रणांत थांब आतां ॥ ३॥
परी विप्राआधीं वधीन द्रोणासी । मागुती तुजसी संहारीन ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें करिती घोर युद्ध । परस्परां विद्ध करिती क्रोधें ॥
श्रेष्ठ कोण ऐसें न कळे कोणासी । स्तवन करिती देवादिक ॥ ६ ॥
दोन घटी ऐसें अलौकिक युद्ध । पुढती पार्षत विद्ध होई ॥ ७ ॥
चाप, ध्वज, छत्र, अश्व तैं सारथी । अश्वत्थामा वधी पार्षताचे ॥
पुढती असंख्य संहारिले वीर । चमकला शूर अश्वत्थामा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे शोभे गुरुपुत्र । जैसा तो देवेंद्र शत्रुहंता ॥ १० ॥

अध्याय १६१ वा ३१३

पांडव तैं झाले क्रुद्ध । करिती निकराचें युद्ध ॥ १ ॥
शिवि, अंवष्ठ, मालव । यांसी वधी वृकोदर ॥ २ ॥
अभीषाह, शूरसेन । तेही वधी भीमसेन ॥ ३ ॥
यौधेय ते अद्रिजादि । यमलोकीं पार्थ धाडी ॥ ४ ॥
रणामाजी इतस्ततः । वळवळती छिन्न शुंडा ॥ ५ ॥
वाटे भुजांगांनीं व्याप्त । झालें तदा रणक्षेत्र ॥ ६ ॥
मारा, कापा, ऐसा शब्द । रणामाजी तो प्रचंड ॥ ७ ॥
वायव्यास्त्रें गुरुद्रोण । सैन्य लाविती उधळून ॥ ८ ॥
अंधःकार भरला रणीं । निद्रा लोटली नयनीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वीर । रणीं जाहले व्याकुळ ॥ १० ॥

अध्याय १६२ वा ३१४

ऐशावेळीं सोमदत्त । चमकावी निज चाप ॥ १ ॥
धांव घेई रणांगणीं । पाहूनियां कोपे शैनी ॥ २ ॥

देई आव्हान तयासी । दोघे झुंजले क्रोधेंसी ॥ ३ ॥
वाहे भळभळां रुधिर । देह व्यापिताती शर ॥ ४ ॥
चमकती महावृक्ष । जेंवी मशकसंयुक्त ॥ ५ ॥
भीमसेन परिघ फेंकी । क्षणीं सोमदत्त छेदी ॥ ६ ॥
तदा रथ, अश्व, सूत । वधी त्याचे शिनिश्रेष्ठ ॥ ७ ॥
वक्षःस्थल फोडी अंतीं । गेला वीर यमलोकीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वृद्ध । ऐसा पडला सोमदत्त ॥ ९ ॥

३१५

सोमदत्तवधें क्षुब्ध झालें सैन्य । रक्षणार्थ धर्म धांव घेई ॥ १ ॥
धर्मावरी द्रोण तदा धांव घेती । धनुष्य छेदिती ध्वजासह ॥ २ ॥
अन्यचापें धर्म ताडी तीव्रबाण । व्याकुळ तैं द्रोण संज्ञाहीन ॥ ३ ॥
पुढती वायव्यास्त्रें ताडितां धर्मानें । चाप तीव्रबाणें छेदियेलें ॥ ४ ॥
इतुक्यांत कृष्ण बोलला धर्मासी । राजा, जा राजासी युद्ध करीं ॥
द्रोण धरावया टपले तुजसी । लढेल द्रोणांसी धृष्टद्युम्न ॥ ६ ॥
ऐकूनि तें धर्म भीमाच्या साह्यार्थ । हांकीं म्हणे रथ इंद्रसेना ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसी पूर्वरात्र । संपली रणांत सैन्यें धुंद ॥ ८ ॥

अध्याय १६३ वा

३१६

घोर भयानक जुंपता समर । दाटे अंधःकार रणांगणीं ॥ १ ॥
एकमेकां वीर न दिसती कोणी । घुसले महारणीं भीमादिक ॥ २ ॥
तयावेळीं द्रोण अवशिष्ट सैन्य । एकत्र करून रचिती व्यूह ॥ ३ ॥
अग्रभागीं स्वयें राहियेले, पृष्ठीं । शल्यादि, निरीक्षी सकलां राव ॥
पदातींसी तदा बोले दुर्योधन । दिवट्या पाजळून धारे हातीं ॥
ऐकूनि आनंद होई सकलांतें । शोभले पलिते सकल रणीं ॥ ६ ॥
प्रति गजावरी प्रदीपक तीन । शोभती स्यंदन विदीपकें ॥ ७ ॥
महाप्रदीप तो प्रति अश्वावरी । सर्वत्र मशाली पदातींच्या ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध भारद्वाज । सुवर्णकवच तळपे अंगीं ॥

१ प्रदीपक, विदीपक आदि हे मशालींचेच लहानमोठे प्रकार होत.

३१७

शस्त्रें आभरणें बिंबें प्रतिबिंबें । सर्वत्र भासले दीप बहु ॥ १ ॥
रत्नाभरणांची काय वर्णू शोभा । दावाग्नीचि जैसा वनीं भासे ॥
गजावरी सप्त दश प्रतिरथी । दोन अश्वपृष्ठीं बहुत अन्य ॥ ३ ॥
पांडवसेनाही ऐसी दीपमय । नभांत गंधर्व यक्षादिक ॥ ४ ॥
रथ, अश्व, गज वीर शस्त्रधारी । एकमेकांवरी धांव घेती ॥ ५ ॥
कोंदले रणांत भिन्न भिन्न नाद । दाह द्विजश्रेष्ठ करी बहु ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शोणिताची वृष्टि । जणुं रणामाजी होई बहु ॥ ७ ॥

अध्याय १६४ वा

३१८

दीप प्रज्वलित तया भूमीवरी । वीर वीरांवरी धांव घेती ॥ १ ॥
अश्वांवरी अश्व रथांवरी रथ । जाहले एकत्र वैरभावें ॥ २ ॥
दुर्योधन म्हणे वाम सव्य भार्गी । रक्षावें गुरूंसी सर्व यत्नें ॥ ३ ॥
रक्षितां गुरूंसी पांडवांचा नाश । जिंकीं पार्षतास गुरुपुत्रा ॥ ४ ॥
अर्जुनाचा नाश करील राधेय । भीमपराजय करीन मी ॥ ५ ॥
भीमार्जुनवधें सकलांचा नाश । यास्तव द्रोणांस संरक्षावें ॥ ६ ॥
ऐकूनि ते शब्द खवळले वीर । झालें घनघोर युद्ध तदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संग्राम रात्रींचा । ऐकिला न ऐसा पुरा कोणी ॥ ८ ॥

अध्याय १६५ वा

३१९

सात्यकि भूरीचा तुंबळ संग्राम । म्हणती घेऊं प्राण एकमेक ॥ १ ॥
दोन घटी युद्ध जाहलें संकुल । भूरीसी घायाळ करी शैनी ॥ २ ॥
परी सात्यकीचें भग्न करी चाप । फोडूनियां हांक भूरि वेगें ॥ ३ ॥
महाशक्ति तदा घेऊनि सात्यकि । वैऱ्यावरी फेंकी क्रोधावेशें ॥४॥
अंगारकासम कोसळला भूरि । जाहला संगरीं हाहाःकार ॥ ५ ॥
अश्वत्थामा तदा पुढती धांव घेई । घटोत्कच पाही तयालागीं ॥६॥
गर्जूनियां वीर एकमेकांवरी । धांवले संगरीं महाक्रोधें ॥ ७ ॥
झुंजतां झुंजतां अश्वत्थामा भ्रांत । होई परी क्रुद्ध उठतां रणीं ॥८॥
वासुदेव म्हणे पुढती घटोत्कच । पडला रथांत प्रखर शरें ॥९॥

अध्याय १६६ वा

३२०

दुर्योधन भीम लढती शौर्यानें । वेधिती शरानें एकमेकां ॥ १ ॥
भीमासी ताडन करी दुर्योधन । धनुष्य छेदून गर्जे बहु ॥ २ ॥
अन्य चाप भीमें घेतां तें छेदिलें । नवलचि केलें दुर्योधनें ॥ ३ ॥
एक, दोन, पांच, सात, भीमचापें । छिन्न होतां गर्जे भीम रणीं ॥४॥
महाज्वालेसम सोडी घोरशक्ति । दुर्योधन छेदी तत्काळाचि ॥ ५ ॥
अंतीं गदाघात करी भीमसेन । रथ-अश्व-चूर्ण नृपाळाचें ॥ ६ ॥
नंदकाच्या रथीं लपला कौरव । मेला हाचि भाव सकलांचा ॥७॥
सिंहनाद तदा केला भीमसेनें । आनंदित सैन्यें पांडवांचीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पुढती धर्म येई । भडिमार होई सायकांचा ॥ ९ ॥

अध्याय १६७ वा

३२१

कर्ण-सहदेव झुंजतां कर्णानें । छेदिलें शरानें चाप क्रोधें ॥ १ ॥
अश्वांसी मारूनि वधिला सारथी । सहदेव हातीं घेई खड्ग ॥ २ ॥
छेदितां ते शक्ति गदाही फेंकिली । विफल ते केली राधेयानें ॥ ३ ॥
अंतीं रथचक्र, मृत अश्व, गज । फेंकी परी व्यर्थ यत्न होती ॥ ४ ॥
सन्निध येऊनि टोंची कर्ण, चापें । म्हणे रणीं तोकें येऊं नये ॥ ५ ॥
जा, जा सहदेवा, झुंजें तूं अन्यासी । अथवा शिबिरासी निघूनि जाईं
पूर्ववचनासी स्मरूनियां कर्ण । वीरासी सोडून देई रणीं ॥ ७ ॥
जनमेजयरथीं[1] बैसे सहदेव । म्हणे वासुदेव खिन्नमनें ॥ ८ ॥

३२२

मद्रपति शल्य-विराटांचें युद्ध । करिताती विद्ध परस्परां ॥ १ ॥
मत्स्यपति अंतीं जाहला विरथ । ठाकला रणांत चापधारी ॥ २ ॥
तदा बंधु त्याचा क्रोधें पुढती येई । परी शल्य घेई प्राण त्याचा ॥
तयाच्याचि रथीं बैसूनि विराट । वर्षाव करीत सुटला वेगें ॥ ४ ॥
पुढती शल्यानें नतपर्वशरें । संज्ञाशून्य केलें विराटासी ॥ ५ ॥

---

१ पांचालपुत्र.

अलंबुष पाही कृष्णार्जुन येतां । प्रवर्तला युद्धा तयासवें ॥ ६ ॥
घटोत्कचासम रथ त्या दैत्याचा । संग्राम शौर्याचा करीतसे ॥ ७ ॥
परी अंतीं तेणें केलें पलायन । समीप तैं द्रोण अर्जुनाच्या ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अर्जुनाचें भय । मानूनि कौरव पळती वेगें ॥ ९ ॥

अध्याय १६८ वा ३२३

नकुलपुत्र शतानिक । चित्रसेन धार्तराष्ट्र ॥ १ ॥
करिती संग्राम दारुण । अंतीं विरथ चित्रसेन ॥ २ ॥
कृतवर्म्याच्या स्यंदनीं । वेगें बैसला जाऊनि ॥ ३ ॥
द्रुपद वृषसेन क्रोधें । सज्ज करूनि आयुधें ॥ ४ ॥
लढले अंतीं यज्ञसेन । पडला मूर्छित होऊन ॥ ५ ॥
दुःशासन-प्रतिविंध्य । करिती क्रोधें घोर युद्ध ॥ ६ ॥
प्रतिविंध्य विरथ होई । परी शौर्यें चाप घेई ॥ ७ ॥
येतां बांधव धांऊनि । बैसे सुतसोमस्यंदनीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । लढती ऐसे धनुर्धर ॥ ९ ॥

अध्याय १६९ वा ३२४

लढला शौर्यानें नकुळ । शकुनि दावी तया बळ ॥ १ ॥
एकमेकांचे ते वैरी । उठले एकमेकांवरी ॥ २ ॥
झाला मूर्छित नकुळ । पडला होऊनि घायाळ ॥ ३ ॥
होतां सावध तो वीर । सोडीतसे तीव्र शर ॥ ४ ॥
ध्वज तोडिला शत्रूचा । फोडी वाम-सव्य अंकां ॥ ५ ॥
तदा व्याकुळ शकुनि । पडला मूर्छित होऊनि ॥ ६ ॥
सूत रथ नेई दूर । गर्जिन्नला माद्रिपुत्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर । गेला द्रोणसैन्यावर ॥ ८ ॥

३२५

शिखंडीसी वेगें शारद्वत ताडी । द्रुपदपुत्र तोडी चाप त्याचें ॥ १ ॥
पुढती शक्त्याघात करिताती कृप । करीतसे भेद वीर तिचा ॥ २ ॥
अंतीं रथोपस्थीं बैसला निस्तब्ध । शिखंडी कुंठित होऊनियां ॥ ३ ॥
पांचाळ, सोमक, साह्यार्थ धांवले । पुढती जुंपलें घोर रण ॥ ४ ॥

कंपायमान तैं होई रणभूमी । अंगनाचि कोणी भयग्रस्त ॥ ५ ॥
मागें पुढें सैन्यें धांव घेती क्रोधें । गगन निनादे महाशब्दें ॥ ६ ॥
प्रदीप्त ते दीप उल्काचि भासती । विसरूनि लढती आप पर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे घोर तो संग्राम । ऐकूनीच प्राण कासावीस ॥ ८ ॥

अध्याय १७० वा ३२६

तयावेळीं धृष्टद्युम्न द्रोणावरी । गर्जूनि सत्वरि धांव घेई ॥ १ ॥
पांचाल, पांडव तया साह्य होती । धृष्टद्युम्न वेधी द्रोणांप्रति ॥ २॥
तोडिलें गुरूनीं क्रोधें त्याचें चाप । सोडी तैं पार्षत दिव्यबाण ॥ ३॥
प्रभा त्या शराची फांकली रणांत । कर्ण त्रयोदश खंड करी ॥ ४ ॥
शल्य, दुःशासन कौरवेंद्रादिक । कोंडिती रणांत पार्षतासी ॥ ५ ॥
द्रुमसेन तदा ताडी पार्षतासी । वधी त्या सात्यकि एका बाणें ॥
धृष्टद्युम्न तोडी कर्णाचें धनुष्य । खवळे तो विपुच्छ सिंहासम ॥
साह्यार्थ तैं धांवे त्याच्या वीर षट्क । पार्षता सात्वत साह्य होई ॥
वासुदेव म्हणे कर्ण-सात्वतांचें । जुंपे त्या स्थळातें घोर युद्ध ॥ ९ ॥

३२७

कर्णावरी वीर सात्यकि धांवला । कर्णही तयाला हांका मारी ॥ १॥
विपाठ, नाराच, कर्णि, वत्सदंत । क्षुरादि असंख्य सोडी शर ॥ २ ॥
तितुकेंहि तोडी सात्वत शौर्यानें । ताडितो क्रोधानें कर्णपुत्रा ॥ ३ ॥
वक्षःस्थलभेद होतां तो मूर्छित । पडला रथांत वृषसेन ॥ ४ ॥
क्षुब्ध राधेय तैं उसळला क्रोधें । हृ तार्चीं कवचें तुटलीं त्याचीं ॥
भंगतां धनुष्य अन्यचापें कर्ण । सोडी दिव्यबाण महाक्रोधें ॥ ६ ॥
इतुक्यांत येई गांडीवाचा घोष । वदला रायास कर्ण तदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रसंग तो बाका । रंग येई युद्धा पुढती बहु ॥ ८ ॥

३२८

कर्ण म्हणे राजा धनुर्धर पार्थ । पातला रणांत वधूनि सैन्य ॥ १ ॥
पार्षत-सात्वतां साह्य होतां पार्थ । जातील हे व्यर्थ श्रम बा रे ॥ २ ॥
अभिमन्यूसम कोंडूं या दोघांसी । अन्यत्र पार्थासी गुंतवावें ॥ ३ ॥
ऐकूनि नृपाळ बोले मातुलासी । अडवूनि पार्थासी धरीं वीरा ॥४॥

गजसैन्यें तदा घेऊनि शकुनि । धांव घेई रणीं पार्थावरी ॥ ५ ॥
सात्वतासी वीर कोंडिती या परी । धृष्टद्युम्नावरी द्रोण जाती ॥६॥
वासुदेव म्हणे रात्रियुद्ध ऐसें । रणीं उग्ररूपें प्रवर्तलें ॥ ७ ॥

अध्याय १७१ वा ३२९

युयुधानावरी येतां महावीर । न भंगेचि धैर्य लवही त्याचें ॥ १ ॥
खवळूनि तेणें मांडिला आक्रांत । पाडिले रणांत वीर बहु ॥ २ ॥
छिन्न अश्व, गज, स्यंदन तें भग्न । तेंवी आक्रंदन सैनिकांचें ॥ ३ ॥
ऐसी धुळधाण केली सात्यकीनें । पाहोनि क्रोधानें धांवे राव ॥४॥
द्वादश शरांनीं ताडिलें तयासी । मारूनि सारथी वधिले अश्व ॥५॥
तैसाचि स्यंदनीं बैसूनियां राजा । वर्षाव शरांचा करी बहु ॥ ६ ॥
परी सात्यकीनें छेदितां ते बाण । सोडूनियां स्थान राव जाई ॥७॥
कृतवर्मा त्यासी रथावरी घेई । ऐसी हातघाई माजे तदा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सिंह तो सात्यकि । दाणादाण ऐसी करीतसे ॥ ९ ॥

३३०

इकडे पार्थासी वेढितां सौबल । मांडियेला खेळ धनुर्धरें ॥ १ ॥
अश्व, गजशुंडा, वीरांचीं मस्तकें । असंख्यात तेथें विखुरलीं ॥ २ ॥
पिता-पुत्र रणीं शकुनि-उलूक । घायाळ रणांत होती बहु ॥ ३ ॥
अग्निग्रासमचि अंधारांत सैन्य । वांचवाया प्राण धांव घेई ॥ ४ ॥
अन्यत्र द्रोणांसी पार्षताचें युद्ध । महावीर त्रस्त होती बहु ॥ ५ ॥
रुधिराचा पूर लोटला त्या स्थानीं । कौरवसेनानी पळूनि जाती ॥
धृष्टद्युम्नादिक फुंकिताती शंख । तेंवी भीमादिक साथ देती ॥ ७ ॥
कर्ण-भारद्वाजांसमक्ष ते नाद । घुमती नभांत आनंदाचे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सावध शत्रूचा । नाश तोचि साचा पराक्रम ॥ ९ ॥

अध्याय १७२ वा ३३१

पाहूनियां घोर युद्ध तें दारुण । भेटे दुर्योधन कर्ण, द्रोणां ॥ १ ॥
म्हणे जयद्रथवधोत्तर तुम्हीं । भिडलाती रणीं स्वेच्छेनेंचि ॥ २ ॥
आतां भ्याडासम काय हें पाहतां । आठवा ते वाचा जिंकू ऐसी ॥
विश्वासें तुमच्या आरंभिलें युद्ध । शोभे ऐसें कृत्य करा आतां ॥४॥

ऐकूनि लढती व्याघ्रासम क्रोधें । प्रलयचि वाटे तयावेळीं ॥ ५ ॥
पिता, पुत्र, भ्राते सोडूनि संबंध । त्यागूनियां दीप त्यजिती रणा ॥
पाठलाग त्यांचा करिती द्रोण, कर्ण । संरक्षीं यां कृष्ण वदला पार्था
इतुक्यांत भीम पुढती पातला । संग्राम मांडिला अंधारीं त्या ॥८॥
ऐकूं येई कानीं नामगोत्रोच्चार । स्तब्धता सर्वत्र क्षणीं होई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे लढताती ऐसे । अंधःकार दाटे रणांगणीं ॥ १० ॥

अध्याय १७३ वा

३३२

इकडे महावीर कर्ण यमासम । करी प्राणहीन सैनिकांसी ॥ १ ॥
पार्षतासी करी विरथ क्रोधानें । युधिष्ठिरसैन्यें रक्षिती त्या ॥ २ ॥
अपूर्वसंग्राम पाहूनि कर्णाचा । धीर सैनिकांचा गळूनि जाइ ॥ ३ ॥
तृणही हालतां वाटे कर्ण येई । पळतां अल्प होई भूमी तयां ॥ ४ ॥
पाहूनि तें धर्म म्हणे पार्था पाहीं । देना, योजीं कांहीं उपायासी ॥
ऐकूनि तें पार्थ म्हणे यदुनाथा । योग्य तोचि पंथा दावीं मज ॥६॥
कृष्ण म्हणे पार्था, घटोत्कचावीण । अन्याचें न कर्म ऐशावेळीं ॥७॥
तोचि युद्धामाजी निवारील कर्णा । वासवी अर्जुना ध्यानीं असो ॥
वासुदेव म्हणे पाचारितां पाहीं । घटोत्कच येई पुढती प्रेमें ॥ ९ ॥

३३३

कृष्णार्जुनांसी वंदूनि । नम्रभावें वदे भैमी ॥ १ ॥
सेवेसी मी सिद्ध असें । काय आज्ञा देवा, मातें ॥ २ ॥
हांसूनियां तें केशव । वदला जाणसी तूं भाव ॥ ३ ॥
वेळ तुझ्या विक्रमाची । आली, नौका हो आम्हांसी ॥ ४ ॥
बाळा, युद्धविशारदा । लढतो कर्ण महायोद्धा ॥ ५ ॥
उडवी गाळण वीरांची । तूंचि निवारिता त्यासी ॥ ६ ॥
आप्तजनां होवो त्राता । करिती यास्तव पुत्रेच्छा ॥ ७ ॥
रात्रिंचरा, तूं समर्थ । कर्णासी तूं करीं युद्ध ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हर्ष । पावे तदा भीमपुत्र ॥ ९ ॥

३३४

पार्थ म्हणे बाळा, घटोत्कच वीरा । जाई रणधीरा संग्रामासी ॥१॥

आजानुबाहु तो संरक्षी सात्यकि । मान्य तूं मजसी वीरश्रेष्ठ ॥२॥
इंद्र-स्कंदासम वीर तुम्ही दोघे । जिंकाल कर्णातें निश्चय हा ॥ ३ ॥
ऐकूनि तें भैमी बोले अर्जुनासी । जिंकीन मी आजी द्रोण-कर्णा ॥४॥
करीन विक्रम ऐसा आजि रणीं । गातील अवनी यावत्काल ॥ ५ ॥
शूर, भ्याड, नम्र वधीन सर्वांसी । राक्षसधर्मासी अवलंबीन ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां हिडिंबेचा पुत्र । गर्जूनि रणांत धांव घेई ॥ ७ ॥
हांसूनियां कर्ण सामोरा जाऊनि । प्रवर्तला रणीं घोरयुद्धा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दारुण संग्राम । होऊनि बेभान, करिती वीर ॥ ९ ॥

अध्याय १७४ वा

३३५

दुर्योधन म्हणे दुःशासनाप्रति । संरक्षीं कर्णासी प्रसंगीं या ॥ १ ॥
इतुक्यांत येई जटासुरपुत्र । नामें अलंबुष क्रूरकर्मा ॥ २ ॥
म्हणे दुर्योधना, मज देई आज्ञा । सूडाची भावना हृदयीं माझ्या ॥
कर्ण-द्रोणसाह्यें पांडवां वधीन । तर्पण करीन शोणितानें ॥ ४ ॥
ऐकूनियां राव सांगे तयालागीं । घटोत्कचालागीं वधीं वेगें ॥ ५ ॥
आज्ञा मानूनियां अलंबुष धांवे । आव्हान भैमीतें देऊनियां ॥ ६ ॥
पुढती घायाळ होई घटोत्कच । धांवला साह्यार्थ भीम त्याच्या ॥
वासुदेव म्हणे विरथ तो दैत्य । पुढती मुष्टियुद्ध होई रणीं ॥ ८ ॥

३३६

रेंटूनियां एकमेकां । वीर प्रवर्तले द्वंद्वा ॥ १ ॥
उत्पाटिती महावेगें । गर्जूनियां घोर शब्दें ॥ २ ॥
करिती मायामय युद्ध । होती वायु कोणी मेघ ॥ ३ ॥
अग्नि, सिंधु, सिंह, गज । होती पर्वत तें वज्र ॥ ४ ॥
सूर्य, राहूचें स्वरूप । पाहूनियां चकित लोक ॥ ५ ॥
मुसळें, पट्टे तेंवी आस । गदा, तोमर, परीघ ॥ ६ ॥
अंतीं करूनि उड्डाण । उचली भीमाचा नंदन ॥ ७ ॥
आपटितां रणांगणीं । जाती किंकाळ्या गगनीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शिर । छेदी घटोत्कच वीर ॥ ९ ॥

३३७

विक्राळ मस्तक धरूनियां केश । दाखवी राजास भीमपुत्र ॥ १ ॥
म्हणे हेचि गति करीन कर्णाची । मागोमाग गति हेचि तुझी ॥२॥
रिक्त हस्तें भेट न होवो रायाची । भेट हे तुजसी अर्पितसें ॥ ३ ॥
आनंदानें आतां स्थिर हो रणांत । कर्ण हा कृतांतसदन पाहो ॥४॥
बोलूनियां ऐसें धांवे कर्णावरी । वर्षावचि करी प्रखर शरें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विस्मयकारक । घटोत्कचयुद्ध ऐका आतां ॥ ६ ॥

अध्याय १७५ वा

३३८

आरक्त नयन विशाल शरीर । टेंकलें उदर पृष्ठभागीं ॥ १ ॥
आकर्ण जिवणी चार चार सुळे । नीलवर्ण, रुळे जिव्हा दीर्घ ॥ २ ॥
कांस्यकवच, तें अलंकार त्याला । अश्व स्यंदनाला शतसंख्य ॥
विरूप नेत्रांचा दैत्य तो सारथी । दीर्घ चाप हातीं शोभे त्याच्या ॥
प्रदीर्घ शरांनीं ताडित तो जाई । मेघांसम होई नाद घोर ॥ ५ ॥
हांसोनियां कर्ण धांव घेई तदा । भिडले एकमेकां वीरश्रेष्ठ ॥ ६ ॥
परस्पराघात करिती क्रोधानें । झुंजले त्वेषानें दीर्घकाल ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पुढती सूर्यपुत्र । योजी दिव्य अस्त्र दैत्यावरी ॥ ८ ॥

३३९

पाहोनि अस्त्रासी दैत्य योजी माया । नवल त्या ठाया होई बहु ॥
घोर दैत्यसेना निर्मिली तयानें । पाहोनियां सैन्यें भयाकुल ॥ २ ॥
शक्ति, तोमरादि शस्त्रांचा वर्षाव । होतां धांवाधांव कौरवांची ॥३ ॥
मर्मभेदी बाण सोडी तदा कर्ण । रोमरोमीं बाण घुसवी अंतीं ॥ ४ ॥
वेडीं-विद्रीं तोंडें करूनियां दैत्य । अस्त्रामागें अस्त्र गिळूनि टाकी ॥
गतप्राण अंतीं भासे रणामाजी । हर्ष कौरवांसी पाहूनियां ॥ ६ ॥
इतुक्यांत रूपें घेऊनि असंख्य । प्रगटे रणांत जागोजाग ॥ ७ ॥
पहा, पद्म, शतशीर्ष, शतोदर । मैनाकचि उग्र पुढती कोण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दैत्य तो क्षणांत । घेई सूक्ष्मरूप विचरे रणीं ॥ ९ ॥

३४०

क्षणांत तो करी भूमीविदारण । क्षणांत उड्डाण उदकीं करी ॥ १ ॥

क्षणांत अन्यत्र गर्जे तो जाऊनि । कर्णासी पाहूनि हांक मारी ॥२ ॥
क्षणांत स्यंदनीं भासे पूर्ववत । सोडी असंख्यात महाशर ॥ ३ ॥
तोडितां ते कर्णें क्षणीं गुप्त होई । पर्वताचि पाही पुढती कर्ण ॥ ४ ॥
निवारितां त्यासी होई नीलमेघ । पाषाणवृष्टीस करीतसे ॥ ५ ॥
अस्त्रवेत्ता कर्ण तयासी वारितां । दिव्य शराघाता दैत्य करी ॥ ६ ॥
छेदुनि ते कर्ण ताडी दिव्य शर । संहारी असुर सैन्य क्रोधें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे त्यावेळीं भैमी । खवळला अग्नीसम क्रोधें ॥ ८ ॥

३४१

प्रज्वलित तैलबिंदूसम नेत्रीं । अग्निज्वाला येती क्रोधावेशें ॥ १ ॥
हातावरी हात चोळूनियां दैत्य । चावी दंत-ओष्ठ असुर रणीं ॥२ ॥
गजशरीर तें पिशाच्चवदन । गर्दभस्यंदन प्रगटे तदा ॥ ३ ॥
वैसूनि त्या रथीं बोलला सूतासी । भिडवी कर्णासी रथ माझा ॥
ऐकूनियां सूत धांवतां संगरीं । शक्ति कर्णावरी फेंकी दैत्य ॥ ५ ॥
परी महावीर झेलूनियां तेचि । घटोत्कचरथीं फेंकितसे ॥ ६ ॥
दैत्यसंदनाचें होई तदा चूर्ण । विस्मित तें जन अवघे होती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तदा यातुधान । पावे अंतर्धान रणामाजी ॥ ८ ॥

३४२

व्याघ्र सिंहादिक हिंस्र पशु येती । फूत्कार करिती महासर्प ॥ १ ॥
राक्षस पिशाच्चें ठोकिती आरोळ्या । व्याकुळ तें झाला वैकर्तन ॥
परी महावीर लढला धैर्यानें । ताडूनि क्रोधानें शर गर्जे ॥ ३ ॥
अस्त्रबळें माया निवारी दैत्याची । सेना राक्षसांची उडवी रणीं ॥
पाहूनियां दैत्य खवळूनि गर्जे । घेतों कर्णा, तुझे प्राण आतां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बोलूनि अदृश्य । जाहला क्षणांत घटोत्कच ॥ ६ ॥

अध्याय १७६ वा

३४३

कर्ण-घटोत्कचांमाजी ऐसें युद्ध । होतां अलायुध पुढती धांवे ॥ १ ॥
दुर्योधनालागीं दुष्ट दैत्य बोले । बांधव वधिले दुष्ट भीमें ॥ २ ॥
हिडिंब, किर्मीर, बकादिक भाई । भक्षीनचि पाहीं पांडवांसी ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें लाभतां अनुज्ञा । दैत्य सिद्ध रणा क्रूरभावें ॥ ४ ॥

घटोत्कचासम विशाल स्यंदनीं । वेले धनुष्पाणी फेंकी शस्त्रें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पांडवांचे वीर । करिती प्रतिकार राक्षसांचा ॥ ६ ॥

अध्याय १७७ वा ३४४

क्रुद्ध भुजंग कीं मत्त तो मातंग । लढतां नृपाळास हर्ष बहु ॥ १ ॥
घटोत्कच तदा भिडला कर्णासी । पडला संकटीं वैकर्तन ॥ २ ॥
दुर्योधन म्हणे अलायुधा, आतां । वध या दैत्याचा तूंचि करीं ॥३॥
ऐकूनियां दैत्य धांवे भैमीवरी । भिडले संगरीं उभय योद्धे ॥ ४ ॥
भीम तयावेळीं पुढती धांवला । आनंद जाहला अलायुधा ॥ ५ ॥
तोडूनियां शरां उलटवी गदा । राक्षस भीमाचा मोड करी ॥ ६ ॥
कृष्ण म्हणे पार्था, पहा हा संहार । होई वृकोदर विरथ तोंचि ॥७॥
पुनरपि गदा उलटवी दैत्य । पुढती द्वंद्वयुद्ध होई त्यांचें ॥ ८ ॥
घटोत्कचालागीं साह्यार्थ श्रीकृष्ण । दैत्याचें पाहून शौर्य धाडी ॥
वासुदेव म्हणे भीमसेन तुष्ट । पाहूनि तो दैत्यपराक्रम ॥ १० ॥

अध्याय १७८वा ३४५

घटोत्कच तदा गर्जला क्रोधानें । पांडवांचीं सैन्यें लढती शौर्यें ॥१॥
परीघाघातानें क्लांत घटोत्कच । होऊनि सावध क्रोधें लढे ॥ २ ॥
दिव्य गदाघातें अश्व-रथचूर्ण । करूनियां रण घुमवी नादें ॥ ३ ॥
अलायुध तदा करी मायायुद्ध । कडाडती मेघ चमके वीज ॥ ४ ॥
निवारितां माया दैत्य फेंकी शस्त्रें । महावृक्षाघातें ताडीतसे ॥ ५ ॥
ऐशा घोर रणीं धांवे घटोत्कच । उचलूनि दैत्यास फिरवी वेगें ॥
आदळूनि अंतीं छेदी मस्तकातें । भरलें शंखनादें गगनांगण ॥ ७ ॥
दुर्योधनावरी फेकूनि मस्तक । गर्जे घटोत्कच अत्यानंदें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे निराश कौरव । पाहूनि विजय पांडवांचा ॥ ९ ॥

अध्याय १७९ वा ३४६

तयावेळीं कर्ण कृतांतकठोर । सोडूनियां शर जिंकी वीरां ॥ १ ॥
पार्षत, सात्वत होती पराभूत । विक्रम अद्भुत करी कर्ण ॥ २ ॥

दाणादाण ऐसी पाहूनि वीरांची । भिडला कर्णासी घटोत्कच ॥३॥
राहू सूर्यासम रणांत शोभती । कोण कोणाप्रति न कळे जिंकी ॥४॥
कर्ण करी अंतीं भैमीतें विरथ । कूटयोद्धा दैत्य गुप्त होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे घटोत्कचवीर । अद्भुत आसुरबल दावी ॥ ६ ॥

३४७

अदृश्यरूपें तो वधील कर्णासी । चिंता हे मानसीं सकलांच्या ॥१॥
परी धैर्यवंत कर्ण करी युद्ध । मायामय मेघ दिसती नभीं ॥ २ ॥
अनावर वृष्टि विविध शस्त्रांची । कौरवसैन्याची दाणादाण ॥ ३ ॥
गगनसंचारी असंख्य राक्षस । ताडिती सैन्यास शूलाघातें ॥ ४ ॥
लोंबती आंतडीं तुटती मस्तकें । कौरवसैन्याचें सुटलें धैर्य ॥ ५ ॥
पळा, पळा नाश म्हणती सर्वांचा । विनाश अश्वांचा राधेयाच्या ॥
कर्णाचें सामर्थ्य विफल जाहलें । कांहींच न कळे मार्ग तया ॥७॥
वासुदेव म्हणे तयावेळीं वीर । होती निराधार सकलही ॥ ८ ॥

३४८

म्हणती कर्णा, शक्त्याघातें । वधीं वधीं या दैत्यातें ॥ १ ॥
ऐसें न घडेल जरी । सकलांचा नाश तरी ॥ २ ॥
उरलों तरी भीमार्जुनां । जिंकूं करूनि संग्रामा ॥ ३ ॥
प्रत्याघातें क्रुद्ध कर्ण । ऐके वीरांचें वचन ॥ ४ ॥
चिंतूनियां 'वैजयंती'- । नामें घेई इंद्रशक्ति ॥ ५ ॥
जणु जिव्हा अंतकाची । कर्ण फेंकी महाशक्ति ॥ ६ ॥
पाहूनि तें घटोत्कच । जाई पळूनि नभांत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शक्ति । सुटतां नाद घोर येती ॥ ८ ॥

३४९

भयाकुल अवघे प्राणी । येती किंकाळ्या गगनीं ॥ १ ॥
निवारूनि सकल माया । भेदी दैत्याच्या हृदया ॥ २ ॥
करूनि आक्रोश तो दैत्य । अंतीं सोडी इहलोक ॥ ३ ॥
गगनांतूनि कोसळला । प्रेतें बहुत नाश केला ॥ ४ ॥
छिन्न भिन्न अवयव । बघूनि हर्पले कौरव ॥ ५ ॥
नाग, मानुष, राक्षस । अस्त्रें तीव्र नानाविध ॥ ६ ॥

व्यर्थ जाहलीं तयाचीं । घोर वासवी ते शक्ति ॥ ७ ॥
दुर्योधनाच्या स्यंदनीं । कर्ण बैसला जाऊनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कोंदे- । गगन, वाद्यांच्या निनादें ॥ ९ ॥

अध्याय १८० वा ३५०

हिडिंबासुताचा ऐसा नाश होतां । पांडवांच्या चित्ता परम दुःख॥
दुःखाश्रु तयांच्या नयनांत येती । हर्षित श्रीपति परी तदा ॥ २ ॥
आलिंगूनि पार्था गर्जे सिंहासम । बांधूनि लगाम हर्षें डोले ॥ ३ ॥
हर्षभरें त्याचें हरपलें भान । देई आलिंगन पुनः पार्था ॥ ४ ॥
वारंवार टाळ्या वाजवी मुकुंद । करी सिंहनाद अत्यानंदें ॥ ५ ॥
पार्थ म्हणे देवा, अयोग्य हें कर्म । सैन्य शोकमग्न असतां देवा ॥
असामान्य तुझा आनंद हा वाटे । निमित्त तयाचें काय सांगें ॥ ७॥
नसेल तें गुह्य तरी सांगें कृष्णा । वाटे जनार्दना, अघटित हें ॥८॥
वासुदेव म्हणे बोलला श्रीहरि । लीलासूत्रधारी पुढती ऐका ॥ ९ ॥

३५१

कृष्ण म्हणे पार्था, आनंदनिमित्त । ऐकतांचि शांत होसी मनीं ॥१॥
कर्णाचि मी मृत मानीतसें अद्य । होता हा अजिंक्य वासवीनें ॥२॥
सहज कवच-कुंडलें तयाचीं । हरिलीं सुदैवचि वासवानें ॥ ३ ॥
अन्यथा अवध्य होता तो सकळां । विषहीन झाला क्रुद्ध नाग ॥ ४॥
शक्तिलाभें मानी मृतचि हा तुज । परी होई अद्य सामान्य हा ॥५॥
तथापिही पार्था, अजिंक्य इतरां । एक धनुर्धरा, तुजसी वध्य॥६॥
ब्राह्मणाभिमानी, तपस्वी, व्रतस्थ । सत्यवक्ता श्रेष्ठ वीर कर्ण ॥७॥
उद्यतशस्त्र तो अवध्यचि असे । संकटीं तयातें वधणें योग्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बोलला श्रीकृष्ण । उपाय योजून वधिले बहु ॥ ९ ॥

अध्याय १८१ वा ३५२

पार्थ म्हणे कैसें कोणा । वधिलेंसी उपायज्ञा ॥ १ ॥
कृष्ण म्हणे जरासंध । एकलव्य तो निषाद ॥ २ ॥
शिशुपाल परमद्वेष्टा । येते कौरवांच्या पक्षा ॥ ३ ॥
बक, हिडिंब, किर्मीर । वधिता झाला वृकोदर ॥ ४ ॥

सकल हे योगायोग । नाहीं घडले सहज ॥ ५ ॥
लोकहितार्थेचि पार्था । पातलों मी या भूलोका ॥ ६
अलायुध, घटोत्कच । वधिले मीचि या हितार्थ ॥ ७ ॥
ऐसें नच होतें जरी । वधितों मीचि या संगरीं ॥ ८ ॥
राक्षस हा ब्रह्मद्वेष्टा । वधिला महाधर्मलोप्ता ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । ऐका वदला भगवान ॥ ॥

३५३

करितील जे ॐ स्वधर्माचा लोप । मजसी ते नित्य वध्य पार्था ॥१॥
धर्मसंस्थापना, अव्यय प्रतिज्ञा । जाण हे अर्जुना, नित्य माझी ॥२॥
ब्रह्म, सत्य, दम, धर्म, शालीनता. । धैर्य, पवित्रता, ज्ञान, क्षमा, ॥
वसे तया ठाई माझा नित्य वास । शपथपूर्वक कथितों तुज ॥ ४ ॥
कर्णवधार्थही उपाय कथीन । सुयोधना भीम संहारील ॥ ५ ॥
पहा शत्रुसैन्यें आनंदित होती । संहार करिती द्रोण बहु ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पार्थासी श्रीकृष्ण । बोलला वचन ऐसें तदा ॥ ७ ॥

अध्याय १८२ वा

३५४

राव म्हणे सूता, वधिता जरी कर्ण । वासवी योजून पार्थाप्रति ॥१॥
तरी तत्काळचि लाभता विजय । आतां पराजय निश्चयेंसी ॥ २ ॥
श्वान-सूकरांच्या युद्धांत श्वपच । होई आनंदित तैसें झालें ॥ ३ ॥
सूत म्हणे राया, कृष्णाचि कारण । उपाय योजून कार्य साधी ॥४ ॥
कृष्ण मूळ, पार्थ स्कंध अन्य शाखा । संहार कृष्णाचा करीं कर्णा ॥
कथितांही ऐसें नित्य विस्मरण- । होई, ऐसे कृष्ण मार्ग योजी ॥६॥
पुशितां सात्यकि गोविंदासी तया । वदला यदुराया हेंचि नृपा ॥
बारंवार मोह पाडूनि कर्णासी । रक्षितों पार्थासी कृष्ण म्हणे । ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थास्तव कृष्ण । आपुलेही प्राण तुच्छ लेखी ॥ ९ ॥

अध्याय १८३ वा

३५५

राव म्हणे सूता, पुढती काय झालें । दैवचि कोपलें वाटे मज ॥१॥

---

ॐ धर्मबुडव्या.

सूत म्हणे धर्म बोलला भीमासी। आंवरीं सैन्यासी न सुचे मज ॥
बोलूनियां ऐसें कोसळे रथांत। सोडी दीर्घश्वास महा दुःखें ॥ ३ ॥
कृष्ण म्हणे धर्मा, सोडितां तूं धैर्य। सकलांचें शौर्य नष्ट होई ॥४॥
नेत्र पुसूनियां धर्म म्हणे कृष्णा। ब्रह्मघ्नचि जाणा कृत मी ॥५॥
वनांत आम्हांसी रक्षिलें बाळानें। वाहिलें प्रेमानें द्रौपदीसी ॥ ६ ॥
सहदेवासम जयावरी प्रेम। हाय तो सोडून गला आम्हां ॥ ७ ॥
लेखूनियां तुच्छ भीमार्जुनांप्रति। वधिलें बाळासी हाय कर्णें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शोकाकुल धर्म। म्हणे व्यर्थ प्राण बाळावीण ॥ ९ ॥

३५६

कृष्णा, काय करूं पार्थाच्या समक्ष। वधिलें बाळास वैकर्तनें ॥१॥
पार्थाच्या परोक्ष कोंडिलें बाळासी। अडवूनि आम्हांसी जयद्रथें ॥
उपायकथन केलें गुरुद्रोणें। चापहीन कर्णें केला बाळ ॥ ३ ॥
सोडूनि तयांसी वधिलें सैंधवा। न रुचे केशवा कृत्य मज ॥ ४ ॥
दुःखाचें हें मूळ द्रोण, वैकर्तन। तयांसी वधीन मीचि आतां ॥५॥
भीमसेन गेला द्रोण सैन्यावरी। जातों मी संगरीं याचि कार्या ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें। हांकी रथ क्रोधें धर्मराज ॥ ७ ॥

३५७

क्रोधावेशें धर्म रणांगणीं जातां। कृष्ण हांकी रथा मागोमाग ॥१॥
विवेकविहीन नृपाळ एकाकी। जातां प्रगटती व्यास मुनि ॥ २ ॥
सन्निध जाऊनि बोलले धर्मासी। न जाई एकाकी राया, ऐसा ॥३॥
घटोत्कचवधें जाहलें कल्याण। वांचला अर्जुन ध्यानीं आणीं ॥४॥
व्यर्थ ऐसा क्रोध नको करूं बापा। न टळे काळाचा नियम कोणा ॥
मृत्यु, मृत्युलोकीं न टळे कोणासी। विवेकें रणासी सिद्ध होई ॥
पंचमदिनीं तूं होसी सार्वभौम। स्वधर्मचिंतन नित्य करीं ॥ ७ ॥
भूतदया, तप, दान, क्षमा, सत्य। सेवीं धर्मा, नित्य कल्याणार्थ ॥
धर्म तेथें जय जाण हा निश्चय। कथूनि मुनिराय गुप्त होती ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कौतुक हरीचें। रक्षण भक्तांचें नित्य करी ॥ १० ॥

## द्रोणवधपर्व ७

अध्याय १८४ वा

३५८

सूत म्हणे राया, व्यासांच्या उपदेशें । सोडूनि कर्णातें धर्म गेला ॥
घटोत्कचवधें दुःखी युधिष्ठिर । आला होता घोर समरालागीं ॥२॥
महाघोर युद्ध करी भीमसेन । वदला तदा धर्म पार्षतासी ॥ ३ ॥
वीर धृष्टद्युम्ना, द्रोणांच्या वधार्थ । सहज-कवच-चाप तुजलागीं ॥
शत्रुतापना, तें निजकार्य साधीं । दौर्मुखी शिखंडी साह्य तुज ॥५॥
द्रुपद, विराट, सात्यकि, केकय । नकुल, सहदेव, प्रभद्रक ॥ ६ ॥
वीरहो, द्रोणांसी भिडा सकलही । धर्म आज्ञा देई सैनिकांसी ॥ ७॥
सकलही तदा करिती घोरयुद्ध । दुर्योधनादिक साह्य द्रोणां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे परस्पर योद्धे । संकुलयुद्धातें सिद्ध होती ॥ ९ ॥

३५९

उभय पक्षांचे सैनिक । तयावेळीं बहु श्रांत ॥ १ ॥
निद्रा नावरे तयांसी । डुलक्या येती मध्यरात्रीं ॥ २ ॥
कर्तव्य कीं भीड, लाज । जाणूनियां कोणी दक्ष ॥ ३ ॥
शस्त्रें फेंकूनियां कोणी । निद्रा घेती रणांगणीं ॥ ४ ॥
रथ, गज, अश्वांवरी । किती एकां निद्रा वरी ॥ ५ ॥
कोणी वधिती निद्रिस्थांसी । लढती कोणी स्वप्नामाजी ॥ ६ ॥
डोलताती जेंवी वृक्ष । कोणी काढिती प्रलाप ॥ ७ ॥
पाहूनियां ती दुरवस्था । दया येई मनीं पार्था ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । गर्जे रणांत उदार ॥ ९ ॥

३६०

श्रांत सैनिक हो, निद्रा घ्या सुखानें । पुढती उत्साहानें युद्ध करा ॥
चंद्रोदय होतां झुंजा एकमेकां । मानलें सैनिकां वचन बहु ॥ २ ॥
ज गजागीं पार्थ गर्जूनि सैन्यासी । म्हणे घ्या विश्रांति सैनिकहो ॥
दुर्योधन-कर्णा निवेदूनि सैन्य । पावलें विश्राम रणांगणीं ॥ ४ ॥
दयावंत बहु म्हणती अर्जुन । होईल कल्याण धर्मज्ञाचें ॥ ५ ॥

बोलतां बोलतां निद्रावश होती। क्षणांत घोरती अश्व, गज ॥ ६ ॥
निश्चेष्ट तें सैन्य चित्रचि भासलें। स्तब्ध शांत झालें रणक्षेत्र ॥ ७ ॥
श्वासोच्छ्वास मात्र होती तयास्थानीं। वंदी वीराग्रणी वासुदेव ॥८

३६१

कपोल जें युवतीचा। रम्य नाथ कुमुदांचा ॥ १ ॥
कनकवर्ण सिंह भासे। करी मंडित पूर्वेतें ॥ २ ॥
नववधूचें तें स्मित। कुमुदें तैंवी विकसित ॥ ३ ॥
आल्हादक रश्मिजाल। पसरी आपुलें विशाल ॥ ४ ॥
विश्व अवघेंचि उजळलें। तम तेजोमय झालें ॥ ५ ॥
येई सिंधूसी भरती। तैसी वीरांसी जागृति ॥ ६ ॥
वीर भिडले एकमेकां। उत्सुक ते परलोका ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे एक। मुहुर्तेचि होते शांत ॥ ८ ॥

अध्याय १८५ वा

३६२

दुर्योधन क्रोधें बोलला द्रोणासी। दया हे आम्हासी भोंवलीसे ॥
श्रमपरिहारें पुनः शौर्ययुक्त। वीर हे समस्त येती रणीं ॥ २ ॥
अस्त्रज्ञा, हे दया दाविता कासया। गुरो, शिष्यप्रिया, दुर्दैव हें ॥३॥
ऐकूनियां द्रोण म्हणती आतां क्रूर। होऊनि संहार करितों रणीं ॥
वदसील जें जें सूक्तासूक्त कर्म। तेंचि आचरीन दुर्योधना ॥ ५ ॥
अद्य पांचालांच्या संहार करीन। तरीच उतरीन कवच राया ॥ ६ ॥
शपथपूर्वक कथितों मी तुज। दुर्बल न पार्थ समजें परी ॥ ७ ॥
विक्रम तयाचे आठवीं बहुत। एकाकी संत्रस्त सकलां करी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थाची प्रशंसा। ऐकूनि नृपाचा भडका होई ॥ ९॥

३६३

दुर्योधन म्हणे कासयासी भाट। होतां पहा अद्य वधितों पार्था
मजसवें कर्ण शकुनि दुःशासन। लढूनि निष्प्राण करिती तया ॥
हांसूनियां द्रोण म्हणती हे प्रलाप। ऐकतसें नित्य दुर्योधना ॥ ३ ॥
प्रतिज्ञापालन करूनि ते अद्य। दाखवा रणांत पराक्रम ॥ ४ ॥

भोग भोगूनि तूं कृतार्थ या जनीं । जा आतां संग्रामीं प्राणपणें ॥५॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । वर्षिती शरांतें गुरुद्रोण ॥ ६॥

अध्याय १८६ वा ३६४

उरली सहा घटी रात्र । युद्ध झालें घनघोर ॥ १ ॥
पुढती अरुणोदय झाला । भानु येई उदयाला ॥ २ ॥
तदा वाहनें त्यागूनि । जप करिती कर जोडूनि ॥ ३ ॥
वीर सूर्यासी अभिमुख । सकल संध्याकर्मी रत ॥ ४ ॥
द्विधा द्रोण सैन्यें पाही । पार्थ अपसव्य जाई ॥ ५ ॥
गर्जूनियां वदे भीम । पार्था, सार्थ करीं जन्म ॥ ६ ॥
पार्थ ऐकूनि ते शब्द । जाई संहार करीत ॥ ७ ॥
इकडे अग्रभागीं द्रोण । पुढती आले अग्नीसम ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । पाहूनि त्यां भयाकुल ॥ ९ ॥

३६५

द्रुपद, विराट, द्रोणांवरी येती । द्रुपदपौत्र होती पुढती तीन ॥ १ ॥
क्षणार्धें तयांचा द्रोण घेती प्राण । द्रुपद गर्जून धांवे तदा ॥ २ ॥
द्रोण तयावेळीं जाती चवताळूनि । पाडियेलें रणीं द्रुपदासी ॥ ३ ॥
मागोमाग वीर विराट वधिला । पाहूनि खवळला धृष्टद्युम्न ॥ ४ ॥
क्रुद्ध होऊनियां बोलला प्रतिज्ञा । न वधीं मी द्रोणा अद्य जरी ॥५॥
क्षात्रतेज माझें तेंवी अग्निबल । होवो तें विफल तया पापें ॥ ६ ॥
गर्जूनियां ऐसें ताडितां द्रोणासी । द्रोण निवारिती तयालागीं ॥७॥
पाहूनि तें भीम धिक्कारी पार्षता । म्हणे व्यर्थ तुझा पराक्रम ॥ ८ ॥
पित्याचाही वध पाहसी तूं कैसा । पाहीं आतां माझा पराक्रम ॥
वासुदेव म्हणे भीम धृष्टद्युम्न । करिती घोर रण सूर्योदयीं ॥ १०॥

अध्याय १८७ वा ३६६

तप्तकांचन तो सहस्रकिरण । प्रकाशला जाण उदयाचलीं ॥ १ ॥
उपासना त्याची करूनियां वीर । रणांत झुंजार भिडले क्रोधें ॥२॥
पूर्वदिनीं रात्रंदिन झालें युद्ध । आतपें बेशुद्ध पडती बहु ॥ ३ ॥
क्षुधा-तृषा देई पीडा तयांप्राति । परी निनादती वाद्यें दिशा ॥ ४ ॥

खिंकाळती अश्व, चीत्कारती गज। शस्त्रास्त्रांसमेत वीरशब्द ॥५॥
प्रक्षालनशिलेवरी वस्त्राघात। नेजेनीं कीं येत तेंवी शब्द ॥ ६ ॥
ऐसी हातघाई होतसे त्या स्थानीं। खड्गनाद कानीं येती बहु ॥
प्रेतावरी प्रेतें कोसळती किती। श्वान-जंबुकांसी अत्यानंद ॥ ८ ॥
अंधार सर्वत्र जाहला धुळीनें। वासुदेव गानें भय पावे ॥ ९ ॥

३६७

गावल्गणि म्हणे नृपा। न कळे कोण कोठें होता ॥ १ ॥
द्रोणार्जुन नकुळादिक। सकळ वीर धूलिव्याप्त ॥ २ ॥
न दिसे कोणालागीं कोणीं। निज देह, दिशा, भूमि ॥ ३ ॥
माद्रेयांसी दुःशासन। अडवी भीमसेना कर्ण ॥ ४ ॥
द्रोणार्जुन झुंजताती। कोण वर्णील तयासी ॥ ५ ॥
मत्त गज कीं वृषभ। तेंवी लढती वीरश्रेष्ठ ॥ ६ ॥
कैसे वांचले कळेना। अकाळीं न मृत्यु कोणा ॥ ७ ॥
घोर संहार जाहला। भयाणता येई स्थळा ॥ ८ ॥
लढती नकुळ-दुर्योधन। गर्जे माद्रीचा नंदन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे अंतीं। वीर नकुळा वाखाणिती ॥ १० ॥

अध्याय १८८ वा

३६८

सहदेवावरी धांवे दुःशासन। सारथी मरून पडला परी ॥ १ ॥
स्वयेंचि लगाम घेऊनियां दुष्ट। सहदेवा कष्ट देई रणीं ॥ २ ॥
सहदेव शौर्यें ताडितां तयासी। दुःशासना रक्षी वैकर्तन ॥ ३ ॥
पाहोनि तें भीम धांवे कर्णावरी। झुंजले संगरीं वीर क्रोधें ॥ ४ ॥
अंतीं भीमसेन जाहला विरथ। नकुळाचा रथ गांठी वेगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे द्रोणार्जुन युद्ध। होऊनियां सिद्ध ऐका आतां ॥ ६ ॥

३६९

महावीर गुरुशिष्य। एकाहूनि एक श्रेष्ठ ॥ १ ॥

१ पानवठ्यावर.

चतुर शस्त्रास्त्रनिष्णात । लढले युद्ध अलौकिक ॥ २ ॥
देवादिकही संग्राम । पाहूनि तो म्हणती धन्य ॥ ३ ॥
वैर विसरले वीर । झाले प्रेक्षक झुंजार ॥ ४ ॥
अस्त्रामागें अस्त्रें किती । तयास्थानीं प्रगट होती ॥ ५ ॥
द्रोण विद्येचा सागर । अस्त्रांमागें येई अस्त्र ॥ ६ ॥
सिंधु आटवील ऐसी । विद्या भासे अर्जुनाची ॥ ७ ॥
द्रोण संतुष्ट अंतरीं । म्हणती धन्य धनुर्धारी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे युद्ध । जगामाजी तें प्रसिद्ध ॥ ९ ॥

३७०

देव गंधर्व तैं ऋषि मुनि, सिद्ध । पातले नभांत यक्षादिक ॥ १ ॥
दशदिशा अस्त्रें पेटतीसें वाटे । जाहलें न ऐसें युद्ध कदा ॥ २ ॥
मानव, राक्षस, देव, गंधर्वही । लढती न पाहीं कदा ऐसे ॥ ३ ॥
सर्वश्रेष्ठ ब्राह्मयुद्ध हें अपूर्व । गर्जताती देव ऐसें रणीं ॥ ४ ॥
रुद्रचि रुद्रासी झुंजे ऐसें वाटे । उपमा कोणातें न सुचे अन्य ॥ ५ ॥
सर्वज्ञ आचार्य, ज्ञानी, वळी पार्थ । श्रीकृष्ण सारथ्य करी त्याचें ॥
दिव्य चाप, दिव्य ध्वज तूणीरही । ध्वजावरी राही हनुमान ॥ ७ ॥
बुद्धिमंत युवा वैशिष्ट्य पार्थाचें । शौर्य आचार्यांचें अलौकिक ॥८॥
द्रोणाचार्य अंतीं ब्रह्मास्त्र योजिती । कंपित तैं क्षिति झंझावातें ॥९॥
निवारितां तेंही विक्रमी पार्थानें । झुंजताती सैन्यें महाशौर्यें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे वर्षाव शरांचा । संग्राम वीरांचा न दिसे तेणें ॥११॥

अध्याय १८९ वा ३७१

धृष्टद्युम्नावरी तदा दुःशासन । धांवूनियां रण करी घोर ॥ १ ॥
नकुळ तयासी निवारी शौर्यानें । लढती धर्मानें ऐसे वीर ॥ २ ॥
कर्णाकार तैंवी नालीक, बस्तिक । घोर ते सायक योजितीना ॥३॥
द्रोणांवरी तदा धांवे धृष्टद्युम्न । क्रोधें दुर्योधन पुढती होई ॥४॥
सात्यकि तयासी अडवी शौर्यानें । दुर्योधन प्रेमें वदला त्यासी ॥
मित्रा, बालपणीं खेळलों सुखानें । लढतों क्रोधानें अद्य रणीं ॥ ६ ॥
निर्व्याज तें प्रेम कोठें रे सात्वता । प्रवर्तलों युद्धा आजि कैंवी ॥७॥

नव्हे हा आश्रम बोलला सात्यकि । सज्ज हो युद्धासी त्वरित आतां
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । ताडिती शरांतें एकमेक ॥ ९ ॥

३७२

युद्ध झालें घनघोर । प्रखर सात्यकीचा मार ॥ १ ॥
असह्य तो दुर्योधना । कर्ण धांवला तें रणा ॥ २ ॥
पाहूनियां भीमसेन । पुढती ठाकला गर्जून ॥ ३ ॥
कर्ण-भीमांचें तें युद्ध । वाहूं लागलें अशुद्ध ॥ ४ ॥
गर्जूनियां वदला धर्म । मत्स्य, पांचाळांसी जाण ॥ ५ ॥
काय वीरहो, पाहतां । क्षात्रधर्मासी विसरतां ॥ ६ ॥
प्राणपणें करा युद्ध । गांठा विजय अथवा स्वर्ग ॥ ७ ॥
नकुळ, सहदेव, भीम । वदले पार्थासी गर्जून ॥ ८ ॥
अडवीं वीरा, कौरवांसी । साह्य होईं पार्षतासी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दिन । महा दारुण पंचम ॥ १० ॥

अध्याय १९० वा

३७३

सक्रोध तो इंद्र दानवसंहार । करी तैंवी घोर द्रोणकर्म ॥ १ ॥
पांचाल, सृंजयां वधिताती क्रोधें । ग्रीष्मीं वन वेगें दग्ध जेंवी ॥ २॥
कृष्ण म्हणे द्रोण अजिंक्य या जनीं । असतां शस्त्रपाणी धनुर्धरा ॥
शस्त्रहीन गुरु होतां संगरांत । वध्य, श्रम व्यर्थ अन्यथा हे ॥ ४ ॥
वधार्थ तयाच्या असत्यचि धर्म । मानूनियां प्राण संरक्षावे ॥ ५ ॥
'अश्वत्थामा हत' ऐसें कथा वृत्त । तरीच निश्चित यश लाभे ॥६॥
कृष्णाचें वचन पार्थासी अमान्य । दुःखें अनुमोदन धर्म देई ॥ ७ ॥
इंद्रवर्म्याचा तें 'अश्वत्थामा' गज । करूनि गदाघात वधिला भीमें ॥
गर्जे भीमसेन अश्वत्थामा मृत । द्रोणांच्या सन्निध जाऊनियां ॥९॥
वासुदेव म्हणे शंकाकुल द्रोण । महाघोर रण करिती तदा ॥ १० ॥

३७४

नसतां प्रतियोद्धा वीर । रणीं योजिती ब्रह्मास्त्र ॥ १ ॥
वीर सहस्र ते रथी । पंचशत मत्स्यांप्रति ॥ २ ॥
सहा सहस्र सृंजयवीर । दशसहस्र ते कुंजर ॥ ३ ॥

संहारिले महा क्रोधें । ' वसुदान ' शिरच्छेदें ॥ ४ ॥
ऐसा अनर्थ मांडिला । लवही विवेक नुरला ॥ ५ ॥
तदा विश्वामित्रादिक । मुनि भेटले द्रोणांस ॥ ६ ॥
म्हणती मुनिराया, ऐसा । अधर्म हा करिसी कैसा ॥ ७ ॥
शोभेनाचि क्रूरकर्म । तुज धर्मज्ञा, हें जाण ॥ ८ ॥
आला अंतकाल तुझा । शस्त्रत्यागें जाई स्वर्गा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे द्रोण । स्मरती भीमाचें वचन ॥ १० ॥

३७५

मुनीचा तो बोध भीमाचें वचन । पुढती धृष्टद्युम्न अवलोकिती ॥१॥
साशंकित चित्तें भांबावूनि जाती । म्हणती धर्मा, कथीं सत्य वार्ता
भयग्रस्त धर्मा बोलला श्रीकृष्ण । धर्मा, निजसैन्य वांचवीं हें ॥ ३ ॥
संकटांत ऐशा असत्याचि श्रेष्ठ । प्राणरक्षणार्थे स्वीकार्य तें ॥ ४ ॥
भीम म्हणे धर्मा, कथिलें गुरूसी । निवेदन तूंचि करीं आतां ॥ ५ ॥
योगायोगें होई संभ्रम धर्मासी । वदला जें इच्छी कृष्ण तेंचि ॥ ६ ॥
' कुंजर तो मृत अश्वत्थामा ' ऐसें । निवेदी द्रोणातें धर्मराज ॥७॥
कुंजर हा शब्द अव्यक्त बोलूनि । वदला गर्जूनि पुढती धर्म ॥ ८ ॥
तत्काळ धर्माचा अधरस्यंदन[1] । स्पर्शला येऊन भूमीलागीं ॥ ९ ॥
ऐकूनि ते शब्द दुःखाकुल द्रोण । उत्साहविहीन उद्वेगानें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे धृष्टद्युम्नाप्रति । पाहूनियां शक्तिहीन गुरु ॥ ११ ॥

अध्याय १९१ वा

३७६

उद्विग्न शोकार्त व्यग्रचित्त द्रोण । पाही धृष्टद्युम्न तयावेळीं ॥ १ ॥
मेघगर्जना तैं करूनि धांवला । चापासी योजिला घोर बाण ॥ २ ॥
शेवटची घटी वाटली द्रोणासी । पाहूनि बाणासी सूर्यासम ॥ ३ ॥
निवारितां अस्त्रें न होती प्रगट । अल्पचि रथांत बाण आतां ॥ ४ ॥
चार दिन एक रात्र युद्ध झालें । प्रहर लोटले अद्य तीन ॥ ५ ॥
पुत्रशोकव्याप्त अस्त्रहीन द्रोण । ऋषींचे वचन आठवे त्यां ॥ ६ ॥
तथापि अंगिरादत्त घेती चाप । सोडिती सायक ब्रह्मदंड ॥ ७ ॥

१ नेहमीं अधांतरीं राहणारा रथ.

घायाळ करूनि पार्षताचा बाण । केला छिन्नभिन्न शतखंड ॥ ८ ॥
ध्वज, चाप, सूत, तोडिले क्षणांत । धृष्टद्युम्न विद्ध हृदयीं करी ।
वासुदेव म्हणे स्यंदनीं स्यंदन । भिडला जाऊन पार्षताचा ॥ १० ॥

३७७

महावीर द्रोण करिती विक्रम । होई चापहीन द्रुपदपुत्र ॥ १ ॥
उचलितां गदा छेदिली तत्काळ । ढाल खड्गधर वीर धांवे ॥ २ ॥
पार्षताचे अश्व होती गतप्राण । करूनि उड्डाण पुढती गेला ॥ ३ ॥
भ्रांत, उद्भ्रांतादि त्रयोदशविध । करी खड्गयुद्ध अलौकिक ॥ ४ ॥
छेदुनियां खड्ग वैतस्तिक बाण । योजिताती द्रोण प्राणघाती ॥५॥
परी सात्यकीनें छेदिला तो बाण । वांचविले प्राण पार्षताचे ॥ ६ ॥
साधु साधु ऐसा होई शब्द रणीं । पार्थ तें ऐकूनि संतोषला ॥७॥
वासुदेव म्हणे विक्रमी सात्वत । घेई धन्यवाद तयावेळीं ॥ ८ ॥

अध्याय १९२ वा

३७८

दुर्योधन, कर्ण, तैसी कृपाचार्य । सात्यकीचें धैर्य बघूनि क्रुद्ध ॥ १ ॥
सात्वतासी भीम, माद्रेय रक्षिती । वीर तैं झुंजती महाशौर्यें ॥ २ ॥
सकळांचीं अस्त्रें निवारी सात्यकि । राशीवरी राशी पडती प्रेतें ॥३॥
प्रोत्साहन देई धर्मराज वीरां । म्हणे साह्य करा पार्षतासी ॥ ४ ॥
पाहूनि तें द्रोण धांव घेती वेगें । धरित्री तैं कांपे सुटला वायु ॥ ५ ॥
सूर्यापासूनि तैं तुटली दिव्य उल्का । महद्भय लोकां सुचवी रणीं ॥
भारद्वाजअस्त्रें तदा दग्ध होती । दुःखाश्रु ढाळिती आर्त अश्व ॥७॥
वामबाहु, नेत्र स्फुरती द्रोणांचे । घोर संहारातें आरंभिती ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्षत विरथ । भीमाच्या रथांत बैसे तदा ॥ ९ ॥

३७९

भीम म्हणे धृष्टद्युम्ना । वीरा, सिद्ध हो संग्रामा ॥ १ ॥
जन्मलासी याचि कार्या । वीरा, आतां करीं त्वरा ॥ २ ॥
ऐकूनियां तें पार्षत । सोडी अस्त्रामागें अस्त्र ॥ ३ ॥
ब्रह्मास्त्रही निवारूनि । टाकी द्रोणांसी झांकूनि ॥ ४ ॥
परी भग्न होतां चाप । धृष्टद्युम्न त्रिकलगात्र ॥ ५ ॥

पाहूनियां भीमसेन । बोले द्रोणांसी गर्जून ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐका । भीमसेनाची ते वाचा ॥ ७ ॥

३८०

द्रोणांच्या समीप भिडवी स्यंदन । बोलला वचन भीम धैर्यें ॥ १ ॥
निजकर्मावरी असंतुष्ट विप्र । लढती तेणें वीर नष्ट होती ॥ २ ॥
श्रेष्ठधर्म जनीं बोलती अहिंसा । आधार विप्रांचा अहिंसेसी ॥ ३ ॥
ब्रह्मविद्वरिष्ठ असूनियां द्रोणां । काय मूढकर्मा आचारितां ॥ ४ ॥
पुत्रदारेच्छेनें चांडालाचें कर्म । एक्यास्तव जन वधितां बहु ॥ ५ ॥
स्वकर्मस्थ वीरां वधी विकर्मस्थ । लाजही चित्तास स्पर्शेना कीं ॥
जयास्तव ऐसें करितां घोर कर्म । पुत्र तो मरून पडला रणीं ॥ ७ ॥
धर्माचें वचन कदा न तें मिथ्या । त्यागिती तें चापा द्रोणाचार्य ॥
वासुदेव म्हणे काळाच्या आधीन । होऊनियां द्रोण वदती ऐका ॥

३८१

महाधनुर्धरा कर्णा । कृपा, राया, दुर्योधना ॥ १ ॥
करा दारुण संग्राम । वचन नित्य हें स्मरून ॥ २ ॥
होवो पांडवांपासूनि । तुमचें रक्षण या जनीं ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां दुःखें । ठेवियेलीं सकल शस्त्रें ॥ ४ ॥
पुत्रा, पुत्रा, हा आक्रोश । करूनि मांडियेला शोक ॥ ५ ॥
अंतीं जाहले ध्यानस्थ । स्वीकारिला योगमार्ग ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वस्थ । द्रोण बैसले रथांत ॥ ७ ॥

३८२

खड्गधारी वीर धांवे धृष्टद्युम्न । समय जाणून द्रोणांवरी ॥ १ ॥
तदा ते ध्यानस्थ ब्रह्मरूपीं लीन । ब्रह्मरंध्रीं प्राण आकर्षिती ॥ २ ॥
धृष्टद्युम्नें शिखा धरितां धिक्कार । करिताती वीर सकल त्याचा ॥
पार्थ म्हणे आणीं जिवंत धरूनि । वधूं नको रणीं गुरूलागीं ॥ ४ ॥
परी धृष्टद्युम्नें केलें घोरकर्म । मस्तक छेदून धरिलें करीं ॥ ५ ॥
अग्रभागीं अंतीं झुगारिलें तेणें । माखला रक्तानें पळती वीर ॥ ६ ॥
सूर्यासम सूर्यामाजी दिव्य ज्योति । प्रवेशे ज्ञात्यांसी नवल दिसे ॥

पलायन तदा करिती कौरव । हर्षती पांडव रणांगणीं ॥ ८ ॥
धृष्टद्युम्न, भीम आनंदें नाचती । प्रेमें अलिंगिती परस्परां ॥ ९ ॥
कर्ण-दुर्योधनवधें हर्ष ऐसा । होईल पार्षता, भीम बोले ॥ १० ॥
वासुदेव म्हणे भीम ठोकी दंड । जाहला प्रचंड नाद रणीं ॥ ११ ॥

## नारायणास्त्रमोक्षपर्व ८

अध्याय १९३ वा ३८३

ढांसळला मेरु, आटला सागर । कोसळला सूर्य गगनांतूनि ॥ १ ॥
निराधार वीर प्रकंपित झाले । अश्रुपूर आले नयनांतूनि ॥ २ ॥
कर्ण, शल्य, दुर्योधनही धांवती । त्राता न तयांसी कोणी आतां ॥
अन्यस्थळीं वीर अश्वत्थामा झुंजे । अवलोकी वीरांचें पलायन ॥
पाहूनि तयासी म्हणे कां रे ऐसी । दैना सैनिकांची अपूर्व हे ॥ ॥५॥
ऐकूनि ते शब्द राव सद्गदित । निवेदिती वृत्त कृपाचार्य ॥ ६ ॥
आकर्ण पलित वय चार शत । वधिला रणांत वृद्ध वीर ॥ ७ ॥
मिथ्याभाषणादि ऐकूनि सकळ । खवळला वीर अश्वत्थामा ॥ ८ ॥
हातावरी हात चोळी, दंत-ओष्ठ- । चावूनियां, दीर्घश्वास सोडी ॥
वासुदेव म्हणे आरक्त नयन । भासे यमासम अश्वत्थामा ॥ १० ॥

अध्याय १९४ वा ३८४

राव म्हणे सूता, ऐकूनि तें वृत्त । वदला द्रोणसुत काय सांगें ॥ १॥
भार्गवाची विद्या पुत्रासी यथार्थ । पढविली सांग गुरुद्रोणें ॥ २ ॥
रामासम ज्याचें चापल्य नैपुण्य । शौर्य इंद्रासम बल श्रेष्ठ ॥ ३ ॥
पर्वतासमान निश्चलता ज्याची । जेंवी बृहस्पति बुद्धिमंत ॥ ४ ॥
सिंधूचें गांभीर्य, अग्नीसम तेज । सर्पासम क्रोध श्रेष्ठ रथी ॥ ५ ॥
व्यथित न कदा वीर जो रणांत । पढला वेदशास्त्र धनुर्विद्या ॥ ६ ॥
अक्षोभ्यचि जेंवी दाशरथी राम । वृत्तांत ऐकून वदला कांहीं ॥७ ॥
द्रोणांचा तो मृत्यु जेंवी धृष्टद्युम्न । अश्वत्थामा यम पार्षताचा ॥८॥
क्रूर अमानुष ऐकूनि तें वृत्त । बोले द्रोणसुत काय सांगें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे संजय रायासी । वृत्तांत निवेदी तोचि ऐका ॥ १० ॥

अध्याय १९५ वा ३८५

छद्म पापयुक्त वध तो ऐकूनि । बाष्पपूर्ण द्रौणि क्रुद्ध होई ॥ १ ॥
प्रलयकालीन यमासम दीप्त । जाहला आरक्त सकल देह ॥ २ ॥
वारंवार नेत्र पुशी दीर्घश्वास । सोडीत, रायास वदला क्रोधें ॥३॥
शस्त्रहीन पिता वधिला नीचांनीं । नाचवी गगनीं धर्मध्वज ॥ ४ ॥
अनिश्चित जय पराजय रणीं । न्याय्यवधें कोणी न करी दुःख ॥५॥
पुण्यलोक लाभ निश्चयें पित्यासी । परी निःशस्त्राची धरिली शिखा
असतां मी जिवंत ऐसे पितृक्लेश । विदीर्ण काळीज करिती माझें ॥
साहूनि हें दुःख वैसेन मी स्वस्थ । तरी कोण सौख्य इच्छी पिता ॥
काम-क्रोधें बाल्यें अविचार अज्ञानें । वागतां अधर्में तेंचि फल ॥९॥
वासुदेव म्हणे बोले अश्वत्थामा । दुष्ट घोरकर्मा फळ भोगी ॥ १० ॥

३८६

लावूनियां पुण्य पणा । करितों राया, हे प्रतिज्ञा ॥ १ ॥
करूनियां कांहींतरी । वधीन दुष्टासी संगरीं ॥ २ ॥
सर्व पांचालवधार्थ । झटेन मी अहर्निश ॥ ३ ॥
धर्मध्वाजि त्या धर्मांचें । रक्त अर्पीन भूमीतें ॥ ४ ॥
वाढलों मी गिरीसम । व्यर्थ शस्त्रास्त्रें हे प्राण ॥ ५ ॥
हाय पित्याचे ते क्लेश । सहन होतील कोणास ॥ ६ ॥
असो आतां पितृऋण । निश्चयेंसी हें फेडीन ॥ ७ ॥
व्यर्थ बोलूं नये परी । पहा विक्रम संगरीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । करिन म्हणे कर्म घोर ॥ ९ ॥

३८७

पार्थाविण अन्य वीर मजसम । त्रिलोकीं न अन्य दुर्योधना ॥ १ ॥
सूर्यासम आजी तळपेन रणीं । अस्त्रबळ रणीं पहा माझें ॥ २ ॥
नारायण झाला प्रसन्न पित्यासी । अर्पिलें तयासी घोर अस्त्र ॥ ३॥
परी कचित्काळीं करावी योजना । बोलूनि वचना देव गेला ॥ ४ ॥
कथिलें मजसी तळपसी रणीं । अस्त्र हें योजूनि शत्रु वधीं ॥ ५ ॥
तेंचि अस्त्र आजी योजूनि रणांत । करीन मी घात पांचाळांचा ॥६॥

ऐकूनियां वाद्यनाद तयास्थानीं । सज्जले गर्जूनि वीर रणा ॥ ७ ॥
पांडव एकत्र होऊनि चिंतिती । प्रगटलें नभीं दिव्य अस्त्र ॥ ८
वासुदेव म्हणे स्पर्शूनि उदक । चिंतितांचि अस्त्र व्यक्त होई ॥ ९ ॥

अध्याय १९६ वा ३८८

निरभ्र आकाशीं सुटे झंझावात । गर्जताती मेघ वर्षूनियां ॥ १ ॥
खवळला सिंधु कांपली धरणी । लांछित तरणी होत असे ॥ २ ॥
दुश्चिन्हें जाहलीं पांडवसैन्यांत । बोले धर्मराज पार्थाप्रति ॥ ३ ॥
वीरा, अस्ताव्यस्त कौरव पळाले । भान न राहिलें तयांलागीं ॥४॥
परी घोर नाद कोठूनि हा येई । वाटे इंद्र होई साह्य तयां ॥ ५ ॥
रोमांचित होती महानादें वीर । कोण रणधीर अडवी सैन्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । कथीतसे पार्थ धर्मालागीं ॥ ७ ॥

३८९

राया, मत्त गजासम महावीर । व्याघ्रासम घोर अश्वत्थामा ॥ १ ॥
फोडूनि किंकाळी कांपविली धरा । जन्म जया वीरा नवलकारी ॥
आकशवाणीनें अश्वत्थामा नाम । जयालागीं जाण तो हा वीर ॥३॥
अनाथासमान ओढूनियां केश । मारिला रणांत गुरु माझा ॥ ४ ॥
अभिमानी त्याचा पुत्र हा ठाकला । निवारी तयाला ऐसा कोण ॥
राज्यलोभें राया, मिथ्या बोललासी । तेणें अपकीर्ति जगामाजी ॥
वालीवधें राम, तैसाचि तूं धर्मा । करूनियां कर्मा निंद्य होसी ॥७॥
संकटीं विश्वासें पाहिलें आम्हांसी । उपेक्षा गुरूची घडली परी ॥
राज्यलोभें ऐसा घडला अन्याय । आतां हाय हाय नरक आम्हां ॥
वासुदेव म्हणे कनवाळु गुरूतें । स्मरूनियां दुःखें द्रवला पार्थ ॥

अध्याय १९७ वा ३९०

पार्थाच्या वचनें वीर स्वस्थ होती । भीमसेन उक्ति वदला ऐका ॥
धर्मशील विप्रासम तूं अर्जुना । बोलसी वचना ऐशावेळीं ॥ २ ॥
सामर्थ्यवंता, तूं कुळाचें भूषण । कोण उल्लंघन करिल तुझें ॥ ३ ॥

परी अधर्माची मानूनियां भीति । सांप्रत बोलसी ऐशा परी ॥ ४ ॥
धन्य धन्य वीरा, वर्षत्रयोदश । भोगूनियां क्लेश वदसी हेंचि ॥ ५ ॥
अन्याय वैऱ्यांचे विसरसी अद्य । आठवीं ते क्लेश सकल बापा ॥६॥
संकटीं ताडिसी कां हे शब्दशर । व्रणावरी क्षार सिंचिसी कां ॥७॥
धार्मिका, कां ऐसा करिसी अधर्म । मर्मविदारण करूनि व्यर्थ ॥८ ॥
वासुदेव म्हणे भीमसेन पार्था । म्हणे कैंवी लज्जा न शिवे तुज ॥९॥

३९१

पाहूनि आमुचें दुरापास्त कर्म । प्रशंसा त्यागून निंदिसी कां ॥ १ ॥
आत्मनिंदा कां रे करितोसी मूढा । सोडूनि अच्युता स्तविसी अन्या
विदारीन धरा पर्वतांचें चूर्ण । क्षणार्धे करीन गदाघातें ॥ ३ ॥
उत्पाटीन महावृक्षही सामर्थ्यें । देव-दानवांतें संहारीन ॥ ४ ॥
ऐशा मज पार्था, जाणूनि बंधूतें । भय कां विश्वाचें धरिसी मनीं ॥
अथवा बंधूसवें बैस आतां स्वस्थ । एकाकी वीरांस जिंकीन मी ॥
वासुदेव म्हणे गर्जे भीमसेन । तदा धृष्टद्युम्न वदला ऐका ॥ ७ ॥

३९२

धृष्टद्युम्न म्हणे षट्कर्मनिरत । विप्र जनीं वंद्य सर्वकाल ॥ १ ॥
घोरकर्मा द्रोण राक्षससमान । संहार दारुण करिताझाला ॥ २ ॥
वधितां त्या दुष्टा मज कां निंदिसी । भीष्मवधनीति वद्य काय ॥३॥
माहुतासी गज स्वगात्रसोपान । करी तैंवी मान तुजसी देतों ॥४॥
आप्तसंबंधचि आणूनियां मनीं । क्षमा तुजसी मी करितों पार्था ॥५॥
विख्यात आमुचें वैर जगामाजी । ज्ञात पांडवांसी असेना कीं ॥६॥
बंधुवधें माझ्या क्रोध न अन्यासी । शासन द्रोणासी तेंचि योग्य ॥
दोष न धर्मासी तैंवी मजप्रति । सज्ज हो युद्धासी विजय तुम्हां ॥
वासुदेव म्हणे बोलला पार्षत । होऊं नको क्रुद्ध धनुर्धरा ॥ ९ ॥

अध्याय १९८ वा

३९३

तयावेळीं वीर सकलही स्तब्ध । पार्थ वक्र नेत्र धिक् धिक् म्हणे ॥
सात्यकि क्रोधानें म्हणे हे निर्लज्जा । वदसी पातकया थोरांमाजीं ॥

निंद्या, निंदितोसी पार्थ-द्रोणांप्रति । पांचाल पातकी सिद्धचि हें ॥
पांचालचि यम भीष्म-द्रोणांप्रति । ब्रह्मघ्ना, निंदिती सकल तुज ॥
दर्शनेंचि पाप घडे हें मानूनि । सूर्यावलोकनीं रमती लोक ॥ ५ ॥
पांचालाधमाचें फोडितों मस्तक । ताडूनि गदेस याचि क्षणीं ॥६ ॥
वासुदेव म्हणे क्रोधाकुल वीर । बोलला कठोर शब्द ऐसा ॥ ७ ॥

३९४

हांसूनि पार्षत म्हणे सात्वतासी । क्षमा पातक्यासी करणें पाप ॥
क्षमितां तयासी मानी तो विजय । कुत्सित हृदय नीचा तव ॥ २ ॥
भूरिश्रवा छिन्नहस्त त्वां वधिला । लाविसी पराला दोष कैंवी ॥३॥
मूढा, सर्वकाल धर्म नसे शक्य । आठवावें दुष्ट कर्म त्याचें ॥ ४ ॥
भीष्म-भूरिश्रवा-वधही तैसाचि । धर्माची ते गति सूक्ष्म जाणें ॥५॥
ऐकूनि ते शब्द धांवला सात्यकि । आंवरी तयासी भीमसेन ॥ ६ ॥
सहदेव करी सांत्वन तयांचें । सोडीं भीमा, वदे धृष्टद्युम्न ॥ ७ ॥
धर्मराज, कृष्ण धांवूनियां अंतीं । प्रयत्नें वारिती वीरांलागीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पुढती रणांत । जाती वीरश्रेष्ठ शत्रूवरी ॥ ९ ॥

अध्याय १९९ वा ३९५

सूत म्हणे द्रोणपुत्र तो कृतान्त । प्रेतांचा पर्वत पाडी क्षणीं ॥ १ ॥
तंत्र वृक्ष ध्वज, शस्त्रें तीं शिखरें । शिला, गजशिरें विराजती ॥२॥
अश्व किंपुरुष, भग्नधनू लता । गृध्र, यक्ष, भूतां महालाभ ॥ ३ ॥
गर्जूनियां विप्र प्रतिज्ञा उच्चारी । धृष्टद्युम्नावरी झेंप घेई ॥ ४ ॥
रणवाद्यघोषें निनादे गगन । अपूर्व संग्राम तयावेळीं ॥ ५ ॥
नारायणअस्त्रें गगनीं लोहगोल । नक्षत्रमंडळ तळपे जैंवी ॥ ६ ॥
चक्र, गदा, शर असंख्य शतघ्नी । प्रगटल्या रणीं भयप्रद ॥ ७ ॥
पांडवसैन्य तें वन, दग्ध होई । पलायन होई सकलां प्रिय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि कल्पांत । बोले धर्मराज वीरांप्रति ॥ ९ ॥

३९६

पळा, पळा, धृष्टद्युम्ना । शिनिश्रेष्ठा, रक्षा प्राणा ॥ १ ॥
आतां न करावें युद्ध । ऐसें माझें स्पष्ट मत ॥ २ ॥

आलों सागर लंघून । गोष्पदांत जाती प्राण ॥ ३ ॥
प्राण जातां सकलांचे । हेतु पुरतील पार्थाचे ॥ ४ ॥
वधिलें आम्हीं आचार्यांसी । ऐसी असे त्याची मति ॥ ५ ॥
गुरु कल्याणार्थ दक्ष । केला अभिमन्यूचा घात ॥ ६ ॥
सभेमाजी पांचाळीसी । पुत्रासवें जो उपेक्षी ॥ ७ ॥
पार्थवधालागीं, नृपा । दिधलें अभेद्यकवचा ॥ ८ ॥
वनवासासी अनुमोदन । दिधलें असूनि अधर्म ॥ ९ ॥
थोर प्रेम ज्याचें ऐसें । सोडूं त्यास्तव प्राणांतें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । बोले शब्द तें ऐकून ॥ ११ ॥

३९७

वीरहो, सकळ ऐकावें वचन । त्यागूनि वाहन उतरा खालीं ॥ १ ॥
निःशस्त्रांसी अस्त्र कदा न संहारी । लढतां प्राणहारी देवादिकां ॥
ऐकूनियां भीम बोलला गर्जूनि । एकाकी मी रणीं लढतों पहा ॥३॥
एकमेव योद्धा होईन रणांत । ठेऊं नका शस्त्र युद्ध करा ॥ ४ ॥
पार्थ म्हणे भीमा, धेनु अथवा विप्र । नारायणअस्त्र पुढती येतां- ॥
न उचलीं चाप हेंचि माझें व्रत । एकलाचि युद्ध भीम करी ॥ ६ ॥
जैसें जैसें भीम करी घोरयुद्ध । तैसें वृद्धिंगत अस्त्र होई ॥ ७ ॥
पाहूनि सकळ निःशस्त्र जाहले । शस्त्र तें पातलें भीमावरी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे होई हाहाःकार । परी वृकोदर न हटे मागें ॥ ९ ॥

अध्याय २०० वा ३९८

ज्वालामग्न भीम पाहूनि अर्जुन । योजूनि वारुणअस्त्र धांवे ॥ १ ॥
द्रोणपुत्राविण कोणी न रणांत । वीर हतबुद्ध सकल होती ॥ २ ॥
ज्वालामय अस्त्रामाजी कृष्णार्जुन । स्वतेजें घुसून वदती भीमा ॥३॥
त्यागूनि स्यंदन होई वा, निःशस्त्र । उपाय साचार हाचि असे ॥
न ऐकतां कृष्ण ओढी तयालागीं । येतां तो भूभागीं भासे सर्प ॥५॥
निःशस्त्र तयासी करितां, अस्त्र शांत । जाहलें रणांत आश्चर्य हें ॥
वासुदेव म्हणे अस्त्र शांत होतां । येई प्रसन्नता सकल वीरां ॥ ७ ॥

३९९

पांडवसैन्याची गर्जना ऐकून । बोले दुर्योधन द्रोणपुत्रा ॥ १ ॥
पुनरपि योजीं अस्त्र हें दारुण । क्षणार्धें घे प्राण पांडवांचे ॥ २ ॥
अश्वत्थामा म्हणे वीर पराभूत । असूनि जिवंत मृतासम ॥ ३ ॥
राया, नारायणअस्त्र हें अंतिम । एकदांचि जाण योजिती या ॥४ ॥
राव म्हणे वीरा, योजीं अन्य अस्त्र । अस्त्रांचा सागर तूंचि लोकीं॥
ऐकूनि तें द्रोणपुत्र धांव घेई । दारुणचि होई युद्ध तदा ॥ ६ ॥
गर्जुनियां तदा वीर धृष्टद्युम्न । अस्त्रनिवारण करी शौर्यें ॥ ७ ॥
परी अंतीं होई रणीं तो विरथ । सात्यकि साह्यार्थ पुढती येई ॥८॥
वासुदेव म्हणे अश्वत्थामा वीर । रणांत घायाळ होई बहु ॥ ९ ॥

४००

द्रोणपुत्र रणीं संत्रस्त जाहला । न सुचे तयाला मार्ग कांहीं ॥ १ ॥
तदा दुर्योधन, कृतवर्मा, कर्ण । येती दुःशासन, वृषकेतु ॥ २ ॥
सात्यकि तयांसी काळासम लढे । विरथ वीरांतें करी शौर्यें ॥ ३ ॥
सावध होऊनि अश्वत्थामा येतां । मार्ग त्या पूर्वीचा दावी शैनि ॥
विक्रम पाहूनि ऐसा सात्यकीचा । हर्षें पांडवांचा शंखनाद ॥ ५ ॥
सहस्रावधि ते वधी वीर, गज । धांवे द्रोणपुत्र क्रोधावेशें ॥ ६ ॥
गर्जूनियां सोडी महाघोर शर । वाहवी रुधिर सात्वताचें ॥ ७ ॥
विद्धकवच तो पडला स्यंदनीं । सूत अन्यस्थानीं नेई तया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध अश्वत्थामा । महाघोर बाणा योजीतसे ॥ ९ ॥

४०१

धृष्टद्युम्नाचें ललाट । भेदीतसे वीरश्रेष्ठ ॥ १ ॥
बैसतां तो धरूनि ध्वज । धांव घेती भीमादिक ॥ २ ॥
सुदर्शन मालवपति । साह्य जाहला भीमासी ॥ ३ ॥
भग्नचाप तें भीमाचें । विद्ध केलें अर्जुनातें ॥ ४ ॥
सुदर्शन तें पौरव । वधिला वीरानें तत्काळ ॥ ५ ॥
वीर नीलकमलासम । वधिला चेदीचा नंदन ॥ ६ ॥
पाहूनियां वृकोदर । गर्जूनियां सोडी शर ॥ ७ ॥

भग्नचाप अश्वत्थामा । अन्य चापें सिद्ध रणा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे रणीं । लढती शौर्यें भीम-द्रौणि ॥ ९ ॥

४०२

सिंहव्याघ्रांसम भिडले संगरीं । सरींवरी सरी सायकांच्या ॥ १ ॥
अश्वत्थामा ताडी प्रखर शरानें । भीमही शौर्यानें सोडी शर ॥ २ ॥
रक्तबंबाळ तैं अश्वत्थामा रथीं । पडला परी शुद्धि क्षण धांत ॥ ३ ॥
पुढती आच्छादी भीमासी शरानें । अतुल विक्रमें लढला भीम ॥
छेदूनि ते शर पातला समीप । तदा द्रोणपुत्र क्रुद्ध बहु ॥ ५ ॥
अलातचक्र तैं भासे चाप त्याचें । शलभासम ते सुटती शर ॥ ६ ॥
वायुसंचारही न घडे त्या स्थानीं । मायाळ स्यंदनीं 'विशोक' तैं ॥
भग्न शिर सूत, भयार्त ते अश्व । स्यंदन अन्यत्र नेती वेगें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसा भीमसेन । हटतां पलायन सैन्य करी ॥ ९ ॥

अध्याय २०१ वा

४०३

दाणादाण ऐसी पाहूनि सैन्याची । धांवला पुढती कृष्णसखा ॥ १ ॥
अश्वत्थाम्यालागीं बोलला हे, विप्रा । सोडीं दिव्यशरां पाहूं आतां ॥
शक्ति, ज्ञान, तेंवी पौरुष, विक्रम । कौरवांचें प्रेम सकळ दावीं ॥३॥
पांडवांचा द्वेष तेंवी तपस्तेज । सकलही अद्य दावा वीरा ॥ ४ ॥
पार्षतचि तुझा हरील रे गर्व । दावीं निज शौर्य सकल रणीं ॥ ५ ॥
सुदर्शन ब्रह्मक्षत्र तो पौरव । पडतां धनुर्धर क्षुब्ध ऐसा ॥ ६ ॥
पार्थवचनें त्या क्रुद्ध द्रोणपुत्र । योजी आग्नेयास्त्र तया ठाईं ॥ ७ ॥
अद्भुत त्या अस्त्रें उल्का कोसळती । पार्थसेनेमाजी दीप्तशर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आश्चर्यकारक । अस्त्र तें आकांत मांडीतसे ॥ ९ ॥

४०४

झाला अंधार सर्वत्र । भयभीत भूतमात्र ॥ १ ॥
गर्जूनियां रुधिराची । मेघ करिताती वृष्टि ॥ २ ॥
ध्यानभ्रष्ट योगीजन । तप्त अवघें त्रिभुवन ॥ ३ ॥
तप्त होती जलाशय । सैन्यामाजी हाय हाय ॥ ४ ॥

दग्ध होई पांडवसैन्य। आनंदित दुर्योधन।। ५ ॥
ज्वालामग्न धनुर्धारी। दग्ध म्हणती हा कौंसारी।। ६ ॥
चिंतूनियां वीर पार्थ। अभिमंत्री तें ब्रह्मास्त्र ॥ ७ ॥
तेणें शांत झाला अग्नि। होई विस्मित तें द्रौणि ॥ ८॥
निराश तो दुःखमग्न। बोले धनुष्य त्यागून ॥ ९ ॥
असो धिक्कार धिक्कार। व्यर्थ अवघें चराचर ॥ १० ॥
वासुदेव म्हणे हरि। एक सर्वसत्ताधारी ॥ ११ ॥

४०५

सरस्वतीचें माहेर। घनःश्याम निर्विकार ॥ १ ॥
वेदविभागांचा कर्ता। आधार जो कुरुश्रेष्ठां ॥ २ ॥
प्रगटला मुनि व्यास। द्रोणपुत्र जैं निराश ॥ ३ ॥
सद्गदित अश्वत्थामा। वंदी मुनींचिया चरणा ॥ ४ ॥
म्हणे नकळ काय झालें। अस्त्र कैंवी व्यर्थ गेलें ॥ ५ ॥
व्यतिक्रम कीं हे माया। यदृच्छा वा मुनिराया ॥ ६ ॥
कृष्णार्जुन हे जिवंत। वाटे काल हा दुर्लंघ्य ॥ ७ ॥
वीर वाचले हे कैसे। सांगा मुनिराया, मातें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शक्ति। अतर्क्यचि श्रीहरीची ॥ ९ ॥

४०६

मुनि म्हणे वत्सा, द्रोणपुत्रा ऐक। सकलां पूर्वज नारायण ॥ १ ॥
कार्यार्थ जन्मूनि धर्माचिया उदरीं। हिमगिरीवरी तप केलें ॥ २ ॥
सहासष्ट सहस्त्र वर्षें वायुपान। पुनरपि द्विगुणवर्षें तप ॥ ३ ॥
आचरूनि, विश्व व्यापिलें प्रभावें। भेटला स्वभावें आदिनाथ ॥४॥
देवाधिदेव तो शंभु जटाधर। नसे दृग्गोचर सामान्यांसी ॥ ५ ॥
उत्पत्ति, संहार क्रीडा हे जयाची। तूणीर चापादि दिव्य जया ॥६॥
सुवर्णकवच, गदा, परशु, शूल। मस्तकीं शीतल चंद्र ज्याच्या ॥
सर्पभूषण ज्या पिशाच्चें भोंवतीं। ब्रह्मद्वेष्ट्यांप्रति काळचि जो ॥८॥
सद्वृत्त, तपस्वी विप्रचि जयासी। ध्यानें अवलोकिती शोकातीता
वासुदेव म्हणे तोचि धर्ममूर्ति। पाहिला पुढती नारायणें ॥ १० ॥

४०७

पाहूनि तो देवदेव । हर्षे पावे वासुदेव ॥ १ ॥
वरप्रद सकलाधार । नमिला जोडूनियां कर ॥ २ ॥
अंकीं पार्वती भवानी । रमला स्तवनांत मुनि ॥ ३ ॥
वरेण्या, हे आदिदेवा । तूंचि आधार या विश्वा ॥ ४ ॥
जीव-शिव तुझीं बाळें । तुझें स्वरूप निराळें ॥ ५ ॥
देवा, तूंचि स्थिति, गति । कालातीत तुझी शक्ति ॥ ६ ॥
होईं प्रसन्न ईश्वरा । प्रेमें जोडीतसें करां ॥ ७ ॥
अहंभाव विलया जावो । आवरण दूर होवो ॥ ८ ॥
स्तवनें होऊनि प्रसन्न । मनोरथ करीं पूर्ण ॥ ९ ॥
देईं दुर्लभ वरांसी । तूंचि आधार भक्तांसी ॥ १० ॥
देवदेवा, वासुदेव । पार्थी म्हणे वासुदेव ॥ ११ ॥

४०८

अचिंत्यस्वरूपी पिनाकी तोषला । म्हणे वासुदेवा, नारायणा ॥ १ ॥
प्रसादें तूं माझ्या होसील अजिंक्य । वंद्य तूं विश्वांत सकळां होसी ॥
कोणीही तुजसी कदापि न जिंकी । तुजपुढें शक्ति सकल व्यर्थ ॥
वासुदेवा, तुज माझा आशीर्वाद । मजहूनि श्रेष्ठ तूंचि रणीं ॥ ४ ॥
द्रोणपुत्रा, ऐसे वर गोविंदासी । योग्यता पार्थाची तेचि असे ॥ ५ ॥
सर्वकाल ध्यानीं असो हा वृत्तांत । लोककल्याणार्थ जन्मती हे ॥
वासुदेव म्हणे कृष्णार्जुनवृत्त । निवेदूनि व्यास वदती ऐका ॥ ७ ॥

४०९

द्रोणपुत्रा, तूंही शिवाचाचि अंश । पूर्वजन्मीं तप थोर तुझें ॥ १ ॥
प्रसन्न शिवानें प्रसाद दिधला । तेणेंचि लाधला विक्रम हा ॥ २ ॥
नारायण-नरें केली लिंगपूजा । केवळ मूर्तीचा ध्यास तुज ॥ ३ ॥
व्यापक जाणूनि पूजितां शिवासी । सर्व ऐश्वर्याची प्राप्ति होई ॥
शिव तो केशव, केशव तो शिव । ठेवी ऐसा भाव तोचि धन्य ॥ ५ ॥
अश्वत्थामा ऐसें ऐकूनि वचन । कृष्णासी वंदन करिताझाला ॥ ६ ॥
पुलकित देह जाहला तयाचा । पावला शांतता चित्तामाजी ॥ ७ ॥

वंदूनि व्यासांसी आंवरिलें सैन्य। युद्ध तें दारुण शांत तदा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पंचम हा दिन। गेले गुरुद्रोण ब्रह्मलोकीं ॥ ९ ॥

अध्याय २०२ रा ४१०

वंदूनि व्यासांसी वृत्त कथी पार्थ। विस्मयकारक ऐका आतां ॥ १ ॥
रणांगणीं माझ्या पुढती दिव्याकृति। अग्नीसम दीप्ति दिसली मज ॥
महापुरुष तो संहारी सैन्यासी। भासे तें जनांसी शौर्य माझें ॥ ३ ॥
पुरुषोत्तम शूलपाणी जो देखिला। कोण तो दयाळा, सांगा मज ॥
शूलांतूनि त्याच्या शूल असंख्यात। पाहिले प्रत्यक्ष निघती ऐसें ॥
कदाही न त्याचा स्पर्श धरित्रीसी। निवेदा मजसी वृत्त त्याचें ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां व्यास। कथिती वृत्तांत पार्थालागीं ॥ ७ ॥

४११

पार्था, ब्रह्मा, विष्णु, देव रुद्रादिक। जयाचे ते अंश तोचि देव ॥१॥
नीलकंठ सर्वसाक्षी सनातन। प्रत्यक्ष तो धर्म विश्वाधार ॥ २ ॥
सर्वसमर्थ तो काळाचाही काळ। शंकर त्रिनेत्र साह्य झाला ॥ ३ ॥
भीष्म, द्रोण, कर्णा जिंकी ऐसा कोण। पार्था, तयावीण त्रिलोकीं या
इच्छामात्रें ज्याच्या उत्पत्ति संहार। जाहला आधार तोचि तुज ॥
धार्मिकांचें नित्य करी जो कल्याण। नित्य जा शरण तया देवा ॥
सर्वभावें नम्र होऊनि वंदन। सर्वकाळ जाण करीं तया ॥ ७ ॥
तारक तो नित्य जाण भवार्णवीं। तारागण रवि तोचि चंद्र ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तन्मय अर्जुन। महर्षिवचन ऐकतसे ॥ ९ ॥

४१२

रुद्र, शितिकंठ, कनिष्ट, सुवर्च। कराल, हर्यक्ष, कपर्दी तो ॥ १ ॥
याम्याव्यक्त, केश, सद्वृत्त, शंकर। काम्य, हरिनेत्र, पुरुष, स्थाणु
हरिकेश, तुंड, प्रिय, देवदेव। उमापति, शिव, लोकेश तो ॥ ३ ॥
कुबेरसखा तो देव यक्षपति। वरद गणपती वंदूं तया ॥ ४ ॥
सर्वरूप सर्व समर्थ भगवान। तयासी वंदन करीं पार्था ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्पूरधवल। स्तवितां सकल दुःखहारी ॥ ६ ॥

४१३

दक्षयज्ञामाजी पार्था, पूर्वकाळीं । गाळण उडाली अमरांची ॥ १ ॥
शिवासी शरण जाऊनि वंदिले । तयासी अर्पिले यज्ञभाग ॥ २ ॥
त्रिपुरनिवासी दैत्य गगनांत । जाहले उन्मत्त एकेवेळीं ॥ ३ ॥
लोह, सुवर्ण तैं रौप्यमयपुर-। त्रय, तें संचार गगनीं करी ॥ ४ ॥
कमलाक्ष, तारकाक्ष, विद्युन्माली । दैत्य त्या नगरीं करिती वास ॥
अजिंक्य ते दैत्य इंद्रादिक देवां । देव महादेवा शरण जाती ॥ ६ ॥
तदा सागरान्त पृथ्वीचा स्यंदन । वेदाश्व योजून सज्ज शिव ॥ ७ ॥
चंद्र-सूर्य चक्रें, प्रतोद ओंकार । चाप तें मंदर गिरिश्रेष्ठ ॥ ८ ॥
गायत्री-सावित्री अश्वांचे लगाम । एकचि दारुण बाण योजी ॥ ९ ॥
एकाचि त्या शरें पुरत्रय दाह । करूनियां शिव हर्ष देई ॥ १० ॥
वासुदेव म्हणे ऐसा देवदेव । वंदूं महादेव प्रेमभावें ॥ ११ ॥

४१४

तयावेळीं अंबा, बाळ पंचशिख । बोले खेळवीत देवांप्रति ॥ १ ॥
कोण हा बालक सांगा हो मजसी । उगारी तयासी इंद्र वज्र ॥ २ ॥
हांसतां तैं बाळ, कुंठित देवेंद्र । शरण सकळ येती बाळा ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे बाळ नव्हे हा शंकर । करिती नमस्कार देव तदा ॥ ४ ॥
पुनरपि बाळ हांसतांचि मुक्त । जाहला देवेंद्र तत्काळचि ॥ ५ ॥
पार्थालागीं व्यास म्हणे, महाकाळ । खेळतो हा खेळ लीलामात्रें ॥
अग्रभागीं रणीं तोचि पाहिलासी । अर्पिलीं तुजसी अस्त्रें जेणें ॥ ७ ॥
'शतरुद्रीय' हें स्तोत्र पुरातन । पठणें प्रसन्न महादेव ॥ ८ ॥
अंकासी टेंकी हा अंक तुझ्या कृष्ण । अर्जुना, जा रण करीं सौख्यें ॥
विजया, तुजसी विजयचि नित्य । कथूनियां गुप्त व्यास मुनि ॥ १० ॥
वासुदेव म्हणे संजय रायासी । म्हणे ब्रह्मलोकीं गेला द्रोण ॥ ११ ॥

४१५

पुण्यद हें द्रोणपर्व सकळ जनांसी ॥
पुण्य स्वाध्यायनिरतां लाभे येणें तेंचि ॥ १ ॥
धैर्यवंत क्षत्रियांसी महद्यश येणें ॥
घोर पापमुक्ति याच्या श्रवण-पठणें ॥ २ ॥

महायज्ञपुण्य याच्या पठणें विप्रांसी ॥
विजय सर्वदा लाभे रणीं क्षत्रियांसी ॥ ३ ॥
वैश्य शूद्रही पठणें होती पूर्णकाम ॥
पुत्रपौत्र इष्ट लाभे तेंवी धन-धान्य ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे जयग्रंथ वृक्षशाखा- ॥
पर्व हें, अर्पण असो प्रभो विश्वनाथा ॥ ५ ॥

## द्रोणपर्व समाप्त

---

या द्रोणपर्वाची एकंदर अभंगसंख्या ४१५

---

पुढील कर्णपर्वाचा आद्य श्लोक—

वैशंपायन उवाच—

ततो द्रोणे हते राजन् दुर्योधनमुखा नृपाः ॥
भृशमुद्विग्नमनसो द्रोणपुत्रमुपाद्रवन् ॥ १ ॥

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग--भारत

(महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ)

## ८ कर्णपर्व

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला

१

नारायण वंदूं विश्वाचें कारण । नरासी वंदन कार्यरूपा ॥ १ ॥
अतीताचि कार्यकारणासी सदा । नरोत्तमपदा प्रेमें वंदूं ॥ २ ॥
तत्त्वत्रय बोध जियेच्या प्रसादें । देवी ती आनंदें वंदीन मी ॥ ३ ॥
सरस्वतीकृपा लाभली जयांसी । आदरें व्यासांसी वंदीन त्यां ॥ ४ ॥
लोककल्याणार्थ अभंग भारत- । स्फूर्तें, हा प्रसाद लाभलासे ॥५॥
त्याच प्रसादानें गिरी लंघियेले । आज आरंभिलें कर्णपर्व ॥ ६ ॥
सोडूनि अहंता अच्युतस्मरणें । पावेन भक्तीनें पैलपार ॥ ७ ॥
कर्णादिक आतां पर्वें आरंभूनि । जाईन तरूनि जयसिंधु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्रोणवधोत्तर । भेटले सकळ तत्पुत्रासी ॥ ९ ॥

२

राव जनमेजयाप्रति । वैशंपायन कथिती ॥ १ ॥
शकुनि, कर्ण, दुःशासन । अश्वत्थाम्यासी भेटून । २ ॥
गेले नृपाच्या शिबिरीं । युग भासे त्यां शर्वरी ॥ ॥

सेनापत्य अन्यदिनीं । लढले कर्णासी अर्पूनि ॥ ४ ॥
दिनद्वय लढले वीर । वृत्तें कांपेल शरीर ॥ ५ ॥
अंतीं कर्णवध झाला । गजपुरीं संजय गेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । कथिलें नृपासी समस्त ॥ ७ ॥

३

जनमेजय म्हणे वैशंपायनासी । भिस्त कौरवांची कर्णावरी ॥ १ ॥
तयाचें निधन ऐकूनियां राव । राहिला सजीव कैसा तरी ॥ २ ॥
विपत्कालीं मृत्यु आवडे नरासी । परी नसे हातीं कवणाच्या तो ॥
थोर थोर गेले ऐसेंही ऐकूनि । राहिलाचि जनीं धृतराष्ट्र ॥ ४ ॥
सकल तें वृत्त कथीं मुनिराया । पूर्वजांच्या पायां वंदीन मी ॥ ५ ॥
ऐकूनि इतिहास अतृप्तचि कर्ण । बोलला वचन जनमेजय ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पूर्वजांचें वृत्त । ऐकूनियां चित्त शुद्ध करा ॥ ७ ॥

अध्याय २ रा

४

मुनि म्हणे राया, द्रोणवधोत्तर । संजय सत्वर नृपा भेटे ॥ १ ॥
कुशल तयासी पुसोनियां म्हणे । कर्म दैवाविणें न घडे कांहीं ॥२॥
थोर थोर बोध करूनियां गेले । परी न पटलें तुज कांहीं ॥ ३ ॥
भीष्म-द्रोणवधें दुःख होई काय । राव म्हणे हाय काय सांगूं ॥ ४ ॥
द्रोणवधोत्तर सांगें जें जाहलें । मन घट्ट केलें ऐकावया ॥ ५ ॥
असेल जें भाळीं टळेना तें कोणा । सिद्धांत हा मना पटला माझ्या
वासुदेव म्हणे कालपरिपक्व । सिद्ध होई राव ऐकावया ॥ ७ ॥

अध्याय ३ रा

५

सूत म्हणे राया, द्रोणवध होतां । सकलांसी चिंता वहु झाली ॥१॥
निराधार सैन्य बावरूनि गेलें । उत्तेजित केलें दुर्योधनें ॥ २ ॥
कर्णाचें सामर्थ्य कथूनियां थोर । देई वहु धीर सैनिकांसी ॥ ३ ॥
म्हणे एकेकही तुम्हीं महावीर । जिंकाल सकळ पांडवांसी ॥ ४ ॥
पुढती कर्णासी केला अभिषेक । चढला आवेश तया वहु ॥ ५ ॥
पांचाल, पांडवां त्राहि त्राहि केलें । अंतीं त्या वधिलें अर्जुनानें ॥
वासुदेव म्हणे कर्णवधवृत्त । ऐकूनि नृपास शोक होई ॥ ७ ॥

अध्याय ४ था ६

मानूनियां पुत्रवध । भूमीवरी टाकी अंग ॥ १ ॥
तयाप्रति पाहूनियां । शोकग्रस्त होती स्त्रिया ॥ २ ॥
करी सांत्वन विदुर । संजयही देई धीर ॥ ३ ॥
म्हणे राया, दुःशासना । सत्य भीमाची प्रतिज्ञा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । सावधपणें कथिती संत ॥ ५ ॥

अध्याय ५ वा ७

दुष्ट राजनीति आमुच्या पुत्राची । आली हे फळासी राव म्हणे ॥
संजया, कथावें आतां उरले कोण । गेले कोण कोण उभय पक्षीं ॥
येरु म्हणे राया, भीष्म, द्रोण, कर्ण । विविंशति जाण जयद्रथ ॥
विंद-अनुविंद तैंवी भगदत्त । गजसैन्ययुक्त सुदक्षिण ॥ ४ ॥
भूरिश्रवा तैंवी श्रुतायु निमाला । कर्णपुत्र गेला त्यजूनि देह ॥ ५ ॥
संशप्तक तैंवी बाल्हिकादि वीर । अलंबुष घोर पडला तोही ॥ ६ ॥
शल्य, दुर्योधन, दुःशासन तोही । पुत्रहीन पाहीं रणीं झाले ॥ ७ ॥
बहु बांधवेंसी दुःशासन गेला । भीमसेन झाला काळ तया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संजय रायासी । सांगे चूक तुझी फळा आली ॥९॥

अध्याय ६ वा ८

राव म्हणे सूता, वीर पांडवांचे । रणांगणीं साचे पडले कोण ॥१॥
सूत म्हणे राया, विराट, द्रुपद । वीर सत्यजित बलभद्रादि ॥ २ ॥
संपले रणांत बहुत नृपाळ । अभिमन्यु बाळ वधिला यत्नें ॥ ३ ॥
वृहंत, मणिमान् तैंवी जनमेजय । तैसेचि कैकय नृपश्रेष्ठ ॥ ४ ॥
धृष्टकेतु तैंवी कुंतिभोजादिक । शिखंडीचा सुत क्षत्रदेव ॥ ५ ॥
व्याघ्रदत्त, नील, अंशुमान वीर । चित्रायुध धीर चित्रयोधि ॥ ६ ॥
शिशुपालपुत्र सुकेतु, वसुदान । जाहले निष्प्राण द्रोणशरें ॥ ७ ॥
विराटाचे पुत्र, वीर सत्यधृति । तैंवी मदिराश्वादि वीर बहु ॥ ८ ॥
नृपालागीं म्हणे संजय यापरी । संपले समरीं पांडव वीर ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भास हा नाशाचा । परी श्रीकृष्णाचा प्रसादचि ॥

अध्याय ७ वा

९

धृतराष्ट्र म्हणे संजया, निःसार । जाहलें साचार सैन्य माझें ॥ १ ॥
रिक्तसरोवर वाहतांचि पात्र । थोर थोर भट तैसे गेले ॥ २ ॥
भीष्म-द्रोण वीर, श्रेष्ठ कर्णाहूनि । कैसे समरांगणीं नष्ट झाले ॥ ३ ॥
आश्चर्य न कर्ण गेला त्यां मागूनि । उरले जे रणीं त्यांचे आतां ॥४॥
मृततुल्यचि तें भासे मज सर्व । बोले धृतराष्ट्र संजयासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सामर्थ्यविहीन । जाणा ते निष्प्राण प्रेतरूप ॥ ६ ॥

१०

सूत म्हणे राया, वीर अश्वत्थामा । शल्यादिक नाना वीर श्रेष्ठ ॥१॥
कृप, पार्वतीय, नदीज कांबोज । तैसा वनराज दुर्योधन ॥ २ ॥
पुरुमित्रादिक राया, तुझे पुत्र । तैसे कर्णपुत्र लढती शौर्यें ॥ ३ ॥
नाममात्र ऐसे ऐकूनियां वीर । होई धृतराष्ट्र संज्ञाशून्य ॥ ४ ॥
पुरे पुरे ऐसें बोलूनि संजया । निश्चेष्ट त्या ठाया पडला राव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकवेन ऐसें । फल दुष्कर्माचें प्राप्त होई ॥ ६ ॥

अध्याय ८ वा

११

कवीमतीसी संभ्रम । अथवा देवेंद्रपतन ॥ १ ॥
उल्केसम भूमीवरी । पतन पावला तमारि ॥ २ ॥
सप्त सागर आटावे । ब्रह्मांड हें नष्ट व्हावें ॥ ३ ॥
कर्मभोग कीं टळावा । तैसा कर्णवध व्हावा ॥ ४ ॥
ऐसें मानी नित्य राव । म्हणूनि पावला विस्मय ॥ ५ ॥
अंतीं उत्पत्ति जयाची । नष्ट तें तें आणी चित्तीं ॥ ६ ॥
पुढती केला वहु शोक । अंतीं सज्जला मरणार्थ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राव । मानी दुःख तें असह्य ॥ ८ ॥

अध्याय ९ वा

१२

सूत म्हणे राया, कुल, यश, तप । आठवूनि खेद न करीं ऐसा ॥१॥
राव म्हणे सूता, दैवचि प्रधान । व्यर्थ पराक्रम दुःखद हा ॥ २ ॥
महा पराक्रमी कर्ण हा निमाला । अमर्याद झाला शोक माझा ॥ ३ ॥

वज्राहूनि माझें हृदय कठीण । न जाईचि प्राण न कळे कैंवी ॥ ४ ॥
धिक्कारचि असो ऐशा जीवितासी । करितील माझी सकल कींव ॥
आदर जयाचा जाहला सर्वत्र । तोचि आतां पात्र अपमानासी ॥६॥
अंतपार आतां न राहे दुःखासी । ऐकूनि कर्णाची दुःखवार्ता ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे टाहो फोडी राव । करी हाय हाय कर्णास्तव ॥ ८ ॥

१३

पंगूचें गमन, दीन मनोरथ । चार थेंबें तृप्त तृषार्त जें ॥ १ ॥
कौरवांचे हेतु तैंवी कर्णाविण । अशक्यचि पूर्ण होतील हें ॥ २ ॥
अपेक्षिलें अन्य अन्यचि लाभलें । प्रारब्धचि आलें फळा माझ्या
दुःशासनें रणीं अन्याय्यवर्तन । केलें न कीं अन्य सूता कथीं ॥ ४ ॥
युद्ध नको करूं विनवितां धर्म । झाला दुर्योधन अविचारी ॥ ५
औषध न सेवी जैंवी रोगग्रस्त । न करीचि पथ्य हिताचेंही ॥ ६ ॥
कळवळूनीयां कथिलें भीष्मानें । परी दुर्योधनें नायकिलें ॥ ७ ॥
आतां पंखहीन पक्ष्यासम झालों । दैन्यचि पावलों सर्वथा गी ॥८ ॥
वासुदेव म्हणे वेल जातां झोपा । करूनियां सौख्या कोण पावे ॥

१४

राव म्हणे सूता, महारथी कर्ण । कैसा तो त्यजून गेला आम्हां ॥
गवसला काय एकाकी पार्थासी । अथवा कपटकृति केली कांहीं ॥
कौरवांची यदा झाली दाणादाण । तदा दुर्योधन वदला काय ॥ ३॥
त्रैलोक्यविजयी पडतां तो कर्ण । बोले दुर्योधन काय सांगें ॥ ४ ॥
निर्भय निःशंक वदला सभेमाजी । तोचि रणीं आजी पडला कैंवी॥
वदले जे ज्ञाते तेंचि आजि झालें । आतां सांग बोले काय राजा ॥
प्रलाप सकळ जाहले ते व्यर्थ । राव वदे शब्द काय आतां ॥ ७ ॥
कृप, अश्वत्थामा काय रे बोलती । वृत्त मजप्रति सकल सांगें ॥८॥
भीष्म-द्रोण-कर्ण गेले काय करूं । दुःख हें आंवरूं कैसें तरी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्णवधवृत्त । पुशिलें समस्त नृपाळानें ॥ १० ॥

अध्याय १० वा

१५

सूत म्हणे राया, पडतां गुरुद्रोण । झाली दाणादाण कौरवांची ॥१॥
तदा दुर्योधन आंवरूनि सैन्य । करी महारण बहुत वेळ ॥ २ ॥

परी विजयोत्फुल्ल पांडवांची सेना । दारुण संग्रामा करीतसे ॥ ३ ॥
लढतां लढतांचि सूर्यास्त जाहला । शिबिरांत गेला सैन्यभार ॥४॥
पुढती कौरव करिती विचार । अश्वत्थामा वीर वदला ऐका ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संकटाची वेळ । येतां सर्व बळ एक व्हावें ॥ ६ ॥

१६

अनुकूल देश काल । स्वामिभक्ति तेंवी बल ॥ १ ॥
तैसी अचुक राजनीति । साधनें या अर्थसिद्धि ॥ २ ॥
परी प्रतिकूल दैव । असतां व्यर्थ यत्न सर्व ॥ ३ ॥
अनुकूल दैव होतां । विजय येई सहज हाता ॥ ४ ॥
यत्न करितांचि सुयोग्य । अनुकूल होई भाग्य ॥ ५ ॥
योग्य जरी सेनापति । विजयश्री येई हातीं ॥ ६ ॥
वैकर्तन वीर श्रेष्ठ । योजूं सैन्याचा वरिष्ठ ॥ ७ ॥
गुरुपुत्राचें वचन । ऐके हृष्ट दुर्योधन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राव । करी कर्णाचा गौरव । ९ ।

१७

दुर्योधन म्हणे वीरश्रेष्ठा, कर्णा । आधार तूं आम्हां एकमेव ॥ १ ॥
भीष्म-द्रोण जरी होते वीर रणी । पक्षपात मनीं होता त्यांच्या ॥
भरंवसा माझा पूर्ण तुझ्यावरी । कर्णा, तूं स्वीकारीं सेनापत्य ॥३॥
अंधःकारनाश करितो भास्कर । दुष्टांचा संहार तैसा करीं ॥४॥
कर्ण म्हणे राया, निश्चिंत तूं राहीं । जिंकिलेंचि पाहीं पांडवांतें ॥
कौरवेंद्र तदा हर्षित जाहला । अभिषेक केला कर्णावरी ॥ ६ ॥
अगणित दानें अपार स्तवनें । सुमंगल स्वनें सकलां मोद ॥ ७ ॥
कर्णाच्या आज्ञेनें सज्ज होई सैन्य । स्कंदापरी कर्ण शोभतसे ॥ ८॥
वासुदेव म्हणे सैन्य सुप्रभातीं । सज्जलें रणासी ऐशापरी ॥ ९ ॥

अध्याय ११ वा

१८

बंधूसम दुर्योधन । वदतां कर्णासी वचन ॥ १ ॥
अवशिष्ट असतां रात्र । सैन्य करिताती एकत्र ॥ २ ॥

रथ वरूथरक्षित। तैसे गजही उन्मत्त ।। ३ ॥
वीर ल्याले कवच, ढाल । रथीं शस्त्रास्त्रें सज्जलीं ॥ ४ ॥
गज-अश्वांचिया नादें । अवघें गगन तें कोंदे ॥ ५ ॥
शुभ्र पताकासंयुक्त । धवल अश्वयुक्त रथ ॥ ६ ॥
नागकक्षा चिन्ह ज्यासी । लघु घंटा निनादती ॥ ७ ॥
शत तूणीर, वरूथ । गदा, शतघ्नीमंडित ॥ ८ ॥
कर्णस्यंदन शोभला । शंखनाद तेणें केला ।। ९ ।।
वासुदेव म्हणे रणीं । येती तदा विविध ध्वनि ॥ १० ॥

१९

बालरवीसम रथावरी कर्ण । शोभला स्फुरण सकलां येई ॥ १ ॥
व्यूह मकराकार रचिला अद्भुत । ठाकला रणांत उत्साहानें ॥ २ ॥
मुखीं कर्ण, नेत्रीं शकुनि उलूक । शोभे द्रोणपुत्र भालदेशीं ॥ ३ ॥
बंधु ग्रीवास्थानीं, उदरीं दुर्योधन । शल्यादि चरण संरक्षिती ॥४ ॥
ऐसा मकरव्यूह रचिला कर्णानें । दावीतसे प्रेमें धर्म पार्था ॥ ५ ॥
धर्म म्हणे पार्था, अजिंक्य हा वीर । तूंचि रणधीर जिंकिता त्या ॥
जिंकितां तयासी आम्हांसी विजय । जाण हा निश्चय धनुर्धरा ॥
वासुदेव म्हणे अर्धचंद्र व्यूह । रचिला अपूर्व अर्जुनानें ॥ ८ ॥

२०

सव्य दक्षिण ते भीम, धृष्टद्युम्न । मध्यभागीं धर्म विराजला ॥ १
सन्निधचि पार्थ नकुल-सहदेव । वीर ते झुंजार पृष्ठभागीं ॥ २ ॥
ऐसीं दोन्हीं सैन्यें जाहलीं सुसज्ज । मानी पार्थवध दुर्योधन ॥३
धर्म मनीं मानी विजय आपुला । उत्साह भरला ऐशा रीति ॥ ४
पणव, आनक, दुंदुभी, डिंडिम । झर्झरांचे स्वन शंख, भेरी ॥ ५
वीरांच्या गर्जना, अश्व-गजशब्द । भरूनि तो नाद गगनीं जाई ॥
परस्परांवरी वीर ते धांवले । समर जुंपलें महाघोर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विनाशक युद्ध । फळ हें प्रसिद्ध दुष्कर्मांचें ॥ ८ ॥

१ एक प्रकारचें रथाचें कवच. २ हत्तीचा साखळदंड.

अध्याय १२ वा २१

सूत म्हणे राया, समरभूमीसी । स्फूर्ति सकलांसी तयावेळीं ॥ १ ॥
गजांवरी गज, अश्वांवरी अश्व । वीरांवरी घांव घेती वीर ॥ २ ॥
पताकांसहित टाकूनियां देह । वीर निःसंदेह स्वर्गी जाती ॥ ३ ॥
सूर्य-चंद्रबिंबें विखुरलीं भासे । भग्नबाहु जैसे मृत सर्प ॥ ४ ॥
अश्वशिरें गजशुंडा छिन्न देह । चतुरंग दळ नाश पावे ॥ ५ ॥
ऐशा रणीं भीम फोडितो गर्जना । साह्यास्तव नाना वीर त्याच्या॥
धृष्टद्युम्न चेकितान तैं सात्यकि । दक्ष जे साह्यासी एकमेकां ॥ ७ ॥
ऐशा गजस्थित भीमावरी वीर । ' क्षेमधूर्ति ' शर सोडी बहु ॥ ८॥
वासुदेव म्हणे वीर क्षेमधूर्ति । सोडीतसे हस्ती भीमावरी ॥ ९ ॥

२२

शुंडादंडें गज गजासी भिडतां । उभय सैनिकां स्फूर्ति येई ॥ १ ॥
पुढती प्रावृट्धारेसम शरवृष्टि । उभयवीरांची होई रणीं ॥ २ ॥
क्षमूधूर्तीचा तैं गजचि पळाला । पाठलाग केला भीमगजें ॥ ३ ॥
आंवरूनि वीर निज द्विपेंद्रासी । भीमाच्या गजासी ताडीतसे ॥
इतुक्यांत भीमें करूनि उड्डाण । शत्रुगजप्राण हरिले क्षणीं ॥ ५ ॥
अंतीं त्या वीरांचें गदायुद्ध होई । क्षेमधूर्ति जाई त्यजूनि प्राण ॥६॥
वासुदेव म्हणे कौरवांचें सैन्य । पाहूनि तें दैन्य, पळूनि जाई ॥७ ॥

अध्याय १३ वा २३

कर्ण तयावेळीं पुढती धांवला । वर्षावचि केला प्रखर शरें ॥ १ ॥
नकुळ तयासी अडवी शौर्यानें । गुरुपुत्रा भीमें दटाविलें ॥ २ ॥
विंद-अनुविंदांसी सात्यकि निवारी । राव धर्मावरी घांव घेई ॥ ३ ॥
संशप्तकगणां ताडीतसे पार्थ । धृष्टद्युम्न-कृप झुंजताती ॥ ४ ॥
दुःशासनावरी सहदेव धांवला । सात्यकि जाहला प्रबळ रणीं ॥५॥
अनुविंदाप्रति दावी यमलोक । विंद तदा क्षुब्ध धांव घेई ॥ ६ ॥
अंतीं खड्गाघातें वधिलें विंदासी । गाळण सैन्याची कौरवांच्या ॥
वासुदेव म्हणे काल प्रतिकूल । संहारी प्रबल वीरां क्षणीं ॥ ८ ॥

अध्याय १४ वा २४

धर्मपुत्र श्रुतकर्मा । रणीं ताडी चित्रसेना ॥ १ ॥
झालें घोरयुद्ध त्यांचें । शौर्यें झुंजले ते दोघे ॥ २ ॥
पुढती चित्रसेनवध । पाहूनियां चित्र क्रुद्ध ॥ ३ ॥
धांवे श्रुतकर्म्यावरी । शक्ति फेंकिली सत्वरी ॥ ४ ॥
शक्त्याघातें क्रुद्ध वीर । वेगें झुगारी तोमर ॥ ५ ॥
पडला चित्र तैं व्याकुळ । झाला निष्प्रभ तत्काळ ॥ ६ ॥
श्रुतकर्म्यावरी तदा । धांवे योद्धयामागें योद्धा ॥ ७ ॥
परी प्रतिविंध्य वीर । तळपला जैं भास्कर ॥ ८ ॥
सैन्य होतां भयाभीत । क्रोधें धांवे गुरुपुत्र ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीम-। गुरुपुत्राचा संग्राम ॥ १० ॥

अध्याय १५ वा २५

अश्वत्थामा भीमसेन । करिती दारुण संग्राम ॥ १ ॥
गिरीवरी जैसा गिरी । तैसे शोभले संगरीं ॥ २ ॥
अस्त्रांवरी सुटती अस्त्रें । निनादती दिव्य शस्त्रें ॥ ३ ॥
एकमेकांच्या वधार्थ । वीर करिताती शिकस्त ॥ ४ ॥
सिद्ध चारण बोलती । प्रलयकालाची हे स्मृति ॥ ५ ॥
देव म्हणती धन्य धन्य । वीर दोघे असामान्य ॥ ६ ॥
युद्ध जाहलें अपूर्व । व्यर्थ होती यत्न सर्व ॥ ७ ॥
अंतीं दोघेही मूर्छित । पडतां सूत नेती रथ ॥ ८ ॥
दुष्टसंग हें दुर्दैव । सुजनां म्हणे वासुदेव ॥ ९ ॥

अध्याय १६ वा २६

सूत म्हणे राया, देहासवें पाप । त्यागूनियां मुक्त वीर झाले ॥ १ ॥
ऐसें घोरयुद्ध संशप्तकांसवें । मांडिलें विजयें तेंचि ऐकें ॥ २ ॥
नालबंधछेदें विखुरलीं अब्जें । शिरच्छेदें ऐसें भासतसे ॥ ३ ॥
हस्त, पाद, रथ, अश्व, गजादिक । छिन्न भिन्न देख रणांगणीं ॥ ४ ॥
पुष्पवृष्टि तदा कृष्णार्जुनांवरी । अशरीरिणी झाली वाणीही तैं ॥५॥

सूर्याग्निसम नर-नारायण रणीं । वीरश्रेष्ठ जनीं अजिंक्य हे ॥ ६ ॥
विस्मयेंचि तदा द्रोणपुत्र धांवे । संगराचें द्यावें दान म्हणे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्णाज्ञेनें पार्थ । पुरवी मनोरथ गुरुपुत्राचे ॥ ८ ॥

२७

कृष्ण म्हणे विप्रा, स्वामीसंतोषाची । संधी हे तुजसी प्राप्त झाली ॥
शास्त्रविवादाचा निर्णय तो सूक्ष्म । उघड संग्रामनिर्णय हा ॥ २ ॥
सावधानचित्तें आतिथ्य स्वीकारीं । झुंजले संगरीं पुढती दोघे ॥
विस्मयचि तदा करी गुरुपुत्र । सर्वांगेंसी शर सोडीतसे ॥ ४ ॥
पाहूनि तें पार्थ प्रतिशर त्रिधा । भेदूनि गोविंदा संतोषवी ॥ ५ ॥
पुढती संशप्तकवीरांसी ताडून । प्रेतभारें रण शोभा आले ६ ।
पुनरपि पार्थ गुरुपुत्रावरी । वर्षावचि करी नाराचांचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गुरुबंधु ऐसे । सज्जले रणातें प्राणपणें ॥ ८ ॥

अध्याय १७ वा २८

शुक्र, अंगिरस शोभले रणांत । तापद जनांस वक्रग्रह ॥ १ ॥
भ्रुकुटीचा भेद केला अर्जुनानें । ताडिलें विप्रानें क्रोधें तया ॥ २ ॥
परस्पर क्रुद्ध होतां कृष्णसखा । करोनि विप्राचा प्रतिकार ॥ ३ ॥
संशप्तकनाश करी क्रोधें पार्थ । धांवे द्रोणपुत्र पाहूनियां ॥ ४ ॥
कृष्णार्जुनालागीं आच्छादी शरानें । पार्था, कृष्ण म्हणे शौर्य दावीं
ऐकूनि अर्जुन सोडी दिव्य बाण । कासावीस प्राण गुरुपुत्राचा ॥६॥
व्याकुळ अश्वांनीं रथ दूर नेला । संशप्तकां आला काळ आतां ॥७॥
वासुदेव म्हणे संशप्तकगण । विघ्न तें दारुण पांडवांसी ॥ ८ ॥

अध्याय १८ वा २९

उत्तरेसी तदा होई कोलाहल । झाला दंडधार प्रबल बहु ॥ १ ॥
गजयोद्धा ताडी पांडवसैन्यातें । पाहोनि पार्थातें क्रोध येई ॥ २ ॥
गजावरी रथ घालूनि वेगानें । जर्जर शरानें करी तया ॥ ३ ॥
व्याकुळ तें गज वज्रविदारित । कोसळे पर्वत तैसा पडे ॥ ४ ॥
गजासवें दंडधारही निमाला । पांडवांसी झाला हर्ष बहु ॥ ५ ॥
दंडधारबंधु दंडही धांवतां । पार्थासी झुंजतां नष्ट झाला ॥ ६ ॥

सैनिक ते पार्था धन्यवाद देती । संशप्तकां गांठी पार्थ वेगें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे युद्ध घनघोर । करी श्रेष्ठ वीर ऐका आतां ॥ ८ ॥

अध्याय १९ वा ३०

अति वक्रगामी अंगारकासम । क्लेश दे दारुण दैत्यां पार्थ ॥ १ ॥
उग्रायुधपुत्रें ताडितां पार्थासी । वधिलें तयासी एका शरें ॥ २ ॥
रोमहर्षण तें करूनियां युद्ध । वधिले असंख्य प्रतियोद्धे ॥ ३ ॥
स्वयें यदुनाथें पार्थाचें वर्णन । आरंभिलें जाण तयावेळीं ॥ ४ ॥
रंगविली बहु युद्धभूमि पार्थें । वर्णूनि अच्युतें अभिनंदिलें ॥ ५ ॥
इतुक्यांत ध्वनि येई सैन्यामाजी । कौरवसैन्याची धुळधाण ॥ ६ ॥
पांड्यवीर करी कौरवांची दैना । रथ यदुराणा नेई तेथें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्णभगवान । योग्यता जाणून साह्य करी ॥ ८ ॥

अध्याय २० वा ३१

धृतराष्ट्र म्हणे मलयध्वजाचें । त्या पांड्यराजाचें वृत्त कथीं ॥ १ ॥
संजय बोलला राया, तो नृपाळ । मानी निजवळ कृष्णासम ॥ २ ॥
ऐसा महायोद्धा कर्णसेनेमाजी । दावीतसे आजी पराक्रम ॥ ३ ॥
पाहोनि तयासी धांवे अश्वत्थामा । करीं म्हणे रणा मजसी वीरा ॥
ऐसे परस्पर वीर ते प्रहार । करोनियां शौर्य दाविताती ॥ ५ ॥
परस्पराघातें खवळले वीर । अश्वत्थामा घोर शर सोडी ॥ ६ ॥
अंतीं शिरच्छेद जाहला पांड्याचा । मोद कौरवांचा न वर्णवे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राव दुर्योधन । भेटे गौरवून गुरुपुत्रासी ॥ ८ ॥

अध्याय २१-२२ वा ३२

पुढती झालें घोर युद्ध । भिडले वीरांसवें वीर ॥ १ ॥
भ्याड पळाले कित्येक । पडले कोणी मरणोन्मुख ॥ २ ॥
कर्ण वधी कित्येकांसी । नकुळ अडवी तयासी ॥ ३ ॥
[1]रणीं कोंडिलें पार्षता । वधिती कुंजर सैनिकां ॥ ४ ॥

---

१ मंगळ

पुढती धांवला सात्यकि । वंगराजाप्रति वधी ॥ ५ ॥
म्लेच्छराजा अंकपति । नकुळें वधिलें तयासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । मोड कौरवसैन्याचा ॥ ७ ॥

अध्याय २३ वा ३३

सहदेवावरी धांवे दुःशासन । म्हणती घेऊं प्राण परस्पर ॥ १ ॥
तोडूनियां चाप ताडिताती शर । जुंपलें समर घोर ऐसें ॥ ॥
विदीर्ण कवच अंतीं शरविद्ध । जाहला मूर्छित दुःशासन ॥ ३ ॥
सूतें अन्यस्थळीं हांकितां स्यंदन । करी दाणादाण सहदेव ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पिपीलिकांसम । निर्दाळिलें सैन्य कौरवांचें ॥ ५ ॥

अध्याय २४ वा ३४

नकुळ त्यावेळीं करी घोर रण । पाहूनि तें कर्ण पुढती येई ॥ १ ॥
तयालागीं म्हणे नकुळ तूं मूळ । वैराचें, समूळ,उच्छेदितों ॥ २ ॥
कर्ण म्हणे बाळा, बढाई न करीं । दाखवीं समरीं पराक्रम ॥ ३ ॥
पुढती दोघांचें जुंपे घोर रण । ताडिताती बाण एकमेकां ॥ ४ ॥
नकुळ त्या रणीं शौर्य बहु दावी । कवच धनु जाई तुटूनि अंतीं ॥
तदा वैकर्तन छेदूनियां रथ । अडकवी चाप कंठीं त्याच्या ॥ ६ ॥
परी धर्मज्ञ तो स्मरूनि वचन । न घेईचि प्राण माद्रेयाचे ॥ ७ ॥
धर्मरथीं तदा दुःखानें नकुळ । चढला व्याकुळ होऊनियां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे त्राही भगवान । करीतसे कर्ण सैनिकांसी ॥ ९ ॥

अध्याय २५ वा ३५

पुढती युयुत्सु-उलूक । करिती घोर रण देख ॥ १ ॥
अंतीं युयुत्सु पळाला । अन्य रथावरी गेला ॥ २ ॥
श्रुतकर्मा, शतानीक । पळूनि जाती एकमेक ॥ ३ ॥
सुतसोम तैं सौबल । करिती रणांत नवल ॥ ४ ॥
क्षणोक्षणीं उलटे रंग । येई प्राणान्त प्रसंग ॥ ५ ॥
अंतीं हरला सुतसोम । शकुनि संहारितो सैन्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । वीर अडविती वीरांतें ॥ ७ ॥

अध्याय २६ वा ३६

पहा पहा धृष्टद्युम्न। शारद्वतापुढती दीन ॥ १ ॥
कृपाचार्य क्रोधाकुल। हरिती पार्षताचें बल ॥ २ ॥
अंतीं पडला तो निश्चेष्ट। रथ दूर नेई सूत ॥ ३ ॥
गुरु करिती पाठलाग। धृष्टद्युम्न विकल अंग ॥ ४ ॥
कृतवर्मा, भोजपति। लढती क्रोधें शिखंडीसी ॥ ५ ॥
अंतीं तयासी जिंकिलें। पांडवसैन्य खिन्न झालें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी। दैना पांडवसैन्याची ॥ ७ ॥

अध्याय २७ वा ३७

अन्यस्थळीं पार्थ कौरवसेनेची। धुळधाण साची करीतसे ॥ १ ॥
कार्पाससंचया वायु जैं उधळी। तैसी गति झाली कौरवांची ॥२॥
शाल्व, संशप्तक, शिबि तैं त्रिगर्त। वरिती मृत्युपंथ रणांगणीं ॥३॥
सत्यसेनवीरें नवलाचि केलें। रश्मी ते गळाले श्रीकृष्णाचे ॥ ४ ॥
अपसव्य कर तोमरानें विद्ध। पडला प्रतोद करांतूनि ॥ ५ ॥
सिंहासम तदा खवळला पार्थ। केला शिरच्छेद प्रतियोद्धयाचा ॥
वासुदेव म्हणे केधवां रणांत। कोणासीं आघात न कळे होई ॥ ७॥

३८

मित्रवर्म्यावरी धांवला अर्जुन। तत्काळचि प्राण हरी त्याचा ॥ १॥
संशप्तकगणां संहारी क्रोधानें। वेढिताती सैन्यें पार्थालागीं ॥ २ ॥
संशप्तकीं ऐसा कोंडितां तो सिंह। सोडूनि इंद्रास्त्र नवल करी ॥
शरांचा वर्षाव सर्वत्र जाहला। रणांगणीं केला नाश बहु ॥ ४ ॥
रथ, रथचक्रें, अश्व, गज किती। प्रेतांनीं ते क्षिती फुलूनि जाई ॥
प्रेतराशीमाजी स्यंदनसंचार। न घडे चक्रधर नवल म्हणे ॥ ६ ॥
करिती पलायन अवशिष्ट वीर। पार्था जोडी कर वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय २८ वा ३९

एक एक राया, दुर्योधनावरी। वेगें चाल करी युधिष्ठिर ॥ १ ॥
रथ, अश्व, वेगें सारथी वधिला। ध्वजही छेदिला। पुढती चाप ॥

खड्गही छेदूनि ताडी पंचबाण । व्याकुळ तैं प्राण त्वत्पुत्राचे ॥ ३॥
कर्ण, द्रौणि, कृप धांवले त्यावेळीं । कल्पान्ताची आली वेळ रणीं ॥
प्रेक्षणीय झालें घनघोर युद्ध । पुढती अमर्याद होती वीर ॥ ५ ॥
उन्मत्त होऊनि क्रूर झाले अंतीं । अन्यायें करिती घातपात ॥ ६ ॥
आप-परभाव गेला विसरूनि । वेहोष होवोनि लढती वीर ॥ ७॥
पांचालांसी कर्ण त्रिगर्ता अर्जुन । कौरवांसी भीम निर्दाळितो ॥
वासुदेव म्हणे अपराण्हकाळीं । रणांगणीं आली घोर वेळ ॥ ९ ॥

अध्याय २९ वा ४०

धृतराष्ट्रालागीं निवेदी संजय । पुढती झालें काय परिसें आतां ॥
धर्म-दुर्योधन भिडले एकमेका । रणांगणीं लोकां नवल झालें ॥२ ॥
घोर शक्त्याघात केला दुर्योधनें । प्रतिकार धर्में केला बहु ॥ ३ ॥
फेंकूनियां शक्ति फोडी वक्षःस्थळ । मूर्च्छित व्याकुळ दुर्योधन ॥४॥
मारूं नको यासी गर्जे तदा भीम । प्रतिज्ञावचनस्मरणें माझ्या ॥५॥
कृतवर्मा तदा धांवला साह्यार्थ । अडवी वायुपुत्र तयाप्रति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी कौरवांची । दाणादाण साची होई रणीं ॥ ७ ॥

अध्याय ३० वा ४१

कर्णाप्रति अग्रस्थान । देऊनि युद्ध करी सैन्य ॥ १ ॥
शिनिश्रेष्ठ सात्यकीसी । कर्णें ताडिलें शरेंसी ॥ २ ॥
खवळे तदा महावीर । घाबरला सूतपुत्र ॥ ३ ॥
करूनि माध्यान्हचिंतन । पुढती येती कृष्णार्जुन ॥ ४ ॥
घायाळ तैं कौरवेंद्र । वांचवी त्या गुरुपुत्र ॥ ५ ॥
कृपाचार्य, अश्वत्थामा । दुःशासनादि ते रणा ॥ ६ ॥
येतां जिंकूनि तयांसी । पार्थ गांठी राधेयासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आतां । कर्णार्जुन लढती ऐका ॥ ८ ॥

४२

शैनीतें सोडूनि पार्थावरी कर्ण । धांवे ताडी बाण कृष्णार्जुनां ॥ १ ॥
सात्यकिप्रभृति वीर तैं धांवले । कर्णावरी गेले चालूनियां ॥ २ ॥

परी कर्ण करी संहार बहुत । पाहूनियां पार्थ अडवी तया ॥ ३ ॥
अनिवार वेग न सहे पार्थाचा । कौरवसेनेचा सुटला धीर ॥ ४ ॥
ऐशा समयासी अस्तंगत सूर्य । जाहला सर्वत्र अंधःकार ॥ ५ ॥
कौरव त्या वेळीं करिती पलायन । रुद्रक्रीडास्थान समरभूमि ॥६॥
वासुदेव म्हणे अर्जुन विजयी । शिबिरांत जाई कृष्णासवें ॥ ७ ॥

अध्याय ३१ वा

४३

राव म्हणे सूता, पार्थ महावीर । एकाकी संगर करी बहु ॥ १ ॥
एकाकीच केलें संतुष्ट अग्नीसी । निवातकवचांसी वधिलें एकें ॥२॥
साक्षात् शंकरासी लढला एकाकी । लढती जे त्यासी धन्य वीर ॥
निवेदीं मजसी पुढती काय झालें । सूत म्हणे गेले शिबिरा सर्व ॥
दक्ष, दूरदृष्टि, समयज्ञ पार्थ । दृढबुद्धि, सूतपुत्र म्हणे ॥ ५ ॥
तैसेंचि तयासी साह्य करी कृष्ण । यालागीं अर्जुन विजयी सदा ॥
परी उदयींक दावीन मी शौर्य । सांगे वासुदेव कर्णवच ॥ ७ ॥

४४

राव म्हणे सूता, दैव बलवान । मूढ दुर्योधन मत्त झाला ॥ १ ॥
द्यूताचें हें फल प्राप्त होई आम्हां । बुद्धिमंत कर्णा शकुनि भासे ॥२॥
सूत म्हणे राया, व्यर्थ पश्चात्ताप । करिताती लोक स्वभाव हा ॥३॥
संहाराचा धनि तूंचि हे नृपाळा । वृत्तांत घडला तोचि ऐकें ॥ ४ ॥
प्रातःकाळीं शुक्र-बृहस्पतिमान्य । व्यूह योजी धर्म स्वसैन्याचा ॥
पाहूनि तो व्यूह कर्णावीण कोण । करील रक्षण म्हणती वीर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे संकटीं रक्षण । करी तोचि धन्य वीर जगीं ॥ ७ ॥

४५

इकडे दुर्योधनाप्रति । कर्ण भेटे सुप्रभातीं ॥ १ ॥
म्हणे राया, अद्य माझा । नाश अथवा पार्थांचा ॥ २ ॥
गेले वीर थोर थोर । एकाकी मी धुरंधर ॥ ३ ॥
परी पार्थासम बळी । एकचि मी भूमंडळीं ॥ ४ ॥
इंद्रदत्त भार्गवचाप । माझें विजयनामक ॥ ५ ॥
याचि चापें भार्गवानें । अवनी जिंकिली शौर्यानें ॥ ६ ॥

चाप घेऊनि तें अद्य । जिंकीन मी अर्जुनास ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । म्हणे राया, तूंचि धन्य ॥ ८ ॥

४६

कौरवेंद्रा, ऐकें पार्थाचें वैशिष्ट्य । रथ अग्निदत्त दुर्भेद्य त्या ॥ १ ॥
मनोजव अश्व, ध्वजाग्रीं वानर । सारथी साचार भगवान ॥ २ ॥
अक्षय्य तूणीर, प्रत्यंचा ते दिव्य । ऐसें हें अपूर्व बळ तया ॥ ३ ॥
दूर करीं राया, न्यूनता हे माझी । शल्य तो सारथी लाभो मज ॥
कौरवेंद्रवाणी ऐकूनि कर्णाची । गौरवी तयासी अत्यानंदें ॥ ५ ॥
म्हणे कर्णा, आम्हीं संरक्षूं तुजसी । पूर्ती वचनाची करूं तुझ्या ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । भेटला शल्यातें दुर्योधन ॥ ७ ॥

अध्याय ३२ वा

४७

दुर्योधन म्हणे शल्या । अगा, वक्तृत्वकुशला ॥ १ ॥
कर जोडितों मी तुज । साह्य होई तूं कर्णास ॥ २ ॥
शिवाप्रति जैंवी ब्रह्मा । कृष्ण सारथी अर्जुना ॥ ३ ॥
तैसा होई तूं कर्णासी । तेणें विजय आम्हांसी ॥ ४ ॥
भीष्म, द्रोण, कृप, कर्ण । भोज, शकुनि, द्रौणि जाण ॥ ५ ॥
शल्या, तुजसवें आम्हीं । नवसंख्य योद्धे रणीं ॥ ६ ॥
महावीर ते निमाले । शत्रु बलवंत झाले ॥ ७ ॥
अरुणसाह्यें सूर्या जय । तैसा मेळवीं विजय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शल्या । अवमान हा वाटला ॥ ९ ॥

४८

शल्य म्हणे राया, अवमानिसी मज । सूताचें सारथ्य कथिसी कैंवी
'ब्राह्मणोस्यमुख' इत्यादि हे श्रुति । परिचर्या सूताची कथिसी कैंवी
आधीन मी तुझ्या परी न सत्तेनें । केवळ प्रेमानें साह्य झालों ॥३॥
नीचकृत्य ऐसें वदसी तूं मज । जातों स्वगृहास युद्ध पुरे ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें सज्ज होई शल्य । अडवी नृपाळ तयालागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वक्तृत्वकुशल । बोले कौरवेंद्र शल्यालागीं ॥ ६ ॥

४९

मद्रराजा शल्या, सत्य तुझी वाणी । शौर्य न तुजहूनि कर्णाप्रति ॥१॥
आर्तायनि, शल्य, नांवे हीं अन्वर्थ । मानदा, तूं श्रेष्ठ कृष्णाहूनि ॥
मजहूनि बळी तूंचि मद्रपते । सामर्थ्य कर्णांतें नसे तव ॥ ३ ॥
धनंजयाहूनि कर्णवीर श्रेष्ठ । शल्या, तूं बलिष्ठ कृष्णाहूनि ॥ ४ ॥
अश्वविद्या ज्ञात असे कृष्णाप्रांत । त्याहूनि जाणसी द्विगुण शल्या ॥
यास्तव सारथ्य करीं मद्रराया । ऐकूनि गौरवा, शल्य म्हणे ॥ ६ ॥
उचित जें मज वाटे तें बोलतां । सहन सूतपुत्रा होई जरी ॥ ७ ॥
करीन तयाचें सारथ्य मी तरी । मान्यता सत्वरी देई राव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे केवळ भाषण । सामर्थ्यसंपन्न कैसें पहा ॥ ९ ॥

अध्याय ३३ वा

५०

राव म्हणे शल्या, ऐकें पूर्ववृत्त । पित्याच्या सन्निध ऐकिलें जें ॥
निवेदिता आम्हां मुनि मार्कंडेय । न धरीं संदेह मनामाजी ॥ २ ॥
पुरा देवा-सुर युद्धामाजी दैत्य । झाले पराभूत महायत्नें ॥ ३॥
तारकासुराचे पुत्र तें ‘ ताराक्ष ’ । तेंवी ‘ कमलाक्ष ’ ‘विद्युन्माली ॥
घोर तपश्चर्या करोनि ब्रह्मयासी । तोषविलें त्यांसी ब्रह्मा म्हणे ॥
‘ वर मागा ’ तदा अमरत्व मागती । ब्रह्मा म्हणे त्यांसी अशक्य हें
वासुदेव म्हणे विचार करून । वर एक अन्य मागीतला ॥ ७ ॥

५१

पुरत्रयस्थित आक्रमूं ब्रह्मांड । ऐसा सहस्राब्द काल कंठूं ॥ १ ॥
पुढती एकत्र होतील तीं पुरें । भंगील जो शरें एकाचि त्यां ॥ २ ॥
तयाच्या हस्तानें मृत्यु येवो आम्हां । वदला त्या ब्रह्मा होवो ऐसें ॥
पुढती दैत्यांनीं मयाच्या आधारें । निर्मियेलीं पुरें रम्य तीन ॥ ४ ॥
सुवर्ण, रजत, लोहमय तिजें । संचार जयांतें विश्वामाजी ॥ ५ ॥
शतयोजनें त्यां एकेका विस्तार । प्रासाद प्राकार तयांमाजी ॥ ६ ॥
प्रबल यापरी अस्त्र वीर्यशाली । ब्रह्मा काय करी म्हणती आम्हां ॥
वासुदेव म्हणे दैत्य पराभूत । साधिती इच्छित नगरीं हेतु ॥ ८ ॥

५२

ताराक्षादि क्रमें हेम, रजत, लोह । पुरांत वास्तव्य करिती मोदें ॥
हरी ताराक्ष्याचा पुत्र तप करी । संजीविनी वापी संपादी तो ॥२॥
वापीमाजी प्रेत टाकितां जिवंत । लाभलें अद्भुत बळ ऐसें ॥ ३ ॥
तेणें होऊनियां उन्मत्त, देवांसी । पीडा दानवांची होई वहु ॥ ४ ॥
अंतीं पुरंदर युद्धार्थ सज्जला । यश न तयाला लाभे परी ॥ ५ ॥
तदा सकलही देव चतुरानना । भाकिती करुणा दीनपणें ॥ ६ ॥
ब्रह्मा म्हणे एका शरें पुरत्रय । भेदील त्या जय अन्या नसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे समबुद्धि ब्रह्मा । अधार्मिकां जनां वधितो परी ॥ ८ ॥

५३

ब्रह्मा म्हणे इंद्रा, विनवी शंकरा । युद्धधुरंधरा दयावंता ॥ १ ॥
ऐकूनियां देव आराधिती भवा । शिवा, महादेवा, मनोभावें ॥ २ ॥
दर्शनें घालिती लोटांगण देव । मागा म्हणे शिव तयांलागीं ॥ ३ ॥
ऐकूनियां देव करिती प्रार्थना । नीलग्रीवा, आम्हां संरक्षावें ॥ ४ ॥
तयांप्रति शिव म्हणे व्हा निर्भय । मागा अन्य काय अर्पू तुम्हां ॥
वासुदेव म्हणे दीनांचा दयाळु । होई कनवाळु भक्तां देव ॥ ६ ॥

अध्याय ३४ वा

५४

शिव म्हणे अर्धे बल घ्यावें माझें । मर्दावें दैत्यांतें संघबळें ॥ १ ॥
संघशक्ति अनिवार्य होई लोकीं । देव तैं बोलती शंकरासी ॥ २ ॥
देवा, असमर्थ आम्हीं या कार्यासी । मर्दी तूं दैत्यांसी देवदेवा ॥३॥
अर्धबल त्यांचें स्वीकारी तैं शिव । म्हणती महादेव सकल तया ॥
शिव म्हणे सिद्ध करा, चाप, रथ । संहारीन अद्य दैत्यांप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां देव । निर्मिती अपूर्व स्यंदनासी ॥ ६ ॥

५५

एकत्र करूनि तेज सकलांचें । चातुर्यें रथातें करिती सिद्ध ॥ १ ॥
विष्णु, सोम, अग्नि स्थापूनियां बाणीं । पृथ्वी ते स्यंदनीं योजियेली
अक्ष तो मंदर, जंघा पुण्यगंगा । ऐसीं अंगोपांगां विविध वळें ॥३॥
इंद्र, वरुण तो यम तैं कुबेर । होती अश्व चार स्यंदना त्या ॥ ४ ॥

सज्ज करूनियां ऐसा दिव्य रथ। वंदूनि शिवास निवेदिती ॥ ५ ॥
शिवानें आकाशध्वज फडकाविला। नंदी विराजला अग्रभागीं ॥६॥
ब्रह्मा, काल, रुद्र दंड ते शोभले। शंकर ठाकले रथावरी ॥ ७ ॥
वेदशास्त्रें सर्व देव करिती सेवा। मोद वासुदेवा होई बहु ॥ ८ ॥

५६

धर्मवंतांचें रक्षण। अधार्मिकनिर्दलन ॥ १ ॥
ब्रह्मद्वेष्ट्यांचा संहार। ब्रीद मानी हें शंकर ॥ २ ॥
सुटला सुगंधित वारा। कंप होई धराधरा ॥ ३ ॥
म्हणे शंकर सारथ्य। करो मजह्नि वरिष्ठ ॥ ४ ॥
तदा देव चतुरानना। करिती जाऊनि प्रार्थना ॥ ५ ॥
झाला सारथी स्वयंभु। मोदें चापधारी शंभु ॥ ६ ॥
चाल करी त्रिपुरावरी। वासुदेव हृष्ट भारी ॥ ७ ॥

५७

शिवाज्ञेनें ब्रह्मा मनोवेगें रथ। त्रिपुरासन्निध नेई त्वरें ॥ १ ॥
नंदीच्या शब्दानें मेले बहु दैत्य। ओढी दिव्य चाप महादेव ॥ २ ॥
चापआस्फालनें रथ येई खालीं। वृषरूपें तोली विष्णु तदा ॥ ३ ॥
वृषभेशफभेद, अश्वस्तनछेद। करी वृषभध्वज तयावेळीं ॥ ४ ॥
तदा प्रभृति ते तैसेचि राहिले। बाणासी योजिलें पाशुपत ॥ ५ ॥
इतुक्यांत होती त्रिपुरें एकत्र। लोकेश्वर शर सोडी वेगें ॥ ६ ॥
पतन पावतां पुरें भस्मसात। करूनि सिंधूंत टाकियेली ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे त्रैलोक्यपालन। करी भगवान ऐशा रीति ॥ ८ ॥

५८

राव दुर्योधन वृत्त हें कथून। शल्यासी भाषण वदला ऐका ॥ १ ॥
म्हणे शल्या, कर्ण शिवासम योद्धा। सारथी तूं त्याचा होईं ब्रह्मा ॥
जमदग्निसुत परशुरामानें। आराधन केलें शंकराचें ॥ ३ ॥
अस्त्रें त्या मागतां शिव म्हणे कैंवी। अपात्रासी व्हावी प्राप्ति ऐसी ॥
राम म्हणे यदा मानिसील पात्र। अर्पी तैं अस्त्रांस मजलागीं ॥ ५ ॥

---

खूर फाटणें.

पुढती रामानें केलें घोर तप । देवांजवळी शिव स्तवी तया ॥ ६ ॥
ऐसे दिन जातां असुर माजले । शिव, रामा बोले वधीं तयां ॥ ७ ॥
शिवाज्ञा प्रमाण मानूनियां राम । असुरां वधून विजयी झाला ॥८॥
वासुदेव म्हणे कनवाळु देव । परीक्षूनि भाव कृपा करी ॥ ९ ॥

५९

विजयी पाहूनियां राम । द्रवला भोलासांब जाण ॥ १ ॥
अंगावरी फिरवी हस्त । ताप शमविला समस्त ॥ २ ॥
दिव्य अस्त्रें अर्पूनियां । शिव तोषवी भार्गवा ॥ ३ ॥
ऐसीं कष्टप्राप्त अस्त्रें । रामें अर्पिलीं कर्णातें ॥ ४ ॥
नव्हे नव्हे कर्ण सूत । मज वाटतो देवांश ॥ ५ ॥
मृगी प्रसवेल व्याघ्रासी । ऐसें न घडे कदापि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राव । कथन करी ऐसा भाव ॥ ७ ॥

अध्याय ३५ वा

६०

दुर्योधन म्हणे शल्या, हो सारथी । कर्णाहूनि शक्ति तुजलागीं ॥१॥
शल्य म्हणे राया, ऐकिलें हें वृत्त । ज्ञात श्रीकृष्णास सकळ कांहीं॥
सूतपुत्रें जरी वधिलें पार्थासी । तरी कौरवांसी वधिल कृष्ण ॥ ३॥
ऐकूनियां राव कर्णाची प्रशंसा । करूनि शल्याचा गौरव करी ॥
म्हणे मद्रेश्वरा, बळाच्या सागरा । शत्रूंच्या अंतरा करिसी शल्य॥
म्हणोनि तुजसी शल्य अभिधान । वधितां पार्थें कर्ण शल्या, तूंही-॥
संहार शत्रूंचा करिसील क्रोधें । विश्वास हा मातें शल्या, तव ॥
ऐकूनि तोषला शल्य, म्हणे राया । आनंदें त्वत्कार्या करीन मी ॥
वासुदेव म्हणे बोलेन कर्णातें । शल्य म्हणे तें तें ऐको कर्ण ॥ ९ ॥

६१

कर्ण म्हणे शल्या, हितास्तव जें जें । वदसील तें तें साहीन मी ॥
हितार्थ रायाच्या तत्पर असावें । शल्या, हें मानावें साध्य माझें ॥
शल्य म्हणे कर्णा, आत्म-पर स्तुति-। निंदाही सुजनांसी आवडेना ॥
परी विश्वासार्थ ऐकें जें कथितों । रथ मी हांकितों मातलीसा ॥४॥
योग्य अवधान, विघ्नांचा अंदाज । नसो उपसर्ग जपतों ऐसा ॥५॥

ऐसेंहि करूनि ओढवतां विघ्न । नेतों निभावून निज शौर्यें ॥ ६ ॥
यास्तव त्यागोनि चिंता करीं युद्ध । कथी हा वृत्तांत वासुदेव ॥७॥

अध्याय ३६ वा ६२

पुढती प्रातःकाळीं राव म्हणे शल्या । विजय लाभला मानितों मी
कर्ण म्हणे सुता शल्या, आणीं रथ । पवित्र जो श्रेष्ठ सुपूजित ॥२॥
आणूनियां रथ शल्य सिंहासम । करी आरोहण रथावरी ॥ ३ ॥
सूर्यासम कर्ण तयाच्या मागूनि । विराजे स्यंदनीं महावीर ॥ ४ ॥
अग्नि आदित्य ते शोभले रथांत । गर्जना नभांत रणवाद्यांची ॥५॥
टणत्कार करी कर्ण धनुष्याचा । वलययुक्त जैसा रवी नभीं ॥ ६ ॥
किरणासमान शरांचा वर्षाव । प्रोत्साहन राव स्तवनें देई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राव दुर्योधन । कुशल भाषण करी बहु ॥ ८ ॥

६३

यशस्वी तूं कर्णा, भीष्म-द्रोणाहूनि । इच्छित तूं सार्थीं कार्य माझें
देवेंद्रासमान गाजवीं विक्रम । निर्दाळीं अर्जुन भीमादिकां ॥ २ ॥
जा जा अधिरथा, असावें कल्याण । दग्ध करीं सैन्य पांडवांचें ॥
हर्षें बोले कर्ण शल्या, हांकीं रथ । संहारीन अद्य पांडवांसी ॥ ४ ॥
शल्य म्हणे सूता, व्यर्थ हे प्रलाप । पांडवप्रताप जगन्मान्य ॥ ५ ॥
पाहसील रणीं विक्रम तयांचा । सुटेल तैं वाचा व्यर्थ ऐसी ॥ ६ ॥
ऐकूनियां कर्ण होऊनियां स्तब्ध । म्हणे हांकीं रथ पुढती शल्या ॥
वासुदेव म्हणे रसाळ हे कथा । द्यावें लक्ष आतां उत्कंठेनें ॥ ८ ॥

अध्याय ३७ वा ६४

पाहूनियां सिद्ध कर्ण । हर्षोत्फुल्ल होई सैन्य ॥ १ ॥
नौबदींचा घुमला नाद । बाण-अश्व-गजशब्द ॥ २ ॥
मरूं अथवा मारूं ऐसा । होई निश्चय वीरांचा ॥ ३ ॥
कंप पावली तैं धरा । सुटला भयदाई वारा ॥ ४ ॥
पाहूनियां हीं दुश्चिन्हें । बुद्धिमंद होती सैन्यें ॥ ६ ॥
सकल विवेक सुटला । विजय मानिती आपुला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । तुच्छ मानी भीष्म-द्रोण ॥ ८ ॥

६५

कर्ण म्हणे शल्या, मज शस्त्रवंता। इंद्रही संहर्ता नसेचि कीं ॥ १ ॥
भीष्म-द्रोणांचाही संहार ज्या रणीं। तेथेंही न मानीं लवही भय ॥
पांडवांसी कैंवी वधिलें न द्रोणें। पार्थबल तेणें सिद्ध होई ॥ ३ ॥
ऐशा पार्थाप्रति संहारीन रणीं। अथवा मरूनि जाईन मी ॥ ४ ॥
टाळितांही मृत्यु न टळेचि कोणा। जाणूनियां रणा प्रवर्तेन ॥ ५ ॥
रामदत्त माझा असे दिव्य रथ। वधीन रणांत पार्थालागीं ॥ ६ ॥
मृत्युही तयासी संरक्षील जरी। संहारीन तरी अद्य पार्था ॥ ७ ॥
अथवा मरून जाईन मी साचा। जाण तूं पार्थाचा पराभव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वल्गना कर्णाची। ऐकूनि शल्यासी हास्य येई ॥९॥

६६

शल्य म्हणे कर्णा, थांब थांब ऐसे। शब्द बढाईचे बोलूं नको ॥ १ ॥
अमर्याद ऐसी भाषा हे अयुक्त। कोठें वीर पार्थ, कोठें कर्ण ॥ २ ॥
सुभद्राहरण, शंकरासी रण। गंधर्वदमन खांडवदाह ॥ ३ ॥
आठवीं तूं कर्णा, गोग्रहणकाल। गलें होतें बळ कोठें तदा ॥ ४ ॥
संग्रामीं खचित मृत्यु तुज अद्य। कर्ण म्हणे युद्ध पाहूं आतां ॥ ५ ॥
कर्ण ऐशापरी रणांत पातला। शोधित पार्थाला जाई पुढें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मरणोन्मुखाची। क्रिया अविचाराची सर्वकाळ ॥७॥

अध्याय ३८ वा

६७

कर्ण पांडवसैन्यांत। म्हणे दावा मज पार्थ ॥ १ ॥
दावील जो कृष्णार्जुन। देईन मी तया धन ॥ २ ॥
अथवा मागेल तो जें जें। अर्पीन मी तया तें तें ॥ ३ ॥
पुत्र, दारा, सकल धन। तयालागीं मी अर्पीन ॥ ४ ॥
वधूनियां कृष्णार्जुना। अर्पीन मी त्यांच्या धना ॥ ५ ॥
कोणी दाखवा तयांसी। पुरवा हेचि इच्छा माझी ॥ ६ ॥
बोलूनियां कर्ण ऐसें। फुंकी आपुल्या शंखातें ॥ ७ ॥

तयावेळीं सकळ योद्धे । गर्जताती महानादें ॥ ८
वासुदेव म्हणे तदा । मद्रपति बोले शब्दां ॥ ९ ॥

अध्याय ३९ वा ६८

शल्य म्हणे कर्णा, उतावीळ ऐसा । होऊनि धनाचा न करीं नाश ॥
कृष्णार्जुनवध न घडे कोणासी । दुर्बुद्धि हे साची तुजलागीं ॥ २ ॥
वाटतें सन्निध काळचि पातला । बांधूनियां शिळा तरला कोण ॥३॥
इच्छिसी कल्याण तरी योजीं व्यूह । एकाकी हा मोह न धरीं मनीं
हितास्तव तुज सांगतों मी साचें । कल्याण रायाचें चिंतूनियां ॥५॥
कर्ण म्हणे मज निर्धारापासूनि । ढळवील जनीं कोण ऐसा ॥ ६ ॥
वरी वरी मित्रभाव दावूनियां । शत्रूसम भया दावितोसी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शल्य तें कर्णासी । प्रशंसा वीरांची करूनि सांगे ॥८॥

६९

पश्चात्ताप कर्णा, होईल तुजसी । गांठ अर्जुनाची पडतां रणीं ॥ १ ॥
अंकस्थ बालक हरूं पाहे चंद्र । तैसाचि हा क्षुद्र यत्न तुझा ॥ २ ॥
त्रिशूळावरी तूं घांसिसी निजांग । हरिण अल्लड सिंहा दावी ॥ ३ ॥
शशक तूं गजा जिंकूं पाहतोसी । सर्प गरुडासी जिंकी काय ॥ ४ ॥
ससांच्या कळपामाजी तूं जंबुक । कैसा पार्थवध करिसील ॥ ५ ॥
द्वारींचें तूं श्वान काननींच्या सिंहा । दटाविसी मूढा, भुंकूनियां ॥
सूर्यचंद्रासम दोघे कांतिमान । कर्णा, पाहिले न भकसी नेत्रीं ॥ ७॥
मूषक-मार्जार, सिंह कीं जंबुक । विष तें अमृत तैसे तुम्ही ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सत्य कीं अनृत । तैसा म्हणे भेद मद्रपति ॥ ९ ॥

अध्याय ४० वा ७०

कर्ण म्हणे शल्या, गुणवंत तोचि । परीक्षा गुणांची करूं जाणे ॥१॥
कृष्णार्जुनांप्रति जाणितों मी जैसा । शल्या, तुज तैसा बोध नसे ॥
पहा पहा माझा अमोघ हा बाण । येणें कृष्णार्जुन वधीन मी ॥ ३ ॥
कृष्णार्जुन जरी पातले सहस्र । करीन संहार सहज त्यांचा ॥ ४ ॥
मद्रदेशवासी मित्रद्रोही पापी । मर्यादा स्त्रियांसी नसे तेथें ॥ ५ ॥
मद्यपि स्त्रियांच्या उदरीं जया जन्म । कथावा कां धर्म ऐशा नरें ॥

क्षात्रधर्मे रणीं मरण वरीन । अर्पिले हे प्राण दुर्योधना ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शल्याप्रति कर्ण । बोलला वचन पुढती ऐका ॥ ८ ॥

७१

सिंधु सौवीरस्थ अथवा मद्रवासी । पापाची ते मूर्ति म्हणती जन ॥
म्लेच्छाचि ते धर्माधर्म न जाणती । फितुर वैऱ्यासी असशी शल्या ॥
युद्धविन्मुख मी न होई सर्वथा । जेंवी धर्मवेत्ता सदाचारी-॥ ३ ॥
नास्तिकसंगानें स्वधर्म न सोडी । तैसा मी या कार्जी स्थिर असें ॥
धृतराष्ट्र-दुर्योधनसंतोषार्थ । क्षमिलें मी तुज मद्रपते ॥ ५ ॥
परी पुनरपि बोलतां तूं ऐसें । शिर गदाघातें करिन चूर्ण ६ ॥
मारीन वैऱ्यासी अथवा मरेन । पाहतील जन सकल अद्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । कर्ण स्यंदनातें हांकीं म्हणे ॥ ८ ॥

अध्याय ४१ वा

७२

मूर्धाभिषिक्तांचें कुळ माझें कर्णा । सुरापी वचना वदसी कैंवी ॥१॥
तथापि मी तुझा तोल संभाळीन । स्नेहाचें वचन बोलूनियां ॥ २ ॥
दुर्योधनास्तव सारथी मी तुझा । धर्म सारथ्याचा सांभाळीन ॥ ३ ॥
बलाबल, स्थलास्थल, हिताहित । समयीं शस्त्रास्त्र निवेदावें ॥ ४ ॥
जाणावे शकुन निरसावी बाधा । जाणूनि हें बोधा करीतसें ॥ ५ ॥
निवेदितों ऐकें हंस-काक कथा । आवडे तें चित्ता पुढती करीं ॥६॥
वासुदेव म्हणे शल्यनिवेदित । कथा घ्या ध्यानांत बोधकारी ॥ ७ ॥

७३

सागराच्या तीरीं वैश्य एक होता । अभिमानी धर्माचा पुत्रवंत ॥
उच्छिष्ट तयाचें भक्षूनियां एक । पुष्ट झाला काक गर्व पावे ॥ २ ॥
तयास्थानीं येती एकयावेळीं हंस । म्हणती वैश्यपुत्र काकासी त्या
काका, तूं प्रबळ सर्व पक्ष्यांमाजी । मति त्या वैश्यांची अपरिपक्व ॥
काक त्यांच्या शब्दें फुगूनिया गेला । हंसासी बोलला गगनीं येई ॥
करूंया उड्डाण लावूनियां पैज । सकळही हंस हंसती तया ॥ ६ ॥
म्हणती काका, आम्हीं मानसविहारी । गगनसंचारी अद्वितीय ॥
वासुदेव म्हणे निर्लज्ज तो काक । बोलला हंसास मूढ ऐका ॥ ८ ॥

७४

एक शत एक जाणतों उड्डाणें । शत शत योजनें एकेकाचीं ॥ १ ॥
उड्डीन, अवडीनें, डीन तें निडीनें । संडीनें, विडीनें, परिडीनादि ॥
मजसवें ऐशाप्रकारें गगनीं । या चला, हांसोनि म्हणती हंस ॥ ३ ॥
काका, तूं खचित दाविसी प्रकार । परी एकमात्र गति आम्हां ॥४॥
ऐकूनि हंसाचें वचन अन्य काक । म्हणती पराभूत खचित हंस ॥
पुढती हंस एक उडाला गगनीं । विचित्र उड्डाणीं रमला काक ॥६॥
पाहोनि काकाचें कौशल्य काकांसी । हर्ष अंतरासी बहुत होई ॥७॥
वासुदेव म्हणे काक वागडती । विजय मानिती स्वज्ञातीचा ॥ ८ ॥

७५

काक काव काव करिती हर्षानें । हंस आनंदानें गगनीं उडे । १ ॥
मागें मागें तया पाहूनियां काक । म्हणती उत्कर्ष आमुचा हा । २ ॥
हंसांप्रति हीनशब्दें ते बोलती । हंस पश्चिमेसी वळला तोंचि ॥ ३ ॥
काकही त्यासवें पश्चिमेसी जाई । सागरीं न कांहीं आश्रयासी ॥४॥
पाहूनि तयाचा जीव कासावीस । अवलोकी हंस तयालागीं । ५ ॥
अंतीं श्रांत काक कोसळूं लागला । धीर त्याचा गेला गळूनियां ॥
हंस म्हणे काका, गति हे कोणती । न कळे निवेदीं मजप्रति ॥ ७ ॥
उडविसी कां रे उदक पंखांनीं । डोळे वटारूनि पाहसी कां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मृत्यूचीं लक्षणें । दाविलीं काकानें अहंकारें ॥ ९ ॥

७६

काक म्हणे हंसा, वांचवीं मजसी । जाणूनि काकाची दुर्बुद्धि हे ॥
काव काव शब्द हाचि अधिकार । मानिलें मी थोर गरुडाहूनि ॥
हंस म्हणे काका, एकशतें एक । उड्डाणांचें वाक्य ध्यानीं आणीं ॥
सागरीं पतन कैंवीं पावलासी । काक म्हणे भक्षीं उच्छिष्ट मी ॥४॥
हंसा, ऐशारीति उन्मत्त जाहलों । शरण मी आलों तुजसी आतां ॥

---

१ वर उडणें. २ खालीं येणें. ३ सरळ उडणें. ४ सावकाश जाणें. ५ रमत गमत उडणें. ६ वेडावीत चालणें. ७ स्वैर उडणें.

संकटीं या मज देईं जीवदान । नम्रता धरून राहीन मी ॥ ६ ।
प्राणान्त तयाचा ओळखूनि हंस । उचलूनि त्यास दावी तीर ॥७॥
वासुदेव म्हणे त्यागूनि गर्वासी । जाहला विवेकी पुढती काक ॥८॥

७७

कर्णा, उच्छिष्टान्न भक्षूनि तूं ऐसा । काकासम चेष्टा करितोसी ॥१॥
विराटपुरींचा आठवीं प्रसंग । रणीं तें जंबुक जाहलासी ॥ २ ॥
सकुटुंब राव वांचला वनांत । पराक्रमी पार्थ साह्य होतां ॥ ३ ॥
सभेमाजी जया भार्गवही वर्णी । श्रेष्ठ धनुष्पाणी पार्थालागीं ॥ ४ ॥
सूर्य तो त्यापुढें खद्योत तूं कर्णा । नको कृष्णार्जुनां व्यर्थ निंदूं ॥५॥
काकासम करीं आश्रय हंसाचा । मूर्खपणा ऐसा करूं नको ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐशा समयातें । कलह कोणातें हितकारी ॥ ७ ॥

अध्याय ४२ वा

७८

शल्याप्रति म्हणे कर्ण । ज्ञात मज कृष्णार्जुन ॥ १ ॥
स्मरतो आजी विप्रशाप । तेणें जाहलों अस्वस्थ ॥ २ ॥
विघ्न रामसेवेमाजी । केलें इंद्रानें मजसी ॥ ३ ॥
होतें अंकीं माझ्या उसें । परशुराम निजले सुखें ॥ ४ ॥
इंद्रें होऊनि तें कीट । भेदीयेला मम अंक ॥ ५ ॥
होऊं नये निद्राभंग । म्हणूनि राहिलों स्थिरांग ॥ ६ ॥
येतां जागृती गुरूसी । पाही रक्तप्रवाहासी ॥ ७ ॥
अवलोकूनि हें धैर्य । राप जाणे, मी न विप्र ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रश्न । कर्णाप्रति करी राम ॥ ९॥

७९

राम म्हणे कर्णा, वदें तुझी जाती । ब्राह्मण नव्हेसी सर्वथा तूं ॥१॥
शल्या, तदा सूत ऐसें मी कथितां । क्रोध बहु चित्ता, भार्गवाच्या ॥
संतप्त होऊनि वदला तो शाप । अंतकाळीं अस्त्र विसरेल ॥ ३ ॥
जंववरी मृत्युकाल न समीप । तंवाचि ब्रह्मास्त्रस्मरण तुज ॥ ४ ॥
शल्या, अद्य मज अस्त्र तें स्मरेना । तथापि अर्जुना वधीन मी ॥५॥
वेलोल्लंघन तें न घडे सागरा । तेंवी धनुर्धरा अडवीन मी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शल्याप्रति कर्ण । मित्राचें लक्षण कथितसे ऐका ॥७॥

८०

नित्य प्रेम करी अथवा तापवी । प्रसन्न अंतरीं करी सदा ॥ १ ॥
संकटीं जो रक्षी, देई जो महत्व । पावे जो संतोष सौख्यें ज्याच्या ॥
ऐसा नर तोचि सन्मित्र जाणावा । विपरीत गणावा शत्रुमाजी ॥
मित्र मी रायाचा शत्रु तूं दुर्जना । विजयार्थ रणा करीन घोर ॥४॥
जयलाभें दुर्योधन इच्छापूर्ति । आनंद तुजसी व्हावयातें ॥ ५ ॥
कर्तव्य सिध्यर्थ ईशेच्छा जाणूनि । उद्यु... मी रणीं मद्रपते ॥ ६ ॥
अडेना हें अद्य जरी रथचक्र । तरी कुंतीपुत्र वधिला जाणें ॥७॥
वासुदेव म्हण कर्ण धैर्यवंत । बोलला वृत्तांत पुढती ऐका ॥ ८ ॥

८१

शल्या, मी एकदां अस्त्राभ्यासास्तव । हिंडतां अपूर्व घडलें वृत्त ॥
वनामाजी एक होमधेनुवत्स । अज्ञानें प्राणास मुकला शरें ॥ २ ॥
तदा शापवाणी बोले मज विप्र । अंतीं रथचक्र पंकीं रुतो ॥ ३ ॥
सर्वस्व अर्पाया जाहलों मी सिद्ध । विप्र म्हणे शब्द न घडे मिथ्या
असत्य भाषणें सकळांचा नाश । भोगीं प्रायश्चित्त दुष्कर्माचें ॥५॥
शल्या, जाणतों मी तुजसी निंदक । मित्रत्वें वृत्तांत कथिला परी
वासुदेव म्हणे कर्ण शल्याप्रति । म्हणे ऐक माझी आज्ञा आतां ॥

अध्याय ४३ वा

८२

सूत म्हणे राया, पुनरपि कर्ण । बोलला वचन शल्याप्रति ॥ १ ॥
युद्धपरावृत्त करिसी तूं मज । परी हें अशक्य धरीं ध्यानीं ॥ २ ॥
नीचपण तुझें प्रत्ययासी आलें । नाहीं मेळविलें अन्य कांहीं ॥ ३ ॥
केवळ विक्रम विजय संपादन । यास्तवचि जन्म असे माझा ॥ ४ ॥
वधितोंचि तुज परी तूं सारथी । असे प्रीति माझी तुझ्यावरी ॥५॥
दुर्योधनकार्य साधावें हें मनीं । बद्ध मी वचनीं तैंवी तव ॥ ६ ॥
सहस्र शल्यही येतां मी एकाकी । वधीन शत्रूसी स्वसामर्थ्यें ॥७॥
मित्रद्रोह पाप न घडो यास्तव । वांचलासी जीव धरूनियां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे महावीर कर्ण । तेजस्वी वचन वदला ऐसें ॥ ९ ॥

अध्याय ४४ वा ८३

ऐकूनि तें शल्य बोलला वचन । कर्णा, मिथ्या जाण प्रलाप हे ॥१॥
कर्ण सहस्रही लेखूनियां तुच्छ । शल्यचि हा सत्य विजयी जनीं ॥
ऐकूनियां कर्ण हाऊनियां क्रुद्ध । बाहिक ते निंद्य म्हणे बहु ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें निंदी तो बाहिका । म्हणे अधार्मिका, शल्यराजा ॥
धृतराष्ट्राप्रति विप्रें वर्णियलें । वृत्त तें कथिलें बाहिकांचें ॥ ५ ॥
मद्र, गांधार तैं आरट्ट वसती । सिंधु, सौवीरादि निंद्य कर्मे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्रोधाचें लक्षण । अवाच्यवचन वदनां येई ॥ ७ ॥

अध्याय ४५ वा ८४

पुनरपि कर्ण बोलला शल्यासी । प्रवासी विप्राची वाणी सांगे ॥१॥
वेदविहित जें कर्म तोचि धर्म । बाहिकस्थ जन अधार्मिक ॥ २ ॥
ब्राह्मणादि होती नापितापर्यंत । पुनरपि विप्र होती तेचि ॥ ३ ॥
एकाच कुळीं हे सर्वही नांदती । संकट त्या देशीं ऐशापरी ॥ ४ ॥
एकदां दुष्टांनीं भ्रष्टिलें साध्वीसी । कुलस्त्रिया होती वेश्या म्हणे ॥
शाप हा सतीचा बाधला त्या देशीं । पुत्रासी संपत्ति न मिळे तेथें ॥
मद्र, पांचनद ऐसे धर्मभ्रष्ट । वासुदेवा कष्ट कथितां होती ॥ ७ ॥

८५

शल्या, ऐसी ज्याची प्रजा धर्महीन । उपदेशी धर्म तोचि कैसा ॥
क्षत्रियासी भिक्षा व्रतत्याग विप्रा । बाहिक भूतला लांछन हे ॥२॥
मद्रस्त्रिया जनीं स्त्रियांसी लांछन । म्लेच्छ तें लांछन मानवांसी ॥
तैसेचि मद्रकलांछन सकलां । ऐक ऐक शल्या, वचन माझें ॥४॥
पांचाल वेदांसी, कौरवेय धर्मा । मत्स्य सत्यकर्मा मानिताती ॥ ५ ॥
शूरसेन यज्ञा, शूरत्वासी प्राच्य । धर्मसंग्रहास दाक्षिणात्य ॥ ६ ॥
चौर्यासी बाहिक, सौराष्ट्र संकरा । धिक्कार त्या मद्रां कृतघ्नांसी ॥
वासुदेव म्हणे ऐसे हे बाहिक । कर्णानें वेदित धर्म त्यांचे ॥ ८ ॥

८६

चिन्हें बोध त्या मागधां । दर्शनेंचि कोसलस्थां ॥ १ ॥

---

सिंधु, शतद्रु इ० नद्यांजवळील एका विशिष्ट देशांतील लोक.

अल्प कथितां पांचालांसी । मोद झाल्वा विस्तारेंसी ॥ २ ॥
मंदबुद्धि पर्वतस्थ । यवन सर्वज्ञचि नित्य ॥ ३ ॥
शूर तयांहूनि ज्ञाते । म्लेच्छ मानिती स्वमतातें ॥ ४ ॥
सामान्य ते करिती हित । ऐकती न ते वाहिक ॥ ५ ॥
मद्रपने, महामूढ । आरट्ट तें पांचनद ॥ ६ ॥
शल्या, आतां स्वस्थ राहीं । अथवा तुजसी वधिन पाहीं ॥
वासुदेव म्हणे शब्द । वाढतांचि हा प्रसंग ॥ ८ ॥

८७

शल्य म्हणे कर्णा, अंगदेशाधिपा । विसरें न दोषां स्वदेशींच्या ॥१॥
सर्वत्रचि सर्व आढळे या लोकीं । पाहतां दोषचि दिसती कर्णा ॥२॥
पापभीरु जन बहुसंख्य जनीं । श्रेष्ठ देवांहूनि असती कोणी ॥ ३ ॥
अंतीं दुर्योधन विनवी तयांसी । झाली वाग्युद्धाची परिसीमा ॥४॥
बोलतांचि राव कर्ण होई स्वस्थ । शल्य सारथ्यार्थ सिद्ध होई ॥
वासुदेव म्हणे आज्ञापि त्या कर्ण । हाकावा स्यंदन रणामाजी ॥६॥

अध्याय ४६ वा

८८

पांडवसैन्याचा व्यूह तो अभेद्य । द्रुपदाचा सुत रक्षीतसे ॥ १ ॥
पाहोनि तें कर्ण खवळला सिंह । स्थापियेला व्यूह स्वसैन्याचा ॥
शारद्वत, कृतवर्मा तें उलूक । शकुनि महारथ रक्षिती त्या ॥ ३ ॥
पृष्ठभागीं गजावरी दुःशासन । सुवर्णासमान कांतिवंत ॥ ४ ॥
दुर्योधन अश्वत्थाम्यादिक वीर । म्लेच्छादि प्रबल मागोमाग ॥ ५ ॥
व्यूह तो कर्णाचा जणु नृत्य करी । परासी अंतरीं धाक वाटे ॥६॥
पाहोनि तें धर्म बोलला अर्जुना । दाखवीं विक्रमा ऐशा वेळीं ॥
वासुदेव म्हणे धर्मवचनासी । ऐकूनि तयासी वदला पार्थ ॥८॥

८९

प्रधान वीरांचा करितों संहार । व्यूहासी आधार तेचि गया ॥१॥
धर्म म्हणे पार्था, हो कर्णापुढती । दुर्योधनाप्रति अडवो भीम ॥२॥
शकुनि-वृषसेनां, सहदेव-नकुळ । शतानिक वीर दुःशासना ॥३॥
हार्दिक्या सात्यकि दमवील मोदें । धृष्टद्युम्न क्रोधें गुरुपुत्रा ॥ ४ ॥

पार्था, मी कृपासी अडवीन शौर्यें। ऐशापरी धैर्यें पुढती व्हावें ॥५॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तें पार्थ। गर्जूनि रणांत पुढती धांवे ॥ ६ ॥

१०

शल्य म्हणे कर्णा, पहा हा स्यंदन। पातला अर्जुन पुढती तुझ्या ॥
पाहोनि दुश्चिन्हें कल्पांतचि अद्य। होईल रणांत वाटे कर्णा ॥ २ ॥
पहा हे वीरांचे ध्वजयुक्त रथ। आनकादि नाद चोंहीकडे ॥ ३ ॥
पहा हा गोविंद शंखचक्रधारी। शोभे रथावरी अर्जुनाच्या ॥ ४ ॥
ध्वजावरी बैसे वीर महाकपि। सकलांचें वेधी चित्त रणीं ॥ ५ ॥
संहार मांडिला कर्णा, या पार्थानें। छिन्न भिन्न सैन्यें सकल होती
कर्ण म्हणे शल्या, पाहें संशप्तक। कोंडिती पार्थास संपला तो ॥
शल्य म्हणे कर्णा, पार्थपराभव। जाण असंभाव्य त्रैलोक्यीं या ॥
पहा हे पांडव वीरांसवें रणीं। झुंजती विक्रमी कैशापरी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे यमुना-भागीरथी। एकत्र तैं होती उभय सैन्यें ॥

अध्याय ४७ वा ११

राव म्हणे सूता, अतृप्त मी सदा। ऐकाया वृत्तांता पुढती सांगें ॥
सूत म्हणे राया, पुत्राचें दुर्वृत्त। कारण युद्धास ध्यानीं असो ॥२॥
तारागणामाजी जैं मृगलांछन। तैसा धृष्टद्युम्न रणीं शोभे ॥३॥
संशप्तकांसवें शौर्यें लढे पार्थ। तुटती हस्तपाद मस्तकादि ॥४॥
अन्यत्र राधेय भिडला धर्मासी। मोद कौरवांसी देई बहु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देव-दैत्यांसम। जाहला संग्राम घोर तदा ॥ ६ ॥

अध्याय ४८ वा १२

दुर्योधन करी कर्णालागीं साह्य। युद्ध तैं अपूर्व होई रणीं ॥ १ ॥
ग्रहनक्षत्रेंसी कांपे अंतरिक्ष। धाकेंचि कित्येक त्यजिती प्राण ॥ २ ॥
भानुदेवादिक कर्णें पंचवीर। वधिले प्रखर शराघातें ॥ ३ ॥
पुनरपि दश वधिले पांचाळ। असंख्य तैं वीर पुढती होती ॥ ४ ॥
भीम, सुषेण तैं करितां संग्राम। भीमावरी कर्ण चाल करी ॥ ५ ॥
भीम तदा कर्णपुत्रासी वधूनि। गर्जना करूनि पुढती धांवे ॥ ६ ॥

सुषेण कर्णादि तैंवी खवळले । नकुळें वेधिलें सुषेणासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वृषसेनावरी । सात्यकि तो करी शराघात ॥ ८ ॥

९३

वृषसेन रथहीन । होतां धांवे दुःशासन ॥ १ ॥
नेई तयालागीं दूर । पुनः सज्जले ते वीर ॥ २ ॥
धृष्टद्युम्न द्रौपदेय । शतानीक सहदेव ॥ ३ ॥
धर्म, शिखंडी इत्यादि । रणीं शौर्य दाविताती ॥ ४ ॥
सकलांवरी वीर कर्ण । करी अचुक संधान ॥ ५ ॥
वधी असंख्य वीरांसी । उडवी त्रेधा पांडवांची ॥ ६ ॥
तदा धर्माप्रति वीर । संरक्षिती दावूनि शौर्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । महायुद्ध त्या स्थळातें ॥ ८ ॥

अध्याय ४९ वा

९४

कर्ण धर्मावरी धांवला शौर्यानें । छिन्नभिन्न सैन्यें करीतसे ॥ १ ॥
पांडु-पांचालादि करिती प्रतिकार । कर्ण सोडी शर धर्मावरी ॥२॥
समीप पाहूनि कर्णाप्रति धर्म । म्हणे निजकर्म भोगीं आतां ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें सोडी दश बाण । छेदूनि ते कर्ण खवळे रणीं ॥४॥
संवर्ताग्निसम पेटला क्रोधानें । वेधी पक्या बाणें धर्म तया ॥ ५ ॥
निश्चेष्ट जाहला रथामाजी कर्ण । कौरवांचें सैन्य दुःख करी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सेना पांडवांची । गर्जना सिंहाची करूनि उठे ॥ ७ ॥

९५

इतुक्यांत कर्ण होऊनि सावध । धर्माचा मी वध करीन म्हणे ॥१॥
पांडु-पांचाळ तैं रक्षिती धर्मासी । कर्ण शरवृष्टि करीतसे ॥ २ ॥
कवच धर्माचें भेदियेलें अंतीं । धर्म ताडी शक्ति क्रोधावेशें ॥ ३ ॥
छेदितां ते धर्म ताडी तोमरांनीं । पळस ते रणीं फुलले वीर ॥ ४ ॥
अन्य रथीं धर्म बैसूनि शेवटीं । पळतां तयासी अडवी कर्ण ॥ ५ ॥
शल्य म्हणे कर्णा, भस्म हा करील । जरी धरिसील वीरातें या ॥६॥
कर्णही स्मरूनि आपुलें वचन । करी वाक्ताडन धर्माप्रति ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्मालागीं कर्ण । बोलला वचन तैंचि ऐका ॥ ८ ॥

१६

धर्मा, क्षत्रिय रणाचा । त्याग न करी सर्वथा ॥ १ ॥
ब्रह्मबळ तुझ्या ठाईं । कासयासी रणघाई ॥ २ ॥
न करीं अवमान वीरांचा । ध्यानीं धरीं विक्रम साचा ॥३॥
युद्ध करीं अन्यासवें । पार्थी सान्निध असावें ॥ ४ ॥
वध कदापि मी तुझा । न करीं ध्यानीं असो राजा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । ऐसें बोलला वचन ॥ ६ ॥

१७

बोलूनियां ऐसें धर्मराजाप्रति । कर्ण, सैनिकांची उडवी दैना ॥ १ ॥
धर्म, लज्जायुक्त सोडूनियां रण । गेला अन्यस्थान लक्षूनियां ॥
बैसूनियां धर्म श्रुतकीर्तिरथीं । सत्कृति कर्णाची अवलोकी ॥ ३ ॥
पांडवसैन्याचा पाहूनि संहार । दावा म्हणे शौर्य, धर्म वीरां ॥४॥
धर्माज्ञा ऐकूनि म्हणती उठा, मारा । भिडले संगरा परस्पर ॥५॥
आश्चर्य मृतांसी अप्सरा स्वर्गांत । नेती हें वीरांस स्पष्ट दिसे ॥६॥
पाहूनि वीरश्री चढे सर्वांप्रति । रुधिराची नदी वाहूं लागे ॥७॥
तदा भीमसेन सात्यकिआदिक । खवळले भट महाक्रोधें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कौरवसैन्याची । दाणादाण साची तयावेळीं ॥९॥

## अध्याय ५० वा

१८

राया, कौरवसैन्याची ऐसी दाणादाण ॥
पाहूनि तयांसी देई धीर दुर्योधन ॥ १ ॥
भयग्रस्त सेना परी रणत्याग करी ॥
शकुनि, कर्णादि तदा जाती भीमावरी ॥ २ ॥
पाहूनिकर्णासी भीम म्हणे धृष्टद्युम्ना ॥
वधितों कर्णासी तुम्हीं सांभाळावें धर्मा ॥ ३ ॥
कवच विदारूनि त्या वेधिलें कर्णानें ॥
वधीन तया वा प्राण सोडीन सुखानें ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें भीम गर्जूनियां धांवे ॥
पाहूनि त्या कर्णालागीं शल्य काय बोले ॥ ५ ॥

कर्णा, आजवरी भीम क्रुद्ध ऐशापरी ॥
पाहिला नसेल कोणी जनीं आजवरी ॥ ६ ॥
इतुक्यांत येई भीम गर्जूनि पुढती ॥
वासुदेव म्हणे कर्ण अवलोकी त्यासी ॥ ७ ॥

९९

कर्ण म्हणे शल्या, सत्य तुझी वाचा । एकाकी त्रैलोक्या वधील हा
कीचकाचा नाश केला वाहुबळें । पूर्ण आजि झाले हेतु माझे ॥ २ ॥
वधितां भीमासी करितां कीं विरथ । धांवूनियां पार्थ पुढती येई ॥
तेणें मम हेतु शल्या, साध्य होई । आचरीं समयीं योग्य तेंचि ॥४॥
शल्य म्हणे कर्णा, वदसी तेंचि सत्य । भीमासवें युद्ध करीं सुखें ॥
वासुदेव म्हणे कर्ण करी आज्ञा । न्यावया स्यंदना भीमाजवळी ॥

१००

भीमावरी कर्ण धांवला सत्वरी । कोंदला अंबरीं वाद्यनाद ॥ १ ॥
एकमेकांप्रति करिती ताडन । घ्यावयासी प्राण सज्ज होती ॥ २ ॥
क्षणीं कर्ण, क्षणीं भीम हतवीर्य । ऐसे परस्पर ताडिताती ॥ ३ ॥
इतुक्यांत कर्ण तोडूनियां चाप । भीमाचें कवच भग्न करी ॥ ४ ॥
शराघातें भीमशरीर विछिन्न । होतां, जैसा यम भासतसे ॥ ५ ॥
खवळूनि एका शरें कर्णाप्रति । मूर्छित वेगेंसी पाडियेलें ॥ ६ ॥
मद्रपति तदा दूर नेई रथ । ऐसा पराभूत वैकर्तन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कौरवसैन्याची । दाणादाण साची करी भीम ॥ ८ ॥

अध्याय ५१ वा

१०१

पाहूनि ते स्थिति बोले दुर्योधन । म्हणे जा धांवून भीमावरी ॥ १ ॥
ऐकूनियां राया, त्वत्पुत्र धांवले । भीमासी वेढिलें क्रोधावेशें ॥ २ ॥
पाहूनि त्यां भीम गर्जूनि धांवला । विवित्सु मारिला एक्या शरें ॥
विकट, सह तैं क्रोथादिक भ्राते । नंदोपनंदातें संहारिलें ॥ ४ ॥
पुत्रषट्क ऐसें वधितां कर्णासी । खेद अंतरासी वहुत होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीमावरी कर्ण । लोटूनि स्यंदन शौर्य दावी ॥ ६ ॥

१०२

झाला तुमुल संग्राम । बाणामार्गे सुटती बाण ॥ १ ॥
शराच्छन्न होती वीर । रुधिर वाहे भळभळ ॥ २ ॥
वाली-सुग्रीव भासले । शर भीमासी बोंचले ॥ ३ ॥
खवळला तदा सिंह । फोडी कर्णाचें कवच ॥ ४ ॥
कंप पावला राधेय । तोडी भीमाचें धनुष्य ॥ ५ ॥
केलें विरथ भीमासी । भीम उचलोनि गदेसी ॥ ६ ॥
फोडी दिव्य ललकारी । वासुदेव स्मरे हरि ॥ ७ ॥

१०३

ठोकूनि उड्डाण करी दाणादाण । मत्त गजसैन्य भय पावे ॥ १ ॥
सैरावैरा गज धांवताती रणीं । माहुत अडवूनि धरिती तयां ॥ २ ॥
सप्तशत गज येती अंगावरी । गदाघातें करीं नाश त्यांचा ॥ ३ ॥
गज घेऊनियां धांवला सौबल । निर्दाळी सबळ भीम तयां ॥ ४ ॥
असंख्यात वीर स्वारही धांवले । भीमें त्या दाविलें यमपूर ॥ ५ ॥
अन्यत्र राधेय पीडितो धर्मासी । भीम तैं कर्णासी हांक देई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीमावरी कर्ण । धर्मासी सोडून धांव घेई ॥ ७ ॥

१०४

झालें युद्ध घनघोर । शौर्य दावी वृकोदर ॥ १ ॥
राधेयाचे प्रखर बाण । टाकी सात्यकी छेदून ॥ २ ॥
कर्ण तदा सात्यकीसी । शरवर्षावेंचि झांकी ॥ ३ ॥
शकुनीसवें कृतवर्मा । साह्य करी अश्वत्थामा ॥ ४ ॥
परस्पर न्यूनशब्द । बोलूनियां करिती क्रुद्ध ॥ ५ ॥
ऐसें युद्ध तें दारुण । भय वाटतें ऐकून ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वीर । ताडिताती प्रखर शर ॥ ७ ॥

अध्याय ५२ वा

१०५

घोर त्या संग्रामीं भयग्रस्त भूमि । प्रेक्षकां पाहूनि कंप सुटे ॥ १ ॥
रणदेवीलागीं इंद्र गोपमाला । अथवा तियेला रक्तवस्त्र ॥ २ ॥
रथावरी रथ, गजावरी गज । सर्वत्र शोणित, मांस दिसे ॥ ३ ॥

गेरु प्रवाह जैं पर्वतशिखरीं । तैशा गजांवरी रुधिरधारा ॥ ४ ॥
कण्हती, कुंथती कोणी हांका देती । रणांगणीं ऐसी हातघाई ॥५॥
तृप्त भूतप्रेतें नाचती त्या ठाईं । भग्न नौका होई कौरवसेना ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रणभूमीवृत्त । वर्णिलें ग्रंथांत भयप्रद ॥ ७ ॥

अध्याय ५३ वा १०६

ऐशा घोर रणीं गांडीवाचा ध्वनि । वैऱ्यांच्या कंदनीं रमला पार्थ ॥
संशप्तकवीर वेढिती तयासी । सुशर्मा पार्थासी विद्ध करी ॥ २ ॥
कृष्णावरी तीन सोडूनियां बाण । पार्थध्वज भग्न त्वरित केला ॥३॥
गर्जना त्या वेळीं फोडिली कपीनें । निश्चेष्ट तीं सैन्यें पडती भयें ॥
शुद्धीवरी येतां करिती घोर रण । वेष्टिती स्यंदन अर्जुनाचा ॥ ५ ॥
बाहु श्रीकृष्णाचे धरिले आंवळूनि । पार्थाच्या स्यंदनीं घुसले वीर
झाडूनियां बाहु पाडी त्या श्रीकृष्ण । विस्मित अर्जुन शौर्य दावी ॥
वासुदेव म्हणे रथस्थ सैनिकां । लोटूनि कौतुका करी पार्थ ॥ ८ ॥

१०७

देवदत्त पांचजन्यही गर्जला । नागास्त्र त्या काला सोडी पार्थ ॥१॥
नागपाशबद्ध सैनिक सकळ । जाहले दुर्बळ पलायना ॥ २ ॥
ऐशा सैनिकांचा मांडितां संहार । सुशर्मा गरुडास्त्र जपे वेगें ॥ ३ ॥
तदा ते सैनिक होती पाशमुक्त । सुशर्मा पार्थास विद्ध करी ॥ ४ ॥
रथामाजी पार्थ व्याकुळ होऊनि । पडतां येई ध्वनि, पार्थ मेला ॥
कौरवसैन्यांत होई सिंहनाद । इतुक्यांत पार्थ चाप ओढी ॥ ६ ॥
ऐंद्रास्त्रें संहार मांडिला अपार । कौरवांचा धीर सुटला तदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ सूर्यासम । तळपे विक्रम दावूनियां ॥ ८ ॥

अध्याय ५४ वा १०८

ऐसें संशप्तकां पाहूनि जर्जर । धांवे कौरवेंद्र साह्यालागीं ॥ १ ॥
कृतवर्मा, कृप, अश्वत्थामा, कर्ण । शकुनि सनंदन धांव घेती ॥ २ ॥
कृपाचार्य तदा ताडिती सृंजयां । शिखंडी आचार्यां अडवी वेगें ॥
पाहोनि तो हतबल धृष्टद्युम्न । लढतां ताडी बाण कृतवर्मा ॥ ४ ॥
गुरूवरी धांव घेई युधिष्ठिर । करी प्रतिकार अश्वत्थामा ॥ ५ ॥

नकुल, सहदेव तयावरी जातां । दुर्योधनचित्ता क्रोध येई ॥ ६ ॥
कौरवेंद्रावरी धांव घेई भीम । संग्राम दारुण ऐसा होई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शिखंडीसी विप्र । करूनि जर्जर त्रस्त करी ॥ ८ ॥

१०९

रथ-कवचहीन शिखंडी निश्चेष्ट । पाहूनि सुकेत पुढती धांवे ॥ १ ॥
परस्परां बहु ताडिती शरानें । गौतम क्रोधानें तप्त होई ॥ २ ॥
सुकेतूचा वध करी एक्या बाणें । बावरलीं सैन्यें पांडवांचीं ॥ ३ ॥
इकडे कृतवर्मा धृष्टद्युम्नावरी । वेगें चाल करी क्रोधावेशें ॥ ४ ॥
अंतीं कृतवर्म्यालागीं धृष्टद्युम्न । सारथीविहीन करीतसे ॥ ५ ॥
ऐसा पराभूत होतां कृतवर्मा । कौरववीरांना क्रोध येई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुनरपि वीर । धांवले समोर महाराणा ॥ ७ ॥

अध्याय ५५ वा

११०

द्रौपदेय तें सात्वत । रणीं रक्षिती धर्मास ॥ १ ॥
ऐशावेळीं अश्वत्थामा । करी दारुण विक्रमा ॥ २ ॥
नभ करी आच्छादित । भासे भरजरी छत ॥ ३ ॥
द्रोणपुत्राचें लाघव । बघतां वीरांसी विस्मय ॥ ४ ॥
पुढती धांवतां सात्यकि । विप्र करी विरथ त्यासी ॥ ५ ॥
अग्नीसम अश्वत्थामा । दग्ध करी पांडवसैन्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । तदा बोलला वचन ॥ ७ ॥

१११

गुरुपुत्रा, कैंवी त्यागिसी ममता । नाहीं कृतज्ञता तुजसी काय ॥१॥
नरव्याघ्रा, वध इच्छिसी तूं माझा । त्याग स्वधर्माचा करिसी कैंवी
दान, अध्ययन तैंवी तपश्चर्या । भूषण हें आर्या, तुजलागीं ॥ ३ ॥
विप्राधमा, नाममात्र तूं ब्राह्मण । करीं अवलोकन सैन्यनाश ॥ ४ ॥
गुरुपुत्र सत्य मानूनि हांसला । वर्षावचि केला प्रखर परी ॥ ५ ॥
अंतीं धर्मराज सोडूनियां रण । गांठी अन्यस्थान परम दुःखें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुनरपि धर्म । गर्जूनि दारुण युद्ध करी ॥ ७ ॥

अध्याय ५६ वा

११२

भीम-कर्ण पार्थ संशप्तकादिक । करिती घोर युद्ध धृतराष्ट्र ॥ १ ॥
संशप्तकां पार्थ, कौरवांसी भीम । पांचालांसी कर्ण यम भासे ॥ २ ॥
धृतराष्ट्राप्रति बोलला संजय । राया, होई क्षय तुझ्यायोगें ॥ ३ ॥
असो, दुर्योधन नकुल-सहदेवां । ताडी घोर शरां महाक्रोधें ॥ ४ ॥
धृतराष्ट्रा, तदा राजा दुर्योधन । प्रत्यक्षचि यम सकलां भासे ॥ ५ ॥
माद्रीपुत्रांवरी पाहूनि हें विघ्न । धांवे धृष्टद्युम्न तयास्थानीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्रुपदाचा पुत्र । तेंवी कौरवेंद्र लढती शौर्यें ॥ ७ ॥

११३

अडवी पार्षत दुर्योधनाप्रति । क्रोधें तो तयासी ताडी बाण ॥ १ ॥
ऐसे एकमेक झुंजले बहुत । भग्न तें कवच नृपाळाचें ॥ २ ॥
परी महावीरें पार्षताचें चाप । तोडूनि ललाट भेदियेलें ॥ ३ ॥
क्रोधें धृष्टद्युम्न फेंकी तदा बाण । करी रथहीन दुर्योधना ॥ ४ ॥
ध्वजहीन राव पाहूनि कौरव । धांवले सभय साह्यालागीं ॥ ५ ॥
दुर्योधनाप्रति तदा दंडधार । घेऊनि अन्यत्र जाई वेगें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इतुक्यांत कर्ण । सात्वता जिंकून धांव घेई ॥ ७ ॥

११४

गजावरी गज जेंवी धांव घेई । सात्वत तें येई कर्णावरी ॥ १ ॥
युद्धपराङ्मुख वीर तदा कोणी । नव्हताचि रणीं तयावेळीं ॥ २ ॥
कर्णावरी वीर पांचाल धांवती । गेले परलोकीं असंख्यात ॥ ३ ॥
भीष्म-द्रोणादिकां जाहलें न कर्म । दाविला विक्रम ऐसा कर्णें ॥ ४ ॥
कथूनि स्वनाम वधिलें वीरांसी । धाक पांचाळांसी बहुत झाला ॥
युधिष्ठिर तदा धांव घेई क्रोधें । परी कर्ण वेगें नायकेचि ॥ ६ ॥
भीमसेन तयावेळीं कौरवांसी । निर्दाळी क्रोधेंसी गर्जूनियां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दारुण संहार । करिती परस्पर वीर शौर्यें ॥ ८ ॥

११५

अन्यत्र अर्जुन म्हणे कृष्णाप्रति । पहा पळूनि जाती संसप्तक ॥ १ ॥
धर्मसैन्यामाजी फडके कर्णध्वज । जिंकील तयास कैंवी धर्म ॥ २ ॥

यास्तव अच्युता, योग्य तेंचि करीं । कृष्ण, त्वरा करीं म्हणे पार्थ
कपिध्वजयुक्त फाल्गुनाचा रथ । हांकिला त्वरित श्रीकृष्णानें ॥४॥
वनामाजी क्षुब्ध गजासम दोघे । भासले रायातें वीर श्रेष्ठ ॥ ५ ॥
दोन लक्ष सैन्यासवें संशप्तक । पाठवी त्वरित राव तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुदक्षिणवंधु । पुढती येतां वधु करी पार्थ ॥ ७ ॥

११६

संशप्तक तेंवी कांबोजसंहार । पाहूनियां घोर रण माजे ॥ १ ॥
अंतीं कौरवांची होई दाणादाण । तयावेळीं द्रोणपुत्र धांवे ॥ २ ॥
प्रलयदंडधारी यमासम भासे । विस्मय तैं वाटे श्रीकृष्णासी ॥ ३ ॥
तयापुढें बल न दिसे पार्थाचें । क्रोध श्रीकृष्णातें बहुत येई ॥ ४ ॥
कृष्ण म्हणे पार्था, वाटतें नवल । कैंवी हीनवल जाहलासी ॥ ५ ॥
गुरुपुत्र ऐसें मानूनि उपेक्षा । न करीं सर्वथा ऐशावेळीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्णाच्या वचनें । सोडिले पार्थानें घोर शर ॥ ७ ॥

११७

चाप, रथ, ध्वज, छत्रही तोडिलें । निश्चेष्ट पाडिलें द्रोणपुत्रा ॥ १ ॥
मूर्छित वीरासी घेऊनियां सूत । वेगें नेई रथ अन्यस्थळा ॥ २ ॥
तदा असंख्यात सैन्य कि दळिलें । प्रत्यक्ष पाहिलें दुर्योधनें ॥ ३ ॥
धृतराष्ट्राप्रति बोलला संजय । अनर्थाचें मूळ तूंचि एक ॥ ४ ॥
सर्वत्र यापरी चालला संहार । असह्य प्रहार धर्माप्रति ॥ ५ ॥
अंतीं तयालागीं असह्य वेदना । त्यागूनियां रणा दूर जाई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विश्रांति घ्यावया । जाई अन्य ठाया धर्म ऐसा ॥७॥

अध्याय ५७ वा ११८

दुर्योधन म्हणे कर्ण शल्यादिकां । आम्हां स्वर्गपंथा प्राप्त झाला ॥
जिंकितां, अवनी अथवा स्वर्गलाभ । आम्हां होई अद्य भाग्य जाणा
ऐकूनि क्षत्रिय होती प्रहर्षित । रणवाद्यनाद गगनीं कोंदे ॥ ३ ॥
द्रोणपुत्र अश्वत्थामा तैं गर्जून । प्रतिज्ञावचन उघड बोले ॥ ४ ॥
पितृघातकी या धृष्टद्युम्नाप्रति । वधीन मी आजी निश्चय हा ॥५॥

तरीच कवच उतरीन माझें । रक्षील तयातें तोही वध्य ॥ ६ ॥
प्रतिज्ञा ऐकूनि प्रवर्तले रणीं । बुडेल अवनी ऐसें वाटे ॥ ७ ॥
दिव्यमाला, गंध, रत्नेंही विविध । अप्सरा सानंद उधळिती तें ॥
वासुदेव म्हणे धन्य धन्य शब्द । ऐकूं येई स्पष्ट नभामाजी ॥ ९ ॥

अध्याय ५८ वा

११९

इकडे पार्थ श्रीकृष्णासी । पाहीं म्हणे निजसैन्यासी ॥ १ ॥
कर्णें संहार मांडिला । राव न दिसे मजला ॥ २ ॥
तृतीय भाग मात्र दिन । देवा, अवशिष्ट जाण ॥ ३ ॥
कोणी नसेचि वा येथें । धार्तराष्ट्र मजपुढें ॥ ४ ॥
दावीं मज धर्म, भीम । पुढती युद्ध मी करीन ॥ ५ ॥
कुशल जाणावें तयांचें । इच्छा हेचि अंतरातें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । फिरवी वेगें तें स्यंदन ॥ ७ ॥

१२०

धर्म-भीम जेथें पातले त्या ठाया । कृष्ण धनंजया वदला ऐका ॥१॥
अर्जुना, हा घोर पहावा संहार । जाणें कौरवेंद्र कारण त्या ॥ २ ॥
विखुरलीं पाहीं शस्त्रें रणांगणीं । वीरकबंधांनीं भरलें स्थान ॥ ३ ॥
अश्व-गजांचीं हीं पाहीं आभरणें । वीरांचीं भूषणें झळकती ॥ ४ ॥
कण्हती, कुंथती कोणी आक्रंदती । तृषार्तचि होती कोणी बहु ॥५॥
वासुदेव म्हणे महा रणभूमि । कृष्ण दावी रणीं पार्थालागीं ॥ ६ ॥

१२१

पार्थ धर्मभेटीलागीं उत्कंठित झाला ॥
गोविंदा, त्वरित दावीं म्हणे बांधवाला ॥ १ ॥
हांकीं देवा, अश्व वेगें ऐसी करी घाई ॥
कृष्ण युद्धमग्न धर्म, पार्थाप्रति दावी ॥ २ ॥
पहा म्हणे पार्था, कर्ण भासतो दावाग्नि ॥
भीम, धृष्टद्युम्नासवें येतसे धांवोनि ॥ ३ ॥
कौरवसैन्याची क्षणीं होई दाणादाण ॥
आंवरी चमूसी पाहीं निजशौर्यें कर्ण ॥ ४ ॥

अश्वत्थामा धृष्टद्युम्न झुंजती क्षणांत ॥
पहा धनंजया, होई सृंजयांचा नाश ॥ ५ ॥
पार्थ निजसैन्यामाजी पातला पाहूनि ॥
स्फूर्ति पांडवसैन्यातें धुंद होती रणीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे होई महाघोर युद्ध ॥
कारण नाशासी ऐसा एक अविवेक ॥ ७ ॥

अध्याय ५९ वा १२२

युधिष्ठिर-कर्ण लढती वेगानें । चाल धृष्टद्युम्नें तेथ केली ॥ १ ॥
जलप्रवाह जैं अडवी पर्वत । तैसा वीरश्रेष्ठ कर्ण भासे ॥ २ ॥
धृष्टद्युम्न-कर्ण लढले शौर्यानें । केलें सात्यकीनें साह्य तदा ॥ ३ ॥
कर्ण-सात्यकि तैं करिती घोरयुद्ध । ठाकती रोमांच पाहूनियां ॥ ४ ॥
इकडे अश्वत्थामा धृष्टद्युम्नावरी । क्रोधावेशें करी चाल वेगें ॥ ५ ॥
म्हणे हे ब्रह्मघ्ना, थांब तुझे प्राण । घेऊनि वचन करितों पूर्ण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे उभय विक्रमी । वीर महारणीं प्रवर्तले ॥ ७ ॥

१२३

धृष्टद्युम्न म्हणे नाममात्र विप्रा । वधिला त्वत्पिता वीर तो मी ॥१॥
तुजलागीं तेचि दावीन मी वाट । मजला न धाक लवही तुझा ॥२॥
ऐसें बोलूनियां कर्णाच्या समक्ष । ताडी गुरुपुत्रास धृष्टद्युम्न ॥ ३ ॥
एकाकी तैं कर्ण रोधी सकलांसी । वाटलें वीरांसी नवल तदा ॥४॥
धृष्टद्युम्नें चाप तोडिलें विप्राचें । अश्वत्थामा क्रोधें सोडी शर ॥५॥
चाप, शक्ति, गदा, रथ सारथ्याचा । क्षणीं नाश होतां धृष्टद्युम्न ॥
खड्ग, ढाल करीं घेऊनि धांवला । विस्मित जाहला वासुदेव ॥७॥

१२४

विक्रमी राधेय तोडूनियां ढाल । वीरासी विकल करी वेगें ॥ १ ॥
छिन्नगात्रही तो पडेना रणांत । तदा गुरुपुत्र पुढती धांवे ॥ २ ॥
माधव तैं प्रेमें बोलला पार्थासी । रक्षीं पार्षतासी आतां वेगें ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें हांकिलें अश्वांसी । ताडिलें शरेंसी पार्थें विप्रा ॥४॥
विव्हल तैं विप्र बैसला रथांत । नेई पार्षतास सहदेव ॥ ५ ॥

पार्थशरें चेष्टाहीन अश्वत्थामा। नेई अन्यस्थाना सूत तया ॥ ६ ॥
ऐसी कौरवांची उडवूनि त्रेधा। संशप्तकघाता जाई पार्थ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संशप्तक वीर। करिती निरंतर विघ्न पार्था ॥ ८ ॥

अध्याय ६० वा १२५

संशप्तकांवरी जातां मार्गामाजी। दाखवी पार्थासी कृष्ण धर्मा ॥
कृष्ण म्हणे धर्मा, कोंडिलें सर्वांनीं। धार्तराष्ट्र रणीं अस्त्रवेत्ते ॥ २ ॥
कर्णादिक तयां पातले साह्यासी। सर्वही बोलती वधा धर्मा ॥३॥
स्वस्थचि हा भीम पाहूनियां वाटे। खचित धर्मातें वधितील हे ॥
पहा पहा, पार्था, सर्वांच्या समक्ष। तोडियेला ध्वज कर्णें त्याचा ॥
दाणादाण झाली पांडवसैन्याची। राधेय विलोकी पार्था, तुज ॥
गांठ तुम्हां दोघां घडेल बा अद्य। करूनियां युद्ध शौर्य दावीं ॥७॥
वासुदेव म्हणे कृष्ण सांगे पार्था। सांगतों सुवार्ता तुजसी पर्थे ॥

१२६

पार्था, धर्मराज आहे सुरक्षित। धांवला साह्यार्थ भीम त्याच्या ॥
क्षणार्धांत सर्व रंग पालटला। संहार जाहला कौरवांचा ॥ २ ॥
प्रक्षुब्ध पांचाल मानसींचे हंस। करिती प्रवेश समरीं वेगें ॥ ३ ॥
कर्णादिक जरी करिती पराकाष्ठा। घातला गराडा पांचाळांसी ॥
निषादपति हा धांवे भीमावरी। गर्जना फोडिली भीमसेनें ॥ ५ ॥
आतां असह्यचि प्रतिकार त्याचा। साह्यार्थ पार्थाचा रथ धांवे ॥
वासुदेव म्हणे भीमार्जुन रणीं। यमासम दोन्हीं दिसती वीर ॥७॥

अध्याय ६१ वा १२७

सूत म्हणे राया खवळला कर्ण। सोडी दिव्य बाण सैन्यावरी ॥
व्याकुळ होऊनि पळाला शिखंडी। दुःशासन वेधी धृष्टद्युम्ना ॥२॥
वृषसेन सोडी नकुळावरी बाण। अंतीं पलायन केलें तेणें ॥ ३ ॥
उलूका सहदेव, सात्यकी सौबला। भीम कौरवेंद्रा पळवी वेगें ॥४॥
वृषादिक तदा बहुत खवळले। गजही लोटिले गजांवरी ॥ ५ ॥
भीमसेन तदा सिंहासम गर्जे। मर्दिलें गजांतें महाशौर्यें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कौरवांसी भीम। भासे रणीं यम प्रत्यक्षचि ॥ ७ ॥

अध्याय ६२ वा १२८

शुभ अश्व जया स्यंदनी जोडिले । लगाम खोंचिले नारायणें ॥ १ ॥
ऐशा रथीं पार्थ शोभे सूर्यासम । कौरवांचें सैन्य भया ... ॥ २ ॥
संधी पाहूनियां धांवे दुर्योधन । धर्मावरी बाण प्रखर सोडी ॥ ३ ॥
परी युधिष्ठिर सिंहासम क्षुब्ध । होऊनियां युद्ध करी शौर्यें ॥ ४ ॥
तदा तयावरी धांवला राधेय । सोडिले असह्य बाण तेणें ॥ ५ ॥
परी धर्मराज न हटे सर्वथा । सैन्य अवलोकितां भस्म करी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें कर्म । खवळला कर्ण बळिवंत ॥ ७ ॥

१२९

पिटाळूनि संरक्षक वीरांप्रति । कोंडिलें धर्मासी सूर्यपुत्रें ॥ १ ॥
धर्मही तयासी निवारी क्रोधानें । परी अंतीं कर्णे नवल केलें ॥ २ ॥
हांसूनियां 'कंकपत्र' एक बाण । सोडूनियां कर्म घोर करी ॥ ३ ॥
फोडूनियां वक्ष पाडिलें धर्मासी । वदला तो सूतासी नेई दूर ॥४॥
युधिष्ठिराप्रति धरा हाचि शब्द । उठला सर्वत्र रणामाजी ॥ ५ ॥
ऐकूनि केकय सप्तदशशत । धर्मरक्षणार्थ धांव घेती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीम-दुर्योधन । द्वंद्व रितीं संग्राम तयावेळीं ॥ ७ ॥

अध्याय ६३ वा १३०

कर्ण केकयांचें करी निर्दळण । मर्दिले स्यंदन पंचशत ॥ १ ॥
केकय तें जाती भीमाचिया आश्रया । तैं ज्येष्ठ पांडवा कर्ण गांठी ॥
घायाळ धर्मासी ताडी तीन शर । क्रोधें युधिष्ठिर फिरला मागें ॥
साह्यार्थ नकुळ धांवतां पुढती । करी उभयांसी विरथ कर्ण ॥ ४ ॥
सहदेवरथीं चढले तें दोघे । शल्य राधेयातें वदला तदा ॥ ५ ॥
कर्णा, पार्थासवें व्हावें आजि युद्ध । सामग्री हे व्यर्थ दवडिसी कां
वासुदेव म्हणे शल्याचें वचन । ऐकूनिही बाण ताडी कर्ण ॥ ७ ॥

१३१

व्याकुळ तैं धर्म त्यागी रणस्थान । पुनरपि वचन वदला शल्य ॥
कर्णा, धर्मवधहेतु व्यर्थ तुझा । वांधसील पार्था अपेक्षा हे ॥ २ ॥
कौरवेंद्र तेणें पावेल संतोष । सात्यकि पार्थास रक्षी पहा ॥ ३ ॥

कोंडिलें रागांसी पहा वृकोदरें । संरक्षीं आदरें तया आधीं ॥ ४ ॥
ऐकूनि तें कर्ण धांव घेई तेथें । धर्म शिबिरातें प्राप्त झाला ॥ ५ ॥
बांधवांसी म्हणे साह्य व्हा भीमासी । कोंडिलें तयासी कौरवांनीं ॥
मानूनि ते आज्ञा नकुळ-सहदेव । म्हणे वासुदेव समरीं गेले ॥ ७ ॥

अध्याय ६४ वा

१३२

सूत म्हणे राया, रणीं द्रोणपुत्र । पार्थावरी शर सोडी बहु ॥ १ ॥
शस्त्रास्त्र संग्राम जाहला अपूर्व । अश्वत्थामा वीर शौर्य दावी ॥ २ ॥
विस्फारित मुख काळचि भासला । आश्चर्य सकलां वाटे तदा ॥
खवळला पार्थ पाहूनि तें कर्म । भरलें रणस्थान रुधिरौघानें ॥ ४ ॥
द्रोणपुत्राअंगीं संचरलें शौर्य । दावी चमत्कार समरांगणीं ॥ ५ ॥
सारथी संपतां अश्वनियंत्रण । स्वयेंचि करून युद्ध करी ॥ ६ ॥
धनंजयें अंतीं केला हाहाःकार । कौरवांचा धीर सुटूनि गेला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पांडव गर्जले । शंख फुंकियेले उत्साहानें ॥ ८ ॥

१३३

पलायन पाही आपुल्या सैन्याचें । राव राधेयातें वदला तदा ॥ १ ॥
कर्णा, तुझ्यावरी विश्वास जयांचा । पहा त्या वीरांचा नाश होई ॥
उचित तें आतां करीं रे सन्मित्रा । ऐकूनियां वीरा क्रोध येई ॥ ३ ॥
हांसूनियां वीरें शल्यासी बाहिलें । आकर्ण ओढिलें विजयचाप ॥
चापआस्फालनें, प्रतिज्ञावचनें । फिरविलीं सैन्यें करूनि पण ॥ ५ ॥
भार्गवास्त्र घोर सोडी महावीर । होई अंधःकार समरीं तदा ॥ ६ ॥
त्राहि, त्राहि कृष्णा, अर्जुना, हे वाणी । आर्तनाद कर्णीं एकचि हा ॥
वासुदेव म्हणे पार्थ श्रीकृष्णासी । पाहूनि कर्णासी वदला ऐका ॥

१३४

महाबाहो कृष्णा, भार्गवास्त्र घोर । संहार हा उग्र करी पहा ॥ १ ॥
प्रत्यक्ष हा यम भासतो मजसी । जयापजयाची आशा नसे ॥ २ ॥
कृष्ण म्हणे पार्था, आश्वासन धर्मा । देऊनि विक्रमा पुढती दावीं ॥
बोलूनियां ऐसें वळवी निज रथ । अंतरीं कर्णास श्रमू द्यावें ॥ ४ ॥
श्रांत होतां कर्ण करितां प्रयत्न । जिंकील अर्जुन सहज तया ॥ ५ ॥

चिंतूनियां ऐसें शोधितां धर्मासी । न दिसे कृष्णासी धर्म रणीं ॥६॥
वासुदेव म्हणे सर्वज्ञ श्रीहरि । संकट निवारी सद्भक्तांचें ॥ ७ ॥

अध्याय ६५ वा १३५

शोधित शोधित भीमालागीं पार्थ । धर्मराजवृत्त पुशीतसे ॥ १ ॥
भीम म्हणे पार्था, कर्णशरविद्ध । जिवंत कीं मृत न कळे राव ॥२॥
पार्थ म्हणे भीमा, जाऊनि शिबिरीं । वृत्तांत सत्वरीं कळवीं मज ॥
असेल विव्हल राजा शिबिरांत । कर्णशराघात असह्य त्या ॥ ४ ॥
भीम म्हणे भ्याड म्हणतील मज । जाईं तूं शिबिरांत चिंता सोडीं
संशप्तकादिकां मीचि निवारीन । देऊनि स्फुरण कृष्ण जाई ॥ ६ ॥
शिबिरीं धर्मासी भेटती ते दोघे । धर्माच्या चित्तातें मोद वाटे ॥७॥
वधूनि कर्णासी पातलेसें मानी । गौरवोद्गारांनीं सन्मानी त्यां ॥८॥
वासुदेव म्हणे अपेक्षा भंगतां । चित्तप्रक्षोभता सहज येई ॥ ९ ॥

अध्याय ६६ वा १३६

धर्म म्हणे कृष्णा, अर्जुना, स्वागत । असावें, आनंद मजसी बहु ॥
वधूनि कर्णासी पातलांती सुखें । देहें अव्यथितें हेंचि भाग्य ॥ २ ॥
शस्त्रास्त्रवेत्ता तो कर्ण कौरवांसी । एकमेव जगीं धीर होता ॥ ३ ॥
भार्गवकृपेनें होता तो अजिंक्य । कौरवांचा नित्य साह्यकारी ॥४॥
जिंकूनि मजसी ताडिलें वाग्बाण । वांचविले प्राण भीमसेनें ॥ ५ ॥
त्रयोदशवर्षें झालों निद्राहीन । दिसला रात्रंदिन कर्ण मज ॥ ६ ॥
अवमान अद्य असह्य जाहला । व्यर्थचि राहिला प्राण वाटे ॥ ७ ॥
याजसाठीं क्षेम कथावें मजसी । कैसें वधिलेंती सूतपुत्रा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आनंदित धर्म । घडलें न कर्म तेंचि पुशी ॥ ९ ॥

१३७

अद्वितीय योद्धा कौरवेंद्राधार । तयाचा संहार घडला कैंवी ॥ १ ॥
उपाय कोणता कथीं योजिलासी । पार्था, कर्णाप्रति वधावया ॥२॥
सर्वांसमक्ष तूं मस्तक तयाचें । छेदिलेंसी कैसें सांगें वीरा ॥ ३ ॥
दावील जो पार्था अर्पीन त्या धन । जयाचें वचन वधिलेंसी त्या ॥
पार्थवधार्थ जो सर्वकाळ सिद्ध । कैंवी त्याचा वध केला पार्था ॥

निवेदिलें दुःख स्मरूनि तुजसी । पडतां संकटीं घडलें तेंचि ॥ ६ ॥
सभेमाजी आम्हां वदला जो षंढ । संहार रणांत घडला त्याचा ॥
अपमान जेणें केला द्रौपदीचा । तैसाचि भीष्मांचा, वधिलें त्यासी ॥
क्रोधज्वाला मम शांत करीं पार्था । वैकर्तनवधा उच्चारूनि ॥ ९ ॥
वृत्रवधासम चिंता मजप्रति । वासुदेव कथी धर्मभाव ॥ १० ॥

अध्याय ६७ वा १३८

पार्थ म्हणे राया, अद्य अश्वत्थामा । अलौकिक कर्मा लढला रणीं ॥
तयासवें युद्ध मांडिलें दारुण । वृत्त निवेदन सकल केलें ॥ २ ॥
राधेयानें केला वीरांचा संहार । पालटलें सर्व वधतां आम्हीं ॥ ३ ॥
भार्गवास्त्र त्याचें निवारील कोण । राया, मजवीण सांग रणीं ॥४॥
ऐकिलें तुजसी ताडिलें म्हणोनि । पातलों या स्थानीं दर्शनार्थ ॥
अद्य कर्णवध न करीन जरी । पातकी मी तरी खचित राया ॥ ६ ॥
आशीर्वाद मज देई राजश्रेष्ठा । पहा राधेयाचा करितों वध ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नाहीं कर्णवध । जाहला हें वृत्त कळलें धर्मा ॥ ८ ॥

अध्याय ६८ वा १३९

कर्ण अद्यापि जिवंत । कळतां धर्मासी हें वृत्त ॥ १ ॥
क्रोधावेशें वदला पार्था । शिबिरीं पातलासी कैसा ॥ २ ॥
भयाभीत झालें सैन्य । एकाकी तो रणीं भीम ॥ ३ ॥
जीवरक्षणार्थ कैसा । शिबिरीं पातलासी पार्था ॥ ४ ॥
व्यर्थ पृथेचें उदर । अर्जुना, तूं केलें भ्रष्ट ॥ ५ ॥
एकाकीच वधिन कर्णा । वदलासी तें वचना ॥ ६ ॥
धीर सोडिसील ऐसें । कळतें जरी पूर्वीं मातें ॥ ७ ॥
अन्य करूनि योजना । प्रवर्ततों मी संग्रामा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । बोले कठोर वचन ॥ ९ ॥

१४०

पार्था, भग्न माझी नाव खडकावरी । करूनि अंतरीं सौख्य तुज ॥
आमिषरूपानें यावा गळ हातीं । पार्था, तैंवी स्थिति प्राप्त आम्हां ॥
आजवरी एक धरियेली आशा । दुर्दिवल जैसा पर्जन्याची ॥ ३ ॥

परी मूढा, आम्हां लोटिलें नरकांत । सर्व आशीर्वाद व्यर्थ गेले ॥
सप्तमदिनीं ते झाली नभोवाणी । कांतिमान जनीं चंद्रचि हा ॥ ५ ॥
वायूसम वेग स्थैर्य मेरूसम । शांति पृथ्वीसम तेजें सूर्य ॥ ६ ॥
संपन्न कुबेर, इंद्रासम शौर्य । अदितीचा पुत्र शत्रूंसी हा ॥ ७ ॥
शत्रूंचा संहार करूनियां वीर । वंश हा स्थापील शूरांचाचि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कथूनि हें धर्म । वदला वचन व्यथित चित्तें ॥ ९ ॥

१४१

आजवरी बहु ऋषीही बोलले । मिथ्याचि तें झालें सकळ वाटे ॥
'प्रत्यक्ष संगरीं ठरेल हा भ्याड' । दुर्योधन वाक्य स्मरतें आजी ॥
कृष्णा, अद्य माझी घोर विटंबना । मानिलें अर्जुना अजिंक्य मी ॥
असता जरी अद्य अभिमन्यु बाळ । नच येती वेळ ऐसी कदा ॥ ४ ॥
अथवा या समयीं असता घटोत्कच । विजय निश्चित प्राप्त होता
असहाय अद्य जाहलों मी हाय । दीन शोचनीय जाहलों मी ॥ ६ ॥
विपत्तींत लोटी तो कैंवी बांधव । आप्ताचें कर्तव्य साह्य होणें ॥
वासुदेव म्हणे दुःखाकुल धर्म । निराश होऊन वदला बहु ॥ ८ ॥

१४२

कपिध्वजा, तुझा दिव्य हा स्यंदन । सारथी श्रीकृष्णा जगन्नाथ ॥
दिव्य धनु तुझें अक्षय्य तूणीर । सोडिलासी धीर नवल वाटे ॥
अर्पितासी जरी गांडीव कृष्णासी । वधिता कर्णासी निश्चयें तो ॥
देईं अन्या कोणा गांडीव हे पार्था । आधार आमुचा होवो कोणी ॥
दुरात्म्या, आलासी त्यजूनि संग्राम । गर्भांत पतन ठरतें योग्य ॥
रथ, वीर्य, चाप, ध्वजस्थ तो वीर । करितों धिक्कार सकलांचा मी
वासुदेव म्हणे एका मागें एक । आपत्तींचा वेग बहुधा जनीं ॥ ७ ॥

अध्याय ६९ वा

१४३

ऐकूनियां पार्थ धर्माचें वचन । खड्ग कोशांतून क्रोधें खेंची ॥ १ ॥
पाहूनि तें कृष्ण म्हणे काय पार्था । आणियेलें चित्ता सांगें मज ॥
रायाचें कुशल कळलें आतां रणीं । सत्वरीं जाऊनि कार्य साधीं ॥

नकळे या स्थळीं वधिसी कोणातें । भ्रम कीं चित्तातें पडला तुझ्या
ऐकूनियां पार्थ सक्रोध धर्मासी । पाहूनि कृष्णासी वदला ऐका ॥
गोविंदा, 'गांडीव अन्यासी दे' ऐसें । वदेल तयातें वधीन मी ॥ ६ ॥
गुप्त ऐसा आज्ञा पण पावे भंग । कृष्णा, दावीं मार्ग काय करूं ॥७॥
वासुदेव म्हणे अर्जुनासी पेंच । वधावें धर्मास हेंचि प्राप्त ॥ ८ ॥

१४४

ऐकूनियां कृष्ण धिक्कारूनि पार्था । अविचार कैसा करिसी म्हणे ॥
अकालीं हा क्रोध पाहूनि वाटतें । वृद्धसेवा तूतें घडली नाहीं ॥ २ ॥
आचरावें कदा निषिद्धही कर्म । जाणूनियां वर्म त्यजावें कीं ॥ ३ ॥
ऐसा हा विभाग न कळे जयासी । अधम तयासी म्हणती ज्ञाते ॥४॥
कार्याकार्यज्ञान सुलभ न पार्था । नेणसी वेदार्था स्पष्ट दिसे ॥ ५ ॥
अनृताहूनि हे हिंसा निंद्य बापा । ज्येष्ठबंधू वधा इच्छिसी कीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मूर्तिमंत ज्ञान । कृष्णभगवान वदला ऐका ॥ ७ ॥

१४५

अयुध्यमान कीं युद्धपरांङमुख । अथवा पलाइत शरण कींजो ॥ १ ॥
प्रपन्न, प्रमत्त अथवा जो कोणी । अवध्य तो जनीं सज्जनांसी ॥ २ ॥
सर्व हीं लक्षणें राजाचिया ठाईं । अवध्याचि पाहीं सर्वथा तो ॥३॥
अविवेकें पण केलासी हें जाण । धर्मतत्त्व सूक्ष्म न कळे तुज ॥ ४॥
वंद्य श्रेष्ठावरी धांवूनियां जासी । या निंद्यकृतीची लाज धरीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निवेदी अच्युत । गूढ धर्मतत्व अर्जुनासी ॥ ६ ॥

१४६

रहस्य धर्माचें चित्त देऊनियां । ऐक धनंजया, कथितों तुज ॥ १ ॥
असत्य तें सत्य, सत्यही । असत्य । संकटीं हितार्थ वदणें लागे ॥२
विवाह, संभोग अथवा प्राणात्यय । किंवा द्रव्यक्षय प्राप्त होतां ॥३
विप्रहितार्थ कीं वदावें अनृत । अनृतें हीं पंच पापहीन ॥ ४ ॥
सत्यानृताचा हा निर्णय कठीण । जाणे तोचि धन्य धर्मवेत्ता ॥ ५ ॥
अंधवधें पुण्य जोडिलें बलाकें । जोडिलें कौशिकें धर्में पाप ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पार्थप्रश्नें कृष्ण । करी निवेदन वृत्त तेंचि ॥ ७ ॥

---

१ तोल सुटलेला

१४७

कोणी एक व्याध नाम ज्या बलाक । उपजीवनार्थ मृगया करी ॥
वृद्ध माता-पिता तैं अन्य आश्रितां । सांभाळी तत्वतां सन्मार्गानें ॥
अनसूयक तो स्वधर्मनिरत । एकदां तयास न मिळे मृग ॥ ३ ॥
अदृष्टपूर्व त्या दिसलें श्वापद । घ्राणचक्षु, आप प्राशीतसे ॥ ४ ॥
वधितां तयासी पुष्पवृष्टि होई । विमानहि येई व्याधास्तव ॥ ५ ॥
सर्वभूतनाशास्तव तें श्वापद । करूनियां तप वळी झालें ॥ ६ ॥
वर, अंधत्वही दिधलें त्या ब्रह्मयानें । दुष्टवधपुण्यें व्याधा स्वर्ग ॥७॥
वासुदेव म्हणे हिंसा ते अहिंसा दावी कृष्ण पार्था ऐशा रीती ॥

१४८

कृष्ण कथी वृत्त कौशिकाचें पार्था । वास संगमीं त्या ग्रामाजवळी
नव्हता बहुश्रुत परी सत्यव्रत । जाहला विख्यात सत्यवादी ॥ २ ॥
एकदां तस्करभयें कांहीं जन । बैसले येऊन वनामाजी ॥ ३ ॥
वृत्त त्यांचें दस्यु पुशितां कौशिका । वदे सत्यवक्ता घडलें तेंचि ॥
ऐकूनि तस्कर जावूनि वनांत । करिती क्रूरकृत्य वधिती जनां ॥५॥
सत्यभाषणें त्या नरक कौशिका । वासुदेव कथा कथन करी ॥ ६ ॥

१४९

अल्पश्रुत मूढ नेणें हा विवेक । न पुशी ज्ञात्यास कदाकाळीं ॥ १ ॥
अधःपात त्याचा ऐशा गुणें होई । धर्मतत्व घेई ध्यानीं पार्था ॥ २ ॥
दुष्कर तें ज्ञान जाणावें तर्कानें । केवळ श्रुतीनें नै कळे सर्व ॥ ३ ॥
भूतप्रभवार्थ निवेदिला धर्म । सर्वत्र हें वर्म कथिलें वेदें ॥ ४ ॥
परपीडा कदां न घडो हा धर्म । स्वरूप, बंधन जाण त्याचें ॥ ५ ॥
बंधन सर्वांसी जाण ते धारणा । धारकता धर्मा आवश्यक ॥ ६ ॥
श्रुतिवचनें तें धारकता ज्ञान । अथवा नियम अहिंसेचा ॥ ७ ॥
परपीडा जेणें न घडे तो धर्म । वेदाचें वचन न लाभतां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे स्वैर जो निर्णय । तोचि वेदबाह्य म्हणती ज्ञाते ॥ ९॥

---

१ घ्राण हेच ज्याचे नेत्र आहेत असा.

१५०

केवळ रूढीतें प्रमाण मानोनि। अव्हेरिती कोणी वेदवाक्य ॥ १ ॥
परी सर्वथा तें अनुचित कर्म। न पाहावें वदन ऐसीयांचें ॥ २ ॥
प्रत्यक्षाप्रत्यक्ष वेदाचा आधार। नसतां निराधार नियम तो ॥ ॥ ॥
स्वैर तो नियम आग्राह्य मानवा। नियम भंगावा अहितकारी ॥ ४ ॥
प्रारंभूनिव्रत एका उद्देशानें। समर्थितां अन्यें निष्फळ ते ॥ ५ ॥
सर्वज्ञातिध अथवा प्राणात्यय। थट्टेचा समय प्राप्त होतां ॥ ६ ॥
मिथ्या भाषणाचा दोष न सर्वथा,। तस्करें गांठितां शपथ घ्यावी
पापीजनांलागीं शक्य ते प्रयत्न। करूनियां धन देऊं नये ॥ ८ ॥
अर्पितां, ज्ञात्यासी पीडील तो दुष्ट। धर्मार्थ अनृत, अनृत नव्हे ॥
कथिले हितार्थ धर्माचे हे मंत्र। सांगे काय वध्य धर्म पार्था ॥ १० ॥
वासुदेव म्हणे अमृताचा अर्क। निवेदी प्रत्यक्ष जगन्नाथ ॥ ११ ॥

१५१

पार्थ म्हणे ज्ञाता वदेल अच्युता। तेंचि त्वां सर्वथा कथिलें मज ॥
सर्वज्ञ तूं देवा, आधार मजसी। माता-पिता तूंचि धर्ममूर्ति ॥ - ॥
अवध्यचि धर्म जाहला निश्चय। परी करूं काय न कळे मज ॥३॥
अंतरींचें देवा कथितों, भीमासी। वदतां 'अघाशी' क्रोध जेंवी ॥
तैसेंचि गांडीव देई अन्याप्रति। वदेल तयासी वधीन मी ॥ ५ ॥
ऐसें व्रत, परी वधितां धर्मासी। नसे जीविताची आशा मज ॥ ६ ॥
परी धर्मवधइच्छा याचि दोषें। बुद्धि, वीर्य माझें नष्ट होई ॥ ७ ॥
नष्ट तें न व्हावें, व्रत न भंगावें। मरण न यावें आम्हां कोणा ॥ ८ ॥
ऐसा देवा मज कथावा उपाय। म्हणे वासुदेव पुढती एका ॥ ९ ॥

१५२

घायाळ, विव्हल श्रांत धर्मराज। बोलला हें तुज घ्यानीं धरीं ॥१॥
न घडेचि जेव्हां क्षोभाविण कार्य। निरुपायें आर्य वदती ऐसें ॥२॥
कार्यार्थ मी आतां कथितों तुज युक्ति। अवमान थोरासी मरणासम
अवमानें ज्ञाता जिवंतचि मृत। मानार्ह जिवंत सन्मानेंचि ॥ ४ ॥
एक वचनें तूं संबोधीं धर्मासी। वध अवधेंचि तेणें त्याचा ॥ ५ ॥

आंगिरस श्रुति आधार या कर्मा । निःशंकचि धर्मा आचरीं या ॥
अवधेंचि वध करूनियां दुःख । देईं तूं धर्मास ऐशा रीति ॥ ७ ॥
पुढती चरण वंदूनियां त्याचे । नम्रभावें मागें पुढती क्षमा ॥ ८ ॥
मर्मज्ञ तो हेतु जाणूनि क्षमील । त्वत्कार्य साधेल ऐशारीति ॥ ९ ॥
पुढती उत्साहें कर्णाप्रति वधीं । वासुदेव वंदी कृष्णालागीं ॥ १० ॥

अध्याय ७० वा

१५३

सूत म्हणे राया, युक्ति हे कृष्णाची । मानली पार्थासी ऐकतांचि ॥
पुढती आजवरी नव्हता जें बोलला । पार्थ तें वदला धर्माप्रति ॥२॥
म्हणे राया, रण सोडूनियां दूर । वदसी हे उच्चार न शोभती ॥
महावीर भीम वदेल हें जरी । मानीन मी तरी वचन त्याचें ॥ ४ ॥
गर्जूनि उडवी शत्रूची गाळण । वीर रणीं धन्य तोचि एक ॥ ५ ॥
नित्य सुहृदांनीं रक्षावें ज्या तुज । न शोभे त्या तुज वचन ऐसें ॥
वाचिवीर्य विप्रासम तूं बोलसी । नसे बाहूमाजी शौर्य कांहीं ॥७॥
आत्मसदृशचि मज मानितोसी । निर्दयता तुझी कळली अद्य ॥८॥
वासुदेव म्हणे वदे धनंजय । कठोर हृदय करूनि ऐका ॥ ९ ॥

१५४

पुत्रदारादिकां लेखूनियां तुच्छ । लढतों रणांत तुझ्यासाठीं ॥ १ ॥
ऐसेंही असूनि करिसी वाक्ताडन । काय सौख्य जाण अर्पिसील ॥
लोळतचि शय्येवरी द्रौपदीच्या । कठोर हे वाचा वदसी मज ॥३॥
शिखंडीरक्षणें केला भीष्मघात । परी राज्यलाभ न घडो तुज ॥४॥
केवळ जुगारें प्राप्त हा प्रसंग । छिन्नभिन्न अंग वीर बहु ॥ ५ ॥
मंदभाग्या, ऐशा शब्दांचे प्रतोद । ताडूनियां मज न करीं क्षुब्ध ॥
वासुदेव म्हणे विदारक वाणी । वदतां उद्वेगूनि द्रवला पार्थ ॥ ७ ॥

१५५

झाला खेद पश्चात्ताप । तळमळूनि खेंची खड्ग ॥ १ ॥
पाहूनि तें शारङ्गधर । वदे तळपे कां तलवार ॥ २ ॥
ऐकूनियां वदला पार्थ । हेंचि मजसी प्रायश्चित्त ॥ ३ ॥
कृष्ण म्हणे आत्मघात । सकल पापांहूनि पाप ॥ ४ ॥

करितां निंदाचि केवळ । जाहलासी तूं व्याकुळ ॥ ५ ॥
शिरच्छेदें काय होतें । पुशीं आपुल्या मनातें ॥ ६ ॥
आतां करीं आत्मस्तुति । तेचि हत्या जाण तुझी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण-। वचनें, तोषला अर्जुन ॥ ८ ॥

१५६

पार्थ म्हणे धर्मा, शंकरावांचूनि । मजसम कोणी वीर नसे ॥ १ ॥
अवघें चराचर जिंकीन क्षणांत । वधिले रणांत वीर मीचि ॥ २ ॥
रथध्वजाचिन्हें चरणावरी माझ्या । जिंकी मज ऐसा नसे वीर ॥३॥
पात्रापात्र जरी चिंतितों अंतरीं । भस्म हे धरित्री अवघी होती ॥४॥
अद्य निपुत्रिक जाण कर्णमाता । अथवा मम माता सत्य राया ॥५॥
बोलूनियां ऐसे वंदूनि धर्मासी । त्यागूनि शस्त्रांसी शरण गेला ॥
याचूनियां क्षमा वदे राया, धर्मा । वदलों त्या कारणा जाणसील ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । दृढ चरणातें धरी पार्थ ॥ ८ ॥

१५७

क्रुद्ध युधिष्ठिर त्यागूनियां शय्या । बोले धनंजया वधीं मज ॥ १ ॥
कुलांगार धर्म छळितो तुम्हांसी । भ्याड मी आळशी, दुष्ट, षंढ ॥
काय लाभ माझी पाहूनियां आज्ञा । राज्यपद भीमा सुखें लाभो ॥
मानखंडणा ही सहे मजसी । ज्ञातों वनामाजी विटलों प्राणां ॥
बोलूनियां ऐसें, निघाला वेगानें । चरण श्रीकृष्णानें धरिले तदा ॥
पार्थाची प्रतिज्ञा प्रेमें निवेदूनि । अवमान चिंतूनि केला म्हणे ॥६॥
धर्मा, तुज आतां याचीतसों क्षमा । अन्य मार्ग आम्हां नव्हता कांहीं
धनंजय अद्य वधील कर्णासी । जाण निश्चयेंसी न धरीं शंका ॥८॥
वासुदेव म्हणे कृष्णासी उठवूनि । जोडूनियां पाणी वदला धर्म ॥

१५८

कृष्णा, लंघिली मर्यादा । सत्य सत्य मी गोविंदा ॥ १ ॥
संकटीं या आम्हांप्रति । देवा, त्वांचि रक्षिलेंसी ॥ २ ॥
घोर अनर्थ टळला । नौका झालासी गोपाळा ॥ ३ ॥
शोकार्णवीं बुडतां अद्य । झालों होतों बुद्धिभ्रष्ट ॥ ४ ॥

अच्युता, तूं आम्हां त्राता । संकटांत ज्ञानदाता ॥ ५ ।
घोर टळलें संकट । धर्म जाहला सद्गद ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । संकटांत कृपा रक्षी ॥ ७ ॥

अध्याय ७१ वा १५९

धर्मचरणीं तदा ठेऊनि मस्तक । ढळढळां पार्थ रूदन करी ॥ १ ॥
उचलूनि धर्म आलिंगी तयासी । अश्रु लोचनासी येती त्याच्या ॥
उभयहि भ्राते रडती ढळढळां । कांहीं काळ गेला ऐशापरी ॥ ३ ॥
आलिंगूनि धर्म बोलला अर्जुना । वधिसी जरी कर्णा तरिच सौख्य
घडेना हें तरी जातील हे प्राण । दुःखें या जगून काय लाभ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्माच्या वचनें । बोले आवेशानें पार्थ ऐका ॥ ६ ॥

१६०

राया, सत्याची धर्माची । शपथ नकुळ सहदेवाची ॥१॥
तुझी, भीमाची घेऊन । कथितों कर्णासी वधीन ॥ २ ॥
अथवा त्यागीन देहातें । आजि दिसेल सर्वांतें ॥ ३ ॥
करूनियां हे प्रतिज्ञा । वदला अर्जुन श्रीकृष्णा ॥ ४ ॥
दावीं योग्य मार्ग मातें । असो कल्याण बा तुझें ॥५॥
कृष्ण म्हणे धनुर्धरा । तूंचि समर्थ या कार्या ॥ ६ ॥
राया, पार्थाच्या विजयार्थ । प्रेमें देईं आशीर्वाद ॥ ७ ॥
तुझी आर्तता ऐकूनि । आलों या स्थळीं धांवूनि ॥ ८ ॥
सुखरूप पाहूनि तुज । आतां वधिल कर्णा पार्थ ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे तदा । प्रेमें वदला मे पार्था ॥ १० ॥

१६१

ये ये पार्था, मज देईं आलिंगन । वदलासी वचन श्रेयस्कर ॥ १ ॥
वास्तव तुजसी क्षमिलें अर्जुना । जा तुज अनुज्ञा असे माझी ॥ २ ॥
निष्ठुर भाषणें मानूं नको क्रोध । पार्थ तदा दृढ चरण धरी ॥ ३ ॥
प्रेमार्द्र यापरी भेटती बांधव । आलिंगूनि राव हृदयीं धरी ॥ ४ ॥
म्हणे महाबाहो, सन्मानिलें मज । मेळवीं वैभव विजयलाभें ॥ ५ ॥
पायांची शपथ घेऊनियां पार्थ । म्हणे कर्णवध करिन आजी ॥ ६ ॥

प्रसन्न नृपाळ देई आशीर्वाद । होवो आयुर्लाभ विजय कीर्ति ॥७॥
वाढवोत भाग्य सकल देवता । जा वध कर्णाचा करीं शौर्यें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बहु आशीर्वाद । देऊनि पार्थास सुखवी धर्म ॥ ९ ॥

अध्याय ७२ वा १६२

सूत म्हणे राया, धर्मासी प्रसन्न । पाहूनि अर्जुन हृष्ट झाला ॥ १ ॥
कृष्णाप्रति म्हणे रथ सिद्ध करीं । शस्त्रास्त्र सामग्री सज्ज असो ॥
दारुकानें सिद्ध करितां स्यंदन । पुण्याहवाचन करिती विप्र ॥ ३ ॥
आशीर्वाद धर्म देई अर्जुनासी । शोभे रथामाजी धनंजय ॥ ४ ॥
उत्तम शकुन होती पार्थाप्रति । परी धाक चित्तीं वाटे तया ॥ ५ ॥
चिंतायुक्त चित्तें होई घामाघूम । पाहूनियां कृष्ण वदला प्रेमें ॥ ६ ॥
पार्था, तुझ्यासम पाहिला न वीर । अलौकिक धैर्य समरीं तुझें ॥
वासुदेव म्हणे पार्थाचा विक्रम । गाऊनियां कृष्ण स्फूर्ति देई ॥ ८ ॥

१६३

महा विक्रमी तूं अजिंक्य हे पार्था । परी ऐक पथ्या कथितों प्रेमें ॥
श्रेष्ठचि बा, कर्ण वाटे रतिमात्र । सावधानचित्त असो सदा ॥ २ ॥
तेज अग्नीसम, वेग वायूसम । क्रोध यमासम राधेयाचा ॥ ३ ॥
सिंहासम बळी, आठ हात उंच । आजानु बाहु तो महायोद्धा ॥४॥
एक मात्र तूंचि वधिसील तया । जाण धनंजया, जगामाजी ॥ ५ ॥
ऐशा महावीरा संग्रामीं वधूनि । यश संपादूनि सुखवीं धर्मा ॥६॥
कौरवांचा धीर, व्याघ्रचि तो मानीं । जिव्हा धरीं ध्यानीं खड्ग त्याचें
बाण त्याचि दंष्ट्रा, वदन तें चाप । महावेग, दर्प, जाण त्याचा ॥८॥
पार्था, कर्णगजा वधीं सिंहासम । पाहो दुर्योधन शौर्य तुझें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण जगन्नाथ । ऐसें स्फूर्तिप्रद वदला पार्था ॥१०॥

अध्याय ७३ वा १६४

कृष्ण म्हणे पार्था, सप्तदश दिन । चाललें दारुण युद्ध रणीं ॥ १ ॥
उभय सैन्यांचा जाहला संहार । कौरवांचे वीर पडले बहु ॥ २ ॥
भीष्म-द्रोण, पार्था अजिंक्याचि होते । पराजय त्यांतें तुझ्यामुळें ॥
जयद्रथवधें आश्चर्य त्वां केलें । नाहींच पाहिलें रण ऐसें ॥ ४ ॥

सूर्य,चंद्र किंवा तारकाविहीन । आकाशासमान कौरवसेना ॥ ५ ॥
दुष्टबुद्धि कर्ण सर्वपापमूळ । उच्छेद समूळ करीं त्याचा ॥ ६ ॥
'कमलनयने अन्य पती वरीं । षंढ हे दरिद्रि पांडव ' म्हणे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण पार्थाप्रति । देई पूर्वस्मृति पेशापरी ॥ ८ ॥

१६५

पार्था, तुझे बाण कर्णाचें मस्तक । छेदूनि कृतार्थ होवोत हे ॥ १ ॥
कौरवांसी येवो दैन्य आजि रणीं । समर सांडोनि जावो शल्य ॥२॥
दुर्योधन होवो निराश अंतरीं । भिस्त कर्णावरी सर्व त्याची ॥ ३ ॥
अर्जुना, कर्णानें कोंडिले पांचाळ । पहा हा नकुळ त्रस्त झाला ॥४॥
भार्गवास्त्र जाळी पहा हें सैन्यासी । आधार तयासी तूंचि एक ॥
सत्य सत्य पार्था, शपथपूर्वक । जगीं तूं अजिक्य वधीं कर्णा ॥५॥
वासुदेव म्हणे यापरी अच्युत । स्फूर्ति वृद्धिंगत करीतसे ॥ ७ ॥

अध्याय ७४ वा

१६६

कृष्णवचनें पार्थासी । लाभली तैं महास्फूर्ति ॥ १ ॥
केलें चापआस्फालन । वदला विनम्र वचन ॥ २ ॥
देवा, तूं माझा आधार । कर्ता करविता साचार ॥ ३ ॥
प्रभो, तुझ्याचि प्रसादें । विजय लाभेल आम्हांतें ॥ ४ ॥
होतां विरोध विश्वाचा । सांभाळील तुझी कृपा ॥ ५ ॥
काय बापुडा हा कर्ण । साह्य असतां जनार्दन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । कर्णवधासी उत्सुक ॥ ७ ॥

१६७

पहा, पहा, कृष्णा, कैसें भार्गवास्त्र । करितें संहार पांचाळांचा ॥१॥
आतां या प्रसंगीं दावीन विक्रम । कर्णासी धाडीन यमलोकीं ॥ २ ॥
यावच्चंद्र-सूर्य अथवा मेदिनी । गातील हे जनीं कथा लोक ॥ ३ ॥
ऐसा अलौकिक दावीन विक्रम । जेणें दुर्योधन पस्तावेल ॥ ४ ॥
प्राशील हे धरा अद्य कर्णरक्त । तयाचें दुरुक्त स्मरेल त्या ॥ ५ ॥
कोण ? कैसे ? आजी ठरेल पांडव । होईल निर्णय अंतिमचि ॥ ६ ॥

होतां निराधार कौरव सकळ । करील हळहळ ससुत अंध ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्फूर्तिभरें पार्थ । बोले गोविंदास ऐशापरी ॥ ८ ॥

१६८

होईल आनंद धर्मराजाप्रति । मांसादे पक्ष्यांसी मेजवानी ॥ १ ॥
संहारीन सर्व 'बालकाचे' वैरी । आनंद अंतरीं भीमादिकां ॥ २ ॥
धृष्टद्युम्नादिक तैसाचि सात्यकि । पाहीन मी सुखी कर्णवधें ॥ ३ ॥
विक्रमाची माझ्या तदा पुनरपि । गाईन थोरवी देवा, प्रेमें ॥ ४ ॥
देवा, वीर अन्य नसे मजसम । चिन्हें अवलोकन करीं माझीं ॥ ५ ॥
ध्वज-रथचिन्हें चरणावरी माझ्या । पहा हीं गोविंदा कथितां शौर्य
वासुदेव म्हणे गर्जूनियां पार्थ । घुसला रणांत चापधारी ॥ ७ ॥

अध्याय ७५ वा

१६९

सूत म्हणे राया, रणांगणीं पार्थ । गर्जला प्रचंड मेघासम ॥ १ ॥
अकालीं पर्जन्यासम वाहे रक्त । द्वैरथ्यादि युद्ध ठाके रणीं ॥ २ ॥
कृप-दुर्योधनां शिखंडी-सात्यकि । अश्वत्थाम्याप्रति श्रुतश्रवा ॥ ३ ॥
क्षुधित शार्दुल धांवे वृषभावरी । तैसा शकुनीवरी सहदेव तो ॥ ४ ॥
कृतवर्म्यावरी धांवला नकुळ । कौरव नृपाळ भीमावरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उत्तमौजा वीर । सुषेणाचें शिर उडवी वेगें ॥ ६ ॥

१७०

पुत्रवधें कर्ण खवळला रणीं । अश्व, ध्वज दोन्हीं छेदी क्रोधें ॥ १ ॥
उत्तमौजा करी विरथ कृपासी । शिखंडीच्या रथीं चढला वेगें ॥ २ ॥
पंकमग्न कृपा साह्य अश्वत्थामा । कौरवांच्या सैन्या भिववी भीम ॥
वासुदेव म्हणे ऐसें घोर युद्ध । देऊनियां लक्ष ऐका आतां ॥ ४ ॥

अध्याय ७६ वा

१७१

सूत म्हणे राया, वृकोदर भीमा । कोंडितांहि सैन्या, संहारितो ॥ १ ॥
ताडिती तयासी असंख्य कौरव । दावीतसे शौर्य महाबळी ॥ २ ॥
उधळूनि लावी सर्व सैनिकांसी । कल्पांतकाळाची स्मृति तयां ॥ ३ ॥

---

१ मांसाहारी

सूता, विशोकासी बोले तदा भीम। सर्वलचि सैन्य कौरवांचे ॥४॥
पाहूनियां भय वाटे मजप्रति। वार्ता नृपाळाची न कळे कांहीं ॥५॥
अर्जुनहि कोठें न दिसे अद्यापि। जाहली रायाची स्थिति काय ॥६॥
धनंजयाचीही वाटतसे चिंता। निवेदीं अशोका, शस्त्रें किती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गणना शरांची। अशोक निवेदी भीमाप्रति ॥ ८ ॥

१७२

साठ सहस्र मार्गण। दश सहस्र क्षुरवाण ॥ १ ॥
तितुकेचि जाण भल्ल। दोन सहस्र नाराच ॥ २ ॥
तीन सहस्र प्रदर। वीरा, तुझ्या रथावर ॥ ३ ॥
सहा वृषभ ओढिती। इतुकीं शस्त्रास्त्रें शोभती ॥ ४ ॥
ऐसीं शस्त्रास्त्रें बहुत। भीमा, करीं घोरयुद्ध ॥ ५ ॥
भीम बोले विशोकासी। संहारीन कौरवांसी ॥ ६ ॥
पहा आजि माझें शौर्य। कोणा धरवेल धैर्य ॥ ७ ॥
समयीं येईल या पार्थ। तरी पावेन आनंद ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम। इतुक्यामाजी ऐके स्वन ॥ ९ ॥

१७३

तयावेळीं भीम बोले विशोकासी। पार्थ संग्रामासी आला वाटे ॥
पळापळ पाहें कौरवसैन्याची। सैन्यें चेंगरती रथाखालीं ॥ २ ॥
सूत म्हणे भीमा, निःसंशय पार्थ। पातला रणांत कपिध्वज ॥ ३ ॥
ऐक ऐक कान देऊनि तो नाद। अपूर्व किरीट झळके पहा ॥ ४ ॥
देवदत्त शंख शोभे कांखमाजी। शोभा गोविंदाची न वर्णवे ॥ ५ ॥
पांचजन्य चक्र वनामाळाधारी। शोभे वक्षस्थळीं कौस्तुभ तो ॥६॥
पूर्ण मनोरथ भीमा, तुझे आतां। शौर्य करीं चिंता सोडूनियां ॥ ७॥
भीम म्हणे रथ, दासी, चतुर्दश-। ग्रामें, मोदें तुज अर्पीन मी ॥ ८॥
वासुदेव म्हणे ऐसा हा संवाद। घडला पुढती युद्ध महाघोर ॥ ९ ॥

अध्याय ७७ वा

१७४

इकडे पार्थवचें श्रीकृष्ण सांवळा। हांकी स्यंदनाला महावेगें ॥ १ ॥
जंभासुरावरी धांवे जैं मघवा। पार्थ तैं शोभला महावीर ॥ २ ॥

असंख्यात वीर कोंडिती तयासि । धाडितो स्वर्गासी पार्थ तयां ॥३॥
अश्व, गज, रथ, चामरें तें छत्रें । छिन्नभिन्न गात्रें पडलीं रणीं ॥४॥
पाहूनियां योद्धे एकत्र होऊनि । पार्थासी कोंडूनि धरिती शौर्यें ५॥
परी मेघांप्रति तरणीसमान । करी छिन्नभिन्न तयां पार्थ ॥ ६ ॥
पुनः पुनः वीर होतां ते एकत्र । करी विकलगात्र पार्थ तयां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सागरतरंग । पावती जें भंग तैसा नाद ॥ ८ ॥

१७५

ऐसी दाणादाण करूनि सैन्याची । पार्थ अग्रभागीं राधेयाच्या ॥१॥
गरुडासमान करी तैं गर्जना । ऐकूनियां भीमा हर्ष वाटे ॥ २ ॥
हर्षभरें भीम करी घोर रण । वदे दुर्योधन तयावेळीं ॥ ३ ॥
वीर हो, भीमासी वधा या समयीं । मानीन विजयी तदा तुम्हीं ॥
ऐकूनि कौरव अडविती भीमा । सजे दिव्य कर्मा वृकोदर ॥ ५ ॥
लक्षावधि वीर दशशत गज । अश्वही असंख्य निर्दाळिले ॥ ६ ॥
खळाळली तदा रुधिराची नदी । प्रेतें वाहताती जियेमाजी ॥ ७ ॥
पंक-शैवालादि सामग्री सकळ । पाहूनि नृपाळ भय पावे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विनवी सौबला । जिंकावें भीमाला, दुर्योधन ॥ ९ ॥

१७६

आत्यांसवें भीमावरी शकुनि धांवला ॥
निकराचें घोरयुद्ध होई तया काला ॥ १ ॥
एकमेकांवरी वीर ताडिती शस्त्रास्त्रें ॥
विरथ सौबलाप्रति केलें वृकोदरें ॥ २ ॥
चेव येऊनि सौबल ताडी तीक्ष्ण शर ॥
असह्य भीमाच्या शरें पडे भूमीवर ॥ ३ ॥
उचलूनि राव तय शिबिरासी जाई ॥
पळतां सैन्यासी तदा भूमि थोडी होई ॥ ४ ॥
पाठलाग करितां भीमें कर्ण येई आड ॥
बुडत्यासी नौकेसम सैन्यातें आनंद ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आतां ऐका घोरयुद्ध ॥
विक्रम भीमाचा करी कर्णाप्रति क्रुद्ध ॥ ६ ॥

अध्याय ७८ वा

१७७

राव म्हणे सूता, भीमाचा विक्रम। पाहूनियां कर्ण काय करी ॥१॥
सूत म्हणे कर्ण बोले शल्याप्रति। नेई सैन्यामाजी रथ वेगें ॥ २ ॥
शल्य संतोषानें सांगे तेंचि करी। पांचाल अंतरीं भयाकुल ॥ ३ ॥
शिखंडी, नकुळ, भीम, धृष्टद्युम्न। द्रौपदेय जाण सात्यकि तें ॥४॥
सहदेवासह करिती वर्षाव। कर्णाचें लाघव अपूर्वची ॥ ५ ॥
छेदूनियां शर सर्वही वीरांचे। निवारी तयांतें राधासुत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आश्चर्य तें मोठें। सैन्यभार पेटे तृणासम ॥ ७ ॥

१७८

पांडु, पांचाळ तैं होती भयाकुल। प्रेतांचा चिखल रणांगणीं ॥ १ ॥
पाहूनि घाबरे पळती कोणी वीर। धरूनियां धीर लढती कोणी ॥२॥
वृकासम तदा विक्रम कर्णाचा। धीर पांचालांचा सुटूनि जाई ॥३॥
अंतीं प्राणपणें पुनरपि रणीं। लढती येऊनि परी व्यर्थ ॥ ४॥
पांडव सैन्याचा ऐसा मोड होई। कर्णापुढें कांहीं न चले बळ ॥५॥
एकमेक वीर म्हणती जनीं कर्ण। भीम शत्रुसैन्य दग्ध करी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे उभय सैन्यांचा। नाश होई ऐसा तयावेळीं ॥ ८ ॥

अध्याय ७९ वा

१७९

सूत म्हणे राया, अन्यत्र फाल्गुन। संग्राम दारुण करीतसे ॥ १ ॥
मांस-शोणिताची वाहवी सरिता। बोलला अच्युता धनंजय ॥ २ ॥
म्हणे राधेयाचा ध्वज पाहीं कृष्णा। कृप, कृतवर्मा सज्ज रणीं ॥ ३ ॥
जनार्दना, अद्य कर्णाचा संहार। न करितां ठार पांडव हे ॥ ४ ॥
ऐकूनियां कृष्ण वेगें हांकी रथ। घडावें द्वैरथ युद्ध म्हणे ॥ ५ ॥
पार्थासी पाहूनि सैनिकांसी धीर। म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥६॥

१८०

शल्य म्हणे कर्णाप्रति। पहा पातला किरीटी ॥ १ ॥
करिसी जयाचा तूं शोध। पातला तो त्वत्सन्निध ॥ २ ॥
ध्वजास्थित महा कपि। दशदिशांसी अवलोकी ॥ ३ ॥
शंख, चक्र, गदा, शार्ङ्ग। ऐसा शोभतो मुकुंद ॥ ४ ॥

पहा विक्रम पार्थाचा । पातला हा तव वधा ॥ ५ ॥
कर्णा, करूनियां त्वरा । पार्थावरी करीं हल्ला ॥ ६ ॥
भयभीत कौरवसेना । इच्छी तवाधार कर्णा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शल्य । म्हणे कर्णा, दावीं बळ ॥ ८ ॥

१८१

अर्जुनाचा रोख स्पष्ट तुझ्यावरी । अपमान अंतरीं, सकलांचा ॥१॥
समीप न तोचि निवारीं तयासी । अद्यापि एकाकी दिसतो पहा॥२॥
कर्णा, तुझ्यावीण तयासवें कोण । मांडूनियां ठाण समरीं लढे ॥३॥
सर्प, वृषभ कीं व्याघ्र खवळला । धांवूनियां आला तुझ्यावरी ॥४॥
सत्वरि तयाचा करूनियां वध । आधार हो अद्य कौरवांसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शल्याचें वचन । ऐकूनियां कर्ण संतोषला ॥ ६ ॥

१८२

म्हणे राधेय शल्यासी । प्रिय तोंचि वदलासी ॥ १ ॥
भय न धरीं अर्जुनाचें । अद्य पाहीं शौर्य माझें ॥ २ ॥
वधीन मी कृष्णार्जुना । अथवा त्यागीन स्वप्राणां ॥ ३ ॥
एकाकीही धनंजय । मिळवी त्रिलोकीं विजय ॥ ४ ॥
अद्य कृष्ण साह्य तया । परी पाहें माझ्या शौर्या ॥ ५ ॥
नाश सकल कौरवांचा । रणीं कर्णवध होतां ॥ ६ ॥
पार्थ संगरीं अजिंक्य । कदा न त्या घर्म कंप ॥ ७ ॥
दिव्य आयुधें तयाचीं । प्रतियोद्धा कोण त्यासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । करी पार्थाचें वर्णन ॥ ९ ॥

१८३

एकाकी जयानें अग्नि तोषविला । इंद्राज्ञेनें केला दैत्यनाश ॥ १ ॥
चाप, तूणीरादि मेळविले जेणें । पाशुपत लेणें जयाप्रति ॥ २ ॥
ऐशा वीर्यवंता देई जो आव्हान । तयाचा विक्रम ध्यानीं घेई ॥ ३ ॥
अनंत सामर्थ्य जया श्रीहरीचें । अजिंक्य जयाचें चक्र लोकीं ॥४॥
तोचि नारायण सारथी जयासी । कोण त्या पार्थासी युद्ध करी ॥
ढळेल ही कदा पार्वतीचा पिता । परी कृष्ण-पार्थां हटवी कोण ॥

ऐसा माझा हेतु सिद्धीसी जाईल । पातली ती वेळ जवळी आतां ॥
वासुदेव म्हणे कर्ण सांगे शल्या । वरीन मृत्यूला अथवा जय ॥८॥

१८४

सूत म्हणे राया, बोलूनियां ऐसें । मेघ गर्जनेतें करी कर्ण ॥ १ ॥
अभिनंदूनि त्या बोले दुर्योधन । वीर हो, झटून साह्य करा ॥ २ ॥
ऐकूनियां वीर करिती भडिमार । हर्षें प्रतिकार पार्थ करी ॥ ३ ॥
नद-नद्यांलागीं सिंधु ग्रस्त करी । तैसा धनुर्धारी ग्रासी वीरां ॥
प्रलयभानू तो भासला रणांत । अश्वत्थाम्यादिक लढती शौर्यें ॥
गुरुपुत्रें अश्व कपि विद्ध केले । पार्थानें छेदिलें चाप त्याचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृप कृतवर्मा । झांकिती अर्जुना प्रखर शरें ॥ ७ ॥

१८५

शस्त्रहीन केला कृप । तुटलें दुर्योधनचाप ॥ १ ॥
अश्व वधिले कृतवर्म्याचे । पळती वीर कौरवांचे ॥ २ ॥
कृष्ण दाक्षिणेसी तयां । घेई हांकारूनि अश्वां ॥ ३ ॥
तदा मागुती ते वीर । सोडिताती प्रखर शर ॥ ४ ॥
नकुळ, सहदेव, शैनेय । करिती पार्थासी तें साह्य ॥ ५ ॥
सुटती शरामागें शर । पडला रणांत अंधार ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्फूर्ति । तेचि पुण्याई वीरांची ॥ ७ ॥

अध्याय ८० वा

१८६

सूत म्हणे राया, भीमासी कौरव । कोंडिती सगर्व रणामाजी ॥१॥
पाहूनि संकटीं भीम धनंजय । दावी महा शौर्य तयावेळीं ॥ २ ॥
भासला तैं काळ कौरव सैन्यासी । गगन आच्छादी दिव्य शरें ॥
हस्त, पाद, वीर, तोडिले अपार । रणांत सर्वत्र पडल्या राशी ॥४॥
चतुर्दश शत कुंजर मारिले । निम्नोन्नत केलें रणस्थान ॥ ५ ॥
मेघाच्छन्न सूर्यासम काढी मार्ग । धांवला सवेग पार्थ रणीं ॥ ६ ॥
सागरीं वादळामाजी जैवी नौका । शत्रुसैन्याधोका तैसा वाटे ॥७॥
वासुदेव म्हणे पळवूनि सैन्य । भेटला अर्जुन भीमाप्रति ॥ ८ ॥

१८७

भेटूनि भीमासी धर्माचा वृत्तांत। कथिला समस्त महावीरें ॥ १ ॥
योजूनियां कांहीं पुढील योजना। वंदूनियां भीमा गर्जे पार्थ ॥ २ ॥
दुःशासनानुज पुढती येती दश। दावी यमलोक पार्थ तयां ॥ ३ ॥
कमळासमान मस्तकें तयांची। रणांगणामाजी उधळलीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अर्जुन लीलेनें। ऐसीं दिव्यकर्मे करूनि गेला ॥ ५ ॥

अध्याय ८१ वा

१८८

कपिध्वज पार्थ भेटूनि भीमासी। गर्जूनि रणासी प्रवर्तला ॥ १ ॥
संशप्तकांलागीं उपेक्षूनि कृष्ण। पार्थाचा स्यंदन पुढती हांकी ॥ २ ॥
कर्णसाह्यास्तव येतां ते पुनरपि। निर्दाळी तयांसी कपिध्वज ॥ ३ ॥
गज त्रयोदश सहस्र त्या वेळीं। म्लेच्छ पार्थावरी सोडिताती ॥४॥
कर्णी नाराचादि सोडूनियां शर। म्हणती जर्जर करूं पार्था ॥ ५ ॥
परी वज्रधारी इंद्रासम पार्थें। गजांचीं मस्तकें भग्न केलीं ॥ ६ ॥
पळतां पार्थाचे शर त्या गांठिती। देह धारातीर्थीं पडती त्यांचे ॥७॥
वासुदेव म्हणे अन्य गजसेना। रणांत अर्जुनावरी धांवे ॥ ८ ॥

१८९

पाहूनियां भीमसेन। धांवे गदा उचलून ॥ १ ॥
भेटूनियां पार्थाप्रति। दैना उडवी सैन्याची ॥ २ ॥
मत्त कुंजर तो भीम। घुसला सैन्यांत गर्जून ॥ ३ ॥
मगर जैसा सागरांत। तैसा संचरे रणांत ॥ ४ ॥
कोसळती जैसे गिरी। तैसे गज गजांवरी ॥ ५ ॥
ऐसे भीमार्जुन वीर। करिती युद्ध भयंकर ॥ ६ ॥
सह्य न होतां आघात। सैन्य पळालें समस्त ॥ ७ ॥
धीर देई तयां कर्ण। युद्ध आरंभी दारुण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आतां। ऐका महा घोरकथा ॥ ९ ॥

अध्याय ८२ वा

१९०

सूत म्हणे राया, पार्थपराक्रम। पाहूनियां कर्ण उसळे वेगें ॥ १ ॥
सारथी वधिला जनमेजयाचा। केलें शतानिका चापहीन ॥ २ ॥

सात्वत तो विद्ध, विरथ सात्यकि। केकेयसुतासी वधिलें रणीं ॥
उग्रवर्मा तदा धांवे सेनापति। लोळविलें त्यासी रथाखालीं ॥ ४ ॥
पाहूनि सात्यकि वधी कर्णसुता। प्रसेन नामका महावीरा ॥ ५ ॥
मेळासी रे ऐसें म्हणोनि तें कर्ण। सोडी दिव्य बाण प्राणघाती ॥
वासुदेव म्हणे सावध शिखंडी। कर्णबाण तोडी बाणत्रयें ॥ ७ ॥

१९१

अन्य तीन बाणें कर्णासी वेधितां। शिखंडीच्या चापा तोडी कर्ण
धृष्टद्युम्नसुता दावी यमलोक। कृष्ण म्हणे घात करिल कर्ण ॥ २ ॥
पार्था पांचालांचा अंत नच पाहीं। येरु म्हणे नेईं पुढती रथ ॥ ३ ॥
पार्थाच्या वचनें कृष्ण हांकी रथ। रणीं राधासुत उडवी दैना ॥४॥
धृष्टद्युम्नादिक पांचालपंचक। दारुण प्रसंग तयांवरी ॥ ५ ॥
इतुक्यांत भीम अर्जुनासी गांठी। कर्णावरी घेती झेंप दोघे ॥ ६ ॥
दुःशासन तदा भीमावरी धांवे। प्रकंप तैं पावे वासुदेव ॥ ७ ॥

१९२

मृगावरी सिंह झेंप घेई जैसी। भीम घाली तैसी उडी वेगें ॥ १॥
शक्र-शंबराचि प्राणासवें द्यूत। करिती रणांत परस्पर ॥ २ ॥
मदोन्मत्त गजांसम ते भासती। ध्वज-चाप छेदी भीमसेन ॥ ३ ॥
वधिला सारथी पाहूनियां ऐसें। दुःशासन स्वयें रथ हांकी ॥ ४ ॥
खवळूनियां तो सोडी दिव्य शर। मूर्छा अनावर भीमासी तैं ॥ ५ ॥
दुःशासनें ऐसा दाविला विक्रम। उठतांचि भीम गर्जे वेगें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ताडनें उत्थान। पावे तोचि धन्य महावीर ॥ ७ ॥

अध्याय ८३ वा

१९३

सूत म्हणे राया, तुझा पुत्र दुःशासन ॥
भीमावरी सोडी बाणामागूनियां बाण ॥ १ ॥
तोडूनियां चाप वेगें वेधी सारथ्यासी ॥
क्रुद्ध होऊनि तैं भीमें फेंकियेली शक्ति ॥ २ ॥
आकर्ण ओढूनि चाप तदा दुःशासनें ॥
भेदिली प्रचंड शक्ति दश दिव्य बाणें ॥ ३ ॥

अलौकिक विक्रम तो पाहूनियां वीर ॥
'दुःशासना, धन्य' ऐसे काढिती उद्गार ॥ ४ ॥
इतुक्यांत एका शरें विद्ध होई भीम ॥
क्रुद्ध होऊनि तें वीर बोलला वचन ॥ ५ ॥
दुःशासना, सोशीं आतां गदेचा प्रहार ॥
वासुदेव म्हणे ऐका प्रसंग तो घोर ॥ ६ ॥

१९४

केला सिंहनाद भीमें । रक्त प्राशीन मी म्हणे ॥ १ ॥
निरीक्षूनि फिरवी गदा । फेंकी; आली म्हणे दुष्टा ॥ २ ॥
ऐकूनियां दुःशासन । सोडी शक्ति मृत्यूसम ॥ ३ ॥
गदा, शक्तिविदारूनि । पडली मस्तकीं जाऊनि ॥ ४ ॥
भळभळां वाहे रक्त । तोंचि अन्य गदाघात ॥ ५ ॥
तेणें दुःशासन दूर । पडला जाऊनि सत्वर ॥ ६ ॥
झाली तयाची दुर्दशा । नुरला आकार कवचा ॥ ७ ॥
वस्त्र फाटूनियां गेलें । आभरणांचें चूर्ण झालें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे रथ । सारथीही झाला शांत ॥ ९ ॥

१९५

दुःशासनाचें हें पाहूनि पतन । आनंदित मन पांचाळांचें ॥ १ ॥
दणाणूनि सोडी भीम दशदिशा । नृपाळांसी मूर्छा तया नादें ॥
इतुक्यांत भीम दुःशासनावरी । धांवला सत्वरी महाक्रोधें ॥ ३ ॥
केशग्रहणादि वस्त्रहरणान्त । आठवे समस्त कर्म तया ॥ ४ ॥
धग धग त्याचा क्रोधानल पेटे । वधितों दुष्टातें म्हणे आतां ॥ ५ ॥
वीर हो, रक्षण करा याचें कोणी । ऐसें आव्हानूनि पुढती गेला ॥
कर्ण-दुर्योधनासमक्ष ही क्रिया । चित्तीं वासुदेवा नवल वाटे ॥ ७ ॥

१९६

घोर वेळ हाय हाय । पडला नरड्यावरी पाय ॥ १ ॥
क्रोधकंपित शरीर । भीम खेंची तरवार ॥ २ ॥
खड्ग घेऊनियां करीं । स्मरें म्हणे ती वैखरी ॥ ३ ॥

'गाय' 'गाय' ऐसा शब्द। दुष्टा, येऊंदे मुखांत ॥ ४ ॥
कवण्या हस्तें ते पवित्र। केश केले अपवित्र ॥ ५ ॥
ऐकूनियां दुःशासन। कर गजशुंडेसम- ॥ ६ ॥
दावूनियां म्हणे हस्त। हाचि सकलां समक्ष ॥ ७ ॥
ओढी याज्ञसेनीलागीं। धाक याचा बहु जगीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट। वदूनि दावी निजहस्त ॥ ९ ॥

१९७

ऐकूनियां भीम वक्षःस्थळीं ताडी। गर्जना तैं फोडी महाक्रोधें ॥ १ ॥
आव्हानूनि म्हणे उपटितों हात। वांचवा सामर्थ्य असे जरी ॥२॥
ऐसें बोलूनियां आदळी दुष्टासी। आवेशें उपटी पुष्ट हस्त ॥ ३ ॥
वज्रमुष्ट्याघातें प्राण घेई त्याचा। विदारूनि वक्षा घोंट घेई ॥ ४ ॥
कवोष्ण रुधिर प्राशूनि, मस्तकहि छेदी, करीं खड्ग घेऊनियां ॥५॥
पुनः पुनः क्रोधें चाखूनि रुधिर। म्हणे हें मधुर मधुराहूनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा भीमसेन। करी निज पण पूर्ण क्रोधें ॥ ७ ॥

१८८

घोरकर्मा वृकोदर। दिसला यमासम क्रूर ॥ १ ॥
हांसूनियां म्हणे नीचा। तुज साह्य यमराजा ॥ २ ॥
नाहीं तरी प्रायश्चित। अन्य लाभतें बहुत ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां वीर। धांवे प्राशिण्या रुधिर ॥ ४ ॥
पुनः पुनः ऊर्मि उठे। अंगावरी येती कांटे ॥ ५ ॥
पाहूनि तें घोरकर्म। वीर पडती घाबरून ॥ ६ ॥
शस्त्रें गळालीं कोणाचीं। वळली बोबडी कुणाची ॥ ७ ॥
रुधिर प्राशितां जयांनीं। पाहिलें ते भ्याले मनीं ॥ ८ ॥
वदले नव्हे हा माणूस। पळती पाहूनि तें रूप ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कोणी। म्हणती राक्षस हा जनीं ॥ १० ॥

१९९

कर्णबंधु तदा चित्रसेन वीर। घाबरूनि धीर त्यजूनि पळे ॥ १ ॥
युधामन्यु त्याचा करी पाठलाग। चित्रसेन विद्ध करी तया ॥ २ ॥

युधामन्यु तदा खवळला रणीं । मस्तक छेदूनि गर्जिन्नला ॥ ३ ॥
पाहूनि त्या कर्ण धांव घेई वेगें । नकुळ तयातें अडवीतसे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे इकडे भीमसेन । दुष्टासी वधून हृष्ट झाला ॥ ५ ॥

२००

पुनरपि रक्तें भरूनि ओंझळ । प्राशितों रुधिर म्हणे दुष्टा ॥ १ ॥
' गाय गाय ' शब्द वदें पुनरपि । हर्षें नाचलांती तयावेळीं ॥ २ ॥
उच्चारूनि शब्द तेचि मी नाचतों । कर्में आठवितों सकल तुझीं ॥
विषान्न भोजन तैंवी सर्पदंश । लाक्षागृहीं वास द्यूतकर्म ॥ ४ ॥
केशग्रहण तें आमुचा वनवास । विराटनगरींत बहु दुःख ॥ ५ ॥
कारण सर्वांसी दुःशासना, तूंचि । मति सकलांसी कथिली तुवां
वासुदेव म्हणे रुधिरें माखला । धांवूनि भेटला पार्थाप्रति ॥ ७ ॥

२०१

वदनीं रुधिर थबथबे । कृष्णार्जुनांलागीं वदे ॥ १ ॥
घोर प्रतिज्ञा ते पूर्ण । केली झालों आजी धन्य ॥ २ ॥
यज्ञवेदीवरी अन्य । वधूनि पशु होइन धन्य ॥ ३ ॥
दुर्योधनाचें मस्तक । रणीं सकलांसमक्ष ॥ ४ ॥
तुडवीन पायांतळीं । आतां इच्छा हे राहिली ॥ ५ ॥
वदूनि गर्जे वृकोदर । रक्तें माखलें शरीर ॥ ६ ॥
वृत्रवधें इंद्राप्रति । तैंवी आनंद भीमासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्म । समयीं पावे परिणाम ॥ ८ ॥

अध्याय ८४ वा

२०२

दुःशासनवधें बंधु त्याचे दश । कवची, पाशी, षंढ धांव घेती ॥१॥
भीमावरी क्रोधें सोडिताती शर । दावी यमपुर भीम तयां ॥ २ ॥
पाहूनि भीमाचें शौर्य शत्रुसेना । त्यागूनियां रणा पळूं लागे ॥ ३ ॥
कर्णही त्या वेळीं घाबरूनि गेला । कृष्णवर्ण मुद्रा होई त्याची ॥४॥
शल्य तयावेळीं बोलला कर्णासी । उचित तुजसी नसे भय ॥ ५ ॥
भीम, भीमकर्में नृपाळ मूर्छित । सांत्वन समस्त करिती त्याचें ॥६॥
पांडवांचें बळ पावलेंसे वृद्धि । संपादिली सिद्धि वाटे तयां ॥ ७ ॥

ऐशावेळीं कर्णा, तेज प्रगटवीं । भार तुझ्यावरी कौरवांचा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे स्फूर्ति देई शल्य । सांगे हीच वेळ शौर्य दावीं ॥९॥

२०३

मेळविसी जरी जय । कीर्ति होईल अक्षय १ ॥
पराजयें स्वर्गप्राप्ति । कर्णा, धरूं नको भीति ॥ २ ॥
पहा वृषसेन क्रोधें । घुसला युद्धार्थ हा पुढें ॥ ३ ॥
ऐकूनि ते शल्यवाणी । कर्ण उभा ठाके रणीं ॥ ४ ॥
नकुळ अडवी वृषसेना । प्रवर्तले घोर रणा ॥ ५ ॥
करितां विरथ नकुळासी । उडाला तो अंतरिक्षीं ॥ ६ ॥
पक्ष्यासम घेई झेंप । रणीं जाहलें कौतुक ॥ ७ ॥
खड्गें असंख्य वीरांसी । नकुळ धाडी यमलोकीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शौर्य । दावी वृषसेन थोर ॥ ९ ॥

२०४

कर्णतनयानें दावूनि विक्रम । मांडिला संग्राम नकुळासवें ॥ १ ॥
ढाल-तरवार छेदूनि नकुळा । कासावीस केला शराघातें ॥ २ ॥
नकुळ त्यावेळीं भीमाच्या स्यंदनीं । आश्रय घेऊनि युद्ध करी ॥ ३ ॥
पाहूनियां कपि बोले अर्जुनासी । पाहें नकुळाची दशा पार्था ॥ ४ ॥
ऐकूनियां रणीं धांवला अर्जुन । नकुळ पाहून वदला तया ॥ ५ ॥
कर्णसुताचे या वेगें हरीं प्राण । ऐकूनि अर्जुन चाल करी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अतर्क्य घटना । भिडवी कर्णार्जुनां ऐशापरी ॥ ७ ॥

अध्याय ८५ वा २०५

सूत म्हणे राया, वृत्त । कळलें नकुळाचें सर्वत्र ॥ १ ॥
द्रौपदेय तैं सात्यकि । द्रुपदपुत्र धांवूनि येती ॥ २ ॥
वीर ऐसे एकादश । येतां हार्दिक्य तैं कृप ॥ ३ ॥
अश्वत्थामा, दुर्योधन । वीर अन्यही मिळून ॥ ४ ॥
चाल करिती तयांवरी । धांवे कुलिंद त्यांवरी ॥ ५ ॥
पडले कुलिंदबांधव । हर्ष पावले कौरव ॥ ६ ॥
पुढती झालें युद्ध घोर । भिडले परस्पर वीर ॥ ७ ॥

शकुनि कुलिंदसुतातें । यमसदन दावीतसे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । करिती युद्ध घनघोर ॥ ९ ॥

२०६

कर्णपुत्र तदा शतानिका पार्था । तेवीं भीमादिकां कृष्णासवें-॥ १ ॥
ताडी, तें पाहूनि आनंद कौरवां । दूरदृष्टिवीरां मोद वाटे ॥ २ ॥
पार्थापुढती हा न वांचे सर्वथा । जाणूनियां चित्ता खेद त्यांच्या
इतुक्यांत पार्थ करी शराघाता । प्रतिकार पार्था करी बाळ ॥ ४ ॥
वेधिलें पार्थास प्रखर शरांनीं । कर्णसुत रणीं शौर्य दावी ॥ ५ ॥
कर्ण, दुर्योधनादिक वीरांप्रति । गर्जूनि किरीटि वदला तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे योग्य वेळीं वीर । आव्हान समग्र शूरां देई ॥ ७ ॥

२०७

तुझ्या समक्षचि कर्णा । घेतों पहा सुतप्राणा ॥ १ ॥
वध एकाकी बाळाचा । केलाती तें दुःख लोकां ॥ २ ॥
ऐसी अन्याय्य ते क्रिया । न रुचे कदा धनंजया ॥ ३ ॥
तुझ्यासमक्ष मी कर्णा । वधितों आतां वृषसेना ॥ ४ ॥
करा तयाचें रक्षण । पुढती कर्णासी वधीन ॥ ५
ह्याचि संहाराचें मूळ । मदोन्मत्त झाला खळ ॥ ६ ॥
ऐसें बोलूनि सायक । सोडी एकामागें एक ॥ ७ ॥
अंतीं एक दिव्य बाण । घेई वृषसेनप्राण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । तदा धांवला खवळून ॥ ९ ॥

अध्याय ८६ वा

२०८

सागरासमान खवळला कर्ण । पाहूनि त्या कृष्ण वदला पार्था ॥१॥
अर्जुना, जयासी साह्य मद्रपति । पातला पुढती, लक्ष देई ॥ २ ॥
विमानासदृश वेगें येई रथ । नागकक्षांकित ध्वज पाहें ॥ ३ ॥
शर सोडी जणु पर्जन्याच्या धारा । पळती सैरावैरा महारथ ॥४॥
विजयचापाचें दिव्य आस्फालन । पार्था, तुझ्यावीण अजिंक्य हा
प्रत्यक्ष शिवासी भिडलासी रणीं । विजय या क्षणीं लाभो तुज ॥
वासुदेव म्हणे कृष्णाचें वचन । ऐकूनि अर्जून वदला तया ॥ ७ ॥

२०९

कृष्णा, लाभेल विजय । नसे मज शंका लव ।१। ।
जोडियेली प्रसन्नता । देवा तुझी मीं अच्युता ॥ २ ॥
हांकीं हांकीं कृष्णा, रथ । करितों राधेयाचा वध ॥ ३ ॥
कर्ण शरीराचे खंड । अद्य पाहील गोविंद ॥ ४ ॥
अथवा वधिलें पार्थासी । आढळेल हें तुजसी ॥ ५ ॥
युद्धासी या वर्णितील । लोक-जोंवरी भूतल ॥ ६ ॥
हांकी हांकीं देवा, रथ । हर्षे ऐकूनि अच्युत ॥ ७ ॥
मनोवेगें रथ गेला । गजापुढतीं गज ठेला ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे युद्ध । आतां ऐका निर्णायक ॥ ९ ॥

अध्याय ८७ .वा

२१०

सूत म्हणे राया, पुत्रशोकें कर्ण । सूडार्थ उद्विग्न होई बहु ॥ १ ॥
आव्हान पार्थासी देई मग रणीं । भासले तरणी वीर दोघे ॥ २ ॥
व्याघ्रचर्में रथ जे अवगुंठित । भासले एकत्र आदित्य ते ॥ ३ ॥
विरोचन इंद्र सज्जले युद्धार्थ । रथ घंटानाद घुमला रणीं ॥ ४ ॥
तलत्राण, बाण, चापआस्फालन । सिंहनादस्वन गगनीं जाती ॥
नवलकारी ते पातले समीप । परस्परध्वज भिडले दोन्हीं ॥ ६ ॥
वीर पाहूनियां द्वैरथ तें युद्ध । ठोकिताती दंड परम हर्षें ॥ ७ ॥
फडकाविती वस्त्रें, कर्णा अर्जुनांसी । रणवाद्यें स्फूर्ति देती बहु ॥८॥
वासुदेव म्हणे शंख-भेरीनाद । कोंदे अंबरांत तयावेळीं ॥ ९ ॥

२११

काय करावें वर्णन । महायोद्धे कर्णार्जुन ॥ १ ॥
रथाधिष्ठित दोघांचीं । दिव्य धनुष्यें शोभती ॥ २ ॥
कवच, खड्ग, चर्म, शंख । पृष्ठीं तूणीर सुरेख ॥ ३ ॥
श्वेत हय शताङ्गांसी । मदनासम त्यांची कांति ॥ ४ ॥
रक्त चंदनाची उटी । मत्त वृषभ भासती ॥ ५ ॥
रुळती मस्तकीं चामरें । शोभताती श्वेत छत्रें ॥ ६ ॥

---

१ रथांस

व्यजनवायु पार्श्वभागीं । शल्य, कृष्ण त्यां सारथी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे रूप । समानचि उभयांस ॥ ८ ॥

२१२

सिंहस्कंध दीर्घबाहु रक्तनेत्र । सुवर्णाचे हार गळ्यामाजी ॥ १ ॥
पुष्ट वक्षःस्थळ, दोघे बलवान । करावया रण प्रवर्तले ॥ २ ॥
भव्य गिरिराज अथवा मत्त गज । भासती रणांत वीरांप्रति ॥ ३ ॥
बालसर्पासम चपलता त्यांची । सूर्यासम कांति उभयांप्रति ॥ ४ ॥
नाशप्रवृत्त ते जणु महा ग्रह । निजांशें हे देव अंतर्बाह्य ॥ ५ ॥
महाव्याघ्र रणीं युद्धांत रंगले । विजय न कळे कोणा लाभे ॥ ६ ॥
विपुल, विविध आयुधें स्यंदनीं । झुंजती ते रणीं ख्यात वीर॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर धनुर्धर । भासती शंकर-विष्णुचि ते ॥ ८ ॥

२१३

कौरववीर ते कर्णाच्या भोंवतीं । पार्थासभोंवतीं भीमादिक ॥ १ ॥
कर्णार्जुन प्राण पणासी लाऊनि । मांडिलें वीरांनीं द्यूत जणु ॥ २ ॥
धूमकेतूचि ते भासले सकळां । विवाद माजला अंतरिक्षीं ॥ ३ ॥
कर्णाप्रति कोणी, कोणी अर्जुनासी । दोष लाविताती स्तविती किंवा
अंतरिक्ष इच्छी कर्णाचा विजय । पृथ्वी पार्थास्तव चिंता करी ॥५॥
वृक्षादि चिंतिती पार्थाचें अभीष्ट । कर्णास्तव कष्ट यातुधानां ॥ ६ ॥
सिद्ध, चारण तैं वेद-उपवेद । रत्नें, महानाग, ऐरावत ॥ ७ ॥
कामधेनु आदि पार्थाच्या पक्षासी । हिंस्र पशु-पक्षी कर्णपक्षा ॥ ८ ॥
शुभ, शुद्धजाती पार्थाच्या पक्षासी । संकरोद्भवें तीं स्तविती कर्णा
इंद्र, सोम, वायु, स्तविताती पार्था । द्वादश आदित्यां कर्ण प्रिय ॥
देव, पितर तैं यक्ष कुबेरादि । पार्था, पिशाचादि कर्णपक्षा ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे कर्णार्जुन युद्ध । त्रैलोक्यप्रसिद्ध बघती सर्व ॥ १२ ॥

२१४

प्राणिमात्र अवघे येती । मेघमंडळीं तपस्वी ॥ १ ॥
देव, दानव, गंधर्व । विहग अप्सरासमूह ॥ २ ॥
शिव, ब्रह्मदेव येती । निजवाहनीं शोभती ॥ ३ ॥
इंद्र म्हणे जय फाल्गुना । लाभो, सूर्य म्हणे कर्णा ॥ ४ ॥

स्वयंभूतें पुशिती देव । वरिल कोणासी विजय ॥ ५ ॥
शिवासवें ब्रह्मदेव । म्हणे पार्थासी विजय ॥ ६ ॥
राखा अंतरीं निश्चया । पार्थ करी देवकार्या ॥ ७ ॥
खवळतां कृष्णार्जुन । जगत्स्वास्थ्य होई भग्न ॥ ८ ॥
नर-नारायण दोघे । जाणा आधार जगाचे ॥ ९ ॥
कर्ण सुखें स्वर्गी राहो । वृत्त कथी वासुदेव ॥ १० ॥

२१५

ऐकूनियां इंद्र बोलला देवांसी । विजय पार्थासी समजा मनीं ॥१॥
देव तयावेळीं सुमनें वर्षिती । रणीं निनादती रणवाद्यें ॥ २ ॥
फुंकूनियां शंख हर्षें कर्ण-पार्थ । प्राणपणें युद्ध करिती यत्नें ॥ ३ ॥
मूर्तिमंत वीररस प्रगटला । स्फूर्ति कर्णाद्राला येई बहु ॥ ४ ॥
कर्णध्वजावरी करूनि उड्डाण । वेगें ध्वजचिन्ह नष्ट करी ॥ ५ ॥
ध्वजांवरी ध्वज अश्वांवरी अश्व । वटारिले नेत्र सारथ्यांनीं ॥ ६ ॥
शल्य तयावेळीं मान घाली खाली । जिंकी वनमाळी दृष्टिक्षेपें ॥७॥
वासुदेव म्हणे वीरांचें हें कर्म । पाहूनियां मर्म वीरां कळे ॥ ८ ॥

२१६

क्रोधावेशें एकमेकां । बघतां दृष्टिजय पार्था ॥ १ ॥
जाणूनियां करूनि स्मित । कर्ण बोलला शल्यास ॥ २ ॥
कदाचित हरलों जरी । काय करिसील तूं तरी ॥ ३ ॥
शल्य म्हणे कृष्णार्जुनां । भेटवीन यमधर्मा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । इकडे वदे श्रीकृष्णास ॥ ५ ॥

२१७

कृष्णा, पराभव पावलों मी जरी । करिसील तूं तरी काय सांगें ॥
उच्चस्वरें कृष्ण हांसूनियां बोले । पार्था, जें योजिलें तेंचि ऐकें ॥२॥
ढळेल तरणी, सिंधु आटतील । उष्णता त्यजील वैश्वानर ॥ ३ ॥
तरीच पार्थाचा वध कर्णहस्तें । घडतां अशक्य तें, प्रलयकाल ॥
बाहुबळेंचि या वधीन उभयां । हास्य धनंजया येई तदा ॥ ५ ॥

पार्थ म्हणे कृष्णा, उच्छिन्न कानन । उन्मत्त वारण करी जेंवी ॥६॥
तैसींच कर्णाचीं खांडोळीं करीन । विधवा त्या जाण कर्णभार्या ॥
तयांनीं दुःस्वप्न पाहिलें असेल । अग्नीसवें खेळ खेळला हा ॥ ८ ॥
द्रौपदी, धर्म तैं पितृभगिनीचें । करितील साचें समाधान ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे झाला कर्णवध । ऐसेंचि तैं पार्थ वदला कृष्णा ॥१०॥

अध्याय ८८ वा

२१८

हास्य-विनोद गगनीं । पाहूनियां स्फूर्ति रणीं ॥ १ ॥
विस्मयानें सकल सेना । नादें दुमदुमवी रणा ॥ २ ॥
धुंद झालीं उभय दळें । घोर संगर मांडिलें ॥ ३ ॥
रथ, अश्व, गज, नर । यांची एकत्र धांदल ॥ ४ ॥
शर, खड्ग, शक्ति, ऋष्टि । यांची होई जणु वृष्टि ॥ ५ ॥
भीरु भयाकुल झाले । ढीग प्रेतांचे पडले ॥ ६ ॥
कर्णार्जुनांच्या शरांनीं । पडला अंधार त्या स्थानीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तमीं । सकल घाबरले रणीं ॥ ८ ॥

२१९

क्षणार्धांत तदा होई चमत्कार । अस्त्रांचा संहार करिती दोघे ॥ १ ॥
चमकला तदा भास्कर गगनीं । अभय सेनानी देती लोकां ॥ २ ॥
भेरी पणव तैं आनक मृदंग । करिताती प्रचंड नाद तेथें ॥ ३ ॥
सूर्यचंद्रासम रणीं दोघे वीर । करिती संहार काळासम ॥ ४ ॥
दोघेही अजिंक्य दक्ष निर्भयही । भडिमार होई शस्त्रास्त्रांचा ॥५॥
उभयही दळें पळती सैरावैरा । सोडिताती शरां पंचवीर ॥ ६ ॥
दुर्योधन, कृप, शकुनि, कृतवर्मा । तेंवी अश्वत्थामा पार्थावरी ॥७॥
वासुदेव म्हणे पार्थ त्यां निःशस्त्र । करूनि, कर्णास ताडी बाण ॥८॥

२२०

शतसंख्य वीर क्रोधें तैं धांवले । अर्जुनें धाडिलें स्वर्गीं तयां ॥१॥
हय कुंजर तैं वधिले असंख्यात । जाहला आकांत रणामाजी ॥२॥
धन्य धन्य शब्द जाहला गगनीं । वर्षिलीं देवांनीं सुमनें बहु ॥३॥
पार्थाचा विक्रम पाहूनियां देव । म्हणती धनंजय महायोद्धा ॥ ४ ॥

अश्वत्थामा तदा बोले नृपाळासी । राया, वे विनंती ध्यानीं माझी
दुर्योधना, असो वैरासी धिक्कार । तातादिक थोर स्वर्गी गेले ॥६॥
मातुलासवें मी अवध्याचि जनीं । वांचलों या रणीं म्हणूनि राया ॥
सख्य करूनियां राज्य करा सुखें । ऐकेलाचि माझें धनंजय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विप्रासी विवेक । परी अधःपात नृपाळाचा ॥ ९ ॥

२२१

विप्र नृपाळासी बोलला पुढती । जनार्दन इच्छी सामाचि हा ॥१॥
प्रिय सर्वकाळ अहिंसा धर्मासी । भीमादिक त्यासी मानितील ॥
राया, सख्य ऐसें करिसील जरी । वांचतील तरी अवशिष्ट जे ॥३॥
अन्यथा पतन पावसील रणीं । पश्चात्ताप मनीं करिसी पुढें ॥ ४ ॥
देवादिकांतेंही पार्थ हा अजिंक्य । परी मम वाक्य ऐकेल तो ॥५॥
प्रेमादरयुक्त कथितों मी तुज । वळवीन कर्णास म्हणसी तरी ॥६॥
वासुदेव म्हणे सामाचे प्रकार । बोलला जे विप्र ऐका तेचि ॥ ७ ॥

२२२

राया, चतुर्विध मार्ग ते मैत्रीचे । कथिताती ज्ञाते स्वानुभवें ॥ १ ॥
एक ते सहज, मृदु शब्दें अन्य । तृतीय ते दान देतां मित्र ॥ २ ॥
शौर्याचिया धाकें मित्र ते चतुर्थ । अनुकूल येथ सकल मार्ग ॥ ३ ॥
प्रसन्न पांडव होतां तुझे मित्र । नांदेल सर्वत्र सौख्य जगीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कळवळूनियां । कथितां वदे राया ऐका विप्रा ॥ ५ ॥

२२३

चिंतूनियां कांहीं मनीं । राव वदला त्या क्षणीं ॥ १ ॥
सोडूनियां दीर्घ श्वास । म्हणे गुरुपुत्रा, सत्य ॥ २ ॥
बोलसी तूं परी भीम । वदला तें ध्यानीं आण ॥ ३ ॥
व्याघ्रासम घेऊनि झेंप । वधिलें तेणें बांधवांस ॥ ४ ॥
वदला जें तें घुमतें कर्णीं । आतां यश कैंवी सामीं ॥ ५ ॥
श्रांत पार्थालागीं कर्ण । वधिल भय दे सोडून ॥ ६ ॥
आतां विश्वास मजवरी । सांग विप्रा, कोण धरी ॥ ७ ॥
नित्य पांडवांच्या मनीं । वैर योग्याचि घे ध्यानीं ॥ ८ ॥

वारंवार विप्राप्रति । नमुनि देई सैन्या स्फूर्ति ॥ ९ ॥
गर्जे रणांगणीं राव । पुढती कथी वासुदेव ॥ १० ॥

अध्याय ८९ वा २२४

सूत म्हणे राया, राव अविवेकें । प्रारंभ युद्धातें करी वेगें ॥ १ ॥
रणवाद्यनाद कोंदला गगनीं । कर्णार्जुन रणीं गज जैसे ॥ २ ॥
अथवा मेघावरी मेघ आदळती । वर्षाव करिती सायकांचा ॥ ३ ॥
गिरीवरी गिरी आदळतां जैसा । नाश शिखरांचा भास तैसा ॥४॥
रथी सारथीही रुधिरानें न्हाले । रथ न्हद झाले शोणिताचे ॥ ५ ॥
एकमेकांवरी घेती जें उड्डाण । आश्चर्यानें सैन्य थक्क होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कांपती प्रेक्षक । नवल इतुक्यांत केलें पार्थें ॥ ७ ॥

२२५

कर्णवधार्थ अर्जुन । गेला उड्डाण ठोकून ॥ १ ॥
वदले सोमक तें तया । त्वरित वधीं रे राधेया ॥ २ ॥
दुर्योधन राज्यतृष्णा । नष्ट करीं याचि क्षणा ॥ ३ ॥
वदले कौरव कर्णासी । वधीं वीरा, अर्जुनासी ॥ ४ ॥
लाभो आतां पांडवांस । कर्णा, शाश्वत वनवास ॥ ५ ॥
पुढती परस्पर वीर । सोडिताती प्रखर शर ॥ ६ ॥
आच्छादूनि जाई नभ । भयाकुल होती खग ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । तोडी अर्जुनाचे बाण ॥ ८ a

२२६

खवळूनि पार्थ सोडी अग्निअस्त्र । पेटला अनळ जाळी कर्णा ॥ १ ॥
पेटतांचि वस्त्रें सैनिक पळाले । कर्णें तें योजिलें वारुणास्त्र ॥ २ ॥
गजशुंडेसम पर्जन्याच्या धारा । पार्थ वायव्यास्त्रा सोडीतसे ॥ ३ ॥
पुनरपि पार्थ जपे महेंद्रास्त्र । कर्णाचें रुधिर वाहूं लागे ॥ ४ ॥
भार्गवास्त्रें परी निवारी महेंद्रा । करीत संहारा जाई कर्ण ॥ ५ ॥
पाहोनि विक्रम कौरव गर्जले । कर्णानें जिंकिलें म्हणती पार्था ॥६॥
वासुदेव म्हणे पाहूनियां भीम । सक्रोध भाषण करी पेका ॥ ७ ॥

२२७

विजया, हा कर्ण दावितो विक्रम । प्रत्यक्ष अर्जुन असतां पुढें ॥ १ ॥
शंकरासी जेणें मांडियेलें रण । सूतपुत्रबाण त्याच्या अंगीं ॥ २ ॥
होऊं नको पार्था, निर्वीर्य यापरी । आठवीं अंतरीं वचनें दुष्ट ॥ ३ ॥
निर्भयपणें जो बोलला कुशब्द । आठवूनि अद्य वधीं तया ॥ ४ ॥
अविलंबें आतां करीं त्याचा नाश । फेंकितों गदेस मीही पाहें ॥५॥
वासुदेव म्हणे याचिवेळीं कृष्ण । बोलला वचन तेंही ऐका ॥ ६ ॥

२२८

पार्था, छिन्न भिन्न सायक जाहले । व्यर्थ आजी गेले यत्न तुझे ॥१॥
निवारिलीं अस्त्रें हर्षले कौरव । आठवीं तें धैर्य पार्था, तुझें ॥ २ ॥
युगायुगीं दुष्टदैत्य निर्दलन । करिसी तें स्मरून कार्य साधीं ॥ ३ ॥
सुदर्शन माझें घे क्षुरधारेनें । मस्तक कर्णाचें उडवीं आतां ॥ ४ ॥
सहजसाध्य हें तुजलागीं पार्था । शिवासी तूं मित्रा, तुष्ट केलें ॥५॥
निष्कंटक आजी करूनि मेदिनी । धर्माच्या चरणीं अर्पी सौख्यें ॥६॥
वासुदेव म्हणे कृष्णवचें पार्थ । चिंतूनि मनांत वदला ऐका ॥ ७ ॥

२२९

देवा, महा अस्त्र सोडितों मी आतां । अनुज्ञा अच्युता, असो मज ॥
येणें सकलांचें होईल कल्याण । कर्णवध जाण सहज येणें ॥ २ ॥
बोलूनियां ऐसें प्रार्थूनि ब्रह्मयासी । सोडी ब्रह्मास्त्रासी धनुर्धर ॥३॥
चमत्कार परी जाहला त्या वेळीं । क्षणांत निवारी कर्ण अस्त्रा ॥ ४ ॥
पाहूनि तें भीम गर्जला क्रोधानें । योजावें अस्त्रें अन्य अस्त्र ॥ ५ ॥
ऐकोनि पार्थानें दिव्यास्त्र योजिलें । असंख्यात मेले वीर तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्याकुळ सैनिक । हस्तपादछेद पाहूनियां ॥ ७ ॥

२३०

कर्णही त्या वेळीं वर्षाव शरांचा । करूनि वीरांचा वध करी ॥ १ ॥
वृकोदरासवें कृष्णार्जुनांप्रति । सूर्यपुत्र वेधी महा शौर्यें ॥ २ ॥
पाहूनि तें पार्थ अष्टादश बाण । सक्रोधें ताडून वेधी कर्णा ॥ ३ ॥
तोडूनियां ध्वज वेधिलें शल्यासी । वधिला सभापति दश बाणें ॥४॥

शराच्छन्न तदा जाहला राधेय । बाहती कौरव कर्णाप्रति ॥ ५ ॥
ऐकूनि आक्रोश सायक वर्षूनि । राधासुत रणीं शौर्य दावी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें महायुद्ध । अपूर्व देवांस भासलें तें ॥ ७ ॥

२३१

दिव्य मंत्रौषधि सेवूनियां धर्म । शल्य व्यथाहीन कवचधारी ॥ १ ॥
पातला रणांत युद्ध तें पहाया । आनंद पांडवां तदा बहु ॥ २ ॥
राहूमुक्त चंद्र भासला राजद्र । रंगलें अपूर्व समरांगण ॥ ३ ॥
विस्मित प्रेक्षक पाहूनि तें शौर्य । होई चमत्कार इतुक्यामाजी ॥ ४ ॥
आकर्ण ओढितां पार्थाची प्रत्यंचा । तुटली तें मोठा नाद होई ॥ ५ ॥
साधूनि ते संधी कर्ण सोडी बाण । विद्ध कृष्णार्जुन तयावेळीं ॥ ६ ॥
भीमादिक धांव घेतां त्यां निवारी । असंख्यात मारी वीर तदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्णशराच्छन्न । होती कृष्णार्जुन तयावेळीं ॥ ८ ॥

२३२

कौरवांसी हर्ष फार । करिती कर्णजयजयकार ॥ १ ॥
जखमी व्याघ्रासम पार्थ । खवळूनि धरी चाप ॥ २ ॥
बाणामागें सोडी बाण । गेलें झांकूनि गगन ॥ ३ ॥
कवच फोडिलें शल्याचें । विकल अंग राधेयाचें ॥ ४ ॥
रुधिरें माखितां शिवाचो । रौद्रक्रीडा भासे साची ॥ ५ ॥
इतुक्यांत राधेयानें । व्याळासम पंचबाणें ॥ ६ ॥
विद्ध केलें गोविंदासी । क्रोध तदा फाल्गुनासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । क्रोधें ताडी तें कर्णास ॥ ८ ॥

२३३

मर्म विदारूनि गेले दिव्य बाण । कर्णचि म्हणून पडला नाहीं ॥ १ ॥
अनावर कोप त्या वेळीं पार्थाचा । कर्णरक्षकांचा वध करी ॥ २ ॥
दोन सहस्र तें वीर निर्दाळिले । कौरव पळाले भयाकुल ॥ ३ ॥
निराधार तदा राधेय एकाकी । वीर तो तथापि डरला नाहीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कर्ण पार्थावरी । वेगें चाल करी महाक्रोधें ॥ ५ ॥

अध्याय १० वा

२३४

सूत म्हणे राया, पार्थाचें दिव्यास्त्र । वारी सूर्यपुत्र क्रोधावेशें ॥१॥
' भूताथर्वण ' तें अस्त्र अभिमंत्रूनि । भार्गवा स्मरूनि रणीं योजी ॥
सरस निरस न कळेचि कोणा । धन्य पार्था-कर्णा, म्हणती देव ॥
शक्ति, युक्ति, शौर्य तेंवी अस्त्रज्ञान । तत्वतां समान उभयांसी ॥४॥
संधी ही साधूनि नाग ' अश्वसेन ' । सूडार्थ त्यजून स्थान, येई ॥
गुप्तरूपें कर्णतूणीरीं प्रवेशे । युद्ध निकराचें होई तदा ॥ ६ ॥
अतुल विक्रमें वीर दोघे श्रांत । वटारूनि नेत्र पाहताती ॥ ७ ॥
चंदनोदक तें अप्सरा सिंचिती । वारा घालिताती चामरांनीं ॥८॥
सूर्य, इंद्र प्रेमें कुरवाळिती मुख । वासुदेव गात शौर्य त्यांचें ॥ ९ ॥

२३५

पुनरपि घोर युद्ध । आरंभिती सुविख्यात ॥ १ ॥
वेग असह्य पार्थाचा । नुरला कर्णासी भरंवसा ॥ २ ॥
रक्तबंबाळ शरीर । निवाणीचा योजी शर ॥ ३ ॥
नित्य चंदनचूर्णांत । कनक तूणीरीं पूजित ॥ ४ ॥
सर्पमुख उग्रबाण । दिसतां, उल्कांच पतन ॥ ५ ॥
अश्वसेन बाणामाजी । शिरला नकळत कर्णासी ॥ ६ ॥
तदा घाबरला इंद्र । धीर देई चतुर्वक्त्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मा । बोले विजय अर्जुना ॥ ८ ॥

२३६

चापावरी दिव्य शर तो योजितां । शल्य राधासुता सुचवी प्रेमें ॥
ग्रीवाभंग येणें न होईसें वाटे । चिंतूनि कार्यातें योजीं बाण ॥ २ ॥
कर्ण म्हणे शल्या, शराचें संधान । एकदांचि जाण करिती वीर ॥
बोलूनियां ऐसें आकर्ण ओढूनि । मेलासी म्हणूनि सोडी बाण ॥४॥
वासुदेव म्हणे भक्तसखा हरि । भक्तांस्तव करी नवल वेगें ॥ ५ ॥

२३७

अग्निज्वालेसम प्राणघाती शर । पाहूनि मुरहर लीला करी ॥ १ ॥
पवित्र चरणें दाबिला स्यंदन । गुडघे टेंकूनि अश्व उभे ॥ २ ॥

भूमीमाजी रथ रुततां यापरी । धन्य हा कंसारी म्हणती देव ॥३॥
कृष्णावरी पुष्पवर्षाव जाहला । वेगें बाण आला पार्थावरी ॥ ४ ॥
ग्रीवा न भंगितां किरीट छेदूनि । बैसला जाऊनि स्वस्थानासी ॥
वासुदेव म्हणे पार्थाचा किरीट । वर्णावें महत्व काय त्याचें ॥ ६ ॥

२३८

निशिकांत अथवा आग्नि । प्रत्यक्षचि कीं तरणी ॥ १ ॥
ऐसा किरीट सोन्याचा । हिरे मोत्यें नवरत्नांचा ॥ २ ॥
इंद्रास्तव चतुराननें । निर्मियेला तो तपानें ॥ ३ ॥
रम्य तयाची आकृति । दर्शनेंचि अरिला भीति ॥ ४ ॥
पसरे सुगंध तयाचा । इंद्रें अर्पिला तो पार्था ॥ ५ ॥
देवादिकांसी अभेद्य । सर्पविषानें तो व्याप्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रवि । कोसळला जै भूवरी ॥ ७ ॥

२३९

किरीटपतनें होई घोर शब्द । हादरे ब्रह्मांड व्यथित लोक ॥ १ ॥
नील शृंगासम पार्थाचें मस्तक । शोभलें किरीट पडतां खालीं ॥
श्वेतवस्त्र शिरीं गुंडाळी तें पार्थ । उदयपर्वत भासे तदा ॥ ३ ॥
आशाभंग ऐसा सर्पिणीसुताचा । होतां, सूर्यसुता विनवी सर्प ॥४॥
कर्णा, मी पार्थाचा शत्रु अश्वसेन । निश्चयें वधीन पार्थालागीं ॥ ५ ॥
मातेसी या दुष्टें वधिलें खांडववनीं । तदा प्रभृति मी वैरी याचा ॥
कर्ण म्हणे सर्पा, अन्याच्या विश्वासें । ठाकलों युद्धातें ऐसें नसे ॥
शतावधि पार्थ स्वबळें वधीन । जाई रे निघून निजस्थाना ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे होतां तिरस्कार । नाग दुःखाकुल चिंती मनीं ॥९॥

२४०

उग्ररूपें अंतीं धांवे पार्थावरी । पाहूनि सत्वरी वदला कृष्ण ॥ १ ॥
दावेदार आला पार्था, वधीं यासी । नाठवे पार्थासी वृत्त त्याचें ॥
कृष्ण म्हणे गुप्तरूपें सर्पिणीनें । वनीं यासी प्रेमें संरक्षिलें ॥ ३ ॥
मानूनि ‘ तो ’ ऐसें वधिली सर्पिणी । वैर तें स्मरूनि पातला हा ॥
तिर्यग्गतीनें ‘ तो ’ येतांचि पाहिला । छिन्नभिन्न केला धनुर्धरें ॥

पुढती कृष्णानें उचलूनि रथ । केला मार्गस्थित लीलामात्रें ॥ ६ ॥
सूर्यपुत्र परी संधी ते साधून । सोडी दशबाण पार्थावरी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्रोधाविष्ट पार्थ । सोडी तैं नाराच बाण एक ॥ ८ ॥

२४१

कवच भेदूनि शिरला भूगव्हरीं । खवळे सर्पापरी कर्ण तदा ॥१॥
द्वादश शरांनीं वेधी तो कृष्णातें । एकोनशत ते पार्थावरी ॥ २ ॥
पुनरपि पार्था, ताडूनियां बाण । उपहास कर्ण करी हास्यें ॥ ३ ॥
अपमानें क्षुब्ध होऊनि तैं पार्थ । प्रखर सायक सोडी बहु ॥ ४ ॥
शिरोभूषण तैं छेदिलीं कुंडलें । क्षणीं भग्न केलें कवच श्रेष्ठ ॥ ५ ॥
कवचहीनासी ताडिलें शरांनीं । घुसले रोमरोमीं प्रखर बाण ॥६॥
घायाळ कर्णाचें फोडीयेलें वक्ष । गळे त्याचें चाप करांतूनि ॥ ७ ॥
रथामाजी अंतीं पडला मूर्छित । वध तैं प्रशस्त न गणीं पार्थ ॥८॥
वासुदेव म्हणे त्वरेनें श्रीकृष्ण । वदला वचन अर्जुनासी ॥ ९ ॥

२४२

वेडा रे वेडा हे पार्था, दिससी तूं मातें ॥
वधितीं जाणूनि ज्ञाते दुर्बल शत्रूतें ॥ १ ॥
अविलंबेंसी दुर्बल शत्रूसी जिंकावें ॥
'शत्रूसंकट ते संधि' तत्व ध्यानीं ध्यावें ॥ २ ॥
तोचि धर्माचार पार्था, कीर्ति ही तयानें ॥
थांबूं नको कर्णवध करावा त्वरेनें ॥ ३ ॥
संकटमुक्त तो होतां घेऊनियां झेंप ॥
ताडील तुजसी श्रम होतील हे व्यर्थ ॥ ४ ॥
नमूचीवधाचें यश लाभलें जें इंद्रा ॥
तैसें कर्णवधें तुज लाभो कुरुवीरा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी मुकुंदाची वाणी ॥
मानली पार्थासी गर्जे प्रत्यंचा ओढोनि ॥ ६ ॥

२४३

शराघातें कर्ण पलाश फुलला । रोमरोमीं झरा शोणिताचा ॥ १ ॥
परी महावीर वर्षे शरवृष्टि । अस्तासी गभस्तीसम भासे ॥ २ ॥
खवळूनि कर्ण ताडी कृष्णार्जुनां । परी छिन्न बाणां करी पार्थ ॥३॥
अंतीं चिंती पार्थ वधावें कर्णासी । तोंचि गुप्तरूपी वदला काळ ॥
कर्णा, रथचक्र गिळिलें भूमीनें । अस्त्रविस्मरणें कर्णा, बोध ॥५॥
इतुक्यांत चक्र न हाले रथाचें । स्मरण शापाचें होई वीरा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भयाकुल कर्ण । बोलला वचन तयावेळीं ॥ ७ ॥

२४४

ज्ञाते बोलती ' धार्मिका । धर्म संरक्षी सर्वदा ' ॥ १ ॥
धर्मास्तव झटतों आम्हीं । तथापि हे कैसी हानी ॥ २ ॥
धर्म सर्वदा कल्याण- । करी, मिथ्या हें वचन ॥ ३ ॥
तदा कर्णावरी पार्थ । शर सोडी असंख्यात ॥ ४ ॥
विव्हल तें रविनंदन । लावी धर्मासी दूषण ॥ ५ ॥
पुढती तीन शर कृष्णा । ताडी सप्त ते फाल्गुना ॥ ६ ॥
सप्तदश पार्थशर । गेले भेदूनि शरीर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । एकवटी सकलप्राण ॥ ८ ॥

२४५

सकल सामर्थ्यें ब्रह्मास्त्र योजिलें । ऐंद्रास्त्र जपिलें धनंजयें ॥ १ ॥
कृष्ण म्हणे पार्था, छिन्नभिन्न बाण । करी, अस्त्र अन्य योजीं वेगें ॥
ऐकूनि अर्जुन ब्रह्मास्त्र मंत्रूनि । झांकी सायकांनीं कर्णाप्रति ॥ ३ ॥
ऐशाही समयीं कर्ण महावीर । दावी चमत्कार सामर्थ्याचा ॥ ४ ॥
क्षणार्धें पार्थाची तोडिली प्रत्यंचा । अन्य योजी चापा पार्थ क्षणीं ॥
तेही क्षणार्धांत तोडिली कर्णानें । योजिली त्वरेनें अन्य पार्थें ॥ ६ ॥
पुनरपि तेंचि करी सूर्यसुत । क्षणार्धेंचि पार्थ योजी अन्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रत्यंचाशतक । तोडी तोंचि श्रेष्ठ जोडी, तो, कीं ॥

२४६

पुढती पार्थानें योजूनि प्रत्यंचा । वेगें अन्य अस्त्रा अभिमंत्रिलें ॥
अलातचक्र तें फिरतसे चाप । प्रत्यंचा कर्णास दिसेचिना ॥ २ ॥

पुनरपि कर्णें केला चमत्कार । योजिलीं अपार अस्त्रें रणीं ॥ ३ ॥
विस्मित अर्जुन कुंठितचि झाला । श्रीकृष्ण बोलला तदा तया ॥४॥
पार्था, पुन्हा पुन्हा अस्त्रें योजीं तींच । विजय तरीच निश्चयेंसी ॥
तैसेंचि पार्थानें करूनियां एक । मंत्रिला सायक दिव्य अस्त्रें ॥ ६ ॥
कथिलें जें पूर्वीं प्रसंग हा तोचि । चक्र पृथ्वी भक्षी याचिवेळीं ॥
वासुदेव म्हणे कर्ण तयावेळीं । उतरला खालीं सत्वरचि ॥ ८ ॥

२४७

खालीं उतरोनि रथोद्धारयत्न । करीतसे कर्ण बहुपरी ॥ १ ॥
चक्रासवें चार अंगुलें मेदिनी । उचली सेनानी सप्तद्वीपा ॥ २ ॥
परी रथचक्र न निघे बाहेर । क्रोधावेशें नेत्र भरूनि येती ॥ ३ ॥
खवळला पार्थ, पाहूनियां कर्ण । बोलला वचन तयाप्रति ॥ ४ ॥
महाधनुर्धरा, थांबें क्षणभरी । रथ चक्र वरी काढितों मी ॥ ५ ॥
रुतलें भूमींत रथचक्र डावें । हेतु न साधावे ऐशा वेळीं ॥ ६ ॥
विपन्न मी ऐशावेळीं बाणक्षेप । न करिती श्रेष्ठ वीर कदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विनवी आतां कर्ण । संकटांत धर्म आठवतो ॥ ८ ॥

२४८

पार्था, विशिष्ट तूं योद्धा । न करीं ऐशा निंद्य कृत्या ॥ १ ॥
मुक्तकेश, शरणागत । त्यक्तशस्त्र अथवा विप्र ॥ २ ॥
युद्धविमुख, जो याची । पितृहीन, वेर्म[1] न ज्यासी ॥ ३ ॥
ऐशा नरासी प्रहार । करिती न कदा थोर ॥ ४ ॥
युद्धधर्मज्ञ तूं वीर । जाणितोसी श्रुतिसार ॥ ५ ॥
कार्तवीर्यासम योद्धा । सकल अस्त्रांचा तूं ज्ञाता ॥ ६ ॥
अतुलवीर्य महाभुजा । चक्रोद्धार होवो माझा ॥ ७ ॥
भूमिस्थित मी विपन्न । तोंवरी न सोडीं बाण ॥ ८ ॥
कुलवर्धना, न मातें । भय लवहीं तुमचें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । याची थांब एक क्षण ॥ १० ॥

---

१ कवच

अध्याय ९१ वा

२४९

ऐकूनि कर्णासी बोलला श्रीकृष्ण। आठवला धर्म भाग्याचि हें ॥१॥
संकटीं दैवासी नीच निंदिताती। बहुधा दुष्कर्मासी विसरूनियां ॥
आणिलीत जेव्हां 'सभेंत साध्वीसी। विझली कैंवी ज्योति धर्माची तैं
द्यूतीं जाणूनि जें केलें कपटकर्म। कोठें तुझा धर्म होता तेव्हां ॥ ४ ॥
राज्य नच दिलें प्रतिज्ञा पाळून। कोठें तुझा धर्म होता तेव्हां ॥ ५ ॥
योजूनि भीमासी चारिलें विषान्न। कोठें तुझा धर्म होता तेव्हां ॥
लाक्षागृह जेव्हां दिलें पेटवून। कोठें तुझा धर्म होता तेव्हां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण यदुनाथ। मापामागें माप पदरीं घाली ॥ ८ ॥

२५०

घडतां घोर पाप दिसली दंतपंक्ती। तेव्हां धर्मबुद्धि होती कोठें ॥
निरागसा कृष्णा यदा क्लेश सोशी। तेव्हां धर्मबुद्धि होती कोठें ॥२॥
वदलासी, कृष्णे, अन्य वरीं पती। तेव्हां धर्मबुद्धि होती कोठें ॥३॥
केलेंति अधर्में द्यूत पुनरपि। तेव्हां धर्मबुद्धि होती कोठें ॥ ४ ॥
विसरलां तुम्हीं तदा सद्धर्मासी। आतां कासयासी कंठशोष ॥५॥
आठवूनि धर्म न आतां रक्षण। विजयलाभ जाण पांडवांसी ॥ ६ ॥
पुनर्वैभव ज लाभलें नळासी। तैंवी हेतुसिद्धी पांडवांची ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे योगेश्वर कृष्ण। बोलला वचन स्पष्टपणें ॥ ८ ॥

२५१

लज्जानत, कर्ण ऐकूनि उत्तर। नच प्रत्युत्तर वदला कांहीं ॥ १ ॥
परी क्रोधावेशें दांत-ओंठ चावी। आकर्ण वांकवी चाप वेगें ॥ २ ॥
कृष्ण म्हणे पार्था, योजूनि दिव्यास्त्र। साधावें सत्वर कार्य आतां
वदला जें कृष्ण कर्णासी तें पार्थ। ऐकूनियां क्रुद्ध होई बहु ॥ ४ ॥
रोमरोमांतूनि निघती अग्निज्वाला। कर्ण ब्रह्मास्त्राला सोडीतसे ॥
रथचक्रोद्धार व्हावयासी झटे। निवारी कर्णाचें अस्त्र पार्थ ॥ ६ ॥
प्रिय आग्नेयास्त्र योजी तें अर्जुन। जपला वारुण अस्त्र कर्ण ॥ ७ ॥
वायव्यास्त्र तदा योजी धनुर्धर। कर्ण महाशर योजी चापीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कांपली धरणी। शस्त्र अवलोकूनि देव भ्याले ॥९॥

२५२

रणीं सुटला झंझावात। पांडव तें भयग्रस्त ॥ १॥
उडती सर्वत्र पाषाण। भरलें धुळीनें गगन ॥ २ ॥
झाला नभीं हाहाःकार। तेजःपुंज सुटला शर ॥ ३ ॥
महा नाग वारुळांत। तैसा पार्थ हृदयांत-॥ ४ ॥
घुसतां, कांपला अर्जुन। पडलें चाप करांतून ॥ ५॥
कर्ण साधूनि ते संधि। रथाखालीं घेई उडी ॥ ६ ॥
यत्नें चक्रोद्धार करी। दैव प्रतिकूल परी ॥ ७ ॥
यत्न जाहले विफल। समिप आली घोर वेळ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। झाला सावध क्षणांत ॥ ९ ॥

२५३

कालदंडाचि तें प्रांजलिक बाण। ओढिला दारुण विजयानें ॥ १ ॥
कृष्ण म्हणे शिर छेदावें सत्वरी। नाहीं रथावरी चढला तोंचि ॥२॥
तथेति म्हणोनि पार्थ सोडी बाण। पाडिला छेदुन ध्वज खालीं ॥
काय वर्णावा तो ध्वज राधेयाचा। शोभे हस्तिकक्षा¹ जयावरी ॥
रत्नखचित तो पाहूनि शत्रूंसी। भय अंतरासी सर्वकाळ ॥ ५ ॥
जगप्रसिद्ध तो आदित्यासमान। ध्वज कांतिमान पडला रणीं ॥६॥
आशाभंग तदा होई कौरवांचा। तळमळ चित्ता वाटे बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे न थांबे अर्जुन। काढी दिव्यबाण अंजलिक ॥ ८ ॥

२५४

इंद्रवज्रचि कीं अग्निदंडासम। प्रखर किरण भास्कराचे ॥ १ ॥
मर्मभेदी मांस-रुधिरें माखला। षट्पिच्छें शोभला हस्तत्रय ॥ २ ॥
प्रलयानल कीं शिवाचें पिनाक। चक्र विदारक विष्णूचें जैं ॥ ३ ॥
दुर्निवार्य ऐसा करीं घेतां बाण। होवो जगत्त्राण म्हणती मुनि ॥
चराचर तदा होई प्रकंपित। जोडितो चापास बाण पार्थ ॥ ५ ॥
अस्त्राभिमंत्रणें आकर्ण ओढिला। चापासी बोलला तदा वीर ॥६॥
वासुदेव म्हणे प्रसंग जाणून। दक्षता सज्जन राखिताती ॥ ७ ॥

---

१. हत्तीचा साखळदंड

२५५

पार्थ म्हणे दिव्य चापा । हेतु सिद्ध होवो बापा ॥ १ ॥
शर महास्त्रप्रहित । उडवो कर्णाचें मस्तक ॥ २ ॥
जरी झाली तपश्चर्या । तोषविलें जरी आर्या ॥ ३ ॥
जरी ऐकिली हितोक्ति । सर्वकाळ आप्तेष्टांची ॥ ४ ॥
तथा पुण्येंचि हा बाण । प्रबलारीचे घेवो प्राण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । वेगें सोडी त्या शरास ॥ ६ ॥

२५६

अथर्वांगिरसी कृत्येसम बाण । सोडूनि अर्जुन वदला मोदें ॥ १ ॥
करावें या बाणें विजयी मजसी । नेऊनि कर्णासी यमालयीं ॥ २ ॥
दशदिशा तया बाणें होती दग्ध । कर्णशिरच्छेद करूनि गेला ॥ ३ ॥
भूमीवरी शिर पडलें तत्काळ । कोसळे शरीर मागोमाग ॥ ४ ॥
बालसूर्यासम मस्तकाची कांति । शरत्सूर्यदीप्ति झळके रणीं ॥ ५ ॥
आरक्तवर्ण जें अस्ताचळीं सूर्य । तैसें कर्णशिर, रुचिर देह ॥ ६ ॥
समृद्धसदनत्याग जें कठीण । शरीरा, तें जाण न त्यजी शिर ॥ ७ ॥
दिव्य ज्योति तदा विराली सूर्यांत । पाहिली प्रत्यक्ष सकळांनीं ८॥
वासुदेव म्हणे पेटतां वैराग्नि । निजोत्पत्तिस्थानीं दाह करी ॥ ९ ॥

२५७

झाला आनंदी आनंद । पार्थें केला कर्णवध ॥ १ ॥
देवदत्त पांचजन्य । नादें दुमदुमे गगन ॥ २ ॥
साथ तया रणवाद्यांची । सिंहगर्जना वीरांची ॥ ३ ॥
हर्ष पावती सोमक । फडकाविती निज वस्त्र ॥ ४ ॥
स्फूर्तिभरें समिप येती । पार्थविक्रम पाहती ॥ ५ ॥
आलिंगिती एकमेकां । पृष्ठीं मारिताती थापा ॥ ६ ॥
बरें झालें, बरें झालें । म्हणूनि नृत्य आरंभिलें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर । करिती आनंद अपार ॥ ८ ॥

२५८

झंझावातें गिरिशिखर कोसळे । यज्ञान्तीं कीं पावे अनल शांति ॥१॥
तैसें कर्णशिर अस्तंगत बिंब । रुधिरानें चिंब तनु शोभे ॥ २ ॥

शरकरें जाळी पांडवसेनेतें। सूर्य तो अस्तातें नेला पार्थें ॥ ३ ॥
सूर्यास्तही तदा जाहला त्या दिनीं। असतां रणस्थानीं सकळ वीर
घेऊनियां भग्नध्वज रिक्त रथ। शल्य शिबिरांत निघूनि जाई ॥५॥
विद्ध मर्यादित कौरव सैनिक। पळतां, पार्थास अवलोकिती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे समाप्तचि युद्ध। झाला कर्णवध, शोक आतां ॥ ७ ॥

अध्याय १२ वा

२५९

रिक्त भग्न रथ आणूनि शिबिरांत। शल्य नृपाळास वृत्त कथी ॥१॥
शोकमग्न तदा होई दुर्योधन। नयन भरून येती त्याचे ॥ २ ॥
हुंदके देऊनि मांडिलें रूदन। करी तें सांत्वन शल्य त्याचें ॥ ३ ॥
शल्य म्हणे राया, खेळ हा दैवाचा। उपाय कोणाचा न चले तेथें
पहावया येती असंख्यात वीर। पडला महावीर रणीं जेव्हां।'
हृष्ट, त्रस्त कोणी विषण्ण, विस्मित। कोणी शोकहत होती तदा
वृषभविहीन धेनूंचीं खिल्लारें। सैरावैरा पळे सैन्य तेंवी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीमाची गर्जना। शल्य दुर्योधना कथन करी ॥ ८ ॥

२६०

हांसला नाचला राया, वृकोदर। कोंदलें अंबर त्याच्या नादें ॥१॥
पांडवसैन्यासी आनंद अपार। केलें कर्णवैर पार्थें पूर्ण ॥ २ ॥
राया, काय वर्णूं दैना त्या सैन्याची। भासली यमाची पुरी मज ॥३॥
आजवरी ऐसें युद्ध न जाहलें। त्रासूनि सोडिलें कर्णें पार्था ॥ ४ ॥
प्रतिकूल परी दैवचि नृपाळा। तेणेंचि जाहला अंत ऐसा ॥ ५ ॥
यास्तव नृपाळा, करूं नको शोक। जय अनिश्चित रणीं सदा ॥६॥
ऐकूनि शल्याचें भाषण, दुष्कर्म। स्मरूनि, नंदन धृतराष्ट्राचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सूस्कारे सोडित। पडला मूर्छित दुर्योधन ॥ ८ ॥

अध्याय १३ वा

२६१

कर्णवधोत्तर स्थिति सैनिकांची। राव प्रश्नें कथी सूत ऐका ॥ १ ॥
अगाध सागरीं तारूं भग्न होतां। होई जे अवस्था तीचि रणीं ॥ २ ॥
त्राता कोण, त्राता कोण, ऐसा शब्द। सर्वत्रचि आर्त ऐकूं येई ॥
भग्नशृंगवृष, सर्प दंतहीन। सैरावैरा सैन्य पळे तेंवी ॥ ४ ॥

छिन्नायुध, भग्नकवच त्व त्पुत्र । बेभान सर्वत्र पळूनि गेले ॥ ५ ॥
पाठलाग भीम करी ऐशा भ्रमें । पळतां खिन्न मनें मूर्छा त्यांसी ॥६॥
सांपडेल तेंचि घेऊनि वाहन । करिती पलायन चोहींकडे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दैना पदातींची । चेंगरूनि जाती, मरूनि बहु ॥ ८ ॥

२६२

सर्वत्र सैनिकां अर्जुनचि दिसे । दुर्योधन दुःखें वदला हाय ॥ १ ॥
भीम मजवरी येईल बा जरी । वधीन मी तरी सूता तय ॥ २ ॥
रायाचें वचन ऐकूनि पदाति । युद्ध आरंभिती पांडवांसी ॥ ३ ॥
भीमसेन तदा उतरे रथाखालीं । शलभांसम करी दग्ध सेना ॥४॥
सौबल सात्यकि करिती संग्राम । इतुक्यांत अर्जुन येई तेथें ५ ॥
पाहूनि तयासी घाबरूनि सैन्य । वांचावया प्राण पळूनि जाई ॥६॥
पुढती जाहला अपूर्व संग्राम । करितो कथन वासुदेव ॥ ७ ॥

२६३

राया, दुर्योधन खवळूनि जाई । करी हातघाई महाशौर्यें ॥ १ ॥
पांडववीरांसी लढला एकाकी । विस्मय मानसीं सकलांच्या ॥ २ ॥
पलायनोद्यत सैनिकांसी राव । देऊनि उत्साह वदला तदा ॥ ३ ॥
वीरहो, वांचाया नसे आतां स्थान । लाभ न पळून लवही तुम्हां ॥
श्रांत कृष्णार्जुनां वधीन शौर्यानें । रणांत मरण श्रेय आम्हां ॥ ५ ॥
मर्त्यलोकीं मृत्यु न टळे कोणासी । रणीं क्षत्रियासी मरण स्वर्ग ॥६॥
पळूनियां भीम न सोडी सर्वथा । वाडवडिलांचा पंथ श्रेष्ठ ॥ ७ ॥
धारातीर्थीं देह ठेवी तया स्वर्ग । ऐकूनिही मार्ग क्रमिती वीर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सुटे ज्याचा धीर । प्रत्यक्ष ईश्वर व्यर्थचि त्या ॥ ९ ॥

२६४

युद्धोत्सुक सैन्य करी दुर्योधन । तयासी पाहून शल्य म्हणे ॥ १ ॥
राया, युद्धभूमि पाहें ही भयाण । प्रेतें छिन्नभिन्न सर्वत्रचि ॥ २ ॥
खड्गें, चापें, गदा, अंकुश, तोमरें । छिन्न, भग्नशिरें कुंजरांचीं ॥३॥
रुधिराचे पाट वाहती अद्यापि । रुधिर ओकती पतित अश्व ॥ ४ ॥
कित्येक गरगरां फिरविती डोळे । किती आर्तस्वरें आक्रंदती ॥५॥
प्रक्षुब्ध कित्येक चावती भूमीस । वीर अर्धमृत पाहें राया ॥ ६ ॥

कण्हती कुंथती प्राण कंठीं येती । नेत्र विस्फारिती किती एक ॥७॥
छिन्न-हस्तपाद कोणी ओरडती । बुबुळ लोंचती मेंदूसवें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे रथ, धुरा, अश्व । गज, जेंवी मेघ भूमीवरी ॥ ९ ॥

२६५

नष्ट आभरणें वस्त्रें । जणु प्रशांत निखारे ॥ १ ॥
शतावधि ऐसे वीर । होऊनियां छिन्न गात्र ॥ २ ॥
मृत्यु जयां न अद्यापि । इतस्ततः अवलोकिती ॥ ३ ॥
दिसली निराशा भयाण । क्षणीं कोणी सावधान ॥ ४ ॥
अग्नि पुनरुज्वलित । भास पाहूनि त्यां होत ॥ ५ ॥
ध्वज, चक्र, तुंबे, कणे । विकीर्ण हीं नवरत्नें ॥ ६ ॥
सुखविलास यापरी । त्यागूनियां स्वर्गावरी ॥ ७ ॥
गेले जाऊंदे तयांसी । चल आतां शिबिरासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शल्य । सांगे अनर्था तूं मूळ ॥ ९ ॥

२६६

ऐसें बोलूनियां शल्य होई स्तब्ध । राव शोकव्याप्त नेत्र पुशी ॥१॥
कर्णा, कर्णा, ऐशा आर्त हांका मारी । पडला भूमीवरी बेभान तो
अश्वत्थामाआदि समीप पातले । बहु आश्वासिलें रायाप्रति ॥३॥
सभोंवार दृष्टि फेंकितां तयांसी । आरक्तवस्त्रेंसी युवती दिसे ॥ ४ ॥
रणदेवी तदा माखली रक्तानें । असंख्य भूषणें झळकती ॥ ५ ॥
भरजरी रक्तवर्णवस्त्र भासे । सन्निध पार्थातें अवलोकिती ॥ ६ ॥
पाहूनि वीरांसी न धरवे धीर । गांठिती शिबिर, कर्ण मनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्णा, कर्णा, ऐसे । शब्द मुखावाटे सहज येती ॥

२६७

इकडे कर्णवपु झळके शरांनीं । भासला तरणी भूमिस्थित ॥ १ ॥
सूर्यपुत्र सूर्योपासना तयाची । होई धारातीर्थी सुस्नात तो ॥ २ ॥
भक्तानुकंपी त्या स्पर्शूनि भास्कर । स्नानार्थ सागरतीर्थ गांठी ॥
पाहूनि देवादि जाती निजस्थानीं । एकचि वदनीं विषय त्यांच्या ॥

जिवंताचि भासे शवरूप कर्ण । तेजस्वी नयन रुळती केश ॥ ५ ॥
पूर्णचंद्रासम वदन विराजे । शोभती अंगदें बाहूंमाजी ॥ ६ ॥
उन्मळला जणुं महावृक्ष वनीं । भासला तें रणीं अधिरथ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शमविला अग्नि । शरांचें शिंपूनि उदक पार्थे ॥ ८ ॥

२६८

सूत म्हणे राया, कर्ण अलौकिक । सपुत्र तयास वधिलें परी ॥१॥
त्राहि त्राहि झालें पांडववीरांसी । शौर्यें जगतासी तापविलें ॥ २ ॥
कल्पवृक्षासम कर्ण महादाता । आधार याचकां नुरला कोणी ॥३
नाहीं ऐसें कोणा वदला न कदा । देतां हेंचि सुखा सर्वकाळ ॥
सर्वधन त्याचें ब्राह्मणां आधीन । विप्रांस्तव प्राण तुच्छ तया ॥५॥
कर्ण कौरवांचा सर्वस्वी आधार । झाला निराधार दुर्योधन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुखाशा, जयाशा । धीर, कौरवांचा तुटला आतां ॥

२६९

कर्णनाशें स्तब्ध सरिताप्रवाह । मावळला सूर्य पडतां कर्ण ॥ १ ॥
कडाडली पृथ्वी गगन फाटलें । सिंधू खवळले झंझावातें ॥ २ ॥
कांपले पर्वत कोसळती उल्का । शिरच्छेद होतां राधेयाचा ॥ ३ ॥
कृष्णार्जुन सूर्यासम तळपले । कलाहीन केलें कौरवांसी ॥ ४ ॥
दणाणती शंखनादें दशदिशा । आनंद धर्माचा अपरंपार ॥ ५ ॥
मूर्तिमंत भय कौरवांपुढती । सोडूनि रायासी सेना गेली ॥ ६ ॥
काढूनियां शल्यें शिबिरांत येतां । पूजिती देवता कृष्णार्जुनां ॥ ७ ॥
बळदैत्यवधें वासव-विष्णूसी । धन्यता तें तैसी तयां वाटे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पुण्यवंत थोर । करिती जयजयकार अत्यानंदें ॥ ९॥

अध्याय ९५ वा

२७०

म्हणे रायासी संजय । दुर्योधना वदला शल्य ॥ १ ॥
करी तैसेंचि नृपाळ । फिरवी मागें सैन्यभार ॥ २ ॥
कृतवर्मा, शकुनि, कृप । जाती ससैन्य शिबिरास ॥ ३ ॥
फिरला दुःखें अश्वत्थामा । संशप्तक तें सुशर्मा ॥ ४ ॥
दुर्योधन दुःखाकुल । भग्नरथासवें शल्य ॥ ५ ॥

झाले निराश सकळ । लवही नव्हतें अंगीं बळ ॥ ६ ॥
राजआज्ञेनें शिबिरीं । राया सकल सेना गेली ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सैन्य । होतें सर्वही विषण्ण ॥ ८ ॥

अध्याय १६ वा २७१

सूत म्हणे राया, कौरवांचें सैन्य । जातांचि श्रीकृष्ण पार्थाप्रति-॥
धरूनि हृदयीं म्हणे वृत्रवधें । श्रेय जें इंद्रातें तेंचि तुज ॥ २ ॥
जाऊनि विक्रम कथूं तो धर्मासी । सफळ तयाची इच्छा आजी ॥
अलौकिक रण पाहूनि तो गेला । असमर्थ झाला शराघातें ॥ ४ ॥
विश्रांति पावला शिबिरीं जाऊनि । होईं तूं अनृणी कथूनि वृत्त ॥
तथेति अर्जुन बोलतां श्रीकृष्ण । वळवी स्यंदन वदला वीरां ॥ ६ ॥
शत्रु अभिमुख सावधानतेनें । स्थित व्हा शौर्यानें सुखी असा॥ ७॥
निवेदूनि वृत्त येतों धर्माप्रति । घेऊनि संमति हांकी रथ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धृष्टद्युम्नादिक । भीमासवें स्थित रणामाजी ॥ ९ ॥

२७२

पार्थासवें नरहरी । भेटे धर्मासी शिबिरीं ॥ १ ॥
भरजरी ज्याची शय्या । कृष्ण धरी त्याच्या पायां ॥ २ ॥
पार्थासवें, परमानंदें । धर्म उठला क्षणीं मोदें ॥ ३ ॥
मुद्रा तयाची पाहूनि । नेत्र भरले प्रेमाश्रूंनीं ॥ ४ ॥
जाणूनियां कर्णवध । प्रेमें आलिंगी उभयांस ॥ ५ ॥
कृष्णार्जुन कथिती वृत्त । कर्णवधाचें समस्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । हृष्ट जाहला ऐकून ॥ ७ ॥

२७३

बद्धांजलि स्मित हास्यमुख कृष्ण । बोलला वचन नम्रभावें ॥ १ ॥
रोमहर्षण या युद्धांत बांधव । वांचले पांडव भाग्यचि हें ॥ २ ॥
उचित तें आतां करा दक्षतेनें । कर्णासी अर्जुनें वधिलें शौर्यें ॥ ३ ॥
विटंबिलें तुम्हां, शत्रूचें त्या, अद्य । प्राशिल शोणित धरित्रीनें ॥
छिन्नशरीर तो लोंबतो मातींत । शत्रू आतां तुज नुरला धर्मा ॥५॥

आम्हांसवें आतां होई राया, सिद्ध । भोगावया भोग आनंदानें ॥६॥
वासुदेव म्हणे भक्तां भगवंत । तारी संकटांत ऐशारीति ॥ ७ ॥

२७४

महाभाग्य, महाभाग्य । गर्जे धर्म तें सानंद ॥ १ ॥
प्रेमें म्हणे श्रीकृष्णासी । काय अशक्य तुजसी ॥ २ ॥
सारथी तूं, वीर पार्थ । विजय तुम्हां हा सहज ॥ ३ ॥
कृष्णा, तुमचा हा प्रताप । असो हेंचि कृपाछत्र ॥ ४ ॥
सालंकृत धरूनि भुज । म्हणे तुम्हीं दोघे देव ॥ ५ ॥
ऋषि नर-नारायण । गेला नारद कथून ॥ ६ ॥
विजय अर्जुनाचा नित्य । देवा, तुझा हा प्रसाद ॥ ७ ॥
स्वीकारिलेंसी सारथ्य । तेंचि आमुचा विजय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । म्हणे कृष्णा, तूं कारण ॥ ९ ॥

२७५

बोलूनियां ऐसें सालंकृत रथीं । सानंद चित्तेंसी बैसे धर्म ॥ १ ॥
कृष्णार्जुनांसवें बोलत ससैन्य । गांठियेलें रण सकलांनीं ॥ २ ॥
पुत्रासवें कर्णप्रेत अवलोकूनि । निश्चय करूनि वदला धर्म ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे उपकार, ज्ञाता । विसरे न कदा सान थोर ॥ ४ ॥

२७६

भ्रात्यांसवें अद्य कृष्णा, मी नृपाळ । जाहलों केवळ कृपा तुझी ॥
निराश होईल आतां दुर्योधन । विजया कारण तूंचि कृष्णा ॥ २ ॥
भाग्येंचि विजय, भाग्यें कर्णवध । लाभलें गांडीव भाग्यें पार्था ॥३॥
त्रयोदश वर्षें निद्रा नसे आम्हां । सुखनिद्रा कृष्णा, अद्य लाभे ॥
प्रसाद केवळ तुझाचि माधवा । हर्ष वासुदेवा धर्मवचें ॥ ५ ॥

२७७

सूत म्हणे राया, वारंवार धर्म । प्रशंसी हर्षून कृष्णार्जुनां ॥ १ ॥
सपुत्र कर्णाचें प्रेत पाहूनियां । पुनर्जन्म तया झाला वाटे ॥ २ ॥
सकलही वीर वंदूनि धर्मासी । कृष्णार्जुनस्तुति करिती मोदें ॥३॥
जयनादघोषें वीर ते कृतार्थ । जाती शिबिरास अत्यानंदें ॥ ४ ॥

रोमांचकारी हा घडला क्षत्रनाश । नृपाळा, हें पाप तुझ्या योगें ॥
व्यर्थ आतां शोक करिसी कासया । खेद वासुदेवा या वृत्तानें ॥

२७८

वैशंपायन हें कथिती सकळां । निश्चेष्टित झाला राव तदा ॥ १ ॥
गांधारीसवें तो पडे भूमीवरी । सांवरूनि धरी विदुर तया ॥ २ ॥
संजय, विदुर करिती सांत्वन । दैव बलवान म्हणती जनीं ॥ ३ ॥
निवारील कोण भवितव्याप्रति । मूर्छा रायाप्रति पुनः पुनः ॥ ४ ॥
सांत्वन करिती विदुर संजय । स्तब्ध होई राव खिन्न मनें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अंतीं पश्चात्ताप । दैवदुर्विलास हाचि मोठा ॥ ६ ॥

२७९

कर्णार्जुन युद्ध राया, यज्ञचि जाणावा ॥
पठण-श्रवणें यज्ञपुण्यलाभ जीवां ॥ १ ॥
विष्णु सनातन यज्ञ तोचि भगवान ॥
अग्नि, वायु, यज्ञ, रुद्र, सूर्य, नारायण ॥ २ ॥
मत्सरविहीन याचें पठण करितां ॥
श्रवण तैसेंचि याचें नेई श्रेष्ठ लोका ॥ ३ ॥
अभ्यासितां भक्तिभावें धन-धान्य, यश ॥
लाभेल श्रवणें याच्या नित्य सर्व सौख्य ॥ ४ ॥
ब्रह्मा, विष्णु, महेशांचा होईल प्रसाद ॥
निदिध्यासें विप्रा वेदपठण पुण्यलाभ ॥ ५ ॥
क्षत्रिय लाभूनि बळ पावेल विजय ॥
वैश्य धनवंत होई, शूद्रासी आरोग्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्णपर्व हें ऐकतां ॥
शुद्धचित्त मानवाची हरिपदीं श्रद्धा ॥ ७ ॥

२८०

व्यास भगवान गुण वर्णिती विष्णूचे ॥
पूर्ण मनोरथ याच्या पठणें जीवांचे ॥ १ ॥
सवत्स कपिला नित्य संवत्सर एक ॥
प्रतिदिनीं दान देतां पुण्य जें जनांस ॥ २ ॥

पुण्य तेंचि कर्णपर्वश्रवण करितां ॥
वैशांपायन कथिती जनमेजय राजा ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे पर्व गोविंदचरणीं ॥
धन्य जाह्लों मी आजी सद्भावें अर्पूनि ॥ ४ ॥

## कर्णपर्व समाप्त

---

या कर्णपर्वाची एकंदर अभंगसंख्या २८०

पुढील शल्यपर्वाचा आद्य श्लोक—

जनमेजय उवाच—

एवं निपातिते कर्णे समरे सव्यसाचिना ॥
अल्पावशिष्टाः कुरवः किमकुर्वत वै द्विज ॥ १ ॥

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग--भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## ९ शल्यपर्व

### शल्यसैनापत्याभिषेकपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला

१

विश्वाधार नारायण । वंदूं नर नरोत्तम ॥ १ ॥
देवी सरस्वती व्यास । वंदूं गाऊं जयग्रंथ ॥ २ ॥
सकल पुरुषार्थांची सिद्धि । वंदितां या ईशमूर्ति ॥ ३ ॥
गाऊं ' अभंग-भारत ' । व्यासमुनींचा प्रसाद ॥ ४ ॥
वंदूंनियां विनायका । शल्यपर्व गाऊं आतां ॥ ५ ॥
वासुदेव धन्य झाला । प्रेमें गाई भारताला ॥ ६ ॥

२

जनमेजय म्हणे वैशंपायनासी । कथावें पुढती वृत्त मज ॥ १ ॥
सांगा मज दुर्योधनें काय केलें । कर्णादि संपले वीर यदा ॥ २ ॥
मुनि म्हणे शोकमग्न दुर्योधन । दुःखें कर्ण कर्ण हेंचि बोले ॥ ३ ॥
वीर तदा तया नेती शिबिरांत । दैवाचें वरिष्ठ म्हणे राजा ॥ ४ ॥

निश्चयें या करी शल्यासी अभिषेक । पुनरपि युद्ध करी घोर ॥५॥
माध्यान्हीं शल्यासी वधिलें धर्मानें । पळाले दुःखानें कौरवेंद्र ॥६॥
महान्हदीं वीर दडला जाऊनि । अंतीं त्या लढूनि वधिलें भीमें ॥७॥
पांचाळ सोमकां वधिलें अपरात्रीं । द्रौपदीसुतांसी गुरुपुत्रें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुःखें सूतपुत्र । हस्तिनापुरास धांव घेई ॥ ९ ॥

३

कांपे ओरडे संजय । करी बहु हाय हाय ॥ १ ॥
शिरला राजमंदिरांत सर्वस्वाचा म्हणे घात ॥ २ ॥
व्यर्थ झाले पराक्रम । अंतीं दैवाचि बलवान ॥ ३ ॥
दुर्योधनवधें आजी । झाली निराशा सर्वांची ॥ ४ ॥
ऐकूनियां घोरवृत्त । बुडती शोकांत समस्त ॥ ५ ॥
कानीं वृत्त त्याच्या पडे । धाय मोकलूनि रडे ॥ ६ ॥
कर्णवधें शोकमग्न । होतां राव चिंतापूर्ण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता । नृपासन्निध तैं होता ॥ ८ ॥

४

स्नुषांसवें होती गांधारी त्या स्थानीं । नृपासी येऊनि वंदी सूत ॥
सद्गदित कंठें उच्चार अस्पष्ट । झाला सर्वघात म्हणे राया ॥ २ ॥
कृप, कृतवर्मा, अश्वत्थाम्यावीण । वीरांसवें सैन्य सकल नष्ट ॥ ३ ॥
सात्यकि, कृष्ण तैं पांडव सकळ । इतुकेचि केवळ अवशिष्ट ॥ ४ ॥
निमित्तमात्र हा राव दुर्योधन । खेळला दारुण खेळ काळ ॥ ५ ॥
ऐकूनि तें वृत्त विदीर्ण हृदय । मूर्छित तैं हाय पडला राव ॥ ६ ॥
एकीमागें एक सकळही स्त्रिया । मूर्छित जाहल्या परम दुःखें ॥
वासुदेव म्हणे चित्रें पटावरी । सर्व तीं भासलीं राजासवें ॥ ८ ॥

५

निश्चेष्ट होऊनि करिती बडबड । वेळ अवघड पातली ते ॥ १ ॥
शुद्धीवरी राव येऊनि विदुरा । बोले तूं आसरा एक आम्हां ॥ २ ॥
'काय ही कठीण वेळ मजवरी' । सहज उच्चारी राव शब्द ॥ ३ ॥
पुनरपि मूर्छा तोंचि रायाप्रति । सावध करिती यत्नें तया ॥ ४ ॥

कुंभस्थ नागसा सुस्कारे सोडीत। अनिवार शोक सकलांसी तें ॥
आक्रोश सकळ स्त्रियांनी मांडिला। दूर न्या यांजला म्हणे राव ॥६॥
विदुर त्या वेळीं युक्तीनें स्त्रियांसी। अन्य स्थळाप्रति पाठवितो ॥७॥
वासुदेव म्हणे वोलूनि विदुर। रायाचें अंतर शांत करी ॥ ८ ॥

अध्याय २ रा

६

पुढती धृतराष्ट्रें आक्रोश मांडिला। मोकळाचि केला गळा तेणें ॥
क्रोधतप्त श्वास सोडी वारंवार। हाय हाय पुत्रनाश म्हणे ॥ २ ॥
सर्वही पांडव कैसे हे वांचले। कौरव संपले सकळ कैसे ॥ ३ ॥
किती वाळलीला आठवूं वाळांच्या। पारावार शोका नाहीं माझ्या
वाळा दुर्योधना, भेट दे सत्वरी। अनाथ भिकारी तात तुझा ॥५॥
विफल अपेक्षा कैसी तव झाली। वाटे महावळी दैव मज ॥ ६ ॥
भीष्म, द्रोण, कर्ण, गेले महावीर। घटना हे घोर दुर्दैवाचि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्मरूनियां वीरां। शोकमग्न झाला राव वहु ॥ ८ ॥

७

भूरिश्रवा, सोमदत्त तें वाल्हिक। वीर भगदत्त पडला रणीं ॥ १ ॥
जयद्रथादि ते संशप्तक गेले। दैव उलटलें आम्हांवरी ॥ २ ॥
सर्वांचि घेऊनि भाग्य जन्मे नर। प्रसंग हा घोर मजवरी ॥ ३ ॥
आत्मस्वकीयही उरले न मज। शत्रूच्या करांत पडलों हाय ॥ ४ ॥
छिन्नपक्षपक्षीदैन्य मी पावलों। वनवासी झालों संजया, मी ॥ ५ ॥
कठोर भीमाचे साहूं कैंवी शब्द। वधिले समस्त वाळ तेणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा वहुपरी। राव शोक करी स्मरूनि पुत्रां ॥ ७ ॥

८

आप्त वांधव ज्या राहिले न कोणी। नृप तो चिंतूनि वदला सूता
संजया, कथावें सकलही वृत्त। आतां विदुरोक्त स्मरतें मज ॥२॥
प्रत्यक्ष पाहूनि उमज न पडे। जगांत वापुडे ऐसे मूढ ॥ ३ ॥
वदला तें सत्य प्रत्ययासी येई। कर्मफल होई प्राप्त जनीं ॥ ४ ॥
सूता, रणांगणीं कोण कोठें होता। निवेदीं त्या वृत्ता सविस्तर ॥

वर्तमान कैंवी घडलें नं सांग । उरले जे मागें कैसे कथीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राव संजयासी । कुशल तूं ऐसी भाषा बोले ॥ ७ ॥

अध्याय रा ३ रा ९

सूत म्हणे राजा, कर्णवधोत्तर । पलायनमात्र करी सैन्य ॥ १ ॥
नृपाळ आंवरी वारंवार तयां । परी यत्न वांयां सकल त्याचे ॥२॥
भग्ननौकेमाजी जेंवी वणिक्जन । पडतां रणीं कर्ण, सैन्य तेंवी ॥३॥
छिन्नशृंग वृष, भग्नदन्त सर्प । वीर तैं रणांत दीन झाले ॥ ४ ॥
भयाकुल सर्व वीर ते बेभान । दिसती भीमार्जुन सर्वत्र त्यां ॥ ५ ॥
सांपडेल त्याचि बैसती वाहनीं । अस्ताव्यस्त कोणी पळूनि जाती
पलायनेंचि त्या बहुनाश होई । पुढती तैं नेई रथ राव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सैन्यासी आधार । व्हावें हा विचार नृपाळाचा ॥८॥

१०

राजाच्या प्रयत्नें सैन्य सिद्ध होई । झाली हातघाई पुनरपि ॥ १ ॥
परी पांडवांचे भीमादिक वीर । करिती संहार अपरिमित ॥ २ ॥
कपिध्वज श्वेतहय पार्थरथ । पाहूनियां धाक कौरवांसी ॥ ३ ॥
अंतीं सर्व सैन्य करी पलायन । स्फूर्ति दुर्योधन देई तयां ॥ ४ ॥
मोक्षमार्ग वीरांप्रति एक युद्ध । वीर हो, कां व्यर्थ पळूनि जातां ॥
ऐकूनि तें सैन्य फिरतां माघारें । समर जुंपलें फिरूनि घोर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पाघरूनि तत्व । स्वार्थास्तव दुष्ट नष्ट होती ॥ ७ ॥

अध्याय ४ था ११

झाला विनाशचि अंतीं । चिंतामग्न वीर होती ॥ १ ॥
काय करावें न कळे । अंतीं आक्रंदन केलें ॥ २ ॥
शीलसंपन्न तैं कृप । झाले करुणार्द्र चित्त ॥ ३ ॥
बदले प्रेमयुक्त वाणी । राजा, वचन घेई ध्यानीं ॥ ४ ॥
करणें रणीं पलायन । क्षत्रियांसी हा अधर्म ॥ ५ ॥
लाभे रौरव तयांसी । पलायन जे करिती ॥ ६ ॥
कथितों यास्तव हिताचें । राया, ऐक शांतचित्तें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृप । करिती पुनरपि बोध ॥ ८ ॥

१२

घोरयुद्धीं गेले भीष्म द्रोण कर्ण । सिंधुपति जाण तोही गेला ॥ १ ॥
लक्ष्मणही राजा गेला त्याचि पंथें । अर्पावें कोणातें राज्य आतां ॥
अनुचित कर्म आरंभिलें आम्हीं । अर्जुनासी रणीं जिंकी कोण ॥३॥
शिशिरांत होई जेंवी वनदाह । निर्दाळिलें सर्व सैन्य तेंवी ॥ ४ ॥
धनंजय जेंवी हस्ती चतुर्दंत । उडवी सैन्यांत दाणादाण ॥ ५ ॥
राया, जयद्रथा वधिलें जें पार्थें । गेलों होतों कोठें तदा आम्हीं ॥
सकळां समक्ष वधिलें तयासी । परीक्षा आमुची झाली तेव्हां ॥७॥
वासुदेव म्हणे ज्ञानवृद्ध कृप । करिताती बोध दुर्योधना ॥ ८ ॥

१३

राया, कोण अवनीवरी । अर्जुनासी जो निवारी ॥ १ ॥
येतां गांडीवनिर्घोष । सकळ वीर तें निस्तेज ॥ २ ॥
भीम अवशिष्ट वचन । करील त्वरिताचि पूर्ण ॥ ३ ॥
दुष्कर्माचें राया, फळ । खटाटोप हा निष्फल ॥ ४ ॥
गेलें झालें तें, पुढती । दुर्योधन स्वहित चिंती ॥ ५ ॥
प्राण रक्षितां अनुकूल । राया, येईल रे काल ॥ ६ ॥
संधि प्रशस्त या वेळीं । नीति गुरूनें कथिली ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बोध । समर्यी दावितो सन्मार्ग ॥ ८ ॥

१४

न कळे स्वहित जयासी । जाणूनि जो अवलक्षी ॥ १ ॥
त्याच्या वैभवाचा नाश । नृपा, शमें साधीं राज्य ॥ २ ॥
बहु दयावंत धर्म । मानी धृतराष्ट्रवचन ॥ ३ ॥
भीमार्जुन श्रीकृष्णाचें । वचन मानितील साचें ॥ ४ ॥
राया, थांबवावें युद्ध । कथितों केवळ हितार्थ ॥ ५ ॥
नसे लवही दुष्टबुद्धि । अथवा चिंता मत्प्राणांची ॥ ६ ॥
हितावह तें कथिलें । आदरितां होईल भलें ॥ ७ ॥
अनादरें पश्चात्ताप । अंतीं होईल नृपास ॥ ८ ॥
ऐसें बोलूनि ढळढळां । रडूनि करिती मुक्त गळा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे अंतीं । गुरु निश्रेष्ट पडती ॥ १० ॥

अध्याय ५ वा

१५

सूत म्हणे राया, बोध तो ऐकूनि । निश्वास सोडूनि स्तब्ध राव ॥
क्षणभरी मनीं चिंतूनि बोलला । हित तेंचि विप्रा कथिलें मज ॥२॥
रणीं घोरयुद्ध आचरूनि आजि । इष्ट कथिलेंसी मित्रभावें ॥ ३ ॥
परी मुमुर्षूसी औषध न रुचे । तैसेंचि हें मातें न रुचे कांहीं ॥ ४ ॥
हेतु कारणेंसीयुक्त हितप्रद । वचन मन्मनास न रुचेचि हें ॥ ५ ॥
राज्यभ्रष्ट आम्हीं केलें ज्या धर्मासी । विश्वास तयासी अमुचा कैंवी
शिष्टाईस येतां फसविलें कृष्णा । विसरेल कृष्णा कैंवी क्लेश ॥ ७ ॥
कृष्णार्जुन दोन्हीं दिसती जरी भिन्न । विप्रा, ते अभिन्न राव म्हणे ॥
वासुदेव म्हणे शांतपणें राजा । आपुल्या मानसा प्रगट करी ॥ ९ ॥

१६

होतां अभिमन्युवध कृष्णार्जुन । झाले निद्राहीन दुःखावेगें ॥ १ ॥
तळमळे कृष्ण भागिनेयासाठीं । क्षमील आम्हांसी कैसा तरी ॥२॥
भंगेल परी तो न वांकेल भीम । प्रतिज्ञास्मरण नित्य तया ॥ ३ ॥
नकुळ सहदेव वधाची प्रतिक्षा । करिती नित्य माझ्या, कवचधारी ॥
विस्मरण कैंवी वीरां पांचाळींचें । होईल, शल्य तें द्रौपदीसी ॥५॥
वधार्थ तियेनें आचरिलें तप । वर्णावें श्रेष्ठत्व काय तिचें ॥ ६ ॥
कृष्णभागिनी ते सुभद्रा जियेसी । सेवी आदरेंसी त्यजूनि मान ॥
ऐसी वैरज्वाला शांत कैंवी व्हावी । इच्छा कां धरावी ऐसी आम्हीं
वासुदेव म्हणे वीर दुर्योधन । बोलला वचन पुढती ऐका ॥ ९ ॥

१७

सम्राट मी कैंवी होऊं आतां दीन । धर्माच्या मागून चालूं कैंवी ॥
सूर्यासम नित्य प्रकाशलों आतां । साहूनियां दास्या राहूं कैंवी ॥२॥
भोगिले असंख्य भोग, भोगविले । दौर्बल्यें लाधलें न सहे दैन्य ॥
विप्रा, अवमान न करीं मी तुझा । परी हा सामाचा समय नसे ॥
इष्टचि यावेळीं युद्धचि केवळ । क्लीबत्वाचे बोल रुचतीना हे ॥५॥
केले यज्ञयाग वाटिल्या दक्षिणा । मर्दिलें रिपूंना पायांतळीं ॥ ६ ॥
ऐकियेले वेद साधिल्या कामना । तोष सेवकांना दिधला बहु ॥७॥

संकटविमुक्त केले बहु दीन । स्व-पर राष्ट्रकर्म केलें यत्नें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मानी दुर्योधन । कैंवी आतां साम करिल दैन्यें ॥९॥

१८

धर्म, अर्थ, काम जोडिले विप्रेंद्रा । संतुष्ट पितरां केलें असे ॥ १ ॥
स्वधर्मपालन केलें परी सौख्य । नसे, यश राष्ट्र काय मातें ॥ २ ॥
केवळ या लोकीं प्रभावी सत्कीर्ति । मार्ग युद्ध हाचि उरला एक ॥
शय्यामरण तें निंद्य क्षत्रियांसी । रण, वन, त्यांसी मरणा योग्य ॥४॥
मजसाठीं स्वर्गीं गेले जे तयांसी । मान स्वर्गांमाजी बहुत लाभे ॥
वासुदेव म्हणे वीर दुर्योधन । अंतरीं धरून पीळ बोले ॥ ६ ॥

१९

मजसाठीं जे जे मृत । त्यांच्या असें मी ऋणांत ॥ १ ॥
काय माझी ऋणमुक्ति । होई याचितां शत्रूसी ॥ २ ॥
जिणें ऐसें लाजिरवाणें । सुखद, त्याहूनि मरणें ॥ ३ ॥
जगावरी आधिपत्य । तो मी जाईन स्वर्गांत ॥ ४ ॥
परी लढेन शौर्येंसी । अन्य मार्ग न मजसी ॥ ५ ॥
ऐकूनि हे नृपवाणी । वीर वदले धन्य वाणी ॥ ६ ॥
विसरले सकल दुःख । सज्ज जाहले युद्धार्थ ॥ ७ ॥
सरस्वतीतीरीं गेले । स्नानपानें हृष्ट झाले ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सिद्ध । निर्भय ते स्फूर्तियुक्त ॥ ९ ॥

अध्याय ६ वा

२०

हिमाचलाच्या पठारीं । जमली कौरवमंडळी ॥ १ ॥
तदा उत्साह चढला । धाक विलयासी गेला ॥ २ ॥
पुढती दुर्योधनाप्रति । म्हणती योजीं सेनापति ॥ ३ ॥
रथाधिष्ठित नरेंद्र । पाही वेगें गुरुपुत्र ॥ ४ ॥
नेत्र कमलपत्रासम । उग्रमुख व्याघ्रासम ॥ ५ ॥
मेरूपर्वतचि जैसा । तैसा देह, भव्य ज्यांचा ॥ ६ ॥
स्कंद, नेत्र, गति, स्वर । जणुं नंदीचि केवळ ॥ ७ ॥
दृढबाहु, दृढसंधि । पुष्ट भरदार छाती ॥ ८ ॥

वेग गरुडासमान। तेजें सहस्रकिरण ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे बुद्धि। दैत्यगुरूसम ज्याची ॥ १० ॥

२१

सुवर्णकमळें एकत्र गुंफिलीं। देहाची भासली कांति तेंवी ॥ १ ॥
चंद्रवदन तो ऊरु गरगरीत। चरण सुरेख नखाग्रेंसी ॥ २ ॥
सौंदर्य ओतिलें ब्रह्मयानें सकळ। संग्रामकौशल्य अपूर्व त्या ॥ ३ ॥
धनुर्वेदाचा तो पढला चार पाद। अंगेंही उपलब्ध दश तया ॥४॥
साङ्ग इतिहास जाणें वेद चार। उग्र तपफल द्रोणांचें तें ॥ ५ ॥
अयोनि संभव माता पिता त्याचीं। लोकोत्तर कृति रूपविद्या ॥६॥
सद्गुणसागर लवही न दोष। ऐसा गुरुपुत्र अवलोकिला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रश्न करी राजा। सेनापति आतां योजूं कोणा ॥८॥

२२

अश्वत्थामा म्हणे सेनापति शल्य। बळिवंत थोर होवो तुझा ॥१॥
भागिनेयत्याग करूनि पातला। योजीं त्या स्कंदाला सेनापति ॥
ऐकूनि नृपाळ शल्याच्या भोंवतीं। धांवूनियां जाती हर्षभरें ॥ ३ ॥
दुर्योधन तदा जोडूनियां कर। शल्या, आतां धीर तूंचि म्हणे ॥४॥
पाहूनियां तुज शौर्य पांडवांचें। जाईल लयातें मद्रेश्वरा ॥ ५ ॥
ऐकूनियां शल्य बोले दुर्योधना। तुझ्यास्तव पणा सर्वस्व हें ॥६॥
राव म्हणे स्कंदासम हो विजयी। अभिषेक आजी होवो तुज ॥७॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें। विक्रम शल्याचे राव गाई ॥ ८ ॥

अध्याय ७ वा

२३

शल्य म्हणे वाक्यविशारदा राया। कृष्ण-धनंजयां म्हणसी शूर ॥
परी माझें बाहूबल सर्वश्रेष्ठ। होतां शल्य क्षुब्ध अजिंक्य हा ॥२॥
जिंकीन पांडवां स्वीकारूनि धुरा। शंका कौरवेंद्रा, न धरीं मनीं ॥
शल्याच्या वचनें रायासी संतोष। केला अभिषेक यथाशास्त्र ॥४॥
सिंहनाद तदा झाला रणांगणीं। जिंकीं हे अवनी म्हणती वीरा ॥
अजिंक्य तूं वीरा, तोष कौरवेंद्रा। देसील हे भद्रा, विजयलाभें ॥
वासुदेव म्हणे धन्यता मानूनि। उल्हासित वाणी वदला शल्य ॥७॥

२४

वधीन मीं रणीं पांचाळ-पांडवां । अथवा निजदेहा समर्पीन ॥ १ ॥
कृष्णार्जुन वीर सात्यकि पांचाळ । पाहोत सकल बळ माझें ॥ २ ॥
प्रतिकार माझा करोत पांडव । योजूनि उपाय दक्षतेनें ॥ ३ ॥
सैरावैरा सैन्य जाईल पळून । दावीन विक्रम ऐसा थोर ॥ ४ ॥
भीष्म-द्रोण-कर्णाहूनि शौर्य माझें । दावूनि रायातें तोषवीन ॥ ५ ॥
ऐकूनियां सैन्य उत्साहित झालें । पांडव मानिले पराभूत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुखनिद्रा तदा । सकल सैनिकां तया रात्रीं ॥ ७ ॥

२५

ऐकूनि कौरवसेनेची गर्जना । धर्म म्हणे कृष्णा, पुढती काय ॥ १ ॥
सेनापति वीर मद्रपति झाला । कृष्ण तें बोलला धर्माप्रति ॥ २ ॥
राया, शल्य महाविक्रमी पुण्यात्मा । तेजस्वी महात्मा चित्रयोद्धा ॥
भीष्म-द्रोण कर्णाहूनि बळ साचें । भीमार्जुनां त्याचें बळ नसे ॥४॥
धर्मा, तूंचि एक वधिसील त्यासी । वध्य न कोणासी मद्रपति ॥
मातुल हें मनीं आणूं नको राजा । मग्न गोष्पदीं या होऊं नको ॥६॥
पांडवांनीं तदा पूजिलें कृष्णासी । गेले शिबिरासी धर्माज्ञेनें ॥ ७ ॥
सूतपुत्रवधें तयां निद्रा शांत । लंघिला अगाध म्हणती सिंधु ॥८॥
वासुदेव म्हणे कर्णवध होतां । पांडवांच्या पक्षा समाधान ॥ ९ ॥

अध्याय ८ वा

२६

अन्यदिनीं प्रातःकाळीं दुर्योधन । म्हणे सावधान व्हावें आतां ॥१॥
आज्ञा मानूनियां सैन्य सज्ज होई । सिद्धतेची घाई करिती वीर ॥
शल्याज्ञेनें होई सैन्याचा विभाग । सज्जलें युद्धार्थ सकळ सैन्य ॥
कृप, अश्वत्थामा, शकुनि, कृतवर्मा । आंखिती योजना शल्यासवें ॥
एकाकी जो कोणी लढेल अन्यासी । सोडील एकाकी अथवा कोणा
उपपातकेंसी पंचमहा पापें । बाधिती तयातें निश्चय हा ॥ ६ ॥
करोनियां ऐसा संकल्प ते वीर । म्हणे वासुदेव सजले युद्धा ॥७॥

२७

पांडवही व्यूह रचूनि सैन्याचा । सकल सिद्धता करिती वेगें ॥१॥

राव म्हणे सूता, कर्णवधवृत्त । कथावें समस्त पुढती मज ॥ २ ॥
सूत म्हणे राया, शल्याच्या नेतृत्वें । उत्साह सैन्यातें पुन्हा येई ॥
महावीर शल्य सिद्ध रणांगणीं । कौरव पाहूनि हृष्ट झाले ॥ ४ ॥
मद्रक, अजिंक्य कर्णपुत्र उभा । घालूनि गराडा सभोंवतीं ॥ ५ ॥
कृप, कृतवर्मा, वीर दोन्हीं भागीं । राव मध्यभागीं विराजला ॥६॥
उलूकासवें तो शोभला शकुनि । वासुदेव वर्णी पुढती ऐका ॥ ७ ॥

२८

पांडवांचें सैन्य त्रिधा । विभागूनि सज्ज युद्धा ॥ १ ॥
शिखंडी तैं धृष्टद्युम्न । शिनिसंहारार्थ सैन्य ॥ २ ॥
शल्यावरी धर्मराज । शौर्यें चाल करी अद्य ॥ ३ ॥
कृतवर्मा, संशप्तक । यांसी वेधी वीर पार्थ ॥ ४ ॥
भीमासवेंचि सोमक । साह्य जाहले पार्थास ॥ ५ ॥
नकुळ सहदेव रणीं । शकुनि उलूकावरी दोन्हीं ॥ ६ ॥
तीन कोटी कौरवसेना । दोन कोटी पांडव जाणा ॥ ७ ॥
हेंचि गजांचें प्रमाण । अश्व त्यापरी स्यंदन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे रणीं । भिडले वीर त्या संग्रामीं ॥ ९ ॥

अध्याय ९ वा

२९

महा दारुण तैं जाहला संग्राम । प्रावृट् मेघांसम नाद रणीं ॥१॥
अश्व अश्वांप्रति गज ते गजांसी । वीरही वीरांसी संहारिती ॥ २ ॥
हंसांसम अश्वसंचार भासला । भूमि ते सुंदरा नखक्षता ॥ ३ ॥
शंख-चापनादें कोंदलें गगन । पडती कोसळून वीर शिरें ॥ ४ ॥
सुवर्णकमळें भासे विखुरलीं । शोणितानें न्हाली समरभूमि ॥ ५ ॥
रुधिर उदक, आवर्त ते रथ । ध्वज तेचि वृक्ष, अश्मे अस्थि ॥ ६ ॥
गज ते खडक, अश्वचि पाषाण । मेद मज्जा जाण कर्दम तो ॥ ७ ॥
छत्रें हंस, चक्रें चक्रवाक जाणा । पाहूनि भ्याडांना भय वाटे ॥८॥
आक्रोश वीरांचा कानावरी येई । खिन्न मनीं होई वासुदेव ॥ ९ ॥

३०

ऐकूनीही आर्तनाद । कोणी नयेची साह्यार्थ ॥ १ ॥
भीमार्जुन ते प्रतापी । लढूनि करिती गुंग मती ॥ २ ॥

प्रमदा, वारुणीच्या मदें । कोसळती ऐसें भासे ॥ ३ ॥
घोर भीमार्जुनशब्दें । स्फूर्ति येई पांडवांतें ॥ ४ ॥
अग्रभागीं करूनि धर्मा । शल्यासवें करिती रणा ॥ ५ ॥
पृथक्पणें एक एक । लढती, अवघे तें विस्मित ॥ ६ ॥
अंतीं कौरवांची सेना । धीर सोडूनि त्यागी रणा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आप्त । प्राणापुढें होती तुच्छ ॥ ८ ॥

अध्याय १० वा

३१

सूत म्हणे राया, ऐसी दाणादाण । सूतासी पाहून वदला शल्य ॥
शुभ्रछत्रधारी पहा युधिष्ठिर । ने रथ सत्वर समिप त्याच्या ॥२ ॥
मजपुढें धर्म न टिके क्षणही । सूत तदा नेई पुढती रथ ॥ ३ ॥
सेनासागराची जाहला तो सीमा । पांडवांच्या सैन्या हटवी वेगें ॥
स्फूर्तिभरें वीर कौरवांचे शौर्यें । आच्छादिती शरें पांडवांसी ॥५॥
वासुदेव म्हणे नकुळ तें वेगें । अडवी सैन्यातें परम धीर ॥ ६ ॥

३२

नकुळ-चित्रसेन वीर कर्णपुत्र । करिती घनघोर युद्ध क्रोधें ॥ १ ॥
मेघांवरी मेघ करिती वर्षाव । तैसेचि उभय वीर श्रेष्ठ ॥ २ ॥
झुंजतां झुंजतां रथचापहीन । करी चित्रसेन नकुळाप्रति ॥ ३ ॥
तैसेंचि ललाट वेधी तीन शरें । नकुळ उतरे रथाखालीं ॥ ४ ॥
ढाल खड्ग करीं घेऊनि धांवला । वर्षाव तें केला चित्रसेनें ॥ ५ ॥
परी निरोधूनि अवघें शरजाल । धांवूनि नकुळ चढला रथीं ॥ ६ ॥
चित्रसेनशिर छेदूनि विक्रमें । गर्जूनि स्वसैन्यें हृष्ट केलीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पडला कर्णपुत्र । शिर तेजःपुंज विराजलें ॥ ८ ॥

३३

भ्राते धांवले तें दोन । सुषेण तें सत्यसेन ॥ १ ॥
करिती वर्षाव शरांचा । देह झांकिती नकुळाचा ॥ २ ॥
पुढती झालें घोर युद्ध । परस्पर वीर विद्ध ॥ ३ ॥
भग्न झालें नकुळ चाप । सत्यसेनाचे सायक- ॥ ४ ॥

प्रखर, फोडिला स्यंदन । नकुळ स्वमनीं चिंतून ॥ ५ ॥
क्रोधें दिव्यशक्ति सोडी । सत्यसेनहृदय फोडी ॥ ६ ॥
कोसळला महावीर । रणीं होई हाहाःकार ॥ ७ ॥
वासुदेव म्हण क्रोधें । ओढी सुषेण चापानें ॥ ८ ॥

२४

ध्वज, अश्व, रथ, सूत नष्ट केला । विरथ तें झाला नकुळ रणीं ॥१॥
द्रौपदीनंदन सुतसोम तदा । पातला नकुळाच्या साह्यास्तव ॥ २ ॥
नकुळ तें त्याच्या चढला स्यंदनीं । पुढती उभयांनीं शौर्य केलें ॥
सुषेण त्या वेळीं खवळूनि शर- । सोडी, महावीर उभयांवरी ॥ ४ ॥
अंतीं नकुळानें केला शिरच्छेद । रणांत आक्रांत कौरवांच्या ॥ ५ ॥
शल्य तदा देई स्फूर्ति सैनिकांसी । जाहलें पुढती घोरयुद्ध ॥ ६ ॥
सात्यकि, अर्जुन, सहदेवादिक । करिती सिंहनाद महाशब्दें ॥ ७ ॥
घाबरले तदा कौरव सकळ । जाहलें तुंबळ पुढती युद्ध ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसें घनघोर । जुंपलें समर रणांगणीं ॥ ९ ॥

अध्याय ११ वा

३५

सूत म्हणे राया, उभय महावीर । करिती जर्जर एकमेकां ॥ १ ॥
पलायन कोणी करिती भयानें । वीर वीरश्रीनें धुंद झाले ॥ २ ॥
सूर्योदयवेळीं ऐसा हा संहार । घाबरले वीर कौरवांचे ॥ ३ ॥
शल्य तयावेळीं दाखवी विक्रम । पांडवांचें सैन्य भय पावे ॥ ४ ॥
उल्कापात तेंवी कंपित धरणी । सुचिन्हें त्याक्षणीं पांडवांसी ॥ ५ ॥
काक, घूक, वीरमस्तकीं बैसती । शल्य धर्माप्रति ताडी शर ॥ ६ ॥
भीम धृष्टद्युम्न, सात्यकि, नकुळ । वेधिले सकळ वीर शल्यें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्माचें शरीर । भेदूनियां शर एक गेला ॥ ८ ॥

३६

पाहूनि तें भीम क्रोधें खवळला । धांवूनियां गेला शल्यावरी ॥ १ ॥
नकुळ, सहदेव, पुत्र द्रौपदीचे । ताडिती शल्यातें प्रखर शरें ॥ २ ॥
उलूक सौबल, वीर अश्वत्थामा । साह्यार्थ त्या क्षणा धांव घेती ॥
कृतवर्मा सोडी भीमावरी बाण । कृपाचें ताडन सात्वतासी ॥ ४ ॥

अडविती वीरां शकुनि अश्वत्थामा । कृतवर्मा, भीमा विरथ करी ॥
अंतकासम तो घेऊनियां गदा । करी चेंदामेंदा कौरवांचा ॥ ६ ॥
शल्य, सहदेवा करितां विरथ । खड्गें शल्यसुत वधिला तेणें ॥७॥
वासुदेव म्हणे वीर अश्वत्थामा । पुनरपि भीमा विरथ करी ॥ ८ ॥

३७

भीम घेऊनियां गदा । रथ फोडी कृतवर्म्याचा ॥ १ ॥
कृतवर्मा पलायन- । करितां, शल्य सोडी बाण ॥ २ ॥
करी ताडन धर्मासी । क्रोध चढे तैं भीमासी ॥ ३ ॥
उग्र नागिणीसमान । वज्रासम जी कठीण ॥ ४ ॥
होती गजमदयुक्त । घागऱ्यांचा येई नाद ॥ ५ ॥
चूर्ण करी पर्वतांचें । वरी काम जडावाचें ॥ ६ ॥
अलकापुरींत गुह्यकां । ताडी उचली तीच गदा ॥ ७ ॥
शल्यावरी वृकोदर । शल्यें ताडिलें तोमर ॥ ८ ॥
उपटी भीम घुसतां वक्षीं । पाडी शल्य सारथ्यासी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे हर्ष । तदा पांडववीरांस ॥ १० ॥

अध्याय १२ वा

३८

म्हणे संजय नृपाळा । तदा क्रोध येई शल्या ॥ १ ॥
गदापाणी अचल जैसा । यमचि तो भासे दुजा ॥ २ ॥
इंद्रचि कीं वज्रधारी । महादेव शूलधारी ॥ ३ ॥
अथवा उन्मत्त कुंजर । फिरवी नेत्र गरगर ॥ ४ ॥
पाहूनियां तयाप्रति । भीम धांवला पुढती ॥ ५ ॥
जुंपे घनघोर युद्ध । वीर करिती सिंहनाद ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्वंद्व । पाहूनि तें थक्क सर्व ॥ ७ ॥

३९

बलरामावीण भीमाचा विक्रम । साही जनीं कोण अन्य योद्धा ॥ १॥
शल्याचें तें शौर्य भीमासीच सह्य । वीर समबल लढती दोघे ॥ २॥
विद्युत्स्फुलिंग जैं गदेवरी गदा । आदळे तैं शोभा अपूर्व ते ॥ ३ ॥
उन्मत्त वृषभ अथवा मत्त गज । एकमेकां विद्ध करिती क्रोधें ॥ ४॥

प्रफुल्ल पलाशतरूचि भासले । सवेग मंडळें घेती बहु ॥ ५ ॥
उचलितां गदा गिरी ते सशृंग । भासती, तें द्वंद्व अपूर्वचि ॥ ६ ॥
इंद्रध्वजासम अंतीं कोसळले । आश्चर्यचि झालें रणामाजी ॥ ७ ॥
रथावरी शल्या वासुदेव म्हणे । घेऊनिया गेले कृपाचार्य ॥ ८ ॥

४०

जागृति येवोनि उठला वृकोदर । सज्जला सत्वर पुनर्युद्धा ॥ १ ॥
पाहूनि कौरव धांवले पुढती । दुर्योधन फेंकी प्रास वेगें ॥ २ ॥
चेकितान तदा झाला गतप्राण । पांडवांचें सैन्य क्रुद्ध होई ॥ ३ ॥
वीराप्रति वीर भिडले क्रोधानें । लढती प्राणपणें उभय सैन्यें ॥४॥
हाणा, मारा, तोडा, कापा ऐसे शब्द । धर्म-शल्ययुद्ध घोर तदा ॥
एकमेकां वार करिती क्रोधानें । ध्वजच्छेद धर्में केला यदा ॥ ६ ॥
शल्य तयावेळीं सिंह खवळला । विद्ध तें सकलां करीतसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हतवीर्य धर्म । शल्याचा विक्रम इंद्रापरी ॥ ८ ॥

अध्याय १३ वा ४१

हतवीर्य धर्मा पाहूनि सात्यकि । भीम नकुळादि क्षुब्ध झाले ॥१॥
वेढिलें वीरांनीं शल्याप्रति वेगें । पाहूनि सिद्धां तें हर्ष वाटे ॥ २ ॥
भीमादींचे बाण तोडिले शल्यानें । छेदिलें वीरानें धर्मचाप ॥ ३ ॥
अन्यचापें धर्म ताडी बहु बाण । परी शराच्छन्न करी शल्य ॥ ४ ॥
पाहूनि सात्यकि धांवला पुढती । तयाचेंही छेदी चाप शल्य ॥५॥
तोमर, नाराच, गदा तें शतघ्नि । भीमादि वीरांनीं फेंकियेली ॥६॥
परी शल्य सर्व छेदी निजबाणें । वर्णितो प्रेमानें वासुदेव ॥ ७ ॥

४२

एकाकी शल्याचा पाहूनि विक्रम । रक्षकांचे प्राण घेई धर्म ॥ १ ॥
तयावेळीं शल्यसिंह खवळला । भयाकुल झाला धर्मराज ॥ २ ॥
म्हणे अद्य नष्ट सकलही सैन्य । कृष्णाचें वचन व्यर्थ वाटे ॥
शलभासमान शल्याचे सायक । झांकिताती नभ नवल होई ॥४॥
अंधःकार तदा जाहला सर्वत्र । गर्जताती वीर कौरवांचे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीमादिक शौर्यें । शल्यासवें धैर्यें करिती युद्ध ॥६॥

अध्याय १४ वा

४३

अन्यस्थळीं पार्थ अश्वत्थामा वीर । विख्यात झुंजार करिती रण ॥
कृष्णार्जुन देह जाहले विदीर्ण । दुर्दशा अर्जुन पावला तें ॥ २ ॥
अंतीं क्रुद्ध पार्थमुद्रांकित रण । जाहलें संपूर्ण शररूपें ॥ ३ ॥
प्रेतराशी तदा टाकी आच्छादूनि । अवघी रणभूमि वेगें पार्थ ॥४॥
द्रोणपुत्र क्रोधें भडकला अग्नि । कांपली धरणी ऐसें युद्ध ॥ ५ ॥
महारथ वेगें मारिला सुरथ । पांडवांसमक्ष गुरुपुत्रें ॥ ६ ॥
संशप्तकांसवें भिडे अर्जुनासी । निवारी तयासी धनंजय ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे देव-दैत्यांसम । जाहला संग्राम पुढती घोर ॥ ८ ॥

अध्याय १५ वा

४४

दुर्योधन, धृष्टद्युम्न । तुच्छ लेखिताती प्राण ॥ १ ॥
शल्य पांडववीरांसी । पराक्रमें तुच्छ लेखी ॥ २ ॥
धर्मराज तें विव्हल । अडवी शल्यासी नकुळ ॥ ३ ॥
केला विक्रम शल्यानें । अडवी सकळांसी क्रोधानें ॥ ४ ॥
सात्यकि तें पुढती झाला । थांब, थांब रे, गर्जला ॥ ५ ॥
इंद्र-शंबराचि दोघे । सोडिताती बाण वेगें ॥ ६ ॥
वाहे शोणिताची नदी । बाणव्याळ तियेमाजी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्षय । ऐकूनि तो वाटे भय ॥ ८ ॥

अध्याय १६ वा

४५

सूत म्हणे राया, कौरवांचीं सैन्यें । शल्याच्या तंत्रानें लढती त्वेषें ॥
विस्मयकारक लढे मद्रपति । निवारी एकाकी पांडवांतें ॥ २ ॥
धर्म चंद्र, शनि भासला तें शल्य । ताडी प्रखर शर धर्मभीमां ॥३॥
पांडव ते अंतीं जाहले घायाळ । सैन्य भयाकुल पळूनि जाई ॥
संतप्त तें धर्म, निर्धारें कृष्णादि । बाहूनि वीरांसी वदला क्रोधें ॥५॥
वासुदेव म्हणे धर्माचें वचन । घ्या आतां ऐकून मोद पावा ॥ ६ ॥

४६

वीरहो निमाले भीष्म, द्रोण, कर्ण । शल्यासी वधून धन्य होऊं ॥१॥

भार तो मजवरी परी साह्य व्हावें। नकुळें रक्षावें रथचक्र ॥ २ ॥
वधीन शल्यासी अथवा मरेन। सर्वदा कल्याण तुमचें होवो ॥ ३ ॥
रथयोजकांनीं सामग्री सकळ। ठेवावी विपुल रथामाजी ॥ ४ ॥
दक्षिण सव्य ते शैनेय-पार्षत। भीम अग्रस्थित होवो माझ्या ॥ ५ ॥
साह्य व्हा यापरी शल्यासी वधीन। विक्रम दावीन जगामाजी ॥६॥
वदतां हें धर्म रणवाद्यनाद। घनघोर युद्ध करी धर्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सरस-निरस। न कळे कोणास शल्य, धर्म ॥ ८ ॥

४७

ऐशावेळीं दुर्योधन। सोडी भीमावरी बाण ॥ १ ॥
ध्वज चापही भंगिलें। भीमें हृदय विदारिलें ॥ २ ॥
पडला राव रथामाजीं। सारथ्यातें भीम वधी ॥ ३ ॥
उधळले तदा अश्व। रणीं होई हाहाःकार ॥ ४ ॥
कृपाचार्य, कृतवर्मा। धांवला तैं अश्वत्थामा ॥ ५ ॥
नवल झालें तयावेळीं। शांति क्रोधरूप ल्याली ॥ ६ ॥
सत्वरूप धर्मराज। रणांगणीं झाला क्षुब्ध ॥ ७ ॥
निर्दाळिलें बहुत वीरां। धाक वाटला कौरवां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शल्य। तदा दावी स्वयें बळ ॥ ९ ॥

४८

फुंकूनि तैं शंख मारिताती हांका। वीर एकमेकां दोष देती ॥ १ ॥
पर्जन्यवर्षाव करिती शरांचा। रंगला वीरांचा रुधिरें देह ॥ २ ॥
लाभेल कोणासी जय तैं न कळे। तुंबळ जाहलें युद्ध ऐसें ॥ ३ ॥
भंगियेलें चाप शल्यानें धर्माचें। तुकडे ध्वजाचे उडवी धर्म ॥ ४ ॥
विपन्न शल्यातें पाही अश्वत्थामा। हांकूनि स्यंदना पुढती येई ५॥
स्वरथीं शल्यासी घेऊनि पळाला। ऐसा मोड झाला कौरवांचा ॥
गर्जना धर्माची ऐकूनियां शल्य। बैसला तत्काळ अन्य रथीं ॥७॥
सामग्रीसंपूर्ण रथ तो भयद। पाहूनि रोमांच अंगावरी ॥ ८ ॥
वासुदव म्हणे शल्य पुनरपि। ठाकला रणासी महाधैर्यें ॥ ९ ॥

अध्याय १७ वा

४९

द्विगुण धैर्यानें शर ताडी शल्य । जाहलें अतुळ युद्ध आतां ॥ १ ॥
त्राहि त्राहि ऐसें केलें पांडवांसी । भीम-सात्यकींसी विद्ध केलें ॥
जर्जर जाहला तदा युधिष्ठिर । खवळले वीर शल्यावरी ॥ ३ ॥
शराच्छन्न केलें धर्मे शल्याप्रति । क्रोध कौरवांसी येई बहु ॥ ४ ॥
शोधूनियां व्यंग वीर परस्पर । शरांमागें शर ताडितानी ॥ ५ ॥
आमिषार्थ व्याघ्र अथवा मत्त हत्ती । भासले लोकांसी वीर दोघे ॥
वासुदेव म्हणे मद्रपति धर्मा । ताडी दिव्यबाणां सोडूनियां ॥ ७ ॥

५०

क्रोधाविष्ट होऊनियां शल्याप्रति धर्म ॥
दिव्य शराघातें गर्जे मूर्छित करून ॥ १ ॥
सावध होऊनि शल्य, शतक बाणांचें ॥
सोडी, तोडी धर्म, फोडी वक्ष तें शल्याचें ॥ २ ॥
चर्म भंगितां धर्मानें शल्य क्रुद्ध होई ॥
चाप छेदूनि धर्माचें भीमावरी जाई ॥ ३ ॥
इतुक्यांत कृपाचार्य वधी सारथ्यासी ॥
अश्वही धर्माचे मारी क्रोधें मद्रपति ॥ ४ ॥
पाहूनियां शल्यचाप तोडी तदा भीम ॥
एकाचि शरानें घेई सारथ्याचे प्राण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मूर्छा येई शल्याप्रति ॥
तीव्र शरें तोडी भीम ढालही तयाची ॥ ६ ॥

५१

सहस्रतारकायुक्त अन्यचर्म । घेऊनि गर्जून उठला शल्य ॥ १ ॥
खड्गधारी वेगें धांवे धर्मावरी । वीर तयावरी धांव घेती ॥ २ ॥
धृष्टद्युम्नादिक अडविती तया । खड्गमुष्टि राया ताडी भीम ॥ ३ ॥
गर्जना तैं केली पांडववीरांनीं । धैर्य कौरवांनीं सोडियेलें ॥ ४ ॥
परी सेनापति धांवे धर्मावरी । अश्व, सूत, करी नष्ट क्रोधें ॥ ५ ॥
शल्य-धर्म दोघे विरथचि आतां । स्मरे कृष्णवचा धर्म तदा ॥

ण शल्यवधकार्य मजवरी । चिंतूनि सत्वरी अंतरांत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कनकखचित । करीं शक्ति एक घेई धर्म ॥ ८ ॥

५२

उचलूनि दिव्यशक्ति । क्रोधें शल्यासी अवलोकी ॥ १ ॥
अहो तेजस्वी नयन । करितील वाटे भस्म ॥ २ ॥
रत्नासम तेजःपुंज । शक्ति फेंकी धर्मराज ॥ ३ ॥
गर्जे मेलासि रे शल्या । हर्षें बाहु उगारिला ॥ ४ ॥
रत्नजडित यमदंड । शक्ति भासली प्रचंड ॥ ५ ॥
विदारूनि गेली वक्ष्या । भग्न देह तें शल्याचा ॥ ६ ॥
नेत्र, नासिका, वदन । गेलें रूधिरें रंगून ॥ ७ ॥
कोसळावें गिरिशृंग । तैसें पडलें रणीं अंग ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शल्य । गेला दावूनि निजबळ ॥ ९ ॥

५३

पडला छिन्नभिन्न गात्र । शल्य शोणितानें स्नात ॥ १ ॥
क्रीडाउद्युक्त पतीसी । सन्मानिते जैसी सती ॥ २ ॥
तैसी मद्रराजपत्नी । ‘ वसुंधरा ’ त्या सन्मानी ॥ ३ ॥
आलिंगूनि प्रेमभावें । जणु प्रसुप्त कीं व्हावें ॥ ४ ॥
रणयज्ञकुंडामाजी । अग्नि शांत भासे आजी ॥ ५ ॥
तेजस्वी तो मृतदेह । वाटे अद्यापि सजीव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । करी सैन्याचें कंदन ॥ ॥

५४

शल्यानुज तदा धांव घेई क्रोधें । बाण ताडी वेगें धर्माप्रति ॥ १ ॥
घायाळ तयासी केलें धर्मराजें । मस्तक तयाचें छेदियेलें ॥ २ ॥
कौरवसैन्य तें पळे घाबरूनि । पाठलाग शैनि करी त्याचा ॥ ३ ॥
कृतवर्मा तदा धांवे तयावरी । शर शरांवरी सोडिताती ॥ ४ ॥
एकमेकां शौर्य दावितातीं क्रोधें । शैनि कृतवर्म्यातें ताडी अंतीं ॥
विरथ तयासी पाहूनियां कृप । घालूनि रथांत दूर नेती ॥ ६ ॥
भयाकूल सैन्या कौरवेंद्र शौर्य- । दावूनियां, धैर्य देई रणीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धृष्टद्युम्नादिक । रणांगणीं झेंप घेती वेगें ॥ ८ ॥

५५

एकाकी नरेंद्र निवारी तयांसी। घावरले त्यासी सकळ वीर ॥ १ ॥
इतुक्यांत कृतवर्माहि धांवला। युधिष्ठिरें केला विरथ वेगें ॥ २ ॥
कृपाली घायाळ करी धर्मराज। नेई गुरुपुत्र कृतवर्म्यासी ॥ ३ ॥
कृपाचार्य बाण ताडिती धर्मासी। पांगापांग अंतीं होई रणीं ॥ ४ ॥
राया, धृतराष्ट्रा, पुत्रांसवें तूंचि। कारण नाशासी क्षत्रियांच्या ॥
असो, शल्यवधें पांडवां आनंद। स्तवूनि धर्मास तोषविती ॥ ६ ॥
वाद्यनादें तदा कोंदलें अंबर। चिंता गदाधर वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय १८ वा

५६

सप्तशत शूर शाल्वाचे अनुचर। धांवले सत्वर वैऱ्यावरी ॥ १ ॥
गजारूढ दुर्योधन छत्रधारी। तयांसी निवारी महायत्नें ॥ २ ॥
थांबा, थांबा, जाऊं नका रे पुढती। म्हणतांही पुढती जाती वीर ॥
पीडिती धर्मासी ऐकूनि मद्रक। धांव घेई पार्थ धर्मारतत्र ॥ ४ ॥
भीम, नकुलादि रक्षिती धर्मासी। मद्रक तयासी म्हणती दावा ॥
पांडव मद्रकां दाविती विक्रम। करितां निवारण लढती राव ॥७ ॥
वासुदेव म्हणे वारंवार राव। निवारितां धांव पुढती घेती ॥ ८ ॥

५७

इतुक्यांत रणीं वेगें शकुनि येई। मद्रकांचा पाही नाश थोर ॥ १ ॥
दुर्योधनालागीं म्हणे कां रे यातें। दुर्लक्षिसी ऐसें संकटीं या ॥२ ॥
विसरसी कैंवी निश्चय आपुला। एकाकी कोणाला न सोडावें ॥३॥
राव म्हणे आज्ञा भंगूनिया गेले। तेणें गवसले मृत्युमुखीं ॥ ४ ॥
शकुनि म्हणे राजा, धन्याचें शासन। रणधुंद जन भंगिताती ॥५॥
यास्तव उपेक्षा न करीं तयांची। क्रोधवृत्ति ऐसी योग्य नव्हे ॥६ ॥
ऐकूनि कौरव धांव देती रणीं। सक्रोध होऊनि गर्जताती ॥ ७ ॥
मारा, पिटा, धरा, तोडा, कापा ऐसे। शब्द मद्रकांतें स्फूर्ति देती ॥

१ धर्म व दुर्योधन

मध्यम व्यूह तें रचिती पांडव । संग्राम अपूर्व पुढती झाला ॥९॥
वासुदेव म्हणे मद्रकांचा नाश । अंतीं कौरवांस पराभव ॥ १० ॥

अध्याय १९ वा

५८

शल्यवधोत्तर सैन्य । गेलें निराश होऊन ॥ १ ॥
आतां रक्षील आम्हांसी । कोण हेचि तयां भीति ॥ २ ॥
भीष्म-द्रोण-कर्णासम । सैन्य शल्यास्तव खिन्न ॥ ३ ॥
अंतीं त्यागूनियां युद्ध । वीर पळती अस्ताव्यस्त ॥ ४ ॥
पाहूनियां पाठलाग । करिती पांडव सवेग ॥ ५ ॥
सिंह गर्जना करूनि । करिती हर्षें शंखध्वनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धीर । त्यजिती सकळ कौरववीर ॥ ७ ॥

५९

पलायन त्यांचें पाहूनि पांचाळ । पांडव सकळ वदती ऐका ॥ १ ॥
निष्कंटक राज्य लाभलें धर्मासी । कांति कौरवांची अस्तंगत ॥ २॥
धृतराष्ट्र होवो विव्हल तो अद्य । दुर्योधनवध ऐकूनियां ॥ ३ ॥
हळहळ आतां वाटेल तयासी । अजिंक्य पार्थासी जाणूनियां ॥ ४॥
आठवेल तया विदुराची वाणी । पार्थबल ध्यानीं येऊनियां ॥ ५ ॥
अद्यप्रभृति तो दास पांडवांचा । येईल दुःखांचा अनुभव त्या ॥ ६
श्रीकृष्णमहात्म्य कळेल तयासी । संपतील आजी अवशिष्ट ॥ ७ ॥
यशोनिधि कृष्ण जयालागीं साह्य । लाभेना विजय तया कोणा ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । कौरवसैन्यातें संहारिती ॥ ९ ॥

६०

पाठलाग यदा पांडव करिती । कौरवसैन्याची दाणादाण ॥ १ ॥
दुर्योधन तदा सारथ्यासी वदे । नेई पिछाडीतें रथ माझा ॥ २ ॥
भीमादिक घोर करिताती संहार । कौरवांचे वीर पळूनि जाती ॥
प्रोत्साहन तदा देई दुर्योधन । कथूनियां धर्म क्षत्रियांचा ॥ ४ ॥
उत्साहें तें वीर करिती गर्जना । पुनरपि रणा प्रवर्तले ॥ ५ ॥
पार्थ, नकुळादि करिती तें हल्ला । संग्राम मांडिला महाशौर्यें ॥ ६॥
वासुदेव म्हणे वीरांवरी वीर । करिती प्रहार वीरश्रीनें ॥ ७ ॥

अध्याय २० वा

६१

पुनरपि शूर सैन्य कौरवांचें । सज्जलें रणातें क्रोधभरें ॥ १ ॥
म्लेच्छपति शाल्व बैसे गजावरी । धांवे सैन्यावरी पांडवांच्या ॥
ऐरावतासम कुलवंत हत्ती । दुर्योधन त्यासी पूजी नित्य ॥ ३ ॥
युद्धनिपुणा त्या पाहूनियां सैन्य । सोडूनियां रण धांव घेई ॥ ४ ॥
पाहूनियां धृष्टद्युम्न पुढती होई । शरामागें जाई शर त्याचा ॥ ५ ॥
गंडस्थळ विद्ध होतां गजराज । त्यागूनि रणास पळूनि जाई ॥६॥
शाल्व तें युक्तीनें मागें तया आणी । सोडिला स्यंदनीं पार्षताच्या
वासुदेव म्हणे वीर गदापाणी । उड्डाण करूनि त्यागी रथ ॥ ८ ॥

६२

सूतासवें गजराज । रथ उचली सहज ॥ १ ॥
वेगें आपटूनि चूर्ण । करी, नाचेही गर्जून ॥ २ ॥
प्राणसंकटीं पार्षत । रक्षिती त्या भीमादिक ॥ ३ ॥
होई सैनिकांची दैना । शाल्व सोडी प्रखर बाणा ॥ ४ ॥
पाहूनि तें धृष्टद्युम्न । धांवे गदा उचलून ॥ ५ ॥
वेगें फोडी गंडस्थळ । केला गजेंद्र घायाळ ॥ ६ ॥
पडला कोसळूनि खालीं । सात्वत तें शाल्वावरी ॥ ७ ॥
सोडी एक भल्ल बाण । करी मस्तक छेदन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । वधिला नृपाळ म्लेच्छांचा ॥ ९ ॥

अध्याय २१ वा

६३

शाल्ववध होतां कौरवांची सेना । त्यागूनियां रणा पळूनि जाई ॥
कृतवर्मा तदा पुढती धांव घेई । एकाकीच दावी महाशौर्य ॥ २ ॥
सात्यकि तें तया अडवी वेगानें । क्षेमधूर्ति तेणें वधिला रणीं ॥३॥
हार्दिक्य, शैनि तें लढती शौर्यानें । सात्यकि विक्रमें निवारी त्या ॥
एकमेकां बहु ताडिताती बाण । द्यावयासी प्राण सिद्ध होती ॥५॥
विरथ विपन्न अंतीं कृतवर्मा । पाहूनियां सैन्या न निघे धीर ॥ ६ ॥
कृपाचार्य तदा नेती तया दूर । राधावीण सर्व पळूनि जाती ॥ ७ ॥

दुर्योधन धरी थांबवूनि तयां । अंतक पांडवां भासला तो ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृतवर्मा तोचि । अन्य रथामाजी बसूनि येई ॥ ९ ॥

अध्याय २२ वा ६४

प्राणावरी वीर होऊनि उदार । दावी रणीं शौर्य दुर्योधन ॥ १ ॥
एकाकी सकळां अनावर होई । नकुळ त्या ठाईं पुढती झाला ॥२॥
घनघोर झालें युद्ध त्या दोघांचें । सात्यकि तयातें साह्य करी ॥३॥
इतुक्यांत भीम गर्जूनि निघाला । सिंधू खवळला तैसा नाद ॥ ४ ॥
शकुनि धर्म, कृतव ि तैं सात्यकि । विक्रम दावि ी परस्परां ।५॥
द्रौपदीसुतांनीं कृपासी वेढिलें । इंद्रियीं कोंडिलें प्राणासी जैं ॥ ६ ॥
विवेकी, इंद्रियां आंवरी ज्यापरी । गु ही त्यापरी बालकांसी ॥७॥
भय, विस्मय तैं वाढे क्षणोक्षणीं । उडाली गगनीं धूळ बहु ॥ ८ ॥
रुधिरवर्षावें धूळ बसे खालीं । वासुदेव झाली म्हणे घाई ॥ ९ ॥

अध्याय २३ वा ६५

दारुण संग्रामीं अंतीं पांडवांचा । विक्रम कौरवां क्लेशकारी ॥ १ ॥
प्रयत्नें सैन्यासी आणिती समोर । क्रोधें युधिष्ठिर बाण सोडी ॥२॥
ताडूनि कृपासी हार्दिक्या विरथ । करितां गुरुपुत्र वांचवी त्या ॥
दुर्योधनासवें सप्तशत रथ । कोंडिती धर्मास महा वेगें ॥ ४ ॥
शिखंडी प्रभृति वीर तैं धांवले । तितुकेही वधिले कौरववीर ॥ ५ ॥
कुलांगना तदा विधवा असंख्य । उत्पात बहुत तयावेळीं ॥ ६ ॥
आविवेकें परी युद्ध न त्यागिती । नेई पिछाडीसी शकुनि सैन्य
वासुदेव म्हणे धर्माच्या आज्ञेनें । सहदेव यत्नें निवारी त्या ॥ ८ ॥

६६

द्रौपदीचे सुत सहदेवा साह्य । संग्राम अपूर्व तयावेळीं ॥ १ ॥
तयावेळीं होई रणीं हातघाई । धूलिमग्न होई अवघें स्थान ॥ २ ॥
वीरांवरी वीर, रथांवरी रथ । शिखा एकमेक ओढिताती ॥ ३ ॥
सावळ मागूनि करी सैन्यनाश । वीर असंख्यात स्वर्गीं जाती ॥४॥
श्रांत, तृषाक्रांत, घायाळ सैनिक । रुधिराचा दर्प सुटला बहु ॥५॥

उभयही सैन्यें व्यथित जाहलीं । धुंदी तयां आली संग्रामाची ॥६॥
वासुदेव म्हणे अमर्याद वीर । झुंजती ते शूर रणांगणीं ॥ ७ ॥

अध्याय २४ वा

६७

अंतीं कौरवांची सेना । उत्सुक ती पलायना ॥ १ ॥
दुर्योधनासी भेटूनि । शकुनि आशा दावी रणीं ॥ २ ॥
तदा कौरवांची सेना । शौर्यें प्रवर्तली रणा ॥ ३ ॥
कृष्णाप्रति तें फाल्गुन । वदला विवेकें वचन ॥ ४ ॥
हांकीं वेगें कृष्णा, रथ । नेईं सेनासमुद्रांत ॥ ५ ॥
करितों संहार शत्रूचा । अंत होवो या युद्धाचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । कथी हेतु श्रीकृष्णास ॥ ७ ॥

६८

जनार्दना, अष्टादशादिन घोर । चालला संहार क्षत्रियांचा ॥ १ ॥
पतन पावतां भीष्म, जरी शम- । होता, तरी प्राण वांचते हे ॥ २ ॥
भीष्म, द्रोण, कर्ण पडतां समरांगणीं। कां नयासी रणीं प्रवर्तले ॥
श्रुतायुध, जलसंध, भगदत्त । दुःशासनादिक पडले वीर ॥ ४ ॥
ऐकिलें न जेणें कृष्णाचें वचन । प्रायश्चित्त अन्य काय तया ॥ ५ ॥
शांतनव योद्धा, गुरुद्रोण, क्षत्ता । कथी महाज्ञाता परी व्यर्थ ॥ ६ ॥
मातापितृांचाही केला अनादर । कलह हा घोर आरंभिला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ श्रीकृष्णासी । चिंतूनि स्वमति कथन करी ॥

६९

कृष्णा, मजलागीं क्षत्ता । वदला बहुवार ज्ञाता ॥ १ ॥
गांजील हा दुर्योधन । यावत्काल शरिरीं प्राण ॥ २ ॥
नित्य करील दुष्कृत्यें । युद्धावीण मार्ग नसे ॥ ३ ॥
आली प्रत्यया ते वाणी । वारंवार येई मनीं ॥ ४ ॥
दुष्कर्में तीं दुरात्म्याचीं । मूर्तिमंत पुढती उभीं ॥ ५ ॥
जामदग्न्याचाही बोध । धिक्कारितां कोणा लाभ ॥ ६ ॥
जन्मतांचि दुर्योधन । वदले ज्ञाते जें वचन ॥ ७ ॥
तेंचि आजि सत्य होई । नाश क्षत्रियांचा पाहीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । वधितों म्हणे अवशिष्ट ॥ ९ ॥

७०

वीरहीन यदा होईल शिबिर। येईल समोर राव तदा ॥ १ ॥
वाधतां तयासी कलह संपेल। अन्यथा उरेल अग्निशेष ॥ २ ॥
तर्क सुबुद्धि तें विदुराची वाणी। पाप्याची करणी सुचवी हेंचि ॥
यास्तव यादवश्रेष्ठा, ने स्यंदन। पाहो दुर्योधन सैन्यवध ॥ ४ ॥
पुरतील तेणें धर्ममनोरथ। वासुदेव पार्थवचन सांगे ॥ ५ ॥

७१

सूत म्हणे राया, मध्यम पांडव। कथितां केशव फेंकी रथ ॥ १ ॥
अरण्यचि भासे कौरवांचें सैन्य। खड्ग शक्ति तृण कंटक ते ॥ २॥
गदा, परिघ ते मार्गाचि वनींचे। रथ, हत्ती तेथें वृक्षराज ॥ ३ ॥
अश्व, पदाति त्या डोलताती लता। नेई तेथ पार्था यादवेंद्र ॥ ४ ॥
पाहतां पाहतां पार्थनामांकित। शराच्छन्न क्षेत्र, सकल शोभे ॥ ५॥
पार्थरूपी अग्नि जाळी शत्रुसैन्य। लता पत्र भस्म करी जणु ॥ ६ ॥
एकेकाचि शरें अश्व, गज, वीर। धाडी रणधीर यमलोकीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थाचा विक्रम। करील वर्णन कोण त्याचें ॥ ८ ॥

अध्याय २५ वा

७२

सूत म्हणे राया, प्राणपणें योद्धे। दाविती शौर्यातें श्रमले अंतीं ॥१॥
पलायन त्यांचें पाहूनि वीरांनीं। उद्युक्त संग्रामीं केलें तयां ॥ २ ॥
धृष्टद्युम्नासवें राव करी युद्ध। होतां सूतवध पळूनि जाई ॥ ३ ॥
गजसैन्य तदा कोंडी पांडवांसी। मेघ जे ग्रहांसी आच्छादिती ॥४॥
पार्थाचें त्या वेळीं अचुक संधान। अन्य गजसैन्य वेढी तया ॥ ५ ॥
गदापाणी तदा धांवे वृकोदर। गज मलमूत्र विसर्जिती ॥ ६ ॥
दुर्योधन तदा न दिसे कोणासी। सकल शोधिती वीर तया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अंतीं अश्वत्थामा। दाखवी विक्रमा तयावेळीं ॥ ८ ॥

७३

फोडूनियां फळी पांडवसैन्याची। शोधाया नृपासी गेला विप्र ॥१॥
तयावेळीं होई युद्ध निकराचें। कौरववीरांचें म्लान मुख ॥ २ ॥
सूत म्हणे तदा झालों मी पुढती। स्नाह्य चौघांप्रति करावया ॥ ३ ॥

धृष्टद्युम्नावरी पार्थ शरविद्ध । होऊनियां क्रुद्ध गेलों आम्हीं ॥ ४ ॥
परी त्या वीरानें पळविलें आम्हां । सात्यकीच्या बाणां लक्ष्य झालों
मूर्छित मी राया, पडलों त्यावेळीं । भीमानें ओढिलीं गजप्रेतें ॥ ६ ॥
मार्ग पांडवांसी यापरी दिधला । शोधिती नृपाळा कौरववीर ॥ ७॥
वासुदेव म्हणे शकुनि ज्या स्थानीं । गेले तयास्थानीं कौरवयोद्धे ॥

अध्याय २६ वा ७४

गदाघातें भीमसेन । कुंजरांचे घेई प्राण ॥ १ ॥
भ्राते शोधिती नृपासी । न दिसे दुर्योधन त्यांसी ॥ २ ॥
धार्तराष्ट्र तें द्वादश । भीमावरी घेती झेंप ॥ ३ ॥
गिरिशिखरावरूनि । गजा लोटूं हेंचि मनीं ॥ ४ ॥
परी दुर्मर्षणा भीम । वधी न लागतां क्षण ॥ ५ ॥
श्रुतान्तही प्राण सोडी । जयत्सेनातेंही वधी ॥ ६ ॥
रवि, भूरिबल, जैत्र । दुर्विमोचन तें सुजात ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । दुर्विषहादिक भ्राते ॥ ८ ॥

७५

भ्रातृवधें श्रुतर्व्यासी येई क्रोध । करी घोर युद्ध भीमासवें ॥ १
विरथ तो धांवे चर्म खड्गधारी । शिरच्छेद करी भीम तदा ॥ २ ॥
श्रुतर्वा रणांत पडतां सैनिक । होती भयभीत धृतराष्ट्रा ॥ ३ ॥
कुरुवीर तदा खवळूनि येती । जर्जर तयांसी भीम करी ॥ ४ ॥
एकादश वीर धृतराष्ट्रपुत्र । मर्दी वृकोदर, धन्य होई ॥ ५ ॥
ठोकूनियां दंड क्रोधें अवलोकी । गर्जतां गजांसी कंप सुटे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कौरवांचें सैन्य । जाहलें तें दीन भयाकुल ॥ ७ ॥

अध्याय २७ वा ७६

सूत म्हणे राया, सुदर्शन मात्र । राहिला साह्यार्थ दुर्योधना ॥१॥
दोघेही ते बंधु अश्वसैन्यामाजी । बोलला पार्थासी कृष्ण तदा ॥
धनंजया, आतां कौरव हे श्रांत । दावीं यमलोक तयांप्रति ॥ ३ ॥
सात्यकि संजया पकडूनि आणी । अवलोकी रणीं श्रांत बंधु ॥४॥

अल्पावशिष्ट हे पडतां वीर रणीं । येईल धांवोनि दुर्योधन ॥ ५ ॥
सुलभ तैं वध होईल तयाचा । पार्थ यदुनाथा तदा बोले ॥ ६ ॥
कृष्णा, धार्तराष्ट्र उरले आतां दोन । वधिल त्यां भीम निश्चयेंसी ॥
वासुदेव म्हणे अवशिष्ट वीर । कथी धनुर्धर कृष्णालागीं ॥ ८ ॥

७७

सौबलाचे आतां पंचशत अश्व । दोन शत श्रेष्ठ स्यंदन ते ॥ १ ॥
शतसंख्य अश्व त्रिसहस्र पदाति । अवशिष्ट वीरांची कथितों नामें
अश्वत्थामा, कृप, उलूक, त्रिगर्त । शकुनि, सात्वत कृतवर्मा ॥३॥
वीर षट्कचि हे अवशिष्ट आतां । कृष्णा, यमपंथा दावीन त्यां ॥४॥
पळतील तेचि वांचतील अद्य । पळेल नरेंद्र सुटका तरी ॥ ५ ॥
हांकी आतां कृष्णा, स्यंदन कृपेनें । निःशत्रु शौर्यानें करूं धर्मा ॥
वासुदेव म्हणे अर्जुनवचनें । हांकिला कृष्णानें रथ वेगें ॥ ७ ॥

७८

सहदेव भीमसेन । जाती रणांत धांवून ॥ १ ॥
शकुनि, सुशर्मा पार्थाली । सुदर्शन भीमाप्रति ॥ २ ॥
सहदेवा दुर्योधन । धरिती क्रोधानें अडवून ॥ ३ ॥
दुर्योधन फेंकी प्रास । सहदेव कासावीस ॥ ४ ॥
त्वरीत होऊनि सावध । करी नृपातें शरविद्ध ॥ ५ ॥
सत्यवर्म्यालागीं पार्थ । क्रोधें दावी यमलोक ॥ ६ ॥
सत्येषूचा घेई प्राण । ताडी सुशर्म्यासी बाण ॥ ७ ॥
फुटलें त्याचें वक्षस्थळ । गेला प्राणही तत्काळ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सुत । वधी सुशर्म्याचे पार्थ ॥ ९ ॥

७९

हांसोनियां भीम सुदर्शनाप्रति । ताडी रणामाजी क्रोधावेशें ॥ १ ॥
वर्षाव शरांचा करूनियां अंतीं । वेगें शिरच्छेदी एका बाणें ॥ २ ॥
अनुचर त्याचे येती भीमावरी । कोंडूनि सत्वरी ताडिती त्या ॥ ३ ॥
भीमसेन तदा करी घोर रण । सैन्याचें कंदन मांडीतसे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे परस्पर वीर । ताडिताती शर एकमेकां ॥ ५ ॥

अध्याय २८ वा

८०

ऐशा घोररणीं सौबल शकुनि। सहदेवा ताडूनि विद्ध करी ॥ १ ॥
उलूक भीमासी करी शराघात। झांकी सहदेवास प्रखर शरें ॥ २॥
खवळूनि तदा पांडव ते दोघे। सोडिताती वेगें सायकांसी ॥ ३ ॥
संहार त्या काळीं होई सैनिकांचा। ढीग मस्तकांचा पडला रणीं ॥
शकुनि त्या वेळीं सहदेवा प्रास-। ताडूनियां, त्रास देई बहु ॥ ५ ॥
पाहूनि भीमानें केला भडिमार। कौरवांचे वीर पळूनि जाती ॥६॥
दुर्योधन तदा देई तयां स्फूर्ति। येती पुनरपि गर्जूनि ते ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अपूर्व संग्राम। घडला रणस्थान रुधिरें भरे ॥ ८ ॥

८१

सावध होऊनि सहदेव धांवला। शराघात केला शकुनीवरी ॥१॥
अश्व, चाप, त्याचें वेधिलें वीरानें। उलूक क्रोधानें पुढती येई ॥
पितापुत्र वीर सहदेवा ताडिती। प्रत्युत्तर देती-घेती वीर ॥ ३॥
सहदेवें तदा भल्लबाणें एका। वधिलें उलूका क्रोधावेशें ॥ ४ ॥
शकुनीसुताचें पडतां रणीं शिर। गर्जताती वीर पांडवांचे ॥ ५ ॥
पुत्रशोकें होई शकुनि व्याकुळ। वाहे भळभळ नयनीं नीर ॥ ६ ॥
आठवूनि मनीं विदुरवचन। ताडी क्रोधें बाण सहदेवासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वेळ ती कठीण। सहदेव दारुण युद्ध करी ॥ ८ ॥

८२

अंगीं रुतलेले बाण। वेगें फेंकी उपटून ॥ १ ॥
क्रोधें करूनि आघात। शकुनीचें तोडी चाप ॥ २ ॥
खड्ग फेंकितां तें तोडी। गदा प्रखर बाणें पाडी ॥ ३ ॥
काळरात्रीसम अंतीं। शकुनि फेंकी दिव्य शक्ति ॥ ४ ॥
पराक्रमी सहदेवानें। खंड करूनि क्रोधानें ॥ ५ ॥
पाडितां ते भूमीवरी। शकुनि घाबरा अंतरीं ॥ ६ ॥
पाहूनियां कौरवसैन्य। करीतसे पलायन ॥ ७ ॥

तदा गर्जूनि पांडव। म्हणती पावलों विजय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अंतीं। शकुनि धांवला पुढती ॥ ९ ॥

८३

शत्रुवधामाजी अपुला हा वांटा। जाणूनियां कांटा काढूं आतां ॥
चिंतूनियां ऐसें वीर सहदेव। शरांचा वर्षाव करी रणीं ॥ २ ॥
गर्जूनिया म्हणे दुष्टा, हो सावध। आठवूनि द्यूत, सिद्ध होई ॥३॥
हर्षलासी तदा भोग त्याचें फल। हांसले ते खळ पुढती गेले ॥४॥
अवशिष्ट आतां तुम्हीं मामा-भाचे। कुलांगार साचे वध्य तुम्ही ५॥
महावृक्षावरी ताडितांचि काष्ठ। पक्क फळ भ्रष्ट होई जैसें ॥ ६ ॥
तैसाचि मी तुझा करितों आतां वध। बोलूनिया ध्वज छेदियेला ॥
छत्र-चाप छेदी गर्जूनि शार्दुल। क्रुद्ध तैं सौबल प्रास घेई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दारुण प्रसंग। क्रोधें माद्रिपुत्र बाण सोडी ॥ ९ ॥

८४

जया करीं प्रास, छेदिला तो कर। तोडिला सत्वर अन्यही तो ॥१॥
पुढती शिरच्छेद केला सौबलाचा। उगम द्वेषाचा सौबलचि ॥ २॥
कलहाचें मूळ छेदिलें वीरानें। कौरवांचीं सैन्यें पळूनि जातीं ॥३॥
दुष्टाचें शरीर पडतां मातींत। पांडवांचें चित्त हर्ष पावे ॥ ४ ॥
उत्साहें तयांनीं केला शंखनाद। सहदेवासमीप वीर येती ॥ ५ ॥
गौरवूनि तदा म्हणती धन्य धन्य। सर्वोत्तम कर्म वीरा तुझें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुष्कर्माचें फळ। लाभे योग्य वेळ येतां जनीं ॥ ७ ॥

# ऱ्हदप्रवेशपर्व २

अध्याय २९ वा

८५

सूत म्हणे राया, सौवळाचे योद्धे । लढती क्रुद्धचित्तें तयावेळीं ॥१॥
क्रुद्ध सर्पापरी, परी भीमसेन । सहदेवरक्षण करीतसे ॥ २ ॥
खाऊं, गिळूं आतां सहदेवाप्रति । चिंतूनियां चित्तीं लढती वीर ॥
इतुक्यांत पार्थ पातला त्या स्थानीं । सशस्त्र छेदूनि टाकी कर..॥४॥
अवशिष्ट वीर करूनि एकत्र । लढती कौरवेंद्र प्राणपणें ॥ ५ ॥
घ[illegible] द्वय तदा जाहलें कंदन । असहाय सैन्य युद्ध करी ॥ ६ ॥
परी अंतीं सर्व गतप्राण झाले । नाहींच उरले कोणी एक ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अकरा अक्षौहिणी । निमाले त्या रणीं कौरवसैन्य ॥

८६

सशस्त्र नृपाळांमाजी दुर्योधन । अवशिष्ट जाण एकमात्र ॥ १ ॥
परी सर्वांगासी जखमा तयासी संपूर्ण हे पृथ्वी शून्य तया ॥ २ ॥
निमाले सकळ राहिलों एकाकी । चिंतूनि अवलोकी चोहींकडे ॥३॥
सहर्ष पांडव करिती गर्जना । पाहूनि यातना तया बहु ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे राव दुःखमग्न । त्यजावें हें स्थान चिंती मनीं ॥ ५ ॥

८७

धृतराष्ट्र म्हणे करावें कथन । अवशिष्ट सैन्य पांडवांचें ॥ १ ॥
सूत म्हणे राया, रथ द्विसहस्र । पदाति सहस्रदश त्यांचे ॥ २ ॥
सप्तशत गज सहस्र पंचक । अश्व अवशिष्ट पांडवांचे ॥ ३ ॥
तितुकेंचि सैन्य घेऊनि पार्षत । उभा व्यवस्थित रणीं होता ॥ ४ ॥
दुर्योधन तदा एकाकी असहाय । न दिसेचि साह्य तया कोणी ॥
वासुदेव म्हणे अकरा अक्षौहिणी । सैन्याचा जो धनि एकाकी तो

८८

मृत अश्वांसी त्यागूनि । भयाकुल राव मनीं ॥ १ ॥
करी वेगें पलायन । पूर्व दिशेसी लक्षून ॥ २ ॥
व्यथित राव गदापाणी । चिंत्ती विदुराची वाणी ॥ ३ ॥

चित्त त्याचें दुःखदग्ध । म्हणे प्रवेशूं डोहांत ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । चिंती राव त्या समयातें ॥ ५ ॥

८९

नृपाळा, मी होतों तदा बंदिवान । कृतवर्मा गौतम अश्वत्थामा ॥
इतुकेचि वीर राहिले जिवंत । सात्वता पार्षत वदला तदा ॥ २ ॥
मृत, जिवंत हा समचि संजय । वधूनियां काय लाभ यातें ॥ ३ ॥
सात्यकि तथापि उपसूनि खड्ग । वधायासी मज सज्ज झाला ॥
इतुक्यांत तेथें प्रगटूनि व्यास । वदले संजयास मारूं नका ॥ ५ ॥
पाहूनि तयांसी जोडीयेले कर । सोडिलें तत्काळ मजलागीं ॥ ६ ॥
द्वैपायन मज वदले जा कल्याण । यापरी बोलून गुप्त झाले ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संजय निःशस्त्र । रक्तसिक्तगात्र मुक्त झाला ॥ ८॥

९०

म्हणे राया, जातां जातां । गदापाणी दिसला राजा ॥ १ ॥
श्रांत, घायाळ, एकाकी । पाहूनियां मज दुःखी ॥ २ ॥
भरले तयाचे नयन । स्तब्ध राही होऊनि खिन्न ॥ ३ ॥
दुःखाकुल मीही राया । वृत्त माझें कथिलें तया ॥ ४ ॥
एक मुहूर्त निःस्तब्ध । राव पुढती बोले शब्द ॥ ५ ॥
बांधवांचें वृत्त पुशी । कथिलें समग्र तें त्यासी ॥ ६ ॥
पाहियेलें जें प्रत्यक्ष । कथूनि गेले तेंचि व्यास ॥ ७ ॥
सोडूनियां तें उसासा । राव पाहे टकमकां ॥ ८ ॥
अंतीं स्कंधावरी हस्त । टाकूनियां करी दुःख ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐका । वदला नृपाळ जें सूता ॥ १० ॥

९१

सूता, तुझ्यावीण वांचला न कोणी । जोडीदार जनीं नसे मज ॥
पांडव अद्यापि सहायसंपन्न । पित्यासी जाऊन वृत्त कथीं ॥ २ ॥
वदें तयाप्रति पुत्र डोहामाजी । शिरला एकाकी सकल गेले ॥ ३ ॥
जिवाचे जिवलग गेले कर्णासम । बंधु-पुत्रहीन जाहलों मी ॥ ४ ॥
राज्यहीन कैसा राहूं मी जिवंत । निवेदीं वृत्तांत नृपासी हा ॥ ५ ॥

वांचलों मी रणीं घायाळ जिवंत । डोहामाजी गुप्तवास माझा ॥६॥
कथावें संजया, हेंही रायाप्रति । बोलू ने उदकीं शिरला राव ॥ ७॥
मायाबळें जळ स्तंभित तें केलें । नवल वाटलें वासुदेवा ॥ ८ ॥

१२

सूत एकाकी त्या स्थानीं । असतां वीर आले कोणी ॥ १ ॥
कृपाचार्य, अश्वत्थामा । तैसाचि तो कृतवर्मा ॥ २ ॥
घायाळ तें श्रांत अश्व । वदले 'संजया, सुदैव' ॥ ३ ॥
संग्रामीं या वांचलासी । वार्ता कथीं नृपाळाची ॥ ४ ॥
नृप आमुचा जिवंत । असे कां रे कथीं वृत्त ॥ ५ ॥
कथिलें वृत्त संजयानें । ऱ्हद दाविला दुःखानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तेथ । करी अश्वत्थामा दुःख ॥ ७ ॥

१३

सूत म्हणे राया, तौंचि पांडवांसी । पाहूनि वीरांसी धाक वाटे ॥
स्यंदनीं कृपाच्या घेऊनियां मज । आले शिबिरांत वीर वेगें ॥ २ ॥
सूर्यास्तसमयीं कौरवांचा नाश । ऐकूनि आक्रोश करिती जन ॥३॥
संरक्षक वृद्ध घेऊनि स्त्रियांसी । जाती नगरासी परम खेदें ॥ ४ ॥
दुःखित कुररी आक्रंदती स्त्रिया । कल्लोळ त्या ठायां मांडियेला ॥
बोटें मोडिताती मस्तकें पीटिती । ऊर बडविती शोकाकुला ॥ ६ ॥
द्वारपालही ते राजदंडधारी । दूत शयनागारीं तेही दुःखी ॥ ७ ॥
बिछाने घेऊनि धांवती कित्येक । खेचरांचे रथ जुंपिताती ॥ ८ ॥
नखाग्रें जयांचीं न दिसती सूर्या । हाय राजभार्या मार्गस्थ त्या ॥९॥
वासुदेव म्हणे पाहिल्या सर्वांनीं । चालल्या सदनीं आश्रयार्थ ॥१०॥

१४

मेंढपाळ ते गुराखी । भीमभयें दुःखी होती ॥ १ ॥
भांबावूनि सैरावैरा । पळूनि येती नगरद्वारा ॥ २ ॥
भयाकुल होती जन । करी युयुत्सु चिंतन ॥ ३ ॥
एकादश चमूपति । पराभूत तो नृपति ॥ ४ ॥
शून्य शिबिरें सकळ । रक्षकही ते व्याकुळ ॥ ५ ॥

सचिव अवशिष्ट, नेती । स्त्रियांलागीं नगराप्रति ॥ ६ ॥
भाग्यें राहिलों जिवंत । म्हणे कर्तव्य हें प्राप्त ॥ ७ ॥
आज्ञा घेऊनि धर्माची । जावें त्यांसवें नगरासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रेमें । दिधली अनुज्ञा त्यां धर्में ॥ ९ ॥

९५

युयुत्सु वेगानें होई रथारूढ । पिटाळूनि अश्व गांठी स्त्रिया ॥ १ ॥
सांभाळूनि तयां नेई नगरांत । अद्यापि सूर्यास्त नव्हता झाला ॥२॥
प्रवेशतां पुर कंठ त्याचा दाटे । काळीजही फुटे परम दुःखें ॥ ३ ॥
महाद्वारीं तया भेटला विदुर । दुभंगलें ऊर दुःखें त्याचें ॥ ४ ॥
म्हणे हे युयुत्सो, वांचलासी भाग्यें । सोडूनि धर्मातें येसी कैसा ॥
येरु म्हणे धर्मआज्ञा घेऊनियां । संरक्षूनि स्त्रिया आणियेल्या ॥ ६ ॥
धर्मज्ञ विदुर उचितचि म्हणे । वासुदेव प्रेमें तया वंदी ॥ ७ ॥

९६

क्षत्ता म्हणे बाळा, द्वितीयेचा चंद्र । जैसा सौख्यप्रद तेसा तूंही ॥
अदूरदर्शी तो हट्टी मंदबुद्धि । जातां तूं अंधाची यष्टि होसी ॥ २ ॥
वास्तव्य तूं अद्य येथेंचि करावें । उदयीक जावें धर्माजवळी ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें सद्गद विदुर । धरूनियां कर नगरीं येई ॥ ४ ॥
शून्य नगरीं त्या हाहाःकारध्वनि । क्षत्त्याच्या लोचनीं अश्रु येती ॥
युयुत्सु ती रात्र सदनीं राहिला । सौख्य न पावला परी अंतीं ॥६॥
वासुदेव म्हणे परिणामीं विष । जाणावें दुष्कृत्य तेंचि जनीं ॥ ७ ॥

# गदायुद्धपर्व ३

अध्याय ३० वा

९७

राव म्हणे सूता, पुढती काय झालें । कोणी काय केलें निवेदीं तें ॥
सूत म्हणे होता न्हदामाजी राव । शोधिती पांडव तयालागीं ॥ २ ॥
न दिसेचि कोठें पाहूनि निराश । गेले शिबिरास श्रांत वीर ॥ ३ ॥
कृपादिक तदा येऊनियां न्हदीं । रायासी बोलती ऊठ राया ॥ ४ ॥
जिंकूनि घे पृथ्वी मरूनि वा स्वर्ग । उभयविनाश होऊं नये ॥ ५ ॥
अवशिष्ट सैन्यवधा तूं समर्थ । रायासी निश्चित साह्य आम्हीं ॥
ऊठ, ये बाहेरी पांडव दुर्बल । नसे तयां बल तुझ्यापुढें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । बोले धार्तराष्ट्र वीरांप्रति ॥ ८ ॥

९८

महा घोर रणीं बांचलांती तुम्हीं । भाग्य हें पाहूनि वाटे मज ॥ १ ॥
शिणलांती गड्या घ्या अद्य विश्रांति । लवही न स्फूर्ति आजि मज ॥
थोर तुम्हीं जरी साह्य मज व्हाल । संहारूं सकल पांडवांसी ॥३॥
अलौकिक शक्ति असे आपणांतें । काळ परी नसे विक्रमाचा ॥ ४ ॥
एक रात्र मज घेऊंद्या विश्रांति । उदयीक शत्रूसी बल दावूं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वीर अश्वत्थामा । बोले तैं वचना रायाप्रति ॥

९९

ऊठ राया, असो नित्यचि कल्याण । प्रतिज्ञावचन ऐकें माझें ॥ १ ॥
इष्टापूर्त सर्व लावूनियां पणा । सोमकांच्या प्राणा हरीन अद्य ॥ २॥
सूर्योदयापूर्वीं संहार शत्रूचा । न घडे तरी माझा पुण्यक्षय ॥ ३ ॥
पांचालवधेंचि उतरीन कवच । निश्चय हा साच जाणें माझा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कथितां हें नृपा । होई अवकृपा दुर्दैवाची ॥ ५ ॥

१००

मांसभार कोणी घेवोनि पारधी । जलप्राशनासी येती तेथें ॥ १ ॥
पैलतटाकीं ते उतरोनि भार । प्राशिताती नीर शांत दोघे ॥ २ ॥
प्रतिदिनीं भीमा मांस ते अर्पिती । बैसले एकान्तीं तीरावरी ॥ ३ ॥

संभाषण सर्व ऐकिलें तयांनीं । वीरां त्याहाळूनि अवलोकिती ॥४॥
उदकांत राव तोचि दुर्योधन । निश्चय मानून संतोषले ॥ ५ ॥
पाहिलांत काय दुर्योधन कोठें । भीमें पुशिलें होतें तयांप्रति ॥ ६ ॥
स्मरूनि ते शब्द पावले आनंद । म्हणती महालाभ अद्य आम्हां ॥
कथूनि हें वृत्त मेळवूं धनासी । चिंता या जन्माची दूर झाली ॥८॥
वासुदेव म्हणे भिंतीसही कान । म्हणती सज्जन प्रत्यय हा ॥ ९ ॥

१०१

शोधार्थ रायाच्या हिंडूनियां दूत । होऊनि निराश शिबिरीं येती ॥
चिंतामग्न तदा होई धर्मराज । लुब्धक इतुक्यांत प्राप्त होती ॥ २ ॥
निवारितांही त्यां रक्षक, हर्षानें । जाती आनंदानें पुढती धैर्यें ॥ ३ ॥
अमर्यादा त्यांची अवलोकी भीम । परी ते येऊन वंदिती त्या ॥ ४ ॥
कथिती प्रत्यक्ष पाहिलें तें वृत्त । भीमासी आनंद ऐकूनियां ॥ ५ ॥
संतुष्टचित्तें त्या अर्पी बहुधन । रायासी येऊन सकल कथी ॥ ६ ॥
ऐकूनि आनंद सकल पांडवां । देऊनि यादवा उठले वेगें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पांडव ते दक्ष । जाहले एकत्र क्षणामाजी ॥ ८ ॥

१०२

सांपडला दुर्योधन । हर्षें वदती ऐसें जन ॥ १ ॥
प्रत्यक्षही पाहियेला । ऐसा प्रवाद उठला ॥ २ ॥
परमानंदें गर्जताती । वीर बैसोनियां रथीं ॥ ३ ॥
जाती धर्मामागोमाग । घोर द्वैपायनऱ्हद ॥ ४ ॥
करिती ऱ्हदावलोकन । जेथ होता दुर्योधन ॥ ५ ॥
राया, अद्भुत विधीनें । जल अवरोधिलें तेणें ॥ ६ ॥
घोर, गंभीर तो ऱ्हद । राव जळांत निद्रिस्थ ॥ ७
ऐसा अदृश्य तो जनां । परी ऐके घोर स्वना ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । तोंचि पातला ससैन्य ॥ ९ ॥

१०३

ऐकूनि सैन्याचा शब्द कृपादिक । बोलले राजास जातों आम्हीं ॥
पुनरपि भेटूं असावी अनुज्ञा । तथेति वचना बोले राव ॥ २ ॥

मायाबळें जळ स्तंभित करूनि । अदृश्य होवूनि तळीं वैसे ॥ ३ ॥
गेले बहु दूर अश्वत्थाम्यादिक । पाहूनि न्यग्रोध वसनां खालीं ॥
भवितव्य चित्तीं चिंतिती वैसोनि । अस्वस्थता मनीं बहु त्यांचिया
वासुदेव म्हणे ऱ्हदावरी धर्म । पातला ससैन्य परमानंदें ॥ ६ ॥

अध्याय ३१ वा १०४

स्तंभित उदक पाहूनियां धर्म । विस्मित होऊन वदला कृष्णा ॥१॥
मायाबल कैसें पहा हें गोविंदा । निर्भय उदकामाजी राव ॥ २ ॥
परी या मायेनें कैसा हा सुटेल । भूताचि दिसेल सकलां अद्य ॥ ३॥
कृष्ण म्हणे माया, मायाचारें धर्मा । निवारूनि प्राणां हरीं याच्या ॥
दुष्टनिर्दलनीं योजूनि उपाय । साधीं निजकार्य राजधर्मे ॥ ५ ॥
बलि, हिरण्याक्ष वधिलें या मार्गें । रावण या योगें वधिला रामें
तारक, इल्वल, राक्षस, दानव । वधिले उपाय करूनि हेचि ॥७॥
वासुदेव म्हणे कृष्ण कथी धर्मा । कपटें दुर्जना वधणें योग्य ॥ ८॥

१०५

वासुदेववाक्य ऐकूनियां धर्म । सुहास्यवदन वचन बोले ॥ १ ॥
म्हणे सुयोधना, क्षत्रियांचा घात । करूनि जळांत दडसी कैंवी ॥
जीवितार्थ ऐसा कुमार्ग अयोग्य । ऊठ, करीं युद्ध आम्हांसवें ॥ ३॥
भयविव्हला, तो कोठें दर्प, मान । व्यर्थ तुज जन म्हणती शूर ॥४॥
सत्याचि तूं शूर तरी ये युद्धासी । पौरवकुळाची लाज धरीं ॥ ५ ॥
प्रशंसा कुळाची करितोसी नित्य । कैसा उदकांत लपसी आजी ॥
राज्यलाभ किंवा स्वर्गात सन्मान । क्षत्रियांचा जाण धर्म हाचि ॥
वासुदेव म्हणे वक्तृत्वचतुर । बोले युधिष्ठिर सहेतुक ॥ ८ ॥

१०६

वानप्रस्थ, न्यस्तशस्त्र किंवा षंढ । त्यजिताती युद्ध हेचि जनीं ॥
षंढत्व कासया वरिसी तूं ऐसें । ऊठ ये युद्धातें सुयोधना ॥ २ ॥
पुत्र, मित्र, बंधु, आप्त स्वकीयांचा । राया, नाश होतां लपसी कैंवी
ऊठ जीविताची त्यजूनियां आशा । स्वीकारीं युद्धाचा मार्ग शौर्यें

कर्ण, शकुनीच्या आधारें तूं देव । करूनि अन्याय बहुत केले ॥५॥
क्षुद्रा, कां रे आतां होऊनि मानव । संरक्षिसी देह उदकामाजी ॥
वासुदेव म्हणे यमधर्मसुत । बोले कौरवास तेंचि ऐका ॥ ७ ॥

१०७

मूढपणें कैसे वीर तुझ्यासम । करिती पलायन ऐशावेळीं ॥ १ ॥
कोठें तो विक्रम अभिमान कोठें । महायत्न कोठें गर्जना ती ॥ २ ॥
कृतास्त्रता कोठें भारता, ते तुझी । ऊठ. ये युद्धासी जिंकीं आम्हां ॥
अथवा शयन करीं रणांगणीं । क्षात्रधर्म ध्यानीं आणूनियां ॥ ४ ॥
विधात्यानें तुज लाविला हा धर्म । पावतांचि जन्म क्षत्रकुळीं ॥५॥
राजा या नांवाचें करावें सार्थक । सज्ज हो युद्धार्थ भिऊं नको ॥६॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । बोले कौरवेंद्र धर्माप्रति ॥ ७ ॥

१०८

दुर्योधन म्हणे महाराजा धर्मा । जगामाजीं कोणा भय नसे ॥ १ ॥
स्वाभाविक भीति स्वभाव नराचा । प्राणरक्षणाचा हेतु नसे ॥ २ ॥
रथ, अश्व, गज नसे मज भ्राता । सारथीही माझा मरूनि गेला ॥
सैनिकही राया, उरला न कोणी । श्रान्त एकाकी मी आलों एथें ॥
केवळ विश्रांति घेतसें या ठाया । पावें तूंहि राया, विश्रांतीतें ॥
सकलांसी होवो विश्रांतीचा लाभ । करीन मी युद्ध पुढती सुखें ॥
धर्म म्हणे आम्हां लवही न श्रम । शोधार्थ हिंडून आलों बहु ॥७॥
वासुदेव म्हणे दुर्योधना धर्म । सांगे करीं रण क्षात्रभावें ॥ ८ ॥

१०९

दुर्योधन म्हणे धर्मा । राज्यसौख्य दाऊं कोणा ॥ १ ॥
गेले पुत्र, मित्र, भ्राते । उरलें कोणीही न मातें ॥ २ ॥
क्षीणरत्ना वसुंधरा । हीनक्षत्रिया हे वीरा ॥ ३ ॥
विधवा नारीसम दीन । भोग तिचा इच्छी कोण ॥ ४ ॥
धर्मा, एकाकी मी तरी । बाधेन तुम्हांसी संगरीं ॥ ५ ॥
परी कर्णादिक गेले । कार्य आतां न उरलें ॥ ६ ॥
तुज जिंकूनि एकाकी । मज हौस न राज्याची ॥ ७ ॥

निर्जन हे पृथ्वी तुज । आतां होवो लखलाभ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राजा । म्हणे नसे राज्यइच्छा ॥ ९ ॥

११०

आशा मज धर्मा, म्हणसी जीवाची । परी न चिंतिसी कांहीं मनीं
कर्णासम मित्र, पितामहादिक । भ्रात्यांचा वियोग जयाप्रति ॥ २ ॥
अपहार ज्याच्या जाहला राज्याचा । वीर कोण ऐसा प्राण इच्छी
वस्तुस्थिति परी नसे मम तैसी । जिंकीन अद्यापि मीचि तुम्हां ॥
परी न कर्तव्य उरलें मजसी । जाईन वनासी मुनिवेषें ॥ ५ ॥
विनष्ट जयाचें जाहलें सर्वस्व । तुच्छ त्या जीवित कां न वाटे ॥६॥
साधन तुजसी नसे जीविताचें । निःसार भूमीतें सुखें भोगीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुर्योधन दीन । वदतां बोले धर्म तयालागीं ॥ ८ ॥

१११

धर्म म्हणे बाळा, प्रलाप हे आर्त । बैसूनि जळांत न करीं ऐसे ॥१॥
काकासम व्यर्थ करिसी काववाव । इच्छीन मी काय दत्ताभूमि ॥
दानबल तुज असतेंही जरी । प्रतिग्रह परी न घेतोंचि मी ॥ ३ ॥
जिंकून तुजसी राज्य मी घेईन । स्वामित्व वांछून दान कैंचें ॥४॥
स्वधर्मे याचितां अर्पिली न तदा । कां रे कुळघाता इच्छिलेंसी ॥
करूनि कृष्णाचा तदा अवमर्द । आता कैंवी राज्य अर्पितोसी ॥६॥
चित्तभ्रम काय जाहला तुजसी । अर्पील राज्यासी कोण सांगे ॥
वासुदेव म्हणे गेलेंचि तयाचें । करितां दान साचें कोण मानी ॥

११२

राज्यरक्षणसामर्थ्य । राया, नसे तुज अद्य ॥ १ ॥
करिसील कैंवी दान । करीं जिंकूनि पालन ॥ २ ॥
मृत्तिकाही सूच्याग्रींची । अर्पिण्याची नव्हती बुद्धि ॥ ३ ॥
आतां अवघी वसुंधरा । कैंवी अर्पिसी नरेंद्रा ॥ ४ ॥
भोगूनियां अवनी कोण । सुखी, शत्रूसी अर्पून ॥ ५ ॥
मूढा, जाहलासी भ्रांत । नसे कांहीं शुद्धबुद्ध ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । वदला कठोर वचन ॥ ७ ॥

११३

पृथ्वीसमर्पणें वांचसी न आतां । जिंकूनि हो राजा अथवा मृत्यु ॥
संशय जनांचा होईल निरस्त । दोहोंमाजी एक उरतां जनीं ॥ २ ॥
स्वाधीन जीवित असे राया, माझें । पराधीन तुझे प्राण आतां ॥ ३ ॥
स्वाधीन तूं माझ्या आहेसी सांप्रत । छळिलेंसी बहुत आम्हांलागीं ॥
अग्नि, जळ, सर्प, योजिलेंसी सर्व । ताडिलेंसी, गर्व वरूनि शब्दें ॥
द्रौपदीकर्षण तें कटु भाषण । सकळ दुष्कर्म आठवीं तें ॥ ५ ॥
आतां दुष्टा, आजी वांचती न प्राण । ऊठ, ये संग्रामें करीं आतां ॥
संग्रामेंचि तुझें होईल कल्याण । क्रोधाविष्ट धर्म वदला बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्म फलोन्मुख । भोगणेंचि प्राप्त इष्टा निष्ट ॥ ८ ॥

अध्याय ३२ वा

११४

राव म्हणे सूता, शत्रुतापकारी । राव तयावेळीं वदला काय ॥ १ ॥
निर्भर्त्सना तेणें ऐकिली न कदा । मानाग्र पावला आजवरी ॥ २ ॥
असीम तयाचा सूता, अभिमान । असह्य त्या जाण छत्रातप ॥ ३ ॥
सूर्यावरी सत्ता न चाले हें दुःख । संरक्षी हें छत्र हाचि खेद ॥ ४ ॥
युधिष्ठिराचे त्या प्रलाप यापरी । सह्य कसे तरी होती कृपा ॥ ५ ॥
म्लेच्छासमवेत अवघी वसुंधरा । जयाचा आसरा इच्छी नित्य ॥
तया मानधना अधिक्षेप ऐसा । शत्रुमुखें कैसा सहन होई ॥ ७ ॥
ऱ्हदस्थ रायानें ऐकोनि दर्पोक्ति । प्रत्युत्तर त्यासी काय केलें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संजयकथित । वचन नृपोक्त परिस आता ॥ ९ ॥

११५

संकटींही तैसा क्रुद्ध दुर्योधन । मुठी आंवळून सोडी श्वास ॥ १ ॥
म्हणे एकाकी मी असहाय्य श्रांत । युद्धार्थ उत्सुक कैसा होऊं ॥ २ ॥
कोणीही एकेकें लढावें मजसी । न्याय्य युद्धें कीर्ति जगीं होय ॥ ३ ॥
निःशस्त्र मी श्रांत कवचविहीन । अश्व-गजहीन आपद्ग्रस्त ॥ ४ ॥
भीम-अर्जुनादि कोणा पांडवांचें । भय नच मातें लवही धर्मा ॥ ५ ॥
प्रसंगीं वधीन एकाकी सर्वांतें । थांबा, कासयातें अवघी आतां ॥
तेणें शांतिलाभ आता स्वकीयांसी । ऋणांतूनि मुक्ति मजलागीं ॥

वासुदेव म्हणे ऐकूनियां धर्म । बोलला वचन दयावंत ॥ ८ ॥

११६

सुदैवें नृपाळा, तूं क्षात्रधर्मज्ञ । शूर समरज्ञ संग्रामेच्छु ॥ १ ॥
एकाकी युद्धार्थ जाहलासी सिद्ध । यालागीं ध्यानांत वचन घेई ॥
आम्हांतूनि एका इष्ट त्या शस्त्रानें । जिंकितां सुखानें राज्य करीं ॥
मेलासी तूं जरी तरी स्वर्गलाभ । ऐकूनि गोविंद स्तब्ध होई ॥ ४ ॥
दुर्योधन म्हणे वदसी जरी ऐसें । तुम्हांमाजी ज्याचें शौर्य श्रेष्ठ ॥
तोचि मजसवें लढेल आनंदें । गदायुद्ध मानें रुचतें धर्मा ॥ ६॥
वधील जो मज ऐसें वाटे तुम्हां । तोचि या संग्रामा पुढती येवो ॥
वासुदेव म्हणे वीर दुर्योधन । वदला वचन तेंचि ऐका ॥ ८ ॥

११७

रथयुद्धें नानापरी । पदोपदीं रणीं झालीं ॥ १ ॥
आतां होओ गदायुद्ध । जनांलागीं तें अद्भुत ॥ २ ॥
रुचती पर्याय मानवा । घडो प्रकार हा नवा ॥ ३ ॥
धर्मा, देई अनुमोदन । घेतों सकलांचे प्राण ॥ ४ ॥
काय पांडवांची क्षति । इंद्राचीही नसे भीति ॥ ५ ॥
ऐकूनियां वदला धर्म । ऊठ मजसी करीं रण ॥ ६ ॥
बलिवंत तूं एकाकी । लढूनि सिद्ध करीं शक्ति ॥ ७ ॥
गांधारे, हो सावधान । अद्य न वांचसी जाण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वाणी । खवळे राव ती ऐकूनि ॥ ९ ॥

११८

महानागासम फूत्कार करूनि । बैसल्याचि स्थानीं उसळे क्रोधें ॥
सदश्वासी जेंवी असह्य प्रतोद । तैसेचि ते शब्द असह्य त्या ॥ २ ॥
क्षोभवूनि जळ घेऊनियां गदा । भुजगेंद्र जैसा फों फों करी ॥ ३ ॥
सुवर्णालंकृत गदा स्कंधावरी । उठला सत्वरी कौरवेंद्र ॥ ४ ॥
भेदूनि उदक पातला बाहेरी । गदा उंच करी महाक्रोधें ॥ ५ ॥
सशृंग पर्वत भासला तो दुजा । वाटे क्रुद्ध जैसा शूलपाणी ॥ ६ ॥
सूर्यासम कांति दंडधारी यम । हर्षले पाहून सकळ वीर ॥ ७ ॥

सानंद ते टाळी देती एकमेकां । अवमान नृपा वाटे तेणें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वटारीत नेत्र । चावूनि दंतोष्ठ वदला क्रोधें ॥ ९ ॥

११९

पांडवहो, उपहासें-। हंसतां देतों फळ त्यांतें ॥ १ ॥
अवघे पांचाळांसमेत । पहा आतां यमलोक ॥ २ ॥
सूत म्हणे धृतराष्ट्रा । रणवंबाळ तें राजा ॥ ३ ॥
उभा राहे गदापाणी । थबथबां गळे पाणी ॥ ४ ॥
गिरि जलधारायुक्त । भासला तो सकलांस ॥ ५ ॥
उगारिली तेणें गदा । घुमवीतसे मेघनादा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रणीं । देई आव्हान गर्जूनि ॥ ७ ॥

१२०

एकेकानें एकेकासी । लढावें हे युद्धनीति ॥ १ ॥
सकलांची जरी इच्छा । अयुक्त तें जाणें राजा ॥ २ ॥
धर्म म्हणे अभिमन्यूसी । सकल मिळूनि वधिलें तीं ॥ ३ ॥
तदा कोठें होता धर्म । निष्ठुर हें क्षात्रकर्म ॥ ४ ॥
धर्मज्ञ तें होतां शूर । तनुत्यागी महावीर ॥ ५ ॥
त्वदाज्ञेनें अभिमन्यूसी । वधितां नीति कोठें होती ॥ ६ ॥
संकटांत मानवासी । स्मृति होतसे धर्माची ॥ ७ ॥
वैभवांत असतां तुच्छ । स्वर्ग मानी तो उन्मत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । देई दुष्टासी स्मरण ॥ ९ ॥

१२१

दुर्योधना, लेई कवच शिरस्त्राण । केश आंवळून सिद्ध होई ॥ १ ॥
इष्ट तें तें घेई साहित्य नृपाळा । इच्छिसी जयाला पाचारीं त्या ॥
जिंकितां एकासी सुखें भोगीं राज्य । वध होतां स्वर्ग उपभोगीं ॥
युद्धाह्वानि राजा, यावेळीं त्वत्प्रिय । करणें आम्हां काय शक्य असे
सूत म्हणे राया, कांचनकवचें । कनकगिरि शोभे पुत्र तुझा ॥ ५ ॥
पांडवांसी बोले कोणी ही मजसी । सज्ज व्हा युद्धासी करितों ठार॥
गदाघातें अद्य करितों वैरान्त । एक वा अनेक धांवूनि या- ॥ ७ ॥

न्याय्ययुद्धं मज वधणें अशक्य । नसती हे प्रलाप पहा आजी ॥
उचलावी गदा सज्ज जो तयानें । वासुदेव म्हणे पुढती ऐका ॥

अध्याय ३३ वा

१२२

सूत म्हणे राया, गर्जतां नृपाळ । धर्मासी गोपाळ वदला क्रोधें ॥
युधिष्ठिरा, कैसा केलासी अविचार । गदापाणी वीर अजिंक्य हा ॥
पार्थादिक तुम्हीं अयोग्य या कार्या । भीमावीण जनीं वध्य न हा ॥
दया ही हिताच्या आड हे जाहली । पुनरपि आली द्यूतवेळ ॥ ४॥
बलवंत भीम कृति दुर्योधन । कृति बळाहून श्रेष्ठ जनीं ॥ ५ ॥
डावपेंचापुढें शक्तीची न मात्रा । कैसा युधिष्ठिरा पडला मोह ॥ ६॥
विपत्तींत आजी पडलों हे राया । सकलही वायां गेले श्रम ॥ ७ ॥
त्रयोदश वर्षें सुटला अभ्यास । गदावीरश्रेष्ठ दुर्योधन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्ण घननीळ । अंतरीं व्याकुळ होई बहु ॥ ९ ॥

१२३

गदापाणी दुर्योधना । जिंकी ऐसा कोण धर्मा ॥ ॥
कैसा वदलासी हें तरी । लढतां भीमाही जय दुरी ॥ २ ॥
पंडु-कुंतीची संतती । वाटे मज हतभागी ॥ ३ ॥
दैन्य, दारिद्य, वनवास । वाटे जन्मभरी त्यांस ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे तदा । भीम बोलला मुकुंदा ॥ ५ ॥

१२४

मधूसुदना, हे यादवा अच्युता । लवही न चिंता करीं ऐसी ॥ १ ॥
अंतरींचा अद्य पेटेल वैराग्नि । टाकील जाळूनि दुर्योधना ॥ २ ॥
निश्चयें विजय लाभेल धर्मासी । माधवा, हे माझी गदा पाहें ॥३॥
गुरुतरा तयाहूनि दीडपट । ऐशी सर्वश्रेष्ठ गदा माझी ॥ ४ ॥
लवही न चिंता करीं जनार्दना । उत्साह मन्मना आजी बहु ॥ ५
अवलोका अद्य माझें गदायुद्ध । जिंकील त्रैलोक्य कृष्णा, शौर्य ।
वासुदेव म्हणे संकटांत धैर्य । जया तोचि शूर भाग्यवंत ॥ ७ ॥

१ कसलेला.

१२५

सूत म्हणे राया, ऐकूनियां कृष्ण । संतुष्ट होऊन वदला भीमा ॥१॥
भीमा, तुझ्या शौर्यें युधिष्ठिर धन्य । जाहला संग्राम जिंकूनियां ॥
वधिलेसी वीरा, तूंचि धार्तराष्ट्र । कलिंग, मागध गजांसह ॥ ३ ॥
इंद्रासी जें विष्णु तैसा तूं धर्मासी । जिंकूनियां पृथ्वी अर्पिसील ॥
फोडूनियां अंक आपुली प्रतिज्ञा । सत्य करीं भीमा, युद्धामाजी ॥
कुशल, बलाढ्य वीर दुर्योधन । दक्षतेनें रण करीं त्यासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णवचनें । वीर आनंदानें स्तविती भीमा ॥ ७॥

१२६

विक्रमी सात्यकि तैसेचि धर्मादि । वृकोदरस्तुति करिती मोदें ॥
तेजस्वी धर्मासी बोले, तदा भीम । जिंकिलेंचि जाण दुष्टाप्रति ॥२॥
खांडववनासी जाळिलें अग्नीनें । तैसा क्रोधाग्नीनें जळेल हा ॥ ३ ॥
हृदयींचें शल्य उत्पाटीन अद्य । राया, राहें स्वस्थ अनघा आतां ॥
राज्यवैभवेंसी वधीन दुष्टासी । अर्पीन तुजसी कीर्तिमाला ॥ ५ ॥
पश्चात्तापदग्ध होईल रे अंध । शकुनीचें कृत्य आठवूनि ॥ ६ ॥
बोलूनियां ऐसें उचली गदेतें । सज्जला युद्धातें भीमसेन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राव दुर्योधन । कैलासासमान पुढती ठाके ॥ ८ ॥

१२७

जैसा वियूथ मातंग । तैसा भासे कुरुराज ॥ १ ॥
पाहूनियां तो एकाकी । हर्ष पांडवांच्या चित्तीं ॥ २ ॥
ग्लानि, संभ्रम न व्यथा । भय लवही न चित्ता ॥ ३ ॥
ऐसा उभा सिंहासम । बोले तयालागीं भीम ॥ ४ ॥
नीचा, आठवीं दुष्कर्मा । मज चारिलें विषान्ना ॥ ५ ॥
रजस्वलेचा तो छळ । भोगीं आतां त्याचें फळ ॥ ६ ॥
आठवीं तें कपटद्यूत । तैंवी दुष्कृत्यें अनेक ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीम । क्रोधें देई त्या स्मरण ॥ ८ ॥

---

१ कळप चुकलेला.

१२८

महा यशस्वी जो कुळाचें भूषण । गंगेचा नंदन पितामह ॥ १ ॥
गुरु द्रोण, कर्ण, शल्यही प्रतापी । गेले मृत्युलोकीं तुझ्यास्तव ॥ २ ॥
शकुनीही गेला वैराचा जनक । बांधव समस्त धूळिमग्न ॥ ३ ॥
एकाहूनि एक पडले बहु रणीं । तेंवी प्रतिकामी दुष्ट गेला ॥ ४ ॥
उरलासी आतां तूंचि नराधमा । वधील कुलघ्ना गदा तुज ॥ ५ ॥
दर्प, राज्यआशा, तेंवी वैरबुद्धि । नेईल लयासी गदाचि हे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्रोधें दुर्योधन । बोले तें वचन भीमाप्रति ॥ ७ ॥

१२९

वाचाळता ऐसी कासयासी भीमा । सिद्ध होईं रणा दावीं शौर्य ॥
दर्प तुझा अद्य भीमा, जिरवीन । न्याय्ययुद्धीं कोण जिंकी मज ॥ २ ॥
शारदीय मेघासम व्यर्थ नाद । दाखवीं रणांत सकळ शौर्य ॥ ३ ॥
दाविसील कैसें जातां यमलोकीं । न जिंकी मजसी देवेंद्रही ॥ ४ ॥
ऐकूनि राजाचें सदर्प वचन । पांडवांचें मन हर्ष पावे ॥ ५ ॥
टाळ्या वाजवूनि प्रशंसिती तया । सकल सृंजयां परमानंद ॥ ६ ॥
ओरडले गज खिंचाळले अश्व । शस्त्रेंही प्रदीप्त विजयेच्छूंचीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुर्बलाचा क्रोध । प्रतिपक्षा मोद देई सदा ॥ ८ ॥

अध्याय ३४ वा

१३०

सूत बोलला नृपासी । झाला प्रारंभ युद्धासी ॥ १ ॥
ऐसा दारुण संग्राम । वीर पाहती बैसून ॥ २ ॥
वृत्त ऐकूनि बळिराम । येई शोभवी तें स्थान ॥ ३ ॥
कृष्ण पांडव तयाचें । करिती स्वागत आनंदें ॥ ४ ॥
म्हणती अवलोकीं युद्ध । स्वस्थ बैसूनियां एथ ॥ ५ ॥
राम म्हणे बेचाळीस । दिन होतों प्रवासांत ॥ ६ ॥
पुष्य नक्षत्रीं निघालों । श्रवण नक्षत्रीं पातलों ॥ ७ ॥
युद्ध पाहीन शिष्यांचें । माधवा, हें इच्छीतसें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । पुशी बलरामासी क्षेम ॥ ९ ॥

१३१

प्रेमें आलिंगन देई तया धर्म । भेटती सप्रेम कृष्णार्जुन ॥ १ ॥
अभिवंदिती त्या सकल पांडव । सकलही वीर सन्मानिती ॥ २ ॥
दुर्योधन भीम वंदिती तयासी । इंद्र उपेंद्र जैं ब्रह्मयाप्रति ॥ ३ ॥
धर्म म्हणे पाहीं बांधवांचें युद्ध । बैसे बळिभद्र वीरांमाजी ॥ ४ ॥
नील वस्त्रधारी वीर तो शोभला । तारागणीं ठेला चंद्र जैसा ॥५॥
वैरान्तकारी तें प्रवर्तलें युद्ध । ठाकती रोमांच अंगावरी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यांच्या समक्ष । प्रातःचि दुष्कृत्यफलभोग ॥ ७ ॥

अध्याय ३५ वा

१३२

जनमेजय म्हणे वैशंपायनासी । तटस्थ पूर्वीचि बलराम ॥ १ ॥
कोणाही पक्षासी न करितां साह्य । जाईन मी आर्य वदला कोठें ॥
वदला तो जैसें घडलें त्याचिपरी । पातला त्या स्थळीं परी कैसा ॥
कैसें पाहियेलें युद्धही रामानें । कथीं विस्तारानें तेंचि वृत्त ॥ ४ ॥
मुनि म्हणे राया, शिष्टाई करून । भेटला श्रीकृष्ण पांडवांसी ॥ ५ ॥
'काळप्रेरित ते ऐकती न माझें' । बोलला धर्मानें 'यादवेंद्र' ॥ ६॥
युद्धावीण आतां कांहीं मार्ग नसे । प्रयाण पुष्यातें करा आतां ॥७॥
वासुदेव म्हणे कृष्णासी बलदेव । वदला होई साह्य उभयवीरां ॥

१३३

मानीना गोविंद पाहूनियां ऐसें । यात्रेलागीं क्रोधें सिद्ध राम ॥ १ ॥
मैत्र नक्षत्रीं तो निघाला यात्रेसी । पाही सरस्वतीतीर वेगें ॥ २ ॥
भोज कौरवांच्या साह्यार्थ निघाला । सात्यकि लाभला पांडवांसी
अग्नियाजक तैं विविध वाहनें । वस्त्रें, पात्रें, रत्नें सिद्ध करा ॥ ४ ॥
इष्ट, मित्र, वृद्ध, विप्र घ्या सांगातीं । आज्ञा करी ऐसी बळिराम ॥
सरस्वतीप्रदक्षिणेसी निघाला । दानधर्म केला बहुत रामें ॥ ६ ॥
अन्न पान वस्त्र पात्र यात्रिकांसी । यथेच्छ लाभती दक्षता हे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सुखावह पंथ । यात्रिकांसी स्वर्ग भासतसे ॥ ८ ॥

१३४

वस्त्रें, पात्रें, रत्नें, धेनु सालंकृत । सुवर्ण द्विजांत अर्पी राम ॥ १ ॥

सरस्वतीतीरीं प्रतितीर्थावरी । राम दानें करी पेशारीति ॥ २ ॥
करूनियां यात्रा कुरुक्षेत्रीं येई । गदायुद्ध पाही बांधवांचें ॥ ३ ॥
मुनीलागीं तदा बोले जनमेजय । निवेदा सकळ तीर्थें मज ॥ ४ ॥
मुनि म्हणे फल, उत्पत्ति तीर्थांची । वर्णितों गुणांसी श्रवण करीं ॥
क्षयरोगें ग्रस्त होता चंद्र जेथ । तीर्थ तें प्रभास पाहीं राम ॥ ६ ॥
पुनरपि तेथ पावला प्रकाश । यास्तव प्रभास संज्ञा तीर्था ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वृत्तांत चंद्राचा । कथा म्हणे राजा सकळ मुने ॥

१३५

मुनि म्हणे राया, कन्या दक्षाप्रति । त्या सप्तविंशति सुविख्यात ॥
लावण्यसंयुक्ता होत्या त्या सकळ । रोहिणी अतुल रूपवती ॥ २ ॥
सर्वही त्या दक्षें अर्पिल्या चंद्रासी । रोहिणी तयासी प्रिय बहु ॥३॥
मंदिरीं तियेच्या नित्य निशापति । पित्यासी कथिती सकळ कन्या॥
प्रजाप्रति चंद्रा करी तदा बोध । राखावें समत्व निशिकांता ॥ ५ ॥
परी निशाकर पाहे न तयांसी । राहूं माहेरासी म्हणती कन्या ॥६॥
प्रजापति पुनर्बोध जामात्यासी । करूनि कन्यांसी सदनीं धाडी ॥७॥
ऐके न वचन तें शशलांछन । श्वशुरें दारुण दिधला शाप ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे क्षयरोगग्रस्त । झाला निशिकांत श्वशुरशापें ॥ ९ ॥

१३६

श्वशुरशापानें चंद्र झाला कृश । जाहल्या नीरस वनस्पति ॥ १ ॥
देव तदा चंद्रा वृत्तांत पुसूनि । भेटती जाऊनि दक्षाप्रति ॥ २ ॥
म्हणती संहार होईल जगाचा । सोडवावें चंद्रा शापांतूनि ॥ ३ ॥
प्रजापति म्हणे क्षय-वृद्धिशील । चंद्रमा होईल प्रतिमासीं ॥ ४ ॥
सर्वकन्यांसवें समत्व राखावें । तप आचरावें पुण्यक्षेत्रीं ॥ ५ ॥
सिंधु सरस्वतीसंगमीं जाऊनि । देवेशा चिंतूनि लाभ घ्यावा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चंद्र त्या तीर्थासी । अमावास्येप्रति प्राप्त झाला ॥७॥

१३७

शीतांशुत्वलाभ जाहला त्या स्थानें । शोभे चंद्रिकेनें गगनमार्ग ॥१॥
चंद्रासवें देव भेटती दक्षासी । दक्ष चंद्राप्रति बोध करी ॥ २॥
पुत्रा, स्त्री, विप्रांसी नावमानीं कदा । बोध राहो सदा ध्यानीं माझा ॥

वंदूनि दक्षासी चंद्र गृहीं जाई। आनंदित होई विश्व तदा ॥ ४ ॥
अमावास्येप्रति जाऊनि त्या तीर्थी। लाभतो अद्यापि चंद्र तेज ॥ ५ ॥
मुनि म्हणे राया, पुढती बलराम। चमसोद्भेदीं स्नान करी प्रेमें ॥
उदपानाप्रति जाऊनि पुढती। दान प्रतितीर्थी करी बहु ॥ ७ ॥
समृद्ध औषधि पाहूनियां ज्ञानी। जाणिताती मनीं सरस्वती ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सरस्वती गुप्त। ओळखिती सिद्ध ऐशा रीति ॥ ९ ॥

अध्याय ३६ वा १३८

मुनि म्हणे राया, त्रितांचिया कूपीं। पातला पुढती बळिराम ॥ १ ॥
राव म्हणे वृत्त कथावें त्रिताचें। मुनि म्हणे ऐकें पुण्यकथा ॥ २ ॥
एक, द्वित ते त्रिताचे बांधव। ज्ञाते महाभाव पूर्वयुगीं ॥ ३ ॥
गौतम तयांचा पिता भाग्यवंत। गांठी पुण्यलोक योग्यवेळीं ॥ ४ ॥
गौतमाचा मान लाभला त्रितासी। तया पाचारिती नृपती यज्ञा ॥
कपट धरूनि पुढती बंधुद्वय। धेनुलाभास्तव हिंडताती ॥ ६ ॥
गांठूनि यजमान करविती यज्ञ। धेनुसंपादन केल्या बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसे यज्ञ बहु। करूनियां जाऊं म्हणती गृहीं ॥ ८ ॥

१३९

असंख्यात धेनु तयांच्या सांगाती। चालला पुढती ज्ञाता त्रित ॥
मागूनि हांकिती धेनु, बंधु दोघे। अंतरांत रिघे कपट त्यांच्या ॥२॥
म्हणती त्रितासी धेनु लाभतील। हांकूं धेनुकुल अन्य मार्गें ॥ ३ ॥
त्रित जावो कोठें होवो त्याचें कांहीं। आपणासी नाहीं चिंता त्याची
चिंतितां ते ऐसें सरस्वतीतीरीं। येती निशाकाळीं, कूपाजवळी ॥
पुढती चालतां त्रित पाही वृका। भयाकुल कूपामाजी पडे ॥ ६ ॥
आक्रोश करूनि मारी बहु हांका। परी बांधवांचा नडला लोभ ॥
अंतरांत लोभ भयही वृकाचें। सोडूनि त्रितातें पुढती गेले ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अनावर लोभ। आणि तो प्रसंग घोर जनीं ॥ ९ ॥

१४०

पशुलुब्ध बांधवांनीं। त्यजितां त्रित दुःखी मनीं ॥ १ ॥
तृणलतावगुंठित। ऐसा शुष्कचि तो कूप ॥ २ ॥

कैसें नरककुंडासम । म्हणे प्राप्त झालें स्थान ॥ ३ ॥
चिंती मनीं शांतचित्तें । कळलें कारण तयातें ॥ ४ ॥
मृत्युभयें मी पळालों । तेणें पतन पावलों ॥ ५ ॥
आतां जिंकीन मृत्यूसी । सोमपानें हेतुसिद्धि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाते । मूळ शोधिताती साचें ॥ ७ ॥

१४१

सोमपानें मृत्युभय नष्ट होई । परी मार्ग कांहीं न दिसे तेथें ॥ १ ॥
इतुक्यांत लता अवलोकिली एक । चिंती मनीं त्रित यज्ञ करूं ॥२॥
धूलिमग्न कूपीं शोधी एक स्थान । कल्पी मनीं यज्ञस्थान शुद्ध ॥३॥
अग्नि, सोम चित्तीं कल्पूनियां स्वयें । पाषाणांचे ग्रावे कल्पियेले ॥
लतेचाचि रस कल्पूनियां सोम । उदक कल्पुन घृत, घाला ॥ ५ ॥
ऋचा यज्ञसूक्तें साम गाऊनियां । हविर्भाग देवां अर्पी मनें ॥ ६ ॥
शास्त्रीय तो मंत्रनाद स्वर्गीं जाई । भयग्रस्त होई स्वर्गस्थान ॥ ७ ॥
बृहस्पति तदा बोलला देवांसी । तोषवा त्रितासी अथवा नाश ॥
निर्मील तो अन्य देवही तपानें । वासुदेव प्रेमें वंदी त्रिता ॥ ९ ॥

१४२

देवगुरु हें बोलतां । देव भेटताती त्रिता ॥ १ ॥
दीक्षित तो कांतिमान । मुनि दिसला कूपमग्न ॥ २ ॥
हविर्भागग्रहणार्थ । देव म्हणती आलों एथ ॥ ३ ॥
मुनि म्हणे या संकटीं । होवो तुमची कृपादृष्टि ॥ ४ ॥
पुढती अर्पी हविर्भाग । देव पावले संतोष ॥ ५ ॥
वर इच्छिले ते देती । कूपस्पर्शें सुजनां गति ॥ ६ ॥
आला सरस्वतीस्रोत उदकें वाहूं लागे कूप ॥ ७ ॥
त्रित येऊनि बाहेरी । देवतांची स्तुति करी ॥ ८ ॥
देऊनियां आशीर्वाद । सकळ होती देव गुप्त ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मुनि । पुढती पातला सदनीं ॥ १० ॥

१४३

दुष्ट बांधवांसी पाहूनि कोपला । निंदूनि बोलला शापवाणी ॥ १ ॥
पशुलोभें मज त्यागूनि संकटीं । एथ पातलांती क्रूरपणें ॥ २ ॥

दंष्ट्रायुक्त क्रूर होऊनियां वृक। संचार वनांत करा वेगें ॥ ३ ॥
ऋक्ष वानरत्व पावेल संताति। वाणी ते त्रिताची सत्य झाली ॥४॥
वैशंपायनें ती कथिली कूपकथा। जनमेजयाचित्ता मोद वाटे ॥ ५ ॥
मुनि म्हणे राया, स्पर्शूनि उदक। विनशनतीर्थ पाही राम ॥ ६ ॥

अध्याय ३७ वा १४४

शूद्राभीरद्वेषें नष्ट सरस्वती। विनशन ऐसी संज्ञा तया ॥ १ ॥
पुढती सुभूमिकतीर्थीं करी स्नान। परम रम्य स्थान जनप्रिय ॥
अप्सरा, गंधर्व, यक्ष सर्व देव। पावती उत्साह तयास्थानीं ॥ ३ ॥
पुढती गंधर्वतीर्थीं केलीं दानें। गर्गस्रत नामें पुढती तीर्थ ॥ ४ ॥
कालज्ञान ग्रहनक्षत्रांचा बोध। जाणिले उत्पात गर्गें येथें ॥ ५ ॥
पुढती शंखतीर्थीं महाशंख वृक्ष। येती देवादिक गुप्तरूपें ॥ ६ ॥
नागधन्वातीर्थीं वासुकीचा वास। झाला अभिषेक तया तेथें ॥७॥
सर्पभय तेथ नसे कदा कोणा। लक्षसंख्यस्थाना पुढती पाही ॥८॥
पश्चिमवाहिनी पुढती सरिद्वरा। आरंभिती सत्रा बहुत मुनि ॥९॥
वासुदेव म्हणे वालखिल्यादिक। पातले असंख्य मुनि तीरीं ॥१०॥

१४५

वास्तव्यासी स्थान तीरावरी नुरे। ऋषींचीं अंतरें खिन्न तेणें ॥ १ ॥
पाहूनियां डोह निर्मूनि बहुत। पश्चिमाभिमुख सरिता वाहे ॥ २ ॥
अमोघप्रवाहें माघारी येईन। मनीं हें चिंतून फिरली मागें ॥ ३ ॥
पाहूनि मुनींसी वाटला विस्मय। 'कुंजनैमिषीय' तीर्थ तेंचि ॥४॥
कुरुक्षेत्रीं तया तप आचरावें। दानधर्म केले बहुत रामें ॥ ५ ॥
औदुंबर, बोरी, अश्वत्थ, पलाश। कर्दळीचें दाट पुढती वन ॥ ६॥
तया सप्तसारस्वततीर्थीं मुनि। मंकणक पूर्वी करिती तप ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हलधारी तेथ। येऊनियां तीर्थस्नान करी ॥ ८ ॥

अध्याय ३८ वा १४६

'सुप्रभा' 'सुरेणु' तेंवीं 'कांचनाक्षी'। तैसी 'ओघवती' 'मनोरमा'
'विमलोदका' तैं 'विशाला' हीं सप्त। रूपें सरितेस तया ठाईं ॥ २ ॥

पुष्करतीर्थासी चतुराननयज्ञ । मंडपीं त्या जन देवादिक ॥ ३ ॥
म्हणती महानदी नसे सरस्वती । यज्ञ सामान्यचि होईल हा ॥ ४ ॥
तदा ब्रह्मदेवें चिंतितां सुप्रभा । प्रकटतां लोकां हर्ष बहु ॥ ५ ॥
मुनि नैमिषांत चिंतितां त्या ठाईं । कांचनाक्षी येई मुनीस्तव ॥ ६ ॥
विशाला ते गयदेशीं गयास्तव । उद्दालकास्तव मनोरमा ॥ ७ ॥
कुरुराजयज्ञीं सुरेणु पातली । वसिष्ठा पावली ओघवती ॥ ८ ॥
सुरेणु दक्षा ही विमलोदका ब्रह्म्या । एकत्र त्या स्थाना सतही त्या
वासुदेव म्हणे सप्त सारस्वत । ऐसें हें विख्यात तीर्थ लोकीं ॥१०॥

१४७

मंकणक मुनि करितां येथें स्नान । सर्वांगसंपूर्ण दिसली कन्या ॥
तेजस्खलन तें पावलें मुनीचें । कलशामाजी त्यातें संरक्षिलें ॥ २ ॥
तेजस्वी त्या स्थानीं मुनि होती सप्त । मरुद्गण सुत तयांप्रति ॥३॥
एकदां दर्भानें मंकणकांगुली । भग्न होतां झाली नवल कथा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐका तेंचि वृत्त । मुनि मंकणक ख्यात होती ॥ ५ ॥

१४८

रुधिरा ऐवजीं शाकरस वाहे । हर्ष बहु पावे मुनि तदा ॥ १ ॥
हर्षें तो नाचतां, प्रार्थिती जैं देव । येई महादेव तयास्थानीं ॥ २ ॥
नखाग्रें अंगुष्ठा करूनियां क्षत । दावी भस्म स्वच्छ रुधिर नसे ॥३॥
पाहूनियां मुनि घाली लोटांगण । म्हणे हे चरण सर्वश्रेष्ठ ॥ ४ ॥
तपोभंग माझा न होवो शंकरा । प्रार्थितां शिवाला कृपा येई ॥५॥
सहस्र गुणित वाढे तदा तप । ऐसा आशीर्वाद तया देई ॥ ६ ॥
आश्रमांत तुझ्या नित्य माझा वास । पूजील तयास पुण्यलोक ॥
सुकन्येचा पुत्र पिता मातरिश्वा । वंद्य वासुदेवा मंकणक ॥ ८ ॥

अध्याय ३९ वा

१४९

औशनसतीर्थ पाही बळिराम । ' कपालमोचन ' म्हणती तया ॥
दंडकवनांत हिंडतां रामानें । छेदूनि उडविलें दैत्याशिर ॥ २ ॥
महोदर मुनिचरणीं चिकटलें । नवलाचि झालें काननीं तें ॥ ३ ॥
तथासवें मुनि करिती तीर्थयात्रा । याचि पुण्यक्षेत्रा मुक्त झाले ॥

शुक्रालागीं एथ नीतिज्ञान झालें । आर्ष्टिषेणें केलें तप एथ ॥ ५ ॥
विश्वामित्र एथें विप्रत्व पावला । रुषंगूसी नेला याचि क्षेत्रीं ॥६॥
जलसमाधी तो घेई याचि स्थानीं । मृत्यु तया स्थानीं मोक्षप्रद ॥
थोर थोर एथें करूनि तपस्या । गेले पुण्यलोका तीर्थस्नानें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तेथ बळिराम । करी दानधर्म अपरंपार ॥ ९ ॥

अध्याय ४० वा १५०

रावप्रश्नें मुनि आर्ष्टिषेणवृत्त । निवेदिती तेंच ऐका आतां ॥ १ ॥
कृतयुगीं आर्ष्टिषेणनामें द्विज । कष्टला बहुत गुरुगृहीं ॥ २ ॥
परी विद्या त्याची पूर्ण नच होई । पुढती तो येई याचि क्षेत्रीं ॥३॥
आचरितां तप विद्या पूर्ण झाली । तीर्थावरी केली कृपा तेणें ॥ ४ ॥
अश्वमेधफल, अल्पतपें लाभ । सर्पबाधा एथ नसे कोणा ॥ ५ ॥
आर्ष्टिषेण ऐसे तीन वर देई । 'सिंधुद्वीप' तोही ज्ञाता एथ ॥ ६ ॥
देवापीही विद्या लाभला या स्थानीं । गाधिसुत जनीं धन्य झाला ॥
वसिष्ठाश्रमीं तो होतां पराभूत । तपश्चर्या एथ करिता झाला ॥ ८ ॥
तेणें ब्राह्मणत्व लाभलें तयासी । दानें बहु अर्पी राम तेथें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे विप्रांसवें राम । बकाचा आश्रम पुढती पाही ॥ १० ॥

अध्याय ४१ वा १५१

मुनि दाल्भ्यबक जेथ करी तप । बळिराम तेथ प्राप्त झाला ॥ १ ॥
विचित्रवीर्याचा पुत्र धृतराष्ट्र । अवमानीं मुनीस पशूंस्तव ॥ २ ॥
याचितां तयासी मृत पशु अर्पी । क्रोध तैं दाल्भ्यासी येई बहु ॥३॥
चिंतूनियां मुनि मृत पशु नेई । आहुती त्या देई अग्नीमाजी ॥ ४ ॥
क्षीण तदा राष्ट्र होई धृतराष्ट्राचें । राव ज्योतिषांतें प्रश्न करी ॥५॥
कथिती ते ज्याचा अवमान जाहला । विनाशार्थ केला यज्ञ तेणें ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां राव । पुशितांचि ठाव पुशिती विप्र ॥ ७ ॥

१५२

सरस्वतीतीरीं धृतराष्ट्र येई । नम्र मुनिपायीं, क्षमा मागे ॥ १ ॥
अविवेकी लोभी मूढ मी जाणूनि । सदय होऊनि कृपा करा ॥ २ ॥

दयाळु तें मुनि जाहला प्रसन्न । राष्ट्र सुसंपन्न होई तदा ॥ ३ ॥
धृतराष्ट्रें धेनु अर्पितां बहुत । नैमिषारण्यांत गेला मुनि ॥ ४ ॥
ऐसाचि गुरूनें यज्ञ पूर्वी केला । विजय लाभला देवांप्रति ॥ ५ ॥
ऐशा त्या तीर्थासी केलीं बहुदानें । वासुदेव प्रेमें वृत्त सांगे ॥ ६ ॥

१५३

पुढती यायात तें तीर्थ । जेथ ययाति कृतार्थ ॥ १ ॥
दुग्ध, घृत, सरस्वती । द्रवली ज्याच्या यज्ञामाजी ॥ २ ॥
केलें तेणें इच्छादान । सकल संतुष्ट ब्राह्मण ॥ ३ ॥
ऊर्ध्वमार्गें उत्तमलोकीं । गेला राजर्षि ययाति ॥ ४ ॥
अवलोकूनियां तें तीर्थ । पुढती गेला बळिभद्र ॥ ५ ॥
क्षेत्र 'वसिष्ठाप्रवाह' । वर्णी आतां वासुदेव ॥ ६ ॥

अध्याय ४२ वा

१५४

रायाप्रति मुनि सांगे जो वृत्तांत । कथितों सहर्ष तोचि ऐका ॥ १ ॥
स्थाणुतीर्थावरी वसिष्ठआश्रम । पूर्वेसी धीमान् विश्वामित्र ॥ २ ॥
स्थाणूनें हें पूर्वी स्थापियेलें तीर्थ । महाघोर तप आचरूनि ॥ ३ ॥
सेनापति केलें एथेंचि स्कंदासी । मुनिद्वयांमाजी स्पर्धा येथें ॥ ४ ॥
वसिष्ठतेजानें मुनि विश्वामित्र । होई चिंताक्रांत मनामाजी ॥ ५ ॥
योजूनियां कांहीं पुढती एक मार्ग । पाचारी सवेग सरितेप्रति ॥ ६ ॥
पतिहीन नारीसम सरस्वती । कांपत पुढती उभी ठेली ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नम्रभावें बोले । वदें काय केलें पाहिजे तें ॥ ८ ॥

१५५

मुनि बोलला तियेसी । वेगें आणीं वसिष्ठासी ॥ १ ॥
आजि तयासी वधीन । सरस्वती तदा दीन ॥ २ ॥
लता जैसी प्रकंपित । तैसें कांपे तिचें अंग ॥ ३ ॥
पुनरपि परी मुनि । वदला त्वरित ये घेवोनि ॥ ४ ॥
न करीं कांहीं तूं विचार । जाई जाई वो सत्वर ॥ ५ ॥
ऐकूनियां सरस्वती । जाई वसिष्ठस्थानासी ॥ ६ ॥

वासुदेव म्हणे चिंता । ऐशी थोरांच्याही चित्ता ॥ ७ ॥

१५६

दोघेही तपस्वी सामर्थ्यसंपन्न । जाहली उद्विग्न सरस्वती ॥ १ ॥
एकीकडे आड अन्यत्र विहीर । जाहली व्याकुळ सरिद्वरा ॥ २ ॥
वृत्तांत सकळ वसिष्ठासी कथी । चिंताकुल चित्तीं होई बहु ॥ ३ ॥
वसिष्ठ तियेचा ओळखूनि भाव । वदती नेई शीघ्र मजसी तेथें ॥४॥
अन्यथा तुजसी कौशिक शापील । न होई व्याकुल माझ्यास्तव ॥
ऐकूनियां चित्तीं चिंती सरस्वती । कैसें उपकर्त्यासी वांचवावें ॥
कैसें वागतां मी होईल सुयोग्य । स्वीकारावा मार्ग कैशारीति ॥
वासुदेव म्हणे पाहूनि सुवेळ । सरस्वतीजळ उफाळलें ॥ ८ ॥

१५७

तीरावरी करी जप । स्वस्थचित्तेंसी कौशिक ॥ १ ॥
ऐसें पाहूनि सरिता । आणी वाहूनि वसिष्ठा ॥ २ ॥
स्तवन मांडिलें मुनीनें । उदकीं वाहतां वेगानें ॥ ३ ॥
तुष्टि, पुष्टि, कीर्ति, बुद्धि । सरस्वती रूपें तुझीं ॥ ४ ॥
तूंचि सगरासी आधार । कथिसी तूंचि वेद-शास्त्र ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मुनि । ऐसा तन्मय स्तवनीं ॥ ६ ॥

१५८

कौशिकासन्निध नेऊनि मुनीसी । आणिलें मी यासी सरिता वदे ॥
पुनः पुनः ऐसें तयासी निवेदी । काष्ठादिक शोधी विश्वामित्र ॥ २ ॥
ब्रह्महत्याभयें वेगें सरस्वती । नेई वसिष्ठांसी वेगें दूर ॥ ३ ॥
विश्वामित्र तदा होऊनियां क्रुद्ध । सरितेसी शापवचन बोले ॥ ४ ॥
राक्षसप्रिया हो रुधिरप्रवाहा । प्रत्ययासी आला अब्दें शाप ॥ ५ ॥
पाहूनि तियेसी देवादिक दुःखी । हर्ष राक्षसांसी बहुत होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वसिष्ठाप्रवाह । तीर्थ सुखावह मानवांसी ॥ ७ ॥

अध्याय ४३ वा

१५९

तीरावरी करिती वास । सरस्वतीच्या राक्षस ॥ १ ॥
रुधिरप्राशनें ते धाले । नित्य आनंद पावले ॥ २ ॥

तीर्थसंचारी बहु मुनि । पुढती पातले त्या स्थानीं ॥ ३ ॥
पुशिलें सरितेसी वृत्त । म्हणती करूं द्विजसी मुक्त ॥ ४ ॥
तपादिक व्रत-वैकल्यें । करूनि तिजसी मुक्त केलें ॥ ५ ॥
राक्षस तैं मुनींप्रति । उद्धारार्थ विनविती ॥ ६ ॥
विप्रव्यभिचारदोषें । येती राक्षसयोनींतें ॥ ७ ॥
विप्रद्वेषी सकल अन्य । पावताती राक्षसजन्म ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नम्र । पाहूनि त्या सदय विप्र ॥ ९ ॥

१६०

सरस्वतीलागीं प्रार्थूनि बोलले । उच्छिष्ट, किडलेलें, क्षताकीर्ण ॥
रुदितोपहत कीं अन्न केशयुक्त । दूर जें पतित अभक्ष्य तें ॥ २ ॥
राक्षसांचा भाग जाणूनि तें सदा । न सेविती कदा ज्ञाते जन ॥३ ॥
अरुणास्नानानें राक्षसांसी स्वर्ग । देऊनियां विप्र हृष्ट होती ॥ ४ ॥
त्याचि स्नानें इंद्र ब्रह्महत्यामुक्त । जाहला प्रत्यक्ष देवराज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्महत्यावृत्त । ऐका तें समस्त साररूपें ॥ ६ ॥

१६१

नमूचीतें इंद्र बोलला वचन । न घेईंचि प्राण दिवा रात्रौ ॥ १ ॥
आर्द्र, शुष्कद्रव्यें न वधीं मी तुज ।पुढती शिरच्छेद फेनें केला ॥
विहारसमयीं वधिलें तयासी । अरुणास्नानेंसी दोषमुक्ति ॥ ३ ॥
बलिराम येथें करूनियां स्नान । अर्पी धन-धान्य विप्रांलागीं ॥ ४ ॥
याचिस्थानीं सोम पूर्वी करी यज्ञ । कुमाराचें स्थान हेंचि राया ॥
वासुदेव म्हणे तारकाचा वध । ऐका तो वृत्तांत स्मरणालागीं ॥६॥

अध्याय ४४ वा

१६२

वैशंपायनासी जनमेजयानें । पुशितां तयानें कथिलें ऐका ॥ १ ॥
कार्तिकेय तोचि गांङ्गेय पूर्वीचा । गिरिशृंगीं ज्याचा पुढती वास ॥
देवदेवता त्या बाळासी रक्षिती । शंकर, पार्वती, अग्नि, गंगा ॥ ३॥
बाळ बहुविध सन्मानी तयांसी । सेनापत्य त्यासी अर्पी ब्रह्मा ॥
सरस्वतातीरीं पातले पुढती । वासुदेव त्यासी वंदी प्रेमें ॥ ५ ॥

अध्याय ४५ वा १६३

सशास्त्र सविधि हवन जाहलें । बाळासी स्थापिलें सिंहासनीं ॥
देवदेवता तैं येती तयास्थानीं । हर्षित पाहूनि अभिषेक ॥ २ ॥
बृहस्पति ब्रह्मा कश्यपादि मुनि । अभिषेक करूनि संतोषवी ॥ ३ ॥
शिव, ब्रह्मा, इंद्र, कुबेरादि देव । अर्पिती अपूर्व सेवक त्या ॥ ४ ॥
वेश भूषा भिन्न-विभिन्न रूपाचें । सैन्यही स्कंदातें अर्पिताती ॥ ५ ॥
विविधाधिकारी तत्तत्सैन्यभाषा । बोलूनियां स्कंदा तोप देती ॥
रूप भाषा तेंवी आयुधें विविध । ऐसी बलवंत देवसेना ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विस्तृत वर्णन । मूळ ग्रंथीं पूर्ण केलें असे ॥ ८ ॥

अध्याय ४६ वा १६४

राया, प्रभावती विशालाक्षी आदि । मातृगण येती साह्यास्तव ॥१॥
नामें रूपें त्यांचीं वर्णिलीं ग्रंथांत । होती पारिषद साह्य तयां ॥२॥
रणवाद्यनादें कोंदलें गगन । बोलला वचन स्कंद तदा ॥ ३ ॥
वधीन मी आतां निश्चयें शत्रूसी । ऐकूनि देवांसी परमानंद ॥ ४ ॥
पुढती शस्त्रास्त्रसंयुक्त स्कंदानें । वधिलें लीलेनें तारकासी ॥ ५ ॥
महिषासुर तैं त्रिपाद वधिला । ह्रदोदर झाला गतप्राण ॥ ६ ॥
बलीपुत्र बाण क्रौंच पर्वतासी । शरण जातां शक्ति फेंकी स्कंद ॥
पर्वतचि तदा होई शतचूर्ण । ऐसें देवविघ्न दूर होई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे स्कंदाभिषेकाची । कथा हे भारतीं सविस्तर ॥ ९ ॥

१६५

तैजस नामक तीर्थ हें विख्यात । येथेंचि अभिषेक वरुणा झाला ॥
जलपतित्व त्या लाभलें येथेंचि । हर्ष बळिरामासी तया स्थानीं ॥
दानधर्म बहु करूनियां, रात्र । राहियेला एक वीर तेथें ॥ ३ ॥
हलधरा बहु तेणें समाधान । वृत्तनिवेदन केलें राया ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे तीर्थयात्रावृत्त । ऐकूनियां चित्त मोद पावे ॥ ५ ॥

अध्याय ४७ वा १६६

जनमेजयप्रश्नें वैशंपायनानें । वृत्त वरुणाचें कथन केलें ॥ १ ॥

उदकाचें भय निवारितां, पति । होई तूं आम्हांसी म्हणती देव ॥२॥
नदीपति सिंधु होवो तुझें स्थान । पाळील वचन सिंधु तुझें ॥ ३ ॥
सोमासह तुझी होवो क्षय-वृद्धि । देव वरुणासी वदती ऐसें ॥ ४ ॥
जलराज्यावरी केला अभिषेक । याचि क्षेत्रीं वृत्त घडलें राया ॥
अग्नितीर्थाप्रति पुढती बळिराम । अपार करून दान गेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अग्नि, शमिगर्भी । राहिला या स्थानीं भृगुशापें ॥

१६७

पुढती शोधिलें देवांनीं । मुक्त केलें त्यालागोनि ॥ १ ॥
सर्वभक्षक तो झाला । वृत्त घडलें तें या स्थळा ॥ २ ॥
ब्रह्मयोनि कौबेरादि । तीर्थ बळिभद्रें केलीं ॥ ३ ॥
ब्रह्मयोनि तीर्थाप्रति । केली ब्रह्म्यानें उत्पत्ति ॥ ४ ॥
पुष्पकादि सकलैश्वर्य । जेथ मेळवी कुबेर ॥ ५ ॥
तयास्थानीं बळिराम । करी बहु दानधर्म ॥ ६ ॥
पुष्पफलयुक्त स्थान । पुढती 'बदरीपाचन' ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्राणि । वसती विविध त्या स्थानीं ॥ ८ ॥

## अध्याय ४८ वा

१६८

श्रुतावली नामें भारद्वाजकन्या । आचरी त्या स्थानां घोर तप ॥ १ ॥
इंद्र पति व्हावा इच्छा हेचि मनीं । वसिष्ठ होऊनि इंद्र येई ॥ २ ॥
पंच बरी फळें दे म्हणे पचवूनि । बैसला जावूनि कथूनि ऐसें ॥
तेंचि इंद्रतीर्थ सन्निध विख्यात । आज्ञापालनार्थ कन्या झटे ॥ ४ ॥
सत्व पाही इंद्र बोरें न शिजती । संपूनियां जाती सकल काष्ठें ॥५॥
ऋषीचें वचन करावया पूर्ण । अग्नींत चरण जाळी कन्या ॥ ६ ॥
काष्ठाऐवजीं ते जाळी निज देह । लवही न खेद तिजप्रति ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे निर्धार कन्येचा । हेतु सन्मुनीचा पूर्ण व्हावा ॥ ८ ॥

१६९

उभय चरण झाले भस्मरूप । लवही कन्येस दुःख नसे ॥ १ ॥
पाहोनि ते निष्ठा संतोषला इंद्र । येशील स्वर्गांत म्हणे तिज ॥ २ ॥
पूर्णकाम कन्या जाहली या तीर्थीं । यावच्चंद्र याची कीर्ति जगीं ॥

अरुंधतीत्याग करूनि सप्तर्षि । हिमनगीं जाती एथूनीच ॥ ४ ॥
तपश्चर्या करी अरुंधती घोर । पातले शंकर तयास्थानीं ॥ ५ ॥
पाचनार्थ बोरें देती तियेप्रति । द्वादशवर्षें तीं शिजतीचिना ॥ ६ ॥
पुढती सप्तऋषि स्वस्थानीं पातले । शंकर बोलले तयांप्रति ॥ ७ ॥
द्वादशवर्षें ही पूर्ण उपोषित । केलें घोर तप तुम्हांहूनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बदरीपाचन । ऐसें पुण्यस्थान भूमीवरी ॥ ९ ॥

१७०

एकदिन एथें जो कोणी उपवासी । पुण्यलोक त्यासी मरणोत्तर ॥
श्रुतावतीलागीं कथूनियां ऐसें । इंद्र स्वस्थळातें जाई सौख्यें ॥२॥
सुवासिक तदा वायूहि सुटला । वर्षाव जाहला सुमनांचा ॥ ३ ॥
श्रुतावती स्वर्गी गेली आनंदानें । जोडिला तपानें इंद्र पति ॥ ४ ॥
घृताचीदर्शनें भरद्वाजाप्रति । कन्या, श्रुतावती प्राप्त झाली ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बळिभद्र तेथूनि । शक्रतीर्थस्थानीं पुढती जाई ॥

अध्याय ४९ वा १७१

शतक्रतु नाम इंद्रासी या स्थानीं । लाभलें पाहूनि यज्ञशत ॥ १ ॥
पुढती रामतीर्थी गेला बलराम । केलें पृथ्वीदान भार्गवानें ॥ २ ॥
राजसूययज्ञ वरुणें करितां । झालें यमुनातीर्थी घोर युद्ध ॥ ३ ॥
राजसूय होतां क्षत्रियसंग्राम । सिद्ध हा नियम धर्मयज्ञें ॥ ४ ॥
आदित्यतीर्थासी पाही बलराम । सूर्यासी, हें स्थान याचि क्षेत्रीं ॥
श्रेष्ठत्व पावले सकल या स्थानीं । कृष्ण, व्यास मुनि, इंद्र, विष्णु
वासुदेव म्हणे ऐसें पुण्यक्षेत्र । पाही बळिभद्र आनंदानें ॥ ७ ॥

अध्याय ५० वा १७२

असितदेवल पुण्यात्मा गृहस्थ । राहियेला तेथ शुद्धचित्त ॥ १ ॥
जैगीषव्य तेथ एकदां पातला । आश्रमीं राहिला देवलाच्या ॥
आश्रमांत ऐसे गेले बहु दिन । देवलाचें मन साशंकित ॥ ३ ॥
म्हणे जैगीषव्य न करीचि कांहीं । आळशी हा राही स्वस्थ तदा ॥
चिंतूनियां ऐसें अंतरिक्षमार्गें । पातला स्नानातें सिंधुतीरीं ॥ ५ ॥

जैगीषव्यालागीं पाही तयास्थानीं । आश्चर्यचि मानी अंतरांत ॥
संध्या जपादिक उरकूनि वेगें । येई स्वस्थळातें असितमुनि ॥ ७ ॥
येतांचि पाहिला तेथ जैगीषव्य । वाटला विस्मय देवलासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अंतरिक्षीं गेला । ऊर्ध्वगामी झाला मंत्रबळें ॥ ९ ॥

१७३

पाही जैगीषव्य आपुल्या पुढती । गेला पुण्यलोकीं देवलमुनि ॥१॥
एकामागें एक पाहिले अनेक । महा पुण्यलोक देवलानें ॥ २ ॥
परी जैगीषव्य दिसे त्या त्या स्थानीं । विस्मयेंचि मुनि थक्क होई ॥
अंतीं पतिव्रतालोकीं गुप्त झाला । देवल तयाला शोधी यत्नें ॥ ४ ॥
सिद्धमुनि तदा वदले तयासी । गेला ब्रह्मलोकीं जैगीषव्य ॥ ५ ॥
उड्डाण ठोकितां पावला पतन । सिद्ध म्हणती यत्न व्यर्थ तुझे ॥ ६॥
सोडूनि छंद देवल त्या स्थानीं । गेला तो क्रमूनि मार्ग आला ॥
नवलचि परी जाहलें अपूर्व । पाही जैगीषव्य निजाश्रमीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नम्र तदा मुनि । चरण वंदूनि शरण गेला ॥ ९ ॥

१७४

विनयें बोले मुनिराजा । मज मोक्षधर्म वदा ॥ १ ॥
वाणी ऐकूनि मुनींची । जैगीषव्य त्या उपदेशी ॥ २ ॥
विधि-निषेध तैं योग । उपदेशी ज्ञानमार्ग ॥ ३ ॥
पुढती संन्यासग्रहण । इच्छी देवलाचें मन ॥ ४ ॥
जाणूनि ते त्याची इच्छा । दिधली जैगीषव्यें दीक्षा ॥ ५ ॥
कोण अर्पील विभाग । म्हणती तदा पितरादिक ॥ ६ ॥
आर्त आक्रोश ऐकूनि । चित्तीं द्रवला देवलमुनि ॥ ७ ॥
पूर्व आश्रमार्थ सिद्ध । होतां भूतमात्रां खेद ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे चिंता । वनौषधींसह वृक्षां ॥ ॥

१७५

अभय भूतांसी देऊनि हा दुष्ट । पुनरपि कष्ट आम्हां देई ॥ १ ॥
अभयवचन विसरला कैसें । क्षुद्रत्व बुद्धीचें सिद्ध होई ॥ २ ॥
चिंती पुनरपि तदा मुनिश्रेष्ठ । संन्यासें वरिष्ठ ठरवी मनीं ॥ ३ ॥

स्वीकारितां मोक्षधर्म पावे सिद्धि । जैगीषव्यस्तुति करिती देव ॥
सर्वश्रेष्ठ मुनि हाचि एक जनीं । ऐसें संतोषूनि वदती सर्व ॥ ५ ॥
ऐशा इंद्रतीर्थी करूनियां दानें । सोमतीर्थी प्रेमें जाई राम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुण्यभूमीवृत्त । एकाहूनि एक श्रेष्ठचि हें ॥ ७

अध्याय ५१ वा १७६

राजसूय करी नक्षत्राधिपति । युद्ध तारकासी येथें झालें ॥ १ ॥
तया तीर्थी स्नान करूनियां राम । सारस्वतस्थान पुढती पाही ॥
दधीचि नामक जितेंद्रिय मुनि । घाबरला मनीं इंद्र तया ॥ ३ ॥
भुलवितांही तो न भुले कोणासी । अलंवुषा त्यासी मोह पाडी ॥
सरस्वतीतीरीं विचलित झाला । वाढवी गर्भाला सरस्वती ॥ ५ ॥
योग्यवेळीं पुत्र दिधला मुनीसी । निवेदूनि त्यासी वृत्त सर्व ॥ ६ ॥
स्वीकारूनि पुत्रा हृदयासी धरी । बोलला वैखरी सरितेलागीं ॥
सरस्वती तुझें उदक पवित्र । तर्पितां पितरतृप्ति होवो ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सारस्वत ऐसें । नाम त्या पुत्रातें ठेवियेलें ॥ ९ ॥

१७७

तपस्वी हा पुत्र तुझा । सरिते, संरक्षील वेदां ॥ १ ॥
पुण्यवती तूं होसील । जनीं श्रेष्ठत्व लाभेल ॥ २ ॥
हर्षित तें सरस्वती । पुत्रासवें स्वस्थळासी ॥
गेली, देव-दानवांचें । युद्ध जुंपलेलें होतें ॥ ४
दुष्ट-दानव वधार्थ । इंद्र शोधी तदा अस्त्र ॥ ५ ॥
देव मागती तें अस्थि । मुनिश्रेष्ठ दधीचीसी ॥ ६ ॥
परम संतोषें तें मुनि । गला स्वदेह ठेवूनि ॥ ७ ॥
पुढती अस्थींचीं त्या शक्रें । निर्मियेलीं बहु शस्त्रें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दैत्य । वधिले देवांनीं असंख्य ॥ ९ ॥

१७८

कांहीं काळ ऐसा लोटतां दारुण । पडलें अवर्षण भूमीवरी ॥ १ ॥
अन्नासाठीं मुनि फिरती दशदिशा । सारस्वता चिंता पडली तधीं
सरस्वती तदा बोलली पुत्रास । जाऊं नको मत्स्य अर्पीन मी ॥ ३ ॥

ऐकूनि तें मुनि राही तीरावरी । अध्ययन करी नित्य प्रेमें ॥ ४ ॥
पुढती तो साठसहस्र मुनींसी । पढवी यथाविधि सकळ वेद ॥५॥
ऐसें मुनि करी स्वधर्मरक्षण । सारस्वतस्थान पाही राम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वृद्धकन्यातीर्थे । पाही वीरश्रेष्ठ बळराम ॥ ७ ॥

अध्याय ५२ वा १७९

गर्ग नामें कोणी तपस्वी विख्यात । तयासी मानसकन्या एक ॥१॥
पाहूनि तियेसी संतोपला मुनि । स्वदेहा त्यजूनि गेला स्वर्गीं ॥२॥
उग्र तपश्चर्या करी भाग्यवती । अनुरूप पती न मिळे तिज ॥ ३ ॥
विजन वनांत करी घोर तप । क्षीण त वार्धक्य येतां होई ॥ ४ ॥
देहत्याग तदा कराया सज्जली । नारद त्यावेळीं वदले तिज ॥ ५ ॥
संस्कारविहीने, तुज न सद्गति । ऐसें देवलोकीं वदले देव ॥ ६ ॥
ऐकूनि ते वृद्धा बोलली मुनींसी । वरी जो तयासी अर्धपुण्य ॥७॥
वासुदेव म्हणे ऐकूनि गालवि । आदरें स्वीकारी वृद्धेप्रति ॥ ८ ॥

१८०

एक रात्रीचि एकत्र । करूनि वास्तव्यसंकल्प ॥ १ ॥
केला तयांनीं विवाह । वृद्धा पावली सौंदर्य ॥ २ ॥
सुखवूनि पतीलागीं । द्वितीयदिनीं जाई स्वर्गीं ॥ ३ ॥
तया तीर्थी एक दिन । वसतां ब्रह्मचर्यपुण्य ॥ ४ ॥
पुत्र गालवाचा स्वर्ग । गांठी तिच्या मागोमाग ॥ ५ ॥
करी तीर्थाचें त्या स्नान । परम हर्षें बळिराम ॥ ६ ॥
शल्यवधाचा वृत्तांत । कळला तयालागीं तेथ ॥ ७ ॥
वासुदेव कथी जाण । कुरुक्षेत्राचें महिमान ॥ ८ ॥

अध्याय ५३ वा १८१

समंतपंचक उत्तर ते वेदी । स्वामी प्रजाप्रति तयास्थाना ॥ १ ॥
वरद देवांनीं केलें महासत्र । नांगरी वरिष्ठ कुरुराजा ॥ २ ॥
क्षेत्रीं या मरण येतां लाभो स्वर्ग । हेतु हा मनांत कुरुराजाच्या ॥
उपहास करी ऐकूनियां इंद्र । कुरु वारंवार नांगरीचि ॥ ४ ॥

अंतीं वर देई इंद्र तयाप्रति । सावध जे अंतीं उपोषित ॥ ५ ॥
अथवा रणांत मरती जे येथें । निश्चयें तयांतें स्वर्गलाभ ॥ ६ ॥
वास्तव्य जयांचें या पुण्यक्षेत्रासी । यमलोकप्राप्ति नसे तयां ॥ ७ ॥
रजःकणही ते पावन एथींचे । कथिती रामातें मुनि ऐसें ॥ ८ ॥
तुरंतुकेंसी हें अरंतुक तेंवी । मकृकही पाहीं रामह्रद ॥ ९ ॥
कुरुक्षेत्राची हे मर्यादा जाणावी । अन्यक्षेत्र नाहीं श्रेष्ठ ऐसें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे बळिरामाप्रति । ऋषि निवेदिती महिमा ऐसा ॥ ११ ॥

अध्याय ५४ वा १८२

करुक्षेत्रीं करूनि दानें । राम पाही अन्यस्थानें ॥ १ ॥
येई एक्या आश्रमासी । जेथें रम्य वनराजी ॥ २ ॥
वट, पिप्पल, पनस । मधुनि मधूनि बिल्ववृक्ष ॥ ३ ॥
राम म्हणे या आश्रमीं । वसतो कोण पुण्य मुनि ॥ ४ ॥
मुनि बोलले तयासी । तपोभूमी हे विष्णूची ॥ ५ ॥
यज्ञ सकल तयाचे । रामा, जाहले या एथें ॥ ६ ॥
ब्रह्मचारिणी श्रीमाति । कन्या मुनि शांडिल्याची ॥ ७ ॥
आचरूनि घोर तप । एथ जाहली स्वर्गस्थ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राम । अभिनंदी पुण्यस्थान ॥ ९ ॥

१८३

प्लक्ष प्रस्रवणतीर्थासी जाऊनि । कारपववनीं पुढती गेला ॥ १ ॥
दर्पणासमान निर्मल उदक । बर्फासम शीत तयास्थानीं ॥ २ ॥
स्नान, दान, तर्पणादि पुण्यक्रिया । करूनि त्या ठायी रजनी कंठी ॥
मित्रावरुणांचें पुढती पाही स्थान । सत्कथाश्रवण राम करी ॥ ५ ॥
इतुक्यांत तेथें नारद पातले । शिरोभागीं रुळे जटाभार ॥ ५ ॥
दंड-कमंडलु शोभे सुवर्णाचा । विप्र देवपूजा करिती ज्याची ॥ ६ ॥
कलहप्रिय जो संगीतप्रवीण । वीणा मनोरम नाद करी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बळिराम प्रेमें । पूजी आदरानें नारदांसी ॥ ८ ॥

१८४

पुढती रामानें कौरवांचें वृत्त । पुशिलें समस्त तयांप्रति ॥ १ ॥

मुनि म्हणे रामा, गेले भीष्म, द्रोण । जयद्रथ, कर्ण तेही गेले ॥ २ ॥
कृप, कृतवर्मा, तैंवी अश्वत्थामा । वीर अवघे रामा, उरले तीन ॥ ३ ॥
तेही पलायन करूनियां गेले । खिन्न मन झालें नृपाळाचें ॥ ४ ॥
द्वैपायन-ह्रद स्तंभित करूनि । शयन त्या स्थानीं केलें तेणें ॥ ५ ॥
कठोर भाषणें तयासी धर्मानें । उद्युक्तचि केलें युद्धालागीं ॥ ६ ॥
इच्छिसी तरी तूं रामा, जाईं तेथें । अवलोकीं त्यांचें युद्ध घोर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तें राम । द्विजांचें पूजन करी प्रेमें ॥ ८ ॥

१८५

धाडिले सेवक अवघे द्वारकेसी । अनुज्ञा द्विजांसी दिधली रामें ॥
गिरीवरूनि त्या उतरला खालीं । आनंदें स्ताविली सरस्वती ॥ २ ॥
सरस्वतीतीर निवासासमान । आनंदित मन नसे कोठें ॥ ३ ॥
स्मरतील गुण स्वर्गींही येथींचे । पुण्यतीर्थ ऐसें हेंचि जगीं ॥ ४ ॥
सरस्वतीतीरीं घडतां निवास । इह-पर सौख्य सकलां लाभे ॥ ५ ॥
दुःख, शोक, सर्व विलयासी जाई । सुखदाई होई सकलां हेचि ॥
स्तवूनियां ऐसें अश्व जोडी राम । वेगें युद्धस्थान गांठीतसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पातला त्या स्थानीं । जेथें गदापाणी वीर दोघे ॥ ८ ॥

## अध्याय ५५ वा

१८६

वैशंपायनासी बोले जनमेजय । पुढती वृत्त काय घडलें सांगा ॥ १ ॥
मुनि म्हणे राया, धृतराष्ट्र संजया । पुशितां हें तया वदला सूत ॥
राया, युधिष्ठिरें सन्मानितां धर्मा । राम पुण्यस्थाना जाऊं म्हणे ॥
समंतपंचकीं लढतां निधन । पावे, तया स्थान स्वर्गामाजी ॥ ४ ॥
ऐकूनियां धर्म तथेति म्हणोनि । जाई तयास्थानीं आनंदानें ॥ ५ ॥
स्कंधावरी गदा टाकूनि डौलानें । केलें दुर्योधनें गमन सौख्यें ॥ ६ ॥
साधु साधु ऐसें बोललें तें देव । पाहूनि निर्भय गमन त्याचें ॥ ७ ॥
पुढती युद्धार्थ नृप इच्छेसम । 'स्वयनतीर्थस्थान' योजियेलें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे गरुडासमान । गदापाणी भीम शोभे तदा ॥ ९ ॥

१८७

कवचधारी वीर दोघे । शिरस्त्राणही विराजे ॥ १ ॥
चंद्रसूर्यासम श्रेष्ठ । गजेंद्रचि कीं उन्मत्त ॥ २ ॥

अवलोकिती एकमेकां । क्रोधें वटारूनि नेत्रां ॥ ३ ॥
क्रुद्ध दोघेही विक्रमी । इंद्र यमचि त्या स्थानीं ॥ ४ ॥
बळिभद्राचे ते शिष्य । गदायुद्धांत निष्णात ॥ ५ ॥
वासुदेव बलराम । अथवा कुबेर वरुण ॥ ६ ॥
सुंद कीं ते उपसुंद । भासताती मधु-कैटभ ॥ ७ ॥
वालि-सुग्रीव शोभती । अथवा राम-रावणचि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे काल- । मृत्युसम ते प्रबल ॥ ९ ॥

१८८

प्रक्षुब्ध ते व्याघ्रासम वीर दोघे । मेघ गर्जनेतें करिती क्रोधें ॥
उन्मत्त गजेंद्र विषारी कीं व्याळ । क्रोधावेशें लाल मंगळचि ॥ २ ॥
प्रक्षुब्ध सागर सिंहचि कीं दोन । अंगावरी कोण जाई त्यांच्या ॥
गिरीवरी गिरी अग्नीचि कीं दोघे । कांपताती क्रोधें ओष्ठ त्यांचे ॥४॥
अश्व, गज किंवा वृषभ गर्जूनि । भिडले जाऊनि एकमेकां ॥ ५ ॥
दुर्योधन दर्पें बोलला धर्मासी । बैसूनि युद्धासी अवलोकावें ॥ ६ ॥
नीलवस्त्रधारी तदा बळिराम । शोभवितो स्थान मध्यभागीं ॥७॥
वासुदेव म्हणे वाणी-गदाघातें । परस्परां दोघे ताडिताती ॥ ८ ॥

अध्याय ५६ वा

१८९

धृतराष्ट्र म्हणे ऐसा परिणाम । व्यर्थ जनीं जाण मानव्य तें ॥ १ ॥
अकरा अक्षौहिणी सैन्याचा जो स्वामी । सार्वभौम जनीं जगात राजा
स्कंधावरी गदा टाकूनि तो गेला । पादचारी झाला हाय दैव ॥३॥
सूत म्हणे दुर्योधन मेघस्वन । गर्जूनि आव्हान देई भीमा ॥ ४ ॥
तयावेळीं वृष्टि जाहली धूळीची । उल्कापात होती भूमी कांपे ॥५॥
बहुतचि ऐसीं जाहलीं दुश्चिन्हें । तदा भीमसेनें कथिलें धर्मा ॥६॥
राया, हा असमर्थ मजसी लढाया । कुलकलंका या वधीन मी ॥
तुझ्या हृदयींचें उपटीन शल्य । मम क्रोधानळ जाळील या ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे महाक्रोधी भीम । अपराधस्मरण करीतसे ॥ ९ ॥

१९०

हस्तिनापुरांत आतां हा जिवंत । जाणार नाहींच महाराजा ॥ १ ॥
आजवरी दुःखें दिधलीं आम्हांसी । फेड न तयांची केली कदा ॥

आमुचेंचि ऋण बहु आम्हांवरी । मुक्तता योजिली आजि त्याची ॥
माता-पितरांचें दर्शन दुष्टासी । घडेल हें ऐसी आशा नको ॥ ४ ॥
सौख्य, स्त्रीदर्शन खळास्मी न घडे । होतील उघडे अंधनेत्र ॥ ५ ॥
बोलूनियां ऐसें सज्ज वृकोदर । वदे दुष्टा, स्मर दुष्कर्में तीं ॥ ६ ॥
वस्त्रहरण, तीं वनांतील दुःखें । अज्ञातवासाचें प्रायश्चित्त ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे रायाचें दुष्कर्म । आठवूनि भीम स्मरण देई ॥ ८ ॥

१९१

गवसलासी तूं नष्टा, बरा हातीं । हानि क्षत्रियांची तुझ्या योगें ॥१॥
भीष्म, द्रोण, कर्ण, शल्यही निमाला । शकुनि सांपडला महादुष्ट ॥२॥
नराधमा, दुःशासनाच्या मागूनि । यमाच्या सदनीं तूंचि जाई ॥३॥
ऐकूनि तें क्रोधें वदे दुर्योधन । अद्य मी हरीन दर्प तुझा ॥ ४ ॥
क्षुद्रा, तुझ्या नादें भिऊनि जाईल । ऐसा हा नृपाळ समजूं नको ॥
देवप्राप्तविद्या दावावी तुजसी । दीर्घकाळ हेचि इच्छा मम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गर्जूनियां राव । बोलला निर्भयवचन ऐका ॥ ७ ॥

१९२

भीमा, इच्छिसी जें तूंही । पावलासी अद्य पाहीं ॥ १ ॥
दुर्मते, ही आत्मश्लाघा । व्यर्थ न करीं प्रलापां ॥ २ ॥
वेळ वायां न घालवीं । निजप्रताप दाखवीं ॥ ३ ॥
ऐकूनियां त्याची वाणी । स्तविलें रायासी सर्वांनीं ॥ ४ ॥
स्तवनें रायासी स्फुरण । उल्लसित रोमरोम ॥ ५ ॥
वाजवूनि करतालिका । चेव आणिताती नृपा ॥ ६ ॥
इतुक्यांत भीमसेन । गेला सक्रोध धांवून ॥ ७ ॥
अश्व, गज, तैं गर्जती । शस्त्रें वीरांचीं झळकती ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । अवलोकिती युद्ध घोर ॥ ९ ॥

अध्याय ५७ वा

१९३

महामानी दुर्योधन । अडवी भीमासी गर्जून ॥ १ ॥
परिपुष्ट जैं वृषभ । तैसे करिती घोर युद्ध ॥ २ ॥
महाभयंकर ध्वनि । करिती वीर ते गर्जूनि ॥ ३ ॥

नखशिखांत रुधिर । फुलले पलाश तरुवर ॥ ४ ॥
विस्फुलिंग गदाघातें । उठती नभीं काजवेसे ॥ ५ ॥
हातघाईचें तें युद्ध । लढतां लढतां होती शांत ॥ ६ ॥
एक मुहूर्त विसावा । घेती, नवल वासुदेवा ॥ ७ ॥

१९४

स्फूर्तिलाभ होतां गदा उचलोनि । प्रक्षुब्ध होऊनि लढती वीर ॥१॥
मत्त करिणीस्तव उन्मत्ताचि गज । झुंजताती भास सकलां ऐसा ॥
देवगंधर्वादि सकल विस्मित । फिरवी यमदंड म्हणती भीम ॥३॥
मुहूर्तपर्यंत नाद तो तुंबळ । भीमाचें कौशल्य थक्क करी ॥ ४ ॥
संरक्षणदक्ष ताडिती अन्यासी । भक्ष्यार्थ झुंजती मार्जार कीं ॥ ५ ॥
गदाफेंक, तैंवी पवित्रे विविध । उड्डाणें विचित्र करिती शौर्यें ॥ ६ ॥
सराईत वीर बलिष्ठचि दोघे । वाम-सव्य मार्गें गिरक्या घेती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीमकुक्षीवरी । दुर्योधन मारी गदा क्रोधें ॥ ८ ॥

१९५

दुर्लक्ष करूनि गदा गरगर । फिरवी वृकोदर महाबळी ॥ १ ॥
दुर्योधनही तैं फिरवी गदेसी । नाद त्या स्थळासी घुमला बहु ॥२॥
भीमाच्या वेगानें धूम्रयुक्त ज्वाला । पाहूनि सकळां नवल वाटे ॥
दुर्योधनही तैं वाढवूनि वेग । भीमावरी झेंप घेई क्रोधें ॥ ४ ॥
दंतयुद्ध जैंवी करिती मत्त गज । रुधिरें सर्वांग भिजूनि जाई ॥ ५ ॥
इतुक्यांत भीममस्तकीं रायानें । ताडिली क्रोधानें महागदा ॥ ६ ॥
ग्रीवाही भीमाची वांकली न परी । विस्मय अंतरीं प्रेक्षकांच्या ॥७॥
वासुदेव म्हणे ताडितां भीमानें । रावही लीलेनें वार झेली ॥ ८ ॥

१९६

चुकविती एकमेकांचे प्रहार । दुर्योधन घोरकर्म करी ॥ १ ॥
भीमवक्षस्थळीं केला गदाघात । भांबावलें चित्त भीमाचेंही ॥ २ ॥
पाहूनि तें धाक वाटे सैनिकांसी । आघातें भीमाची दुरवस्था ॥ ३॥
परी कुक्षीवरी करितां ताडन । धृतराष्ट्रनंदन गुढघे टेंकी ॥ ४ ॥
पाहूनियां हास्य करिती सृंजय । पुनरपि वीर ताडी भीम ॥ ५ ॥
फोडूनि मस्तक भिजवी रुधिरानें । लोळविलें भीमें नृपाळासी ॥

वासुदेव म्हणे कवच भग्न झालें । वीर तें हांसले परमानंदें ॥ ७ ॥

१९७

महामानी दुर्योधन । कैसा साही हा अपमान ॥ १ ॥
नित्य बहुमान ज्याचा । होई, विक्रमही तैसा ॥ २ ॥
अपमानें क्रुद्ध झाला । भीमावरी घाली घाला ॥ ३ ॥
केला असह्याचि वार । विव्हल तें वृकोदर ॥ ४ ॥
कोसळला गिरीसम । उसळे राव तें गर्जून ॥ ५ ॥
झाला भीमकवचभेद । वीर पडला मूर्छित ॥ ६ ॥
पुष्पवृष्टि रायावरी । देव संतुष्ट अंतरीं ॥ ७ ॥
भयविव्हल पांडव । उठला तोंचि वृकोदर ॥ ८ ॥
रुधिर पुसोनि वदनींचें । वटारिले नेत्र क्रोधें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वीर । आतां प्रक्षुब्धसागर ॥ १० ॥

अध्याय ५८ वा

१९८

सूत म्हणे राया, पार्थ श्रीकृष्णासी । बोले या वीरांची तुलना करीं ॥
श्रेष्ठ कोण गुण अधिक कोणाचे । कथावे कोण ते देवा मज ॥ २ ॥
कृष्ण म्हणे पार्था, गदायुद्धज्ञान । उभयां समान ध्यानीं असो ॥ ३ ॥
भीमवधास्तव रायाचा अभ्यास । वीर सराईत जाणें तया ॥ ४ ॥
तयाहूनि बळ श्रेष्ठ भीमसेना । नसे धर्मरणा विजय यासी ॥ ५ ॥
मर्यादा सोडूनि अंकभेद जरी । करील हा तरी कार्य साधे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कपटासी कपट । विजयाचा स्पष्ट मार्ग जनीं ॥ ७ ॥

१९९

पार्था, प्रतिज्ञा भीमाची । गदा फोडील अंकासी ॥ १ ॥
तेचि व्हावी आतां पूर्ण । तरिच निजलाभ जाण ॥ २ ॥
मायिकासी धर्मयुद्ध । करितां धर्म संकटांत ॥ ३ ॥
अपराधी धर्मराज । सर्व यत्न व्यर्थ आज ॥ ४ ॥
करीं लाभतां विजय । धर्मामुळें हा संशय ॥ ५ ॥
संधि दुर्योधनाप्रति । दिधली, धर्मा हे दुर्बुद्धि ॥ ६ ॥
बदला जिंकितां एकासी । दुर्योधना विजयी तूंचि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । बदला ऐका नीतिपुर्ण ॥ ८ ॥

२००

दुर्योधनवीर निपुण अभ्यासी। उदार तो आजी जिवावरी ॥१॥
शुक्रकथित हे नीति घेई ध्यानीं। अल्पही उलटूनि येतां सैन्य ॥२॥
निराश ते सर्व सोडूनियां आशा। वरिती युद्धाचा मार्ग अंतीं ॥३॥
मारूं किंवा मरूं हेंचि ब्रीद त्यांचें। अजिंक्य बहुतां, ते अल्पसंख्य
पाहीं दुर्योधन तैसा हा निराश। हिरूनियां राज्य घेई वाट ॥५॥
हर हर आतां अन्यायावांचूनि। अन्यमार्ग जनीं नुरला भीमा ॥६॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तें पार्थ। मारूनिया थाप अंक दावी ॥७॥

२०१

चाणाक्ष भीमानें तदा जाणिला संकेत ॥
मंडलें यमकें करी युद्ध अलौकिक ॥१॥
गरुडासमान घेती गिरक्या त वीर ॥
उसळती वायुवेगें जैसे कीं सागर ॥२॥
गदेवरी गदा त्यांची आदळतां नाद ॥
विसावा घेऊनि घेता झेंपेवरी झेंप ॥३॥
वार झेलिती चुकविती गर्जतांतां क्रोधें ॥
भीममस्तक वेधिलें क्रोधें कौरवेंद्रें ॥४॥
सांवरूनियां तें मूर्छा स्वस्थ राही भीम ॥
वासुदेव म्हणे दैवें वांचे तदा प्राण ॥५॥

२०२

कळली नाहीं दुर्योधना। भीमसेनाची मूर्छना ॥१॥
कांहीं डाव करी ऐसा। भास नृपाळाच्या चित्ता ॥२॥
एक मुहूर्त विश्रांति। भिडले क्रोधानें पुनरपि ॥३॥
भीम धावतां सन्निध। करी उड्डाण नरेंद्र ॥४॥
मारी भीम वेगें उडी। राव देई त्या झुकांडी ॥५॥
ऐसें पाहूनियां भीम। चवताळला जेंवी यम ॥६॥
नृपें मारितांचि उडी। भीम त्याचा अंक फोडी ॥७॥
गर्जूनियां नरव्याघ्र। पडला भूमीवरी शीघ्र ॥८॥
वासुदेव म्हणे काल। देई योग्यवेळीं फळ ॥९॥

२०३

सुंदर ऊरूंचा होऊनियां भंग । पडलें सर्वांग भूमीवरी ॥ १ ॥
निर्घातकारक वाहती तें वारे । प्रकंपित झालें भूमंडल ॥ २ ॥
धूलिवृष्टि उल्कापात तैं जाहला । देवेंद्र वर्षला शोणितासी ॥ ३ ॥
अश्वगजादिक करिती आक्रंदन । शंख भेरीस्वन गगन व्यापी ॥ ४ ॥
विक्राळ कवंधें नाचती सर्वत्र । शस्त्रधारी वीर तेही भ्याले ॥ ५ ॥
जलाशयांतूनि उसळे रुधिर । सरिताप्रवाह वेगें वाढे । ६ ॥
पुरुष त्या स्त्रिया, स्त्रिया ते पुरुष । होई विपरीत तयावेळीं ॥ ७ ॥
अद्भुत उत्पात पाहूनि उद्विग्न । पांडवांचें मन होई बहु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रशंसित वीरां । गेले निजस्थळा देवादिक ॥ ९ ॥

अध्याय ५९ वा

२०४

भूमीवरी शालवृक्ष तो पाहूनि । प्रहर्षित मनीं पांडवादि ॥ १ ॥
सन्निध जाऊनि बोलला तैं भीम । आठवीं आपण मंदा, आतां ॥२॥
'गाय रे गाय' ते शब्द आणीं ध्यानीं । दुष्टा तदा कोणीं हास्य केलें
बोलूनियां क्रोधें वामपादलत्ता । मस्तकीं रायाच्या ताडियेली ॥४॥
लोळविलें शिर प्रहारें लत्तेच्या । म्हणे आम्हीं आतां म्हणतों तेंचि
'गाय गाय' ऐसें बोलूनियां नृत्य । केलें, तेंचि हर्षे पाहोत हा ॥
द्यूतादि कपटमार्गाविण आम्हीं । पराक्रमें रणीं विजया झालों ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीम सावकाश । बोलूनियां हास्य करी तदा ॥ ८ ॥

२०५

बोले हांसूनि सर्वांसी । छळिलें जयांनीं साध्वीसी ॥ १ ॥
पांडवांनीं वध त्यांचा । केला आजि अवलोका ॥ २ ॥
वदले आम्हां षंढ तीळ । वधिलें तयां सपरिवार ॥ ३ ॥
स्वर्ग, नरक वा आतां । भोगूं सुखेंचि तत्वतां ॥ ४ ॥
बोलूनियां हिसडी गदा । तुडवी रायाच्या मस्तका ॥ ५ ॥
कटुशब्दें ताडी त्यासी । राया, भीम क्षुद्रबुद्धि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाते । प्रशंसिती न भीमातें ॥ ७ ॥

२०६

भीमाचें तें कर्म पाहूनियां धर्म । बोलला उठून पुरे आतां ॥ १ ॥
शुभ वा अशुभ कर्में हेतु पूर्ण-। केलासी, विराम पावें भीमा ॥ २ ॥
गदाघातें शिर मर्दूं नको याचें । कृत्य अधर्माचें ठरेल हें ॥ ३ ॥
नृपाळ असूनि बांधव हा आम्हां । ऐसी विटंबना योग्य नसे ॥ ४ ॥
एकादशचमूपति हा नरेंद्र । झाला निराधार बंधु तुझा ॥ ५ ॥
पुत्र मित्र बंधु पडले रणांगणीं । विकलांग रणीं पडला भ्राता ॥ ६ ॥
तयाचा अवमान करूं नको भीमा । बोलती धर्मात्मा तुजसी शांत ॥
वासुदेव म्हणे बोलता हें धर्म । गेला गहिंवरून पुण्यवंत ॥ ८ ॥

२०७

सद्गदितकंठें दुर्योधनाप्रति । बोले क्रोध चित्तीं आणूं नको ॥ १ ॥
दूषणही स्वयें न लावीं आपणा । न टळेची कोणा दैव जनां ॥ २ ॥
ब्रह्मयानेंचि भालप्रदेशीं लिहिलें । वैरही आपुलें दुर्योधना ॥ ३ ॥
लोभ, बालिशत्व, तैसाचि उन्माद । नृपाळा, हा तुज नडला आजी ॥
वध सकलांचा करवूनि अंतीं । पतन पावसी नृपाळा, तूं ॥ ५ ॥
आपराधें तुझ्या प्राप्त हें आम्हांसी । जाहलें आमुचि नसतां इच्छा ॥
उपाय न आतां दोष आपणासी । अथवा अन्यासी लावूं नको ॥ ७ ॥
वीरमरण हें जाणावें सुदैव । कथी वासुदेव धर्मवच ॥ ८ ॥

२०८

शोचनीय दुर्योधना । निश्चयेंसी जाण आम्हां ॥ १ ॥
तुम्हां बांधवांवांचून । आम्हां वाटे सर्व शून्य ॥ २ ॥
पुत्र-बांधवविहिना । विधवा करितील रूदना ॥ ३ ॥
दावूं कैसें त्यां वदन । दुर्योधना, तूंचि धन्य ॥ ४ ॥
पावसील मान स्वर्गीं । आम्हां दुःखचि या जगीं ॥ ५ ॥
स्नुषा, प्रस्नुषा, वैधव्यें । निंदितील आम्हां खेदें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । ऐसा होई दुःखमग्न ॥ ७ ॥

अध्याय ६० वा

२०९

राव म्हणे गदायुद्धशास्त्रवेत्ता । बळिराम तदा वदला काय ॥ १ ॥
सूत म्हणे राया, लत्तेचें ताडन । पाहूनियां राम वदला क्रोधें ॥ २ ॥

धिक्कार धिक्कार असो या भीमासी । नाभिअधोभागीं ताडन हें ॥
आजवरी ऐसें दुष्कर्म न कोणीं । आचरिलें जनीं गदायुद्धीं ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें क्रोधाकुल राम । गयासी पाहून वदला कृष्णा ॥५॥
मजसम योद्धा वीर हा पतन । पावला न, जाण असतां आम्हीं ॥
आश्रित दौर्बल्यें आश्रयाची निंदा । निवारण आतां करणें प्राप्त ॥
वासुदेव म्हणे बोलूनि हलधर । उचलूनि नांगर धांवे वेगें ॥ ८ ॥

२१०

श्वेतपर्वत तो भीमावरी धांवे । धरिलें केशवें पुष्ट करें ॥ १ ॥
गौर, शामवर्ण, चंद्र-सूर्यासम । होता अस्तमान पौर्णिमेसी ॥ २ ॥
सांत्वनार्थ कृष्ण बोलला रामासी । षट्प्रकारवृद्धि जनांमाजी ॥
आत्मवृद्धि तैंवी मित्रवृद्धि पाहीं । मित्रमित्रोदयीं स्ववृद्धिचि ॥ ४ ॥
आत्मशत्रु-मित्र-शत्रु तैशापरी । मित्रमित्र-अरिनाशें वृद्धि ॥ ५ ॥
विपरीत याच्या होतां उद्विग्नता । सहजचि चित्ता बंधुराया ॥ ६ ॥
परी तसें आजि नसेचि बा कांहीं । बंधो, शांत होईं सद्विचारें ॥७॥
वासुदेव म्हणे बुद्धीचा सागर । बोले यादवेंद्र बळिरामासी ॥ ८ ॥

२११

शुद्धपौरुष हे सहज मित्र आम्हां । आप्तांसी यातना दिधल्या बहु ॥
यास्तव प्रतिज्ञापालन हा धर्म । मानितां मी जाण क्षत्रियांचा ॥२॥
दुर्योधनअंक फोडीन हा पण । भीमसेनें पूर्ण केला आजी ॥ ३ ॥
रायासी तैसाचि मैत्रेयाचा शाप । यास्तव न दोष भीमाप्रति ॥ ४ ॥
जाणूनि हें कोप प्रलंबमर्दना । न करीं आणीं मना आप्तभाव ॥ ५ ॥
शालक तैं मित्र उत्कर्षें तयांच्या । उत्कर्ष आपुला ध्यानीं घेईं ॥६॥
वासुदेव म्हणे कृष्ण यदुनाथ । हलधरा शांत करूं पाहे ॥ ७ ॥

२१२

धर्मज्ञ, सक्रोध बोले तदा राम । सद्धर्माचरण करितो संत ॥ १ ॥
अर्थकामें धर्म होतसे सदोष । अतिलोभें अर्थ दोष पावे ॥ २ ॥
अतिप्रसंगें तो कामही सदोष । एकत्र समस्त सौख्य देती ॥ ३ ॥
धर्ममर्यादा ते उल्लंघिली भीमें । व्यर्थ समर्थनें काय लाभ ॥ ४ ॥
कृष्ण म्हणे आतां कलियुग प्राप्त । प्रतिज्ञा ध्यानांत तैंवी घेईं ॥ ५ ॥

कालोचित कर्म जाणोनि भीमाचें । न करीं क्रोधातें बंधुश्रेष्ठा ॥ ६ ॥
प्रतिज्ञा भीमाची पूर्ण आजि होवो । हेतु सिद्धि पावो भीमसेन ॥७॥
वासुदेव म्हणे कृष्णमुखें ऐसा । धर्मच्छल कैसा रुचे रामा ॥ ८ ॥

२१३

गर्जूनि तैं राम बोलला सभेंत । होईल जगांत भीमनिंदा ॥ १ ॥
दुर्योधनालागीं लाभेल सद्गति । रणयज्ञामाजी हवन याचें ॥ २ ॥
कीर्तिअवभृथस्नान या जाहलें । बोलूनि सोडिलें स्थान रामें ॥ ३ ॥
द्वारकेसी जातां दुःख सकळांसी । धर्म अधोमुखी, दीन, दुःखी ॥
कृष्ण म्हणे धर्मा, निश्चेष्ट रायासी । ताडितां लत्तसी साहिलें कां ॥
धर्म म्हणे कृष्णा, अनावार क्रोधें । कृत्य तें भीमाचें घडलें वाटे ॥
असंख्य यातना स्मरूनि तयाच्या । जाहली उपेक्षा देवा, ऐसी ॥७॥
दुष्ट, कामी, लोभी दुर्योधनवधें । पुण्य पाप वा जें होवो नेंचि ॥८॥
वासुदेव म्हणे धर्मवचें कृष्ण । कष्टें अनुमोदन तया देई ॥ ९ ॥

२१४

राया, दुर्योधनवधें प्रफुल्लित भीम ॥
विजयलाभाचा तया मनीं अभिमान ॥ १ ॥
येऊनि पुढती कर जोडूनि धर्मासी ।
म्हणे निष्कंटक राया भोगीं अवनीसी ॥ २ ॥
राज्य चालवूनि करीं धर्माचें पालन ॥
वैराग्निजनक मेला दुष्ट दुर्योधन ॥ ३ ॥
दुःशासनादि बांधव शकुनि तैं कर्ण ॥
निमाले हे रत्नभूमी तुझीच कीं जाण ॥ ४ ॥
धर्म म्हणे कृष्णमतें वागूनियां भीमा ॥
द्रौपदी-कुंतीच्या आजी पाळिलें वचना ॥ ५ ॥
ऋणमुक्त जाहलासी पावलों विजय ॥
दुष्ट निर्दळनें हृष्ट होई वासुदेव ॥ ६ ॥

अध्याय ६१ वा

२१५

राव म्हणे सूता, पुढती काय झालें । संजय तैं बोले नृपाळासी ॥
दुर्योधनवधें हर्ष सकळांसी । वस्त्रें फडकाविती किती एक ॥ २ ॥

हालविती चापें ओढिती प्रत्यंचा। शंख भेरिनाद करिती कोणी॥
हांसती नाचती भीमासी स्तविती। म्हणती ठेंचिलेंसी भाग्यें दुष्टा
सिंह महिषांचें रुधिर जें प्राशी। तैसी लाभे गति दुःशासना॥ ५॥
वृत्रवधें इंद्रा स्तविती जें देव। तैसे रणीं सर्व स्तविती भीमा॥ ६॥
वासुदेव म्हणे दुर्योधनाप्रति। क्रोधें निंदिताती सकळ लोक॥ ७॥

२१६

कृष्ण म्हणे कां रे मृतासी मारितां। निर्लज्जा, पातक्या, लोभग्रस्ता
उल्लंघिला जेणें थोरांचा उपदेश। पांडवांचें राज्य हरिलें दुष्टें॥ २॥
दुष्कर्में त्या मूढ पडला काष्ठासम। लाभ न बोलून आतां तया॥
नृपाळ हो मेला सपरिवार दुष्ट। भाग्यचि हें स्पष्ट चला आतां॥
वासुदेव म्हणे कृष्णाची ते वाणी। संतापवि आणी दुर्योधना॥

२१७

अवहेलना ऐकूनि। उठला राव जळफळूनि॥ १॥
जानूवरी घेई भार। टेंकी भूवरी कमर॥ २॥
उचलूनि निजग्रीवा। क्रोधें चढवी तो भिंवया॥ ३॥
छिन्नपुच्छ जैंवी सर्प। दिसलें तदा त्याचें रूप॥ ४॥
प्राणान्तिक त्या वेदना। विसरूनि बोले कृष्णा॥ ५॥
कंसदासाचिया पोरा। अंकीं प्रहार करविला॥ ६॥
बोलूनियां पार्थाप्रति। दिधली भीमालागीं स्मृति॥ ७॥
कुटिलमार्गें भीष्म-द्रोणां। वधिलें तूंचि रे दुर्जना॥ ८॥
वासुदेव म्हणे स्मृति। देई राव श्रीकृष्णासी॥ ९॥

२१८

वासवी ते शक्ति घालविली व्यर्थ। भूरिश्रवा श्रेष्ठ वधिला कैंवी॥१॥
पन्नगपतीचा घेवूनियां प्राण। संकटांत कर्ण वधिला त्वांचि॥ २॥
धर्मयुद्ध जरी करितासी रणीं। जिंकिता या जनीं कोण आम्हां॥
अनार्यकृतीनें आम्हां धर्मनिष्ठां। वधिलेंसी पापिष्ठा, लाज धरीं॥
वासुदेव म्हणे क्रोधें दुर्योधन। बोलतां वचन वदला कृष्ण॥ ५॥

२१९

गांधारीच्या पुत्रा, पापमार्गरता। दुष्कर्में आप्तेष्टां वधिलेंसी त्वां॥

जाहला ज्यावेळीं द्रौपदीचा छळ। वधास्री ते वेळ योग्य होती ॥२॥
विषान्नापासूनि अभिमन्युवध। आठवीं एकेक दुष्ट कर्म ॥ ३ ॥
अकार्य जें झालीं आमुचिया हस्तें। कारण तयाचें तूचि नीचा ॥
शुक्र बृहस्पति तैंवी वृद्ध ज्ञाते। कथितां सकलांतें अवमानिलें ॥५॥
तृष्णा-लोभग्रस्त होऊनि जीं कृत्यें। केलींस तयांचें फल भोगीं ॥
वासुदेव म्हणे पापकर्मस्मृति। देई रायाप्रति यादवेंद्र ॥ ७ ॥

२२०

राव म्हणे केलें अध्ययन दान। पृथ्वीचें पालन परमन्यायें ॥ १ ॥
अमित्रां मस्तकीं ताडिलें उत्तेनें। मेला या मरणें कोण सांगे ॥ २ ॥
देवयोग्य तेंचि ऐश्वर्य भोगिलें। मरण लाभलें वीर योग्य ॥ ३ ॥
सहपरिवार जाईन स्वर्गांत। वसावें रडत तुम्हीं येथें ॥ ४ ॥
पुष्पवृष्टि तदा होई राजावरी। स्वर्गीं मनोहारी वाद्यनाद ॥ ५ ॥
सिद्धही बोलती हर्षें साधु साधु। सुगंधित वायुझुळुका नभीं ॥६॥
वासुदेव म्हणे लज्जित पांडव। पाहूनि प्रकार सकळही तो ॥ ७ ॥

२२१

भूरिश्रवा, द्रोण कर्ण। वधिले करूनि अधर्म ॥ १ ॥
ऐकूनियां बहु चिंता। वाटे पांडवांच्या चित्ता ॥ २ ॥
मेघदुंदुभीनिःस्वन। तदा बोले तयां कृष्ण ॥ ३ ॥
तया शीघ्रास्त्र वीरांचा। वध अशक्यचि होता ॥ ४ ॥
रणीं तुमच्या हितास्तव। केले विविध उपाय ॥ ५ ॥
कपटावीण या दुष्टांसी। वधिता कोण या त्रैलोक्यीं ॥ ६ ॥
पुरातनचि हा मार्ग। लवही मानूं नका खेद ॥ ७ ॥
याचिमार्गें वळिवंत। शत्रु जिंकावा हें शास्त्र ॥ ८ ॥
कृतकृत्य आतां तुम्हीं। चला सुखें निजस्थानीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे तदा। करिती वीर शंखनादा ॥ १० ॥

अध्याय ६२ वा

२२२

हर्षोत्फुल्ल वीर कौरवशिबिरीं। जाती तयावेळीं वाद्यनाद ॥ १ ॥
युयुत्सु, सात्यकि, जाती त्यांच्या मागें। स्वशिबिरमार्गें सात्वतादि ॥

नागहीन र्‍हद, गतोत्सव पुर । कौरव शिबिर भासे तदा ॥ ३ ॥
रंगभूमि जेंवी भासे जनशून्य । षंढ, वृद्धजन स्त्रिया तेथें ॥ ४ ॥
वंदीजन बद्धकर ते सामोरे । वीर उतरले रथाखालीं ॥ ५ ॥
कृष्ण तयावेळीं बोलला पार्थासी । चाप तूणीरेंसी उतरें खालीं ॥६॥
हितार्थ तुझिया उतरेन मागूनि । वर्ते तें ऐकूनि पार्थ तेंवी ॥ ७ ॥
सोडूनियां रश्मि पुढती यदुनाथ । उतरे, हनुमंत गुप्त होई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे जाहलें नवल । सांभाळी गोपाळ भक्तांलागीं ॥ ९ ॥

२२३

अग्निदग्ध रथ तत्काळ जाहला । अनळ त्या काळा नव्हता तेथें ॥
अश्वांसवें रथ भस्मरूप झाला । विस्मय सकळां तयावेळीं ॥ २ ॥
साष्टांग नमन करूनियां पार्थ । विनवी कैंवी रथ भस्म झाला ॥ ३॥
कृष्ण म्हणे दग्ध पूर्वींचि हा होता । परी संरक्षिता मीचि यासी ॥
कृतकार्य होतां उतरलों खालीं । दग्ध त्याचिवेळीं ब्रह्मास्त्रानें ॥५॥
मंदहास्यें कृष्ण बोलला धर्मासी । दैवें वांचलांती सकळ तुम्हीं ॥
संरक्षीन यांसी वदलों मी जें पुरा । तेंचि जनेश्वरा केलें सत्य ॥७॥
रोमहर्षण जो संहार जाहला । संकटीं वांचला त्याही पार्थ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तदा धर्मराज । हर्षप्रफुल्लित वदला कृष्णा ॥ ९ ॥

२२४

द्रोण, कर्णाचें ब्रह्मास्त्र । सह्य तुजवीण कोणास ॥ १ ॥
तुझ्या कृपेनें अच्युता । विजयलाभ आम्हां पार्था ॥ २ ॥
कृष्णा, विविध संकटें । उल्लंघिलीं त्वत्प्रसादें ॥ ३ ॥
उपप्लव्यीं द्वैपायन । वदले ‘ धर्म तेथें कृष्ण ’ ॥ ४ ॥
तेंवी कृष्ण तेथें जय । कथितो प्रेमें वासुदेव ॥ ५ ॥

२२५

पुढती शिबिरामाजी वीर । अवलोकिती भांडागार ॥ १ ॥
अलंकार सोनें, रुपें । अपारचि रत्नें मोत्यें ॥ २ ॥
उंची वस्त्रें दासदासी । विविध वस्तु त्या स्थानासी ॥ ३ ॥
पाहूनियां हर्ष वीरां । तेथ ठेविती पहारा ॥ ४ ॥
कृष्णवचनें कल्याणार्थ । गेले सरितातीरास ॥ ५ ॥

रजनी कंठिती त्या स्थानीं । स्मरती कर्तव्यासी मनीं ॥ ६ ॥
धर्म बोलला मुरारी । गांधारीतें शांत करीं ॥ ७ ॥
द्वैपायनही असतील । तुझे युक्तियुक्त बोल ॥ ८ ॥
ऐकूनि तें यदुश्रेष्ठ । बैसे सत्वरी रथांत ॥ ९ ॥
गेला गांधारी समीप । वासुदेव कथी वृत्त ॥ १० ॥

अध्याय ६३ वा २२६

जनमेजय म्हणे मुनिश्रेष्ठा कां रे । कृष्णासी धाडिलें युधिष्ठिरें ॥
शिष्टाई ते व्यर्थ जाहली कृष्णाची । यश पांडवांसी प्राप्त झालें ॥
ब्रह्मांडनायका धाडिलें ज्या अर्थी । गोष्ट महत्वाची असेल ती ॥३॥
मुनि म्हणे राया, महत्वाचें वृत्त । कथितों ध्यानांत घेई नृपा ॥ ४ ॥
गदायुद्धशास्त्र उल्लंघूनि भीमें । वधिलें क्रोधानें दुर्योधना ॥ ५ ॥
ऐकूनि हें वृत्त गांधारी प्रक्षुब्ध । होऊनियां दग्ध करिल पार्थां ॥६॥
गांधारी ते साध्वी उग्र तपस्विनी । साहील हें मनीं कैसें दुःख ॥
वासुदेव म्हणे अन्याय्य जें कर्म । भयाचें कारण जगामाजी ॥ ८ ॥

२२७

जनमेजया ऐसें चिंतूनियां धर्म । बोलला वचन कृष्णालागीं ॥ १ ॥
गोविंदा, असाध्य तेंचि झालें साध्य । केवळ प्रसाद तुझाचि हा ॥
सर्वस्वी तुझीचि कृपा हे अच्युता । आजि कृतार्थता राववधें ॥ ३ ॥
परी गांधारीचा नावरितां कोप । जातील हे व्यर्थ सकल श्रम ॥४॥
कर्ता करविता अव्यय तूं श्रेष्ठ । करीं अनुरूप बोध तिज ॥ ५ ॥
व्यासही त्यास्थानीं कृष्णा असतील । तूंचि साधिशील महत्कार्य
वासुदेव म्हणे श्रीकृष्णासी धर्म । विनवी कल्याण करीं देवा ॥७॥

२२८

धर्माच्या वचनें कृष्ण यदुनाथ । हस्तिनापुरांत गेला वेगें ॥ १ ॥
वृत्त तें नृपासी कळलें तत्काळ । पातला गोपाळ भवनीं तोंचि ॥
द्वैपायनमुनि होते तयास्थानीं । तयांसी पाहूनि हर्ष कृष्णा ॥ ३ ॥
उभयांचे पाय धरिले कृष्णानें । वंदिलें धैर्यानें गांधारीसी ॥ ४॥
पुढती नृपाचा धरूनियां हात । प्रारंभी अच्युत रूदनासी ॥ ५ ॥
दोन घटी ऐसा शोक बहु केला । अश्रुपूर आला नयनीं त्याच्या ॥

पुढती प्रक्षाळूनि नेत्र, आचमन। करूनि, भाषण करीतसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विश्वसाक्षी हरि। बोले त्यावेळीं चातुर्यानें ॥ ८ ॥

२२९

भारता, तूं वृद्ध जाणसी सकळ। काळाचे हे खेळ विदित तुज ॥१॥
आज्ञाधारक त्या वीरांनीं कुलार्थ। प्रयत्न बहुत केले राया ॥ २ ॥
बांधवांसी धर्म, ज्ञातीचा उच्छेद। न व्हावा शपथ म्हणूनि घाली ॥
पुढती कपटद्यूतोत्तर वनीं। असंख्य सोसूनि हाल यत्नें ॥ ४ ॥
अज्ञातवासही कंठिला कष्टानें। विनविलें प्रेमें तुम्हांप्रति ॥ ५ ॥
ऊणुं तयांप्रति प्रतिकारशक्ति। नव्हतीच ऐसी नम्रता ते ॥ ६ ॥
सकलांसमक्ष प्रत्यक्ष मी तुज। मागितले पंचग्राम राया ॥ ७ ॥
परी कालासम बुद्धि हा नियम। रुचलें वचन नाहीं तुज ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे लोभमूळ पाप। परिणामीं नाश वदला कृष्ण ॥ ९ ॥

२३०

राया, अनावर लोभें। वचन ऐकिलें न माझें ॥ १ ॥
वृद्धा, तुझाचि अपराध। अंतीं झाला सर्वनाश ॥ २ ॥
विदुर-भीष्म द्रोणादिक। कथूनि जाहले ते श्रांत ॥ ३ ॥
दोष तुझाही न राजा। खेळ सर्व हा काळाचा ॥ ४ ॥
सकलां मोह पाडी काळ। काय तुजसी तरी बोल ॥ ५ ॥
पांडवांचा लवही दोष। राया, नसे घे ध्यानांत ॥ ६ ॥
प्रेम-नीति-धर्मच्युति। लवही अद्यापि न त्यांची ॥ ७ ॥
जाणूनियां निज दोष। पांडवांचा न करीं द्वेष ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण। वदाल तैंचि घ्या ऐकून ॥ ९ ॥

२३१

कुल, वंश, पिंड, एकचि तयांचा। सर्वदा हें नृपा ध्यानीं असो ॥
पांडवांचे माथां तुम्हां सकलांचा। दोष आजि नृपा, प्राप्त झाला ॥
गांधारीसवेंचि तुम्हीं मोहवश। जाहलांती चित्त शुद्ध करा ॥ ३ ॥
आत्मव्यतिक्रम दोष हा जाणूनि। न करावा वृद्धांनीं शोक आतां ॥

कृपादृष्टि करा पंडुपुत्रांवरी । वृद्ध चरणांवरी नमन माझें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शांतिरूप कृष्ण । बोलला वचन योगयुक्त ॥ ६ ॥

२३२

राया, जाणसी वडिलांचें-। भक्ति-प्रेम, त्या धर्माचें ॥ १ ॥
अपकारकर्त्यातेंही । वधूनि सौख्य तया नाहीं ॥ २ ॥
रात्रंदिन त्या दुःखानें । जळतो धर्म खिन्नमनें ॥ ३ ॥
तुम्हांविषयीं तळमळ । वाटे तया निरंतर ॥ ४ ॥
भेट इच्छितो तुमची । परी लज्जा अडवी त्यासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । वदूनि बोले गांधारीतें ॥ ६ ॥

२३३

सुबलकन्ये, शुभे गांधारी वो ऐकें । सीमंतिनी नसे तुजसम ॥ १ ॥
राज्ञी, सभेमाजी समक्ष तूं माझ्या । केलासी हिताचा तनयां बोध
'धर्म तेथें जय' वदलीस तूं ऐसें । सत्यता वाक्यातें त्याचि आली
ऐकिला न तुझा बोध तो पुत्रांनीं । न करीं कल्याणी, शोक आतां ॥
क्रोधतप्त होतां जाळिसील विश्व । सौबले विवेक करीं परी ॥ ५ ॥
पांडवनाशाची बुद्धि नच येवो । उत्कर्षचि होवो कुरुवंशाचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वचन कृष्णाचें । चित्त गांधारीचें शांत करी ॥ ७ ॥

२३४

कृष्णालागीं तदा गांधारी बोलली । बुद्धि ताळ्यावरी आणिली त्वां॥
पुत्रहीन अंध वृद्धाप्रति आतां । नसे कोणी त्राता तुम्हांवीण ॥ २ ॥
आश्वासूनि तिज श्रीकृष्ण घाईनें । उठला वेगानें जावयासी ॥ ३ ॥
दुष्ट संकल्पासी द्रौणीच्या कथूनि । चरण वंदूनि आज्ञा मागे ॥ ४ ॥
ऐकूनियां दोघें वदलीं जा जा कृष्णा । पांडवरक्षणा करीं त्वरें ॥ ५॥
जातां कृष्ण, व्यास करिती सांत्वन । कृतकृत्य कृष्ण शिबिरीं येई ॥
वासुदेव म्हणे निवेदूनि वृत्त । भक्तरक्षणार्थ दक्ष राही ॥ ७ ॥

अध्याय ६४ वा

२३५

राव म्हणे सूता, अवमानतप्त । राव भग्नअंक वदला काय ॥ १ ॥
सूत म्हणे राया, घडलें तेंचि ऐकें । खंडाचि अंकाचे झाले त्याच्या॥

धूळिव्याप्त अंग आंवळितां केश। फेंकी सभोंवार दृष्टि क्रोधें ॥३॥
दिसतां मी कर चोळी भूमीवरी। दांत ओंठ चावी महाक्रोधें ॥४॥
निर्भर्त्सित धर्मा वदला मजसी। दुर्दैवें हे गति प्राप्त झाली ॥ ५ ॥
भीष्मद्रोण कर्ण अश्वत्थाम्यादिक। असतां साह्यास अवस्था हे ॥
कालाचा महिमा अगाध संजया। कथावें अन्याया असती त्यांसी॥
वासुदेव म्हणे सोडूनि निश्वास। पांडवांसी दोष देई नृप ॥ ८ ॥

२३६

राक्षसीक्रियेनें वाधिलें भीष्म-द्रोणां। हरिलें मम प्राणां त्याचिमार्गें ॥
धिक्काराचि नित्य करितील सज्जन। विजयें या प्रेम सुजनां नसे ॥
धर्मासम कोण होईल हर्षित। अन्याय असंख्य करूनि ऐसे ॥ ३ ॥
मम भग्नांकाचें मस्तक भीमानें। तुडावितां झाले जयनाद ॥ ४ ॥
याहूनि आश्चर्य अन्य काय असे। माता पितरातें शास्त्रज्ञान ॥ ५ ॥
कथावें तयांसी श्रेष्ठ मजहून। लाभलें मरण अन्य कोणा ॥ ६ ॥
भोगिलें वैभव त्रिवर्ग साधून। लाभलें मरण ऐसें कोणा ॥ ७ ॥
हीन दीन रणीं जाहलों मी नाहीं। अधमचि पाहीं वधिलें मज ॥
वासुदेव म्हणे संतप्त नृपाळ। हृदयासी पीळ पाडी शब्दें ॥ ९ ॥

२३७

संजया, जा द्रौणि कृपादिकां कथीं। अधर्मप्रवृत्ति पांडवांची ॥१॥
प्रतिज्ञेचा भंग केला, तयांवरी। विश्वास अंतरी न धरा कदा ॥२॥
पुढती नृपाळ वदे वार्तिकांसी। अधर्मे मजसी वधिलें भीमें ॥ ३ ॥
तेणें सार्थहीन अध्वगासमान। एकाकी जाईन निजमार्गें ॥ ४ ॥
थोर थोर वीर बांधव पुढती। गेले लक्ष्मणादि एकाकी मी ॥ ५ ॥
भगिनी दुःशला करील आक्रोश। मातापिता दुःखमग्न होती ॥६॥
स्नुषा-प्रस्नुषादि वृद्धांच्या भोंवती। आक्रंदतां त्यांची काय दैना ॥
परिव्राजक तो चार्वाक ऐकतां। घेईल या सूडा निश्चयेंसी ॥ ८ ॥
समंतपंचकीं पावूनि निधन। होईन मी धन्य जगामाजी ॥ ९ ॥
उद्गार नृपाचे रडविती लोकां। दैन्य पंचभूतां प्राप्त झालें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे द्रोणपुत्राप्रति। वृत्त निवेदिती दुःखें लोक ॥ ११ ॥

अध्याय ६५ वा

२३८

देवद्वारा राव हत ऐसी वार्ता । अश्वत्थाम्यादिकां कळली यदा ॥
कृप, कृतवर्मा तेवी अश्वत्थामा । पातले त्या स्थानां परमवेगें ॥२॥
वायुवेगें भग्नशालवृक्षासम । धृतराष्ट्रनंदन दिसला तयां ॥ ३ ॥
व्याधनिपातीत अथवा तो गज । वाहे रुधिरौघ अंगांतूनि ॥ ४ ॥
धुळीमाजी लोळे विवळे दुःखानें । पडला दुर्दैवानें आदित्यचि ॥५॥
महावातें शुष्क जैसा कीं सागर । अथवा पूर्णचंद्र अभ्राच्छन्न ॥
क्रूरश्वापदें तें भूतें सभोंवतीं । वटारल्या नेत्रीं भ्रुकुटी वक्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि नृपासी । गहिंवर वीरांसी अनावर ॥ ८ ॥

२३९

त्यागूनि स्यंदन जाऊनि सन्निध । बैसले सखेद भूमीवरी ॥ १ ॥
बाष्पपूर्ण क्षण, द्रोणांचा नंदन । वदला हें दारुण दृश्य राया ॥ २ ।
अक्षौहिणीपति नृपाळ एकाकी । निर्जन स्थळासी पडला कैसा ॥
सत्य सत्य राया, अनित्य संसार । सिद्धान्त साचार पटला आजी
कर्ण दुःशासन इष्ट, मित्र कोणी । मजसी या स्थानीं दिसतीचि ना
धुळीमाजी राया, पडसील ऐसी । कल्पना कदापि नव्हती कोणा ॥
कालगति कोणा न कळेचि बाबा । धूळ-तृणीं राजा पडला हाय ॥
वासुदेव म्हणे कालगति वक्र । अनंत अपार कालगति ॥ ८ ॥

२४०

दुःखें म्हणे गुरुपुत्र । राया, कोठें तुझें छत्र ॥ १ ॥
कोठें गेलीं तीं चामरें । सैन्य अवघें काय झालें ॥ २ ॥
करी मानवकल्पना । अदृष्टाची गति भिन्ना ॥ ३ ॥
दृश्याहूनि तें अदृश्य । खचित सर्वकाळें श्रेष्ठ ॥ ४ ॥
स्पर्धा जयाची इंद्रासी । दशा तयाची हे ऐसी ॥ ५
मर्त्य वैभव हें ऐसें । अशाश्वत जनीं साचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुःख । अनावर गुरुपुत्रास ॥ ७ ।

२४१

ऐकूनि वचन अवलोकूनि दुःख । राव पुशी नेत्र उभय हस्तें ॥ १ ॥
आंसवें गाळीत वदला वीरांसी । अटळ काळाची गति जनीं ॥२॥
सर्वभूतनाश सिद्धांत हा लोकीं । समक्ष हे गति मजसी प्राप्त ॥३ ॥
पृथ्वीचें पालन करूनियां ऐसी । दशा मजप्रति प्राप्त आजी ॥ ४ ॥
युद्धविपत्तीनें भ्यालों न कदापि । त्यागूनि रणासी गेलों नाहीं ॥
नित्य नवोत्साह धरिला संग्रामीं । कपटें वैन्यांनीं वधिलें मज ॥६॥
ज्ञातिबांधवांचिया वधान्तीं मी रणीं । पडलों हें मानी सुदैवचि ॥७ ॥
वांचलेति तुम्हीं घोर या प्रसंगीं । तेणें सुदैवी मी खचित विप्रा ॥
वासुदेव म्हणे मरणोन्मुख वीर । वीरांप्रति धीर देई शौर्यें ॥ ९ ॥

२४२

मरणें माझ्या मित्रभावें । दुःख लवही न करावें ॥ १ ॥
यदि वेद त प्रमाण । जनीं जाहलों मी धन्य ॥ २ ॥
जिंकियेले पुण्यलोक । आड येतां जगन्नाथ ॥ ३ ॥
घडो क्षात्रधर्मच्युति । हेचि होती इच्छा त्याची ॥ ४ ॥
परी पाळूनि स्वधर्म । जगीं जाहलों मी धन्य ॥ ५ ॥
झाली तुमची पराकाष्ठा । कोण टाळील अदृष्टा ॥ ६ ॥
पुढती निःस्तब्ध नृपाळ । वदूनि जाहला, विव्हळ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बाष्प । वाहे नृप नयनांस ॥ ८ ॥

२४३

पाहूनि तें दुःख गुरुपुत्र क्षोभे । ज्वलनाचि भासे कल्पांतींचा ॥ १ ॥
हातावरी हात चोळूनि सद्गद- । होऊनियां, शब्द वदला घोर ॥२॥
नीचकर्में पितृवधहीं तो होतां । खेद ऐसा चित्ता नाहीं झाला-॥३॥
असह्याचि अद्य जाहला संताप । कथितों सत्य सत्य श्रवण करीं ॥
इष्टापूर्तादींची घेऊनि शपथ । पांचाळांचा वध करिन अद्य ॥ ५ ॥
केशवासमक्ष हरप्रयत्नेंसी । प्रतिज्ञा हे माझी मानीं राया ॥ ६ ॥
ऐकूनि हर्षित नृपाळ कृपासी । उदक कलशासी आणा म्हणे ॥७॥
करवी अभिषेक अश्वत्थाम्यालागीं । नृपासी आलिंगी गुरुपुत्र ॥

सिंहनादें गेला निघूनि कार्यासी । रणांत एकाकी पडला राव ॥९॥
कृपादिक तदा जाऊनियां दूर । करिती विचार वीर दुःखें ॥ १० ॥
वासुदेव गाई भावें शल्यपर्व । तेणें वासुदेव तोष पावो ॥ ११ ॥

## शल्यपर्व समाप्त

---

या शल्यपर्वाची एकंदर अभंगसंख्या २४३

संजय उवाच—

ततस्ते सहिता वीरा प्रयाता दक्षिणामुखाः ॥
उपास्तमय वेळायां शिबिराभ्याशमागताः ॥ १ ॥

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग--भारत

(महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ

## १० सौप्तिकपर्व

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला

१

नारायण-नरनरोत्तम देवी । सरस्वतीपाईं नमवूं शिर ॥ १ ॥
भवबंधछेदी गाऊं जयग्रंथ । आरंभू सौप्तिकपर्व आतां ॥ २ ॥
सूत म्हणे राया, वेळ सूर्यास्ताची । गहन प्रदेशीं लपती वीर ॥३॥
सन्निधचि येतां पांडवांचा शब्द । पळाले पूर्वेस विकलवीर ॥ ४ ॥
श्रांत अश्व तृषाक्रांत ते जाहले । चित्त तळमळे रावदुःखें ॥ ५ ॥
अंध म्हणे सूता, वद्‌मी तें सत्य । न वाटे चित्तास ऐकूनीही ॥६॥
अयुत नागांचें बळ, वज्रदेही । तरुण विजयी अवध्य जो ॥ ७ ॥
तयाचाहि वध जाहला दुर्दैवें । दुर्लंघ्य निश्चयें दैवबळ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुःखें धृतराष्ट्र । बोले संजयास ऐका काय ॥ ९ ॥

२

सूता ऐकूनि हें वृत्त । कैसा राहिलों जिवंत ॥ १ ॥
खचित हृदय पाषाणाचें । पुढती कंठूं दिवस कैसे ॥ २ ॥
पुरा, राजा-राजपिता । आतां साहूं कैंवी दास्या ॥ ३ ॥

वधिले शतपुत्र माझे । कैसे साहूं बोल त्याचे ॥ ४ ॥
मस्तकीं तो देऊनि पाय । राज्य करिल हाय हाय ॥ ५ ॥
उल्लंघूनि विदुरवच । केलें मत्पुत्रानें सत्य ॥ ६ ॥
असो, सूता कृपादिक । करितें झाले काय सांग ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सूत । ऐका कथी घोरवृत्त ॥ ८ ॥

३

राया, घोर वनीं तया सायंकाळीं । श्वापदें देखिलीं क्रूर बहु ॥ १ ॥
नाना पक्षी द्रुम व्याळही ते नाना । कमळें जळें नाना तया स्थानीं ॥
सहस्रशाखांचा पाहिला न्यग्रोध । घेऊनियां शोध मुक्तरथ ॥ ३ ॥
उदक स्पर्शूनि करिती सायंसंध्या । सर्वलोकमाता रजनी येई ॥ ४ ॥
नक्षत्रसंयुक्त कशिदा जयावरी । नीलवस्त्रधारी रजनी शोभे ॥ ५ ॥
दिवाचर घेती निद्रा, रात्रिचर । करिताती घोर शब्द वनीं ॥ ६ ॥
ऐशा शर्वरीसी कृपादिक वीर । बैसले एकत्र वटातळीं ॥ ७ ॥
संहार सकळ आठवूनि शोक । करिती संत्रस्त वीर श्रांत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कोणावरी काय । येईल समय न कळे कदा ॥ ९ ॥

४

क्षतविव्हला त्या निद्रेनें घेरिलें । अंग टाकियेलें धरणीवरी ॥ १ ॥
मृदुशय्या कोण अर्पी तयां अद्य । निद्रावश शांत होती दोघे ॥ २ ॥
सर्पासम श्वास सोडी अश्वत्थामा । तळमळे मना चैन नसे ॥ ३ ॥
तरूवरी गेली सहज त्रस्त दृष्टि । निद्रिस्थ दिसती काक तदा ॥ ४ ॥
इतुक्यांत एक भयप्रद घूक । बुबुळें हरित नयनीं त्याच्या ॥ ५ ॥
बभ्रु पिंगल तें, चंचु नखें दीर्घ । गरुडासम वेग भासे त्याचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रार्थूनि न्यग्रोधा । घूक नीचकृत्या प्रवर्तलें ॥ ७ ॥

५

क्रूरपणें घूक संहारी काकांसी । छिन्नभिन्न त्यांसी करी वेगें ॥ १ ॥
पंख, चरण, जिव्हा, करूनि विछिन्न । संहार दारुण मांडियेला ॥
निद्रिस्थ सकळ काक संहारिले । आनंदित झालें घूक मनीं ॥ ३ ॥
पाहूनि तें गुरुपुत्र पावे हर्ष । लाभला हा मार्ग योग्य म्हणे ॥ ४ ॥

प्रतिज्ञा जे केली नृपाळासन्निध । होईल ते सिद्ध याचि मार्गें ॥ ५ ॥
धर्मयुद्धें मज अशक्य विजय । अमर्याद बळ पांडवांचें ॥ ६ ॥
संशयाचा मार्ग स्वीकारूं कामया । पावन विजया कपटमार्गें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वार्थांध नरासी । भासे उन्मार्गाचि योग्य मार्ग ॥ ८ ॥

६

अश्वत्थामा म्हणे शास्त्रीं लोकीं निंद्य । स्वीकारिती मार्ग तेही क्षाते
क्षत्रियांचा धर्म ऐसाचि हा असे । कर्म पांडवांचें हेंचि सांगे ॥ २ ॥
प्राचीन आचार्य हेंचि उपदेशिती । वधावें शत्रूसी संधि येतां ॥ ३ ॥
एकाकी, निद्रिस्थ, पाहूं नये कांहीं । कोण्याही समयीं वध्याचि तो
चिंतूनियां ऐसें वीर अश्वत्थामा । उठवूनि वीरा हेतु कथी ॥ ५ ॥
ऐकूनियां वीर लज्जित जाहले । दुःखाकुल बोले विप्र तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पाप तें पापचि । समर्थनें शांति न मिळे चित्ता ॥ ७ ॥

७

आरंभिलें वैर श्रेष्ठ नृपास्तव । एकाकी तो राव पडला रणीं ॥ १ ॥
अकरा अक्षौहिणीपति तो दुष्टांनीं । पाडियेला रणीं नीचकर्में ॥ २ ॥
मूर्धाभिषिक्ताच्या मस्तकीं त्या लत्ता । ताडूनि दुष्कृत्या केलें भीमें
पांचाल हांसती-नाचती आनंदें । सर्वत्र तो कोंदे हर्षनाद ॥ ४ ॥
रथघोषें त्यांच्या उठती रोमांच । घोर हा प्रसंग वाटे मज ॥ ५ ॥
वीरांत आपण उरलों अवघे तीन । असंख्यांचे प्राण गेले रणीं ॥ ६ ॥
काळचि फिरला वाटे मजलागीं । अशक्य तें जगीं घडवी काळ ॥
काळाचिया मनीं येईल जें जेव्हां । घडेल तें तेव्हां दुष्करही ॥ ८ ॥
संकटीं या जरी प्रज्ञावंत तुम्हीं । दावा मजलागूनि मार्ग कांहीं ॥
वासुदेव म्हणे प्रसंग तो घोर । कैसा सद्विचार ऐशावेळीं ॥ १० ॥

अध्याय २ रा

८

अश्वत्थाम्याप्रति कृपाचार्य तदा । म्हणती ऐक आतां अल्प माझें ॥
दैवें उद्योगें वा बद्ध सर्व जन । तृतीय न कर्म लोकीं दिसे ॥ २ ॥
कोणीही त्या माजी एक न समर्थ । उभय संयोग कार्यक्षम ॥ ३ ॥

सानथोर सर्व कर्मं याचि रीति । सिद्ध असिद्ध कीं सर्वकाल ॥४॥
पर्वतशिखरीं वर्षतां पर्जन्य । होई फलशून्य सहजपणें ॥ ५ ॥
सुक्षेत्रीं तो होई बहु फलदाई । यत्नावीण पाही तेंवी दैव ॥ ६ ॥
नांगरिलें, यत्नें पेरिलें, सुक्षेत्र । सुवृष्टीनें लाभ तरिच होई ॥ ७ ॥
तैसेंचि प्रयत्नें साफल्य सुदैवा । हर्ष वासुदेवा कृपवचें ॥ ८ ॥

९

घडवील दैव अशक्यही शक्य । प्रयत्न सदैव इष्ट परी ॥ १ ॥
अनुकूल दैवें प्रयत्न साधती । विफलही होती यत्न कदा ॥ २ ॥
यास्तव आळशी निंदिती उद्योगा । ज्ञात्यांसी ते निंदा न रुचे परी
यत्नावीण लाभ यत्नेंही अलाभ । कचित्काळीं योग ऐसा घडे ॥४॥
अपवादचि तो जाणूनि सर्वदा । उद्योगाच्या मार्गी रमती ज्ञाते ॥
प्रायः निरुद्योगी उपवास कंठिती । उद्योगी भोगिती सौख्य जनीं ॥
प्रयत्नेंही कार्य साधेनाचि जरी । दोष कर्त्यावरी नसे त्याचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे लाभ यत्नावीण । जनीं तो कारण निंदा-द्वेषा ॥ ८ ॥

१०

दैव-उद्योगांचें ऐसें तारतम्य । जाणीना त्या विघ्न सर्वकाल ॥ १ ॥
दैवावीण यत्न, यत्नावीण दैव । जाणावें निष्फल जगीं नित्य ॥२॥
यास्तव देवतास्मरणें प्रयत्न । करी, दक्ष, जाण यशस्वी तो ॥ ३ ॥
वृद्धानुमत तें वागेल जो नित्य । निश्चयेंचि यश तयाप्रति ॥ ४ ॥
उच्छृंखलपणें अवमानी जनांसी । कदा न तयासी अर्थसिद्धि ॥ ५ ॥
राग, लोभ, मोह, भय ज्याच्या मनीं । वैभवाची हानि पावेल तो ॥
वासुदेव म्हणे कथिती कृपाचार्य । रायाचा अविचार नडला तया

११

ऐकिलें न तेणें हिताचें वचन । दुर्जन वचन सन्मानिलें ॥ १ ॥
निवारितां सर्व धरूनियां गर्व । पांडवांसी वैर मांडियेलें ॥ २ ॥
दुःशील तो धैर्यहीन कोपयुक्त । वच सन्मित्रोक्त ऐकेचि ना ॥३॥
तया पापिष्ठासी अनुसरलों आम्हीं । दारुण प्रसंगीं पडलों तेणें ॥
म्हणोनि मस्तक कांहींच न सुचे । मार्ग न गवसे मजसी कांहीं ॥५॥

मार्ग ऐशावेळीं पुसावा सज्जना । साधिती कल्याणा सुहृज्जन ॥६॥
धृतराष्ट्र, गांधारी, बुद्धिमंत क्षत्ता । दाविताल पंथा आचरूं तें ॥७॥
यत्नें कार्यसिद्धि नियम हा जगीं । ठरतां हतभागी दोष काय ॥८॥
वासुदेव म्हणे प्रयत्नेंही यश । लाभ न तयास दोष नसे ॥ ९ ॥

अध्याय ३ रा १२

ऋजु नीतियुक्त कृपाचें वचन । ऐकूनियां खिन्न वदला विप्र ॥ १ ॥
स्वस्वबुद्धि लोकीं मानूनि शोभना । मानवांच्या मना तोष वाटे॥२॥
बुद्धिमंत मीचि मानिती समस्त । अल्प प्रशंसेंत रमती नित्य ॥ ३ ॥
प्रशंसिती स्वयें आपणासी सर्व । निंदिती सगर्व इतरांलागीं ॥ ४ ॥
निमित्तें अन्योन्य येऊनि एकत्र । दाविती आदर परस्परां ॥ ५ ॥
काळविपर्ययें एकमेकांप्रति । निंदिती अडविती तेचि जनीं ॥ ६ ॥
व्यक्ति व्यक्तीमाजी जनीं भिन्न मति । गोंधळूनि जाती संकटांत ॥
वासुदेव म्हणे येतां विपत्काळ । सर्वत्र सुकाळ मतभेदांचा ॥ ८ ॥

१३

कुशल वैद्य जयापरी । योग्य उपचार करी ॥ १ ॥
तैसा इष्ट कार्यास्तव । योजी उपाय मानव ॥ २ ॥
अल्प, थोर, बुद्धीसम । दोष देती तया अन्य ॥ ३ ॥
बालपणांत जें योग्य । तेंचि तारुण्यीं अयोग्य ॥ ४ ॥
रुचे अन्यचि वार्धक्यीं । ऐसें चांचल्य मतीसी ॥ ५ ॥
घोर संकट वा भाग्य । करीतसे बुद्धिभेद ॥ ६ ॥
त्या त्या वेळीं ते ते बुद्धि । रुचते जनीं मानवासी ॥ ७ ॥
तेचि मानूनियां सत्य । मनुज होई कार्यरत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विप्र । मानी हाचि योग्य मार्ग ॥ ९ ॥

१४

स्वकीय जे बुद्धि हितप्रद तेचि । मानूनि नराची चेष्टा चाले ॥
सुचतां जो मार्ग शोक नष्ट झाला । कथितों तुम्हांला तोचि मार्ग ॥
ब्रह्मदेवें धर्म योजिले निर्मूनि । वर्णासम जनीं वेद, शौर्य- ॥ ३ ॥
दाक्ष्य, सेवा ऐसे चार धर्म थोर । धर्महीन नर निंद्य होती ॥ ४ ॥

श्रेष्ठ विप्रकुळीं जन्मूनि दुर्दैवें । कर्म स्वीकारिलें क्षत्रियाचें ॥ ५ ॥
आतां शमादिक आचरितां व्यर्थ । विप्रधर्मं हित नसे वाटे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चिंतिलें जें मनीं । तेंचि श्रेष्ठ जनीं वाटे मूढा ॥ ७ ॥

१५

श्रेष्ठ चाप दिव्य अस्त्रें । साह्य जाहलीं न मात्रें ॥ १ ॥
पितृवध तो समक्ष । आठवूनि होती कष्ट ॥ २ ॥
पुशितां कोणी सांगूं काय । अन्य मार्ग नसे हाय ॥ ३ ॥
अद्य क्षत्रियांचा धर्म । आचरूनि होइन धन्य ॥ ४ ॥
कवचहीन सकल वीर । शिबिरीं सुखें झोंपतील ॥ ५ ॥
संधि साधूनि ते साचा । घात करीन तयांचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्रोध । मानवासी करी अंध ॥ ७ ॥

१६

अश्वत्थामा म्हणे दावूनि विक्रम । सकल संहारीन शत्रु आजि ॥ १ ॥
दीप्तानल जेंवी दग्ध करी वन । कर्म रुद्रासम आचरीन ॥ २ ॥
सपुत्र पांचाळ करूनियां नष्ट । तुडवीन प्रेतराशि अद्य ॥ ३ ॥
पितृऋणमुक्त होईन सुखानें । स्वर्गी वीरमनें तोषतील ॥ ४ ॥
पशूसम धृष्टद्युम्नाचें त्या शिर । छेदूनि साचार उडवीन तें ॥ ५ ॥
निद्रितांचा वध करूनियां अद्य । होईन कृतार्थ परम हर्षे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । गर्जिन्नला क्रोधें अश्वत्थामा ॥ ७ ॥

अध्याय ४ था

१७

कृप म्हणे वीरा प्रतिकारमति । लाभली तुजसी अनिश्चर्ये ॥ १ ॥
निवारी न तुज इंद्रही या कामीं । साह्य होऊं आम्हीं उभय तुज ॥
परी घे विश्रांति अद्य एकरात्र । काल उदयीक करूं शौर्यें ॥ ३ ॥
अथवा प्रभातीं उठूनि सत्वरी । वेगें शत्रूवरी जाऊं क्रोधें ॥ ४ ॥
वीरा, तुजसम योद्धा नसे जगीं । घे आजि विश्रांति एक रात्र ॥ ५ ॥
चिर जागरण जाहलें तुजसी । निर्दाळूं पुढती शत्रूलागीं ॥ ६ ॥
सकल ते जरी एकत्र मिळोनि । येतांहि, लढोनि निर्दळूं त्यां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अश्वत्थाम्याप्रति । कृप आश्वासिती समयासम ॥

१८

क्रोधें आरक्तनयन । द्रौणि बोलला वचन ॥ १ ॥
दुःखाकुल, क्रोधाविष्ट । कार्यमग्न, कीं कामुक ॥ २ ॥
मामा, कैंवी ऐशा नरां । सांगा येई सुखनिद्रा ॥ ३ ॥
कारणें हीं सकल अद्य । दैवें मजलागीं प्राप्त ॥ ४ ॥
एकटाचि मम संताप । निद्राभंगासी समर्थ ॥ ५ ॥
वध पित्याचा तो तैसा । स्मरणें जाळीतसे चित्ता ॥ ६ ॥
कैसे राहिले हे प्राण । पितृवधातें ऐकून ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे द्रौणि । बोले अपात्र मी जनीं ॥ ८ ॥

१९

प्रत्यक्ष पित्याचा वध म्यां पाहिला । याहूनि वीराला दुःख काय ॥
पांचालविजय कैसा सह्य मज । प्राण त्यांचा अद्य घेईन मी ॥ २ ॥
भीमगदाघातें भग्नअंक नृप । करितो विलाप ऐकूनियां ॥ ३ ॥
निर्दयही कोणी द्रवेल त्या दुःखें । सह्य नें राजाचें दुःख कोणा ॥४॥
टपटपा अश्रु येतील लोचनीं । शब्द ते ऐकोनि आर्त त्याचे ॥ ५ ॥
स्मरणें त्या दुःखसिंधूसी भरती । निद्रा मजप्रति कैसी येई ॥ ६ ॥
कृष्णार्जुन साह्य जोंवरी शत्रूंसी । भय न तयांसी निश्चयानें ॥ ७ ॥
परी काय करूं कोप अनावर । आंवरील नर कोण मज ॥ ८ ॥
यास्तव प्रसुप्त वीरांसी वधून । संतुष्ट होईन निर्धार हा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे अज्ञान विकार । होती अनावर दैवयोगें ॥ १० ॥

अध्याय ५ वा

२०

इंद्रियाधीन जो मूढ स्वभावेंसी । धर्माधर्म त्यासी न कळे कदा ॥
विनयहीन तो जरी बुद्धिमंत । धर्माधर्म बोध न ये तया ॥ २ ॥
चिरकाल मूढ सेवा पंडिताची । करितांही न त्यासी धर्मबोध ॥३॥
मुहूर्तमात्रही पंडितसान्निध्य । लाभतां सुबुद्ध लाभ घेई ॥ ४ ॥
पाकरसीं दर्वीसम मूढमति । प्राज्ञाची ते स्थिति जिव्हेसम ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे महामति कृप । बोलती सिद्धांत हितास्तव ॥ ६ ॥

२१

बुद्धि कुशाग्र जयाची । शुश्रूषेचें वळण ज्यासी ॥ १ ॥
लाभे तया शास्त्रज्ञान । न करी वितंडा ना जाण ॥ २ ॥
अनम्र जो दुष्ट पापी । न रुचे तया हितबुद्धि ॥ ३ ॥
असती जया सुहृन्मित्र । दुष्टकर्मी त्या विरोध ॥ ४ ॥
दैव अनुकूल जरी । बोध रुचल अंतरीं ॥ ५ ॥
येतां विनाशाची वेळ । रुचती न सुहृद बोल ॥ ६ ॥
भ्रांतचित्त निवारण । करिती इष्ट मित्र जाण ॥ ७ ॥
अशक्य तें होई जरी । विनाशाची वेळ तरी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे निंद्य- । कर्मी, बोधी तोचि मित्र ॥ ९ ॥

२२

अश्वत्थामा ताता, बोध हा हिताचा । करूनि विवेका ध्यानीं घेई ॥
टळेल वा तेणें पश्चात्ताप तुझा । आंवरीं स्वचित्ता हितास्तव ॥ २ ॥
प्रसुप्तांचा नाश जाण हा अधर्म । शस्त्रकवचहीन, निद्रस्थ ते ॥३॥
आजवरी तुज स्पर्शलें न पाप । दुस्तर नरक जोडूं नको ॥ ४ ॥
वीरा, सूर्यासम तेज तुझें उग्र । निष्कलंक शुभ्र वस्त्रासम ॥ ५ ॥
यास्तव न करीं ऐसें निंद्यकर्म । शौर्यें दे आव्हान शत्रूलागीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे न्याय्य हें वचन । कोपला ऐकून अश्वत्थामा ॥ ७ ॥

२३

म्हणे मामा, सत्य बोलतां तें परी। उल्लंघिला पूर्वी सेतु त्यांनीं ॥१॥
विस्मृति ते काय जाहली तुम्हांसी । वधिलें पित्यासी कैसें सांगा ॥
कर्ण-भीष्मादिकां वधिलें कैसें सांगा । भीमें नृपअंका फोडियेलें ॥
विलाप रायाचा आठवूनि मन । होतसे उद्विग्न मामा, माझें ॥ ४ ॥
तयां दुष्टांप्रति निंदिलें न तुम्हीं । अद्य निद्रिस्थां मी संहारीन ॥५॥
तया पापें येवो कृमि-कीट जन्म । कोण निवारण करिल माझें ॥६॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । अश्व स्यंदनातें जोडी विप्र ॥ ७ ॥

२४

कृप, कृतवर्मा बोलती तें त्यासी । कोठें हांकितोसी रथ सांगें ॥ १ ॥
तव दुःख तेंचि आमुचें हे वीरा । लवही अंतरा शंका नको ॥ २ ॥

ऐकूनि सखेद बोले अश्वत्थामा । अद्य धृष्टद्युम्ना नरक लाभो ॥३॥
यज्ञपशूसम वधीन दुष्टासी । न लाभो तयासी स्वर्गलोक ॥ ४ ॥
सज्ज होऊनियां साह्य व्हा या कामीं । निघाला बोलूनि ऐसें विप्र ॥
प्रज्वलित अग्नीसम ते भासले । सत्वरचि आले शिबिरद्वारीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अनर्थाची वेळ । येतां अनावर होई क्रोध ॥ ७ ॥

अध्याय ६ वा

२५

सूत म्हणे राया, शिबिराच्या द्वारीं । अलौकिक स्वारी बसली एक
नेत्र सूर्यासम पांघरिलें चर्म । रक्त अंगांतून वाहे त्याच्या ॥ २ ॥
सर्पभूषणें तो नाना शस्त्रधारी । वदन विस्फारी ज्वालायुक्त ॥ ३ ॥
स्वरूप विक्राळ असंख्यात नेत्र । पाहूनि रोमांच उठती अंगीं ॥ ४ ॥
शंख चक्रधारी श्रीकृष्णमुरारी । सर्वत्र शिबिरीं दिसला तदा ॥ ५॥
परी अश्वत्थामा निर्भय राहूनि । दिव्यास्त्रें ताडूनि शौर्य दावी ॥ ६॥
उग्र त्या भूतानें गिळियेलीं अस्त्रें । कांहींच न चले विप्रबळ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे खड्ग, गदा तेही । गिळितां न कांहीं अशा विप्रा ॥

२६

आयुधविहीन तदा अश्वत्थामा । पाही जनार्दना जळीं-स्थळीं ॥ १ ॥
सहस्रावधि तीं रूपें श्रीकृष्णाचीं । विस्मयें अवलोकी द्रोणपुत्र ॥
कृपवाक्य क्रोधें आठवूनि बोले । नाहीं ऐकियेलें हितवाक्य ॥ ३ ॥
अप्रिय परी जा पथ्यकर बोध । ऐके न तयास पश्चात्ताप ॥ ४ ॥
उन्मत्तपणें मी उल्लंघिलें शास्त्र । परिणामीं घात ऐसा झाला ॥ ५ ॥
प्रयत्न करूनि होतां कार्यनाश । सुकृत विनाश जाणावा तो ॥ ६ ॥
कालप्रवाहीं या करी जो प्रतिज्ञा । मूढचि तो मना पटलें आज ॥
वासुदेव म्हणे अतर्क्य तें भूत । न कळे विप्रास चिंतितांही ॥ ८ ॥

२७

अश्वत्थामा म्हणे ऐसी । वेळ आली न कदापि ॥ १ ॥
ऐसा युद्धपराङ्मुख । नव्हता कदा द्रोणसुत ॥ २ ॥
अधर्मेंचि बुद्धि भ्रष्ट । जाहलों मी वाटे अद्य ॥ ३ ॥
दैव ऐसें आड येतां । तेथ उपाय कोणाचा ॥ ४ ॥

निवारील देव दंड । एकमेव भोळासांब ॥ ५ ॥
सकल देवांचा तो देव । उमापति महादेव ॥ ६ ॥
शरण जाइन मी त्यासी । शूलपाणी आशा माझी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे द्रौणि । चिंत्ती ऐसें निजमनीं ॥ ८ ॥

अध्याय ७ वा

२८

चिंतूनियां ऐसें रथाखालीं विप्र । जोडूनियां कर प्रार्थी शिवा ॥१॥
उग्र स्थाणु शिव रुद्र सर्व ईश । ईश्वर गिरीश वरद देव ॥ २ ॥
शितिकंठ, अज, विश्वरूप शुक्र । दक्ष क्रतुहर, विरूपाक्ष ॥ ३ ॥
बहुरूप, विभु, दृप्त, उमापति । स्मशाननिवासी ब्रह्मचारी ॥ ४ ॥
महागणपति, रुद्र, जटाधर । शक्र, परात्पर, नीलकंठ ॥ ५ ॥
खट्वांगधारी, तो देवगणाध्यक्ष । हिरण्यकवच, चंद्रमौली ॥ ६ ॥
शरण मी तया विनम्र भावानें । निवारील विघ्न तोचि मम ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रार्थूनि या परी । चिंती निजांतरीं अश्वत्थामा ॥८॥

२९

प्रार्थूनियां ऐसें बोलतसे विप्र । अर्पीन पवित्र भूतबली ॥ १ ॥
घोर दुस्तर हें विघ्न दूर होतां । मजवरी कृपा करो शिव ॥ २ ॥
जाणूनि तें शिवें निर्मियेली वेदी । अग्नि जियेमाजी प्रज्वलित ॥३॥
पर्वताकार तैं दिसती शिवगण । करावें वर्णन काय त्यांचें ॥ ४ ॥
श्वान-सूकरादि पशूसम मुखें । ज्वालामय अंगें विराजती ॥ ५ ॥
जटाधर वक्रदंत कोणी कृश । अस्त्रेंही विविध जयांप्रति ॥ ६ ॥
विक्राळ, अद्भुत ऐसे शिवदूत । साह्य शंकरास नित्य ज्यांचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शिवासी स्तवित । विप्राच्या सन्निध प्राप्त होती ॥

३०

वाद्यनाद, हास्य गर्जना संतापें । भिववीत भूतें प्राप्त झालीं ॥ १ ॥
परीक्षावें तेज, वाढावा महिमा । अवलोकावें कर्मा घोर त्याच्या ॥
ऐसा मनि हेतु धरूनि शिवगण । व्यापूनि तें स्थान टाकितातीं ॥
लवही न भ्याला परी अश्वत्थामा । देहसमर्पणा करी स्वयें ॥ ४ ॥
आंगिरसकुळीं म्हणे जन्म माझा । अर्पीतसे देहा वेदीमाजे ॥ ५ ॥

सर्वसमर्था, हे शंकरा स्वीकारीं । अजिंक्य हे वैरी मजलागीं ॥ ६
वासुदेव म्हणे स्तवूनि शिवासी । अर्पी स्वदेहासी अश्वत्थामा ॥७॥

३१

आत्मसमर्पणें कृतार्थ तो विप्र । प्रसन्न शंकर तया होती ॥१॥
आराधिलें प्रेमें म्हणती कृष्णानें । पांचाळां रक्षिलें आजवरी ॥२॥
परी आजि तयां गांठिलें काळानें । दिव्य खड्ग तेणें दिधलें विप्रा॥
संचार तयाच्या तनूमाजी केला । तेजस्वी जाहला अश्वत्थामा ॥४॥
तया ईशतेजें चढला आवेश । प्रवेश शिबिरांत करी विप्र ॥५॥
वासुदेव म्हणे भूत, राक्षसादि । येती सभोंवता तदा त्याच्या ॥६॥

अध्याय ८ वा

३२

राव म्हणे सूता, कृप, कृतवर्मा । साह्य तया कर्मा झाले कीं न ॥१॥
योग्य समाचार तदा निद्रिस्थांचा । घेतला कीं सूता, सांगे मज॥२॥
सूत म्हणे राया, द्वारावरी दोघे । राहूनियां उभे करिती साह्य ॥३॥
देऊनि तयांसी स्फूर्ति अश्वत्थामा । तया घोरकर्मा प्रवर्तला ॥४॥
श्रांत, व्याकुळ ते वीर कोणी जागे। नव्हते, आडमार्गे शिरला विप्र॥
धृष्टद्युम्नालयीं पातला क्रोधानें । भरलें सुगंधानें शय्यागार ॥६॥
मृदुशय्येवरी पहुडला वीर । ताडिला प्रहार लत्तेचा त्या ॥७॥
वासुदेव म्हणे जागृति सात्वतीं । येतां द्रोणसुता अवलोकी ॥८॥

३३

कवचहीन अर्धनिद्रामग्न वीर । उठतांचि विप्र बैसे उरीं ॥१॥
ओढूनियां केश करी मुष्ट्याघात । लोळवी वीरास अश्वत्थामा ॥२॥
प्रतिकाराक्षम होतां धृष्टद्युम्न । भय निद्रामग्न तयावेळीं ॥३॥
पशूसम त्याचा चरणां दाबी गळा । क्रूर तो चावला वक्षःस्थळीं ॥४॥
गुदमरूनियां सात्वन ओरडे । हाय तडफडे महावीर ॥५॥
नखाग्रं ताडूनि अस्पष्ट तो बोले । मजसी वधीं रे विप्रा, शस्त्रें ॥६॥
लाभेल रे तेणें मजसी पुण्यलोक । बोलूनियां अंग टाकी वीर ॥७ ॥
वासुदेव म्हणे क्रूर अश्वत्थामा । बोलला वचना ऐका काय ॥८॥

३४

गुरुहत्या घडली ज्यासी । कदाही न त्या सद्गति ॥१॥
कुलांगारा, शस्त्रवध । तुजसा । नव्होये रे योग्य ॥२॥
ऐसें बोलूनियां जमें । चरणें ठेचिलें क्रौर्यानें ॥३॥
वीर फोडित किंकाळ्या । हाय हाय ठार झाला ॥४॥
स्त्रिया, दूत तया शब्दें । उठतां पावती भयातें ॥५॥
म्हणती कोणी महाभूत । क्रूरपणें करी घात ॥६॥
वासुदेव म्हणे विप्र । वेगें चढला रथावर ॥७॥

३५

हांकूनियां रथ गेला अन्यस्थळीं । फोडिती आरोळी इकडे स्त्रिया ॥
अपरात्रीं वीर धांवूनि तें आले । रुद्रास्त्रें वधिलें तयां विप्रें ॥२॥
उत्तमौजा, युधामन्यूही वधिला । पशूसम गेला प्राण त्यांचा ॥३॥
आक्रंदती कोणी मागिती राक्षस । होती भयग्रस्त वीर ऐसे ॥४॥
संहार क्रौर्यानें करूनियां विप्र । पुढती घेई शस्त्र करामाजी ॥५॥
अश्वगजादीही होती भयाकुल । वधिले तत्काल तयांलागीं ॥६॥
शस्त्रकवचहीन श्रांत निद्रामग्न । काढिलें कापून क्रूरपणें ॥७॥
वासुदेव म्हणे द्रौपदीचे सुत । अवलोकी विप्र सपांचाळ ॥८॥

३६

शूर राजपुत्र ऐकूनि तें वृत्त । शौर्यानें सायक सोडिताती ॥ १ ॥
शिखंडीप्रभृति वीर तयावेळीं । अश्वत्थाम्यावरी धांव घेती ॥ २ ॥
तदा खड्गधारी वीर अश्वत्थामा । चवताळूनि रणा प्रवर्तला ॥ ३ ॥
प्रतिविंध्याची तैं फोडियेली कुक्षी । क्रौर्ये कर छेदी सुतसोम्याचा ॥४॥
वक्ष विदारूनि प्राण घेई त्याचा । वधिलें शतानिका शिरच्छेदें ॥५॥
श्रुतकर्म्याचेंही वदन फोडिलें । शिर छेदियेलें श्रुतकीर्तीचें ॥६॥
वासुदेव म्हणे द्रौपदीचे सुत । दुर्दैवाचें भक्ष्य हाय झाले ॥ ७ ॥

३७

शिखंडीच्या भाळीं ताडूनियां बाण । खड्गें घेई प्राण क्षणीं त्याचा ॥
विराटाचें सैन्य द्रुपदाचे सुत । संहारी समस्त अश्वत्थामा ॥२॥

मूर्तिमंत काली वीरांसी दिसली । गात्रांत रंगली तयावेळीं ॥३॥
रक्तपुष्पमाळा रक्तवस्त्र ल्याली । स्वपाशें आंवळी प्रेतें बहु ॥४॥
बहुत दिन ऐसें दृश्य वीरांप्रति । दिसलें प्रचीति अद्य येई ॥५॥
काली अश्वत्थामा दिसे तयांप्रति । प्रत्यक्ष तें आजी घडलें वाटे ॥६॥
निमित्ताचे अश्वत्थामा त्या संहारा । काळाचे पातला दैवयोगें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर छिन्नभिन्न । करूनियां प्राण घेई विप्र ॥ ८ ॥

३८

एकामागें एक होऊनि जागृत । हस्तपादच्छेद करी विप्र ॥ १ ॥
कापाकोप कोणी वीर आक्रंदती । कोणा चुंधडिती अश्व, गज ॥
काय हें हा कोण अनर्थ हा केला । आक्रोशें कोणाचा प्राण जाई ॥
शस्त्रास्त्रयुक्तां निःशस्त्र करोनि । निष्प्राण करूनि टाकियेलें ॥ ४ ॥
उठले घाबरले दचकले कोणी । तयांचे लपूनि बैसताती ॥ ५ ॥
स्तंभिताचे भयें कोणा आक्रंदती । दैन्यें अवलोकिती परस्परां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रथारूढ विप्र । करीत संहार जाई वेगें ॥ ७ ॥

३९

भयाकुल कोणी होती वक्रतंड । करिती बडबड भ्रांतचित्तें ॥ १ ॥
शस्त्र, वस्त्रांचेंही भान नच राही । गोंधळूनि जाई सैन्य सर्व ॥ २ ॥
मुक्तकेश कोणी, होती स्मृतिहीन । पावती पतन भूमीवरी ॥ ३ ॥
मूत्र-पुरीषांचा द्वार मुक्त होती ॥ दीन दशा त्यांची वर्णवेना ॥ ४ ॥
तोडूनि बंधनें पळती अश्व, गज । करी प्राणनाश अश्वत्थामा ॥ ५॥
भूतप्रेत तदा आनंद पावली । राक्षसमंडळी हर्ष पावे ॥ ६ ॥
द्विगुणित करी धूळ अंधारासी । पळतां आदळती एकमेकां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृप, कृतवर्मा । पळती जे त्यांना संहारिती ॥ ८ ॥

४०

कृप, कृतवर्मा करिती क्रूरकर्म । तत्र हुताशन लाविताती ॥ १ ॥
पेटवूनि देती शिबिर तीन भागीं । अश्वत्थाम्यालागीं मार्ग दिसे ॥
प्रकाशें त्या घोर करी तो संहार । पृष्ठ, स्कंदोदर, फोडी, तोडी ॥३॥
संहार यापरी जाहला सैन्याचा । छिन्न वीर हांका मारिताती ॥ ४ ॥

व्याकुळ होवोनि म्हणती हे राक्षस । कोण या स्थानास प्राप्त झाले ॥
ऐशी निर्दयता कौरवांही नसे । कृष्णार्जुन येथें नसती अद्य ॥ ६ ॥
क्रूरता हे ऐसी नसे पार्थाप्रति । विलाप मांडिती ऐसा बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कण्हती, कुंथती । किंचाळ्या फोडिती कोणी दीन ॥

४१

हाय हाय त्या किंकाळ्या । क्षणार्धांत शांत झाल्या ॥ १ ॥
रुधिरें धूळ शांत झाली । दिसती दीन हालचाली ॥ २ ॥
हलती कांहीं हस्त-पाद । पडले कोणी, नाउमेद ॥ ३ ॥
कवटाळिती एकमेकां । पळती, लपती धरूनि धाका ॥ ४ ॥
लढती कोणी शूर वीर । क्रूर जाहला संहार ॥ ५ ॥
पळतां आग चोंहोंकडे । इकडे यमद्वार उघडें ॥ ६ ॥
मध्यरात्रीचा समय । वीरहीन तें शिबिर ॥ ७ ॥
रुधिर, मांस मेद भूतें । भक्षिताती हृष्टचित्तें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विप्र । दैवें होई कृतकार्य ॥ ९ ॥

४२

इतुकें होईतों पहांट जाहली । जावें निजस्थळीं म्हणे विप्र ॥ १ ॥
नररुधिरानें चिंब तो जाहला । वाहाचि भासला खड्ग त्याचा ॥२॥
संहारूनि विश्व शमे प्रलयानल । तैसा कृतकार्य वाटे विप्र ॥ ३ ॥
निःशब्द शिबिरीं आला त्याचपरी । गेला तयावेळा शून्यस्थान ॥४॥
भेटतां ते सर्व हर्षें निजकार्य । निवेदितीं क्रूर एकमेकां ॥ ५ ॥
गर्जूनि आनंदें टाळ्या वाजवितां । विचित्र दैवाची गति राया ॥६॥
वधूनि कौरवां आपणही मेले । यदा ओढवलें दैव त्यांचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दोष हा कोणाचा । खेळ दुर्दैवाचा हेंचि सत्य ॥ ८ ॥

४३

राव म्हणे सूता, अभिमानें द्रौणि । प्रवर्ते या कर्मीं कां न पूर्वीं ॥ १॥
क्षुद्रत्व कां ऐसें दावियेलें तेणें । रायालागीं म्हणे सूत ऐका ॥ २ ॥
कृष्ण'सात्यकीच्या भयें अश्वत्थामा । उद्युक्त या कर्मा झाला नाहीं ॥
असान्निध्य त्यांचें पाहूनियां अद्य । जाहला कृतार्थ विप्र राया ॥ ४ ॥

कृष्णाच्या समक्ष ऐसें घोर कृत्य । नव्हतेंचि शक्य रुद्रातेंही ॥ ५ ॥
असो, त्या आनंदें परस्परां वीर । आलिंगूनि थोर करिती नाद ॥ ६॥
हर्षे अश्वत्थामा सोमक, पांचाळ । वधिले द्रौपदेय म्हणे आजी ॥ ७॥
पडलीं शरीरें त्यांचीं इतस्ततः । असतां प्राण नृपा निवेदूं हें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आसुरी आनंद । भोगिताती मूढ ऐशापरी ॥ ९ ।

अध्याय ९ वा

४४

पुढती ते वीर रायाच्या सन्निध । येऊनि जिवंत पाहती त्या ॥ १ ॥
किंचित्प्राणधारी पाहूनि तयासी । त्यागूनि रथासी जवळी आले॥
श्वासोच्छ्वासरुद्ध करी तो भग्नांक । दिसला वेशुद्ध रुधिर वमे
वृकादि श्वापदें सभोंवतीं त्याच्या । धरूनि मांसाशा हिंडताती ॥
युद्धोवरी येतां निवारी तयांसी । अवस्था रायाची हाय ऐसी ॥
अत्यवेदना त्या होऊनि असह्य । गडबडां राव लोळतसे ॥ ६ ॥
शोणितें माखलें सर्व अंग त्याचें । पाहूनि वीरांतें दुःख बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुःखानें रुदन । करितो, वदन पुशितो हस्तें ॥ ८ ॥

४५

कृप म्हणे दैव श्रेष्ठ । लोळे नृपाळ रुधिरांत ॥ १ ॥
अकरा अक्षौहिणीपति । पडला आजी मृत्युमुखीं ॥ २ ॥
कनकखचित हे गदा । छायेसम जवळी सदा ॥ ३ ॥
महाराजा अभिषिक्त । पडला हाय धूळ खात ॥ ४ ॥
कर जोडावे नृपांनीं । तोचि पडला रणांगणीं ॥ ५ ॥
विप्र जयाच्या भोंवतीं । तया श्वापदें वेष्टिती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निंद्य । कर्म तेंचि वा दुर्दैव ॥ ७ ॥

४६

अश्वत्थामा तदा बोले करुणार्द्र । कैसा मर्मभेद केला भीमें ॥१॥
नरव्याघ्रा, राया वीर तूं कुबेर । बलभद्र थोर गुरु तुझा ॥ २ ॥
ऐसें असूनियां अवस्था हे तव । हाय हाय दैव बलवान ॥ ३ ॥
अधर्मयुद्धानें फोडियेला अंक । लत्तेनें मस्तक तुडविलें ॥ ४ ॥

उपेक्षिलें तदा भीमासी धर्मानें । तैसेंचि कृष्णानें, धिक्कार त्यां ॥५॥
त्रिरकाल वीर क्षितीतील भीमा । मान्य तूं बलरामा वीर एक ॥६॥
नृपाळा, तुजसी लाभेल सद्गति । वीरमरणाची प्राप्ति तुज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर अश्वत्थामा । हांका दुर्योधना मारी दुःखें ॥ ८॥

४७

राया, तुझ्याहूनि खेद त्या वृद्धांचा । वाटतसे चिंता काय करूं ॥ १ ॥
अनाथासमान धृतराष्ट्र-गांधारी । हिंडतील सारी अवनी आतां ॥ २ ॥
धिक्कार असो त्या कृष्णार्जुनांप्रति । अधर्म्य कृत्यासी उपेक्षिलें ॥ ३ ॥
निर्लज्ज पांडव मानितील गर्व । अधर्मेही राव वधितां ऐसा ॥ ४ ॥
धारातीर्थी राया, झालासी पुनित । आमुचेंचि व्यर्थ जिणें आतां ॥ ५ ॥
प्रजारक्षक तूं जासी परलोकीं । आम्हां अवशिष्टांसी लांछन हें ॥ ६ ॥
भोगिलें ऐश्वर्य आजवरी आम्हीं । आतां ही अवनी दुःखें हिंडूं ॥ ७ ॥
हाय हाय कर्म काय हें आमुचें । वासुदेव सांगे द्रौणिवाक्य ॥ ८ ॥

४८

राया, सोडूनि तूं जासी । आतां आम्हां कैंची शांति ॥ १ ॥
स्वर्गामाजी थोर थोरां । भेटसील हे राजेंद्रा ॥ २ ॥
अद्य धृष्टद्युम्नाप्रति । वधिलें सांग ताताप्रति ॥ ३ ॥
महावीरांसी नमन । सांग स्वर्गांत जाऊन ॥ ४ ॥
राया, ऐकें शुभवार्ता । वधिलें पांचाळां समस्तां ॥ ५ ॥
वधिले द्रौपदीचे पुत्र । दुष्ट धृष्टद्युम्नसुत ॥ ६ ॥
करूनि सौप्तिक युद्धासी । नष्ट केलें शिबिरासी ॥ ७ ॥
शेष आता अवघे सप्त । कृष्ण, पांडव, सात्वत ॥ ८ ॥
वधिले अवघे पशुसम । शिबिरीं तिघांनी जाऊन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । घोर कथिलें तें समग्र ॥ १० ॥

४९

ऐकूनि त्या वृत्ता शुद्धीवरी राजा । येऊनियां विप्रा धन्य म्हणे ॥ १ ॥
भीष्म द्रोण कर्णा साध्य न हें झालें । इंद्रपद आलें हातीं माझ्या ॥ २ ॥
आतां मी असावें कल्याण सर्वदा । स्वर्गामाजी आतां पुनर्भेट ॥ ३ ॥

ऐसें बोलूनियां राय स्तब्ध झाला । स्वर्गामीजी गेला भागल्यागें ॥४॥
वारंवार तया आलिंगिती वीर । द्रौणीनें अपार शोक केला ॥ ५ ॥
कृप, कृतवर्मा पाहूनि तो शोक । दुःखें नगराज नेतो तया ॥ ६ ॥
सूत म्हणे राया, अनर्थ हा घोर । जाहला संहार तुझ्या कर्में ॥ ७ ॥
मम शोकार्ताची गेली दिव्यदृष्टी । मज अर्पिली जी द्वैपायनें ॥ ८ ॥
जनमेजयाप्रति कथी मुनिराज । सोडी दीर्घश्वास अंध तदा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दुष्कर्माचें फल । ऐकूनि निर्मल होवो मन ॥ १० ॥

---

## ऐषीकपर्व २

अध्याय १० वा

५०

वैशंपायन तें कथिती जनमेजया । सूत धर्मराया वृत्त कथी ॥ १ ॥
द्रौपदेय तेवीं धृष्टद्युम्नसुत । असतां निद्रावश शिबिरामाजीं ॥ २ ॥
अश्वत्थामा, कृप, कृतवर्मा दुष्ट । आले अकस्मात क्रूरपणें ॥ ३ ॥
निद्रिस्थांचा केला संहार खलांनीं । अवशिष्ट कोणी शिबिरीं नसे ॥
उच्छिन्न कानन करावें त्यापरी । कापाकाप झाली मध्यरात्रीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सूत सात्वताचा । उरलों म्हणे आतां एकाकी मी ॥ ६ ॥

५१

महाघोर वृत्ता ऐकूनियां धर्म । मूर्छित होऊन पडला खालीं ॥ १ ॥
सात्यकि तयासी सांवरूनि धरी । येई शुद्धीवरी पुढती धर्म ॥ २ ॥
बांधव सकल पाहूनि सन्निध । आर्तस्वरें शोक करी बहु ॥ ३ ॥
शत्रूंसीही म्हणे न कळे कालगति । जित जेत्यांप्रति करिती जित ॥
जिंकूनि सर्वांसी जित झालों आम्ही । विजय मानूनि नष्ट झालों ॥
अनर्थाचे ठाईं अर्थसिद्धि होई । विजय तो पाहीं पराजय ॥ ६ ॥
विजयें ज्या होई पश्चात्ताप दुःख । विजय तो व्यर्थ निश्चयेंसी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बेसावधपणें । वांचले विक्रमें तेही मेले ॥ ८ ॥

५२

धर्म म्हणे झाला प्रमादें हा नाश । धनी पातकास आम्हीचि या ॥

सत्य सत्य रणसिंहाचि तो कर्ण । दंष्ट्रा त्याचे बाण, खड्ग जिव्हा ॥
विस्फारित वक्त्र जाणावें तें चाप । प्रत्यंचेचा नाद गर्जना ते ॥३॥
अथवा रणडोह बाणवृष्टि लाटा । जाणा आयुध गजां मकर मत्स्य ॥
वाहनें तीं रत्नें, आवर्त धनुष्यें । उसळला जेथें बाणफेन ॥ ५ ॥
युद्धप्रसंग हा चंद्रोदय साचा । द्रोणसागराला उफाळतां ॥ ६ ॥
वांचले जे वीर तेचि अद्य नष्ट । हाय हाय कष्ट दुर्दैव हें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रमादें अनर्थ । अर्थ समीपस्थ दूर जातो ॥ ८ ॥

५३

ध्वज तोचि धूम्र बाण त्याचि ज्वाला । कोपाचि भासला झंझावात ॥
फडत्कारशब्द प्रत्यंचानिनाद । भीष्म दावानल शस्त्राहुत ॥ २ ॥
भडकतां तोहि साहिला जयांना । अद्य तयां हानी प्रमादानें ॥ ३ ॥
प्रमादें या विद्या तप, श्री वा यश । सर्वथा अशक्य जगामाजी ॥ ४ ॥
अप्रमादें इंद्र भोगी नित्य सौख्य । प्रमादें हे नष्ट पुत्र शूर ॥ ५ ॥
सागर तरूनि गोष्पदीं बुडावें । वैस्य, तैंवी झालें प्रमाद हें ॥ ६ ॥
निःसंशय तयां लाभेल सद्गति । परी द्रौपदीसी काय सांगूं ॥ ७ ॥
पुत्र-भ्रातृवध दावाग्निनें दग्ध । होईल ती अद्य काय कथूं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुःखाकुल धर्म । ऐसा हा दारुण शोक करी ॥ ९ ॥

५४

सूत म्हणे राया पुढती नकुळासी । आणीं द्रौपदीसी म्हणे धर्म ॥ १ ॥
ऐकूनि ते आज्ञा द्रौपदीमंदिरीं । पातला सत्वरी माद्रीसुत ॥ २ ॥
इकडे धर्मराज सहपरिवार । जाऊनि तें घोर स्थळ पाहे ॥ ३ ॥
छिन्न भिन्न पुत्रमित्रांसी पाहिलें । रूदन मांडिलें दुःखें तदा ॥ ४ ॥
आक्रोश त्या वेळा करी धर्मराज । पडला मूर्छित पुण्यवंत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्माचा हा खेळ । रंगवी गोपाळ कर्मासम ॥ ६ ॥

अध्याय ११ वा

५५

आठवूनि गुण मांडिला विलाप । दुःखें पावे कंप धर्मराज ॥ १ ॥
समाधान त्याचें करितो इष्टमित्र । येई इतुक्यांत याज्ञसेनी ॥ २ ॥
ऐकूनि वृत्तांत पाहूनि तें दृश्य । जाहली मूर्छित कोमलांगी ॥ ३ ॥

गांधारीतां भीम वदली तयासी । भोगा साम्राज्याचीं सौख्यें आतां ॥
प्रायश्चित्त लाभे दुष्टासीं न जरी । उपवासें तरी त्याजिन प्राण ॥ ५ ॥
धर्म म्हणे पुत्रां लाभली सद्गति । शोधावे दुष्टांसी कोठें आतां ॥
वासुदेव म्हणे धर्माचें वचन । ऐकूनि भाषण करा कृष्णा ॥ ७ ॥

५६

मस्तकीं द्रोणीच्या सहजमणि असे । संहारूनि त्यातें आणावा तो ॥
धर्ममस्तकां तो झळकेल जरी । वांचतील तरी प्राण माझे ॥२॥
बोलूनियां ऐसें वदली भीमसेना । रक्षावे मत्प्राणा महावीरा ॥३॥
आजवरी केले बहुत विक्रम । तयांचें स्मरण होवो आजी ॥४॥
वधूनि दुष्टासी व्हावें कृतकृत्य । ऐकूनियां रथ हांकी भीम ॥५॥
भरधांव फेंकी अश्व तो वेगानें । गर्जत क्रोधानें गेला वीर ॥७॥
वासुदेव म्हणे अश्वत्थामावध । हेतु हा मनांत धरी वीर ॥७॥

अध्याय १२ वा

५७

कृष्ण म्हणे धर्मा, पुत्रशोकमग्न । सूडभावें भीम पुढती गेला ॥१॥
सकलांहूनि प्रिय धर्मा, तोचि तुज । उपेक्षा कां अद्य करिसी त्याची ॥
द्रोणदत्तब्रह्मशिरास्त्र तो विप्र । जाळील अविचार करूनि विश्वा ॥३॥
उतावीळपणें अस्त्र तें पित्यासी । मागतां अस्त्रासी अर्पूनियां- ॥४॥
द्रोण तयालागीं वदले हें कदापि । घाळा नच योजीं मनुजावरी ॥५॥
सन्मार्गगामी तूं न होसील पुत्रा । ऐकूनि निराशा होई त्याची ॥६॥
सत्कर्म आपुल्या हातें नच घडे । चिंतूनियां हिंडे भूमीवरी ॥७॥
हिंडतां हिंडतां आला द्वारकेसी । श्रीकृष्ण धर्मासी वृत्त कथी ॥८॥
वासुदेव म्हणे मागे सुदर्शन । करितां म्हणे दान ब्रह्मशिर ॥९॥

५८

ऐकूनियां धर्मा, बोललों मी तया । संपादीं या ठाया इच्छिसी तें ॥
चक्र, गदा, चाप तोलेल जें तुज । नेऊनि आनंद पावें विप्रा ॥२॥
ब्रह्मशिरोस्त्रहि न देई मजसी । ऐकूनि तयासी हर्ष झाला ॥३॥
उतावीळपणें घेऊनियां झेंप । सुदर्शनचक्र उचलूं पाहे ॥४॥

परी तें कैसेंचि उचलेना ऐसें । पाहूनि तयाचें न चले कांहीं ॥५॥
तदा धर्मा, तया बोललों वचन । पार्थही मत्प्राण विप्रा कदा ॥६॥
बोलला न ऐसें अथवा पुत्र मित्र । अपेक्षिलें चक्र नाहीं कोणी ॥७॥
वासुदेव म्हणे धर्मासी श्रीकृष्ण । बोलला वचन पुढती ऐका ॥८॥

५९

धर्मा, त्या विप्रासी पुशिलें हेतु काय । तदा बोले काय तेंचि ऐकें ॥
कृष्णा, तुझ्यासवें करीन मी युद्ध । होईन अजिंक्य हेचि इच्छा ॥
देतांही त्वां मज न लाभलें चक्र । गांठीन स्वस्थळ सुखें आतां ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें श्रेष्ठ अश्व, धन । रत्नें संपादून गमन केलें ॥ ४ ॥
ऐसा अविचारी दुरात्मा चपळ । जाण तें दिव्यास्त्र रक्षीं भीमा ॥५॥
वासुदेव म्हणे ऐसे थोर थोर । पोराहूनि पोर स्वार्थें होती ॥ ६ ॥

अध्याय १३ वा

६०

ऐसें बोलूनियां कृष्ण । हांकी आपुला स्यंदन ॥ १ ॥
शैब्य, सुग्रीव त्या अश्व । मेघपुष्प, बलाहक ॥ २ ॥
ध्वजावरी वैनतेय । समीपचि धनंजय ॥ ३ ॥
धर्म शोभे अन्य भागीं । ऐसा रथ चाले मार्गी ॥ ४ ॥
गांठियेलें भीमाप्रति । परी नावरे तो त्यांसी ॥ ५ ॥
भागीरथीतीरीं विप्र । कळतां धांवे वृकोदर ॥ ६ ॥
पुढती दिसले तया व्यास । अश्वत्थामाही घृतलिप्त ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्र । पांघरला दर्भवस्त्र ॥ ८ ॥

६१

अश्वत्थाम्याप्रति पाहूनियां भीम । धांवला गर्जून चापधारी ॥ १ ॥
थांब, थांब ऐसे ऐकूनियां शब्द । अवलोकी विप्र कृष्णार्जुनां ॥ २ ॥
भयभीत ब्रम्हशिरोस्त्रातें जपे । धरूनि धैर्यातें अश्वत्थामा ॥ ३ ॥
अभिमंत्रूनियां दीर्घदर्भावरी । फेंकिलें सत्वरीं अस्त्र विप्रें ॥ ४ ॥
अविचारें बलाबल न चिंतिलें । क्रूरपणें बोले अस्त्रालागीं ॥ ५ ॥
पांडव निःपात करीं रे जा अस्त्रा । प्रलयकाल आला तयावेळीं ॥६॥
वासुदेव म्हणे प्रगटला अग्नि । जाळील अवनी ऐसें वाटे ॥ ७ ॥

अध्याय १४ वा ६२

पूर्वींच कृष्णानें सकल जाणूनि । प्रेमें संबोधूनि अर्जुनासी ॥ १ ॥
अर्जुना, अर्जुना, द्रोणदत्त अस्त्र । जेंं हीच वेळ त्वरा करीं ॥ २ ॥
एकूनि ते शब्द 'असावें कल्याण' । बोलूनि स्यंदन त्यजिला पार्थें ॥
अस्त्रनिवारण होवो संरक्षण । सकळांचें, अर्जुन वदला तदा ॥४॥
वंदूनि वृद्धांसी सोडियेलें अस्त्र । कांपे थरथर भूमि तदा ॥५॥
अस्त्रावरी अस्त्र जातांचि प्रळय । होईल हें भय सज्जनांजी ॥६॥
व्यास, नारद तैं विश्वरक्षणार्थ । मध्यभागीं स्थित होती वेगें ॥७॥
आजवरी झाले अस्त्रज्ञ बहुत । सोडिलें न अस्त्र म्हणती ऐसें ॥८॥
वीरहो, साहस काय तुम्हीं केलें । वासुदेव बोले म्हणती मुनि ॥९॥

अध्याय १५ वा ६३

पाहूनि मुनींसी विनम्र अर्जुन । आंवरी दारुण शस्त्राप्रति ॥१॥
जोडूनियां कर बोलला मुनींसी । सांभाळा आम्हांसी सकळांसवें ॥२॥
पापकर्मा आम्हां जाळील अस्त्रानें । अस्त्र तें अस्त्रानें निवारिलें ॥३॥
बोलूनियां ऐसें आंवरी निजास्त्र । देवांही अशक्य कर्म ऐसें ॥४॥
अस्खलित ब्रह्मचर्यांविण ऐसें । बळ न कोणातें जगामाजी ॥५॥
अश्वत्थाम्याप्रति नव्हतें तें शक्य । होऊनि निराश वदला व्यासां ॥
संकटीं या मुनि, पांडववधार्थ । सोडियेलें अस्त्र करिल कार्य ॥७॥
वासुदेव म्हणे अश्वत्थामा बोले । पापकर्म केलें भयामुळें ॥८॥

६४

मुनि म्हणे विप्रा, थोर हा अर्जुन । घेई आंवरून निज अस्त्र ॥१॥
केवळ रक्षणास्तव हें तयानें । सोडिलें धैर्यानें आंवरिलें ॥२॥
क्रोध, नाशहेतु नव्हता तयासी । कां रे इच्छितोसी नाश त्याचा ॥३॥
विकारहीन तो विवेकी सज्जन । जाणे तो परिणाम घोर याचा ॥४॥
ब्रह्मास्त्र ब्रह्मास्त्रें होतां निवारित । द्वादशाब्द तेथ अवर्षण ॥ ५ ॥
यास्तव हे विप्रा, जगत्कल्याणार्थ । आंवरीं अस्त्रास सुज्ञपणें ॥ ६ ॥
आंवरीं आपुला क्रोध, सुखें वास । करीं, पांडवांस अर्पीं मणि॥ ७॥
मस्तकीं जो तुझ्या असे सर्वकाळ । वीर रक्षितील तुजलागीं ॥ ८ ॥

वासुदेव म्हणे व्यासांचें वचन । ऐकूनि ब्राह्मण वदला ऐका ॥ ९ ॥

६५

अश्वत्थामा म्हणे द्वैपायनाप्रति । मोल या मण्यासी जगतीं नसे ॥१॥
धारण करितां मणी हा मस्तकीं । शस्त्रभय त्यासी नसे कदा ॥ २ ॥
क्षुधा, रोगभय, देवदैत्यांचेंही । नसे तया पाहीं तस्करभय ॥ ३ ॥
आज्ञेस्तवचि हा केवळ अर्पीन । दुष्टांचा वधीन परी गर्भ ॥ ४ ॥
अस्त्रनिवारणसामर्थ्य न मातें । उलंघीं वचनातें ऐसें नसे ॥ ५ ॥
व्यासाज्ञेनें तदा उत्तरेचा गर्भ । छेदावया अस्त्र सोडियेलें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्णद्वैपायन । अनुज्ञा सर्वज्ञ देती तया ॥ ७ ॥

अध्याय १६ वा

६६

हर्षोत्फुल्ल तदा बोलला श्रीकृष्ण । होतां परिक्षीण कुरुवंश ॥ १ ॥
परिरक्षिता त्या तोचि परिक्षित् । वदला कोणी विप्र उत्तरेसी ॥ २ ॥
होईल तयाचें कथित तें सत्य । उत्तरेसी पुत्र निश्चयेंसी ॥ ३ ॥
क्रुद्ध अश्वत्थामा बोलला तें कृष्णा । अस्त्र त्याच्या प्राणा घेईलचि ॥४॥
कृष्ण म्हणे अस्त्र वधिल बाळासी । परी पुनरपि जीवित त्या ॥ ५ ॥
दीर्घायुष्य तेंवी लाभेल तयासी । निंद्य सज्जनांसी बालघ्न तूं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्ण भगवान । बोलला वचन शापयुक्त ॥ ७ ॥

६७

दुष्टा, पापाचें या फळ । भोगिसील दीर्घकाल ॥ १ ॥
तीन सहस्र वत्सरें । विजन काननीं विचरें ॥ २ ॥
संभाषणही कोणासी । नच घडे ऐसी स्थिति ॥ ३ ॥
पूय-शोणितदुर्गंध । युक्त, होवो तुझें अंग ॥ ४ ॥
बाळ शास्त्रपारंगत । साठ संवत्सर राज्य ॥ ५ ॥
करील हा आनंदानें । तुझ्या समक्ष शौर्यानें ॥ ६ ॥
पाहीं तपोबळ माझें । उठवीन मी या बाळातें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । घोर परिणाम कर्माचा ॥ ८ ॥

६८

अश्वत्थाम्याप्रति बोलले तैं व्यास । अवमानूनि नीच घडलें कर्म ॥१॥
असूनि ब्राह्मण क्षत्रियांचा धर्म । स्वीकारूनि कर्म घोर ऐसें ॥ २ ॥
वास्तव श्रीकृष्णवचन हें सत्य । होईल निश्चित समजें मनां ॥ ३ ॥
विप्र म्हणे तुम्हांसवेंचि या लोकां । राहीन कृष्णासीं यश लाभो ॥४॥
वासुदेव म्हणे शात्यांचा दुर्ध्वंस । सर्वकाळ धाक राहो जनीं ॥ ५ ॥

६९

पुढती पांडवां अर्पूनियां मणि । वनांत निघूनि गेला विप्र ॥ १ ॥
निर्वैर पांडव सत्वरी निघाले । मुनींद्रांसी केलें अग्रभागीं ॥ २ ॥
शिबिरीं येऊनि याज्ञसेनीप्रति । वृत्त निवेदिती घडलें तेंचि ॥ ३ ॥
अर्पूनियां मणि बोले भीमसेन । आमुचें वचन पूर्ण झालें ॥ ४ ॥
प्राशिलें रुधिर, फोडियेला अंक । वैराचा त्या अंत आजि झाला॥५॥
जिंकूनि विप्रासी हरूनियां तेज । सोडिलें जिवंत, मर्यादा ते ॥ ६ ॥
ऐकूनि द्रौपदी संतोषली मनीं । म्हणे राव मणि स्वीकारो हा ॥ ७ ॥
द्रोणांचा प्रसाद धर्म घेई शिरीं । उदितचंद्रगिरीसम शोभे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे उठली द्रौपदी । धर्म श्रीकृष्णासी प्रश्न करी ॥ ९ ॥

अध्याय १७ वा

७०

कोण्या पुण्यें कृष्णा, यश दुरात्म्यासी । लाभलें सौप्तिकीं सांगें मज ॥
कृष्ण म्हणे साक्षात् शंकर वंदिला । सामर्थ्य जयाला अमर्याद ॥ २ ॥
आदि मध्य अंत हाचि सकलांचें । आत्मलिंग क्रोधें छेदियेलें ॥ ३ ॥
जलमग्न होतां, अन्य भूतसृष्टि । निर्मूनि, रक्षिली, कळतां शिवें ॥ ४ ॥
पुशितां ब्रह्मयानें कथूनि कारण । गिरि भुजवान गांठियेला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे क्रोधरूप शिव । विश्वाचा संहार करिल क्षणीं ॥ ६॥

अध्याय १८ वा

७१

पुढती सत्ययुगीं करितां यज्ञासी । भाग शंकरासी दिधला नाहीं ॥
तदा शंकरानें निर्मूनियां चाप । केलें घोरकृत्य यज्ञस्थानीं ॥ २ ॥
मृगरूपें यज्ञ करी पलायन । देवांसी ताडन केलें शिवें ॥ ३ ॥

अंतीं ते शरण येतां संतोषला । यज्ञ पूर्ण झाला पुढती सौख्यें ॥४॥
हविर्भाग त्याचा नियोजित केला । हर्ष तदा झाला ब्रह्मांडांत ॥५॥
कोपें त्याच्या खेद, आनंदें आनंद । होतसे विश्वांत युधिष्ठिरा ॥६॥
तयाच्या कृपेनें लाभलें हें यश । विप्रास कर्तृत्व नसे त्याचें ॥७॥
यास्तव तयाची संपादूनि कृपा । पुढील उद्योगा लागें राया ॥८॥
वासुदेव म्हणे पर्व हें सौप्तिक । जाहलें समाप्त वंदूं शिवा ॥९॥

## सौप्तिकपर्व समाप्त

या सौतिकपर्वाची एकंदर अभंगसंख्या ७१

पुढील स्त्रीपर्वाचा आद्यश्लोक—

जनमेजय उवाच—

हते दुर्योधने चैव हते सैन्ये च सर्वशः ।
धृतराष्ट्रो महाराज श्रुत्वा किमकरोन्मुने ॥ १ ॥

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग--भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## ११ स्त्रीपर्व

### जलप्रदानिकपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला

१

नारायण नर वंदूं सरस्वती । सद्भावें पुढती ग्रंथ गाऊं ॥ १ ॥
वैशंपायनासी पुढील वृत्तांत । पुशितां तयास मुनि कथी ॥ २ ॥
शाखाभग्नवृक्षासम धृतराष्ट्र । करी पुत्रशोक चिंतामग्न ॥ ३ ॥
सांत्वन तयाचें करूनि संजय । म्हणे अंत्यकार्य करीं आतां ॥ ४ ॥
धृतराष्ट्र तदा बोलला संजय । जगावें कासया आतां सांग ॥ ५ ॥
पक्षविहीन मी जराजीर्ण पक्षी । ऐकिली न वुद्धि ज्ञात्यांचीही ॥ ६ ॥
काय घोर पाप केलें पूर्वजन्मीं । ऐसा दुःखी कोणी जगतीं नसे ॥७॥
परलोक अद्य गांठीन यास्तव । पाहोत पांडव सदाचारी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे फल दुष्कर्मांचें । भोगितां नरातें क्लेश वहु ॥ ९ ॥

२

म्हणे संजय नृपासी । राया, त्यजीं या शोकासी ॥ १ ॥

वेदशास्त्रज्ञ तूं थोर । श्रवण केलेसी साचार ॥ २ ॥
झाला दुष्टांचा सन्मान । महाज्ञात्यांचा अवमान ॥ ३ ॥
वृद्ध युद्ध ऐसें मूढ । अविचारें वदला नित्य ॥ ४ ॥
ताचि पुत्र तुझा ज्ञाता । मानिलासी मोह चित्ता ॥ ५ ॥
वायु, भाषणें तां दुष्ट । पार्थकोपाग्नि प्रदीप्त ॥ ६ ॥
लोभघृत तयामाजी । पडतां वेळ ही नाशाची ॥ ७ ॥
आतां करूं नको शोक । भिजलें अश्रूंनीं हें मुख ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सूत । म्हणे थोर हा विवेक ॥ ९ ॥

अध्याय २ रा

३

मुनि म्हणे राया, अमृतासमान । विदुरभाषण ऐकवो नृपा ॥ १ ॥
क्षत्ता म्हणे नृपा, ऊठ कां निजसी । आंवरी चित्तासी विवेकानें ॥२॥
विश्वाची हे गति जाण निश्चयानें । रिक्त होती धनें भांडारींचीं ॥
संचयाचा क्षय, जाणावा निश्चय । तेंवी पतन होय चढतां जसें ॥४॥
वियोगान्त राया, संयोग जाणावे । जीवित गणावें मरणान्त हें ॥५॥
शूर, भ्याडातेंही मृत्यूचि गांठितो । कां न युद्धोत्सुक क्षत्रिय सांगें ॥
युद्धांहि कोणी मरूनियां जाती । रणांत वांचति कोणी वीर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नेईल ज्या काळ । कोण वांचवील तयालागीं ॥ ८ ॥

४

स्वप्नसौख्यासम जाणावें हें सौख्य । शून्य आदिअंत भासचि तो ॥
स्वप्ननाशें जेंवी दुःख न मानावा । तैसाचि जाणावा व्यवहार हा ॥
मृताच्या संबंध शोकें नच जाई । तैसाचि न येई मृत्यु शोकें ॥३॥
खेंचीतसे काल सकल विश्वासी । प्रियाप्रिय त्यासी नसे कोणी ॥४॥
सकल तृणाग्रें वायु जैं हालवी । कालवश पाहीं तेंवी प्राणी ॥ ५ ॥
एकाचि माळेचे मणी आम्हीं सर्व । ओढीतसे काळ यथाक्रम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता रायाप्रत । बोले कां शोकासी करिसी ऐसा ॥७

५

पुत्र-पौत्र राया, रणांत निमाले । उत्तम लाभले लोक तयां ॥ १ ॥

क्षत्रियांसी ऐसें दुर्लभ मरण । शोकासी कारण लवही नसे ॥ २ ॥
जन्म आजवरी असंख्य लाभले । पुत्र-पौत्र झाले असंख्यात ॥ ३ ॥
तयांमाजी सांगें कोण ते कोणाचे । शोक भय लाभे मूढा नित्य ॥४॥
ज्ञात्यालागीं शोक भयाची न बाधा । ग्रासिता समस्तां महाकाळ ॥५॥
जागृत तो नित्य दुर्लंघ्य सर्वदा । अनित्य संपदा रूप वय ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अनित्याचा शोक । न करी विवेक करूनि ज्ञाता ॥७॥

६

सर्वदेश आजी दुःखांत निमग्न । एकाकी रडून काय लाभ ॥१॥
प्राणान्त आपुला करूनि हें दुःख । न टळेचि स्पष्ट सकलां कळे ॥
शोकनिरासार्थ एकचि औषध । दुःखदप्रसंग चिंतूं नये ॥३॥
चिंततां न जाय, वृद्धीचि दुःखाची । अनिष्ट अज्ञासी दुःख होई ॥४॥
धर्मअर्थ सौख्य न लाभे शोकानें । त्रिवर्गनाशानें अनहित ॥५॥
न्यूनाधिकधनें दुःखी सुखी अज्ञ । विचलित प्राज्ञ नसे तेणें ॥६॥
शारीरिकदुःखें हरावीं प्रज्ञेनें । तेंवी औषधानें देहदुःखें ॥७॥
वासुदेव म्हणे क्षत्ता नृपाळास । सांगे राया, शोक बालभाव ॥८॥

७

राया, पूर्वकर्म न टळे कोणासी । तिष्ठे तिष्ठतांचि पळतां धांवे ॥१॥
निद्रिस्तासन्निध तेंही झोंप घेई । तत्तत्काळीं देई तेंचि फल ॥२॥
तत्तत्शरीरें जें कर्म तेंचि फळ । घेऊनि शरीर तेंचि लाभे ॥३॥
आपुला आपण जाण शत्रु-मित्र । साक्षी स्वकर्मास आपणाचि ॥४॥
शुभकर्में सुख अशुभें तें दुःख । कर्मावीण देख फल नसे ॥५॥
राया, हें जाणूनि तुजसम ज्ञाते । आत्मविघातातें रमतीनाचि ॥६॥
वासुदेव म्हणे विदुराची वाणी । अमृताचे जनीं अमर करी ॥७॥



८

राव म्हणे इष्टनाश, अनिष्टाची । प्राप्ति होतां कैसी समता घडे ॥१॥
साधो, तुझ्या बोधें शोक दूर होई । तत्वज्ञा, हरावी शंका मम ॥२॥

जैसें जैसें मन सुखदुःखमुक्त । संयमितां त्यास शांति लाभे ॥३॥
निःसार हें सर्व कदलीसमान । वरितां मरण मुक्ति नसे ॥४॥
मरणोत्तरही भिन्नभिन्नावस्था । कर्मासम क्षत्ता म्हणे प्राप्त ॥५॥
वास्तव तपस्वी भोगुनियां कष्ट । इष्ट तेंचि प्राप्त करूनि घेती ॥६॥
तपासम पुण्यलोकही विविध । कुलरूपादिक कर्मासम ॥७॥
अदृष्टासमान संयोग वियोग । प्रारब्धाचा भोग वासुदेवा ॥८॥

९

जाणूनियां तत्व आशा कवणाची । कदा पंडितासी असोचिना ॥१॥
सदनें जैं भिन्न शरीरें हीं तैसीं । योग्यकाळीं जाती अन्य देहा ॥२॥
अशाश्वत देह शाश्वत हा जीव । वस्त्र जेंवी नव तैसा जन्म ॥३॥
स्वर्ग नरक वा कर्मेंचि लाभतो । इच्छा असो नसो मानवाची ॥४॥
घट चक्रावरी, काढितां, वाळतां । अथवा पक्व होतां भग्न पावे ॥५॥
तैसाचि हा देह अकालींही नासे । कर्मासम त्याचे विविध भाव ॥६॥
कर्मासम जन्म-मरण वा मोक्ष । व्यर्थ ऐसा शोक न करीं राया ॥७॥
जलमग्न क्रीडा करी जेंवी प्राणी । निमज्जोन्मज्जनीं तेंवी जीव ॥८॥
रहस्यज्ञ परी दुःख न पावती । सद्गति तयांसी लाभतसे ॥९॥
वासुदेव म्हणे विदुराचा बोध । ऐकूनियां मोद सुजनां होई ॥१०॥

अध्याय ४ था

१०

राव म्हणे कसें संसारअरण्य । जाणावें, कथन करीं साधो ॥१॥
क्षत्ता म्हणे शुक्र-शोणित संयोग । होतां राहे गर्भ कलिलरूप ॥२॥
पंचमास होतां चैतन्याविर्भाव । दशममासा होय जन्म तया ॥३॥
ग्रह, व्याधी, तया पुढती अनेक । विषयपाशबद्ध होतां दुःख ॥४॥
विषयव्यसनें तृप्ति नच होई । विवेक न राही कर्माकर्मीं ॥५॥
ज्ञाता योग्यकाळीं होऊनि सावध । रक्षी आपणांस ऐशावेळीं ॥६॥
मूढासी विवेक कदा नच होई । वारंवार येई जन्म तया ॥७॥
वासुदेव म्हणे मूढासी विपत्ति । सावध करितां परी व्यर्थ ॥८॥

११

अहो, हीनत्वासी पावले हे जन । लोभाचे गुलाम सकल झाले ॥१॥

लोभ क्रोध-भयें जाहले उन्मत्त । कैसें स्वस्वरूप जाणेतील ॥२॥
कुलीन निंदिती अकुलिनांप्रति । दरिद्यां निंदितो द्रव्यदर्पे ॥३॥
मूर्खत्व अन्यासी लाविती सत्वरी । विचार अंतरीं लवही नसे ॥४॥
अन्यासी लाविती सर्वकाळ दोष । कदा आत्मदोष बघतोचेना ॥५॥
परी यमद्वारीं जातां ते सकळ । अभिमान निर्मूल होई त्यांचा ॥६॥
एकत्रचि सर्व सोशितातो हाल । तथापि निष्फल धरिती हांव ॥७॥
वासुदेव म्हणे धर्माचाररत । तोचि पुण्यलोक पावे ज्ञानें ॥८॥

अध्याय ५ वा १२

कैसा धर्मवर्नी करावा संचार । बुद्धीचा आधार घेऊनियां ॥१॥
धृतराष्ट्र ऐसें पुशितां विदुर । करी नमस्कार ब्रह्मदेवा ॥२॥
म्हणे राया, एकें महावना एक । गहन स्थळास येई विप्र ॥३॥
सिंह व्याघ्र गज बहुत त्या स्थानीं । विक्राळ गर्जूनि कांपविती ॥४॥
साक्षात् कृतांतही भय पावे तेथें । थरथरां कांपे विप्रअंग ॥५॥
अंतीं आश्रयार्थ चोहींकडे धांवे । मार्ग न सांपडे परी तया ॥६॥
इतस्ततः तया दिसतो वागुर । पकडी भयंकर कृत्या तया ॥७॥
पंचफणायुक्त फूत्कारती नाग । गगनभेदी वृक्ष विस्तारले ॥८॥
वासुदेव म्हणे ऐसें घोर वन । कूप तृणाच्छन्न तेथ होता ॥९॥

१३

धांवतां धांवतां विप्र सैरावैरा । हाय कोसळला कूपामाजी ॥१॥
दैवें लतेमाजी गुंतूनि चरण । पनसफलासम लटकूं लागे ॥२॥
अध शिर ऊर्ध्वपादचि तो ऐसा । सांप्रत त्या कूपामाजी असे ॥३॥
हाय हाय तया कूपा एक व्याळ । पाहूनि व्याकुळ विप्र होई ॥४॥
कांठावरि एक षण्मुख गजेंद्र । चरण कृष्ण-शुभ्र द्वादश त्या ॥५॥
आश्रयभूत तो लता जया वृक्षीं । गज त्या वृक्षासी मोडूं पाहे ॥६॥
राया, नवल त्या वृक्षशाखेवरी । मधुपटलावरी भ्रमर बहु ॥७॥
वासुदेव म्हणे पहा भ्रमरावलि । मधुपानीं रंगली तया वृक्षीं ॥८॥

१४

मधु आवडेन कोणा । लुब्ध घालकें त्या जाणा ॥ १ ॥

ऐसी मधुर मधुधारा । तोष देई तया विप्रा ॥ २ ॥
ऐशा संकटींही प्राणी । दंग होई मधुपानीं ॥ ३ ॥
जीविताचा न सुटे लोभ । मधु सेवनीं तो धुंद ॥ ४ ॥
शुभ्र कृष्ण मूषकांनीं । वृक्षमुळेंही छेदिलीं ॥ ५ ॥
ऐसें विघ्न पटक जया । वैराग्य न उपजे तया ॥ ६ ॥
जीविताशाही बलिष्ठ । वासुदेव मानीं कष्ट ॥ ७ ॥

अध्याय ६ वा १५

राव म्हणे ऐशा संकटीं तो विप्र । कैसें मधुसौख्य मानीतसे ॥ १ ॥
स्थान त्याचें कोठें सांगावें मजला । सोडवूं तयाला ऐसें वाटे ॥ २ ॥
क्षत्ता म्हणे राजा वर्णिलें ज्ञात्यांनीं । रूपक जाणूनि मुक्तिलाभें ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे संस्कृतीचा बोध । रूपकें सहज होईल या ॥ ४ ॥

१६

अनादि संस्कृति हेंचि वन घोर । व्यक्तीचा संसार गहन स्थान ॥ १ ॥
व्याधि तीचि नाग, कृत्या जाण जरा । कूप या शरीरा म्हणती ज्ञाते ॥
काळ तोचि व्याळ, भक्षक सर्वांचा । लता जीविताशा नृपा जाणें ॥
संवत्सर गज, ऋतु त्यांचीं मुखें । चरण द्वादश ते मास ख्यात ॥ ४ ॥
दिनरजनी ते मूषक जाणावे । काम ते मानावे भ्रमर तेथें ॥ ५ ॥
विषय तो मधु, धुंद तेथें नर । ऐसें भवचक्र जाणें ज्ञाता ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा शुद्ध बोध । भवपाश छेद करीतसे ॥ ७ ॥

अध्याय ७ वा १७

राव म्हणे क्षत्त्या, सत्य तूं तत्वज्ञ । गोड हें वचन सुधेहूनि ॥ १ ॥
अतृप्तचि नित्य ऐकून हे भाषा । सांगा पुनः पुनः तीचि मज ॥ २ ॥
क्षत्ता म्हणे राया, कथितों विस्तृत । ऐकोनियां मुक्त होती जन ॥ ३ ॥
पांथस्थ चालतां घेई जैं विश्रांती । तैसीचि हे लोकीं समजें जन्म ॥
विसरूनियां हे रमताती मूढ । ज्ञानी होती मुक्त जाणूनि हें ॥ ५ ॥
म्हणती यास्तव ज्ञाते तया मार्ग । गुंतती तयांस वनचि हा ॥ ६ ॥
आवर्त हा जगीं स्थावर जंगमा । गवसे न जाणा ज्ञाता एथ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रत्यक्षा प्रत्यक्ष । शरीर मानस दुःखव्याळ ॥ ८ ॥

१८

अज्ञासी हे व्याळ देती बहु क्लेश । घेती वारणार्थ क्लेश बहु ॥ १ ॥
पूर्वकर्मं परी बद्ध अल्पबुद्धि । सुटतांही तयांसी जरा व्यापी ॥ २ ॥
मज्जा, मांस, पंकयुक्त देह कूपीं । पडतांही विषयीं मग्न होई ॥ ३ ॥
हरिती आयुष्य संवत्सर मास । मूढाच्या ध्यानांत न येई तें ॥ ४ ॥
कर्मं विधात्याची अपल्यें हे प्राणी । शरीरस्यंदनीं बुद्धिसूत ॥ ५ ॥
इंद्रियें तें अश्व, मन हेंचि रश्मी । धरितां आंवरूनि मार्गीं रथ ॥ ६ ॥
मोकाट सोडितां भ्रमण या चक्रीं । भ्रमेल जो त्यासी दुःख बहु ॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यानें सर्वदा । यत्नाचि करावा मुक्तीस्तव ॥ ८ ॥

१९

यतेंद्रिय तेंवी क्रोध लोभहीन । सत्य तोष जाण शांति तया ॥ १ ॥
अज्ञ मोहकारी स्यंदन हा यौम्य । यमद्वारीं जाण नेई जीवां ॥ २ ॥
तीच गति राया, लाभली तुजसी । धरितां तृष्णेसी हेंचि फळ ॥ ३ ॥
आत्मज्ञान, स्थिर संयम संतोष । हेंचि या रोगास अगद असे ॥ ४ ॥
इष्ट, मित्र, द्रव्य विक्रमें न याचें । निवारण साचें होई राया ॥ ५ ॥
मित्रभावें सत्य कथितों तुजसी । संपादीं शीलासी धृतराष्ट्रा ॥ ६ ॥
दम, त्याग तेंवी अप्रमाद अश्व । परब्रह्मलोक दावताती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शील रश्मिधारी । मनोरथीं स्वारी करितां मुक्ति ॥ ८ ॥

२०

प्राणिमात्रासी अभय । दानें स्थान निरामय ॥ १ ॥
नित्य उपवास यज्ञ । करितांही न तैसें पुण्य ॥ २ ॥
प्रिय प्राण सर्वांहूनि । मरण इच्छीनाचि कोणी ॥ ३ ॥
अभय यास्तव सर्वांसी । द्यावें, व्हावें दयाबुद्धि ॥ ४ ॥
मोहमग्न अज्ञ मंद । भ्रमती संसारचक्रांत ॥ ५ ॥
सूक्ष्म दृष्टीचे जे नर । नित्य ब्रह्मीं होती स्थिर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । ठसवी बोध हा स्वचित्ता ॥ ७ ॥

१ यमाचा.

अध्याय ८ वा

२१

ऐकूनीही बोध पुत्रशोकें नृप। पडला बेशुद्ध भूमीवरी ॥ १ ॥
कृष्णद्वैपायनादिक करितां यत्न। नृपाळासी भान येई पुनः ॥ २ ॥
म्हणे मानव्यासी असावा धिक्कार। दुःख वारंवार प्राप्त येथें ॥ ३ ॥
असह्य हें दुःख जाहलें मजसी। प्राणान्तेंचि मुक्ति हावी मम ॥ ४ ॥
पित्यासी यापरी बोलूनियां नृप। राहियेला स्वस्थ शोकावेगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तदा नृपाळासी। सद्भावें बोधिती द्वैपायन ॥ ६ ॥

२२

वेदशास्त्र धर्म-अर्थज्ञ तं राया। वसे तुझ्या ठायां इष्ट ज्ञान ॥१॥
अशाश्वतता हे जाणसी विश्वाची। कासया करिसी शोक ऐसा ॥२॥
वैराचें निमित्त करूनि दैवानें। भवितव्य नेलें सिद्धीप्रति ॥३॥
उत्तम गति त्या लाभतां कां ऐसा। करिसी शोक बापा निरर्थक ॥
जाणूनि क्षत्त्यानें केलें निवारण। परी ते प्रयत्न व्यर्थ गेले ॥५॥
देवनियोजित उल्लंघील कोण। कथितों देई ध्यान देवकार्य ॥६॥
वासुदेव म्हणे चित्तस्थैर्यास्तव। करिताती बोध व्यास ऐसा ॥७॥

२३

पूर्वी मी सहज गेलों इंद्रलोकीं। आली सभेमाजीं पृथ्वी तदा ॥१॥
वदली पर्वदत्त वचन करा पूर्ण। ऐकूनि हांसूनि वदला विष्णु ॥२॥
धृतराष्ट्रपुत्रांमाजी दुर्योधन। करील तो पूर्ण हेतु तुझे ॥३॥
परस्पर नाश पावतील नृप। हरील सकल भार तुझा ॥४॥
जा लोकधारण करी, जा, कल्याणें। वास्तव्य स्वस्थानीं करूनियां ॥
वासुदेव म्हणे भवितव्य थोर। घडवी देवेंद्र कैसें चुके ॥६॥

२४

धृतराष्ट्रा, तुझा पुत्र दुर्योधन। कलिअंशें जाण जन्म त्याला ॥१॥
असहिष्णु क्रोधी, चंचल तो मूढ। राया दुराराध्य सर्वथा तो ॥२॥
बंधूही दुर्दैवें जाहले तसेचि। शकुनि कर्णाची संगति त्यां ॥३॥
राजासम प्रजा नियमचि ऐसा। परिणाम तैसा सकळ तेंवी ॥४॥
अधार्मिकभृत्य होइ तो धार्मिक। नृपाळ धार्मिक लाभतां त्या ॥५॥

स्वामीसम नित्य सेवक जाणावा । नित्य हा धरावा नियम स्वामीं॥
नृपाळाच्या दोषें जाहले हे नष्ट । वृत्त हें विदित नारदाही ॥७॥
वासुदेव म्हणे स्वापराधें नाश । होतां व्यर्थ शोक कासयासी ॥८॥

२५

पांडवांचा नव्हता दोष । पुत्रें तुझ्या केला घात ॥१॥
मयसभेंत धर्मातें । कथिलें होतें हें नारदें ॥२॥
ऐकूनियां तें पांडवां । दुःख वाटलें तेधवां ॥३॥
देवकार्य त्वपुत्रानें । केलें शांत हो श्रवणें ॥४॥
जाणोनि हें दैवाधीन । न करीं प्राणत्याग जाण ॥५॥
ब्रह्मलिखित कोणासी । न टळे हेंचि सत्य अतां ॥६॥
तूंही करितां दुःख ऐसें । धर्म त्यागील प्राणातें ॥७॥
वासुदेव म्हणे धर्म । सदय सर्वांभूतां सम ॥८॥

२६

दुर्लंघ्याचि दैव जाणूनि नृपाळा । आंवरीं आपुला शोक आतां ॥१॥
पांडवांवरी तूं करूनि करुणा । प्राणत्याग मना आणूं नको ॥२॥
तेणें तव कीर्ति होईल जगतीं । धर्म-अर्थप्राप्ति तयायोगें ॥३॥
चिर तपश्चर्यापुण्यही लाभेल । कल्याण होईल सकलांचें ॥४॥
प्रज्वलित अग्निसमाचि हें दुःख । सिंचीं ज्ञानामृत विझवीं तेणें ॥५॥
चिंतूनि नृपाळ बोलला वचन । करीन प्रयत्न मुने, ऐसा ॥६॥
वासुदेव म्हणे सत्यवतीसुत । ऐकून तें गुप्त होतो सौख्यें ॥७॥

अध्याय १ वा

२७

जनमेजय म्हणे पुढती काय झालें । मुने, निवेदावें तेंचि मज ॥१॥
मुनि म्हणे गेली संजयाची दृष्टि । वृत्तांत निवेदी नृपासी तो ॥२॥
धृतराष्ट्रपुत्रें विनाश हा केला । निवारितां झाला नाहीं बोध ॥३॥
नाइलाज आतां करीं अंत्यकर्म । ऐकूनि वचन खिन्न नृप ॥४॥
भूमीवरी अंग टाकी परम खेदें । विदुर त्या बोधें शांत करी ॥५॥
वासुदेव म्हणे वारंवार मोह । पावतसे जीव अज्ञानेंचि ॥६॥

अध्याय १० वा २८

विदुरवचनें जोडा म्हणे रथ । सकळ स्त्रियांस आणा म्हणे ॥१॥
बोलूनियां ऐसें शोकमूढ नृप । बैसला रथांत महाकष्टें ॥२॥
केवळ पतीची आज्ञा मानूनियां । गांधारी त्या ठाया प्राप्त होई ॥३॥
शोकाकुल स्त्रिया मोकलिती धाय । करिती हाय हाय आप्तांस्तव॥४॥
विदुरहि तदा होई दुःखमग्न । करी समाधान महा यत्नें ॥५॥
बसूनियां रथीं निघाला बाहेरी । मंदिरां, नगरीं हाहाःकार ॥६॥
आबालवृद्ध तें टाहो फोडिताती । म्हणती हे स्त्रियांसी घोर वेळ ॥
वासुदेव म्हणे अनाथासमान । करिती आक्रंदन कुलस्त्रिया ८॥

२९

मरतां यूथपति अनाथ करिणी । राजगृहांतूनि तैंवी स्त्रिया ॥१॥
अश्वशावकी त्या नृत्यांगणीं जैंवी । वीरांगना तैंवी धांव घेती ॥२॥
आंवळूनि मुठी करिती आक्रोश । पुत्र-बांधवांस संबोधूनि ॥३॥
प्रलयसंहार त्यावेळीं भासला । भानही कोणाला न राहिलें ॥४॥
सखीजनांतही लाजती ज्या पुरा । आजि एकवस्त्रा मार्गामाजी ॥५॥
सूक्ष्मभेद एकमेकांचें सांत्वन । करूनियां दीनवदनें जाती ॥६॥
शूद्रवैश्यादिक अवघे पौरजन । करिती रूदन मागोमाग ॥७॥
वासुदेव म्हणे दीन धृतराष्ट्र । रणस्थानमार्गे क्रमीतसे ॥८॥

अध्याय ११ ३०

लंघितां तो मार्ग ऐसा कोश एक । अश्वत्थामा, कृप दिसले तयां ॥
कृतवर्म्यासवें पातले पुढती । भेटूनि रायासी करिती शोक ॥२॥
म्हणती राया, तुझा पराक्रमी पुत्र । विक्रम दुष्कर करूनि गेला ॥३॥
अनुचरांसवें गेला इंद्रलोकीं । वीरत्रय आम्हीं उरलों आतां ॥४॥
गांधारीसी तदा बोले कृपाचार्य । पुत्र तुझे वीरमरणें मेले ॥५॥
निश्चयें तयांसी स्वर्गसौख्यलाभ । शत्रूंचाही नाश केला आम्हीं ॥
घालूनियां छापा वधिलें सकळां । अंकुर उरला नाहीं त्यांचा ॥७॥
सूडास्तव आतां येतील ते वीर । न धरावे धीर आम्हांलागीं ॥८॥

पुत्रशोकें भान हरेल तयांचें । शोधित आम्हांतें येतील ते ॥९॥
वासुदेव म्हणे घेऊनि अनुज्ञा । हांकिती अश्वांना गंगामार्गें ॥१०॥

३१

जाऊनियां दूर करूनि विचार । क्रमिती सत्वर मार्गत्रय ॥१॥
शारद्वत जाई हास्तिनापुरासी । निज नगरासी कृतवर्मा ॥२॥
व्यासाश्रमीं जाई द्रोणांचा नंदन । भयाकुल मन दुष्कर्मानें ॥३॥
सूर्योदयापूर्वीं भेटूनि नृपासी । यथेच्छ ते जाती क्रमूनि मार्ग ॥४॥
पुढती वीरांसीं गांठेल विप्रासी । जनमेजयासी विदिताचि तें ॥५॥
वासुदेव म्हणे वैशंपायनाचें । कथन नृपातें, पुढती ऐका ॥ ६॥

अध्याय १२ वा

३२

वैशंपायन जनमेजया । म्हणे वृत्त ऐकें राया ॥१॥
धृतराष्ट्र नगरत्याग । केला ऐकें धर्मराज ॥२॥
तदा सपरिवार धर्म । भेटे अंधासी येऊन ॥ ३ ॥
पुत्रशोकमग्न कृष्णा । तेही गेली तयास्थाना ॥ ४ ॥
हाय कौरवसुंदरी । शोक करिती गंगातीरीं ॥ ५ ॥
म्हणती निर्दय हा धर्म । स्वार्थें केलें घोरकर्म ॥ ६ ॥
पुत्रमित्रांच्या वियोगें । सौख्य काय तया राज्यें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुःखें । स्त्रिया निंदिती धर्मातें ॥ ८ ॥

३३

स्त्रियांमाजी दुःखें शिरूनियां धर्म । राजासी वंदन विनयें करी ॥ १ ॥
अनिच्छेनें राव भेटला तयासी । शिष्टाचार चित्तीं आणूनियां ॥२ ॥
नृपाच्या अंतरीं उदेली दुर्बुद्धि । भीमवधसंधि हेचि मानी ॥ ३ ॥
पाहूनियां मुद्रा हेतु अंतरीचा । कळला यदुनाथा तत्काळचि ॥ ४ ॥
पूर्वनियोजित लोहमयभीम । पुढती करून ओढी भीमा ॥ ५ ॥
धृतराष्ट्र तदा आलिंगी क्रोधानें । चूर्णमय केलें अंग त्याचें ॥ ६ ॥
घोर त्या कर्मानें फुटूनियां वक्ष । मुखांतूनि रक्त येई त्याच्या ॥ ७ ॥

भूमीवरी तया कोसळला राव । सांत्वन संजय करी त्याचें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पश्चात्तापें अंध । करी बहु शोक भीमास्तव ॥ ९ ॥

३४

अल्पावकाशानें शांत होतां क्रोध । म्हणे भीमवध हाय झाला ॥ १ ॥
वासुदेव वदे धृतराष्ट्राप्रति । प्रतिमा भीमाची भीम न हा ॥ २ ॥
जाणूनियां क्रोध रचिलें भीमासी । काळ हा तयासी आला होता ३॥
अयुत गजांचें बळ नृपाळासी । दृढ त्याची मिठी कोण सोडी ॥ ४ ॥
दुर्योधनकृत लोहमय भीम । संरक्षिता जाण अद्य भीमा ॥ ५ ॥
राया, धर्माधर्म राहिला न तुज । कृष्ण म्हणे अद्य पुत्रशोकें ॥ ६ ॥
निमित्तचि भीम झाला पुत्रवधा । काळाचि तयांचा आला होता ॥७॥
करूं नका आतां क्रोध किंवा दुःख । आंवरूनि चित्त विवेकानें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्राप्रति । बोलला श्रीपति सांत्वनार्थ ॥ ९ ॥

अध्याय १३ वा

३५

तयावेळीं परिचारिका । प्रक्षाळिती राजमुखा ॥ १ ॥
पुनरपि बोले कृष्ण । नृपा, असशी तूं शास्त्रज्ञ ॥ २ ॥
परिकियेलीं तूं पुराणें । वेदज्ञ तूं अध्ययनें ॥ ३ ॥
ज्ञाता बलाबलवरा । चिंतां आपुल्या अपराधा ॥ ४ ॥
अन्यावरी व्यर्थ क्रोध । दुर्लक्षिला तुवां बोध ॥ ५ ॥
परोपरीनें सकलांनीं । निवेदिलें तुजलागूनि ॥ ६ ॥
मार्ग त्यागूनि ज्ञात्यांचा । गेलासी तूं आडमार्गी ॥ ७ ॥
नाचवील दुर्योधन । तैसा नाचलासी जाण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । देई कर्माचें स्मरण ॥ ९ ॥

३६

स्वापराध दोष अन्यासी लावूनि । भीमवधकर्मी रमसी कां रे ॥ १ ॥
आंवरूनि कोप आठवां कर्मासी । छळिलें सार्ध्वीसी सभेमाजीं ॥ २ ॥
वैरासी प्रतिवैर केलें भीमसेनें । करितां दुर्योधनें छळ बहु ॥ ३ ॥
सत्य निवेदन करितां कृष्णानें । मानिलें रायानें वचन त्याचें ॥ ४ ॥
पुत्रस्नेहें मज झाला म्हणे मोह । वदला जें माधव तेंचि सत्य ॥ ५ ॥

वृकोदर अद्य वांचला हे दैव । भेटो धनंजय कृष्णा, मज ॥ ६ ॥
अर्जुनासमेत अन्य बांधवांसी । भेटूनि शुभाशी देई राव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अंतरांत क्रोध । दाखवावा मोद कैसा वरी ॥ ८ ॥

अध्याय १४ वा ३७

आज्ञा घेऊनि नृपाची । धर्म भेटे गांधारीसी ॥ १ ॥
तदा शापावया सिद्ध । असतां प्रगट होती व्यास ॥ २ ॥
तिचा भाव ओळखूनि । म्हणती शांत होई मनीं ॥ ३ ॥
स्वमनीं जें योजिलेंसी । अयोग्य तें या समयासी ॥ ४ ॥
नसे वेळ ही कोपाची । अंतरांत धरीं शांति ॥ ५ ॥
पुत्रें प्रार्थितां विजयार्थ । वदलीस तें झालें सत्य ॥ ६ ॥
वदलीस तू वारंवार । ' धर्म तेथेंचि विजय' ॥ ७ ॥
त्यजीं कोप तें स्मरूनि । कर्तव्यही ध्यानीं आणीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे व्यास । म्हणता न देई वो शाप ॥ ९ ॥

३८

गांधारी बोलली द्वैपायनाप्रति । द्वेष, नाशबुद्धि नसे मज ॥१॥
कुंतीसम आम्हा स्नावे पांडव । परी पुत्रशोक अनावर ॥२॥
शकुनि, दुःशासन, दुर्योधन, कर्ण । संहारासी जाण मूळ तेचि ॥३॥
धर्मार्जुन भीम अथवा माद्रिसुत । सर्वथा निर्दोष जाणतें मी ॥४॥
पुत्रनिधनाचें नसे मज दुःख । दुर्योधनवध सलतो परी ॥५॥
अनापर होतां फोडियेला अंक । कृष्णाच्या समक्ष वृकोदरें ॥६॥
क्षुद्र प्राणास्तव ऐसा हा अधर्म । करिती धर्मज्ञ कैसा तरी ॥७॥
वासुदेव म्हणे गांधारीवचन । ऐकोनियां भीम वदला ऐका ॥८॥

अध्याय १५ वा ३९

नम्रभावें भीम बोलला निर्भय । माते, हा सदय क्षमा करीं ॥१॥
धर्माधर्म जो कां घडला भयानें । अपरिहार्यतेनें रक्षणार्थ ॥२॥
धर्मयुद्धें कोण वधिता दुर्योधना । यालागीं तूं क्षमा करणें मज ॥३॥
वधितां तेणें मज अनर्थाचि होता । यास्तवाचि अंका फोडियेलें ॥४॥
तेसाचि आमुचा छळ जो जाहला । अधर्माचि केला द्यूतामाजी ॥५॥

रजस्वला साध्वी ओढिली सभेंत । दुष्कर्मे असंख्य आचरिलीं ॥६॥
वाम अंक जेव्हां दाविला कृष्णेसी । वधार्ह तदाचि दुर्योधन ॥७॥
परी धर्माज्ञेनें राहिलों तें स्वस्थ । केला हा वैरान्त आजो रणीं ॥८॥
वासुदेव म्हणे भीमाच्या भाषणें । गांधारी दुःखानें वदली तया ॥९॥

४०

भीमा, तूं पुत्राची करिसी प्रशंसा । वध तेणें त्याचा समजेना मी ॥१॥
अपराध त्याचे होते, हेंही सत्य । प्राशिलेंसी रक्त कैसें परी ॥२॥
भीम म्हणे अन्य रक्त प्राश्य नये । प्राशिलें न माये रंजित मी ॥३॥
बांधवाचें रक्त प्राशीन मी कैसें । दुजाभाव मातें नसे त्याचा ॥४॥
ओष्ठ स्पर्शमात्र केला रुधिरासी । पूर्ति प्रतिज्ञेची तेणें माझ्या ॥५॥
थेंबही रक्ताचा वदनीं न गेला । एक रंगा यमाला बोध त्याचा ॥६॥
शंका ही न घेई अन्याय्य कृत्याची । न लावीं आम्हांसी दोष माये ॥
वासुदेव म्हणे गांधारीसी भीम । म्हणे निवारण कां न केलें ॥८॥

४१

म्हणे गांधारी भीमासी । रक्षिलें न एखाद्यासी ॥१॥
रक्षितासी या अंधाची । भीमा, एक तरी यष्टि ॥२॥
तरी इतुकें न दुःख । आम्हांप्रति हातें सत्य ॥३॥
ऐसें बोलूनि क्रोधानें । धर्मालागीं पाचारिलें ॥४॥
कर जोडुनियां धर्म । वंदी पुढती येऊन ॥५॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । परदुःखें मानी खेदा ॥६॥

४२

युधिष्ठिर म्हणे माय वो मी धर्म । दुःखासी कारण सकलांच्या ॥१॥
वधिता त्वत्पुत्र राक्षस हा जाण । शापूनियां भस्म करीं माझें ॥२॥
पृथ्वीविनाशक, मित्रद्रोही, पापी । राज्य, जीवितही नको मज ॥
भयाकुल धर्म बोलला जें ऐसें । रोधला तैं दुःखें सोडी श्वास ॥४॥
स्पर्शितां चरण नखाग्रें धर्माचीं । येतां दृष्टिपथीं कुनखें होतीं ॥५॥
बद्धनेत्रांचें हें पाहूनि सामर्थ्य । कृष्णाआड पार्थ लपला तदा ॥६॥
ऐसा कांहीं वेळ जातां गांधारीनें । दुःख आंवरिलें विवेकानें ॥७॥
वासुदेव म्हणे पुढती मातसम । गांधारी सांत्वन करी प्रेमें ॥८॥

४३

गांधारीची आज्ञा घेवोनियां वीर । भेटले रणधीर कुंतीलागीं ॥१॥
माता बालकांसी करी अवलोकन । अंगाची चाळण झाली त्यांच्या ॥
मातृहृदय तें द्रवल लोण्यासम । कुरवाळी वदन एकेकाच ॥३॥
पौत्रांसी स्मरूनि जाहली व्याकुळ । नेत्रां खळखळ वाहे नीर ॥४॥
पुत्रशोकें कृष्णा लोळतां देखिली । प्रेमें बोध करी कुंती तिज ॥५॥
गांधारीसी कुंती भेटली पुढती । याज्ञसेनी होती संगे तिच्या ॥६॥
दुःखमग्न तदा होती सकलही । कृष्णेसी गांधारी बोध करी ॥७॥
कुंतीलागीं बोले समदुःखी आम्ही । विदुराची वाणी सत्य झाली ॥
रडूं नको कोण निवारील दैवा । बोधील उभयां कोण सांगें ॥९॥
वासुदेव ह्मणे विनाश कुळाचा । बोले सुबलसुता कुंतीलागीं ॥१०॥

---

## स्त्रीविलापपर्व २

अध्याय १६ वा

४४

जनमेजयासी निवेदिती मुनि । यापरी बोलूनि सुबलसुता ॥१॥
दिव्य दृष्टीनेंचि पाही समरांगण । अलौकिक पुण्य त्या साध्वीचें ॥
महा पातिव्रत्य समान व्रतातें । न सोडी सत्यातें कदाकाळीं ॥३॥
उग्र तप तेंवी द्वैपायन कृपा । तेणेंचि सामर्थ्या पावली या ॥४॥
भयप्रद प्रेताकीर्ण रणांगण । पाहिलें दुरून जवळी जैसें ॥ ५ ॥
पुढती व्यासाज्ञेनें पांडवांसमेत । श्रीकृष्णप्रमुख धृतराष्ट्र ॥ ६ ॥
कुरुस्त्रियांसवें पातला रणांत । मांडिती आकांत विधवा तदा ॥७॥
वासुदेव म्हणे भयाण स्मशान । रुद्रक्रीडा स्थान दिसलें रण ॥८॥

४५

टाहो फोडूनियां कवटाळिती प्रेतें । हस्तचि कोणाचे नव्हते पाद ॥
आक्रोश तयांचा ऐकूनि गांधारी । अवलोकीं बोलली कृष्णा दुःखें ॥
गतधवा स्नुषा आक्रंदती माझ्या । सांत्वनासी त्यांच्या कोण जाई ॥
वीरपत्नी वीरमातांच्यास भूमी । हाय ही पाहोनि परम दुःख ॥४॥

भीष्म, द्रोण, कर्ण, अभिमन्यु, द्रुपद । एथ प्रेतरूप दिसतो योद्धे ॥
छिन्नविच्छिन्न हीं शरीरें वीरांचा । गृध्र-काक यांची भक्षितातो ॥६॥
गोमायु, गरुड ओढनियां नेती । नेत्र फोडितातो चंच्वाघातें ॥७॥
वासुदेव म्हणे वर्णवेल मज । सामान्य स्वरूप दुःखाचें हें ॥८॥

४६

कृष्णा, मृदुशय्येवरी । शयन जयांचें मंदिरीं ॥१॥
भूमीवरी त्यांचीं प्रेतें । भक्ष्य होती श्वापदांचें ॥२॥
भाट ज्यांचे गाती गुण । पुढती त्यांच्या घोर स्वन ॥३॥
कृष्णागरु चंदनउटे । धळांमाजो ते लोळती ॥४॥
दिसती कोणी शस्त्रधारी । घांव घेता शवत्रुंपी ॥५॥
श्वापदांनीं हीं शरीरें । विदारिलीं पहा कायें ॥६॥
तुटल्या माळा, फुटले मणि । कर शिरावीण कोणी ॥७॥
वासुदेव म्हणे स्त्रिया । प्रेतें धुंडिती त्या ठाया ॥८॥

४७

अवलोकीं कृष्णा, कौरवललना । कमललोचना विधवा झाल्या ॥
वदनें तयांचीं सुकूनियां गेलीं । वाटे ही पातली प्रलयवेळ ॥२॥
शोधितांहा कोणा पती न लाभतां । विच्छिन्न तयांचीं गात्रें झालीं ॥
हस्तपाद शिर जोडनि पाहतां । निराशा पावती परी अंतां ॥ ॥
नेत्र-नासिकादि विच्छिन्न जाहल्या । छिद्रें त्या केल्या श्वापदांनीं ॥
शिरावीण धड केवळ मस्तक । ओळख कोणातें न करावी ॥६॥
पिता, पुत्र, भ्रात पाहनि कोणातें । जीवित नकोरे होई कृष्णा ॥
पीटिती कपाळ ओढितातीं केश । करितो आक्रोश सकळ स्त्रिया ॥
कृष्णा, काय माझें पाप पर्वजन्मा । जाहलें, म्हणोनि वेळ ऐसी ॥
वासुदेव म्हणे गांधारी इतुक्यांत । दुर्योधनप्रेत अवलोकी ॥१०॥

अध्याय १७ वा

४८

पाहोनि तें प्रेत भग्न कदलीसम । दुःखार्त होउनि पडली खालीं ॥
पुढती सावध होऊनि पुत्राचे । धरूनि पोटाशी शोक करी ॥२॥
दुःखधूर्नी त्याचें भिजावलें वस्त्र । बोलली कृष्णास दुःखें देवी ॥३॥

आशीर्वाद मज मागतां पुत्रानें । वदलें 'धर्म तेथें जय' बाळा ॥४॥
मोह न पावतां लढसील जरी । वधिलें स्वर्ग तरी पावसील ॥५॥
वासुदेव म्हणे गांधारी इतुक्यांत । दुर्योधनप्रेत अवलोकी ॥६॥

४९

कैसें धृतराष्ट्र साहील हें दुःख । पडला वीरपुत्र समरीं कैसा ॥१॥
ज्याच्या भोंवती पूर्वीं रम्य स्त्रिया । श्वापदेंचि तया सभोंवतां ॥२॥
भूतलाचे राजे स्ताविती ज्यासी । गिधाडें तयासी वेष्टिताती ॥३॥
स्त्रियांच्या ऐवजीं अद्य क्रूर पक्षी । वारा घालिताती पुत्रालागीं ॥४॥
भीम सिंहें गज पाडिला हा रणीं । अकरा अक्षौहिणीपती गेला ॥५॥
मंदभाग्य नाश पेरिलें क्षत्त्याचें । प्रत्यक्ष पित्यातें अवमानिलें ॥६॥
कृष्णा, प्राण कैसे राहतील माझे । काय आशा मातें आतां सांगा ॥
वासुदेव म्हणे दुर्योधनमाता । पुत्रास्तव ऐसा शोक करी ॥८॥

५०

म्हणे गांधारी कृष्णासी । पहा, पहा, भानुमती ॥१॥
कवटाळूनियां पुत्रासी । हस्तें कुरवाळी पतीसी ॥२॥
लक्ष्मण तैं दुर्योधन । प्रेतें जवळी घेऊन ॥३॥
रात्रंदिवस हे करी शोक । प्रेतावरी टाकी अंग ॥४॥
कमलासम जिची कांति । वर्ण पांडूर तेजसी ॥५॥
पडला हाय ती निःस्तब्ध ।भानुमती हंत हंत ॥६॥
वेदशास्त्र सत्य जरी । बाळालागीं स्वर्ग तरी ॥७॥
वासुदेव म्हणे माता । इच्छी स्वर्गसौख्य सुता ॥८॥



५१

गांधारी बोलली कृष्णा, जित क्लांत । पुत्र हे रणांत पडले माझे ॥१॥
गदाघातें भीमें वधिलें तयां वीरां । पाहूनि स्नुषांतें खेद बहु ॥२॥
भूषित चरणें चालल्या प्रासादीं । रक्तसिक्त भूमि तुडविती त्या ॥३॥
वृद्धा, तरुणी किती आक्रंदती येथें । हृदयीं मस्तकें कवटाळिती ॥४॥
हाय हाय कर्मभाग भोगावाण । न संपोचि जाण यदुनाथा ॥५॥
हाय ज्या अंगना दिसल्या न कोणा । धांवती या स्थाना सैरावैरा ॥६॥

सामान्यही जन यांसी अवलोकिती । विखुरलेलीं किती शस्त्रे पथ ॥
वासुदेव म्हणे दुःशासनप्रेत । पाहूनियां दुःख करी माता ॥८॥

५२

ज्येष्ठ भ्रात्यास्तव कठोर भाषणें । दुखविलीं मनें सज्जनांचीं ॥१॥
दुर्योधनासी तैं बोधिलें मी कृष्णा । रुचलें न मना त्याच्या परी ॥२॥
अंतीं हा प्रसंग आला आम्हांवरी । पडला हा रणीं दीर्घबाहु ॥३॥
हाय याचें रक्त प्राशिलें भीमानें । निंद्य या दुष्कर्मे झाला भीम ॥४॥
वासुदेव म्हणे आठवूनि वृत्त । गांधारीचें चित्त खेद पावे ॥५॥

अध्याय १९ वा ५३

कृष्णा, पहा हा विक्रम । ज्ञाते देती जया मान ॥१॥
झाले भीमगदाघातें । खंड खंड या शरिराचे ॥२॥
क्रूरपक्षी श्वापदांसी । निवारिते कांता त्याची ॥३॥
कृष्णा, वीर हा दुर्मुख । पहा पडला धूलीव्याप्त ॥४॥
चित्रसेनाच्या भोंवता । स्त्रिया आक्रोश मांडिती ॥५॥
कृष्णा, विविंशतिमुख । पहा रेखीव सुरेख ॥६॥
दुःसहाचें हें शरीर । रोमांपरी घुसले शर ॥७॥
शोभताती कनकमाळा । श्वेतपर्वत शोभला ॥८॥
वासुदेव म्हणे हाय । माता मोकलिते धाय ॥९॥

अध्याय २० ५४

कृष्णा, अभिमन्यु तुम्हांहूनि बळी । कोसळे संगरीं महा तरु ॥१॥
पहा हो उत्तरा स्नुषा अर्जुनाची । शोकमग्न केली दुःख करी ॥२॥
उचलोनि पतिवदन चुंबित । प्रेमें न्याहाळित अंग त्याचें ॥३॥
सोडूनि कवच फिरवी दुःखें हात । मारूनियां हाक वदते तुज ॥४॥
कृष्णा, तुझ्यासम आकृति जयाची । गुणही जयाची तुझ्यासम ॥५॥
भागिनेय तुझा पडला भूमीवरी । रुंदेदा अंतरीं ध्यास तुझा ॥६॥
वासुदेव म्हणे उत्तरेची वाणी । जाई विदारूनि हृदय माझें ॥७॥

५५

मृदु शय्येवरी जाण । रंकुभृगाचें अजिन ॥१॥
अंथरूनि शयन करी । पता माझा तो भूवरी ॥२॥
टोंचती न कीं हे खडे । कां हो पडलांती उघडे ॥३॥
श्रांत झालांती लढूनि । तेणें निद्रा हो नयनीं ॥४॥
पाहूनियां मजसी दूर । संभाषणासी अधीर ॥५॥
नाथ आजी कांहो ऐसे । अबोला हा धरितां मातें ॥६॥
अपराध काय झाला । लोटूनि कां मज गेलां ॥७॥
वासुदेव म्हणे हाय । उत्तरा ती दीन गाय ॥८॥

५६

बोले गांधारी कृष्णासी । ऐकें वाणी उत्तरेची ॥१॥
पडलांती कैसे रणा । पता शूर धनुष्पाणी ॥२॥
ऐकूनियां हें दुर्वृत्त । कैसें कंठील आयुष्य ॥३॥
सत्कर्म ज पुण्यगति । लाभलीसे तुम्हांप्रति ॥ ४ ॥
तेथें येईन मी देवा । लोभ मजवरी करावा ॥ ५ ॥
प्राण कैंचो हे न जाती । न टळे दुर्दैवाची गति ॥ ६ ॥
चतुर सस्मित ते वाणी । कोणा वदाल ते स्वामी ॥ ७ ॥
अथवा काय तुम्हां न्यून । व्हाल स्वर्गात रममाण ॥ ८ ॥
स्मरण देईल कां माझें । दुर्दैवाचे घोर हातें ॥ ९ ॥
नाथा, षण्मासचि पूर्ण । सेवियेले हे चरण ॥ १० ॥
वासुदेव म्हणे ऐसें । अंत्यवाक्य उत्तरेचें ॥ ११ ॥

५७

इतुक्यांत येती मत्स्यराजस्त्रिया । नेती अन्य ठाया उत्तरेसी ॥ १ ॥
तोंचि विराटाचें पाहूनियां प्रेत । अनावर दुःख तयां होई ॥ २ ॥
द्रोणशरांवद्ध जाहला विराट । श्वापदें तयास ओढिताती ॥ ३ ॥
निवारितां त्यांचें न होई वारण । स्त्रिया दुःखमग्न होती बहु ॥ ४ ॥
आतपतप्त त्या विवर्ण जाहल्या । गांधारी कृष्णाला दावीतसे ॥ ५ ॥

उत्तर, कांबोज, लक्ष्मणादि वीर। हाय रणधीर पडले रणीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुढती गांधारी । कर्णास्तव करी शोक बहु ॥ ७ ॥

अध्याय २१ वा ५८

पार्थपराक्रमजलें । कर्णाग्नीसी शांत केलें ॥ १ ॥
केशवा, हा महावीर । कौरवांचा मुख्य धीर ॥ २ ॥
स्त्रिया त्याच्या करिती शोक। पडला वातभग्न वृक्ष ॥ ३ ॥
वृषसेनाची हे माता। हाय करिते विलापा ॥ ४ ॥
कर्णा, भार्गवाचा शाप । अंतीं नडला तुजसी देख ॥ ५ ॥
कर्णमाता करी शोक। प्रेमें हुंगी पुत्रमुख ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा। शोक ऐकवेन त्याचा ॥ ७ ॥

अध्याय २२ वा ५९

गांधारी बोलली यदुरायाप्रति । अवंतीचा पती अवलोकीं हा ॥ १ ॥
प्रतीपाचा पुत्र पहा हा बाल्हिक । पशु पक्षी हिंस्र भक्षिती यां ॥ २ ॥
यदुश्रेष्ठा, पाहा दुःशलेचा कांत । वीर जयद्रथ पडला रणीं ॥ ३ ॥
कन्या माझी शोक करी तयास्तव। आणिलें वैधव्य बांधवांनीं ॥४॥
वनांतचि याचा व्हावयाचा वध । परी भगिनीस्तव सुटला तदा ॥५॥
प्रेम तें धर्माचें अद्य कोठें गेलें । असह्य हें झालें दुःख कृष्णा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गांधारीचा शोक। झाला जामात्यार्थ असह्यचि ॥ ७ ॥

अध्याय २३ वा ६०

केशवा, प्रत्यक्ष मातुल हा शल्य । नकुळाचा, अद्य पडला एथें ॥ १ ॥
तेजोवध येणें केला रे कर्णाचा । धिक्कारचि साचा असो यासी ॥२॥
गृध्र याची जिव्हा पहा ओढीतसे । कुलस्त्रिया त्यातें कवटाळिती ॥
भगदत्तही हा पडला वीर एथें । दमवूनि पार्थातें पडला अंतीं ॥४॥
कौरवकुळाचा आधार हा भीष्म । शरतल्पीं प्राण धरूनि राही ॥५॥
वीर याच्यासम नसे कोणी अन्य । ज्ञाता हा धर्मज्ञ बुद्धिदाता ॥६॥

द्रोणाचार्य सर्व वीरांचे हे गुरु । पडले काय करूं नसहे दुःख ॥ ७ ॥
कृपीचा हा शोक पाहें अनावर । अंत्यविधि विप्र करिती पाहें ॥८ ॥
वासुदेव म्हणे आठवूनि गुण । गांधारी दारुण शोक करी ॥ ९ ॥

अध्याय २४ वा ६१

पहा पहा हा माधवा । महावीर भूरिश्रवा ॥ १ ॥
सोमदत्ताचा हा पुत्र । हाय घोर हा संहार ॥ २ ॥
सिंहकटी त्याची भार्या । पहा झाली शोकाकुला ॥३॥
सात्यकीचें घोरकर्म । कोण म्हणेल तो धर्म ॥४॥
मूळ सर्व अनर्थाचें । कृष्णा, पाहीं या शकुनीतें ॥५॥
आढितातो या शकुन । केला मत्पुत्रांचा अंत ॥६॥
गेला हाही स्वर्गामाजी । पुत्रां न देवो दुर्बुद्धि ॥७॥
ऐसा उपाय माधवा । न कळे काय रे करावा ॥८॥
वासुदेव म्हणे ऐसा । शोक साध्वी गांधारीचा ॥९॥

अध्याय २५ वा ६२

कांबोजास्तरणां योग्य ज्या शयन । कृष्णा, धुलिमग्न कांबोज तो ॥१॥
कलिंगही पहा पडला रणांत । नृपाळ, मागध, द्युमत्सेन ॥२॥
बृहद्बल तेवी धृष्टद्युम्नसुत । केकय, द्रुपद्र, धृष्टकेतु ॥३॥
भार्या त्यांच्या कृष्णा,करिताती शोक । काल हा विपरीत पातलासे ॥
विफल ते यदा झाले तुझे यत्न । शांतनव भीष्म वदले तदा ॥५॥
आतां या पुत्रांची न धरावी आशा । शब्द तो तयांचा सत्य झाला ॥
बोलतां बोलतां ऐसें गांधारीसी । मूर्छना ते गांठी टाकी अंग ॥७॥
वासुदेव म्हणे संतप्त ते झाली । कृष्णासी बोलली कटु शब्द ॥८॥

६३

कृष्णा, विनाश हा पाहिलासी कैसा । परस्पर नाश प्रवर्तता ॥१॥
समर्थ तूं शाक्तिसंपन्न असूनि । सन्मान्य असूनि उभयत्र ॥२॥
बुद्ध्याचि तूं एक राहिलासी स्वस्थ । यास्तव हा शाप भोगीं आतां ॥
पतिशुश्रूषेच्या पुण्यें गदाधरा । शापितें तुजला यादवेंद्रा ॥४॥
ज्ञातिबांधवांचा करिसील वध । अंतीं अप्रसिद्ध मरणें मृत्यु ॥५॥

छत्तीस वर्षांनीं घडेल हें सत्य । करितील शोक सकल स्त्रिया ॥६॥
स्मितहास्यें तदा बोलला श्रीकृष्ण । क्षत्रियें, पेषण पिष्टाचें हें ॥७॥
परस्परनाश तयांचा निश्चित । कोण अन्य त्यांस वधिता असे ॥८॥
ऐकूनि ते शब्द पांडव उद्विग्न । वासुदेव मन खिन्न होई ॥९॥

---

## श्राद्धपर्व २

अध्याय २६ वा ६४

कृष्ण म्हणे बो गांधारी । ऊठ शोक हा आंवरीं ॥१॥
फळ तुझ्याचि कर्माचें । घडतां दोष काय मातें ॥२॥
मृत, नष्टास्तव शोक । अये, करणें निरर्थक ॥३॥
नष्टाचा न पुनर्लाभ । शोकें वाढतसे शोक ॥४॥
तपार्थचि ब्राह्मणीचा । गर्भ जाणावा बो साचा ॥५॥
धेनु प्रसवे वृषभार्थी । तुरंगी ते चपलाश्वासी ॥६॥
प्रसवे शूद्रा त सेवका । पशुपालाप्रति वैश्या ॥७॥
समरीं मरणास्तव मानीं । क्षत्रियेचा पुत्र जनीं ॥८॥
कां बो, करिसी ऐसा शोक । कृष्ण वदला कटु वाक्य ॥९॥
वासुदेव म्हणे तदा । पावे गांधारी स्तब्धता ॥९॥

६५

धृतराष्ट्र तदा बोलला धर्मासी । सकल मृतांची संख्या कथीं ॥१॥
धर्म ह्मणे अठरा अक्षौहिणी सैन्य । पावलें निधन संग्रामीं या ॥२॥
धृतराष्ट्र म्हणे कोणा काय गति । धर्मा, तें निवेदीं मजलागीं ॥३॥
धर्म म्हणे हर्षें लढले तयांसी । स्थान अमरावती प्राप्त झालें ॥४॥
उदासीनांलागीं गंधर्वांचा लोक । पळतां वधिलें ज्यांस गुह्यक ते ॥५॥
असहाय छिन्न-विछिन्न जे तयां । ब्रह्मलोक राया, प्राप्त झाला ॥६॥
येनकेन मार्गें रणभूमीमाजी । पडले तयांप्रति पुण्यलोक ॥७॥
वासुदेव म्हणे ऋषींच्या प्रसादें । दिव्य ज्ञान होतें धर्माप्रति ॥८॥

६६

सनाथ अनाथ वीर हे असंख्य । बोलला धृतराष्ट्र धर्माप्रति ॥१॥
इतक्यांचें कैंवी होईल दहन । कर्मासम स्थान लाभो तयां ॥२॥
पुरोहिताप्रति पाचारूनि धर्म । म्हणे अंत्यकर्म व्हावें यांचें ॥३॥
संजय, विदुर, युयुत्सु आदिक । अग्नि यां देवोत सकलांसी ॥४॥
ऐकूनि ते आज्ञा कर्पूर,चंदन । अगरु घृत जाण महावस्त्र ॥५॥
तैल, काष्ठभार तैंवी भग्नरथ । मेळवूनि अंत्यकर्में केलीं ॥६॥
थोर थोरांप्रति यथाक्रम अग्नि । देऊनियां अंतीं सकल दाह ॥७॥
निर्धूम ज्वालांनीं व्यापिलें गगन । जाहलें दहन सकलांचें ॥८॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्रप्रमुख । जाई धर्मराज गंगेवरी ॥९॥

अध्याय २७ वा

६७

विशाल पावन गंगेच्या तटाकीं । स्त्रिया उतरीती अलंकार ॥१॥
सद्गदिताचित्तें गंगेमाजी येती । तिलांजली देती पुत्र-पौत्रां ॥२॥
श्वशुर, बंधु, पति अठवूनि सारे । उदक अर्पिलें तयांप्रति ॥३॥
निवेदावें कैंवी दुःख जें तयांचें। गढुळ गंगेचें उदक होई ॥४॥
वासुदेव म्हणे दुःखाचा सागर । होई अनावर अविवेकानें ॥५॥

६८

पुढती उदास जाहलें पुलीन । करी आक्रंदन कुंती तदा ॥१॥
पाचारूनि दुःखें निजपुत्रांप्रति । बोलली तयांसी आर्तदुःखें ॥२॥
महा धनुर्धारी बलाढ्य तो कर्ण । मत्पुत्र जाणुन उदक द्यावें ॥३॥
सूर्यतेजें मज लाभला तो वीर । बोलतां हें उर दाटे तिचें ॥४॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां धर्म । व्याकुळ होऊन वृत्त पुशी ॥५॥

६९

कुंतीमुखें वृत्त ऐकूनियां धर्म । कर्णाचा विक्रम गाई प्रेमें ॥१॥
म्हणे हाय हाय दुःखित मी अद्य । परी बंधुवधदुःख थोर ॥२॥
कळतें हें जरी पूर्वींच मजसी । तरी वेळ ऐसी पावतों ना ॥३॥
त्रैलोक्य राज्यही नव्हतें दुर्लभ । जरी कर्णवृत्त कळतें पूर्वी ॥४॥
वासुदेव म्हणे अज्ञान अल्पही ।अनर्थ घडवी मोठमोठे ॥५॥

७०

यापरी बहुत करूनि विलाप । केलें अंत्यकृत्य कौंतेयानें ॥१॥
तदा सकलांनीं आक्रोश मांडिला । दुःखासी नुरला अंत त्यांच्या ॥२॥
गुप्त वृत्तें ऐसा घडला बंधुवध । झाला बहु खेद तेणें धर्मा ॥३॥
तया दुःखें धर्म बोले यापुढती । ललना न राखेती गुह्य कांहीं ॥४॥
बोलूनियां ऐसें दुःखाकुल धर्म । बैसला येऊन तीरावरी ॥५॥
वासुदेव म्हणे असो कृष्णार्पण । पर्व हें दारुण दुःख हरो ॥६॥

## स्त्रीपर्व समाप्त

या स्त्रीपर्वाची एकंदर अभंगसंख्या ७०

# तृतीय खंड समाप्त

या तृतीय खंडांत आलेल्या एकंदर अभंगांची संख्या १५२५

॥ भगवान् गोपालकृष्णार्पणमस्तु ॥

---

पुढील शांतिपर्वाचा आद्यश्लोक—

वैशंपायन उवाच—

कृत्वोदकं ते सुहृदां सर्वेषां पांडुनंदनाः ॥
विदुरो धृतराष्ट्रश्च सर्वाश्च भरतस्त्रियः ॥ १ ॥

श्रीमद्भगवद्गीतेची

# आरती

—०—

आरती ज्ञानगंगे । गीतामाते शुभांगे ॥

अष्टादश प्रवाहांनीं । केलें पावन जगातें ॥ आरती०

सप्तशत दिव्य श्लोक । तेचि ज्ञानामृतकुंभ ॥

अनासक्त कर्म, भक्ति । तेंवी योगही अष्टांग ॥ १ ॥

वेदार्थ साररूपें । कल्पवृक्षासम ऐसे ॥

दाखवूनि पंथ लोकां । योजियेलें स्व-स्वमार्गें ॥ २ ॥

आई, तुज काय वानूं । ज्ञानाची तूं कामधेनु ॥

रोमरोमीं ज्ञान कोंदे । हरि होई अणु-रेणु ॥ ३ ॥

अखंड ज्ञानरूप । तेववूनि नंदादीप ॥

अभंग-गीतागानें । वासुदेव कृष्णरूप ॥ ४ ॥

राष्ट्रीय कीर्तनकार श्री. कोल्हटकर यांचें

## राष्ट्रीय संग्राह्य वाङ्मय

| | |
|---|---|
| कीर्तन मंदाकिनी—तरंग ४ ( चार पुस्तकें ) | १–२–० |
| चैतन्य ग्रंथमाला— | |
| १ महाराणा-प्रताप ( उत्कृष्ट चरित्र ) | १–४–० |
| २ राम-गीत-सुधा ( गद्यपद्यात्मक रामायण भाग १ ला ) | २–०–० |
| ३ राम गीत सुधा ( ,, ,, भाग २ रा ) | ३–०–० |
| ४ रूपनगरची राजकुमारी ( चरित्र आणि गीतें ) | ०–६–० |
| ५ सम्राट् सुभाष ( आवृत्ति २ री ) चरित्र आणि गीतें | ०-१०-० |
| ६ सुलभ कीर्तन-संग्रह | ०–८–० |
| ७ धर्मचैतन्य शिक्षण ( पुस्तक १ लें ) आवृत्ति ४ थी | ०–८–० |
| ८ धर्मचैतन्य शिक्षण ( पुस्तक २ रें ) | १–८–० |
| ९ विदुराची अभंग-नीति | ०–८–० |
| १० अभंग–भारत ( खंड १ ला ) | ५–०–० |
| ११ ,, ,, ( खंड २ रा ) | ७–८–० |
| १२ ,, ,, ( खंड ३ रा ) | ७–८–० |

—आगामी प्रकाशनें—

१ अभंग–भारत ( खंड ४ व ५ )
२ कीर्तनकला आणि शास्त्र ( शास्त्रीय ग्रंथ )
३ धर्मचैतन्य शिक्षण ( पुस्तक ३ रें )
४ अभंग–भागवत

पत्ता—व्यवस्थापक, धर्मचैतन्य संस्था,
सदाशिव पेठ, पुणें २.